# पैसा

Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-009213

## नारायण गोविंद चापेकर

बर्कचें चरित्र’, ‘निवडक लेख’, ‘गच्चीवरील गप्पा’, ‘आमचा गांव’ या पुस्तकांचे कर्ते,

बदलापूर ( ठाणें )
शके १८५२

मुद्रकः— सीताराम वासुदेव फडणीस, बी. ए.
'आर्यसंस्कृति-मुद्रणालय',
१९८ (१८), सदाशिव पेठ, टिळकरस्ता, पुणें नं. २

X61
G1

सूचना:-शुद्धिपत्राप्रमाणे पुस्तकांत बदल करून नंतर वाचनास सुरवात करावी.

9213

प्रकाशकः-नारायण गोविंद चापेकर
बदलापूर, जिल्हा ठाणें

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

यत्र यादृग्व्यवहारस्तत्र तादृक्प्रकल्पयेत् ।
रजतस्वर्णताम्रादिव्यवहारार्थमुद्रितं ॥
व्यवहार्यं वराटाद्यं रत्नान्तं द्रव्यमीरितं ।
सपशुधान्यवस्त्रादितृणान्तं धनसंज्ञकं ॥
व्यवहारे चाधिकृतं स्वर्णाद्यं मूल्यतामियात् ।
कारणादिसमायोगात्पदार्थस्तु भवेद्भुवि ॥

शुक्रनीति

जॉव्हन्स साहेबांचें एतद्विषयक इंग्रजींत लिहिलेलें पुस्तक वाचीत असत पैशाचा इतिहास मोठा मनोरंजक वाटला; व नाणें पाडण्याचें शास्त्र असून त्यांत कितीतरी गोष्टींचा विचार करावा लागतो हें पाहून कौतुक वाटलें; मराठींत अशा विषयावर ग्रंथ नाही म्हणून व मराठी वाचकांना ह्या व अशासारख्या दुसऱ्या विषयांच्या अध्ययनाने प्रत्यक्ष फायदा होण्याचा कांही संभव नसला तरी त्यामुळे त्यांच्या विचारशक्तीस विकास होण्यास चांगली मदत होईल अशा उद्देशाने ह्यांचें पुस्तक लिहिलें आहे.

विद्यमान पुस्तक लिहिण्याचा हा एक हेतु आहे खरा; तथापि तो प्रधान नव्हे. मराठी वाचकवर्गच जर अद्यापि निर्माण झाला नाही तर वाचकांची मनःसंस्कृति करण्याचा प्रयत्न अकालीं होय हें उघड आहे. आता मराठी वाचकवर्ग तयार न होण्याला कारण केवळ अज्ञान होय. शिक्षणाचा प्रसार जसजसा जास्त होईल व शिक्षित लोक आपली जबाबदारी जसजशी जास्त ओळखूं लागतील तसतसा वाचकवर्गहि अस्तित्वांत येऊन वृद्धिंगत होत जाईल यांत शंका नाही.

इंग्रेजी भाषेच्या प्रसारामुळे मराठी वाङ्मयाच्या पुष्टीला प्रत्यवाय येतो हा जो कित्येकांचा समज आहे तो अज्ञानमूलक व निष्प्रमाण दिसतो. विश्वविद्यालयाच्या क्रमिक ग्रंथमालेंत अन्तर्भाव न पावणाऱ्या इंग्रजी-विशेषतः शास्त्रीय-ग्रंथांचें परिशीलन करणारे पदवीधर फार विरळा. म्हणून प्राविण्य संपादन करण्याचा हेतु

नसून केवळ बुद्धिविकास व ज्ञानप्राप्ति व्हावी इतकाच ज्यांचा मानस असेल अशा पदवीधरांनी शास्त्रीयग्रंथ मराठींत कां वाचूं नये ह्यास सोपपत्तिक कारण सांपडणें कठीण आहे. शिवाय कुटुंबांत एक मनुष्य जर इंग्रेजी जाणणारा असला तर दहा माणसें इंग्रेजीचा गंधहि नसणारीं असतात. अशा स्त्रीपुरुषांकरितांच मराठी वाङ्मय होय. आता ह्यावर असा आक्षेप येण्याचा संभव की, ह्या दहाजणांत आठ माणसें लिहितांवाचतां न येणारीं निघणार, तेव्हा अशांना कितीहि सुंदर ग्रंथ असला तरी त्याचा काय उपयोग? अशा आक्षेपकांनी ही गोष्ट लक्षांत बाळगली पाहिजे कीं, लिहितां वाचतां न येणाऱ्या माणसांसुद्धा श्रवणेंद्रियानें ज्ञानाधिगम होण्याचें साधन उपलब्ध आहे. विशेषतः हाच मार्ग ज्ञान संपादण्यास सुगम होय. समग्र ग्रंथ स्वतः वाचण्यास मनाचें स्थैर्य असणें अवश्य आहे; असें स्थैर्य थोडक्यांस असतें. परंतु नुसत्या श्रवणानें श्रम न भासतां सहज ज्ञानप्राप्ति होते. म्हणून कुटुंबांतील लिहितां वाचतां येणाऱ्या प्रत्येक यजमानानें मराठी पुस्तकें विकत घेऊन तीं आपल्या अनधिगताक्षर कुटुम्बियांना दररोज नियमानें वाचून दाखविण्याचा निर्धार केल्यास मराठी वाचकवर्ग बनण्यास विलंब लागणार नाही व मराठी ग्रंथ-कारांवर आपले ग्रंथ आपणच पुनः पुनः वाचण्याचा दुर्धर प्रसंग ओढवणार नाही. कुटुंबवाचन हें सर्व सुधारणांचें मूळ आहे. सर्व समाजाची सुधारणा करूं पाह-णारांनी अगोदर आपलें घर सुधारणें अगत्याचें आहे. पण असला विचारहि कोणाच्या मनाला शिवत नाही. तात्पर्य इतकेंच की, मराठी ग्रंथांना विपुल अवकाश आहे. मात्र शिक्षितांनी आपली जबाबदारी ओळखून वागलें पाहिजे.

त्याचप्रमाणे इंग्लिश शिक्षणानें मराठी भाषेची पिछेहाट होईल असें मानण्यासहि कारण नाही. बंगाली व पारशी लोकांत महाराष्ट्रीयांपेक्षाहि इंग्रेजी शिक्षण जास्त फैलावलें आहे. असें असूनहि त्या लोकांत मातृभाषेची वाढ झपाट्यानें होत आहे; व ग्रंथकारांना अनपेक्षित उत्तेजन मिळत आहे. तेव्हां इंग्रजी शिक्षणानें मराठी वाङ्मयाच्या वृद्धीस व्यत्यय येत नाही इतकेंच नव्हे तर उलट तें पोषक आहे असें अनुमान करणें भाग पडतें.

कांही असलें तरी ही भावी आशा आहे. आजमितीस मराठी वाचकांकरितां ग्रंथ लिहिण्याची अवश्यकता विशेष भासमान होत नाही ह्यांत संशय नाही. एवढ्याचकरितां मराठी वाचकांची मनःसंस्कृति करणें हा प्रस्तुत पुस्तक लिहि-ण्याचा प्रधान हेतु नव्हे असें वर म्हटलें आहे. मराठींत ग्रंथरचना करण्याचा उद्देश

मनांत धरला म्हणजे विषयाध्ययन विशेष काळजीपूर्वक करावें लागतें व फुरसतीचा काल आलस्यांत न जातां योग्य कामाकडे खर्च होऊन लेखकाची मनःसंस्कृति होते. ह्या उघड गोष्टी मनांत बाळगून प्रस्तुत प्रयत्न केलेला आहे.

ह्या कारणासाठी सदरहू पुस्तक म्हणजे अगदीं निवळ भाषांतर नाही. हिंदुस्थानांतील द्रव्याविषयक जितकी माहिती मिळाली तितक्याचा उपयोग केला आहे. संस्कृतांतील व्याकरणग्रंथांचा उपयोग अनेक सिद्धांत प्रतिपादण्याच्या कामीं आजपर्यंत अनेकांनी केला आहे. परंतु द्रव्यशास्त्रावर मात्र त्यांचा प्रकाश अद्याप कोणी पाडल्याचें आढळांत नाही. तेव्हां प्राचीन काळीं ह्या देशांत पैशाच्या कामीं ज्या निरनिराळ्या पदार्थांचा उपयोग करीत असत त्यांची माहिती मराठी वाङ्मयांत तरी अपूर्व आहे असें वाटतें. सारांश, इंग्रेजी पुस्तक वाचून तसेंच ठेऊन दिलें असतें व मराठींत लिहिण्याची योजना झाली नसती तर उपरिनिर्दिष्ट माहिती मिळविण्याची खटपटहि झाली नसती. अजूनसुद्धा कितीतरी माहिती मिळण्यासारखी आहे. नाणें पाडण्याचे व तें चालू करण्याचे महाराष्ट्रराज्यकर्त्यांचे नियम काय होते ह्यांचें आपणास यत्किंचित्‌हि ज्ञान नाही. पेढ्यांची उत्पत्ति व त्यांच्या वाढीचा इतिहास अद्यापि कोणी लिहिलेला नाही. प्रतिनिधिभूत पैसा ह्या देशांत मुळींच कधीं सुरू न होण्याच्या कारणाचा छडा कोणी लावला नाही. असो; सांगावयाचें इतकेंच की, एतद्देशीय स्वरूप विषयास देतां येणें शक्य होतें तितकें दिलें आहे. जीव्हन्स साहेबांच्या मूळ ग्रंथांत "इंग्लंडची पेढी" व वजावाट-गृहें ह्यांचें वर्णन दिलें आहे तें मराठी वाचकांस फारसें उपयुक्त वाटणार नाही म्हणून ह्या पुस्तकांत गाळलें आहे. विषयरचनेंत वगैरे जीव्हन्स साहेबांचेंच अनुकरण केलें आहे.

कार्योपजीवी अथवा उच्छिष्टजीवी म्हणून मराठी ग्रंथकारांची अवहेलना वारंवार केल्याचें कानीं येतें. ह्याचें कारण प्रस्तुतचा काल व परिस्थिति स्वतंत्र ग्रंथरचनेस अनुकूल नाहीत हें होय. ह्याचा प्रत्यय लेखकांना येतो तसा टीकाकारांना येत नाही. विविध माहिती मिळवून सिद्धांत बनवून शास्त्र रचण्याची क्रिया विद्यमान परिस्थितींतील एतद्देशीयांकडून होणें प्रायः अशक्य आहे. उदाहरणार्थ प्रस्तुत विषयच घ्याना. दर वर्षास रुपयाची झीज किती होते हें ठरविण्यास कोट्यवधि रुपये तोलून पाहिले पाहिजेत; पण इतके जुने रुपये व निर्दोष कांटे आणि वजनें हव्या त्या मनुष्यास मिळणें संभवनीय नसतें. तथापि तेंच काम टंकाध्यक्ष सहज करूं शकेल. परंतु

असल्या सर्व महत्त्वाच्या कामांवर युरोपियन असल्यामुळे एतद्देशीयाला रुपयाची वार्षिक झीज कशी ठरवितां यावी ?

निरनिराळ्या ठिकाणांहून विविध माहिती ज्यास अधिकारपरत्वें सहज प्राप्त होते त्यास पुढे आलेल्या माहितीवरुन सामान्य सिद्धांत बांधता येतात व अशा सिद्धांतांवरून कोणत्याहि शास्त्राची उत्पत्ति होत असते. ह्यावरून हें उघड आहे की, मूळ साधनेंच ज्यांना उपलब्ध नाहीत त्यांजकडून स्वतंत्र शास्त्रीय ग्रंथांची अपेक्षा करणें म्हणजे विद्यमान परिस्थितीविषयीं अज्ञान प्रकट करणें होय. पाश्चिमात्य विद्वानांनी विविध शास्त्रांवर जें ग्रंथ लिहिले असतील त्यांचें मातृभाषेंत रूपांतर करून प्रतीच्य भाषांशीं अपरिचित असलेल्या आपल्या देशबांधवांमध्ये ज्ञानाचा प्रसार करणें हेंच सामान्यतः सांप्रतच्या सुशिक्षितांचें मर्यादित कर्तव्य होऊन बसलें आहे.

असो. पुस्तक जितक्या सोप्या भाषेंत लिहितां आलें तितकें लिहिलें आहे व विवेचनहि मुद्दाम विस्तृत केलें नाही. मराठी वाचकांना असले विषय वाचण्याची सवय नसल्यामुळे कंटाळा न येतां थोडक्यांत तो समजावा ह्याकरितां प्रस्तुत-सारख्या शास्त्रीय विषयावरील ग्रंथ सध्याच्या स्थितींत फार मोठे नसावे अशी माझी समजूत आहे. त्याचप्रमाणे मराठी विद्यार्थ्यांच्यासुद्धा उपयोगी पडावे म्हणून द्विधातुपरिमाणवादासारख्या वादग्रस्त विषयाचें विवेचन हेतुपुरःसर दोन्ही पक्षांच्या मुद्यांचें निदर्शन करण्यापलीकडे जास्त केलें नाही. परराष्ट्रीय हुंड्यांवरील भाग गॉशन साहेबांच्या सुप्रसिद्ध ग्रंथाच्या आधाराने लिहिला आहे. प्रसंगोपात्त निकलसन, क्लेअर वगैरे ग्रंथकारांची मदत घेतली आहे. पण मुख्यत्वेंकरून ह्या पुस्तकाला जीव्हन्स साहेबांच्या "पैसा" चाच आधार आहे. मराठी वाचक ह्या पुस्तकास कोणी दैववशात् मिळाल्यास त्यांस तें प्रिय होवो व तद्द्वारा त्यांचें अल्पसें तरी हित होवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करितों.

नारायण गोविंद चापेकर

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

पूर्वी ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालेल्या "पैसा" ह्या पुस्तकाचें हें पुनर्मुद्रण होय. आजमितीस जरी ह्या विषयावर अफाट वाङ्मय प्रसिद्ध झालें आहे तरीहि प्रस्तुत ग्रंथांतील प्रमेयें अद्यापि जशींच्या तशींच स्थिर आहेत. त्यांत कोणताहि फरक करण्याची अवश्यकता भासत नाही; विशेषतः ह्या पुस्तकांतील इतिहासात्मक भाग मनोरंजक असून नवीन मतांनी तो कधीहि बाधित होण्यासारखा नाही. त्यामुळे "पैसा" पुस्तकाचें पुनर्मुद्रण करावेंसें वाटलें. प्रतिनिधीभूत पैसा, वायदेचिठ्या व चलनाचा सामान्य तत्त्वें हीं प्रकरणें त्यांमधील सिद्धांतांमुळे आजच्या वाचकांसहि फार उपयुक्त होतील. कारण त्यांतील सिद्धांत जसे प्रो. जेव्हन्स ह्यांनी प्रतिपादिले आहेत तसेच आजच्या काळींहि लागू पडतात. हल्लीच्या चलनविषयक अराजक स्थितींत तर ते फारच मार्गदर्शक होतील ह्यांत शंका नाही. गेल्या दोन महिन्यांत जगांतील चलनांत जी क्रांति झाली आहे तिचें स्वरूप कळण्यास प्रस्तुत पुस्तकाचा फार उपयोग होईल असा माझा पूर्ण विश्वास आहे.

सध्याच्या काळीं राष्ट्रीय विद्यापीठें अस्तित्वांत आलीं आहेत. त्यांना, मनांत आणल्यास ह्या पुस्तकाचा उपयोग करून घेतां येईल. ह्याशिवाय सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की, चालू युगांत सर्व जगाच्या हालचालीचीं सूत्रें पैशाच्या हातीं गेलीं आहेत. धर्म व राजकारण ह्यांनाहि आर्थिक परिस्थितीपुढे नमावें लागत आहे. मनुष्यमात्राच्या प्रवृत्तीचा उगम अर्थांत दिसून येतो. इंग्लंडसारखें साम्राज्य, पण पैशाकरतां त्याची स्थिति केवळ केविलवाणी झाली आहे. राजापासून रंकापर्यंत सर्व चिंताग्रस्त स्थितींत असलेले आढळतात. पैशाच्या योगानें धर्म व नीति ह्यांचा लाप होऊं बघत आहे. स्वतःच दरिद्री बनल्यामुळे हिंदुस्थानाला स्वराज्य देऊन तेथील लक्ष्मी आपण होऊन सोडण्याचें औदार्य कोणत्याहि इंग्लिश माणसांत इतःपर आढळणें कठीण जाईल. दारिद्र्यानें सद्गुणांचा विनाश कसा होतो ह्याचें हें उदाहरण आहे. अशा परिस्थितींत पैशाचें शास्त्र हें धर्मशास्त्र होऊन बसलें आहे. म्हणून त्याचा अभ्यास प्रत्येकानें करणें अवश्य आहे.

चलनविषयक निबंध "निवडक लेखां"तून काढून ह्याच पुस्तकांत समाविष्ट केले आहेत. असें करण्याचें कारण विषयसादृश्य हें होय. धातुरूप विनिमयसामान्यावरील लेख स्वतंत्र आहे व तो माझ्या वाचनांत जो पुरावा आढळला त्यावर

आधारभूत केलेला आहे. तो पुढील शोधकांस उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. हिंदुस्थानांत नाणें प्रथम केव्हा झालें हा शोध चालू ठेवला पाहिजे; कारण तो ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. तसेंच हल्लीच्या काळीं चलन व हुंडणावळ या विषयांकडे भारतवासीयांचें पुष्कळ लक्ष लागलें आहे; अशा वेळीं "परतहुंड्या" हा निबंध मनोरंजक व उद्बोधक होईल अशी आशा आहे.

ह्याशिवाय अर्थशास्त्रावर लिहिलेल्या पुस्तकांचें जें परीक्षण मी केलें तेंहि निबंध या संग्रहांत उद्धृत केले आहेत. ह्याचें कारण त्यांत कांही स्वतंत्र विचार व माहिती ग्रथित केली आहे. व्यवहारांत गरज नसेल तेथे पैसा वापरणें हें अनिष्ट आहे असें मत एका परीक्षणांत प्रदर्शित केलें असून दुसऱ्यांत धान्य व कच्चा माल देशाबाहेर पाठविल्याने हिंदुस्थानाचें कसें नुकसान होत आहे हें दाखविलें आहे.

शुद्धलेखनमंडळाच्या निर्णयाप्रमाणे ह्या पुस्तकांतील शुद्धलेखन ठेविलें आहे.

पूर्वीचे सर्व आंकडे कायम ठेविले आहेत; फक्त जागोजाग आजची स्थिति दाखविण्याकरतां गेल्या पांच वर्षांपैकी ज्या शेवटच्या सालाचे आंकडे उपलब्ध आहेत ते दिले आहेत. हे आंकडे काढून देणें, मुद्रितें तपासणें, जरूर ते फेरबदल सुचविणें वगैरे काम प्रो. वामन नारायण गोडबोले एम्. ए ह्यांनी केल्यामुळे माझे बरेच श्रम वाचले. त्याचप्रमाणे पुस्तकाची सूचि तयार करण्याचें जिकिरीचें काम सॉलिसिटर गंगाधर विश्वनाथ गोखले यांनी केलें आहे. दोनहि मदती बहुमोल आहेत.

प्रथम पुस्तक लिहिलें तेव्हा कांही शब्द नवीन बनवावे लागले. त्यांपैकी कायदेशीर फेडीचें चलन हा एक आहे. Legal tender ह्या इंग्रेजी शब्दाचा हा मराठी शब्द अर्थवाहक आहे. जुने कागद वाचीत असतां पोतेचाल हा शब्द मला आढळला. पोतेचाल शब्द सुटसुटीत असून सार्थ आहे. पोतेचाल म्हणजे सरकारी तिजोरींत चालतो तो अगर सरकारी मान्यता ज्याच्यावर आहे असा. हा शब्द कायदेशीर फेडीचें चलन ह्याच्या ऐवजी या पुस्तकांत योजावा असें मनांत होतें. परंतु एकतर कायदेशीर फेडीचें चलन हा शब्द रूढ होऊन बसला आहे, आणि दुसरें असें की, पोतेचाल नाण्यांची माहिती अधिक मिळावयास पाहिजे ती अद्यापि मिळाली नाही. तथापि ह्याचा विचार पुढील लेखकांनी करावा म्हणून मुद्दाम उल्लेख केला आहे.

बदलापूर
देवदिवाळी शके १८५२

ना. गो. चापेकर

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| पैसा आणि विनिमयाचें साधन ... ... | १ |
| विनिमय ... ... ... ... | ६ |
| पैशापासून होणारीं कार्यें ... ... ... | ११ |
| शिकारी युगांतील पैसा ... ... ... | १५ |
| पैशाच्या द्रव्यांत लागणारे गुणधर्म .... ... | २० |
| पैशाच्या कामीं उपयोजिलेल्या धातु .... ... | ३० |
| नाणीं .... .... .... ... | ४० |
| चलनाचीं तत्त्वें .... .... ... | ५० |
| धात्वात्मक पैशाचे प्रकार .... .... ... | ६५ |
| हिंदुस्थानची धात्वात्मक चलन-पद्धति .... ... | ७८ |
| परचुटण नाणें ... .... .... ... | ९१ |
| मुख्य परिमाणवाद .... .... ... | १०३ |
| फ्रान्स् ... ... ... .... ... | ११५ |
| नाण्यांसंबंधीं विशिष्ट गोष्टी ... ... ... | १२२ |
| विनिमयाचें साधन ... .... ... | १४८ |
| प्रतिनिधिभूत पैसा .... .... ... | १४९ |
| दर्शनी हुंडी व वजावाट-पद्धति ... ... | १५० |
| प्रतिनिधिभूत पैसा ... ... ... | १५१ |
| वायदेचिठ्ठयांचें स्वरूप आणि जाति ... ... | १६० |
| कागदीचलन चालविण्याचे प्रकार ... ... | १६७ |
| सांकपत्रें ... ... ... | १८० |
| वह्यांतील जमाखर्च आणि पेढीची पद्धति... ... | १८९ |
| चेक बँक ... ... ... ... | १९६ |

परराष्ट्रीय हुंड्या ... ... ... ... १९

मोलाचें कोष्टकात्मक परिमाण ... ... २०

राष्ट्राला लागणाऱ्या पैशाची संख्या ... ... २०

आर्थिक निबंध

प्राक्कालीन अधातुरूप विनिमय–सामान्यें ... २११

धातुरूप विनिमयसामान्य अथवा नाणें ... ... २१५

ब्रिटिश अंमलापूर्वीच्या चलनासंबंधाने थोडीशी माहिती २१६

रुपया ब्रिटिशांनीच सुरू केला काय ? ... ... २३५

परत हुंड्या ( Reverse Council Bills ) ... २४५

भारतीय चलनपद्धति ... ... ... २८७

रुपया अर्थात् आमचें चलन ( पुस्तक परिक्षण ) ... २९८

जुन्या हुंड्यांचा नमुना ... ... ... ३११

# पैसा

## भाग पहिला

## पैसा आणि विनिमयाचें साधन

एकदा एक गायनकलानिपुण स्त्री आपल्या धंद्यांत पैसे मिळवण्याकरितां जगाचा प्रवास करीत असतां एका बेटांत आली. तेथें झालेल्या तिच्या गायनाबद्दल तिला तीन डुकरें, तेवीस वानर, चवेचाळीस कोंबडीं व पांच हजार नारळ ह्याप्रमाणें किफायत झाली. शिवाय नारिंगें, लिंबें वगैरे फळफळावळ मिळाली ती वेगळीच. एवढ्याची किंमत इतर देशांत पंधराशें रुपये आली असती. पण ह्या बेटांत पैसा फार दुर्मिळ असल्याकारणानें, तिला हे जिन्नस विकतां येईनात; व स्वतः इतक्याचा खप नसल्यामुळें, आपल्या पदरच्या खर्चानें, कोंबडीं, डुकरें पोसण्याचें तिला भाग पडलें.

ह्याच्या उलट, मलाया बेटांत एक गृहस्थ फिरत असतां, त्याला अन्नसामग्रीची मोठी टंचाई अनुभवास आली. त्याच्या प्रवासवृत्तांत त्यानें असें लिहून ठेवलें आहे कीं, प्रत्येक प्रसंगीं त्रास झाल्याशिवाय व आधीं तज वीज केल्याशिवाय मला कधींच खाण्याचे पदार्थ मिळाले नाहींत. ह्याचें कारण पैसे प्रचारांत नसणें हें होय. ह्याचा परिणाम असा होई कीं, आपल्याजवळ असलेले पदार्थ घेणारा जर कोणी मिळाला नाहीं तर आपणास पाहिजे ते पदार्थ समोर येऊनहि ते मिळत नसत. ह्यासाठीं ह्या गृहस्थाला, माणसास हम्मेश जरूर लागणाऱ्या सर्व पदार्थांचा संग्रह करावा लागे.

अर्वाचीन सुधारलेल्या समाजाला अदलाबदलीच्या प्राथमिक पद्धतीपासून होणारा त्रास मुळींच माहीत नाहीं व त्याची कल्पनाहि त्यास करतां येणार नाहीं. लहानपणापासून पैसा वापरण्याची सवय लागल्यामुळें त्यापासून होत असलेल्या अतर्क्य लाभाविषयीं आपल्या मनांतसुद्धां कधीं येत नाहीं. आपण आपल्याहून अगदीं भिन्न स्थितींतील समाजाकडे जर वळलों, तर मात्र पैशाच्या अभावीं होणाऱ्या अडचणींची आपणांस कांहीं कल्पना करतां येते. पुष्कळ रानटी लोकांत अद्यापि सर्व व्यापार अदलाबदलीनेंच चालतो हें सांगितलें असतां पुष्कळांस चमत्कार वाटेल. लंडनमध्यें आफ्रिकेबरोबर अदलाबदलीचा व्यापार करणारी मंडळी आहे. आफ्रिकेच्या पश्चिमकिनाऱ्यावर ह्या कंपनीचा व्यापार चालतो. युरोपांत तयार झालेला यांत्रिक माल देऊन त्याऐवजीं तेल, सोनें, हस्तिदंत, काफी, गोंद, कापूस व दुसरा कच्चा माल ते खरेदी करतात. हिमालयाच्या माथ्यावर बेगसर येथें दर जानेवारी महिन्यांत जत्रा भरते त्यावेळीं पुष्कळ ठिकाणचे लोक तेथें जमतात. त्यांत मध्यआशिआंतले लोक आपणांबरोबर आणलेले लोंकर, टांकणखार वगैरे जिन्नस देऊन त्याऐवजीं स्थानिक पदार्थ घेऊन जातात.

आपल्याजवळ असलेला पण आपणास ज्याची जरूर नाहीं असा पदार्थ देऊन त्याच्या ऐवजीं आपल्याला पाहिजे असेल तो पदार्थ घ्यावयाचा अशा रीतीनें अगदीं आरंभीं देवघेवीचा व्यवहार सुरू झाला असला पाहिजे. ह्याच साध्या व्यवहाराला आपण अदलाबदल म्हणतों. हा व्यवहार क्रयविक्रय व्यवहारापासून भिन्न आहे. कारण, ह्या दुसऱ्या व्यवहारांत बदलून घेतलेला पदार्थ आपल्या हातांत क्षणिक रहावयाचा असून त्याच्याच योगानें केलेल्या दुसऱ्या विनिमयक्रियेंत तो आपल्या हातून जातो. ह्या रीतीनें क्रयविक्रयव्यवहारांत जो पदार्थ क्षणिक मध्यें येतो त्यालाच पैसा म्हणतात. ह्यावरून प्रथमदर्शनीं असें वाटण्याचा संभव आहे कीं, पैशाचा उपयोग केल्यामुळें एका विनिमयक्रियेनें जेथें काम होत होतें तेथें दोनदा विनिमयक्रिया करण्याचा त्रास पडतो. पण अदलाबदलीच्या व्यवहाराचा जरी थोडासा

सूक्ष्म विचार केला, तरीसुद्धां असें दिसून येईल कीं, ज्यास्त त्रास ह्यांतच आहे. अशा रीतीनें अदलाबदलीच्या व्यवहारापासून होणाऱ्या नैसर्गिक अडचणींचा विचार केला म्हणजे आपणांस स्पष्ट दिसून येतें कीं, पैशाचा एकच तऱ्हेनें नव्हे तर पुष्कळ तऱ्हेनें उपयोग होतो. निरनिराळ्या प्रकारच्या पदार्थांची किंमत ठरविण्यांत, विभाग करण्यांत, व सवदा करण्यांत पैशाचें जें साहाय्य मिळतें तें जर नसतें तर हा नानाविधव्यवहारी अर्वाचीन समाज टिकला नसता.

## अदलाबदलींत सवदा जुळून येण्याची अडचण.

अदलाबदलीच्या व्यवहारांत मुख्य अडचण ही कीं, आपल्या जवळ असलेल्या जिनसांची ज्याला गरज आहे व आपल्याला जरूर असलेले जिन्नस त्याच्याजवळ आहेत व ते बदल करण्यास ज्याची हरकत नाहीं असा मनुष्य भेटणें फार कठिण पडतें. कांहीं ना कांहीं वस्तु ज्यांना पाहिजे आहे असे पुष्कळ लोक असतील व तशा वस्तू ज्यांच्याजवळ आहेत असेहि पुष्कळ असूं शकतील; पण अदलाबदलीचा व्यवहार घडून येण्यास आणखी एक योग यावा लागतो व तो क्वचित् येतो. शिकार मारून आलेल्या पारध्याजवळ पुष्कळ शिकार आहे व त्याला दुसऱ्या शिकारीच्या साधनांची गरज आहे. पण हीं साधनें ज्यांच्यापाशीं आहेत त्यांच्याजवळ जर विपुल शिकार असेल तर अदलाबदल होण्याचा संभव नाहीं. सुधारलेल्या समाजांत, एकाद्या घराच्या मालकाला आपलें घर गैरसोईचें वाटून त्याची इच्छा शेजारच्या घरावर गेली व तें त्याला अगदीं पाहिजे तसें असलें, तरी ह्या दुसऱ्या घराचा मालक आपलें घर देण्यास तयार असतांहि त्याला पहिलें घर जर पसंत पडणार नाहीं तर सवदा होणें शक्य नाहीं. एवढ्यासाठीं खरेदी देणाऱ्या घेणाऱ्यांचा योग जुळवून आणण्यास, जो पदार्थ कांहीं वेळ पतकरण्यास सर्वजण तयार असतात, म्हणजे विक्रीच्या व्यवहारांत मिळालेल्या ज्या पदार्थांचा लगेच दुसऱ्या खरेदीच्या व्यवहारांत उपयोग करतां येतो, अशा पदार्थांचा उपयोग केला पाहिजे. ह्या सर्वसाधारण पदार्थाला विनि-

मयाचें साधन अथवा विनिमयसामान्य म्हणतात. कारण व्यापाराच्या प्रत्येक व्यवहारांत तिसरा पदार्थ येतोच.

विकत देणाऱ्या इसमांचा योग जुळून येण्याची अडचण वर सांगितलीच आहे. पण ती कांहीं अंशीं हल्लीं वर्तमानपत्रांमुळें नाहींशी झाली आहे. इंग्लंडमध्यें एक वर्तमानपत्र आहे. त्यांत सर्व अदलाबदलीच्या जाहिराती असतात. म्हणजे एखाद्याच्या मनांत आपल्या जवळचा पदार्थ देऊन त्याच्या ऐवजीं दुसरा पदार्थ घ्यावयाचा असेल तर तो त्याप्रमाणें जाहिरात देतो.

## किंमत ठरवितां येत नाहीं.

अदलाबदलीच्या व्यापारांत, विनिमय कोणत्या प्रमाणानें करावयाचा ह्याविषयीं दुसरी अडचण उद्भवते. तांदूळ देऊन डाळ घेतली, डाळ देऊन तेल घेतलें, तेल देऊन कापड घेतलें, तरी, किती तांदूळ देऊन किती डाळ घ्यावयाची, केवढ्या कापडाला किती तेल घालावयाचें, हा प्रश्न राहतोच. अदलाबदलीनें व्यापार करणाऱ्या समाजांत चालू किंमतीची याद फार भानगडीची होईल ह्यांत संदेह नाहीं; कारण प्रत्येक पदार्थाची किंमत दुसऱ्या प्रत्येक पदार्थानें द्यावी लागेल. शंभर पदार्थ असले तर त्यांच्या परस्पर दरांची संख्या ४९५०पेक्षां कमी होणार नाहीं आणि हे दर मोठ्या काळजीनें व एकमेकांशीं विसंगत होणार नाहींत अशा रीतीनें ठरविले पाहिजेत; नाहीं तर धूर्त व्यापारी, लोकांस फसवून आपला नफा करून घेईल.

एक पदार्थ निवडून त्याच्याशीं बाकीच्या पदार्थांच्या किंमती ठरविल्या तर हा सर्व त्रास वांचेल. एक रुपयाला धान्य व कापड किती येईल हें समजल्याबरोबर किती धान्याबद्दल किती कापड घ्यावयाचें हें आपोआप समजतें. हा निवडलेला पदार्थ किंमत ठरविण्याचें सर्वमान्य परिमाण होऊन बसतें व ह्या पदार्थांत इतर सर्व पदार्थांच्या आपण किंमती करतों; ह्यामुळें कोणत्याही पदार्थांच्या परस्पर किंमती समजण्यास फार सुलभ पडतें.

## विभाग करण्याच्या साधनाची उणीव

पुष्कळ पदार्थ विभागण्यासारखे नसल्यामुळें अदलाबदलीच्या व्यापा-रांत आणखी एक तिसरी अडचण उद्भवते. कोठारांत असलेलें धान्य, पेटींत असलेलें सोनें, हीं कमी अधिक देऊन त्यांऐवजीं आपणांस जरूर तो पदार्थ घेतां येईल. परंतु अर्थशास्त्रावरील कित्येक ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें, एका शिंप्यानें एक अंगारखा तयार करून ठेवला आहे, त्यास धान्याची जरूर आहे व त्याबद्दल देण्यास त्याच्यापाशीं काय तो अंगरखाच आहे. पण त्याला जरूर असलेल्या धान्यापेक्षां त्या अंगरख्याची किंमत तर जास्त आहे. आतां अंगरखा फाडून त्यांतून जितका पाहिजे असेल तितका भाग देऊन त्यानें धान्य घ्यावें असें म्हणतां येत नाहीं. कारण अंगरखा फाडल्या-बर त्याची अंगरखा म्हणून जी किंमत आहे ती नाहींशी होते. ह्या गोष्टी-वरून हें उघड होतें कीं, त्या शिंप्याला कांहीं विनिमयसामान्य पाहिजे; म्हणजे मग अंगरखा विकून आलेल्या त्या सामान्याचा कांहीं भाग शिधा-सामग्रीकडे, लाकूडफाट्याकडे खर्च करतां यावा व कांहीं भाग पाहिजे तर पुढील उपयोगाकरतां राखून ठेवतां यावा. ह्याहून जास्त उदाहरणांची जरूर नाहीं. कारण, आपल्या गरजांप्रमाणें पदार्थांचे विभाग करतां यावे म्हणून कांहींतरी साधन अवश्य आहे, हें उघड आहे.

आजमितीस सुधारलेल्या व्यापारी समाजांत देखील अदलाबदलीचा व्यवहार कांहीं अंशानें चालतो, हें खरें आहे; तथापि ज्यामध्यें त्यापासून गैरसोय असत नाहीं, तेवढ्यापुरताच तो चालतो. दाराशीं ठेवलेल्या गड्याला पैशाच्या ऐवजीं भात, घोंगडी व पायतण देण्याचा करार करण्याची अद्यापि खेडेगांवांतून चाल आहे. देशावर न्हावी, धोबी, कुंभार ह्यांस त्यांच्या कामगिरीबद्दल वर्षास धान्य देण्याचीच पद्धति आहे. ठाकूर, कातकरी, वारली वगैरे जंगली लोक आंबे, करवंदे, जांभळें पानें इत्यादि जंगली पदार्थ देऊन त्यांच्या ऐवजीं कणीकोंडाच घेतात. शेतकरी लोक आपआ-

पर्ली कामें* अदलाबदलीनेंच करून घेतात. दळणकांडण करणाऱ्या मोलकरणीस अद्यापि पैसे न देतां धान्य घालण्याचीच पद्धति आहे. जवळचे शेतधनी प्रसंगोपात्त आपआपल्या शेतांची अदलाबदल करतात. पण, एकंदरीनें पाहतां असले व्यवहार कमीच. विनिमयाच्या सर्व प्रकारांत हल्लीं पैसा कोणत्या ना कोणत्या रूपानें तरी येतोच. जेथें प्रत्यक्ष पैशाचा उपयोग केला जात नाहीं तेथेंसुद्धां पैशामध्यें किंमत करून पदार्थांची देवघेव केली जाते. अदलाबदलीनें व्यापाराला सुरवात होते व एका अर्थी तो अदलाबदलीवरच येऊन बसतो. तथापि ह्या आद्य व अंतिम स्थितींमध्यें फार फरक आहे हें पुढें केलेल्या विवेचनावरून दिसून येईल. इंग्लंडमध्यें आज मितीला धातूचा पैसा वापरल्यावांचून बहुतेक व्यापारी देणें दिलें जातें. पण असें करण्यास मुळींच अडचण पडत नाहीं. कारण पैशांत सर्व पदार्थांच्या किंमती करून विकत दिलेल्या व घेतलेल्या जिनसांची वजावाट सहज करून टाकतां येते.

---

## भाग दुसरा

## विनिमय

पैसा विनिमयसामान्य असून शिवाय किंमत मोजण्याचें साधन व मुख्य परिमाण आहे. मनुष्याला गरजा लागतात, व त्या भागवावयाच्या अस-

---

* एतद्विषयक खालील श्लोक वाचण्यासारखा आहे.

क्रीणीहि भो फलानीति श्रुत्वा सत्वरमच्युतः ।
फलार्थी धान्यमादाय ययौ सर्वफलप्रदः ॥

भागवत स्कंध १० अ. ११ श्लोक १०

तात, ह्या गोष्टींवर पदार्थांचा विनिमय अवलंबून आहे हें कोणासही कबूल होण्यासारखें आहे. आपली एक गरज भागली नाहीं, तोंच दुसरी उत्पन्न होते; कारण आपल्याला नेहमीं निरनिराळ्या पदार्थांविषयीं इच्छा उत्पन्न होते. ज्याला पोटभर भात मिळत आहे, त्यास आणखी भाताची इच्छा होणार नाहीं. पण नंतर, दूध, तूप, गहूं इत्यादिकांवर त्याची वासना जाईल. दूध, तूप, भरपूर असलेला पण जवळ भात नसलेला माणूस जर दैववशात् त्यास आढळला, तर प्रत्येकजण ज्या पदार्थांविषयींची इच्छा कमी आहे तो देऊन ज्याविषयीं अधिक प्रबल इच्छा आहे तो पदार्थ घेईल. अधिक असलेला पदार्थ देऊन अवश्य असलेला पदार्थ घेणें, ह्याचें नांव विनिमय; पण ही व्याख्या अगदीं निर्दोष नाहीं, हें वरील उदाहरणावरून ध्यानांत येईल. कारण वरील उदाहरणांतल्या माणसाजवळ स्वतःला पुरून उरेसें भात होतें असें नाहीं, त्याला खावयास भरपूर होतें, इतकेंच काय तें. पण भाताविषयीं त्याची इच्छा तृप्त झाल्यामुळें, थोडेसें भात कमी करून त्या ऐवजीं अगदीं अवश्य असें नव्हे, पण साधारण अवश्यकता ज्याविषयीं भासत आहे—अशा दूधतुपाची त्याला इच्छा झाली. ह्यास्तव, अगदीं निर्दोष व्याख्या करणें झालें तर असें म्हटलें पाहिजे कीं विनिमय म्हणजे दोन वस्तूंपैकीं अधिक अवश्य वाटणारा पदार्थ घेऊन कमी जरूरीचा वाटणारा पदार्थ देणें.

किती जिनसांची मनुष्याला गरज आहे, हें ठरविणें अशक्य आहे. वासना अतृप्य असल्यामुळें आपल्याला फार तर इतकेंच म्हणतां येईल कीं, जसजसा जिनसांचा पुरवठा अधिकाधिक होत जातो, तसतशी आपल्या गरजांची निकड कमी कमी होत जाते. रुक्ष अरण्यांत अथवा रणभूमीवर एक पेलाभर पाण्यानें जीव वांचेल व त्यामुळें तें अत्यंत उपयुक्त होऊं शकेल. दररोज माणसास स्वयंपाकाकरतां व पिण्याकरतां मिळून दोन घागरी पाण्याची अवश्यकता आहे. धुण्याकरितां वगैरे आणखी पांच घागरी पाणी मिळणें फार अगत्याचें आहे. पण ह्याच्यापुढें अधिक पाण्याचा पुरवठा

फारसा महत्त्वाचा वाटत नाहीं. हल्लीं शहरांतून दर माणशीं पंचवीस ग्यालन पाणी पुरेसें होतें. ह्याहून जास्त पाणी दिलें असतां त्याची उपयुक्तता कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं. कधीं कधीं तर म्हणजे पूर वगैरे आले असतां उपयुक्तता बाजूस राहून पाणी हानिकारक मात्र होतें.

उपयुक्तता व मोल हे पदार्थांचे अंगभूत गुण नव्हत. ह्यावरून हें उघड आहे कीं, योग्यवेळीं व फाजील होणार नाहीं अशा रीतीनें पदार्थ पुरविला तरच तो उपयुक्त आहे असें म्हणतां येईल. उपयुक्तता हा पदार्थांचा अंगभूत धर्म नाहीं. तसा तो असता तर आपणांजवळ पदार्थ भरपूर असूनही तो आणखी हवा अशी इच्छा नेहमीं कायम राहतीच. पदार्थांची गरज लागते तेव्हांच त्याच्या ठिकाणीं उपयुक्तता व किंमत उत्पन्न होतात. जोंपर्यंत कोणाला पदार्थांची जरूरी लागत नाहीं तोंपर्यंत तो उपयुक्त आहे असें कसें म्हणतां येईल, व त्याला तोंपर्यंत मोल तरी काय असणार ? दारू-मांसाला न शिवणाऱ्या मनुष्याच्या दृष्टीनें ते पदार्थ अगदीं निरुपयोगी आहेत व त्याला त्यांची कांहीं किंमत नाहीं, हें उघड आहे. म्हणून पदार्थांचें उपयुक्ततेचें प्रमाण व तदुद्भूत मोलाचें प्रमाण हीं ज्या कमजास्त मानानें त्या पदार्थांविषयींची इच्छा पूर्वी तृप्त झाली असेल त्यावर अवलंबून असतात.

तर मग, उपयुक्ततेचें प्रमाण—पदार्थाच्या प्रत्येक निराळ्या भागाच्या उपयुक्ततेचें प्रमाण—वारंवार बदलतें, इतकें ध्यानांत ठेवलें असतां हें समजण्यास कठीण पडणार नाहीं कीं, विनिमयक्रियेंत आपण आपल्या जवळ असलेल्या पदार्थांपैकीं, जितक्या भागाच्या उपयुक्ततेचें प्रमाण आपल्या दृष्टीनें फार कमी असेल तितका भाग देऊन त्या ऐवजीं, आपल्याला अत्यंत इष्ट, पण दुसऱ्याला ज्या पदार्थाची उपयुक्तता फार कमी, असा पदार्थ घेतों. दिलेल्या व घेतलेल्या पदार्थांची उपयुक्तता आपल्याला सारखी असेपर्यंत फार तर विनिमयक्रिया चालू राहील. ह्याच्या पलीकडे गेल्यास आपला तोटा झाल्याशिवाय राहणार नाहीं. उदाहरणार्थ अशी कल्पना करा कीं, आपल्या जवळ तीस खंडी भाताचें दास्तान आहे. त्यापैकीं कुटुंबाच्या

निर्वाहार्थ दहा खंडी लागतें; तेव्हां आतां ह्या दहा खंडींची आपणांस जितकी उपयुक्तता आहे, तितकी बाकी राहिलेल्या वीस खंडींची नाहीं. आतां ह्याही वीस खंडींत दहा खंडींमध्यें जें उपयुक्ततेचें प्रमाण असेल तितकेंहि दुसऱ्या दहा खंडींत असूं शकणार नाहीं. कारण निर्वाहाला एक सालाला लागणारें दहा खंडी भात एकीकडे काढून ठेवल्यावर, दुसऱ्या साला-करतांहि, नापीक वगैरे झालें असतां उपयोगी पडावें म्हणून आणखी दहा खंडी भात शिल्लक ठेवण्याची इच्छा आपणांस होणें संभवनीय आहे. पण बाकी राहिलेल्या दहा खंडींविषयीं आपणांस तसें म्हणतां येत नाहीं. ह्यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, पहिल्या दहा खंडींत जितकें उपयुक्ततेचें प्रमाण आहे, तितकें दुसऱ्या दहा खंडींत नाहीं; व तिसऱ्या दहा खंडींत तर फारच कमी आहे. आतां आणखी अशी कल्पना करा कीं, आपल्या कुटुंबास अवश्यक असा कपडालत्ता आपणांस पाहिजे आहे. तो घेण्यास जितक्या भाताची आपणांस उपयुक्तता कमी, तितकें भात आपण प्रथम खर्च करूं. दहा खंडी भात देऊन त्याऐवजीं आपणांस अवश्य लागणारें कापड घेतलें तर ह्या व्यवहारांत कमी उपयुक्त पदार्थ देऊन अत्यंत उपयुक्त पदार्थ घेतला असें होईल. आतां दुसरें दहा खंडी भात देऊन जर अधिक कापड घेतलें, तर ह्या व्यवहारांत दोनही पदार्थांची उपयुक्तता सारखीच म्हणावयाची. कारण दहा खंडी भात दुसऱ्या सालाकरितां शिल्लक ठेवावयाचें त्याच्या-बद्दल त्या वर्षाचें कापड शिल्लक टाकल्यासारखें होईल. पण ह्याप्रमाणें वीस खंडी भाताचा निकाल केल्यावर जर आणखी कापड घ्यावयास आपण लागलों, तर त्या व्यवहारांत आपलें नुकसान झाल्यावांचून राहणार नाहीं. कारण निर्वाहाला अवश्यक लागणारें भात कमी करून निरुपयोगी असें कापड आपण घेत आहों. ह्यावरून विनिमय व मोल ह्यांविषयींचे सिद्धांत बसवणें सोपें जातें.

मोल हें विनिमयाचें प्रमाण दाखवितें. प्रत्येक विनिमयव्यवहारांत दोन वस्तूंच्या परिमित भागांची अदलाबदल केली जाते, हें आपण पक्कें ध्यानांत

ठेवलें पाहिजे. अदलाबदल केलेले पदार्थ अगदीं निरनिराळ्या प्रकारचे असूं शकतील व ते मोजण्याची तऱ्हाहि निरनिराळी असूं शकेल. कांहीं भार रुपें देऊन त्याऐवजीं आपणांस पाहिजे तर, दोरखंड, सतरंजी, दूध, कार्यशक्ति, अगर कांही विवक्षित अंतरावर जाण्याकरितां वाहन मिळूं शकेल. मोजावयाच्या पदार्थांचा नामनिर्देश कोणत्याहि भौतिक परमाणूंच्या द्वारा करतां येईल. तथापि, प्रत्येक विनिमयक्रियेंत पदार्थांची मोजण्याची तऱ्हा वेगळी असली तरी एका द्रव्याचे विवक्षित परमाणु देऊन त्याबद्दल दुसऱ्या द्रव्याचे विवक्षित परमाणु घेतले जातात.

अर्थात् प्रत्येक विनिमयक्रिया दोन पदार्थांच्या संख्येमधील परस्पर प्रमाणाच्या रूपानें घडते. ह्याला सामान्यतः किंमत म्हणतात. एक मण तांबें देऊन जर दहा मण लोखंड मिळूं शकेल, तर तांब्याची किंमत तितक्याच वजनाच्या लोखंडाच्या दसपट आहे, असें म्हणण्याची वहिवाट आहे. ह्यावरून पदार्थांची किंमत ठरविणें म्हणजे दोन पदार्थांतील प्रमाण अप्रत्यक्ष रीतीनें सांगणें होय हें उघड आहे. सोनें रुप्यापेक्षां अधिक किंमतवान् आहे, असें जेव्हां आपण म्हणतों, तेव्हां त्याचा अर्थ जितके भार सोनें घेतलें असेल त्याहून जास्त भार रुपें घ्यावें लागतें असें आपण समजतों. रुप्याच्या मानानें सोन्याची किंमत वाढली, तरी देखील तितक्याच भार सोन्याला अधिक रुपें द्यावें लागेल. पण उपयुक्ततेप्रमाणेंच मोल हा पदार्थांचा अंगभूत धर्म नाहीं. तो केवळ आगन्तुक आहे. एकच पदार्थ जगांत असता, तर त्याच्या ठिकाणीं मोल शब्दाचा अर्थ कांहींच झाला नसता. म्हणून जेव्हां आपण पदार्थांचें मोल ठरवितों, तेव्हां आपल्या मनांत दुसरा पदार्थ आल्याशिवाय राहत नाहीं. एकाच वेळेला एकाच पदार्थांची किंमत कमीजास्त होऊं शकेल. कांहीं विवक्षित भार सोनें देऊन त्याऐवजीं जर मला, पूर्वीपेक्षां अधिक रुपें, पण कमी तांबें मिळूं लागेल, तर रुप्याशीं तुलना करतां सोन्याची किंमत वाढली, व तांब्याशीं तुलना करून पाहतां उतरली असें होतें. किंमत हा जर पदार्थांचा अंगभूत धर्म

असता, तर एकाच वेळीं त्याची किंमत कमीजास्त झाली नसती हें उघड आहे. म्हणून, दुसरे पदार्थ जगांत आहेत व मनुष्याला पदार्थांची गरज आहे, एवढ्यामुळें त्याला किंमत आली.

---

## भाग तिसरा

# पैशापासून होणारीं कार्यें

अगदीं साध्या अदलाबदलीच्या व्यवहारांत तीन प्रकारच्या अडचणी उद्भवतात हें मागें सांगितलेंच आहे. त्या अडचणी ह्या कीं, आपल्याला जरूर असलेल्या जिनसा ज्याच्या जवळ आहेत असा माणूस भेटण्याचा असंभव; प्रत्येक पदार्थाची किंमत दुसऱ्या प्रत्येक पदार्थांत करावी लागत असल्यामुळें होणारा घोंटाळा, व मूल्यवान पदार्थांचे विभाग करण्याच्या साधनांचा अभाव. पैशाच्या उपयोगानें ह्या अडचणी दूर होतात. आणि म्हणून त्याच्या योगानें दोन अत्यंत महत्त्वाचीं व परस्परांहून भिन्न अशीं कार्यें घडून येतातः—

(१) विनिमयसामान्य.

(२) मोलाचें सर्वसामान्य परिमाण.

ह्या दोन स्वरूपांनीं पैशाचा अवबोध होतो. प्रथम, पैसा उपयोगांत आला तो विनिमयाचें साधन म्हणून आला. म्हणजे त्याच्या द्वारानें सर्व विनिमय होऊं लागला. या दृष्टीनें पैसा म्हणजे इतर पदार्थांप्रमाणेंच एक पदार्थ होय. तो खाण्याची वस्तूही असूं शकेल; किंवा कपडालत्ता व दागिनाही असूं शकेल. मात्र सर्व लोकांना हवा असा व कोणीहि नाकारणार

नाहीं, असा तो पदार्थ असला पाहिजे. तसेंच हा पदार्थ देऊन आपल्याला पाहिजे तेव्हां पाहिजे तो जिन्नस मिळेल, असें त्या पदार्थाविषयीं प्रत्येकास वाटलें पाहिजे, हेंच पैशाचें प्राथमिक स्वरूप होय. जरी पुष्कळ पदार्थांचा कमी अधिक प्रमाणानें, विनिमयसामान्य म्हणून उपयोग करण्यांत आलेला असला, तथापि सामान्यतः सवयीनें किंवा परिस्थितिवैचित्र्यामुळें एकच पदार्थ पैसा म्हणून वापरला जातो. आणि नंतर मग मोलाचें परिमाण म्हणून अशा पदार्थाचा उपयोग लोक करूं लागतात. पैसा घेऊन पदार्थ देण्याची सवय सारखी लागल्याकारणानें इतर जिनसांची किंमत लोक पैशांतच करावयास लागतात; अशा रीतीनें प्रत्येक जिनसाची किंमत पैशांत करतां येऊं लागल्यामुळें निरनिराळ्या पदार्थांचा विनिमय होण्यास विलंब लागत नाहीं.

## मोलाचें परिमाण

ह्यापुढें पैशाचा तिसरा उपयोग लवकरच होऊं लागतो. समाजांत व्यापाराची सुरवात होऊन फार दिवस लोटले नाहींत तोंच कर्ज घेण्याला आरंभ होतो व नाना तऱ्हेचें कर्ज काढलें जातें. कांहीं ठिकाणीं उसना घेतलेला पदार्थ जशाचा तसाच परत करणें अवश्य असतें हें खरें, पण बहुधा प्रत्येक ठिकाणीं ज्या जातीचा पदार्थ उसना घेतला असेल त्याच जातीचा दुसरा पदार्थ परत करतां येतो. धान्य कर्जाऊ घेतलें असतां व्याजासुद्धां धान्य परत करतां येतें; पण कर्ज देणाराची अशी इच्छा असते कीं, घेणाराच्या इच्छेस येईल तेव्हां म्हणजे आपणांस नको असेल अथवा धान्याचा भाव उतरला असेल अशा वेळीं त्यानें फेड करूं नये. त्याचप्रमाणें माणसांला ज्या निरनिराळ्या पदार्थांची गरज लागते ते सर्व एकाऱ्याच जवळ असणें संभवनीय नाहीं. ह्यामुळें सर्वांस मान्य होणाऱ्या व ज्याची किंमत फारशी बदलत नाहीं अशा पदार्थांत कर्ज काढणें फार सोईचें पडतें. एक वर्षानें एखादा पदार्थ घेण्याचा करार जर कोणी केला तर आज आहे तितकीच किंमत एका वर्षानेंहि ज्या पदार्थाची राहील

अशा पदार्थ घेण्याचें तो पसंत करील हें उघड आहे. पैसा म्हणून चालू असलेला पदार्थ हाच अशा तऱ्हेचा फार करून असल्यामुळें त्याचाच उपयोग मोलाचें परिमाण म्हणून होऊं लागेल. मोलाचें परिमाण म्हणून वापरल्या जाणाऱ्या पदार्थांची किंमत कधींच बदलत नाहीं, असें समजावयाचें नाहीं. तर तो पदार्थ म्हणजे पुढील देण्याची किंमत ठरविण्याचें साधन होय. किंमत म्हणजे विनिमय केलेल्या दोन पदार्थांचें प्रमाण होय हें नीट ध्यानांत ठेवलें तर दोन पदार्थांची एकच किंमत नेहमीं असूं शकणार नाहीं, हें सहज समजेल. पण मोल करण्याकरितां म्हणून जो पदार्थ आपण परिमाणभूत घेणार तो पदार्थ देऊन त्याऱ्याऐवजीं दुसरा कोणताहि पदार्थ जवळ जवळ सारख्याच प्रमाणानें सतत मिळूं शकेल असें होणें इष्ट आहे.

## मोलाचा संग्रह.

विनिमयसामान्य ह्या दृष्टीनें जेव्हां आपण पैशाचा विचार केला, तेव्हां आपल्याला कळून चुकलेंच आहे कीं, पैशामुळें मिळकतीचे विभाग करतां येतात. व एकंदर विनिमयक्रिया सुलभ होते. पण मिळकतीचे विभाग करण्याची जशी आपणांस अवश्यकता पडते, त्याचप्रमाणें, कधीं कधीं, उदाहरणार्थ, प्रवासांत बरोबर घेण्यासाठीं अथवा परठिकाणीं पाठविण्याची असेल तर, आपली सर्व मिळकत अगदीं थोड्या आकारांत आणणें जरूर पडतें. अशा कामीं आकारानें आणि वजनानें लहान पण फार मोलाचा आणि जगांतील सर्व लोकांस हवा, असा पदार्थ उपयोगी पडेल हें उघड आहे. म्हणून केव्हां केव्हां हिरे, माणकें, वगैरे जवाहिरांचा अशा प्रसंगीं उपयोग करितात. तरी पण, हे वर सांगितलेले धर्म देशांत पैसा म्हणून चालू असलेल्या पदार्थांत आढळण्याचा संभव विशेष असतो. ह्यामुळें पैशाचा आपणांस आणखी चवथा उपयोग घडतो; तो हा कीं, त्याचेमुळें फार किंमतीच्या पदार्थांचा संग्रह थोडक्यांत करतां येतो.

## कार्यविभाग.

हल्लींच्या समाजांत वर निर्दिष्ट केलेलीं पैशापासून होणारीं चार कार्यें एकमेकांपासून अगदीं भिन्न आहेत, ही गोष्ट आपण कधींहि विसरतां कामा नये. निरनिराळ्या चार कार्यांसाठीं एकच पदार्थ वापरण्याची आपणास इतकी सवय लागली आहे कीं, त्यांतील भेद आपण विसरून जातों. एकाच पदार्थाच्या ठिकाणीं हा कार्य-संयोग अवश्य आहे, असा आपला समज होऊं लागतो. पण हा समज अगदीं चुकीचा आहे. विनिमयसामान्य म्हणून एका पदार्थाचा उपयोग करूं व मोलाचें परिमाण आणि मोलसंग्रह ह्या-करितां आणखी दुसऱ्या दोन पदार्थांचाही उपयोग करूं. पदार्थांची किंमत आपण रुपयांत ठरवूं व ती देतांना सोनें पाठवून देऊं. जमिनीचे लांब मुद-तीचे कौल आपल्यास द्यावयाचे असल्यास मक्ता ठरविणें तो आपण धान्यांत ठरवूं. व आपली मालमत्ता घेऊन आपणांस लांब परदेशीं जाव-याचें असेल तर जवाहिराच्या रूपानें ती आपण घेऊन जाऊं. अशा रीतीनें पूर्वकालीं निरनिराळ्या पदार्थांचा निरनिराळ्या कामीं उपयोग होत असे, अशाबद्दल पुष्कळ प्रमाणें मिळतात.

पैशाचीं चार कार्यें ज्या एकाच पदार्थानें होऊं शकतील असा पदार्थ निवडणें फार सोईचें आहे, हें उघड आहे. विनिमयविषयक पदार्थांच्या किंमती ह्यांत केल्या जातील तर पुष्कळ त्रास चुकेल. व लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन फसवाफसवी करण्यास सवड सांपडणार नाहीं. कारण, पदा-र्थांच्या किंमती कशा बदलत जातात, हें थोडेच लोक पाहात असतात. बहुतेक लोकांची कल्पना अशीच असते कीं, ज्या पैशानें आपण किरकोळ व नेहमींचे सवदे करितों त्याच पैशानें आपणांस लांब मुदतीचे व्यवहारही करतां येतील. त्याचप्रमाणें कांहीं देणें कायद्यानें कायमचें ठरविलें असतें; उ० दस्तुरी, जकात फी वगैरे. म्हणून विनिमयसामान्याच्या किंमतींत पुष्कळ फरक पडला, तरी लोक पूर्वीप्रमाणेंच हे कर देत राहवील.

## कार्यविभाग

आजपर्यंत जगांत कोणकोणते पदार्थ पैशादाखल वापरण्यांत आले व वर सांगितलेलीं निरनिराळीं चार कार्यें कोणत्या पदार्थांच्या उपयोगानें नीटपणें होतील, ह्याचें विवेचन मुख्यत्वेंकरून ह्या पुस्तकांत करावयाचें आहे. फार प्राचीन काळापासून चलनी पैशाची आवश्यकता लोकांनीं कशी भरून काढिली व त्या कामीं योजलेल्या पदार्थानें इष्ट हेतु कितपत सिद्धीस गेला ह्याचा विचार केला म्हणजे आपल्या समाजांत कोणत्या पदार्थांचा पैशादाखल उपयोग करतां येईल, हें आपोआप निश्चित होईल.

---

### भाग चवथा.

## पैशाचा आद्यकालीन इतिहास.

ज्ञानसंपन्न समाजांत राहून धातुमय पैसा वापरण्याची सवय लागल्यामुळें पैसा म्हणजे सोन्यारुप्याचाच असावयाचा अशी आपली समजूत होते; व त्यामुळेंच चुकीच्या कल्पना लोकांच्या मनांत घोळत असतात. एवढ्याकरितां व्यापाराच्या प्रत्येक जिनसेंत दोन प्रकारचे धर्म असतात; एकाच्या योगानें किंमतीचें मान ठरविलें जातें व दुसऱ्यामुळें किंमती पदार्थांचें स्वामित्व बदललें जातें, ही गोष्ट सतत ध्यानांत धरणें फार उपयुक्त आहे. म्हणून एकाद्या विवक्षित समाजांत कोणता पदार्थ पैशाच्या कामीं विशेष उपयुक्त होईल एवढेंच ठरवावयाचें असतें. निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या पदार्थांचा उपयोग पैशादाखल झालेला आहे, ह्यावरून वरील सिद्धांताची सत्यता चांगली प्रत्ययास येईल.

### शिकारी युगांतील पैसा.

रानटी जनावरांची पारध करून, त्याच्यावर उदरनिर्वाह करणें ही उद्यो-

गुधंद्याची अगदीं आद्यस्थिति होय. शिकार करून मिळालेल्या पदार्थांची किंमत अशा समाजांत फार असली पाहिजे. शिकारींत मारलेल्या जनावरांचें मांस टिकाऊ नसल्यामुळें त्याचा संग्रह करतां येणार नाहीं व विनिमयव्यवहारांत त्याचा वारंवार उपयोग करतां येणार नाहीं, हें खरें आहे. पण तशी स्थिति कातड्याची नसते; म्हणूनच चामड्याचा उपयोग पैशाबद्दल केल्याचीं उदाहरणें प्राचीन समाजांत व अर्वाचीनहि कांहीं समाजांत पुष्कळ सांपडतात. रशियांत पीटर दी ग्रेटच्या कारकीर्दीपर्यंत चामड्याचें चलन वापरीत असत; आणि रोम, लाकिडीमान व कार्थेज येथेंहि पहिल्यानें चामड्याचाच विनिमयसामान्य म्हणून उपयोग होत असे, असें प्राचीन इतिहासकारांनीं लिहून ठेवलें आहे. हिंदुस्थानांत ज्ञानेश्वराच्या वेळीं कांहीं ठिकाणीं अशा कामीं चामड्याचा उपयोग करीत असत[१].

हा फार लांबचा काळ सोडून हल्लींच्या काळाकडे वळलों, तरी सुद्धां व्यापारांत चामड्यांचा उपयोग करण्याची चाल अद्यापि नष्ट झाली नाहीं, हें अमेरिकेंतील इंडियन लोकांच्या उदाहरणावरून समजेल.

## पशुपालवृत्तींतील चलन.

वरच्यापेक्षां मनुष्याची सुधारणा जास्त होत चालली म्हणजे तो ढोरें बाळगून त्यांच्यावर आपली उपजीविका करतो. अशा स्थितींत अर्थातच गुरेंमेंढरें हीच काय ती अदलाबदल करण्यासारखी संपत्ति होय. पशु सहज एकमेकांस देतां घेतां येतात. ते वाटेल तेथें नेतां येतात; व पुष्कळ वर्षें टिकतात. ह्यावरून पैशाचीं कांहीं कार्यें त्यांच्याकडून होऊं शकतात, हें उघड आहे. व त्याप्रमाणें पैशाच्या कामीं पशूंचा उपयोग करीत असत, अशाबद्दल विपुल पुरावाही आहे. आपल्या देशांत प्राचीनकाळीं बैल, गाय, शेळी, घोडे इ॰ जनावरांचा पैशादाखल उपयोग करीत. यशाकरत

---

१ प्राकालीन अधातुरूप विनिमयसामान्यें हा माझा निबंध पहा (निबंध लेख पान २२६).

सोमवल्ली एक कालवड देऊन विकत घ्यावी अशी अनुज्ञा आहे.[१]

होमरच्या काव्यांत पदार्थांची किंमत बैलांत करीत असत अशाविषयींचा उल्लेख वारंवार केलेला आढळतो. तेथें डायमेडच्या शस्त्रांची किंमत नऊ बैल आहे, असें म्हटलें आहे. तसेंच युद्धांत पकडलेल्या कुशल स्त्रियेची किंमत चार बैलांबरोबर केलेली आहे. अशा रीतीनें मोलाचें परिमाण म्हणून बैलांचा जरी उपयोग होत असे, तथापि विनिमयसामान्य व मोलाचा संग्रह ह्यांकरितां अमुद्रित सोनेंच वापरलें जात असें. ह्यावरून स्पष्ट दिसतें कीं, पैशाचीं कार्यें निरनिराळ्या पदार्थांकडून ह्या कालीं होत असत.

संस्कृतशिवाय दुसऱ्या कित्येक भाषांत, पैशाचा जो वाचक शब्द तोच कोणत्यातरी जनावराचा वाचक आढळतो.

लॅटिन भाषेंतील द्रव्यवाचक 'पेक्यूनिआ' शब्दाची उत्पत्ति 'पेकस' ह्या शब्दापासून आहे. व ह्या पेकस शब्दाचा अर्थ त्या भाषेंत ढोरें असा होतो [Pecus=पशु]. प्राचीन इतिहासावरून रोम व ग्रीक देशांत नाण्यांवर बैलांची आकृति काढलेली असे, असें समजतें. झेंदावेस्तांत वैद्यांची फी पशूंत ठरविली आहे.

ज्या देशांत गुलामगिरी चालते, त्या देशांत गुलाम म्हणजे एक प्रकारची लोकांची संपत्तिच समजली जाते. तेव्हां अर्थात् त्याचाच विनिमयसामान्यवजा उपयोग केल्याचीं उदाहरणें आहेत. मध्य आफ्रिकेंत गुलाम, ढोरें व हस्तिदंत ह्यांचा विनिमयसामान्य म्हणून उपयोग केला जातो. न्यू गिनींत मोलाचें परिमाण गुलाम आहेत, असें एका प्रवासवृत्तावरून समजतें. इंग्लंडमध्येंसुद्धां पैशाच्या ऐवजीं गुलामांचा उपयोग एका वेळीं होत होता, असा समज आहे. हें गुलामी चलन हिंदुस्थानांतही एका कालीं चालत असे असें "द्वाभ्यां पुरुषाभ्यां क्रीता द्विपुरुषा" (४।१।२४ काशिका) इ० व्याकरणग्रंथांतील उदाहरणांवरून स्पष्ट होतें.

---

१ निवडक लेख पृष्ठ २५५ व २५९.

## दागिन्यांचा पैशाच्या ऐवजीं उपयोग.

मनुष्य जातीची अलंकाराविषयीं आसक्ति प्रसिद्धच आहे. व ते टिकाऊ, सर्वमान्य, आणि सहज अदलाबदल करण्यासारखें असल्यामुळें, त्यांचाच उपयोग लोक पैशावजा करूं लागले. उत्तर अमेरिकेंतील मूळचे रहिवाशी शिंपल्यांचो माळ गळ्यांत भूषणादाखल घालीत. पुढें ते हाच दागिना विनिमयसामान्य म्हणून वापरूं लागले. ह्या पैशाचा त्यांच्यांत इतका प्रसार झालेला होता कीं, इ० स० १६४९ मध्यें वसाहतवाल्यांनासुद्धां ठरीव रकमेपर्यंत ते पैसे कबूल करावे लागले. हिंदुस्थानांत कवड्या कांहीं वर्षांपूर्वी किरकोळ देवघेवींत चालत असत हें सुप्रसिद्धच आहे. एक पैशाच्या ऐवजीं कवड्या धरल्या जात असत, ह्याप्रमाणें एक रुपयाच्या ५१२० कवड्या होतात. ह्याशिवाय सयाम व पश्चिम आफ्रिका ह्या देशांतहि कवड्यांचें चलन चालू आहे. कवड्यांच्या ऐवजीं व्हेल माशाच्या दातांचा उपयोग फिजिअन लोक करीत असतात. त्याचप्रमाणें हस्तिदंत, घडीव दगड इ० अलंकारभूत पदार्थांचें चलनहि चालू असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें.

## शेतकीच्या परिस्थितींतील चलन

मागें सांगितलेल्या पुष्कळ पदार्थांप्रमाणें पुष्कळ वनस्पतिजन्य पदार्थांत-सुद्धां पैशाचे धर्म असतात; त्यामुळें अशा प्रत्येक जास्त टिकाऊ पदार्थाचा पैशाच्या कामीं उपयोग केलेला आढळतो. युरोप खंडांत कित्येक ठिकाणीं, प्राचीन ग्रीक लोकांप्रमाणें आज मित्तीस सुद्धां धान्याच्या द्वारा विनिमयक्रिया चालू आहे. नॉर्वे देशांत पेढ्यांतून धान्य ठेवतात व कर्जाऊहि देतात घेतात. मध्य अमेरिकेंत, विशेषतः मेक्सिको देशांत, मक्याचें चलन पूर्वी प्रचारांत होतें. भूमध्यसमुद्राच्या भोंवतालच्या प्रदेशांत शिरसाच्या तेलाचा सर्वत्र खप असल्यामुळें, त्याचाच उपयोग तेथें पैशाच्या ऐवजीं करीत, कारण तें टिकाऊ, एकाच जातीचें व सुविभाज्य असतें.

हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें कवड्या चालतात, त्याप्रमाणें मध्य अमेरिकेंत केको नांवाच्या फळाचें चलन चालतें. हें प्रथम कदाचित् पोटचलन

असावें असें वाटतें. युरोप खंडांत ज्या ठिकाणीं बदाम होतात, तेथें त्यांचें चलन चाललेलें आहे. अशा पैशांचा भाव पिकाच्या कमजास्त प्रमाणावर अवलंबून असतो, हें उघड आहे.

वनस्पतिजन्य पदार्थांचें चलन किरकोळ कामांतच वापरतात असें नाहीं. अमेरिकन वसाहतींत व वेस्ट इंडिआ बेटांत पैसा दुर्मिळ झाला तेव्हां सरकारनें सावकार लोकांस ठरलेल्या दरानें आपल्या कर्जाऊ दिलेल्या रकमांच्या फेडींत धान्य घ्यावयास लावलें. इ. स. १६१८ त व्हर्जिनियाच्या गव्हर्नरानें असा हुकूम फर्मावला कीं तीन शिलिंगांच्या ऐवजीं एक पौंड तंबाखु घेत जावी व ह्याप्रमाणें कोणी घेण्याचें नाकारल्यास त्यास तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा कायद्यानें ठरवून टाकिली. असें म्हणतात कीं, व्हर्मिया कंपनीनें जेव्हां वसाहतवाल्यांकरितां परदेशांतून बायका आणविल्या, तेव्हां दर बायकोची किंमत प्रथम शंभर पौंड तंबाखु ठरवून नंतर दीडशेंपर्यंत वाढविली. इ. स. १६३१ सालीं मेरिलंड देशाच्या सरकारनें तंबाखू व धान्य हीं कायदेशीर चलनें ठरविलीं. इ. स. १६६१ त मॅसेच्युसेट मध्यें अशाच प्रकारचे कायदे होते. वेस्ट इंडिया बेटाच्या सरकारनींहि अशाच मासल्याच्या कायद्यांचें अनुकरण केलेलें दिसतें. कारण त्यांनीं असा ठराव केला कीं, कोर्टामध्यें वादी जिंकला असतां त्यानें दाव्याच्या फेडींत, साखर, सुंठ, तीळ, तंबाखू, अगर असेच दुसरे पदार्थ घेतलेच पाहिजेत. अशा प्रकारानें पुष्कळ प्रकारचें चलन एकाच वेळीं चालू असणें किती हितावह आहे हें पुढें समजेल. पुष्कळ वस्तु नाशिवंत असल्यामुळें त्यांचा पैशाच्या कामीं उपयोग करतां येत नाहीं. तरीसुद्धां स्वित्सर्लंड देशांत कांहीं खेड्यांतून अंड्याचा उपयोग सदर कामीं केलेला ऐकिवांत आहे. न्युफाउंडलंड देशांत तर सुकलेल्या माशांचा उपयोग पैशावजा होत होता ह्यांत कांहीं शंका नाहीं. हिंदुस्थानांतही तांदूळ, मूग इ. धान्यांनीं खरेदी विक्री होत असे[१].

१. निवडक लेख २५५, २५६.

## शिल्पनिर्मित व किरकोळ पदार्थांचें चलन.

एथवर दिलेल्या माहितीवरून, पैशाच्या कामीं पुष्कळ पदार्थांचा उपयोग झालेला आहे हें स्पष्ट कळून येईल. आतां निरनिराळ्या काळीं व स्थलीं शिल्पनिर्मित पदार्थांचें पण चलन चालू असे, हें सांगितलें म्हणजे झालें. हिंदुस्थान, अबिसीनिआ, अर्किपेलेगो, सुमात्रा, मेक्सिको, पेरु, सैबेरिआ, इत्यादि ठिकाणीं कापडाच्या साधनानें लोकांच्या विनिमयक्रिया चालत असत. पैशाच्या कामीं वापरलेला फार चमत्कारिक पदार्थ म्हटला म्हणजे पैंळ्याच्या हातऱ्या होत. अंगोला येथील पोर्चुगीझ लोकांच्या ताब्यांतील प्रदेशांत इ. स. १५९४ पर्यंत अशा हातऱ्यांचें चलन चालू होतें. एका हातरीची किंमत सरासरी पांच दिडक्या इतकी असे.

अबिसिनिया, सुमात्रा, मेक्सिको ह्या देशांत व अन्यत्र मिठाच्या द्वारा लोकांच्या देवघेवी चालत असत. सुमात्रामध्यें मेण, पासिफिक समुद्रांतील बेटांत तांबडीं पिसें, टार्टरीमध्यें चहा, आणि मालागासी लोकांत लोखंडी कुदळी असे विलक्षण पदार्थ चलनरूपानें प्रचारांत होते. स्कॉटलंडमधील कांहीं खेड्यांतून हातानें केलेल्या खिळ्यांचा उपयोग पैशाच्या कामीं करीत असत असें ॲडम स्मिथनें म्हटलें आहे. चांगले घडीव दगड व लाकडें ह्यांनींहि पैशाचें काम केलेलें आहे, असा अदमास आहे पण त्याबद्दल खात्रीलायक पुरावा नाहीं. हिंदुस्थानांत नावा व सुपा ह्यांचा पैशाप्रमाणें उपयोग होई हें मी आपल्या प्राक्कालीन अधातुरूप विनिमय-सामान्यें ह्या निबंधांत दाखविलें आहे.

---

### भाग पांचवा

## पैशाच्या द्रव्यांत लागणारे गुणधर्म

पैशापासून नानाविध कार्यें व्हावयाचीं असतात. तेव्हां नाना प्रकारचे धर्म त्यांत असणें अवश्य आहे हें आपण कधीं विसरतां कामा नये.

कोणत्या पदार्थाचा उपयोग पैशाच्या ठिकाणीं करावा हें ठरविणें सोपें नसतें. कारण पैशापासून घडून येणाऱ्या निरनिराळ्या कार्यांत जास्त महत्त्वाचें कार्य कोणतें, प्रत्येक कार्यासाठीं पैशाचा उपयोग कितपत केला जातो व प्रत्येक कार्य घडवून आणण्यास त्या पदार्थांत अंगच्या गुणांनीं कितपत सामर्थ्य आहे, ह्या सर्वांचा विचार आपणांस केला पाहिजे. उद्योगधंद्याच्या प्राथमिक अवस्थेंत पैसा मुख्यत्वेंकरून व्यापारी लोकांत वापरला जातो. अशा वेळेस पैसा असा पाहिजे कीं, तो हवा तिकडे सुलभ रीतीनें नेतां आणतां यावा व त्याचे सहज ओळखतां येतील असे वेगवेगळे भाग करतां यावेत; कारण असें असलें म्हणजे कोणतीहि रक्कम नक्की करण्यास अडचण पडत नाहीं. परंतु विनिमयपद्धति एक प्रकारची अदलाबदलेची पूर्णावस्थाच जेव्हां बनते, तेव्हां अशा व्यापाराच्या उत्कर्षाच्या वेळीं पैशाचा उपयोग विशेषतः मोलाचें परिमाण म्हणून केला जातो. अशा वेळेस वर निर्दिष्ट केलेल्या गुणांचें फारसें महत्त्व राहत नाहीं. सुवाह्यता व मूल्यस्थैर्य हे गुण पुढें सरसावतात. पैशाच्या अंगीं निरनिराळे धर्म असावे लागतात म्हणून वर सांगितलें ते गुण त्यांच्या महत्त्वाच्या दृष्टीनें विचार केला असतां पुढील अनुक्रमानें सांगतां येतील :—

| | | |
|---|---|---|
| १ उपयुक्तता व मोल. | २ सुवाह्यता. | ३ अविनाश्यता. |
| ४ साधर्म्य. | ५ विभाज्यता. | ६ मोलाची स्थिरता. |
| ७ ज्ञेयता. | | |

## १ उपयुक्तता व मोल

पैसा देऊन मोलवान पदार्थ घ्यावयाचा असतो त्यामुळें पैशाच्या अंगीं स्वतः मोल असलें पाहिजे; व त्याचप्रमाणें हें मोल ज्यावर अवलंबून असतें अशी जी उपयुक्तता तीहि त्याच्या ठिकाणीं वसत असली पाहिजे. पैशाचा प्रसार एकदा देशांत पुरा चालू झाला म्हणजे त्याचा उपयोग मुख्यत्वें-करून विनिमय घडवून आणण्याकडेच होतो. अशा वेळेस अगदीं विन-

मोलाचा पदार्थहि चालू शकेल. ह्या कारणास्तवच कवड्यांसारखा बिनमो-लाचा पैसा आज मितीसही आपल्या दृष्टीस पडतो, हें जरी प्रायः खरें आहे तथापि पैसा म्हणून एकादा पदार्थ सुरू करते वेळेस त्याच्यामध्यें कांहीं उपयुक्तता नसल्यास तो घेतकरण्यास लोक तयार असणार नाहींत. निरुपयोगी पदार्थ पैसा म्हणून चालविण्याचे प्रयत्न आजपर्यंत पुष्कळ सरकारांनीं केले. पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं. ह्यामुळें अगदीं निरुपयोगी पदार्थांचा पैसा बनविणें शक्य नाहीं हा सिद्धांत प्रायः अबाधितच राहील. आजपर्यंत ज्या ज्या पदार्थांचा उपयोग पैसा म्हणून केला गेला आहे त्या सर्व पदार्थांचा इतिहास जर आपणांस अवगत होईल तर ते पदार्थ लोकांनीं त्यांच्या उपयुक्ततेमुळें ग्राह्य केले असले पाहिजे अशीच आपली खात्री होईल. पैसा एकदा चालू झाला म्हणजे संवयीनें, संप्रदायानें व कायद्यामुळें लोक तो टाकणार नाहींत. पण मुख्य अडचण सुरवात करण्याचीच आहे. कांहीं तरी कारण असल्यावांचून लोक कोणताही पैसा कबूल करणार नाहींत. म्हणूनच कितीही सामर्थ्यवान् राजा असला तरी त्याच्यानें सुद्धां अत्यंत निरुपयोगी द्रव्याचा प्रसार होऊं शकणार नाहीं.

एकदा का एखाद्या पदार्थाचा उपयोग पैसा म्हणून सर्वत्र होऊं लागला म्हणजे त्यापासून समाजाचीं जीं कार्ये होतात त्या कार्यावर पदार्थाची उपयुक्तता ठरली जाईल असें मानण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ, डाग-दागिने करण्यांत सोन्याचा जितका उपयोग होतो, त्यापेक्षांहि पैसा ह्या दृष्टीनें पाहिलें असतां त्याचा फार उपयोग आहे. प्रथमतः ज्या पदार्थाचा उपयोग अनेक कामांकडे होतो त्या पदार्थाचा उपयोग अखेरीस एकच पदार्थाकडे केला जातो. पण ह्यामुळें त्याची किंमत कमी होते असें नाहीं; व्यापाराकरितां त्याची फार गरज लागल्यामुळें किंमत उतरत नाहीं. व पुष्कळ किंमत देण्याची सवय लोकांच्या हाडीं खिळल्यामुळेंहि त्या पदार्थाचा भाव एकाएकीं खालवत नाहीं. उदाहरणार्थ, कवड्यांचा उपयोग सांप्रत दागिने करण्याकडे कोणी करीत नाहींत. संवयीच्या प्रबलतेमुळें अशा

पिहि कवड्यांचा पैसा चालूच आहे. सामाजिक व नैतिक वर्तनांत रूढीचें प्राबल्य जितकें आहे, तितकेंच तें अर्थशास्त्रांतहि आहे.

तथापि सोन्या-रुप्याची किंमत हल्लीं पैसा म्हणून केल्या जाणाऱ्या त्यांच्या उपयोगावरच केवळ अवलंबून आहे असें मानणें संयुक्तिक नाहीं. ह्या दोन धातूंमध्यें इतके कांहीं विलक्षण उपयुक्त धर्म आहेत कीं, त्या जर विपुल सांपडल्या तर तांबें, पितळ, जस्त, लोखंड इत्यादि कमी योग्यतेच्या धातूंच्या केलेल्या, नेहमीं घरांत लागणाऱ्या भांड्यांच्या ऐवजीं सोन्यारुप्यांचींच भांडीं सर्वत्र झालीं असतीं.

पैशापासून होणारीं कार्यें नीट व्हावीं म्हणून, विशेषतः विनिमय घडवून आणण्यांत त्याचा उपयोग चांगला व्हावा, तसेंच लहान आकारांत पुष्कळ मोलाचा संग्रह व्हावा, एवढ्याकरितां, ज्या पदार्थाचा उपयोग पैशाच्या कामीं करावयाचा त्या पदार्थाला सर्व जगभर किंमत येत असून बहुतेक सर्व लोकांना तो इष्ट असावा हें अगदीं अगत्याचें आहे. सुदैवानें सोनें-रुपें ज्यांना प्राप्त झालें आहे अशा सर्व मानवजातीचें प्रेम ह्या दोन धातूंवर दृष्टोत्पत्तीस पडतें. ह्या धातूंच्या सतेज कांतीकडे हल्लींप्रमाणेंच पूर्वीच्या लोकांचें लक्ष वेधलें होतें ह्यांत आश्चर्य नाहीं.

## सुवाह्यता.

जो पदार्थ पैसा म्हणून वापरावयाचा तो जात्या मोलवान् पाहिजे, इतकेंच नाहीं तर त्याची किंमत त्या पदार्थाचें वजन व आकार ह्यांच्या मानानें अशी पाहिजे कीं, तो पैसा वापरावयास गैरसोयीचा होईल इतका अतिशय जड किंवा अत्यंत सूक्ष्म असतां कामा नये. आकारानें मोठा आणि किंमतीनें कमी, असा पैसा वापरण्यास लोक नाखुष असतात. म्हणूनच पंचतन्त्रांतल्या एका गोष्टींतील माणूस तांब्याची खाण सांपडली असतां तें ओझें फार म्हणून टाकून देऊन पुढें गेला. पुढें त्यास रुप्याची खाण सांपडली. पण सोन्यापेक्षां रुपें जड एवढ्याकरतां रुपेंहि टाकून सोन्याच्या

आयेनें तो पुढें चालला. सोन्याचीही खाण त्यास लागली तथापि तेंहि त्यास पतकरेना. कारण तितक्याच वजनाचें जवाहिर सापडलें असतां तें ज्यास्त मौल्यवान् म्हणून सोनेंही त्यानें टाकलें. तात्पर्य, आकारानें व वजनानें लहान पण किंमतीनें मोठा असाच पैसा लोकांस पाहिजे असतो. लोखंडाचा पैसा जर आज सुरू केला तर आपणांस किती त्रास पडेल ह्यांची कल्पना करा. हल्लीं जेथें आपण पन्नास रुपये बरोबर घेतों तेथें आपणांस एक टन लोखंड घ्यावें लागेल. स्वीडनदेशांत गेल्या शतकांत तांब्याचें मुख्य नाणें चालू होतें. त्यामुळें व्यापाऱ्यांना कोठून पैसे घ्याव-याचे झाले म्हणजे ते आणण्याकरतां बरोबर एक लहान हातांनीं ओढ-ण्याची दुचाकी गाडी घेऊन जावें लागत असे. प्राचीन काळीं जे पदार्थ पैशादाखल वापरण्यांत येत होते त्यांच्या ठिकाणीं व्यंग असलें पाहिजे. बदाम, नारळ, कवड्या, धान्य, चामडें वगैरे पदार्थ इकडून तिकडे नेण्यास फारच गैरसोईचे आहेत ह्यात शंका नाहीं.

पैशामध्यें सुवाह्यतेचा गुण असणें फार अगत्याचें आहे. कारण त्यामुळें फार दगदगीशिवाय मालकाला लहान रकमा खिशांत घालून हव्या तिकडे नेतां येतात; इतकेंच नव्हे, तर मोठमोठ्या रकमासुद्धां एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं अगर एका देशांतून दुसऱ्या देशांत फार खर्चाशिवाय सहज पाठवितां येतात. ह्या कारणास्तव जगाच्या कोणत्याहि भागांत पैशाची किंमत साधारणपणें जवळ जवळ सारखीच राहाते. धान्य किंवा कोळसा ह्याप्रमाणें किंमतीच्या मानानें फार अवजड असलेला पदार्थ एके ठिकाणीं दुर्मिळ व दुसऱ्या ठिकाणीं अतिशय विपुल असूनहि गरजेप्रमाणें पुरवठा करूं म्हटलें तर नेण्याआणण्यांत फार खर्च केल्याशिवाय तसें करतां येणार नाहीं. सोनेंरुपें लंडनहून पॅरिसला पाठवावयाचें झालें तर शेंकडा $\frac{४}{१०}$ खर्च येतो व जगाच्या दुसऱ्या कोणत्याहि दूरच्या प्रदेशीं पाठविणें झाल्यास शेंकडा २ ते ३ हून जास्त येत नाहीं.

कांही पदार्थ अतिशय स्वस्त असतात तसे कांही अतिशय मोलवान् असतात. अशा पदार्थांसाठी नेहमीच्या व्यवहारांत सूक्ष्मदर्शक यंत्राची मदत घ्यावी लागेल. उदाहरणार्थ, रत्नें, माणिकें, हिरे हीं इतकीं मोलवान् असतात की, त्यांच्या विरुद्ध येणारे दुसरे आक्षेप बाजूला ठेवले तरी, एवढ्यामुळेंच बारीकसारीक व्यवहारांत त्यांचा उपयोग होणार नाहीं. जवाहिरांची किंमत त्यांच्या वजनाच्या वर्गाप्रमाणें वाढत जाते असें म्हणतात. त्यामुळे त्यांची बरोबरी धातूंशीं कधीच होणार नाही. कारण धातूंची किंमत त्यांच्या वजनाला अनुसरूनच असते. दोन तोळे सोन्याला जर पन्नास रुपये पडले तर चार तोळ्यांना शंभर रुपयेच पडतील. पण तशी गोष्ट जवाहिरांची नाही. दोन तोळे भाराच्या खड्याची किंमत जर ५०० रुपये असली तर चार तोळ्यांच्या खड्याची किंमत २५०००० रुपये होईल. इरिडिअम आणि ओसमिअम नांवाच्या धातूहि अशाच फार मोलवान् असल्यामुळे व्यवहारांत वापरण्यास उपयोगी नाहीत. अगदी अल्प पैशाची ज्यांस गरज लागते अशा लहान व्यवहारांत सोनेंरुपेंसुद्धा उपयोगी पडत नाही. आपण पैची मिरचीकोथिंबीर घेतों ती घेण्यास सोन्याच्या नाण्याचा काय उपयोग होणार ? हल्लीच्या आपल्या पैचें वजन ३३$\frac{1}{3}$ ग्रेन आहे. हीच जर रुप्याची पै केली तर ती एक ग्रेनहि वजनाने भरणार नाही. मग सोन्याच्या पैची गोष्टच बोलावयास नको. सर्व जगांत अत्यंत लहान असें सोन्याचें नाणें नेपाळांत असे. त्याचें वजन $\frac{5}{8}$ ग्रेनाहून जास्त नसे. हीं नाणीं इतकीं पातळ असत की, फुंकर घालतांच उडून जावीं. कालीफोर्निआंत ४ ग्रेनचीं असलेलीं सोन्याचीं नाणीं फार लहान म्हणून म्हणत, पण नेपाळांतल्या नाण्याच्या मानानें तीं फार मोठीं म्हटलीं पाहिजेत.

## अविनाश्यता.

व्यापारांत एका हातांतून दुसऱ्या हातांत पैसा सारखा खेळावयाचा असल्याकारणाने व हवी ती वस्तु हवी तेव्हा घेतां यावी एतदर्थ पैशाचाच संग्रह करण्याकडे लोकांची प्रवृत्ति स्वाभाविक होत असल्यामुळे, पैशाचें द्रव्य

नाशिवंत असतां कामा नये. एखाद्या वायुरूप द्रव्याप्रमाणे तें उडून जातां कामा नये, मांसाप्रमाणे नासतां कामा नये, लाकडाप्रमाणे कुजतां कामा नये, अगर लोखंडाप्रमाणे गंजतां कामा नये. अंडीं, सुकी मासळी, ढोरें, तेल इत्यादि नाशिवंत पदार्थांचा उपयोग पैशाप्रमाणे केलेला आहे, नाही असें नाही. पण आज जो आपण पैसा म्हणून मानतों तो लवकरच नष्ट होऊन जावयाचा अशी त्यांची स्थिति असली पाहिजे. अशा नाशिवंत पदार्थांचा फार मोठ्या प्रमाणावर संग्रह करून ठेवणें शक्य नाही, व त्यांची किंमतहि ते नाशिवंत असल्यामुळे वारंवार बदलण्याचा संभव विशेष. त्यांतल्यात्यांत हा आक्षेप निरनिराळ्या प्रकारच्या प्राण्यांनाच कमी लागतो. कारण एकदा सुकल्यावर तीं बरीच वर्षे, समजण्यांत येण्यासारखा ऱ्हास न होतां राहूं शकतात.

## साधर्म्य.

आता, ज्या द्रव्याचा आपण पैसा करणार तें एकजातीचें असावें. असें असलें तरच सारख्या वजनाच्या कोणत्याहि तद्द्रव्यविभागांची किंमत सारखी असेल. एक अंश घेऊन त्यावरून दुसरे कोणतेहि अंश बरोबर मोजतां यावे म्हणून निरनिराळ्या अंशांत साम्य व सादृश्य असलें पाहिजे. म्हणजे मग दोन–आणि–दोन नेहमी चार होतील. जवाहिरांत चार खड्यांची किंमत दोन खड्यांच्या दुप्पट झाली असें क्वचित्‌च घडेल. सोनें, रुपें हा धातुसुद्धां मूल अवस्थेंत अगदीं एक जातीच्या नसतात. त्यांत पुष्कळ भेळ असते. पण ह्यापासून फारशी गैरसोय भासत नाही. कारण टांकशाळींतील धातुपरीक्षक लगडींत शुद्ध धातु किती आहे हें तावडतोब निश्चित करतो; शुद्ध करून नाणें पाडतांना धातूंचा कस एकच होतो. त्यामुळे सारख्या वजनाचीं नाणीं अगदी बरोबर सारख्या किंमतीचीं होतात.

## सुविभाज्यता.

ज्या जातीच्या द्रव्याचा पैसा करावयाचा त्या जातीच्या कोणत्याहि पद

थांत साधर्म्य असणें जसें अवश्य आहे, तसेच ते पदार्थ सुविभाज्य असणेंहि फार अगत्याचें आहे. आता विभाग करतां येणार नाहीत असा पदार्थ पृथ्वीवर एकहि मिळावयाचा नाही, हें म्हणणें एका अर्थी खरें. अतिशय कठीण असे हिरेसुद्धां फोडतां येतात, अथवा पोलादाचे अधिक कठीण तुकडे पोलादाने करतां येतात. पण पैशाच्या द्रव्याचे नुसते तुकडे करतां आले म्हणजे झालें असें नाही. त्याला आणखी एका गोष्टीची अपेक्षा आहे ती ही की, सर्व निरनिराळया तुकड्यांची एकंदर किंमत सबंध पदार्थाहून रतिभर सुद्धा कमी होतां कामा नये. एक कागद घेऊन त्याचे जर आपण दहा तुकडे केले तर सबंध कागदाची किंमत त्या दहा तुकड्यांना मुळींच नाही हें उघड आहे. असाच प्रकार लाकूड, दगड इत्यादि पदार्थांचा आहे. ह्याचें कारण असें की, ते तुकडे संयुक्त करून त्यांचा सबंध पदार्थ पुन्हा बनवितां येत नाही. असा प्रकार धातूंचा नसतो. धातूंचे निरनिराळे व कितीहि लहान असणारे तुकडे वितळून त्याचा एक गठ्ठा बनवितां येतो व असें करण्यास खर्चहि म्हणण्यासारखा लागत नाही. एक औंस सोनें किंवा रुपें वितळविण्यास सरासरी दोन पैपासून चार पैपर्यंत खर्च येतो. वितळवितांना धातूचा जो कांही अल्पनाश होतो तो धरून सुद्धा ह्याच्यापेक्षा जास्त खर्च होत नाही. ह्याप्रमाणे सामान्यतः कोणत्याहि मौल्यवान् धातूच्या तुकड्याची किंमत त्याच्या वजनाच्या प्रमाणानेच असते असें म्हणण्यास हरकत नाही.

## मोलाची स्थिरता.

ज्या पदार्थाला आपण पैसा म्हणून मानतों त्याच्या किंमतींत वारंवार चलबिचल होणें इष्ट नाही, हें उघड आहे. पैसा देऊन ज्याप्रमाणाने इतर सर्व पदार्थ विकत घेतां येतात तें प्रमाण होतां होईल तितकें एकसारखेंच राहावें अशी तजवीज केली पाहिजे. पैशाचा उपयोग केवळ विनिमयसामान्यत्वाकडेच होता, अगर मोलाचें परिणाम म्हणून केलेला तत्क्षणापुरताच होता, तर त्याच्या किंमतींत झालेल्या फेरबदलापासून फारशी बाधा झाली नसती. रुपयाची किंमत उतरली तर इतर सर्व पदार्थांची किंमत चढली

नाशिवंत असतां कामा नये. एकाद्या वायुरूप द्रव्याप्रमाणे तें उडून जातां कामा नये, मांसाप्रमाणे नासतां कामा नये, लाकडाप्रमाणे कुजतां कामा नये, अगर लोखंडाप्रमाणे गंजतां कामा नये. अंडीं, सुकी मासळी, ढोरें, तेल इत्यादि नाशिवंत पदार्थांचा उपयोग पैशाप्रमाणे केलेला आहे, नाही असें नाहीं. पण आज जो आपण पैसा म्हणून मानतों तो लवकरच नष्ट होऊन जावयाचा अशी त्यांची स्थिति असली पाहिजे. अशा नाशिवंत पदार्थांचा फार मोठ्या प्रमाणावर संग्रह करून ठेवणें शक्य नाही, व त्यांची किंमतहि ते नाशिवंत असल्यामुळे वारंवार बदलण्याचा संभव विशेष. त्यांतल्यात्यांत हा आक्षेप निरनिराळ्या प्रकारच्या धान्यांनाच कमी लागतो. कारण एकदा सुकल्यावर तीं बरीच वर्षे, समजण्यांत येण्यासारखा न्हास न होतां राहूं शकतात.

## साधर्म्य.

आता, ज्या द्रव्याचा आपण पैसा करणार तें एकजातीचें असावें. असें असलें तरच सारख्या वजनाच्या कोणत्याहि तद्द्रव्यविभागांची किंमत सारखी असेल. एक अंश घेऊन त्यावरून दुसरे कोणतेहि अंश बरोबर मोजतां यावे म्हणून निरनिराळ्या अंशांत साम्य व सादृश्य असलें पाहिजे. म्हणजे मग दोन–आणि–दोन नेहमी चार होतील. जवाहिरांत चार खड्यांची किंमत दोन खड्यांच्या दुप्पट झाली असें क्वचित्‌च घडेल. सोनें, रुपें या धातुसुद्धां मूल अवस्थेंत अगदीं एक जातीच्या नसतात. त्यांत पुष्कळ भेळ असते. पण ह्यापासून फारशी गैरसोय भासत नाहीं. कारण टांकसाळींतील धातुपरीक्षक लगडींत शुद्ध धातु किती आहे हें ताबडतोब निश्चित करतो; शुद्ध करून नाणें पाडतांना धातूंचा कस एकच होतो. त्यामुळे सारख्या वजनाचीं नाणीं अगदी बरोबर सारख्या किंमतीचीं होतात.

## सुविभाज्यता.

ज्या जातीच्या द्रव्याचा पैसा करावयाचा त्या जातीच्या कोणत्याहि पदा

र्थोत साधर्म्य असणें जसें अवश्य आहे, तसेच ते पदार्थ सुविभाज्य असणेंहि फार अगत्याचें आहे. आता विभाग करतां येणार नाहीत असा पदार्थ पृथ्वीवर एकहि मिळावयाचा नाही, हें म्हणणें एका अर्थी खरें. अतिशय कठीण असे हिरेसुद्धां फोडतां येतात, अथवा पोलादाचे अधिक कठीण तुकडे पोलादाने करतां येतात. पण पैशाच्या द्रव्याचे नुसते तुकडे करतां आले म्हणजे झालें असें नाही. त्याला आणखी एका गोष्टीची अपेक्षा आहे ती ही की, सर्व निरनिराळ्या तुकड्यांची एकंदर किंमत सबंध पदार्थाहून रतिभर सुद्धा कमी होतां कामा नये. एक कागद घेऊन त्याचे जर आपण दहा तुकडे केले तर सबंध कागदाची किंमत त्या दहा तुकड्यांना मुळीच नाही हें उघड आहे. असाच प्रकार लाकूड, दगड इत्यादि पदार्थांचा आहे. ह्याचें कारण असें की, ते तुकडे संयुक्त करून त्यांचा सबंध पदार्थ पुन्हा बनवितां येत नाही. असा प्रकार धातूंचा नसतो. धातूंचे निरनिराळे व कितीहि लहान असणारे तुकडे वितळून त्याचा एक गठ्ठा बनवितां येतो व असें करण्यास खर्चहि म्हणण्यासारखा लागत नाही. एक औंस सोनें किंवा रुपें वितळविण्यास सरासरी दोन पैपासून चार पैपर्यंत खर्च येतो. वितळवितांना धातूचा जो कांही अल्पनाश होतो तो धरून सुद्धा ह्याच्यापेक्षा जास्त खर्च होत नाही. ह्याप्रमाणे सामान्यतः कोणत्याहि मौल्यवान् धातूच्या तुकड्याची किंमत त्याच्या वजनाच्या प्रमाणानेच असते असें म्हणण्यास हरकत नाही.

## मोलाची स्थिरता.

ज्या पदार्थाला आपण पैसा म्हणून मानतों त्याच्या किंमतींत वारंवार चलबिचल होणें इष्ट नाही, हें उघड आहे. पैसा देऊन ज्याप्रमाणाने इतर सर्व पदार्थ विकत घेतां येतात तें प्रमाण होतां होईल तितकें एकसारखेंच राहावें अशी तजवीज केली पाहिजे. पैशाचा उपयोग केवळ विनिमयसामान्यत्वाकडेच होता, अगर मोलाचें परिणाम म्हणून केलेला तत्क्षणापुरताच होता, तर त्याच्या किंमतींत झालेल्या फेरबदलापासून फारशी बाधा झाली नसती. रुपयाची किंमत उतरली तर इतर सर्व पदार्थांची किंमत चढली

हें सांगणें नकोच. अशी कल्पना करा की, एका मनुष्यानें आपलें भात विकलें. आता रुपयाची किंमत उतरल्यामुळे म्हणजे भाताचा भाव वाढल्यामुळे त्यास त्याच्या भाताचे पूर्वीहून जास्त रुपये येतील; पण ह्या जास्त आलेल्या रुपयांचा त्यास कांही फायदा व्हावयाचा नाही. कारण त्याला हवे असणारे दुसरे पदार्थ तो घेऊं लागला म्हणजे त्यास पूर्वीहून जास्तच रुपये द्यावे लागतील. ह्या रीतीने कोणासहि नफा तोटा होणार नाही. मात्र पूर्वीपेक्षा व्यवहारांत नाणें जास्त लागेल इतकेंच. पण ज्या करारांची पूर्तता ताबडतोब व्हावयाची नसते, अशा करारांतहि लोक पैशाचा उपयोग मोलाचें परिमाण म्हणून करतात व करार करते वेळेस जी पैशाची किंमत असते ती पुढे बदलली तरी संवयीने किंवा कायद्याने लोक त्याच दराने पैसा देतात. उदाहरणार्थ अशी कल्पना करा की, आज एका माणसाने आपल्या जवळ असलेलें चार खंडी धान्य विकून दुसऱ्यास १०० रुपये एक वर्षाने परत घेण्याच्या बोलीने कर्जाऊ दिले. पुढे पैशाचा भाव निमटीने उतरला असतां सर्व जिनसा तितक्याच प्रमाणाने म्हणजे दुप्पट महाग होतील हें उघड आहे. अशा वेळीं सावकाराचें नुकसान व कर्ज काढणाराचा फायदा विनाकारण होतो, हें निराळें सांगावयास नको. कारण वरील उदाहरणांत चार खंडी धान्य देऊन दोन खंडी धान्य परत घेण्यासारखें आहे. सावकाराचें दुप्पट नुकसान झालें व कुळाचा दुप्पट फायदा झाला. ह्यामुळे पैशाच्या भावांत फेरबदल होणें इष्ट नाही. त्यामुळे समाजाचें नुकसान होतें.

ह्यावरून कदाचित् अशी शंका येण्याचा संभव आहे की, पैशाच्या भावांत बदल झाल्याने व्यक्तिशः जरी नफा तोटा झाला तरी एकंदर समाजाचें अहित होणार नाही. पण वस्तुतः हें खरें नाही. एका मनुष्याचें द्रव्य हरण करून दुसऱ्यास दिलें तर अपहृत मनुष्याचें नुकसान जितकें होईल, त्या मानानें द्रव्य दिलें त्या माणसाचा फायदा होणार नाही, असा सामान्य अनुभव आहे. असें समजूं या की एका माणसास कुटुंबाच्या निर्वाहास

१००० रुपये सालिना लागतात. त्याच्या त्या उत्पन्नांतून १०० रुपये कमी केले तर त्या कुटुंबास अर्धपोटीं राहावें लागेल व त्यामुळे त्या कुटुंबाची अत्यंत हानि होईल; पण त्याच माणसाच्या उत्पन्नांत आणखी शंभर रुपयांची भर घातली, तर त्यापासून म्हणण्यासारखा त्यास फायदा होणार नाही. ह्याचें कारण उघडच आहे की, १०० रुपये उत्पन्न असतां पैशाची उपयुक्तता त्याला जितकी होती, तितकी उपयुक्तता ११०० रुपयांचें उत्पन्न झाल्यावर राहात नाही. ह्या कारणामुळेंच जुगार, सट्टे इ. रूपानें जें द्रव्याचें परिक्रमण होतें त्यांत उपयुक्ततेचा अंश मुळीच असत नाही. मनुष्य उद्योगधंदा करीत असतो त्यांत त्याचा हेतु सुखप्राप्ति हाच असतो. हा उद्देश पैशाच्या भावांत चलबिचल झाल्याने नाहीसा होतो व त्यामुळे मनुष्यास उद्योग करण्यास प्रवर्तक कांही रहात नाही.

## ज्ञेयता.

इतर सर्व पदार्थांतून चटकन ओळखून काढतां येईल असा गुण पैशाच्या द्रव्यांत पाहिजे. विनिमयसामान्य ह्या नात्याने पैशाचा वापर सारखा चाललेला असतो. म्हणून प्रत्येक वेळीं प्रत्येक माणसास पैशाचें द्रव्य वजन करावें लागलें, कसास लावावें लागलें, अगर त्याचें अन्य रीतीने सूक्ष्म निरीक्षण करावें लागलें, तर त्यापासून फार त्रास होईल. खोट्या पैशापासून खरा पैसा ओळखण्यास जर विशेष अक्कल खर्च करावी लागली तर अज्ञ, भाबडे लोक सहज फसूं शकतील. एवढ्याकरिता हव्या त्या मनुष्याला सहज ओळखतां येईल असे कांही तरी स्पष्ट चिन्ह विनिमयसामान्यावर असणें अवश्य आहे. खोट्या नाण्याने अडाणी लोकांना कोणाला फसवतां येऊं नये, म्हणून प्राचीन काळीं हिंदुस्थानांत नाणकपरीक्षकाची योजना केलेली असे व त्यानें आपल्या कामांत लबाडी केली असतां त्यास मोठें शासन होई. जवाहिराचा पैशादाखल उपयोग करतां येईल असे त्यांत कांही गुण आहेत. पण खरेंखोटें ठरविणें अतिशय कसबाचें काम असल्यामुळे तें ह्या कामीं त्याज्य झालें आहे.

शेयता ह्या शब्दाने मुद्राग्राहकतेचाही अर्थ ध्वनित होतो. ठरीव किंमतीचा चलनी पैसा आहे असें दर्शविणारी मुद्रा, चिन्ह अगर ठसा ज्या पदार्थावर उमटेल तो पदार्थ मुद्राग्राहक आहे असें म्हणतात. सारांश, नाणें पाडतां येईल असें पैशाचें द्रव्य पाहिजे. म्हणजे मग टंकशाळेंतून नाणीं बाहेर आलीं असतां तीं सर्व एक आकाराचीं, वजनाचीं व किंमतीचीं आहेत हें सर्वांस समजतें. खरें नाणें कसें पाडावें ह्याचा विचार पुढे केला जाईल.

---

भाग सहावा.

## पैशाच्या कामीं उपयोजिलेल्या धातु.

चौथ्या भागांत वर्णिलेल्या पदार्थांत पैशाच्या द्रव्याच्या अंगीं अवश्य लागणारे धर्म जरी कमजास्त प्रमाणाने असले तरी धातूंच्या बरोबर त्यांची तुलना कधीच होणार नाही हें जास्त सविस्तर रीतीने सांगण्याची जरुरी दिसत नाही. पैसा म्हणून वापरण्यास निदान विनिमयसामान्यता व मूल्यसंग्रह हीं दोन पैशाचीं कार्यें करण्यास इतर सर्व पदार्थांपेक्षा कांही धातूंमध्ये स्वाभाविक लायकी दिसते. म्हणून ज्या ज्या काळचा इतिहास उपलब्ध आहे, त्या सर्व काळीं सोनें, रुपें, तांबें, जस्त, शिसें, लोखंड ह्या धातु कमजास्त प्रमाणाने लोकांच्या वापरण्यांत आहेत असें आढळून आलें आहे. पैसा म्हणजे तांब्यारुप्याचाच असावयाचा ही लोकांची बुद्धि इतकी दृढ झाली आहे की, पुष्कळ भाषांतून ह्या धातूंचे वाचक जे शब्द तेच पैशाचेहि आढळतात.

लोखंड शिवाय करून बाकी मुख्य धातू नाशिवंत नाहीत, हा त्यांच्यांत विशेष गुण आहे. त्याचप्रमाणे त्या साठवून ठेवल्या असतां किंवा त्यांची देवघेव चालू असतां त्यांच्यांत फारसा अवगुण उत्पन्न होत नाही. साधर्म्य हा गुण प्रत्येक जातीच्या धातूंत आहेच. एका तुकड्यांत व दुसऱ्या तुक-

ण्यांत जें कांही अंतर असतें तें वजनांत मात्र असतें; दुसऱ्या कशांत नाही. सोन्यारुप्याच्या निरनिराळ्या लगडींत थोडा फेर असतो पण तो तात्काळ समजतो व किती आहे हेंही नक्की ठरवितां येतें. धातूंचे बारीक तुकडे करतां येतात व म्हणण्यासारखें नुकसान अगर खर्च न होतां तुकडे परत वितळून त्यांचा गोळा करण्यांत येतो. श्रेयतेचा व मुद्राग्राहकत्वाचा गुण त्यांच्या ठिकाणीं विशेष प्रमाणाने वसत असतो. रंग, घनता व राठपणा हे गुण प्रत्येक धातूंत अद्वितीय असल्यामुळे नवख्या माणसाला सुद्धा एक धातु दुसऱ्या धातूहून सहज ओळखतां येते. धातू घनवर्धनीय असल्यामुळे त्यांस पाहिजे तो आकार देतां येतो व त्यांवर कायमचा ठसा उमटवितां येतो. नाणीं फार करून धातूंचींच बनविलेलीं दिसतात. पण सयाम येथे चिनी मातीचीं व हिंदुस्थानांत चामड्याचीं नाणीं पाडलीं होतीं असें दिसतें.

मोलाचें परिमाण या दृष्टीने जर धातूंचा विचार केला तर धान्य वगैरे इतर पदार्थांपेक्षा त्यांच्यांत मोलाची अस्थिरता जास्त असें आढळून येईल. धातूंची किंमत फार प्राचीन काळापासून लोक विशेष मानीत असले पाहिजेत. कारण, आजमितीसही रानटी लोकांची आवड धातूविषयीं विशेष दिसून येते; पण त्यांची किंमत ते खणून काढण्याचे मार्ग सुलभ झाल्यामुळे उत्तरोत्तर उतरत चालली आहे. एवढेंच नव्हे, तर पूर्वी जी धातू सर्वांत किंमतवान् म्हणून समजली जात असे, तिचा नंबर हल्ली खाली लागू लागला आहे. होमेरिक युगांत तांब्यापेक्षा लोखंड अधिक मौल्यवान् समजलें जात असे. शिसें तर फारसें लोकांस माहीतही नव्हतें व तें मोलवानही नव्हतें. सोनें, रुपें आणि जस्त ह्यांचा मात्र नंबर हल्लीप्रमाणे पूर्वींहि वरच होता.

## लोखंड.

मुख्य धातूंपैकी एकेक धातूचा विचार केला असतां ॲरिस्टॉटल,

पोलक्स इत्यादिकांच्या ग्रंथांवरून असें दिसतें की, प्राचीन काळीं लोखंडाचा पैशाच्या कामीं फारच उपयोग करीत असत. अशा प्रकारचा पैसा सांप्रत काळीं बिलकुल उपलब्ध नाही. पण असें होण्याचें कारण ही धातू फार लवकर गंजते हेंच होय. ह्या पैशाचा मासला पाहण्यास सांपडत नसल्या-मुळे, त्याचा आकार व स्वरूप हीं कशीं होतीं हें माहीत नाहीं. पण, मध्य आफ्रिकेंतील मुळचे लोक आजमितीसही व्यापारांत लहान लहान लोखंडी लगडींचा उपयोग करितात, त्या लगडीसारखेच ते पैसे असावेत असें वाटतें. अल्प किंमतीचे लोखंडी पैसे जपानांत चालत होते. हल्ली ते टांकसाळींत पाडावयाचे नाहीत, असें ठरलें आहे.

ही धातु फार स्वस्त आहे, गंज येत असल्यामुळे मलीन होते, व वर उमटविलेले ठसे अस्पष्ट होतात; तसेंच ह्या धातूचीं खोटीं नाणीं पाडणेंही सुलभ झालें आहे. ह्या कारणांवरून सुधारलेल्या राष्ट्रांत हल्ली शुद्ध लोखं-डाचीं नाणीं पाडण्याचें कोणाच्या मनांत येईल, ही गोष्ट स्वप्नींही नको. पण इतर धातूंचीं नाणीं पाडतांना त्यांत लोखंड किंवा पोलादाचें मिश्रण पुढेंही केलें जाईल असा अदमास आहे.

## शिसें.

शिशाचा विनियोग पैशाच्या कामीं पुष्कळदा झालेला आढळतो व एतद्विषयक निर्देश प्राचीन ग्रीक व लॅटिन कवींनी प्रसंगोपात्त केलेला आहे. मासाच्युसेट येथे इ. स. १६३५ सालीं एका फार्दिंगाला एक गोळी ह्याप्रमाणे किरकोळ कामांत शिशाच्या गोळ्यांची देवघेव होत असे. ब्रह्मदेशांत तर आजमितीस शिशाचें चलन सुरू आहे. त्याची किंमत वजनावर असते व त्याचा बारीकसारीक देवघेवींत मात्र उपयोग करितात. प्राचीन आंध्र राजांचीं शिशाचीं नाणीं हल्ली उपलब्ध झाली आहेत. त्यांत शुद्ध शिसें आहे. ह्यावरून पूर्वी ह्या धातूंचा उपयोग नाण्याच्या कामीं केला जात होता हें उघड आहे. अगदी अलीकडे म्हणजे अठराव्या शतकांत मुंबईस शिशाचें चलन चालू होतें. दोन पैसे, पैसा

व अर्धा पैसा हीं नाणीं अठराव्या शतकांत तांब्याचीं किंवा शिशाचीं पाडीत; पोर्तुगीझ लोकांच्या ताब्यांतील हिंदुस्थानी मुलखांतसुद्धा शिशाचीं नाणीं चालत. नाणकसंग्रहांत हीं नाणीं अद्यापि दृष्टीस पडतात. शुद्ध शिसें अतिशय मृदु असल्यामुळे त्याचें नाणें पाडतां येणें शक्य नाहीं. काशाचें नाणें पाडतांना मात्र शिशाचें संमिश्रण करितात.

## कथील.

निरनिराळ्या काळीं कथिलाचा देखील पैशाच्या कामीं उपयोग केलेला आहे. अगदीं खात्रीपूर्वक अशी ज्या प्राचीन कथिलाच्या नाण्याची माहिती मिळते तें नाणें सिराक्यूज येथील डॅनिसिअस ह्याने पाडिलें; पण कार्नवाल येथे कथील पूर्वी विपुल सांपडत असल्याकारणाने पहिलें इंग्लिश नाणें कथिलाचेंच असावें असे अनुमान करण्यास फारसा प्रत्यवाय नाही. रोमन बादशहांनी व इंग्लिश राजांनी कथिलाचीं नाणीं पुष्कळदां पाडलीं आहेत. इ. स. १६८० त दुसऱ्या चार्लस राजाने इंग्लंडांत कथिलाचें फार्दिंग पाडले. वुल्यम आणि मेरी ह्यांच्या कारकीर्दीत ( १६९० ते १६९१ ) सुद्धा अर्धा पेन्स व फार्दिंग हीं नाणीं ह्याच धातूचीं पाडीत. जावा व मेक्झिको येथील आणि दुसऱ्या पुष्कळ लोकांत कथिलाचें नाणें पूर्वी चालत असे; मलाक्का बेटांत अजूनही ही धातू वापरली जात आहे असें म्हणतात.

खुद्द इंग्लिशांनी आरंभीं मुंबईस ह्या धातूचें नाणें पाडलें होतें असें टॅव्हरनिअर म्हणतो. सयामांतील तानासरीम वगैरे ठिकाणीं कथिलाचीं मोठालीं पातळ व वाटोळीं नाणीं असत. हींच मलायन स्टेटमध्ये चालत. ब्रह्मदेशांतील बंदरकाठीं कथिलाचे पैसे वापरण्यांत होते.

ही धातु पांढरी स्वच्छ असून गंजत नाही व तांब्यापेक्षां अधिक मोलवानही असते. नाण्याच्या कामीं उपयुक्त असे बरेच गुण ह्या धातूंत आहेत. पण मृदुपणा, लवचीकपणा, व ठिसूळपणा ह्या गुणांमुळे वरील गुणांचा फायदा होत नाही.

असतें; पण त्यामुळें पैशाप्रमाणे तिचा उपयोग करण्यास कांही बाधा येत नाही, कारण, हें कवच अगदीं पातळ असतें व त्या विशिष्ट कृष्णवर्णावरून उलट बनावट रुप्याहून खरें रुपें ओळखण्यास मदत होते. योग्य प्रमाणाने इतर धातु मिश्रित केली असतां रुपें लवकर झिजत नाही. सोनें खेरीज करून इतर सर्व धातूंमध्ये रुपें विशेष घनवर्धनीय व मुद्राग्राहक असतें.

खाली सांगितलेल्या चिन्हांवरून रुप्याचें नाणें किंवा दुसरा पदार्थ ओळखतां येतो.

( १ ) तें घांसलें असतां पांढरी स्वच्छ झळक मारते.

( २ ) हवेंत फार वेळ ठेवल्याने पृष्ठभागावर काळसरपणा येतो.

( ३ ) विशिष्टगुरुत्व मध्यम असतें.

( ४ ) जमिनीवर टाकलें असतां सुरेख कणखर आवाज निघतो.

( ५ ) त्याच्या अंगीं काठिन्य पुष्कळ असतें.

( ६ ) नायट्रिक आसिदांत ठेवलें असतां त्याचा रस होतो व तो रस परत प्रकाशांत ठेवल्याने त्याचें घनीभवन होतें.

लोकांना नाणीं पाडण्याची कला साधल्यापासून सर्वत्र व सर्वकाळीं रुप्याचें नाणें पाडलें गेलें आहे. हें तांब्याइतकें अति स्वस्त व सोन्याइतकें अति महाग नसल्यामुळे देशाच्या धातुरूप चलनपद्धतींत रुप्याचा चांगला उपयोग होतो. नाण्याशिवाय भांडीं, पक्वाळें, नक्षीचीं कामें, इत्यादिकांत रुपें पुष्कळ अडकून राहतें. त्यामुळे, एकंदर पुरवठ्यांत थोडाबहुत फरक झाला तरी त्यापासून कांही विशेष परिणाम घडत नाही. ह्या कारणास्तव रुप्याच्या किंमतींत शेंपन्नास वर्षांतसुद्धा बदल होत नाही. जगाच्या बहुतेक सर्व भागीं फायदेशीर रुप्याच्या खाणी आढळतात. शिवाय जेथें शिसें सांपडतें तेथूनसुद्धा थोडें पण नियमित रुपें काढतां येतें.

## सोनें.

रुपें दिसण्यांत सुरेख दिसतें हें खरें, पण सोनें त्याहून सुरेख दिसतें व

त्याच्या ठिकाणीं जितके उपयुक्त धर्म आहेत तितके दुसऱ्या कोणत्याहि ज्ञात पदार्थांत आढळून येत नाहीत. सोन्याचा वर्ण इतका पिवळा-धमक असतो कीं, त्याला सोनेरी हेंच नांव शोभेल. शिवाय ह्या धातूची घनवर्ध-नीयता फार विलक्षण आहे. त्याचप्रमाणे प्लॅटिनम आणि दुसऱ्या थोड्या अत्यंत दुर्मिळ धातू खेरीज करून, विशिष्टगुरुत्वासंबंधाने ह्या धातूच्या तोडीला दुसरी कोणतीहि धातु लागणार नाही. पिवळा-धमक वर्ण, मोठें विशिष्ट-गुरुत्व, जमिनीवर फेकलें असतां, आंत प्लॅटिनम व शिसें ह्यांचा अंश नाही हें दाखविणारा आवाज, ह्या गुणांवरून विशिष्ट नाणें सोन्याचेंच आहे किंवा नाही ह्याची परीक्षा करतां येते.

एखादी विवक्षित धातू सोनें आहे की नाही, अशाबद्दल जर कांही शंका असली तर तिच्या द्राव्यशक्तीवरून त्या गोष्टीचा निर्णय करतां येतो. कोरड्या, दमट अगर अशुद्ध हवेंत कितीहि वेळ ठेवलें तरी सोन्यास यत्किं-चितहि बाधा होत नाही. तसेंच, कोणत्याहि आसिदाने त्याचें द्रवीभवन शक्य नाही. खऱ्या सोन्याशीं दुसऱ्या धातूंची भेळ केली असेल तर नाय-ट्रिक आसिदाने तिचा तावडतोब रस होईल. खऱ्या सोन्याला मात्र कांही धक्का लागणार नाही.

सोनें ही धातु नाणें पाडण्याच्या कामीं फारच लायक आहे. शुद्ध सोनें असासारखेंच बहुतेक मृदु असतें हें खरें, पण त्यांत दाहावा किंवा बारावा भाग तांबें मिसळलें असतां काठिन्य येऊन तें फार झिजत नाही, त्यामुळे आवाजहि कणखर निघतो; इतकें असूनहि तें घनवर्धनीय राहतें व त्याच्या-वर ठसा चांगला उमटवितां येतो. सोनें वितळण्यास फार उष्णता लागते असें नाही; तथापि, भट्टींतल्या अतिशय कडक उष्णतेने सुद्धां त्याचें बाष्पीभवन होत नाही. अशा रीतीने जुनीं नाणीं व तुकडे वितळवून नज-रेस येण्यासारखा नाश न होतां परत त्यांचा गड्डा बनवितां येतो; ह्या कामीं शेंकडा एक विसांशाहून जास्त खर्च येत नाही.

## प्लॅटिनम.

अलीकडे शोध लागलेल्या सामान्यतः दुर्मिळ ज्या कांही धातु आहेत, त्यांपैकी ही एक आहे. ही वितळण्यास फारच उष्णता लावावी लागते; व प्राणवायूशीं हिचा संयोग अतिशय कमी प्रमाणानें होतो. ह्या दोन कारणांमुळे ही धातु अविनाशी झाली आहे. शुभ्रवर्ण व फार मोठें विशिष्टगुरुत्व हीं ही धातु ओळखण्याचीं विशेष चिन्हें होत. ह्या धातूच्या खाणी रशियामध्ये पुष्कळ आहेत. राष्ट्रीय चलन करण्यास ही बऱ्याच अंशीं उपयुक्त वाटल्यामुळे रशियनसरकारनें इ. स. १८२८ त ह्या धातूचें नाणें पाडण्यास सुरवात केली पण त्यापासून उद्भवणाऱ्या अडचणी लवकरच प्रत्ययास येऊं लागल्या. सोन्यारुप्याइतका ह्या धातूचा वर्ण मोहक नसल्यामुळे वाटेल तेव्हां मोडून उपयोग करण्याकरितां म्हणून दागिन्यांच्या रूपानें हिचा कोणी संग्रह करून ठेवीत नाहीत. ह्या कारणास्तव व ज्या ठिकाणीं ही धातु सांपडते तीं ठिकाणें फार थोडकीं असल्यामुळे व्यापारानिमित्त अथवा अन्यकारणास्तव जास्त पैशाची गरज लागल्यास गरजेप्रमाणे पुरवठा होत नाही. त्याचा परिणाम पैशाची किंमत अतोनात वाढते. ही धातु वितळविणें अत्यंत दुर्घट असल्यामुळे नवीन नाणें पाडण्यास खर्च फार येतो. ह्यामुळे, जुनीं झिजलेलीं नाणीं वापरण्यांत राहण्याचा संभव जास्त. ह्याप्रमाणे ही धातु चलनाच्या कामीं अनुपयुक्त ठरल्यामुळे इ. स. १८४८ सालीं ही क्लृप्ति टाकून द्यावी लागली आणि प्रचारांत असलेलीं सर्व नाणीं माघारीं घ्यावीं लागलीं. पुन्हा ह्या धातूचा नाणें पाडण्याच्या कामीं कधी कोणी उपयोग करील असें दिसत नाही.

## निकल.

प्राचीन काळीं ही धातु म्हणजे धातुशोधकांचा काळ म्हणून मानली जात असे. पण सांप्रत यांत्रिक व्यापारांत आणि द्रव्यशास्त्रांतही हिला फार महत्त्व आलें आहे. दुसऱ्या धातूंशीं संमिश्रण करण्यांतच काय तो

हिचा उपयोग करतात. नाण्याच्या कामीं एक भाग निकल व तीन भाग तांबें असें प्रमाण असतें. बेल्जम व अमेरिका ह्या दोन देशांत ह्या मिश्र धातूचीं कांही नाणीं पाडलीं आहेत व तीं सोयीचीं आहेत असें वाटतें. इ. स. १८६९ आणि १८७०–७१ सालीं जमेकाकरितां इंग्लंडच्या टांकशाळेंत तीन हजार पौंड किंमतीचीं पेन्स व अर्ध्या पेन्साचीं ह्याच मिश्रधातूचीं नाणीं पाडलीं होतीं. जर्मन सरकारानेही आपल्या देशांत उपनाणीं ह्या धातूचीं पाडलीं आहेत. हिंदुस्थानांतसुद्धा एक आण्याचें व दोन आण्याचें नवीन नाणें ह्या धातूचें पाडलें आहे. किंमतींत फेरबदल होणें हाच ह्या धातूसंबंधानें दोष आहे. पण जसजसा संग्रह व वार्षिक उत्पन्न वाढत जाईल त्या मानाने किंमतींत एकदम फार फरक पडण्याचें कमी होईल ह्यांत शंका नाही.

## इतर धातु.

एथवर सांगितलेल्या धातूंपेक्षा दुसऱ्या पुष्कळ धातूंचा शोध अर्वाचीन रसायनवेत्त्यांनी लावला आहे. त्यामुळे आजवर नाण्याच्या कामीं ज्या धातूंचा उपयोग केला त्याच धातूंचा पुढेही केला जाईल, असें मानणें शहाणपणाचें होणार नाही. कदाचित् कालांतराने सोन्याहूनही महाग असलेली धातु वापरावी लागेल असा संभव दिसतो. साधारणपणें पाहतां मुख्य विनिमयसामान्यें तांबें, रुपें व सोनें ह्या अनुक्रमाने झालीं आहेत. जसजशी धातूंची किंमत उतरत उतरत गेली, तसतशी अधिक मोलवान् धातु आपल्याहून कमी मोलवान् असलेल्या धातूंची जागा घेत चालली. हल्ली तर रुप्याच्या ऐवजीं सुवाह्य सोनेंच झपाट्याने पुढे येत आहे. पूर्वी ज्याप्रमाणे सर्वत्र रुप्याचें नाणें चालू होतें त्याप्रमाणे लहान मोठया सर्व देशांतून सांप्रत सोन्याचें नाणें सुरू करण्याचा क्रम सारखा चालू आहे. ह्यावरून असें अनुमान करण्यास हरकत नाही कीं, पुढे सोन्याहूनही दुर्मिळ असलेली पलाद, ऐंद्र, ओस्म किंवा तशाच प्रकारची दुसरी एखादी धातु सोन्यास मागे सारील.

शिवाय, अल्यूमिनिअम अथवा मँगेनीज ह्या धातु रुप्याहून कमी खर्चाने काढतां येतात. ह्या धातूंवरून उपनाण्यांच्या हल्ली दुर्घट असलेल्या प्रश्नाचा निकाल समाधानकारक रीतीने लागण्याचा संभव दिसतो.

## मिश्र धातु.

निरनिराळ्या काळीं पुष्कळ मिश्रधातूंचीं नाणीं पाडलेलीं आहेत. किंबहुना, मिश्रणावांचून केवळ शुद्ध धातूंचा उपयोग कधी केला नाही, हेंच म्हणणें यथार्थ आहे. सोन्याचें किंवा रुप्याचें म्हणून हल्ली नाणें पाडतात. त्यांत सुद्धां परस्परांचें किंवा तांब्याचें मिश्रण केलेलें असतें. त्याचप्रमाणें तांब्यामध्ये दुसऱ्या धातूंची भेसळ केलेली असते. कांही रोमन बादशहांनी पितळेचीं पुष्कळ नाणीं पाडलीं होतीं. माळव्याच्या मुसलमान राजांचीं पितळेचीं नाणीं लाहोरच्या संग्रहांत आहेत. जावा बेटांतील जुनीं नाणीं पितळेचीं सांपडतात. ग्यासुद्दीन तघलख व महमद तघलख हे ह्या धातूचीं नाणीं पाडीत असत. अक्षिमशहाचीं तंक नांवाचीं नाणीं पितळेचींच असत. शिवाय उज्जनी, बुखारा, जपान येथें पूर्वी ह्या धातूचीं नाणीं चालत. चीन देशांत तागलू नांवाचें पितळेचें नाणें अद्यापि चालतें. ह्यासच विदेशी लोक कॅश म्हणतात. जस्ताचीं नाणीं हिंदुस्थानांत पोर्तुगीज लोकांनी आपल्या मुलखांत व इंग्लिशांनी मुंबईस पाडलीं होतीं. काश्मीरच्या कीदार व प्रव प्रतापराजांचीं नाणीं मिश्रधातूचीं होतीं. शुद्ध धातु करण्याची माहिती प्राचीन लोकांत नसल्यामुळे मिश्रधातूचीं नाणीं पाडणें अगदी साहजिक आहे. पैशाची जरूर असलेल्या राजांनी आजपर्यंत पुष्कळ वेळां सुलभ धातूंचीं नाणीं पाडलीं आहेत. जुन्या तोफा, मोडक्या घंटा, रद्दी तांबेंपितळ, जस्त आणि जुनीं स्वयंपाकाचीं भांडीं, तशीच दुसरी कोणतीहि सांपडेल ती रद्दी धातु ह्यांचीं नाणीं आयर्लंडांत दुसऱ्या जेम्सने पाडल्याचें सांगतात. इजिप्तच्या खलिप वालीदाने देशांतील ब्रांझ धातूचे पुतळे वितळवून त्यांचें नाणें पाडलें होतें. वर सांगितलेल्या जेम्स राजानें जस्ताचीं नाणीं रुप्याच्या नाण्याच्या किंमतीनें वापरलीं जावींत म्हणून प्रयत्न केला होता.

---

## भाग सातवा.

# नाणीं.

इतर पदार्थांपेक्षा चलनाला धातूच उपयुक्त आहेत, ह्यांत कांहीं शंका नाहीं; व धातूंतही कांहीं धातु इतरांपेक्षा ह्या कामीं विशेष लायक आहेत हें अगदी निर्विवाद आहे. संकेत किंवा कायदा एकीकडे ठेवूनही केवळ स्वभावतःच सोनें आणि रुपें ह्या दोन धातु सर्व जगाला पैशासमान झाल्या आहेत, हें जें फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ टरगो ह्याने म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. नाणें पाडण्याची कला जरी अस्तित्वांत आली नसती, तरीसुद्धा सोन्यारुप्याचाच पैसा बहुधा सर्वत्र झाला असता; पण ह्या धातूंच्या नियमित वजनाच्या तुकड्यांचीं नाणीं पाडून त्यांच्या अंगच्या अमोल गुणांचा किती उत्तम रीतीने आपणांस फायदा करून घेतां येईल हें आता पाहावयाचें आहे.

फार प्राचीन काळीं धातूचें चलन प्रथम सुरू झालें तेव्हा सामान्यपणे वजन ठरविलेले नुसते हे तुकडे इतर पदार्थ खरेदी करण्याकरितां वापरीत असत. प्राचीन एट्रस्कन लोकांच्या वापरण्यांत असलेलें तांब्याचें नाणें उपलब्ध आहे, त्यावरून पाहतां असें दिसतें की, विशिष्टाकृतिशून्य असे तांब्याचे तुकडेच त्यांच्या प्रचारांत असत. शिवाय, सर्व्हिअस राजाच्या पूर्वी मूळ स्वरूपांतच तांब्याचा नाणेंवजा उपयोग करीत असत असें प्लिनी नांवाच्या ग्रंथकाराने लिहून ठेवलें आहे. नंतर तांबें, पितळ अथवा लोखंड ह्यांच्या कांबी उपयोगांत आल्या असाव्या. ग्रीस देशांत किंमतीचें आदि परिमाण जें होतें त्यास द्रम्म (द्रम्मा) असें म्हणत त्याचा वास्तविक मूळ अर्थ मुठींत मावण्याजोग्या धातूच्या सळ कांबी असा होता असें म्हणतात. ह्याप्रमाणे आरंभीं धातुरूप पैसा चाले.

समुद्रकांठीं सोनें वाळूंत विपुल सापडतें व तें कण्याच्या आकाराचें असतें, तेव्हा ह्याच रूपाने त्याचा प्रथम पैशाच्या ऐवजी उपयोग होऊं

लागला. कॅलिफोरनिया, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इ. ठिकाणीं सोन्याच्या खाणीशीं आजमितीससुद्धा सोन्याचे कण वजन करून पदार्थ विकत घेतात. सोनें, रुपें वितळून त्यांच्या निरनिराळ्या आकारांच्या वस्तु बनविण्याची कला फार प्राचीन काळापासून लोकांस माहीत आहे. आपल्या इकडे अद्यापि पुष्कळ गरीब लोक थोडेसे रुपये शिल्लक पडल्यास ते वितळवून त्याचे दागिने करून ते अंगावर घालतात व गरज पडल्यास पुनः तेच मोडून त्यांचा निर्वाहाकरिता उपयोग करतात. त्याचप्रमाणे, प्राचीन गॉथ व केल्ट लोक सोन्याच्या जाड तारा करून त्यांच्या आंगठ्या बनवीत व व्यापाराकरता मोडाव्या लागेपर्यंत आपल्या बोटांत वापरीत असा तर्क आहे. एशिया व युरोप ह्या दोन खंडांतहि सोन्याचीं वळीं पुष्कळ सापडतात व तीच नाण्याची पूर्वावस्था असावी ह्यांत शंका नाही. कांही ठिकाणीं हीं वळीं सारख्याच वजनाचीं मुद्दाम केलीं असावींत; कारण ब्रिटन लोकांचीं ठरीव वजनाचीं लोखंडाचीं वळीं असत व ते त्यांचा पैशाप्रमाणे उपयोग करीत असें सीझरने म्हटलें आहे. इतर ठिकाणीं वजनावर ह्यांची देवघेव होत असावी असें वाटतें; कारण हातांत ताजवा घेऊन अशा प्रकारच्या आंगठ्या वजन करताहेत असे पुतळे इजिप्तमध्ये सापडतात. न्यूबियामध्ये अद्यापि असलीं वळीं पैशाच्या रूपाने चालतात असें म्हणतात.

वर सांगितल्याहून अन्य नानाविध आकारांचे सोन्यारुप्याचे पैसे प्रचारांत आहेत; उ. सयामांत अगदी बारीक लगडी एका विशिष्ट रीतीने वाकवून त्यांचे पैसे बनवतात. पांदिचरीमध्ये व अन्यत्र सोन्याच्या पैशाला बुतावांचा आकार दिलेला असतो.

## नाण्यांची उत्पत्ति.

नाणें पाडण्याची कल्पना प्रथम केव्हा निघाली तो काल अदमासाने ठरवितां येईल. वेदांत, तसेंच रामायण, महाभारत व होमर ह्यांत नाण्याचा उल्लेख नाही. लायकरगसच्या वेळीं तें लोकांस ठाऊक होतें; ह्यावरून नाणें

पाडण्याची युक्ति निघून आज जवळ जवळ ३००० वर्षें झालीं असावींत असें अनुमान करण्यास हरकत नाही.

एकाद्या वस्तूवर आपली सत्ता अथवा अधिकार आहे असें दाखवावयाच्या उद्देशाने त्यावर शिक्का मारण्याची चाल पूर्वांपार चालत आहे. एखाद्या राजाच्या मनांत चलनात्मक धातूच्या तुकड्यांचें वजन अमुक आहे अशी सर्व लोकांची खात्री करून देण्याचें आलें असेल तेव्हा अर्थात् त्याने आपल्या शिक्क्याचा उपयोग केला असावा. ह्या एका गोष्टीवरून नाण्यांची कल्पना कशी निघाली असावी ह्याची अटकळ करतां येईल. मोहोर नांवाच्या सोन्याच्या नाण्यावरूनमुद्धा हाच सिद्धांत चांगला व्यक्त होतो. मोहोर हा फारशी शब्द असून त्याचा अर्थ शिक्का असा आहे. मोहोर शब्दाचा वास्तविक अर्थ शिक्का मारलेलें नाणें इतकाच आहे. पुढे मात्र तो एका विशिष्ट जातीच्या नाण्यांचा वाचक बनला. आरंभींच्या नाण्यांत शिक्क्याला धक्का लावल्यावांचून वजन कमी करण्यांत येणार नाही अशी योजना केलेली दिसत नाही. पुष्कळ नाण्यांवर एकाच बाजूला शिक्का असे. सिलोनमध्ये व दक्षिण हिंदुस्थानांत इराणचें नाणें सापडतें. ह्याला लारीन म्हणतात. हें नाणें म्हणजे सुमारें अडीच इंच लांबीची दोन फेरे घेऊन वर्तुलाकार बनविलेली रुप्याची तार असते. हिची एक बाजू मुद्दाम चपटी करून तिच्यावर शिक्का मारीत. मागे सांगितलेल्या वळ्याच्या पैशाचा हा अवशेष आहे असें वाटतें. चीन देशांत सरकारने पसंत केलेल्या रुप्याला जोड्याचा आकार देऊन त्यावर शिक्कामोर्तब करतात व मग त्याचा पैशादाखल उपयोग केला जातो.

## नाणें म्हणजे काय ?

आपण हल्ली ज्याला नाणें म्हणतों त्याच्याशीं वर सांगितलेल्या रुप्याच्या वळ्यांचें, बुतावांचें आणि शिक्क्याच्या लगडींचें कांहीसें साम्य आहे; तथापि सोईचा पैसा करण्यास आपणांस आणखी कांही तरी केलें पाहिजे हें उघड आहे. शिक्का अशा रीतीने मारला पाहिजे की, त्यावरून धातूचा

कस व गुळचें वजन ह्यांच्याबरोबर पाळीमागून त्यांत कांही अफरातफर झाली नाही हेंहि स्पष्ट दिसलें पाहिजे. आपल्या हल्लीच्या समजुतीप्रमाणे धातूचें नाणें पाडणें म्हणजे वर्तुलाकार, लांबट, चौकोनी, षट्कोनी, अष्टकोनी अगर अशाच दुसऱ्या आकाराचे चपटे तुकडे करून त्यांवर दोन्ही बाजूंनी खोदलेल्या ठशांनी छाप उठविणें हें होय. ह्याप्रमाणे सुबक नाणीं पाडलीं असतां तशाच तऱ्हेचीं बनावट नाणीं करणें खर्चाचें व दुर्गम होतें इतकेंच नाही तर, वरील छाप शाबूत असल्यास त्या नाण्यांत कोणीं अफरातफर केली नाही अशीहि पण आपली खात्री होते. शिवाय नाण्याच्या कडा गुळगुळीत अथवा वरचा छाप अस्पष्ट झाला असेल तर तेवढ्यावरूनहि तें नाणें किती झिजलें आहे ह्याचा ढोबळ अदमास आपणास करतां येईल. नाणें म्हटलें म्हणजे त्यावर छाप पाहिजेच अशी समजूत फार प्राचीन काळापासून आहे. नुसत्या धातूंच्या तुकड्यांना नाणें म्हणत नाहीत, म्हणून सर्वज्ञनारायणाने मनुस्मृतीवरील टीकेंत " नाणकं मुद्रादिचिह्नितं द्रम्मनिष्कादि " " राजनामाङ्कादिना मुद्रितं" अशीच व्याख्या नाण्याची केली आहे. तेव्हा पृष्ठभागावर मारलेल्या राजनामांकादि मुद्रांच्या स्पष्टपणावरून ज्या धातूंच्या तुकड्यांच्या वजनाची व कसाची 'वास्तविक' उपलब्धि होते अशा तुकड्यांस नाणीं म्हणावयाचें ही व्याख्या बसते.

## नाण्यांचे नानाविध आकार.

हिंदुस्थानांत आजपर्यंत वेळोंवेळीं जीं असंख्य नाणीं पाडलीं त्यांचे आकारहि तितकेच भिन्न भिन्न आहेत. तथापि त्यांतल्या त्यांत वर्तुलाकार नाणीं पाडण्याचा प्रघात जास्त दिसतो. मणिपूरचीं नाणीं बहुधा चौकोनी आढळतात. तसेंच काश्मिरच्या सुलतानांचीं रुप्याचीं नाणीं, शीख लोकांचीं कांही तांब्याचीं नाणीं, नाझीरशाहा खिलजीचीं कांही सोन्याचीं व तांब्याचीं नाणीं, ग्वालेर, हिसार, लखनौ, काल्पी, कनोज, संभाळ, इ. टांकसाळीमधून निघालेलीं कांही नाणीं चतुष्कोनी होतीं. आसामचीं नाणीं बहुधा अष्टकोनी आढळतात. शीखांच्या तांब्याच्या कांही नाण्यांच्या आकृति

षट्कोनी आहेत. तसेंच शमसुद्दीनाचीं (१२१०–३५) तांब्याचीं नाणीं ह्याच आकाराचीं होतीं. नासिरुद्दीन, जलालुद्दीन वगैरे कांही राजांच्या नाण्यांवर वर्तुलांत दोन चौकोनी असत. जंगीजखानाच्या नाण्यांवर एकांत-एक अशीं दोन वर्तुळें असत. एक फार प्राचीन तांब्याचें नाणें सापडलें आहे, त्याची आकृति तर त्रिकोणी आहे. नासिरुद्दीनाच्या कांही तांब्याच्या नाण्यांवर वर्तुल असून आंत एक लांबट आकृति असते.

सिलोन व दक्षिणहिंदुस्थान ह्या दोन ठिकाणीं नाणीं सापडलीं आहेत, त्यांचा आकार मासे धरण्याच्या गळासारखा आहे. जपानी कोडम नांवाचें नाणें गोलाकार असून एका मोठ्या बाटाण्याइतकें असतें. आपल्या इकडील होनही अशाच तऱ्हेचा होता. सयामांतील नाण्यांची तुलना घोड्याच्या नालाचीं करीत असतात. चीनदेशांत पितळेचें नाणें चालतें त्यास ते लोक तागल म्हणतात व विदेशी लोक कॅश म्हणतात. हें मंडलाकृति असून त्याच्या मध्यभागीं चतुष्कोनाकृति छिद्र असतें. छिद्र ठेवण्याचा हेतु इतकाच असतो की, त्यांत दोरी ओवून शेंकडों तागल एकत्र करून त्यांच्या माळा करतां याव्यात. सर्वांत विलक्षण तऱ्हा म्हटली म्हणजे इराणांत एका वेळीं तरवारीच्या आकाराचीं नाणीं चालत ती होय. ह्याच्या खालोखाल चमत्कारिक तऱ्हेचीं नाणीं स्वीडनदेशांत असत. हीं नाणीं म्हणजे शुद्ध तांब्याचे मोठमोठाले पत्रे होत. एवढ्या मोठ्या पत्र्यावर एक छाप मारणें शक्य नसल्यामुळे प्रत्येक कोनांत एक व मध्ये एक वर्तुलाकार शिक्का मारलेला असे. ह्या तऱ्हेचें मोठें नाणें ७॥ इंच चौरस असे.

## नाण्यांचा उत्तम आकार

नाणीं पाडण्याची पद्धति व त्यांचा आकार उत्कृष्ट असणें फार अगत्याचें आहे. कारण, धातुरूप पैशाचा उपयोग एकदा आपण करूं लागलों म्हणजे खोटीं नाणीं लोक पाडूं लागतात. ही इच्छा इतकी बलवत्तर असते की अशा अपराधास कितीही शिक्षा ठेवली, तरी ती कमींच होते, असा दोन हजार वर्षांचा अनुभव आहे. याज्ञवल्क्यस्मृतींत खोटें नाणें पाडणा-

याला सर्वांत मोठा दंड सांगितला आहे. अद्यापिही नाणीं पाडण्याच्या कामीं चांगल्या यंत्रांचा उपयोग होत असूनहि खोटीं नाणीं पाडण्याचे गुन्हे हमेष घडत आहेत. म्हणून शिक्षेच्या योगाने असले गुन्हे कमी करण्याच्या भानगडींत न पडतां नाणीं पाडण्याच्या कलेंत सुधारणा करून खोटीं नाणीं पडण्याची शक्यता नष्ट करण्याचे प्रयत्न नेहमी करावेत.

नाण्यांवर कोणती मुद्रा असावी ह्याचा निर्णय करितांना आपणांस विशेषतः मुख्य चार गोष्टी लक्ष्यांत ठेवल्या पाहिजेत.

१. बनावट नाणीं पाडतां येऊं नये.

२. नाण्यांतील धातू लबाडीने काढून घेतां येऊं नये.

३. वापरामुळे स्वभावतःच झिजेने धातूचें नुकसान फार होऊं नये.

४. नाणें पाडणाऱ्या राजाचें व तें वापरणाऱ्या लोकांचें ऐतिहासिक व कलाकौशल्याचें तें स्मारक असावें.

खोटीं नाणीं पाडतां येऊं नयेत म्हणून नाण्याचें यांत्रिक स्वरूप शक्य तितकें निर्दोष केलें पाहिजे; आणि ज्या यंत्राने नाणें पाडावयाचें तें अतिशय नाजूक व भानगडीचें असावें. ज्या वेळीं धातूचा रस ओतून नाणीं पाडीत त्या वेळेस तीं बनावट करण्याचें काम फार सुलभ असे. म्हणून प्राचीन काळीं खऱ्याखोट्या नाण्यांतील भेद समजणें फार अवघड पडे. एवढ्याकरताच पूर्वी नाणकपरीक्षक म्हणून राजनियुक्त पुरुषाची योजना होत होती. रस ओतून नाणें पाडण्याची पद्धति कांही दिवसांनी बंद पडून हातोडीने पत्रा ठोकून नाणें बनविण्याची अधिक सुधारलेली पद्धति प्रचारांत आली. ह्यानंतर नुसत्या साध्या यंत्रांनी नाणीं पाडूं लागले. हल्ली तर बहुतेक सुधारलेल्या देशांत वाफेच्या यंत्राचा ह्या कामीं उपयोग होत आहे.

अर्वाचीन नाण्यांची भोंवतालची नक्षी व वरील मुद्रा अगर छाप जितकीं चांगलीं वठतील तितकीं वठवण्याकडे लक्ष दिलें पाहिजे; कारण असें झालें असतां नाणें तोडून त्यांत अफरातफर करण्यास सापडत नाही. मोंगल बादशहांचीं कांही रुप्याचीं नाणीं ह्या पद्धतीचीं असून फारच सुबक असत.

त्रावणकोर येथे चक्रं नांवाचें रुप्याचें नाणें चालतें. ह्याच्यावर मुखवट्याच्या ऐवजी कांहीं अक्षरें असतात ह्यामुळे खोटीं नाणीं पाडण्यास फार सुलभ जातें. हल्ली त्या देशांत खोटीं नाणीं फार प्रचारांत येऊं लागलीं आहेत. ब्रिटिश अमलापूर्वीच्या कोणत्याहि नाण्यांवर मुसलमानांच्या अगर हिंदूंच्या राजाचा मुखवटा नसे. कुराणांतलीं वाक्यें, देवादिकांचीं चित्रें, राशी, सिंहादिपशूंच्या आकृति आणि राजांचीं नांवें उमटविलेलीं असत. जहांगीर बादशाहाच्या नाण्यांवर मात्र राजाचा मुखवटा असलेला दृष्टीस पडतो. हा प्राचीन नाण्यांना अपवाद होय. यंत्राने तयार केलेलीं हल्लीचीं समुद्र व नक्षीदार नाणीं बनावट करतां येतात, तेव्हा प्राचीन काळीं बनावट नाणीं किती होत असतील ह्याची कल्पनाच केली पाहिजे.

## कलाकौशल्याचीं कामें ह्या दृष्टीने नाण्यांचा विचार.

बनावट नाणीं पाडतां येऊं नये म्हणून नाण्यांचा आकार कसा असावा ह्याचा विचार नुकताच केला. झिजेमुळे नाण्याला लागणारी घट, त्याकारणाने त्याचा अव्यवहारोपयोगीपणा, व हीं टाळण्याचा उपाय ह्यांचें विवेचन १३ व्या भागांत केलें जाईल. आता, येथे एवढें सांगणें जरूर आहे की, वर निर्दिष्ट केलेले दोष नाण्यांत राहूं नयेत, म्हणून खबरदारी घेणें जसें अगत्याचें आहे, तसेंच करणाराचें कौशल्य त्यांत दृग्गोचर होईल अशा रीतीने तीं सुबक करण्याकडे लक्ष पोंहोचविणें सुद्धा अवश्य आहे. अशा दृष्टीने मराठयांच्या शिवराईढब्बूंचा नंबर फार खाली लागेल. परंतु त्या वेळेस यंत्राचें साहाय्य नसल्यामुळे ही अडचण एका प्रकाराने अपरिहार्य होती. हल्ली सुद्धा इंग्लिशांच्या नाण्यांत विशेष सुबकपणा दिसून येतो असें नाही. तांब्याचा अर्धा आणा, ज्यास फद्या म्हणतात तो, फार बेढब दिसतो. तसेंच एडवर्डबादशाहाच्या हारपाचे जे नवीन रुपये पडले आहेत ते पाडणारांच्या अरसिकतेचें प्रदर्शन आहे, असें म्हणण्यास विशेष हरकत नाही. राणीच्या नाण्यांवरील मुखवटा उचललेला पाहिजे होता. हा दोष हल्लीच्या नाण्यांत कांहीं अंशाने नाहीसा केला आहे. तसेंच, उलट बाजूवर

पूर्ववत् वेलबुट्टी पाहिजे होती हें खरें; तथापि मुखवट्यावर मुकुट दाखविला असता, तर बरें होतें. नाण्याचा पृष्ठभाग कोरा राहिल्याने बनावट नाणीं करणें सुलभ जातें, हें उघड आहे.

## ऐतिहासिक नाणीं

राज्यारोहण, राज्योत्सव, विजय इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींचें स्मारक म्हणून आजपर्यंत पुष्कळ राजांनी नाणीं पाडलीं आहेत. राज्यारोहणाचा व नाण्यांचा अति निकट संबंध आहे, असें दिसतें; कारण तद्द्वारा नवीन राजपुरुषाची प्रसिद्धि तेव्हाच होते. शिवाजीने राजपद धारण केल्याबरोबर प्रथम आपल्या नांवाचें नवीन नाणें पाडलें हें सुप्रसिद्धच आहे. बंड करून राज्यावर हक्क सांगावयाचा असला म्हणजे एकदम आपल्या नांवाचें नाणें पाडीत. आपल्या पश्चात् राज्याचा अधिकारी आपला मुलगा आहे, हें जगजाहीर करण्याकरता बगदादचा खलीफ हरून अल् रशीद ह्याने आपल्या मुलाच्या नांवाने नाणें पाडलें होतें. एखाद्या शूर पुरुषाने राजास राज्य संपादन करण्याच्या कामीं जर साहाय्य केलें असलें, तर ती गोष्ट ध्यानांत रहावी म्हणून त्याचें नांव राजाच्या नांवाबरोबर नाण्यांवर घालीत असत. एकाद्या राजाबरोबर तह होऊन त्याच्याशीं सख्य झालें, तरीसुद्धा त्याचा परिणाम नाण्यावर घडे. अवरंगजेबाशीं सख्य करण्याकरिता तिबेटच्या राजाने वकील पाठविले, त्यांनी तिबेटांत त्यानंतर पाडल्या जाणाऱ्या नाण्यांच्या एका बाजूवर अवरंगजेबाची मुद्रा उठविण्याचें कबूल केलें होतें. पूर्वी नवीन राजा गादीवर बसल्यावर त्याच्या नांवाचें नवीन नाणें पाडणें जितकें अवश्य होतें, तितकें आता ह्या शांततेच्या दिवसांत राहिलें नाही. तरीसुद्धा महाराणी व्हिक्टोरिया ह्यांच्या मरणानंतर एडवर्ड बादशहांनी आपल्या नांवाचीं नाणीं हिंदुस्थानांत पाडलीं, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ऐतिहासिक नाण्यांच्या योगाने इतिहाससंशोधनाला मदत होते, ह्यांत शंका नाही. सर्व वाङ्मय व प्राचीन शहरें जरी नष्ट झालीं तरी असल्या प्रकारच्या नाण्यांवरून पुष्कळ ऐतिहासिक गोष्टी समजल्या जातात. ह्या गोष्टींची प्रचीति

हल्ली जे लोक हिंदुस्थानचा पूर्वकालीन इतिहास शोधीत आहेत त्यांस पदोपदीं येत आहे. फ्रान्समध्ये जोलीसाहेबांनी १८४२ त व १८५२ त ऐतिहासिक नाणीं पाडण्याबद्दल सूचना आणली होती. पण तिचा कांही उपयोग झाला नाही. इंग्लंडांत तर अशा प्रकारचीं नाणीं कधींच पाडलीं नाहीत. दर खेपेस नवीन सांचे करण्याचा खर्च सोसावा लागेल; पण ह्या ल्हानशा खर्चाशिवाय ऐतिहासिक नाणीं पाडण्यास दुसरी हरकत नाही.

## नाणें पाडण्याचा हक्क फक्त राजालाच पाहिजे

प्रत्येक सुधारलेल्या समाजाचा व्यवहार सुरळीत चालण्याकरिता निर्दोष नाण्यांची अवश्यकता आहे हें उघड आहे. तेव्हा अर्थात् असा प्रश्न उद्भवतो की, हीं नाणीं पाडावीं कोणीं ? दरएक जातीचीं सर्व नाणीं सारख्या वजनाचीं आणि एकाच कसाचीं असून तीं त्या तऱ्हेचीं आहेत अशाबद्दल खात्री करणारा वर शिक्का पाहिजे. अशा प्रकारच्या नाण्यांचा पुरवठा करण्याचें काम चाकूकातऱ्या वगैरे जिन्नस पुरवण्याचें जसें आपण कारखानदारांवर व व्यापाऱ्यांवर सोपवतों तसेंच त्यांच्यावर सोपवावें काय ? अथवा, कायद्याने केलेल्या नियमांप्रमाणे निर्दोष नाणें पाडण्याकरिता सरकारी खातें स्थापणें अवश्य आहे काय ?

पूर्वीचा इतिहास पाहिला असतां महाराष्ट्रांत खासगी टांकसाळी पुष्कळ होत्या असें दिसतें. त्यांवर अंशतः तरी सरकारी देखरेख असावी असें वाटतें. शेंकडा अडीच रुपये सरकारांत देऊन सरकारी शिक्क्याचीं नाणीं पाडण्याचा हक्क वाटेल त्या गांवीं वाटेल त्या सोनारास देण्याचा मोंगल बादशहांचा रिवाज होता. नाणें पाडण्याची परवानगी पेशवे सरकार देत असत. ह्यावरून अशा परवानगीवांचून हव्या त्या माणसांस नाणें पाडणें शक्य नव्हतें, असें दिसतें. कोरिया देशांत आजमितीसहि सरकार खासगी टांकसाळी काढूं देतें. चढाओढीच्या तत्त्वांचा अवलंब करून चाहेल त्या माणसास नाणें पाडण्यास मुभा असावी, असें प्रतिपादन करणारे लोक थोडे थोडके नाहीत. ह्या सर्वांत इंग्लंडांत हरबर्ट स्पेन्सर प्रमुख होते. चांगला

चहा ज्या दुकानांत मिळतो, तेथे जशी गिऱ्हाइकांची गर्दी होते, त्याप्रमाणे पुऱ्या वजनाचें व ठरीव कसाचें नाणें जेथे मिळेल, तेथेच लोकांच्या झुंडी पडतील व तदितर नाण्याला कोणी पुसणारहि नाहीत, असे स्पेन्सरसाहेबांनी आपल्या समाजशास्त्रांत म्हटलें आहे.

हे साहेब ह्या शतकांतले एक जबरदस्त तत्ववेत्ते होते हें निर्विवाद आहे. तरीपण कित्येक बाबतींत त्यांचीं मतें फार एकदेशी होतीं. चढाओढीचें सामान्य तत्त्व जरी खरें असलें, तरी त्याला कोठेच अपवाद नाही ? इतर व्यापारांत स्वहितदक्ष व्यापारी माल चांगला काढण्याविषयी नेहमी जपत असतात, परंतु पैशाच्या बाबतींत निर्दोष नाणें न काढण्यांतच त्यांचें हित असतें. हें कसें होतें, ह्याचा विचार पुढे केला जाईल.

अनुभवावरूनसुद्धा हेंच अनुमान दृढ होतें. कारण, आजपर्यंत पुष्कळ वेळां व पुष्कळ ठिकाणीं खासगी कारखानदारांनी नाणीं पाडलीं आहेत. परंतु त्याचा परिणाम प्रत्येक ठिकाणीं चलन बिघडून जाणें हाच झाला आहे. धारवाडप्रांतांतील सुमारे १८ टांकसाळी खोटीं नाणीं पाडूं लागल्या-मुळे पेशव्यांस बंद कराव्या लागून सरकारी टांकसाळ खुद्द धारवाड येथे उभारावी लागली. वर सांगितलेल्या कोरिया देशांत खोटें नाणें हल्ली इतकें माजलें आहे की, गेल्या सालीं कस्टम अधिकाऱ्यांनी ३५,७३,१३८ नाणीं जप्त केलीं. इंग्लंडमध्येसुद्धा पूर्वी खासगी रीतीने लोक नाणीं पाडीत असत. बोल्टन आणि वॉट ह्यांच्या चरित्रांत बोल्टनचें एक पत्र छापलें आहे, त्यांत तो म्हणतो की, मी प्रवास करीत असतां जकातीच्या नाक्यांवर दर तीन नाण्यांत दोन खोटीं नाणीं मला हम्मेशा सापडत. ह्या खोट्या नाण्यांचा सुळसुळाट इतका झाला की, कांही शहरवासी लोकांनी सभा भरून ह्या नाण्यांऐवजी दुसऱ्या कंपनीचीं पुऱ्या वजनाचीं नाणीं वापरण्याचा ठराव केला. ह्या पुराव्यावरून इतकें उघड होतें की, नाण्याच्या व्यापारांत स्वहिताची आस्था खोटीं नाणीं प्रचारांत न येऊं देण्याविषयी असमर्थ असते. चीन देशांतील तागलु नांवाचें लहान नाणें सामान्यतः खाजगी

रीतीनेच कारखानदार पाडतात, त्यामुळे तीं हल्ली हीन कसाचीं व कमी वजनाचीं होत चाललीं आहेत.

सारांश, नाणें पाडण्याचा अधिकार लोकांवर न सोपवतां सरकारने आपल्याकडेच ठेवावा, हें अगदी अवश्य आहे. लोकांकडे हें काम सोपवल्यास निर्दोष नाणीं निघतील ही आशा करणें व्यर्थ आहे व ह्याप्रमाणे हल्ली बहुतेक सुधारलेल्या देशांतून सरकारच हें काम करीत असतें.

भाग ८ वा.

## चलनाचीं तत्त्वें

प्राचीन व अर्वाचीन राष्ट्रांनी अंगिकारलेल्या चलनात्मक पद्धतीचा विचार करण्यापूर्वी, "पैसा" ह्या शब्दाचे जे निरनिराळे अर्थ करतां येतील त्यासंबंधी व नाण्याचें चलन व उपयोग हीं ज्या स्वभावसिद्ध तत्त्वांवर होत असतात त्यासंबंधी थोडा विचार करणें बरें. राष्ट्रांत सुरू केलेली चलनात्मक पद्धति चालू असतां, व्यवहारांत असलेलीं प्रत्यक्ष नाणीं, त्यांचा निर्देश ज्या संख्येने केला जातो ती संख्या व किंमतीचें गृहीत जे आदिपरिमाण त्याच्याशी ह्या संख्येचा संबंध ह्या तीन गोष्टींची आपण चांगलीशी वेगवेगळी ओळख करून घेतली पाहिजे. शिवाय नाण्यांचा सुद्धा आपणांस वेगवेगळ्या दृष्टीने विचार करणें जरूर आहे; कारण त्यांची किंमत आंतील धातूवर, मोबदल्याने मिळणाऱ्या धातूवर व ज्या दुसऱ्या नाण्यांशीं कायद्याने त्यांचें साम्य ठरविलें आहे अशा नाण्यांवर अवलंबून असते.

## मोलाचें आदिपरिमाण

मोलाचें ठरीव आदिपरिमाण ह्याचा अर्थ आपण काय समजावयाचा हें निश्चित करणें प्रथमतः अवश्य आहे. हें परिमाण म्हणजे वजन अथवा

आकार ह्याच्या योगाने व्यक्त झालेला कोणता तरी सावयव पदार्थ पाहिजे. कांही लोकांना मोल हा एक निवळ मानसिक व्यवहार आहे असें वाटतें व म्हणून रुपया म्हणजे किंमतीचें ज्ञान, अशी सुद्धा ते व्याख्या करतात; पण मग इतर व्याख्याहि अशाच कराव्या लागतील. हात म्हणजे मापाचें ज्ञान, तोळा म्हणजे वजनाचें ज्ञान असें म्हणावें लागेल. इतर शास्त्रांप्रमाणे किंमत करणें व तिचा निर्देश करणें जर आपणांस अवश्य आहे, तर त्याकरिता कोणता तरी निश्चित केलेला, वारंवार न बदलणारा व ठरीव प्रमाणाचा पदार्थ आपणांस घेतला पाहिजे.

मोलाचें ठरीव आदिपरिणाम हे जे शब्द वर वापरले आहेत त्यांवरून, ज्याची किंमत कधींच बदलत नाही असा एखादा पदार्थ आहे, असें वाटण्याचा बराच संभव आहे. पण मागे आपण पाहिलेंच आहे की, दोन पदार्थांचा विनिमय ज्या सदा बदलणाऱ्या प्रमाणांत होतो, त्या प्रमाणाचा बोध किंमतीवरून आपणांस होतो. म्हणून कोणत्याहि पदार्थाची किंमत दोन दिवस सारखीच असूं शकेल, असें मानण्यास कारण नाही. दोन पदार्थांच्या परस्परविनिमयाने माणसांच्या मनांत जे तरंग उठतात, त्यांचा यत्किंचित्हि विचार न करतां, केवळ त्या विनिमयाचें प्रमाण ज्या पदार्थांच्या द्वारें किती आहे हें समजून निर्दिष्ट करतां येईल, असा सर्वसामान्य कायमचा निवडलेला जो कोणताहि पदार्थ त्यालाच किंमतीचें परिमाण म्हणावयाचें. मागे सांगितलेल्या कारणाकरिता, सोनें, रुपें व तांबें ह्यांपैकी कोणताना कोणता पदार्थ बहुतकरून परिमाणविषय होण्यास योग्य समजला गेला आहे.

ह्या परिमाणाचें अमुकच वजन अथवा आकार असला पाहिजे असा नियम नाही. मात्र त्याच्या परिमाणाबद्दल सर्व लोकांची एकवाक्यता असली पाहिजे; परिमाणाचें लक्षण कायमचें व बिनचूक ठरलें गेलें पाहिजे व पुढे व्यवहारांत त्याचाच उपयोग सर्वांनी केला पाहिजे. तोळा ठरविण्याचे पूर्वी बारा माशांच्या ऐवजी वीस माशांचा ठरवला असता तरी त्यांत विशेष

बिघडलें नसतें. सोळा आण्यांऐवजी वीस आण्यांचा रुपया ठरला असता तर कांहीं फारशी हरकत नव्हती. जें काय अवश्य आहे तें हें की, ह्या परिमाणाचें स्वरूप एकदा निश्चित रीतीने ठरून तद्द्वारा सर्व व्यवहार चालला पाहिजे. तसेंच, रुपया, पुतळी अथवा मोहोर ह्यांपैकीं कोणतेंहि एक नाणें मुख्य परिमाणार्थ निवडलें असतें, तरी हरकत नव्हती. पण कोणतें तरी एक नक्की ठरल्यावर दुसऱ्यांचा उल्लेख त्याच्याशीं असलेल्या ठरीव प्रमाणांनीच केला पाहिजे।

सर्व जगभर एकच मुख्य परिमाण असावें, असें म्हणणारे जे लोक आहेत, त्यांचें म्हणणें असें आहे की, दहा ग्रॅम वजनाचा सोन्याचा तुकडा हें मुख्य परिमाण समजावें. वजनें व पैसा ह्यांचा सादृश्यभाव असण्यांत कांही विशेष आहे असें ह्या लोकांस वाटत असतें; पण परदेशांत जाणाऱ्या अगर परदेशांतून आलेल्या नाण्यांची किंमत आंतील धातूवरून ज्या सराफांना ठरवावी लागते त्यांस आणि टांकसाळेंतील कांही अधिकाऱ्यांस मात्र ही योजना फायदेशीर होईल. बाकी सामान्य जनसमूहाला नाण्यांत धातु किती आहे हें जाणण्याची मुळीच परवा नसते. आपल्याइकडे रुपयांत १६५ ग्रेन ठरीव कसाचें रुपें असतें ही गोष्ट पन्नास हजारांत एकालाही माहीत नसेल व माहीत असण्याचें प्रयोजनहि नाही. शिवाय, दुसरी एक अडचण अशी आहे की, ठरलेल्या धातूशिवाय दुसऱ्या धातूंचीं जीं नाणीं असतील त्यांचीं वजनें त्या त्या वेळच्या बाजारभावाप्रमाणे समभाग बसावयाचीं नाहीत.

तात्पर्य काय की, ज्या धातूचें आपण मुख्य परिमाण ठरवूं ती किती वजन घ्यावयाची हें मनसोक्त प्रकारानेच ठरवावें लागतें. सामान्यपणे लोक ह्या गोष्टींविषयी बेफिकीर असतात. तथापि नक्की वजन लोकांच्या सवयींचा व अवांतर गोष्टींचा विचार करून ठरवावें हें बरें.

## नाणें, जमाखर्ची पैसा आणि मोलाचें आदिपरिमाण

ह्या तिहींचा जरी एकमेकांशीं निश्चित संबंध असला तरी त्यांमध्ये भेद

आहे व ह्या तिहींचें तादात्म्य असलेंच पाहिजे असा नियम नाही. कोणत्या तरी पसंत केलेल्या धातूचें ठरीव वजन जें आपण मोलाचें मुख्य परिमाण म्हणून मानतों तें नाणेंच असतें असा नियम नाही. हें परिमाण नाणें पाडण्यास गैरसोईचें म्हणजे फार मोठें अगर सूक्ष्मही असूं शकेल. चालू नाणीं मुख्य परिमाणाचीं विभाज्य किंवा विभाजक असलीं अथवा मुख्य परिमाणानें त्यांचा सुलभ निर्देश करतां आला म्हणजे झालें. त्याचप्रमाणें मोलाचा नामनिर्देश ज्या संख्येनें आपण करूं ती संख्या नाण्यांची अथवा मुख्य परिमाणांचीच असली पाहिजे असाहि नियम नाही. जमाखर्ची पैसा ज्यास म्हणतात तो चालू नाणेंहि नसतो किंवा मुख्य परिमाणहि नसतो. सॅक्सन लोकांचें मुख्य परिमाण एक पौंड वजनाचें रुपें हें होतें. पण हें परिमाण फार मोठें असल्यामुळे त्याचें नाणें पाडतां येणें शक्य नव्हतें. अँग्लोसॅक्सन राजे रुप्याचे पेन्स व अर्धे पेन्सच फार करून पाडीत असत, तरी लोकांचा जमाखर्ची पैसा म्हटला म्हणजे शिलिंग होता. सातव्या हेनरीच्या आधी शिलिंग नांवाचें नाणें कोणीहि पाडलें नाही. पूर्वी म्हैसुरांत कान्तवेनर्प अथवा नरसिंहराय ह्या नांवाचा हिंदुराजा होऊन गेला, त्याच्या नांवावरून कान्तरराय म्हणून पैशाचें नांव पडलें होतें. पण हा पैसा केवळ काल्पनिक असून त्याला धरून निरनिराळ्या चलनात्मक पद्धति होत्या. गुजराथेंत दोकडा हें नाणें सांप्रत चालू नाही. पण हिशेबांत ह्याचा हरहमेश उपयोग केला जातो. सयामांत पै नांवाचें नाणें चालू नसतांहि लोकांच्या हिशेबांत येत असे. महाराष्ट्रांत रेस फक्त जमाखर्चांत येतात हें पुष्कळांस माहीत आहेच. त्याचप्रमाणें आणा हा केवळ हिशेबी काल्पनिक पैसा असूं शकेल. हिंदुस्थानांत हल्लीं रुपया हेंच मुख्य नाणें मोलाचें मुख्य परिमाण व सर्व मोठ्या व्यवहारांत जमाखर्ची पैसा आहे. तीनही गोष्टी एकवटल्यानें बरीचशी सोय आहे ह्यांत शंका नाही. इंग्लंड देशांतहि सॉव्हरिन नाण्यांत तीनहि प्रकार एकवटलेले आहेत. फ्रान्स देशांत हिशेबी पैसा व मुख्य परिमाण फ्रँक म्हणून आहे. पण त्याचें वजन पांच ग्रेनांहून जास्त

भरत नसल्यामुळे एका फ्रांकाचें सोन्याचें नाणें त्या देशांत पाडीत नाहीत, पांच, दहा, वीस फ्रांकांचीं नाणीं पाडतात. पीटर दि ग्रेट राजाच्यापूर्वी रशियांत रुबल हा जमाखर्चांत येणारा काल्पनिक पैसा होता.

देशाच्या चलनपद्धतींत जेव्हा फेरफार होतो, तेव्हा नाणें, जमाखर्ची पैसा व मोलाचें मुख्य परिमाण हीं वेगवेगळीं होण्याचा संभव असतो. कधी कधी जुन्या नाण्यांना लोक नवीन हिशेबी पद्धत लागू करितात. नार्वे देशांत असा प्रकार झाला होता. आपलेकडेहि अद्यापि सॉव्हरीन सर्वत्र उपयोगांत आले नाहीत; तथापि कांहीं ठिकाणीं रुपयांनीच सर्व देवघेव होत असूनसुद्धा हिशेब मात्र 'गिनींत' केला जातो. उलट पक्षीं कधी कधी नाण्यांत फेरबदल होतो, तथापि हिशेबाची पद्धति विशेषतः परदेशीय व्यवहारांत तशीच कायम राहते. सांप्रत मोहोर महाराष्ट्रांत चालत नाही. तरीसुद्धा हायकोर्टाच्या ॲडव्होकेटची फी मोहरेंत गणली जाते व आजच्या सोन्याच्या भावाप्रमाणे पंधरा रुपयांना एक मोहोर येईल असा नियम नसतां ह्याच दराने फीचा हिशेब होतो. पन्हाळे रुपये हल्ली कोठे चालत नाहीत व ते कायदेशीर फेडीचें चलनहि नाहीत; तथापि महाराष्ट्रांत कित्येक ठिकाणी पदार्थांची किंमत अद्यापि पन्हाळी रुपयांत ठरविली जाते.

जमाखर्ची पैसा व नाणकात्मक चलन ह्यांत फरक पाडणारीं दोन कारणें वारंवार दृष्टीस पडतात. वापरामुळे होणाऱ्या स्वाभाविक झिजेने, किंवा लबाडीने कीस वगैरे काढल्याने नाण्यांचें असावयाचें तितकें वजन न राहतां, तीं फार कमी वजनाचीं होण्याचा संभव असतो व असें झालें तरी झिजीइतकी किंमत कमी धरून मोलाचें परिमाण व हिशेबी पैसा हीं पूर्ववतच कायम ठेविलीं जातात. हाच प्रकार यूरोप खंडांत आमस्टरडॅम, हाम्बर्ग आणि दुसऱ्या कित्येक शहरांत झाला. राष्ट्रांत उण्या किंमतीचें चलन सुरू केलें असतां हिशेबी पैसा बदलला जाईल अथवा पूर्वींचाच कायम राहील. असें समजा की, इ. स. १७३५ सालचे रुपये अतिशय झिजल्यामुळे त्यांत कायदेशीर रीतीने जितकें रुपें असावयास पाहिजे तितकें राहिलें नाही

व नवीन रुपये सरकारने पाडिले नाहीत; अशा स्थितींत पदार्थांच्या किंमतीचा निर्देश पूर्वीच्या जुन्या नाण्यांत अगर नवीन अजुन्या नाण्यांत लोक करितील. किंमतीचा निर्देश जरी जुन्या नाण्यांत झाला तरी उण्या किंमतीचें नाणें पूर्ववत् लोक घेणार नाहीत; तें नेहमी वजन करून घेतलें जाईल.

एका जातीचें मुख्य नाणें व त्याच्याशी सुसंबद्ध अशीं दुसरी उपनाणीं अशा प्रकारची शिस्त सर्व देशात असतेच असें नाही. आज मिसरीसहि कित्येक देशांत परदेशचीं निरनिराळ्या आकाराचीं व किंमतीचीं नाणीं सारखींच चालतात. अशा देशांत हिशेबी पैसा अर्थात्च निराळा असला पाहिजे. मालावर जकात घेणें वगैरेसारख्या बाबींत जेथे नाण्यांचा प्रत्यक्ष व्यवहार घडतो तेथे त्या परदेशीय निरनिराळ्या नाण्यांची किंमत हिशेबी पैशांत केली जाते. पोर्टसेड शहरीं हल्ली इजिप्तचें पिऑस्टर नाणें, फ्रेंच लोकांचे फ्रँक व इंग्लिशांचा पौंड इत्यादि नाणीं चालतात. कांहीं वर्षांपूर्वी जर्मन संस्थानांत सोन्याचीं फ्रेंच आणि इंग्लिश नाणीं बिनहरकत ह्या रीतीने वापरलीं जात असत. बऱ्याच वर्षांपूर्वी कानडा देशाचीहि हीच स्थिति होती. हल्लीसुद्धा त्या देशाचें मुख्य परिमाण सोन्याचा डालर आहे. तथापि सोन्याचीं नाणीं मुळीच पाडलेलीं नाहीत. ५०,२५,२०,१० आणि ५ अशीं सेंट नांवाचीं रुप्याचीं उपनाणीं असून बाकी पेढीवाल्यांच्या नोटी चालतात. परंतु इंग्रजी सॉव्हरीन, अर्धे सॉव्हरीनसुद्धा त्या नाण्यांबरोबर सारखेच वापरले जातात. इंग्लिश अंमलाच्या पूर्वी हिंदुस्थानांत असंख्य नाणीं होतीं; पण प्रत्येक भागाची स्वतंत्र चलनपद्धति असून इतर नाणीं वटावाने घेतलीं जात असत. हल्ली कित्येक संस्थानांत मात्र कानडासारखी स्थिति आहे. इंग्रजी रुपये व संस्थानचे रुपये दोन्ही नाणीं सारखींच प्रचारांत आहेत.

## मुख्य आणि उपपैसा.

मुख्य पैसा व उपपैसा म्हणून जेव्हा नाण्यांचा उपयोग केला जातो. तेव्हाचा त्यांतील भेद काय आहे हें आपण आता पाहिलें पाहिजे.

मुख्य नाण्याची किंमत आंतील धातूइतकी नेहमी असली पाहिजे. ठरीव कसाचें व वजनाचें नाणें आहे, इतकें दाखविण्यापुरताच वरील छापाचा उपयोग असतो. वाटेल तर धातूचे निव्वळ गट असें समजून अशीं नाणीं वितळवावीं अगर जेथे तीं कायदेशीर रीतीने चालत नाहीत अशा परमुलखांत पाठवावीं. धातूची किंमत ठरवणें कायद्याच्या आटोक्यांत नसल्यामुळे हीं नाणीं सर्वत्र स्वीकारलीं जातील. उपनाण्याची मात्र अशी गोष्ट नसते. त्याचें मुख्य नाण्याशीं जें किंमतीचें प्रमाण असतें तें कायद्याने अगर रूढीने ठरविलेलें असतें. उपनाण्याची किंमत आंतील धातूवर अवलंबून नसते. आंत असलेल्या धातूला कांही तरी किंमत आहे हें उघड आहे. पण कायद्याने ह्या नाण्यांची जी किंमत ठरावेली असते, त्यापेक्षा आंतील धातूची किंमत फारच कमी असूं शकेल. उदाहरणार्थ, आपल्या इकडल्या इंग्रजी दिडकीची धातुगत किंमत पाहूं गेलें तर वस्तुतः तांब्याच्या आजच्या बाजारभावाने फक्त ½ पै आहे म्हणजे ठरीव किंमत ½ पैने जास्त आहे.

## नाण्याच्या धातुगत आणि ठरीव किंमती

आंतील धातूची किंमत हीच नाण्याची अंगभूत किंमत असें म्हणण्याचा प्रघात आहे; पण ह्या "अंगभूत" शब्दाने किंमतीच्या धर्माविषयी गैरसमज होण्याचा संभव आहे. कारण किंमत ही कांही वस्तु नसून जो वस्तूचा आगंतुक आणि म्हणूनच अस्थिर धर्म आहे, हें मागे सांगितलेंच आहे. यास्तव कोणत्याही प्रकारचा संशय राहूं नये म्हणून "अंगभूत" किंमत हे शब्द न वापरतां नाण्यांची धातुगत किंमत असें आपण म्हणूं. तसेंच नाण्यांच्या विनिमयांत म्हणजे एक नाणें देऊन दुसरीं नाणीं कायद्याने अगर रूढीने ठरलेल्या अशा ज्या किंमतीने मिळतात, त्या किंमतीस आपण कायदेशीर, सांकेतिक, रूढ अगर ठरीव किंमत म्हणूं. धातुगत किंमत व रूढ किंमत एकमेकांपासून भिन्न आहेत हें उघड आहे.

रूढ किंमतीच्या खाली धातुगत किंमत दोन प्रकारांनी जाते, ती धातूचें वजन अथवा कस कमी करण्याने. इ. स. १८१६ पूर्वी इंग्लंडांत रुप्याचें

मुख्य नाणें होतें. पुढे त्या साली कायद्यानें ह्या रुप्याच्या नाण्यांचें वजन शेकडा सहाप्रमाणे कमी करण्याचें ठरलें तेव्हा तीं उपनाणीं बनलीं. फ्रान्स व इतर कांही देशांत फ्रांक नांवाचीं रुप्याचीं लहान नाणीं होतीं. त्यांतील धातूंचा कस कमी करून तीं उपनाणीं बनवलीं. कोणताही प्रकार योजला तरी सारखाच आहे, पण फरक इतकाच की वजन कमी केलें असतां तें किती कमी केलें आहे हें प्रत्येक माणसास पाहतां येण्यासारखें आहे. धातूचा कस कमी केल्याने मात्र प्रत्येकास तसें करतां येणार नाही. कारण ही धातू अमुक कसाची आहे हें त्या विषयांत वाकबगार अशा थोडक्याच माणसांस समजतें. एका देशांत जीं उपनाणीं म्हणून लोक वापरतात तींच दुसऱ्या देशांत गेलीं तर तेथील लोक तीं धातुगत किंमतीनेच घेतील हें उघड आहे.

## कायदेशीर फेडीचें चलन.

पैशाचा आणखी एक निराळ्या रीतीने उपयोग करतां येतो व त्यामुळे पैशांत भिन्न प्रकार उत्पन्न होतो. कर्जाची अथवा देण्याची कायदेशीर फेड होण्यास कांही पैसे उपयोगी पडतात; कांही पडत नाहीत. अमक्या रकमे-पर्यंत अमुक पैशाने फेड होते असें जेथे कायद्याने ठरलें आहे तेथे धनकोस ते पैसे घेणें भाग आहे. ऋणकोने असा पैसा देऊं केला असता जर धनको घेणार नाही व पुढे ऋणकोवर फिर्याद करील तर फिर्यादीचा खर्च धनको-वर पडेल. विनिमय व करार इ. व्यवहार देशाच्या पैशांतच केले पाहिजेत अशी कायद्याची अट नाही. करारांच्या शर्ती अमलांत येतील इतक्या रास्त पाहिजेत इतकेंच काय तें. एखाद्या धनकोने ऋणकोस १०० रुपये उसनें देऊन परत रुपयांच्या ऐवजीं भात अगर दाणे घेण्याचें जर ठरविलें तर त्यास कायद्याची कांही अट नाही. तसेंच १०० रुपयांबद्दल दुसऱ्या कोणत्याही देशांत अगर संस्थानांत चालणारे पैसे घेण्याचा करार असल्यास तोही कायदेशीर रीतीने अमलांत आणितां येईल, एवढेंच नव्हे तर १०० रुपये देऊन परत १०० रुपये किंमतीच्या दिडक्या घेण्याचा करार केल्यास-सुद्धां त्यास कायद्याची बाधा येत नाही. तेव्हा अमुक रकमेपर्यंत अमुक

नाणें फेड करण्यास योग्य आहे असा जो कायद्याचा निर्बंध आहे त्याचा अर्थ इतकाच की, विनिमयसामान्य अमुक आहे व त्याचें स्वरूप अमुक आहे हें स्पष्टपणें सरकार ठरवून टाकतें. जेथे पक्षकारांत विशिष्ट करार झालेला नसतो तेथे कायद्याने ठरविल्याप्रमाणेच फेड करावी लागते; म्हणून कायद्याच्या नियमाप्रमाणे सरकारी टांकसाळींतून जो पैसा निघेल तेवढेंच कायदेशीर चलन समजावयाचें असा हिंदुस्थानसरकारचा निर्बंध आहे.

## पैशाच्या चलनांत दिसून येणारें संवयीचें प्राबल्य

सवयीचें प्राबल्य किती असतें याची ज्यास कल्पना नाही त्यास पुष्कळ सामाजिक गोष्टींचा नीट उलगडा होत नाही. हा नियम पैशाच्या बाबतींत तर फारच स्पष्टपणें व्यक्त होतो. जुनीं नाणीं बंद करण्याचे व नवीन नाणीं सुरू करण्याचे प्रयत्न पराक्रमी राजांनी वारंवार केले असें इतिहासावरून दिसतें. तथापि स्वहितदक्षता अथवा सवय यांचा जबरदस्त पगडा असल्यामुळे कायदे व दंड ह्यांचा केव्हाच उपयोग झाला नाही. पैशाच्या फिरतीसंबंधाने कांही गोष्टींचा खुलासा करणें जरी कठीण असलें तरी पैशाशीं व्यवहार करणाऱ्या लोकांचा स्वभाव व पैशाचा संग्रह अगर व्यय करण्यांतला त्यांचा हेतु ह्यांचें पृथक्करण केलें असता ह्या विषयाचा बराच उलगडा होईल. पैशाच्या विषयासंबंधाने माहिती बहुतेक लोकांस नसते व तत्संबंधी सिद्धांत फारच थोडया लोकांस अवगत असतात ही गोष्ट आपण ध्यानांत ठेविली पाहिजे. लोकवार्ता व पूर्वापार चालत आलेली वहिवाट हेंच त्यांच्या वर्तनाचें धोरण असतें. नाणें स्वीकारतांना असल्या प्रकारचीं नाणीं दुसरे लोक विनदिक्कत घेतात की नाहीत एवढाच ते विचार करितात. नॉर्वे देशांत अति दूरच्या प्रदेशांत राहणारे लोक अद्यापि नवीन पाडलेल्या सुरेख सोन्याच्या नाण्यापेक्षा जुनाट कागदी नाणींच पसंत करितात. अपरिचित नाण्यांची धातुगत अगर कायदेशीर किंमतसुद्धा समजण्यास पुष्कळ लोकांस साधन नसतें. नाणें वजन करण्यास योग्य कांटे व वजनें बहुतेकांपाशीं नसतात. तसेंच धातूचा कस समजण्यास जें विशेष ज्ञान लागतें तें

रसायनशास्त्रज्ञावांचून दुसऱ्या कोणास नसतें. चांगलीं नाणीं खिशांत घालून जेथें तीं चालत नाहींत अशा देशांत जर आपण प्रवासास गेलों तर त्यांस तेथे कोणी विचारीत नाहीं असा अनुभव आहे.

परिचित स्वरूपाचें नाणें असलें म्हणजे तें लोकांना पटतें असा साधारण नियम दिसतो. अडाणी लोक तर नाण्याच्या स्वरूपांत बदल केला असतां तीं हातांत धरीतच नाहीत. एडवर्ड बादशहाच्या मुखवटयाचे नवीन रुपये व्यवहारांत आले तेव्हां कांही दिवस अडाणी लोक ते घेतना. ह्या अडचणीमुळे नवीन नाणीं निघालीं तरीसुद्धा वरील मुद्रा पूर्ववत् कायम ठेवणें पुष्कळदां भाग पडलें आहे. हैदर व टिपू हे हिंदुधर्माचे कट्टे शत्रू होते; तथापि त्यांनी पाडलेल्या नाण्यांवर शिवाची अगर स्वामीची आकृति असे. स्वामी म्हणजे राधाकृष्ण होय. ह्याच कारणास्तव मुसलमानी नाण्यांवर श्री हे अक्षर व स्वस्तिक इ. हिंदुचिन्हें असत. मुसलमानांचें राज्य स्थायिक होऊन बरींच वर्षें लोटल्यामुळे त्यांच्या इरपाचीं नाणीं वापरण्याची लोकांना सवय झाली. त्या कारणाने मराठयांच्या वेळीं जीं नाणीं मराठी राज्यांत पाडीत त्यावर मुसलमानी इरप कायम ठेविलेला असे. त्याचप्रमाणे पोर्तुगीज लोकांच्या अमलांत असलेल्या मुलखांत पूर्वीचीं एतद्देशीय नाणीं चालत असत. कांही देशांत तर अडाणी लोकांच्या समजुतीकरिता मेलेल्या राजाचा मुखवटा व फार मागील वर्ष हीं नवीन नाण्यांवर जशींच्या तशींच ठेवावीं लागत. ऑस्ट्रिया देशांत प्रथम इ० स० १७८० सालीं ज्या छापाचीं नाणीं पाडलीं त्याच छापाची त्याच वर्षाचा आंकडा घालून नाणीं उत्तर आफ्रिकेंतील लोकांना तीं आवडतात ह्या सबबीवर पाठीमागून कित्येक वर्षें पाडण्यांत आलीं आहेत.

सवयीचें प्राबल्य व खरी किंमत जाणण्यास साधनांचा अभाव ह्यामुळे उण्या किंमतीचीं नाणीं व्यवहारांत फार राहिलीं असलीं पाहिजेत. तांब्याच्या शिवराईचें वजन जर आपण हल्ली केलें तर आपणांस असें आढळून

येईल की, निरनिराळे शिवराई बरेच कमजास्त वजनाचे भरतात, असें असू- नही व्यवहारांत ते आजपर्यंत चालत होते. दोन दांडया स्पष्ट दिसल्या म्हणजे जास्त चौकशी लोक करीत नसत. बनावट नाणीं पाडणारे व राज्यकर्ते ह्या दोघांचाही अनुभव असा आहे की, नवीन नाणीं बाह्य स्वरूपांत अगदी हुबेहूब जुन्याप्रमाणे असलीं तर उण्या किंमतीचीं नाणीं बिनदिक्कत लोक पतकरतील.

नाण्यांचा एकंदर इतिहास पाहिला असतां खासगी व सरकारी दोन्ही उण्या किंमतीचीं नाणीं व्यवहारांत आलेलीं फार दिसतात. ह्या कामीं सुधारणा करण्याचे क्वचित् झालेले प्रयत्न बहुधा निष्फळच झाले. रोममध्ये लोकांची फसवणूक करण्याचे सारखे प्रयत्न एकदा झाले त्याचें उदाहरण इतिहासांत नमूद आहे. रोमच्या अमलाखालील जर्मन मुलखांत खोटीं नाणीं पाडणारांनी बनावट दीनार सुरू केले. तेव्हा खरेखोटेपणाची परीक्षा करण्या- करितां लोक असल्या नाण्यांस भोंक पाडून पहात असत असें दिसतें. ह्या- प्रमाणे भोंक पाडलेलीं नाणीं वापरण्याची जर्मन लोकांस सवय लागली. म्हणून नवीन नाणीं जुन्या नाण्याप्रमाणे भोंकाचीं पाडणें रोमन सरकारास भाग पडलें; परंतु खोटीं नाणीं पाडणारे ह्यामुळे हटले असें नाही. त्यांनीही भोंकें पाडलेलीं खोटीं नाणीं पाडण्याचा क्रम मांडला. असलीं बनावट नाणीं नाणकसंग्रहालयांत अद्यापि दृष्टीस पडतात.

## 'ग्रेशामचा सिद्धांत'

दिखाऊ साम्य असलेल्या नाण्यानाण्यांतील फरक सामान्य जनसमूहास जरी कळत नसला तथापि सराफ, पेढीवाले, सोनार व गटविके ह्यांस त्यां- तील सूक्ष्म भेदाची परीक्षा असते व त्यावर ते आपला फायदाही करून घेतात. स्वतः वितळवून किंवा जेथे लवकर वितळलीं जातील अशा परकी देशांत पाठवून नाण्यांची पूर्ववत् धातू बनविण्याचें काम बहुधा हेच लोक करितात. व्यापारानिमित्त परदेशी पैसा पाठवावयाचा असल्यास व्यापारी

लोक चांगलीं नवीन नाणीं अर्थातच पाठवितात. कारण परदेशांत तें काय-देशीर चलन नसल्यामुळे आंतील धातूवर नाण्यांची किंमत होते. उण्या किंमतीचें नाणें पाठविलें तर आंत धातू नीरस अगर कमी असल्यामुळे अधिक नाणें पाठवावें लागेल हें उघड आहे. ह्याकरितां परदेशांशीं व्यापार करणाऱ्या लोकांस चांगल्या नाण्यांची फार जरूर असते. करितां अशीं नाणीं एके ठिकाणीं पुष्कळ मिळाल्यास जास्त किंमत देऊनही ते विकत घेतात. ह्याचा परिणाम असा झाला आहे की, चांगलीं, टांकसाळींतून नुकतींच निघालेलीं व म्हणूनच भर किंमतीचीं नाणीं निवडून सांठवून ठेवून नंतर परदेशाशीं व्यापार करणाऱ्यास तीं विकण्याचा एक नवीनच व्यापार कांही देशांत सुरू झाला आहे. अशा रीतीनें चांगलें नाणें देशांत रहात नाहीं. नेहमीच्या व्यवहारास व अंतर्गत व्यापारास जुनीं झिजलेलीं अथवा उण्या किंमतीचीं नाणींच बहुधा रहातात.

ह्या विवेचनावरून ग्रेशाम साहेबाचा सिद्धांत आपणांस चांगला कळेल. तो सिद्धांत म्हणजे खोटा पैसा खऱ्या पैशास घालवितो; खरा पैसा खोट्या पैशास घालवूं शकत नाही. चांगलीं, सुरेख व पुऱ्या वजनाचीं नवीं नाणीं टांकशाळेंतून निघालीं असतां जुनाट झिजलेलीं नाणीं लोकांनी वापरावीं हें प्रथमदर्शनी जरा चमत्कारिक दिसतें. इतर बहुतेक बाबींत मनुष्यास चांगलें आवडतें व वाईट नको असतें. परंतु पैशाच्या बाबतींत हा नियम टिकत नाहीं. अथवा एका दृष्टीनें पाहिलें असतां हाच नियम येथेही लागू पडतो असें म्हटलें असतां चालेल. परिणाम मात्र वेगळा होतो. विनिमयाचें साधन एवढाच नाण्याचा उपयोग असल्यामुळे एका हातांतून दुसऱ्या हातांत ह्याप्रमाणे पैसा सारखा फिरत असतो व जोंपर्यंत बाजारांत नव्या जुन्या पैशाची किंमत सारखीच येत आहे तोंपर्यंत अर्थात् नवीनच नाणीं वापरण्याविषयी लोक फारशी पर्वा करीत नाहीत. पण जेव्हां लोकांस आंतील धातूचा उपयोग करावयाचा असतो म्हणजे नाणें वितळावयाचें असतें, परदेशीं पाठवावयाचें असतें अगर संग्रह करून ठेवा-

वयाचें असतें, तेव्हां हटकून नवीन नाण्याचाच ह्या कामीं उपयोग होतो.

ह्या ग्रेशामच्या सिद्धांतावरून लोकांनी खाजगी रीतीने नाणें पाडावें हें जें स्पेन्सरचें म्हणणें तें मुळींच सिद्ध होत नाही. आपणांस कापड, पुस्तकें वगैरे जिन्नस पाहिजे असल्यास जे उत्तम असतील तेच आपण घेऊं; पण नाण्याच्या बाबतींत ह्याच्या अगदी उलट प्रकार घडतो. पैसा नेहमी फिरता असतो. लोकांस पैसा लागतो, तो केवळ जवळ ठेवण्याकरिता नव्हे, तर इष्ट वस्तु संपादन करण्याकरिता दुसऱ्यास द्यावयाचा असतो व दुसऱ्यास दिली जाणारी वस्तु ज्या मानाने वाईट त्या मानाने आपला फायदा जास्त हें उघड आहे. ह्याप्रमाणे उण्या किंमतीचीं नाणीं प्रचारांत राहण्याचा संभव फार असतो. सरकारचें ह्या गोष्टीकडे सतत लक्ष असेल तरच ह्याचा बंदोबस्त होऊं शकेल.

देशांतील चलन सुव्यवस्थित राहण्यास दोन प्रकारांनी खबरदारी घेतली पाहिजे हें वरील नियमावरून आपणांस दिसून येईल. कायदेशीर रीतीने नाण्यांचें जें वजन ठरलें असेल त्याच वजनाचीं नाणीं होतां होईल तितकें करून टांकशाळेंतून निघावींत, नाही तर, कांही कमी व कांही अधिक वजनाचीं निघाल्यास लोक त्याचा फायदा करून घेतील. तसेंच स्वाभाविक झिजेने अथवा अन्य रीतीने, कायद्याने ठरविलेल्या कमींत कमी वजनाहून जीं नाणीं कमी भरतील तीं सर्व सरकारने परत घेऊन वितळवून त्यांचीं नवीं नाणीं पाडलीं पाहिजेत; असें न झाल्यास उण्या वजनाचीं नाणीं उपनाणीं म्हणून वापरलीं जातील. सारख्या किंमतीच्या पदार्थांचा विनिमय ह्याचेंच नांव व्यापार; म्हणून देशांतील मुख्य नाणीं इतक्या सारख्या वजनाचीं पाहिजेत की, सर्व लोक, व्यापारी, सराफ, व पेढीवाले त्यांत निवड करण्याच्या भानगडींत पडणार नाहीत. हें विधान अर्थात् उपनाण्यांस लागू पडत नाही. कारण त्यांची ठरीव किंमत धातुगत किंमतीपेक्षा फारच जास्त असते. करितां नेहमीच्या व्यवहारावांचून इतर कामीं जर कोणी ह्यांचा उपयोग केला तर त्यास त्यापासून

फायदा व्हावयाचा नाहीं. ह्यामुळेच उपनाण्याचें वजन कमजास्त झाल्याची कोणी परवा करीत नाही. त्यांत इतकेंच लक्षांत धरावयाचें असतें की, वजन फार कमी झाल्यास बनावट नाणीं पाडण्याकडे लोकांची प्रवृत्ति होण्याचा संभव असतो. एवढ्याचकरितां ह्या नाण्यांचेंसुद्धा फार कमी वजन होऊं देतां कामा नये.

आपला रुपया १८० ग्रेन वजनाचा आहे. तो शेकडा दोन ह्या प्रमाणाने ३·६ ग्रेन वजन कमी भरेपर्यंतच कायदेशीर चलन मानला पाहिजे; पण हल्ली ह्याहीपेक्षा कमी वजनाचे रुपये आहेत. ते केवळ लोकांच्या अज्ञानामुळे व संवयीने चालतात. वस्तुतः कमी वजन झाल्यामुळे उपनाण्यांतच त्यांची गणना केली पाहिजे. सन १८४० ते १८६२ पर्यंतचीं नाणीं सरकार वितळवून नवीं पाडीत आहे हें चांगलें आहे. असें केलें नसतें तर मुख्य नाणीं उपनाणीं बनत चाललीं असतीं.

## ग्रेशामच्या सिद्धान्ताची व्याप्ति

खऱ्या पैशाच्या अंगीं खोट्या पैशास घालवून देण्याचें असामर्थ्य ह्याच्यासंबंधाने ग्रेशाम साहेबांचा जो सिद्धांत होता तो फक्त एकाच जातीच्या धातूच्या पैशासंबंधाने होता. तथापि सर्व जातींच्या निरनिराळ्या चालू पैशाचा जो एकमेकांशीं संबंध असतो त्यालाही हा नियम सारखाच लागू पडतो. सोनें, रुपें, तांबें, कागद, सोनें, ह्या दोन दोन चलनांचा परस्परसंबंध ग्रेशामच्या नियमाने बद्ध आहे. म्हणजे दोहोंमध्ये कमी किंमतीचें जें चलन असेल तें व्यवहारार्थ राहून अधिक किंमतीचें नाहीसें होईल. ह्याचें ढळढळीत उदाहरण जपान देशांतील चलनाचें होय. सन १८५८ सालीं इंग्लंड, अमेरिका व जपान ह्यांच्या दरम्यान तह होऊन यूरोपियन व्यापाऱ्यांना जपानशीं व्यापार करण्याची जेव्हा सवलत मिळाली, तेव्हा त्या देशांत विलक्षण प्रकारचें चलन व्यवहारांत होतें. सर्वांत अधिक किंमतीचें जपानी नाणें कोबंग नांवाचें होतें. हें सोन्याचें असून त्याचा

आकार लांबट होता. तें सुमारें दोन इंच लांब व पाव इंच रुंद असून २०० ग्रेन वजन भरत असे. त्याच्यावरील वेलबुट्टी ओबडधोबडच असे. जपानांत इचबस नांवाचें रुप्याचें नाणें होतें. एक कोबंग म्हणजे चार इचबस, ह्या प्रमाणानें ह्या दोन नाण्यांचा मोबदला जपानांतील बाजारीं होत असे. परंतु वास्तविक किंमत ह्या सोन्याच्या नाण्याची फार होती. म्हणजे इंग्लंड देशांत एका कोबंगची १८ शिलिंग ५ पेन्स किंमत आली असती व जपानी रुप्याच्या नाण्याची किंमत १ शिलिंग ४ पेन्साहून अधिक नव्हती. अशा रीतीनें जपानी लोक आपल्या सोन्याच्या नाण्याची किंमत त्याच्या वास्तविक किंमतीहून ⅓ कमी करीत असत. त्याचा फायदा युरोपियन व्यापाऱ्यांनी तात्काल घेतला. जपानच्या भावानें कोबंग विकत घेऊन आपल्या देशांत नेऊन ते विकूं लागले; त्यामुळे जपानांतील सोन्याचें नाणें एकदम कमी झालें. ही गोष्ट पुढें जपानी लोकांच्या लक्षांत येऊन त्यांनी शिल्लक असलेलें चालू नाणें काढून घेतलें.

हाच प्रकार अंशतः तरी इतर देशांत घडला आहे. सोन्यारुप्याच्या नाण्याच्या कायद्यानें ठरविलेल्या व्यापारभावाच्या किंमतींत यत्किंचित् अंतर पडलें असतां एकच धातू परदेशांत पाठविणें फायदेशीर होण्याचा संभव आहे. ह्याप्रमाणें फ्रान्स देशांत सन १८४९ व १८६९ ह्यांच्या दरम्यान रुप्याचें चलन जाऊन मुख्यत्वेंकरून सोन्याचें राहिलें. अशा रीतीनें पुष्कळ देशांचें चलन कायमचें ठरलें गेलें आहे. प्राचीन रोम राज्यांत रुप्याच्या व तांब्याच्या चलनांचें परस्परप्रमाण ठरविणें मोठें बुचकळ्यांत असे असें मानण्यास जागा आहे. सोन्याचें नाणें सुरू केल्यावर तर ही अडचण जास्त दुणावली असली पाहिजे.

आपल्या सोन्याच्या नाण्याची किंमत वास्तविक किंमतीहून जपानी लोक कमी करीत असल्यामुळें तें नाणें लवकरच व्यवहारांतून कमी होऊं लागलें म्हणून वर सांगितलें आहे. तशाच मासल्याची पण भिन्न तऱ्हेची हकीकत हिंदुस्थानांतही घडल्याचें फेरिस्ता नामक ग्रंथकारानें लिहिलें आहे.

महंमद तघलखाने एकदा आपला हेतू साधण्याकरिता तांब्याचें नाणें पाडून तें सोनें रुपें समजून वापरावें असा हुकूम केला. त्याबरोबर हिंदु लोकांनी तांब्याचे ढीग टांकसाळेंत आणून नाणें पाडून घेतलें व त्यावर विपुल नफा मिळविला हें सांगणें नकोच. तांब्याच्या नाण्याने विकत घेतलेले जिन्नस पुन्हा विकल्यास त्याच्या ऐवजी ते सोन्या रुप्याचें नाणें घेत. सोनारसुद्धा आपआपल्या घरांत नाणें पाडून तें चालवूं लागले. अशा रीतीने तांब्याचें नाणें देऊन जो तो सोन्यारुप्याच्या नाण्यांचा घरांत संचय करूं लागला. ह्याप्रमाणे व्यवहारांत तांब्याचें नाणें रेलचल झाल्यामुळे त्याची किंमत फार उतरली, आणि सोनें रुपें दुर्मिळ झाल्यामुळे फार महाग झालें. हें अनिष्ट टाळण्याकरिता तांब्याच्या चलनाचा विनिमय सोन्यारुप्याच्या चलनाशीं व्हावा असा सुलतानाने ठराव केला. परंतु ह्याचा परिणाम इतकाच झाला की, खजिन्यांतून सोन्यारुप्याचें नाणें पार जात चाललें.

## भाग नववा

## धात्वात्मक पैशाचे प्रकार

धात्वात्मक पैशाच्या आजपर्यंत होऊन गेलेल्या व पुढे होण्याचा संभव असलेल्या निरनिराळ्या प्रकारांचें आता आपण विवेचन करूं. दोन तीन अथवा अधिक धातूंचा उपयोग कोणत्याही चलनपद्धतींत ज्या रीतीने करणें शक्य आहे, त्याचा व्यापक दृष्टीने विचार केला असतां असें दिसतें की, धातुमय पैशाची व्यवस्था सरकारास पांच प्रकारांनी करितां येण्यासारखी आहे.

( १ ) सरकार प्रथमतः निरनिराळ्या प्रमाणाचीं वजनें मात्र ठरवून टाकतें. ह्या वजनांना अनुलक्षून लोकांनी मूल्यवान् धातूचा इतर कोणत्याही पदार्थाप्रमाणे व्यवहार करावा. लोकांना सोयीवार पडेल त्याप्रमाणे त्यांनी ह्या धातूचा आकार बनवला तरी सरकारची हरकत नसते. ह्या पद्धतीस आपण तुलनात्मक चलनपद्धति म्हणूं.

( २ ) वारंवार मोजण्याचा त्रास पडूं नये व धातूच्या कसाबद्दल अनिश्चितपणा राहूं नये म्हणून विशिष्ट वजनाचीं व कसाची धातू ज्यांत आहे, अशीं एक किंवा अधिक धातूंचीं नाणीं सरकार पाडतें व कोणत्याही धातूच्या पैशांत खरेदी किंवा अन्य व्यवहार करण्यास लोकांस सवड ठेवतें. ह्या पद्धतीस आपण अनियंत्रितसंख्यात्मक चलनपद्धति म्हणूं.

( ३ ) चुकया होऊं नयेत म्हणून सरकार कधीं कधीं निरनिराळ्या धातूंचीं निरनिराळीं नाणीं पाडतें व राष्ट्रीय पैशाला अनुलक्षून जे जे व्यवहार होतील ते सर्व एका विशिष्ट धातूच्या पैशाला अनुलक्षून झाले आहेत ( उलट पक्षी स्पष्ट शर्त नसेल तर ) असें समजलें जाईल व बाकीच्या धातूंचीं नाणीं बाजारभावाप्रमाणे त्यांची ज्या मुख्य नाण्यांच्या तुलनेने जी किंमत होईल त्याचप्रमाणे घेतलीं जातील असें फर्मावतें. हीच कायदेशीर फेडीची एकात्मक चलनपद्धति होय.

( ४ ) दोन अथवा अधिक धातूंचीं नाणीं पाडून, देण्याची फेड कोणत्याही नाण्याने पण कायद्याने ठरविलेल्या भावाप्रमाणे करावी असेंही सरकार ठरवितें. ही कायदेशीर फेडीची अनेकात्मक चलनपद्धति होय.

( ५ ) मोठमोठ्या व्यवहाराकरिता फेडीचें एकच विशिष्ट नाणें ठरवूनसुद्धा मुख्य नाण्याच्या ऐवजीं कांहीं नियमित संख्येपर्यंत दुसऱ्या धातूचीं नाणीं वापरावीं असा सरकार कधीं कधीं हुकूम करितें. ह्यास आपण कायदेशीर फेडीची संयुक्त चलनपद्धति असें नांव देऊं.

## तुलनात्मक चलनपद्धति

धातुमय पैशाचा जो वर अनुक्रम दिला आहे तो ऐतिहासिकदृष्ट्याही

खरा आहे. तुलनात्मक पद्धतिच प्राथमिक होती असें मानण्यास भरपूर पुरावा आहे. तराजूची कल्पना निघण्यापूर्वी आकारावरून अथवा जडत्वावरून ठोकळ प्रमाण धरूनच विनिमयव्यवहार होत असला पाहिजे. परंतु नंतर सर्व मोठमोठ्या व्यवहारांत तराजू हा अवश्य भाग होऊन बसला. प्राचीन हीब्रू लोक वजन करून पैसा देत घेत असत असा बायबलांत स्पष्ट उल्लेख आहे. ह्या काळीं नाणें पाडण्याची पद्धति अस्तित्वांत नव्हती व धातूचे कांहीं विशिष्ट आकाराचे अथवा साधे तुकडे वजन करून देत घेत असत असें अर्थात् मानलें पाहिजे.[१]

विशिष्ट आकाराचे नुसते धातूचे तुकडे लोक व्यवहारांत वापरीत अगर प्रत्येक वेळीं धातू वजन करून घेत असें आरिस्टॉटलने आपल्या 'राजनीति' नामक ग्रंथांत स्पष्ट म्हटलें आहे. त्याचप्रमाणे प्लिनीनेंही विधान केलें आहे. रोम येथे गुलाम विकीत तेव्हां उपयोग नसतांही तराजू जवळ आणून ठेवण्याची चाल असे. ह्या विलक्षण गोष्टीवरून वरील विधानांत सत्यता दिसून येते.

सारांश, आरंभीं सर्व निरनिराळ्या नाण्यांची व्यवस्था तुलनात्मक पद्धतीवर रचली गेली होती ह्यांत संशय नाही. असल्या पद्धतींत अर्थात् एका विवक्षित धातूचें वजनी आदिपरिमाण हेंच किंमतीचें आदिपरिमाण असावयाचें.

आपल्या इकडे हल्ली उपलब्ध असलेलीं व पूर्वी प्रचलित असलेलीं मोलाचीं बहुतेक आदिपरिमाणें हीं मूळचीं परिमाणें होतीं असें इतिहासावरून स्पष्ट होत आहे. निष्क, पण आणि पल हीं पूर्वी वजनी परिमाणें होतीं, तींच पुढें किंमतीचीं परिमाणें झालीं. वर सांगितलेल्या परिमाणांपैकी निष्क शब्दाचा धात्वर्थ मापणें, मोजणें किंवा तोलणें असा आहे.

---

१ आब्राहम एफ्रला ४०० शेकल ( रुप्याचें चलन ) वजन करून देत आहे असें वर्णन आहे. ( जेनिसीस अ० २३ क० १६ ).

यावरूनही हल्लींच्या नाण्यांच्या मुळाशी तुलनात्मक पद्धति होती असेंच ठरलें. सांप्रतही कांही देशांत तुलनात्मक चलनपद्धति सुरू आहे. पेगू देशांत रुप्याच्या धातूचाच मुख्य पैसा आजपर्यंत चालत असे; परंतु या धातूचें नाणें पाडलेलें नसे. क्रयविक्रयांत वजनाने या धातूची देवघेव केली जाई. ब्रह्मदेशांत शिसें, रुपें, आणि सोनें अशा तीन प्रकारच्या धातूंचें चलन चाले; तथापि सर्व प्रकारच्या देवघेवींत वजनाचाच उपयोग केला जाई. चीन देशांत तागलू नांवाचें पितळेचें नाणें आहे. तथापि रुपें व सोनें ह्यांचें नाणें पाडलें नसून त्यांचा व्यवहार वजनानेच होतो. व्यापाराच्या इतर पदार्थांप्रमाणेच या चलनात्मक धातूंची या देशांत गणना केली जाते. ठरीव कसाची धातू आहे असें दाखविणारा राजशिक्का मारण्याची चाल या देशांत नाही. या देशांत जर प्रवास करण्याचा प्रसंग आला तर या दोन धातू प्रवाशाला आपल्या जवळ बाळगाव्याच लागतात. कारण की, तेवढ्याच किंमतीच्या तागलूच्या माळा बरोबर घेणें झाल्यास त्यासाठी एक गाडी केली पाहिजे. परंतु या दोन धातूंचीं नाणीं नसल्यामुळे खोटीं वजनें, तराजू व त्याचप्रमाणे अनिश्चित कस या कारणांनी प्रवाशाला बरेंच नुकसान सोसावें लागतें. जपानांतसुद्धा थोडक्या वर्षांपूर्वी सोन्यारुप्याचें चलन तुलनात्मकच होतें. ह्या पद्धतीपासून कितीही गैरसोय असली तरी नाणीं झिजलीं असतां अथवा निरनिराळ्या परकीय नाण्यांचें संमिश्रण झालें असतां किंवा स्वराज्य पराराष्ट्रांकित झालें असतां अथवा अशाच कांही दुसऱ्या कारणांनी लोकांचा विश्वास उडून गेला असता ह्या स्वाभाविक आणि आवश्यक पद्धतीचा अंगिकार केल्याशिवाय लोक रहात नाहींत. हिंदुस्थानांत इंग्लिशांचा अम्मल सुरू होण्यापूर्वी एकाच ठिकाणी निदान विसाहून जास्त नाणीं चालत असत. त्या वेळेस प्रांतिक नाणें खेरीजकरून बाकीचीं नाणीं वजनावर घेत असत.

सांप्रतही आपल्याला वाटतें त्याहून फार अधिक प्रमाणाने जगांतील पुष्कळ देशांत जेथे जुनाट झालेलीं, झिजलेलीं, कमी वजनांचीं, मोडकीं-

तोडकी अशीं परदेशांतून आलेलीं नाणीं वापरलीं जातात तेथेही तुलनात्मक पद्धति अद्यापि दृष्टोत्पत्तीस येते. अशा देशांत नुकसान न होऊं देण्याचा उपाय म्हटला म्हणजे प्रत्येक नाणें वजन करून घेणें हाच होय. शिक्क्यांतील धातू ठरीव कसाची आहे एवढें समजण्यापुरताच वरील छापाचा उपयोग होतो. शिवाय व्यापारासंबंधाने परराष्ट्राशीं देवघेव करावयाची असल्यास ती याच पद्धतीच्या अनुरोधाने केली जाते. अमुक नाणें अमक्या पैशाच्या ऐवजी घेतलें पाहिजे असा जो कायद्याचा निर्बंध असतो तो ज्या त्या देशापुरताच असतो. परदेशांत या कायद्याचा अंमल चालणें शक्य नाही म्हणून व सर्वप्रकारचीं नाणीं थोडी-बहुत झिजलेलीं असतात व अंशतः तरी कमजास्त वजनाचीं असतात, ह्यामुळे परदेशांत त्या नाण्यांचें जें वास्तविक वजन असेल त्या वजनाचीच किंमत येते. परदेशांतील टांकसाळीचें काम व्यवस्थित चाललें आहे, अशा टांकसाळींतून निघालेलीं नाणीं न वितळवितां प्रायः लोक वजन करून पतकरतात. परंतु इतर बारीकसारीक देशांतील नाणीं वितळविल्याखेरीज कोणी रहात नाही. वितळविल्यानंतर अर्थातच आंतील धातूच्या गटाइतकीच त्यांची किंमत होते.

## अनियंत्रित संख्यात्मक चलनपद्धति

नाण्याच्या अगदी पूर्वीच्या कल्पनेचा अंगीकार करून टरीव वजनाचें सोनें, रुपें व तांबें यांचे तुकडे पाडणें व ह्यांपैकीं कोणत्याही धातूंत करार, खरेदी, विक्री इत्यादि व्यवहार करण्यास लोकांस सवड ठेवणें हा कोणत्याही देशांत पैसे सुरू करण्याचा साधा प्रकार होय. अशा प्रकारच्या टरीव वजनाच्या तुकड्यांची गणना व्यापाराच्या इतर पदार्थांमध्येच केली जाते व त्यांची किंमतही बाजारभावाप्रमाणेच होत असते.

फ्रान्सच्या राज्यक्रांतिकारांनी हीच पद्धति सुरू करण्याचें योजिलें होतें. सोनें, रुपें, तांबें या धातूंचे दहा ग्रॅम वजनाचे तुकडे पाडून त्यांच्या किंमतीसंबंधाने कोणताही निर्बंध न ठेवतां ते व्यवहारार्थ प्रचारांत आणण्याचा

चेत होता. सर्व राष्ट्रांत एक नाणें असावें असें ज्यांचें म्हणणें आहे त्यांची कल्पना या वरील कल्पनेशीं अगदी विसंगत नाही. कारण ह्यांकी एकाचें म्हणणे दहा ग्रेन वजनाचें सोनें हेंच मुख्य चलन असावें असें आहे. परंतु बहुजनसमूहाच्या दृष्टीने तरी निदान वजनाच्या अनुरोधाने नाणीं पाडण्यांत कांही विशेष फायदा दिसत नाही. कारण रुपयाचे जोंपर्यंत सोळा आणे येत आहेत, तोंपर्यंत आंतील धातूचें किती वजन आहे हें जाणण्याची कोणीही पर्वा करीत नाही. आन्तरराष्ट्रीय नाण्यांची कल्पना जर अमलांत आणिली म्हणजे सर्व नाणीं एका ग्रेनच्या गुणोत्तरांत पाडलीं तर सर्व लोकांना प्रत्येक वेळीं मानगडीची आंकडेमोड करण्याचा प्रसंग येणार. सोन्याच्या एका दहा ग्रेन वजनाच्या तुकड्याच्या किंमतीचे बाजार भावाप्रमाणे रुप्याचे दहा ग्रेन वजनाचे तुकडे किती येतील हा हिशेब करून काढल्याशिवाय कोणालाही एकदम नक्की मोड देतां यावयाची नाही. असा हिशेब करण्यांत प्रत्येक वेळीं विनाकारण त्रास पडतो व वेळ खर्च होतो आणि त्यामुळे अशिक्षित गरीब लोकांचा तोटा होऊन चाणाक्ष व धूर्त लोकांचा फायदा होतो.

ह्या अडचणीमुळे वर निर्दिष्ट केलेल्या तऱ्हेचें चलन कोणतेंही सुधारलेलें राष्ट्र पतकरीत नाही. असें आहे तरी जवळ जवळ ह्याच मासल्याचें चलन निरनिराळ्या देशांतील नाण्यांच्या मिश्रणामुळे पुष्कळ देशांत चालू आहे. मागसलेल्या राष्ट्रांचें स्वतःचें चलन नसल्यामुळे व्यापाराच्या संबंधाने जीं नाणीं देशांत येतील तींच तीं वापरतात. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर स्पेन देशांतील 'डॉलर' विशेष प्रचारांत आहेत; तथापि डेन्मार्क, फ्रान्स आणि हॉलंड ह्या देशांतील नाणींसुद्धा तेथे चालतात. दक्षिण अमेरिकेंतील कांही संस्थानांत अमेरिका, इंग्लंड व दुसऱ्याही पुष्कळ देशांचीं नाणीं सारख्याच प्रमाणाने चालतात. इंग्रजी मुलखांतसुद्धा हा प्रकार आहेच. वेस्ट इंडीज बेटांत अमेरिका, मेक्सिको, स्पेन येथील व इतर ठिकाणचे "डॉलर"

इंग्लिश नाण्यांबरोबर वापरले जातात. तथापि या बेटांत मोलाचें मुख्य परिमाण स्पॅनिश डॉलरच समजलें जातें. बाकीच्या नाण्यांच्या किंमती या डॉलरांत करितात.

पूर्वेकडील देशांतही असेंच नाण्यांचें संमिश्रण झाल्याचें दिसतें. सिंगापूर येथे हिंदुस्थानांतील रुपयाप्रमाणेच स्पेन आणि मेक्सिको येथील डॉलरही चालतात. इराण देशाला स्वतःचें ओबडधोबड चलन आहे हें खरें; तथापि तेथील नाण्यांचीं वजनें अनिश्चित असल्यामुळे वजन करून तीं वापरतात आणि ऑस्ट्रिया येथील सोन्याचीं नाणीं जशींच्या तशींच म्हणजे निव्वळ संख्येने देतात घेतात. जर्मनीमध्यें फ्रान्स व इंग्लंड या दोन देशांतील सोन्याचीं नाणीं ठरीव भावाप्रमाणे घेतलीं जात असत. इंग्लंडमध्ये मात्र अमिश्रित असें चलन फार वर्षांपासून आहे. गेल्या शतकाच्या आरंभीं मात्र स्पेनचे डॉलर वापरण्यांत येत असत.

आतापेक्षा प्राचीन काळीं नाण्यांचें संमिश्रण फार असे. परकी नाण्यांपासून अलग अशी कोणत्याच देशाची स्वतंत्र चलनपद्धति नव्हती. खुद्द हिंदुस्थानांत शंभर वर्षांपूर्वींची कोणतीही जमाखर्चाची वही उलगडली तर त्यांत निरनिराळ्या प्रकारचीं पुष्कळ नाणीं आढळल्याशिवाय रहाणार नाहीत. त्या वेळीं सराफाचा धंदा सर्वसाधारण असून मोठ्या किफायतीचा असे.

वरील छापावरून व एकंदर स्वरूपावरून पुऱ्या वजनाचीं नाणीं आहेत असा जोंपर्यंत समज असतो, तसेंच नाण्यांच्या ठरीव किंमतीला जोंपर्यंत तीं पतकरलीं जातात, तोंपर्यंतच संख्यात्मक पद्धति वस्तुतः असते ही गोष्ट विसरतां कामा नये.

रुप्याच्या डॉलरचा आकार मोठा असतो म्हणून त्याला झीजही कमी लागते. ह्या कारणास्तव नियमित व सर्वसंमत अशा भावांनी निरनिराळ्या जातीचे डॉलर निःशंकपणे लोक पतकरतात. ह्याप्रमाणे डॉलर हा उष्ण कटिबंधांतील देशांत कित्येक वर्षेपर्यंत आन्तरराष्ट्रीय पैसा बनून राहिला; परंतु झिजेची

किंवा अफरातफर केल्याचीं चिन्हें नाण्यावर दृष्टोत्पत्तीस येतांच नाण्याचा उपयोग वजनावर होऊं लागतो व अशा रीतीने प्राथमिक पद्धतीचा अंमल पुन्हा सुरू होतो.

एखाद्या सरकारने दोन किंवा अधिक धातूंचीं नाणीं पाडून बाजारभावाप्रमाणे जी किंमत होईल त्या किंमतीला तीं नाणीं घेतलीं जावींत असें फर्माविलें तर अशा पद्धतीस समानपरिमाणात्मक पद्धति म्हणतां येईल. स्वीडन देशांत ही पद्धति अमलांत आणिली होती. तेथील सरकारने अंतर्गत व्यवहारासाठी रुप्याचें नाणें पाडून परराष्ट्राबरोबरच्या व्यापाराच्या सोयीसाठी सोन्याचेंही नाणें पाडलें होतें. त्याचप्रमाणे हिंदुस्थान सरकारने सुद्धा रुप्याचें कायदेशीर चलन असतां दुसरें सोन्याचें चलन सुरू करण्याचा वारंवार प्रयत्न केला. इंग्लिश अमलाच्यापूर्वी मोहरा, होन वगैरे सोन्याचीं नाणीं प्रचारांत होतीं व तीं बाजारभावाच्या किंमतीने वापरलीं जात; त्यांपैकी सोन्याच्या मोहरा हिंदुस्थान सरकार आपल्या टांकसाळींत पाडीत असत. त्यांचें वजन व कस हीं रुप्याच्या वजनाइतकीं व कसाइतकीं असत. एका मोहरेचा दर पंधरा रुपये कायद्याने ठरविला होता.

## एकात्मक चलनपद्धति

पहिल्या प्रथम ज्यांनी नाणीं पाडिलीं त्यांनी कायदेशीर फेडीचें एकच चलन ठेविलें होतें. लॅसिडीमॉन येथे व इतर कांही ठिकाणीं लहान लहान लोखंडी कड्यांच्या आकाराचें एकच कायदेशीर चलन होतें. चीन देशांत अजूनसुद्धा पितळेचें नाणें तागलू हेंच काय तें कायदेशीर फेडीचें चलन आहे. तिसऱ्या एडवर्डच्या कारकीर्दीपर्यंत इंग्लंडांत फक्त रुप्याचें नाणें पाडीत असत व कर्जांची फेड रुप्याच्या नाण्यांतच करावी लागे. अठराव्या शतकांत रशिया आणि स्वीडन या दोन देशांत तांबें हेंच कायदेशीर फेडीचें चलन होतें.

कायदेशीर फेडीचें एकच चलन असलें म्हणजे त्यांत बरेंच सौकर्य व निश्चितता असते. आपल्यास किती द्यावयाचें व किती घ्यावयाचें ह्याची

अटकळ प्रत्येकास तंतोतंत करितां येते व सारख्या आकाराचीं नाणीं असलीं म्हणजे तर कोणालाही फसवणुकीने किंवा इतर रीतीने नुकसान होण्याचा संभव नसतो. परंतु ह्यांत एक मोठी गैरसोय आहे ती ही की, पसंत केलेली धातु जर महाग असेल तर बारिकसारीक देवघेवीकरिता नाणें पाडणें अशक्य होतें व धातु अगदी स्वस्त असेल तर मोठ्या व्यवहारांचा निर्वाह त्या नाण्यांनी होणार नाही. रुपयांच्या ऐवजीं नुसतें तांब्याचेंच नाणें आपल्या इकडे असतें तर दहा हजार रुपयांचा जेथे व्यवहार करावयाचा असेल त्या ठिकाणीं खुर्द्यांच्या गाड्याच्या गाड्या भरून न्याव्या लागतील.

आता उलट पक्षीं तांब्याचें नाणें बंद करून फक्त रुप्याचेंच नाणें चालू ठेविलें तर पैच्या किंवा दमडीच्या किंमतीचें नाणें पाडतां येणें अशक्य असल्यामुळे दिडकीदुगाणीची मिरचीकोथिंबिर घेणें झाल्यास तें प्रायः दुरापास्त होईल. ज्या वेळीं रुप्याचा पेनी २२॥ ग्रेनांचा असे व मूल्यवान् धातु हल्लीपेक्षाही अधिक बहुमोल असत, त्यावेळीं किरकोळ व्यापार कसा चालत असे हें समजणें कठीण आहे.

तात्पर्य, सरकारने एकाच धातूचें नाणें पाडलें तर आपआपल्या सोईकरिता लोक दुसऱ्या जातीचीं नाणीं पाडतात असा अनुभव आहे. इंग्लंडमध्ये तांब्याचें नाणें नव्हतें त्या वेळेस व्यापाऱ्यांनी उपनाणीं पाडण्याचा क्रम सुरू केला होता.

## कायदेशीर फेडीची अनेकात्मक चलनपद्धति

एका धातूचें नाणें पाडण्याचा क्रम सुरू झाला म्हणजे त्याच्या पाठोपाठ दोन किंवा अधिक धातूंचीं नाणीं पाडणें आपोआपच भाग पडतें. उदाहरणार्थ, रुप्याशिवाय दुसऱ्या धातूचें नाणें आपण पाडीत नसल्यामुळे लोक सोनें वापरूं लागले हें पाहून इंग्लंडच्या राजांनी सोन्याचें नाणें पाडण्याची सुरुवात केली व या दोन प्रकारच्या नाण्यांची परस्पर किंमतही कायद्याने ठरवून टाकिली. हिलाच कायदेशीर फेडीची द्व्यात्मक चलन-

पद्धति म्हणण्यास हरकत नाही. ह्या राजांनी सोन्यारुप्याच्या नाण्यांची परस्पर किंमत ठरविली ती त्या वेळच्या बाजारभावाला अनुसरून ठरविली होती; परंतु पुष्कळ काळपर्यंत कोणत्याही पदार्थांचा एकच भाव कायम राहणें अशक्य असल्यामुळे नवीन बाजारभावाच्या अनुरोधाने पूर्वीच्या किंमतींत त्यांना पुनः बदल करावा लागला. इ० स० १२५७ पासून १६६४ पर्यंत सोनें व रुपें या दोन धातूंचेंच चलन इंग्लंडमध्ये होतें. तांबें अथवा दुसऱ्या एकाद्या अशाच हलक्या धातूचें नाणें बिलकुल पाडीत नसत. सन १६६४ पासून १७१७ पर्यंत नाण्यांची परस्पर किंमत सरकारने कायद्याने ठरविल्याचें दिसत नाही. त्यामुळे बाजारभावाप्रमाणे एका गिनीची कमजास्त किंमत लोक करीत असत. एके वेळीं तर एका गिनीचे तीस शिलिंग घेत असत. याचें कारण रुप्याची किंमत उतरली हें तर खरेंच; परंतु मुख्यत्वेंकरून रुप्याचें नाणें झिजून हलकें झालें होतें हें होय. ह्या मुदतींत देशांत फक्त रुप्याचेंच नाणें होतें असें म्हटलें तरी चालेल.

अठराव्या शतकाच्या आरंभीं चलनाच्या असमाधानकारक स्थितीबद्दल त्या देशांत बरीच चर्चा सुरू झाली. टांकसाळीवरील मुख्य अधिकारी सर आयझॅक् न्यूटन ह्याला ही स्थिति सुधारण्याला काय उपाय योजावे ह्याबद्दल रिपोर्ट करण्यास सांगितलें. इ. स. १७१७ मध्ये त्याने रिपोर्ट केला; त्यांत पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे गिनीची किंमत सरकारने ठरवावी असा अभिप्राय देऊन हल्ली ती २१ शिलिंग ठरवावी असेंही सुचविलें. हा अभिप्राय इंग्लिश सरकारला पसंत पडला व तेव्हापासून गिनीची किंमत २१ शिलिंग कायम आहे. ह्याप्रमाणे पुन्हा एकवार इंग्लंडमध्ये कायदेशीर फेडीचीं दोन चलनें सुरू झालीं; परंतु ही कायदेशीर किंमत व व्यापारी किंमत सारखी राहणें बहुतेक अशक्यच असतें. न्यूटनने गिनीचा भाव २१ शिलिंग जो ठरविला होता तो शेंकडा १॥ या प्रमाणाने जास्त होता. ह्याचा अर्थ असा की, धातूपेक्षा नाणें म्हणून गिनीची किंमत तेवढ्यापुरती जास्त होती. म्हणून आठव्या भागांत सांगितलेल्या नियमाप्रमाणे पुऱ्या वजनाचीं रुप्याचीं नाणीं

परमुलखांत जाऊं लागलीं व सोनें हेंच मोलाचें मुख्य परिमाण होऊन बसलें व हल्लींही हीच स्थिति कायम आहे. जेथे जेथे म्हणून एकाच वेळीं किंमतीचीं दोन सारखीं परिमाणें सुरू करण्याचा प्रयत्न आजपर्यंत झाला तेथे तेथे अखेर परिणाम असाच घडला आहे. मॅसॅचुसेट्स् येथे १७६२ मध्ये रुप्याप्रमाणे सोनें हें कायदेशीर फेडीचें चलन ठरलें गेलें. सोन्याचा भाव दर ग्रेनला २।। पेन्सप्रमाणे कायम केला होता. परंतु बाजारभावाहून शेकडा ५ प्रमाणांनी ही किंमत अधिक असल्यामुळे रुप्याचें नाणें व्यवहारांतून झपाट्याने नाहीसें झालें. ही स्थिति सुधारण्याकरिता पुष्कळ उपाय योजले; परंतु सोन्याचा पूर्वीचा भाव जोंपर्यंत कायम राहिला होता तोंपर्यंत त्याचा कांही उपयोग झाला नाही.

ह्याप्रमाणे ह्या व दुसऱ्या कित्येक देशांत सोन्यारुप्याचें दुहेरी चलन सुरू करण्याचे प्रयत्न पुष्कळ वेळां झाले. परंतु ह्या कृतीच्या नफ्यातोट्याचा तात्त्विक विचार कोणींच केला नव्हता. ही दुहेरी चलनपद्धतीच सर्वोत्कृष्ट आहे अशा सिद्धांताचें प्रतिपादन प्रथमतः फ्रान्सच्या राज्यक्रांतिकारांनी केलें तेव्हापासून त्या देशांतील अर्थशास्त्रवेत्त्यांच्या मनाचा कल ह्या पद्धतीच्या वतीने विशेष दिसतो.

इ० स० १७९१ मध्ये फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेपुढे मिरॅबोने एक सूचना आणिली. त्यांत त्याचा मुख्य मुद्दा इतकाच होता की, सोन्यापेक्षा रुपें विपुल उपलब्ध होत असल्यामुळे रुप्याचेंच मुख्य म्हणजे कायदेशीर फेडीचें चलन करावें व मोलाचीं अवांतर परिमाणें म्हणून सोन्याचें व तांब्याचें नाणें पाडावें. ह्या सूचनेप्रमाणे फ्रान्समध्ये अंशतः चलनांत फेरबदल करण्यांत आला.

## कायदेशीर फेडीची संयुक्त चलनपद्धति

एकच धातूचें चलन असल्यास धातू महाग किंवा स्वस्त असेल त्या मानाने लहान मोठ्या देवघेवी करण्यास फार अडचण पडते हें मागे सांगितलें आहेच. पुऱ्या वजनाचीं दोन अथवा अधिक धातूंचीं नाणीं पाडून

बाजारभाव हेंच त्यांच्या किंमतीचें प्रमाण असें ठरविलें तर हिशेब करण्याचा त्रास पडतो. आता दोन धातूंची परस्पर किंमत कायद्यानें ठरविली तर ज्या उद्देशानें दोन धातूंचीं नाणीं पाडलीं गेलीं तो उद्देश सफल न होतां प्रत्येक वेळेस कोणत्या तरी एकाच धातूचें नाणें देशांत राहील व सराफ लोकांना दुसऱ्या धातूचें नाणें वितळवून फायदा करून घेण्यास सापडेल.

आता तिसरा आणखी एक प्रकार आहे, तो असा की, मोलाचें मुख्य परिमाण कायदेशीर फेडीचें मुख्य चलन म्हणून एकाच धातूचें नाणें पाडतात व त्याचे पोटभाग म्हणून दुसऱ्या धातूचीं नाणीं पाडतात. ह्या नाण्यांनी लहान रकमेपर्यंत मात्र कायदेशीर फेड करितां येते. ह्या उपनाण्यांची किंमत आंतील धातूवर अवलंबून नसून मुख्य परिमाणात्मक नाण्याच्या किंमतीवर अवलंबून असते. ह्या कायद्यानें ठरविलेल्या किंमतीहून आंतील धातूची किंमत नेहमी कमी राहील अशाबद्दल खबरदारी घेतलेली असते. अशा रीतीनें हीं नाणीं वितळवून अथवा देशांतून परमुलखांत पाठवून फायदा होण्याचा संभव नसतो.

संयुक्त चलनपद्धतीचा उद्भव अर्थातच द्व्यात्मक चलनपद्धतीपासून होतो; कारण दुहेरी चलन असतांना सोन्याच्या नाण्याची किंमत जर बाजारभावापेक्षा जास्त असेल तर पुऱ्या वजनाचीं रुप्याचीं नाणीं हलके हलके व्यवहारांतून नाहींशीं होतील हें वर सांगितलें आहेच. असें झालें म्हणजे कमी वजनाचीं रुप्याचीं नाणीं काय तीं देशांत राहतील. इंग्लंडमध्ये लॉर्ड लिव्हरपूल यांनी दुहेरी चलनपद्धतीहून संयुक्त चलनपद्धतीचें श्रेष्ठत्व ठरवून तिचा अंगिकार करावा असें प्रतिपादन केलें. तेव्हापासून ही पद्धत इंग्लंडमध्ये सुरू आहे. ह्याशिवाय इतर देशांतही संयुक्तपद्धति अमलांत नव्हती असें नाही, पण जाणून बुजून मात्र ती कोणी अमलांत आणिली नव्हती इतकेंच. ज्या ज्या देशांत दोन धातूंचें सारखें चलन चालू आहे तेथे त्यापैकी एका धातूच्या नाण्याची किंमत वास्तविक किंमतीहून जास्त व्हावयाला

लागली म्हणजे तीं उपनाणींच होऊन बसतात व वास्तविक किंमतीचें दुसऱ्या धातूचें नाणें व हें उपनाणें मिळून संयुक्त चलनपद्धतिच सुरू होते. सन १७१७ पासून इ० स० १८१६ पर्यंत गिनीची किंमत एकवीस शिलिंग ठरली होती. तेव्हा इंग्लंडमध्ये तत्त्वतः द्वयात्मक चलनपद्धति म्हणून सुरू केली होती; परंतु वस्तुतः पहातां रुप्याचीं नाणीं इतकीं दुर्मिळ असत व जीं असत तीं इतकीं झिजलेलीं असत की त्यांना उपनाणींच म्हटलीं पाहिजेत. परंतु वर सांगितल्याप्रमाणें इ० स० १८१६ त लॉर्ड लिव्हरपूलने संयुक्तपद्धति अमलांत आणण्याबद्दल खटपट चालविली व कोणत्या तत्त्वांना अनुसरून ही पद्धति अमलांत आणावी याचाहि त्याने खुलासा केला. आजपर्यंतच्या अनुभवावरून सर्व प्रकारचे व्यवहार सुयंत्रित चालण्यास हीच पद्धति योग्य आहे असें म्हणावें लागतें.

बऱ्याच सुधारलेल्या राष्ट्रांनी हल्ली कमजास्त स्वरूपाने संयुक्त चलनात्मक पद्धतीचा अंगिकार केला आहे. फ्रान्स, बेल्जम, स्वित्सर्लंड, इटली ह्या देशांत अद्यापि पूर्वीची द्वयात्मक चलनपद्धतिच कायम आहे. तथापि ह्या देशांत सुद्धा पांच फ्रांकांहून कमी किंमतीचीं सर्व रुप्याचीं नाणीं उपनाणीं बनविलीं आहेत; म्हणजे त्यांतील धातूचा कस शेकडा ७। प्रमाणे कमी करून कांही ठरीव रकमेपर्यंतच त्यांच्या योगाने कायदेशीर फेड करितां येते असें ठरविलें आहे. फ्रान्समध्ये तांब्याचीं नाणीं चालू आहेत, परंतु पांच फ्रांकावरील रकमेकरिता तीं घेतलींच पाहिजेत असा निर्बंध ह्याच्यापूर्वींच काढून टाकला होता. अमेरिकेंतसुद्धा जरी दोन धातूंचीं नाणीं चालू होतीं तरी वास्तविक किंमतीहून सोन्याच्या नाण्याची किंमत जास्त ठरली गेली असल्यामुळे ती पद्धति संयुक्तपद्धतीवरच आली. पुढे इ० स० १८५३ मध्ये तेथील सरकारने एक कायदा केला त्याअन्वयें रुप्याच्या लहान लहान नाण्याचें वजन कमी झालें व पांच डॉलरांच्या आंतील देवघेवीकरिता मात्र त्याचा कायदेशीर रीतीने उपयोग होऊं लागला. जर्मनीमध्ये हल्ली संयुक्त चलनपद्धतिच सुरू केली आहे.

## भाग दहावा

# हिंदुस्थानची धात्वात्मक चलनपद्धति

हिंदुस्थानांत इंग्लिशांच्या कारकीर्दींत आज जवळ जवळ ६० वर्षें जी चलनपद्धति सुरू आहे, तत्संबंधी माहिती देण्याचें ह्या भागांत योजिलें आहे.

## रुप्याचें नाणें

ह्या देशांत रुपया हें मोलाचें परिमाण व कायदेशीर फेडीचें मुख्य चलन आहे. ह्याचें वजन १८० ग्रेन असावें लागतें. ह्यांत $\frac{११}{१२}$ ठरीव कसाची चांदी असून बाकी $\frac{१}{१२}$ हिस्सा इतर कनिष्ठ धातूंचें मिश्रण असतें. म्हणजे एका रुपयांत शुद्ध चांदी १६५ ग्रेन असली पाहिजे; परंतु कायद्यानें ठरविलेल्या वजनाबरहुकूम बरोबर अगदी तंतोतंत कोणत्याही नाण्याचें वजन करितां येणें कांही अंशीं अशक्य असल्यामुळे वर सांगितलेलें वजन जें कायद्यांत दिलेलें आहे त्या वजनाचीं नाणीं होतां होईल तितकें करून पाडण्याचा प्रयत्न टांकसाळींतील लोकांनी करावा इतकाच त्याचा आशय आहे.

लोकांच्या दृष्टीनें विचार केला असतांही असें दिसतें की, कायद्या-प्रमाणे अमुक नाणें अगदी बरोबर वजनाचें आहे की नाही हें अगदीं कोणी बरोबर पहात बसत नाही. ठरीव वजनांत थोडी चलबिचल झाली तरी चालेल; परंतु टांकसाळींतून बाहेर पडतांना नाण्याचें जें वजन असेल त्यास व ज्या वजनापर्यंत कायदेशीर रीतीनें व्यवहारांत वापरतां येईल अशा वजनास कांही मर्यादा पाहिजे हें उघड आहे. वर सांगितल्याप्रमाणे अगदी बरोबर वजनाचें प्रत्येक नाणें पाडणें यंत्रदोषामुळे व कामगारांत तितकें नैपुण्य संभवनीय नसल्यामुळे टांकसाळींत पाडलेल्या नाण्यांत किंचित् कमजास्त वजनाचीं नाणीं पडतात; ह्यामुळे टांकसाळींतील अधिकाऱ्याला थोडी सवलत देणें कायद्यानें भाग पडतें. ह्याच सवलतीला मुभा ही पारिभाषिक संज्ञा आहे. रुपयाच्या वजनांत पांच हजारांशाच

मुभा दिलेली असते. याचा अर्थ रुपयाचें जें ठरीव वजन असलें पाहिजे त्याहून एक पांचहजारांश हिश्शानें तें कमी अथवा अधिक झालें तरी तो कायदेशीर रुपया आहे असें समजावयाचें; म्हणजे टांकसाळींत १८०·०३६ ग्रेनांहून अधिक अथवा १७९·९६४ ग्रेनांहून कमी वजनाचा रुपया काढतां येणार नाही. त्याचप्रमाणे वर सांगितलेली चांदी दर रुपयांत नेमकी घालण्यांत अलीकडे पलीकडे होण्याचा संभव असल्यामुळे त्या कामींहि कायद्यानें थोडी सवलत ठेविली आहे. म्हणजे रुपयांत १६४·९१७५ ग्रेनांपेक्षा कमी अगर १६५·०८२५ ग्रेनांपेक्षा जास्त चांदी असतां कामा नये. ह्याप्रमाणे वर सांगितलेल्या नियमांचा टांकसाळींतून पडलेला व कायद्याप्रमाणे ठरलेला शिक्का असलेला प्रत्येक रुपया कायदेशीर चलन आहे; आणि तेवढ्या रकमेपुरत्या कर्जाच्या फेडींत सावकारानें तो पतकरलाच पाहिजे. मात्र इतकेंच की, शेंकडा २ म्हणजे १७६·४ ग्रेनांहून त्या रुपयाचें कमी वजन झालेलें असतां कामा नये. ह्यापेक्षा कमी वजनाचा रुपया हिंदुस्थान सरकारानें ज्यांना अधिकार दिला आहे अशा अधिकाऱ्यांच्या हातांत आला असतां तो त्यांना तोडतां येतो. केवळ वापरल्यामुळेच जर ही झीज लागली असेल तर एक तोळ्यास एक रुपया याप्रमाणे तो त्यांनी घेतलाच पाहिजे असा निर्बंध आहे. म्हणजे एका तोळ्याला एक रुपयाप्रमाणे त्यानें मालकाला किंमत दिली पाहिजे; परंतु वापरामध्ये स्वाभाविक रीतीनें लागणाऱ्या झिजेनें कमी वजन न होतां जर कांही अन्य कारणामुळे त्याचें कमी वजन झालें असेल अथवा तो बनावट केलेला दृष्टोत्पत्तीस येईल तर तो मालकाला परत दिला पाहिजे व तोडण्यामुळे जें कांही नुकसान झालें असेल तें मालकानेच सोसलें पाहिजे. कायद्याची अंमलबजावणी करीत असतां जर कोणाच्या हातून न कळतां चूक झाली तर त्याबद्दल त्याजवर फिर्याद चालत नाही.

ह्याशिवाय अधेली, पावली व चवली अशीं दुसरीं रुपयाचीं नाणीं पाडलीं जातात. ह्या सर्वांचें वजन रुपयाच्या वजनाच्या निम्मे, चतुर्थांश व

अष्टमांशाइतकें असतें व प्रत्येकांत एकंदर वजनाच्या ११/१२ चांदी व १/१२ इतर धातूचें मिश्रण असतें. एकंदर वजनांत एका अधेलींत पांचहजारांश, पावलींत सातहजारांश व चवलींत दहाहजारांश याप्रमाणे मुभा ठेविली आहे. त्याचप्रमाणे अधेलीमध्ये जी चांदी असणें अवश्यक आहे, तींत दोनहजारांश, पावली व चवली ह्यांत तीनहजारांश हिश्शांनी ती कमजास्त झाली तरी तें नाणें बेकायदेशीर होत नाहीं. ह्याशिवाय पूर्वी दोन रुपयांचें नाणें पाडीत असत, पण तें हल्लीं बंद केलें आहे.

शेंकडा दोनहून जास्त वजन कमी झालें नसेल तर रुपया आणि अधेली हीं कायदेशीर फेडीचीं नाणीं आहेत. म्हणजे यांमध्ये कर्ज दिलें असतां तें धनकोला घेणें भाग आहे. परंतु पावली आणि चवली ह्यांनी रुपयापर्यंत रकमेचीच कायदेशीर रीतीने फेड करितां येते. वजनांत शेंकडा दोहोंपेक्षा कमी असतां कामा नये. हा नियम पावली, चवली यांस लागू आहेच. हीं नाणीं पाडतांना टांकसाळीवरील अधिकाऱ्याला मुभा दिली आहे म्हणून जें वर सांगितलें त्याच्याबाहेर बहुधा नाणीं पडत नाहीत असें दिसतें. सन १९०१–०२ सालीं ११३० नाण्यांची पारख केली त्यांत फक्त एकच रुपयाचा कस मुभेच्या बाहेर गेलेला आढळला. ह्या नाण्यांचें सरासरीचें वजन १८०·०३४ ग्रेन इतकें होतें. सर्वांत जास्त वजन म्हणजे १८०·८९ आणि कमी म्हणजे १७९·०३ असें भरलें व १०५७ नाणीं तर बरोबर १८० ग्रेन वजनाचीं भरलीं.

## तांब्याचें नाणें

याशिवाय उपनाणीं म्हणून तांब्याचीं नाणीं पाडलीं आहेत. अर्थात् रुपयाचीं हीं नाणीं अंशभूत आहेत. किरकोळ व्यवहाराकरिता रुप्याचें नाणें पाडणें अशक्य असल्यामुळे हलक्या जातीचें नाणें पाडणें कसें भाग पडतें हें मागे सांगितलेंच आहे. हीं नाणीं पाडण्यांत अशी योजना केली आहे की, धातूची किंमत नाण्याहून कधीहि जास्त असूं शकणार नाहीं. म्हणजे ह्या नाण्यांत जितकी धातू असते त्या धातूच्या किंमतीहून पुष्कळ

पटीने अधिक किंमत या नाण्याची कायद्याने ठरवून टाकली आहे. एवढ्याकरिता ह्यांस उपनाणीं म्हणणें सयुक्तिक होईल. दोन दिडक्या, दिडकी, अर्धी दिडकी अथवा सापिका आणि पै इतकीं तांब्याचीं नाणीं हल्ली टांकसाळींत पाडतात. अर्ध्या आण्याचें वजन २०० ग्रेन, ह्या प्रमाणाने बाकीच्या नाण्यांचीं वजनें असतात. ह्या तांब्याच्या नाण्यांच्यासंबंधाने १/४० ग्रेनापर्यंत मुभा टेविली आहे. म्हणजे कायद्याने ठरविलेल्या वजनाहून १/४० हिशाने कमजास्त वजनाचें नाणें पडलें तरी तें कायदेशीरच समजलें पाहिजे. एका रुपयापर्यंतच्या व्यवहारापर्यंतच हीं कायदेशीर फेडीचीं नाणीं आहेत. एका रुपयाचा बत्तिसावा हिस्सा अथवा अर्धा आणा ह्याकरिता दोन दिडक्यांचें नाणें; चौसष्टाव्या हिश्शाकरिता अथवा पाव आण्याकरिता दिडकीचें नाणें; एकशेंअठ्ठाविसाव्या हिश्शाकरिता अथवा १/८ आण्याकरिता अर्धी दिडकी अथवा सापिका व १९२ व्या हिश्शाकरित अथवा १/१२ आण्याकरिता एक पै हीं त्या त्या पुरतीं कायदेशीर फेडीचीं नाणीं होत. असें जरी आहे तरी रुप्याचीं व तांब्याचीं लहान नाणीं कोणत्याही रकमेपर्यंत सरकारदेण्याच्या ऐवजी दिली असतां अधिकाऱ्यांनी तीं घेतलीं पाहिजेत असा सरकारने नियम केला आहे.

एक दिडकी अथवा पाव आणा हा रुपयाचा ६४ वा हिस्सा आहे. तेव्हा रुपयाच्या ६४ व्या हिश्शाला आजच्या तांब्याच्या बाजारभावाप्रमाणे (८० रुपये भार तांब्याला बारा आणे) जितकें तांबें येईल तितक्या तांब्याचें जर दिडकीचें नाणें पाडलें तर एका दिडकीचें वजन सुमारें ३०० ग्रेन म्हणजे हल्लीच्या तिप्पट वजन होईल. तात्पर्य, हल्ली बाजारांत एका दिडकीला जी किंमत येते ती तिची वास्तविक अथवा धातुगत किंमत नसून वास्तविक किंमत १/३ ने कमी आहे. हीं नाणीं पाडण्यांत सरकारला पुष्कळ फायदा राहण्याचा संभव आहे.

रुप्याच्या नाण्याप्रमाणे अमुक झीज लागेपर्यंत तांब्याचीं नाणीं कायदेशीर रीतीने व्यवहारांत राहूं द्यावीं अशाबद्दल कायद्याचा कांही निर्बंध

नाही. वापरामुळे त्यांचें वजन कितीहि कमी झालें तरी तीं बेकायदेशीर होत नाहीत. जाहिरनामा काढून सरकारने जोंपर्यंत परत मागितली नाहीत अथवा त्यावरील छाप जोंपर्यंत लुप्तप्राय झाला नाही तोंपर्यंत तीं कोणत्याही माणसाला नाकारतां यावयाचीं नाहीत. टांकसाळींत तांबें नेऊन दिलें असतां त्याचें नाणें पाडण्याचें सरकार पतकरीत नाही. स० १८९३ पर्यंत कोणत्याहि मनुष्याने १००० तोळे किंवा त्याहूनहि जास्त रुपें दिलें असतां शेंकडा दोनप्रमाणे त्यावर जकात घेऊन सरकार त्या रुप्याचे रुपये पाडून देत असे; परंतु १८९३ च्या कायद्याने ही सवलत सरकारने काढून घेतली आहे. तांब्याच्या नाण्यांत इतर धातूचें मिश्रण नसतें.

हिंदुस्थानांतील टांकसाळींत तीस, पंधरा, दहा, पांच रुपयांच्या किंमतीचीं सोन्याचीं नाणीं पाडतात. पंधरा रुपयाच्या किंमतीच्या नाण्याला मोहर ही संज्ञा आहे. मोहरेचेंहि रुपयाप्रमाणेच १८० ग्रेन वजन असावें लागतें. त्यांत १६५ ग्रेन सोनें व १५ ग्रेन हलकी धातु असावी असा निर्बंध आहे. बाकीच्या नाण्यांचीं वजनें ह्या प्रमाणानेच असतात. ह्या नाण्यासंबंधाने एक दोनहजारांश $\frac{1}{2000}$ ची मुभा ठेविलेली आहे; परंतु कोणत्याही सोन्याचें नाणें कायदेशीर चलन नाही असा कायद्याचा नियम असल्यामुळे या संबंधाने जास्त विचार करण्याचें कारण नाही.[1]

## हलकें नाणें परत घेणें

वर दिलेल्या माहितीवरून असें दिसून येईल की, कायद्याने कमींत कमी जें नाण्याचें वजन ठरविलें आहे त्याहून जर वजन खाली गेलें तर तीं

---

१ हल्लीं हिंदुस्थानसरकारने नाण्याच्या कायद्यांत दुरुस्ती केली आहे. ह्यांत मुख्य फरक हे आहेत कीं आण्याचें नवीन ५० ग्रेन वजनाचें निकल धातूचें नाणें सुरू केलें आहे. पूर्वीं प्रचलित असलेलीं तांब्याचीं नाणीं जाऊन त्यांच्या ऐवजीं ब्रॉन्झ ( तांबें, जस्त, कथील ) धातूचीं नाणीं पाडलीं आहेत. दोन दिडक्यांचें नाणें बंद केलें आहे. पूर्वीं दिडकीचें वजन १०० ग्रेन होतें तें हल्लीं ७५ ग्रेन आहे व त्याचप्रमाणे इतर उपनाण्यांचीं वजनें आहेत.

नाणीं कायदेशीर चलनाला अयोग्य आहेत. म्हणून अशीं नाणीं व्यवहारांत चालू ठेवणें रास्त नाही. कायदेशीर वजनाच्या खाली नाणीं झिजलीं असा सुमार दिसतांच सरकारने परत घ्यावीं हें चांगलें. परंतु हीं परत कोणत्या तऱ्हेने घ्यावीं हा मोठा प्रश्न आहे. जुनीं नाणींच वजनाने कमी झालीं पाहिजेत हें उघड आहे. सोन्यापेक्षा रुप्याच्या नाण्याला झीज कमी लागते. सुमारें ५० किंवा ६० वर्षांपर्यंत कायदेशीर वजनाच्या बाहेर झिजल्याशिवाय रुप्याचें नाणें राहील असा अजमास आहे. या बाबतींत कोणताही ठाम नियम बांधणें अशक्य आहे. कारण नाण्याची झीज ज्या प्रमाणाने तें वापरण्यांत आलें असेल त्या प्रमाणावर व त्याच्या आकृतीवर अवलंबून असते. तथापि हिंदुस्थानच्या संबंधाने असें म्हणावयास हरकत नाही कीं, ५०।६० वर्षांपर्यंत रुपया व्यवहारांत चालू ठेवण्यास हरकत नाही. तेव्हा अशा ५०।६० वर्षांचीं जुनाट नाणीं कोणीं वापरूं नये व तीं सर्व सरकारी तिजोरींत लोकांनी आणून द्यावीं असा जाहिरनामा काढतात अथवा मुलकी खात्यांतील अधिकारी, पोष्टमास्तर, किंवा ज्यांच्या हातांत लोकांकडून रुपये येण्याचा संभव असतो अशा सर्व अधिकाऱ्यांनी, त्याचप्रमाणे देशांतील पेढीवाल्यांनीसुद्धा अशीं नाणीं लोकांस परत न देतां टांकसाळींत पाठवून द्यावीं असा निर्बंध करतात. परंतु ह्या दुसऱ्या उपायाने प्रत्येक नाणें वजन करण्याची दगदग व गैरसोय उत्पन्न होणार हें उघड आहे. कांही देशांत हलक्या वजनाचीं नाणीं भरलीं तर त्यावर बट्टा घेण्याची चाल आहे; परंतु अशाने सरकारी सेव्हिंग बँकेंत पैसे ठेवण्यास कोणीही प्रवृत्त होणार नाही व गरीब लोकांना मात्र असा कायदा फार जडीचा होईल. कारण पुष्कळ पैसा जवळ असणारे श्रीमंत लोक हलकीं नाणीं तिजोरींत न पाठवितां तीं खासगी व्यवहारांत उपयोगांत आणतील; परंतु गरीब लोकांजवळ पैसे थोडे असल्यामुळे त्यांना अशा रीतीने टाळाटाळी करतां येणें दुर्घट आहे. सारांश, हा उपाय बहुतेक त्याज्यच आहे. उत्तम उपाय म्हटला म्हणजे नाण्याच्या झिजेपासून होणारें नुकसान सरकारने

आपण सोसावें हा होय. इंग्लंड वगैरे देशांत ही झीज लोकांनाच सोसावी लागते; पण त्यामुळे मोठा अन्याय होतो. आधी पुष्कळ लोकांनी वापरून नाण्याचें वजन कमी झालें असतां त्याचा वचपा दुर्दैवानें अखेरीस ज्याच्या हातांत नाणें पडेल त्याला भरून द्यावा लागणें हें न्यायाच्या दृष्टीनें अगदी अप्रशस्त आहे. सन १८७० च्या कायद्यान्वयें हिंदुस्थानांतसुद्धा वापरामुळे नाण्याचें वजन कायदेशीर मर्यादेच्या बाहेर गेल्यास त्याचा बोजा लोकांवर पडत असे. परंतु स. १८८१ सालीं हिंदुस्थान सरकारनें नवीन नियम करून असें ठरविलें की अधिकाऱ्यांनी (कांहीं विवक्षित) लबाडीनें रुपयाचें वजन कमी न होतां योग्य झिजेनेंच झालें असेल–मग तें कितीही कमी असो–तर ते सर्व रुपये मुखकिंमतीनें (Face-value) विकत घेऊन टांकसाळींत पाठवावे. म्हणजे वापरामुळे आलेल्या झिजेपासून होणारें नुकसान लोकांवर न टाकतां सरकारनें आपण पतकरलें.

हे नियम स० १८९९ पर्यंत अमलांत होते. ह्या सालीं सरकारनें पुनः असें ठरविलें की, रुपये किंवा अर्धे रुपये शेंकडा ६। वजनाहून कमी वजनाचे झाले नसल्यास सरकारनें ते आपल्या खर्चानें पूर्ण किंमतीला परत घ्यावे. म्हणजे ११$\frac{२५}{१००}$ ग्रेन वजन कमी होईपर्यंत अगर १६८·७५ पर्यंत रुपयाच्या झिजेचें नुकसान सोसण्यास सरकार तयार झालें. पुढे सरकारास असें आढळून आलें की, परत घेतलेल्या नाण्यांत योग्य झिजेनें बहुतेक रुपयांचें वजन शेंकडा ४ हून कमी झालें नाही. त्यामुळे शेंकडा ६। चा नियम सरकारास फाजील सवलतीचा दिसला. म्हणून आता शेंकडा ४ पर्यंत ज्याचें वजन झिजेनें कमी झालें आहे असे रुपये व अर्धरुपये मात्र पूर्ण किंमत देऊन घेण्याचें योजलें आहे. शेंकडा ४ हून जास्त व १० च्या आंत कमी वजन असेल तर रुपयास साडेचवदा आणे देण्याचें ठरविलें आहे. ह्याहून कमी वजनाचे रुपये कापून मालकास परत द्यावयाचे. परंतु ही योजना पेढीवाल्या मंडळीस अगदी नापसंत झाली. प्रत्येक खेपेस तागडी बाळगून रुपये तोलण्याचा प्रसंग येईल अशी त्यांची तक्रार आली.

त्यावरून सदर नियम सध्या तहकूब ठेवण्याचें सरकारने अभिवचन दिलें आहे.

अकबराच्या कारकीर्दींत एक रति वजन कमी होईपर्यंत रुपया पूर्ण किंमतीचा म्हणजे ४० दामाचा मानला जाई. त्याच्याखाली वजन गेल्यास त्याची कसर मालकाकडून घेत. हल्ली हिंदुस्थानसरकारने शेकडा ६। पर्यंत झीज सोसण्याचें जें पतकरलें आहे तें योग्य आहे असेंच म्हणावें लागतें. तथापि इतकासुद्धा निर्बंध कां असावा हें समजणें कठीण आहे. वापरामुळे झालेली झीज किती का असेना ती सरकारने सोसणें अवश्य आहे. कारण, हलक्या वजनाचे रुपये न वापरण्याचा बोजा लोकांवर नसून असे रुपये वापरण्यांत न ठेवतां ते परत घेण्याचें कर्तव्य सरकारचें आहे.

सरकारचे तिजोरींत, रेल्वेअधिकाऱ्यांकडे व इतर कांही सरकारी अधिकाऱ्यांकडे स० १८३५ व १८४० सालचे जे रुपये येतील ते घेऊन त्यांनीं टांकसाळींत पाठवावे असा हिंदुस्थानसरकारने हुकूम सोडल्याने हे जुने रुपये बऱ्याच अंशाने व्यवहारांतून कमी झाले[1]. अशा रीतीमे सर्व रुपये एकदम माघारे घेणें सरकारास अशक्य आहे. तथापि हळू हळू हे सर्व रुपये परत सरकारी तिजोरींत गेले ह्यांत संशय नाहीं. हेच रुपये वितळवून सरकाने एडवर्ड बादशाहाच्या मुद्रेचे नवीन रुपये पाडले. स० १९०० पासून तीन सालांत अशा प्रकारचे जे रुपये सरकारने परत घेतले ते वितळवून त्याचे नवे रुपये पाडण्यांत सरकारास एकंदर १३३८५५४ रु० नुकसान झालें.

## रुप्याच्या नाण्याचा पुरवठा

इंग्लंडमध्ये सोन्याचें मुख्य नाणें चालतें. त्यामुळे टांकसाळींत कोणीं सोनें आणून दिल्यास तितक्याच किंमतीचें सोन्याचें नाणें सोनें आणून देणारापासून कांही एक फी न घेतां त्यास पाडून दिलें पाहिजे असा नियम आहे.

---

१ सन १९०५ एप्रिलपर्यंत एकंदर २००८ लाख जुने रुपये माघारे आले आहेत. अद्यापि ४॥ कोट वापरांत असा तर्क आहे.

अशा रीतीने नाणें पाडण्याच्या कामीं जो खर्च येतो तो सरकार आपण होऊन सोसतें. हा मार्ग दिसण्यांत सोपा दिसतो खरा; परंतु नाणें पाडून मिळ-ण्यास बराच वेळ लागत असल्यामुळे त्या मुदतींत सोन्याची लगड आणून देणाऱ्या माणसास व्याजाचें नुकसान सोसावें लागतें. म्हणून तेथील लोक बहुतकरून टांकसाळींत सोनें घेऊन न जातां बँक ऑफ् इंग्लंडमध्ये एक-दम विकतात. तेथे त्यांस दर औंसास १ पौं. १७ शि. ९ पे. मिळतात. ह्यापेक्षा त्यांस टांकसाळींत १॥ पेन्स जास्त मिळतो. परंतु अनिश्चित कालावधीने होणाऱ्या व्याजाच्या नुकसानापेक्षा हे दीड पेन्साचें झालेलें नुक-सान त्यांस पतकरतें.

हिंदुस्थानांत आजपर्यंत रुप्याचें एकच मुख्य नाणें होतें. त्या वेळीं इंग्लंडप्रमाणेच कोणत्याही माणसास टांकसाळींत जाऊन तेथे रुपें देऊन त्याऐवजी १ तोळा धातूस १ रुपया ह्याप्रमाणे रुपये पाडून मागण्याचा हक्क होता. परंतु त्या देशाप्रमाणे नाणें पाडण्याचा खर्च सरकार न सोसतां तो गिऱ्हाइकावरच टाकीत असे. म्हणजे नाणें पाडण्याबद्दल गिऱ्हाइकाला शेकडा २ रुपये फी द्यावी लागे. ह्या देशांत गिऱ्हाइकांची खोटी होणार नाही अशाबद्दलची मात्र खबरदारी घेतली जात असे. नाणें पाडण्याजोगें रुपें असेल तर टंकशालाध्यक्ष गिऱ्हाइकाला पावती देई. ही पावती घेऊन धातुपरीक्षकाकडे गेल्यावर त्याकडून एक दाखला देण्यांत येई. हा दाखला घेऊन मुख्य खजिन्यांत गेलें म्हणजे तेथे तावडतोब रुपये मिळत. ह्याचा अर्थ असा की, धातु घेऊन गिऱ्हाईक टांकसाळींत जाईल त्याच धातूचे रुपये पाडीपर्यंत गिऱ्हाइकास वाट पाहण्याचें कारण नसे. अशा व्यवस्थे-मुळे इंग्लंडप्रमाणे येथे व्यापाऱ्यांचें नुकसान होण्याचा संभव नव्हता.

परंतु इ. स. १८९३ सालीं सरकारने कायदा करून ह्या देशांतील टांकसाळी लोकांस अतःपर उघड्या ठेवल्या नाहींत. त्यामुळे आता कोणा-लाही सरकाराकडून रुपये पाडून मागण्याचा अधिकार उरला नाही. ह्याचा परिणाम व्यापारास वारंवार दुःसह असा होतो. ज्या

दिवसांत व्यापार जारीने चालू असतो, त्या दिवसांत रुपये जास्त लागतात; परंतु रुपये पाडून देण्यास सरकार तयार नसल्यामुळे व्यापारास हिसका बसतो. अशा प्रसंगीं रुपें खरेदी करून सरकारास आपण होऊन रुपये पाडावे लागतात. परंतु जास्त रुपयांची आवश्यकता केव्हा आहे हें व्यापारी लोकांप्रमाणे सरकारास आगाऊ कळण्याचा मार्ग नसल्यामुळे पुष्कळ वेळां व्यापाऱ्यांचें नुकसान होतें.

## सोन्याचीं नाणीं

सन १८९३ पूर्वी ह्या देशांत टांकसाळींत रुप्याप्रमाणेच सोन्याचीं नाणीं पाडून देत असत; परंतु कोणतेंही सोन्याचें नाणें कायदेशीर चलन नसल्यामुळे तें फार महत्त्वाचें नव्हतें. हल्लीही सोन्याचें नाणें कायदेशीर चलन आहे, म्हणजे कोणाच्या इच्छेविरुद्ध तें कर्जाच्या फेडींत देतां येईल असें अद्यापि सरकारने ठरविलें नाही. तथापि कांही कालानंतर रुप्याच्या नाण्याच्या ऐवजीं सोन्याचेंच मुख्य नाणें करण्याचा सरकारचा इरादा आहे. या कामासाठी सरकाराजवळ बरेंच सोनें असणें अवश्य आहे; म्हणून सरकारने असें ठरविलें होतें की, जो कोणी टांकसाळींत सोनें किंवा इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया ह्या दोन देशांत पाडलेल्या सोन्याचें नाणें आणून देईल त्यास ७·५३३४४ एवढ्या ग्रेन सोन्याबद्दल एक रुपया ह्या दराने खजिन्यांतून त्याच्या सोन्याच्या मोबदला रुपये देण्यांत येतील. त्यांत एवढीच अट होती की, तें सोनें नाणें पाडण्याजोगें पाहिजे व ५० तोळ्यांहून कमी असतां कामा नये. त्याचप्रमाणे सरकारी तिजोरींत इंग्लंड अथवा ऑस्ट्रेलिया ह्या देशांतील टांकसाळींत पाडलेले साव्हरीन आणि अर्धसाव्हरीन अनुक्रमें १५ आणि ७॥ रुपये ह्या दरांनी विकले जावेत असेंहि सरकारने फर्माविलें होतें. हल्ली सोन्याचें नाणें सरकारने बंद केलें आहे.

## तांब्याच्या नाण्यांचा पुरवठा

हीं नाणीं पाडण्याचा अधिकार सर्वस्वी सरकारने आपल्या हातांत ठेविला आहे. कोणत्याही खासगी मनुष्यास टांकसाळींत तांबें नेऊन याचें मला नाणें पाडून द्या असें म्हणण्याचा अधिकार नाही. लोकांच्या सोयीला अनुसरून किती नाणीं पाडावीं हें ठरवून सरकार त्याप्रमाणे पाडीत असतें. ह्यामध्ये कांही गैरवाजवी आहे असे ह्मणतां यावयाचें नाही. कारण हीं केवळ उपनाणीं असल्यामुळे तीं कोणी वितळविण्याच्या भरीस पडत नाही किंवा परदेशांतहि पाठवीत नाही. ह्या कारणास्तव असलीं नाणीं वाटेल तितकीं पाडून मागण्याचा जर लोकांस अधिकार दिला तर व्यापाराची तेजी असतांना फाजील नाणीं पाडलीं जातील; तीच व्यापाराची मंदी झाली म्हणजे निष्कारण लोकांच्या घरांत पडून राहतील. अशी स्थिति रुपयांची नसते. रुपयांची जेव्हां अवश्यकता नसते तेव्हां लोक ते नुसते घरांत राखून ठेवीत नाहीत. ते वितळले जातात किंवा परदेशांत पाठविले जातात.

## टांकसाळी

ह्या देशांत एकंदर मुंबई व कलकत्ता मिळून दोन टांकसाळी सरकारने घातल्या आहेत. सन १८६२ पर्यंत मद्रासेसही टांकसाळ होती पण ती पुढे बंद करण्यांत आली. ह्या दोन टांकसाळी मिळून सर्व हिंदुस्थान देशास व ब्रिटिश अमलांतील पूर्वेकडील दुसऱ्या कांही बेटांस नाण्याचा पुरवठा होतो. थोड्या दिवसांपूर्वी कलकत्ता येथील टांकसाळ बंद करून मुंबई येथे एकच टांकसाळ ठेवण्याबद्दल सरकारची वाटाघाट चालू होती. खर्चाच्या दृष्टीने पाहता ह्यांत सरकारची सोय झाली असती; परंतु राजकीय दृष्ट्या असें करणें गैर होतें. हिंदुस्थानावर परकीयांची कधी स्वारी झाल्यास तिचा आरंभ कलकत्त्याकडे होण्याचा संभव फारच कमी आहे. ह्या बाबतींत सरकारला स्वभावतः मुंबईची भीति जास्ती आहे. तेव्हा अशा ठिकाणीं सर्व देशाची एकच टांकसाळ असणें राज्याला अपकारक

होण्याचा संभव आहे, अशा समजुतीने सरकारने हा बेत रहीत केला असावा.

कलकत्यापेक्षाहि मुंबईच्या टांकसाळींचें काम जास्त होतें; एवढेंच नव्हे तर इंग्लंडमधल्या टांकसाळींत जें काम होतें त्याच्या चौपट मुंबईच्या टांकसाळींत होतें. स० १९०१ सालीं इंग्लंडच्या टांकसाळींत ७७२ टनांची काय ती घडामोड झाली; परंतु स. १९०२ मध्ये ३,२७७ टनांहून जास्ती धातूचें नाणें ह्या गिरणींत पाडलें गेलें. मुंबईची टांकसाळेची इमारत स. १८२९ मध्ये पुरी झाली. ह्या गिरणींत दररोज सुमारें ५०० मनुष्य काम करीत असतें. नवीन रुपये पाडण्याकरिता निरनिराळ्या पेढ्यांतून रुप्याच्या गाड्या भरून चांदी येत असते. त्याचप्रमाणे सरकारी खजिन्यांतून, आगगाड्यांच्या मंडळीकडून, जुने, बनावट म्हणून संशय आलेले व झिजलेले असे रुपये येत असतात; हे सर्व रुपये वितळवितात आणि त्यांच्या लहान लहान लगडी तयार करितात. पुढे ही चांदी एका मोठ्या कांट्यांत घालून वजन करतात. ते कांटे इतके मोठे असतात की, १५००० तोळे चांदी सहज वजन करतां येते. नंतर त्यांत ठरीव प्रमाणाने तांबें मिसळून वर सांगितल्याप्रमाणे वजन केलेली निरनिराळी चांदी भट्टींत घालतात. ह्या भट्ट्यांतून चांदीच्या लगडी बाहेर पडल्यावर त्या दुसऱ्या यंत्रांत घालतात. ह्या यंत्रांतून लगड निघाली म्हणजे ती बरीच लांब व पातळ होते. हल्लींच्या रुपयाच्या जाडीचा पत्रा होण्याला एक लगड सोळा वेळां अशा यंत्रांतून काढावी लागते. प्रथमतः टांकसाळींत गाड्यांतून जी निरनिराळ्या आकाराची चांदी येते तिच्या आता लांब व पातळ चिपा बनतात. अशा चिपा पडल्यावर त्या ठरीव वजनाच्या आहेत किंवा नाहीं हें पाहतात. ही परीक्षा करण्याकरिता रुपयाच्या आकाराचा तुकडा हव्या त्या लगडीचा कापून काढून त्याचें वजन करितात. नियमित वजनाहून जास्ती वजन भरल्यास ती चीर पुन्हा दुसऱ्या यंत्रांत घालून त्याचा थोडा भाग कापून काढतात. ह्याप्रमाणे रुपयाचा पूर्व आकार बरोबर वजनाचा होतो. अशा रीतीने सर्व चिपांचें वजन बरोबर आहे अशी खात्री झाल्यावर ह्या

चिपा पुन्हा यंत्रांत घालतात. ह्या यंत्रांत चीप घातली म्हणजे दुसऱ्या अंगास रुपायाच्या आकाराचे वर्तुलाकार निरनिराळे तुकडे पडतात. पुढे जें मुद्रांकित नाणें होणार त्याची ही पूर्वस्थिति होय. ह्या कापणाऱ्या यंत्राचें काम इतकें झपाट्याने चाललें असतें की, ह्या पूर्वावस्थ रुपयांचीं भांडींच्या भांडीं भरून निघतात; परंतु इतक्यांतच त्यांच्यावर शिक्का उठवितां येत नाहीं. नियमित वजनाचेच हे तुकडे आहेत हें पाहणें अवश्य आहे. म्हणून ते चाकांच्या गाड्यांतून घालून दुसऱ्या एका ठिकाणीं नेतात. ह्या ठिकाणीं स्वयंगति अशीं वजन करण्याचीं मोठमोठीं यंत्रें ठेवलेलीं असतात. मुंबईच्या गिरणींत अशा प्रकारचीं ७८ यंत्रें आहेत. हें यंत्र लहान कांचेच्या पेटीसारखें असतें. याला पुष्कळ चक्रें व दांडे असतात व वर एक लांबचलांब नळी असून खाली भांडीं ठेवलेलीं असतात. एकेका यंत्रांत नळीवाटे शंभर शंभर पूर्वावस्थ रुपये ओततात. ते ओतल्याबरोबर त्या यंत्रांत निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन पडतात. जितके तुकडे ठरीव वजनाचे असतात तितके मधल्या बालदींत पडतात. जास्ती वजनाचे एकीकडे व कमी वजनाचे दुसरीकडे बालदींत पडतात. याप्रमाणे रुपये ओतल्याबरोबर त्या यंत्रांतून हें काम आपोआप होत असतें. जास्ती वजनाचे रुपये जे निघतील ते दुसऱ्या यंत्रांत घातल्यावर तेथून ते बरोबर होऊन बाहेर निघतात; परंतु कमी वजनाचे जे असतील ते पुन्हा वितळवावे लागतात.

ह्यानंतर रुपयांची कडा तयार होते. हें कामहि यन्त्रानेच केलें जातें. ह्या यन्त्राचेंहि काम इतकें झपाट्याने चाललें असतें की, एका मिनिटांत शंभर रुपयांच्या कडा तयार होतात. ह्या वेळीं थंड झाल्यामुळे ह्या पत्र्यांवर छाप उठविणें कठीण पडतें, म्हणून हे तुकडे पुन्हा भट्टींत घालतात. भट्टींतून काढल्यानंतर छाप मारण्याकरिता ते पुन्हा यन्त्रांत घालतात. मग एकेक रुपया छाप वगैरे बसून पटापट बाहेर पडतो. एका दिवसांत ५००० रुपये ह्या टांकसाळींत सहज पाडले जातात.

ह्याच्यापुढेहि आणखी ह्या पाडलेल्या रुपयांची परीक्षा होत असतेच.

कांही मुलांकडून हे रुपये दगडावर वाजवून बघतात. ज्यांचा आवाज बरोबर निघणार नाही ते एकीकडे काढतात आणि चांगल्या रुपयांच्या २००० ची एकेक ह्याप्रमाणे थैल्या बांधून जिकडे तिकडे रवाना करतात.

ह्या टांकसाळींतील रुपये पाडण्याचें वगैरे सामान फारच उत्कृष्ट आहे. येथे जे कांटे ठेवले आहेत त्यांच्यायोगाने एका ग्रेनच्या दहाहजारांश भागापर्यंत वजन करतां येतें. प्रमाणभूत वजनें इतक्या व्यवस्थितपणें वापरतात की, तीं नेहमी दुघडी पेटींत ठेऊन दोन वर्षांतून फक्त एकदा बाहेर काढतात. असें करण्याचा हेतु इतकाच असतो की, त्यांच्या वजनांत कमतरपणा बिलकुल होऊं नये. तीस तोळ्यांचें इरिडिओ-प्लॅटिनम धातूचें एक मुख्य प्रमाणभूत वजन असतें. ह्या वजनाच्या आधारें बाकीचीं निरनिराळीं वजनें तयार करतात. मुख्य वजन दोन वर्षांतून एकदा बाहेर काढून बाकीचीं वजनें त्याबरोबर आहेत कीं नाहीत हें पाहतात. उष्णता, हवेचा दाब, व हवेची आर्द्रता ह्या सगळयांचा विचार करून वजनांची तुलना केली जाते. इरिडिओ-प्लॅटिनम धातूचीं वजनें व वर सांगितलेले अति नाजूक कांटे ह्यांची किंमत हजारों रुपये असते. हाताच्या स्पर्शाने वजनांत फरक पडण्याचा संभव आहे, म्हणून ह्या वजनांना स्पर्शसुद्धा करीत नाहीत. १२ – १४ फुटांच्या अंतरावरून दुरुस्ती करतां यावी अशा रीतीने कांट्यांची योजना केलेली असते.

---

## भाग अकरावा
## परचुटण नाणें

अल्प किंमतीच्या नाण्याकरिता अथवा ज्यास आपण खुर्दा म्हणतों त्याकरिता कोणती धातू सोइस्कर आहे याचा अद्यापि कायमचा निकाल लाग-

लेला नाही. रुप्याचीं जितकीं नाणीं असतील त्या प्रत्येकाच्या $\frac{1}{10}$ किंमतीचें असें नाणें अशा जातीचें असावें; परंतु रुप्याच्या किंमतीच्या दशांशाइतकी किंमत ज्या धातूची आहे अशी धातूच सांप्रत उपलब्ध नसल्यामुळे अशी व्यवस्था होणें दुर्घट आहे. रोमन लोकांच्यावेळीं रुप्यापेक्षा सोनें दसपटीने महाग होतें; आणि रुप्याची किंमत तांब्याच्या किंमतीच्या दसपट होती. अशा काळीं मात्र दशांशाच्या फरकाने या तीन धातूंचीं नाणीं सहज पाडतां आलीं असतीं.

ही गोष्ट नीट लक्षांत यावी म्हणून हल्ली उपलब्ध असलेल्या समान किंमतीच्या निरनिराळ्या धातूंचीं वजनें खाली दिलीं आहेत. या किंमती वारंवार बदलण्याचा संभव आहे हें उघड आहे. सोन्याचें एक हें वजन कल्पून त्या मानाने दुसऱ्यांचीं वजनें दिलीं आहेत.

| | |
|---|---|
| सोनें, प्लाटिनम | १ |
| रुपें | ३१$\frac{1}{3}$ |
| निकल | ५६० |
| अल्यूमिनियम् | ७८० |
| कथील | ११२० |
| तांबें | १८८६ |
| लोखंड | ६२२० |
| शिसें | ८००० |
| ओतीव लोखंड | २८००० |

वरील कोष्टकावरून असें दिसून येईल की, शिशाहून अल्यूमिनियम् व लोखंडाहून तांबें सरासरीने अनुक्रमें दसपट व तिप्पट महाग पडतें. त्याचप्रमाणे निकल आणि कथील यांच्या दरम्यान दुपटीचें अंतर दिसतें; आणि निकल व तांबें ह्यांमध्ये तिपटीचें अंतर दिसतें. आजमितीला रुपें तांब्याच्या ८० पट किंमतीबरोबर आहे. म्हणून तांब्याच्या नाण्याची जी ठरीव किंमत आहे, त्या मानाने आंतील धातू फारच अल्प किंमतीची असली पाहिजे.

नाही तर हीं नाणीं वापरावयास फारच अवजड होतील. इंग्रजी अमलाचे पूर्वी ह्या देशांत तांब्याच्या नाण्यांत तें नाणें १ रुपयाचा जितका अंश असेल तितक्या अंशाच्या वास्तविक किंमतीची धातू घालून सदर नाणीं पाडीत असत. ह्यामुळे पूर्वीचे शिवराई हल्लीच्या दिडक्याहून तिपटीने जड असत.

हल्लीच्या दिडक्यांत एका रुपयाचा ६४ वा अंश म्हणून वास्तविक जितकी धातू असणें अवश्य आहे त्याच्या तिसऱ्या हिशाच्या किंमतीइतकी धातू असते. म्हणजे हल्लीच्या दिडकीची किंमत कायम ठेवून वजन मात्र $\frac{1}{3}$ केलें आहे.

उपनाण्याचें वजन एकदम फार कमी केल्याने दोन प्रकारांनी नुकसान होण्याचा संभव असतो. फार हलकीं लागल्यामुळे ह्यांत लबाडी असावी असें समजून अडाणी माणसें तीं घेत नाहीशीं होतात. इ. स. १७९४ त फ्रान्स येथील राजक्रांतिकारांनी तांब्याचीं नवीन नाणीं पाडलीं त्यांची स्थिति अशीच झाली. त्यामुळे तेथील राज्यकर्त्यांना तीं नाणीं परत घेऊन पूर्वीच्या वजनाचीं दुसरीं नाणीं फिरून पाडावीं लागलीं. त्याचप्रमाणे आंतील धातूपेक्षा नाण्याची किंमत बरीच जास्त असेल तर बनावट नाणीं पाडून फायदा करून घेण्याची इच्छा लबाड माणसांना होण्याचा संभव आहे. पॅरिसमध्ये अशा प्रकारचीं बनावट नाणीं उघड पाडीत असत. हिंदुस्थानांत तांब्याचीं नाणीं बनावट करण्याचा प्रकार फारसा आढळून येत नाही. त्याचें एक कारण असें आहे की हें कृत्य उघडकीस आलें असतां कायद्याने जी शिक्षा मिळण्याचा संभव आहे त्या मानाने असलीं खोटीं नाणीं पाडण्याने फायदा फारच अल्प होतो.

शिवाय शुद्ध तांब्याच्या धातूचें नाणें फारसें चांगलें होत नाही. त्यांत काठिन्य फारसें नसल्यामुळे तें लवकर झिजतें; आणि या धातूला एक प्रकारचा वास मारतो व त्याची बाधा हातालाही होते. तसेंच, दमट हवेंत राहिली असतां या धातूवर गंज चढतो; त्यामुळे ती विद्रुप होऊन विषारी होते. एवढ्याकरताच हिंदुस्थान सरकारने तांब्याच्या ऐवजी ब्रॉंझ धातूची नाणीं हिंदुस्थानांत सुरू करण्याचें आता ठरविलें आहे. ह्या नाण्यांचें

वजनही शेंकडा २५ प्रमाणें कमी केलें आहे. म्हणजे इतःपर दिडकी १०० ग्रेनांची नसून ७५ ग्रेनांची असणार. ह्या प्रमाणानेच बाकीच्या नाण्यांचीं वजनें असतील.

## हिंदुस्थानांतील तांब्याचें नाणें

हिंदुस्थानांत तांब्याचें किरकोळ नाणें फार वर्षांपासून चालत आहे. माजी राज्यांतील शिवराई, ढबू नांवाच्या नाण्यांनंतर ब्रिटिश अमलाखालीं दिडकी, दोन दिडक्या, पै, सापिका, ह्या नांवांचीं नाणीं इ. स. १८३५ पासून टांकसाळींत पडूं लागलीं. १८३५ पासून सन १९०३ । ०४ पर्यंत एकंदर तांब्याचें नाणें पडलें त्याचा तपशील येणेंप्रमाणेः--

| | वजन टन | रुपयांत मुख किंमत | नाण्यांची संख्या |
|---|---|---|---|
| अर्धा आणा | २८८४ | ७०६४३९० | २२६०६०४८० |
| पाव आणा | २१४१५ | ५२४६८५०५ | ३३५७९८४३२० |
| अर्धा पैसा | ९४७ | २३२०५५२ | २९७०३०६५६ |
| पै | १२६० | ३०८९१३८ | ५९३११४४९६ |
| | २६५०६ | ६४९४२५८५ | ४४७४१८९९५२ |

ह्या देशांत वरील नाण्यांशिवाय शिवराई, ढबू आजपर्यंत चालत होते. देशी संस्थानांतील तांब्याचीं नाणीं निराळीं पाडलीं जातातच. ह्यामुळे दरमाणशीं तांब्याच्या नाण्याचें प्रमाण बिनचुक काढणें कठीण आहे. तथापि वरील किंमतीचीं नाणीं ब्रिटिश मुलखांतील लोकांनीच वापरलीं असें मानलें तर प्रत्येक माणूस साडेचार आणे किंमतीचें तांब्याचें नाणें वापरतो असें दिसून येईल. इंग्लंडपेक्षा हें प्रमाण निम्में कमी आहे.

तांब्याच्या ऐवजीं ज्या कित्येक दुसऱ्या धातूंचा उपयोग अल्प किंमतीच्या नाण्यांकडे आजपर्यंत केला आहे त्या धातूंचा आतां विचार करूं.

## बिलन अथवा हीण धातूचीं नाणीं

पया, सापिके, दिडक्या, जर रुप्याच्या धातूच्या केल्या तर त्या फारच

सूक्ष्म व हलक्या होतील. धातुगत किंमत व नाण्याची किंमत जर सारखी ठेविली तर एक दिडकी सुमारें २।।। ग्रेन वजनाची भरेल व धातुगत किंमतीहून नाण्याची किंमत हल्लींच्या प्रमाणाने जास्त ठेवली तर मग एक ग्रेनाहून अधिक वजनाची दिडकी पाडतां येणें शक्य नाही. अर्थात् इतक्या कमी वजनाचें नाणें वापरण्याच्या उपयोगीं नाही. २२।। ग्रेन वजनाचें हल्ली जें चवलीचें नाणें आहे, तेंसुद्धा वापरण्यास फार लहान होतें अशी ओरड आहे. म्हणून हिंदुस्थानांत व यूरोपखंडांतील पुष्कळ देशांत किरकोळ देवघेवीचीं नाणीं रुपें व तांबें ह्या दोन धातूंच्या मिश्रणाचीं पाडलीं आहेत. फ्रान्समध्ये एकदा असलीं नाणीं चालत असत. त्यांत १ भाग रुपें व ५ भाग हलकी धातू असें प्रमाण असे; पण तेथे पुष्कळ दिवसांपूर्वीच हीं नाणीं बंद केलीं. नॉर्वे देशांत हीं नाणीं चालू आहेत; त्यांचें प्रमाण १ भाग रुपें व तीन भाग तांबें असें आहे. ह्या देशांत दिल्लीचे पठाणराजे, महमद तघलख, बाबर, हुमायून, पृथ्वीराज, अनंगपाल, पीपल, महीपाल इत्यादि मुसलमान व हिंदू राजांनी ह्या धातूचीं नाणीं पाडलीं होतीं.

जर्मनी देशांत ह्या नाण्यांचा प्रसार फार मोठा आहे. एक भाग रुप्यांत त्याच्या तिपटीने चौपटीने अथवा ह्याहूनही अधिक पटीने तांबें मिसळून हीं नाणीं पाडतात. हीं नाणीं पाडतांना त्यांच्या पृष्ठभागावर तांब्याचा रंग दिसणार नाही अशी खबरदारी घेतात. त्यामुळे त्यांस रुपेरी झांक मारून तीं तेजस्वी दिसतात; परंतु ही झांक फार दिवस टिकत नाही व लवकरच तीं मलिन दिसावयास लागतात. ह्या धातूस एक प्रकारचा कीटही फार जलद चढतो. शिवाय असलीं नाणीं बनावट पाडणें फार सोईस्कर असतें. ह्या व इतर कारणांकरिता ह्या मिश्र धातूंचीं नाणीं पाडण्यास कोणी धजत नाही.

## संयुक्त नाणीं

फ्रान्सचा राजा सेंट लुई याला शिपायांस देण्याकरिता सुर्याची मोठी अडचण पडल्यामुळे त्याने एक चमत्कारिक रीतीचें नाणें तयार केलें. शिक्का

मारलेल्या चामड्याच्या तुकड्यांत नऊ व अठरा ग्रेन वजनाचे रुप्याच्या तारेचे तुकडे बसवून नाणेंवजा त्यांची सुरवात केली. रुप्यामुळे त्याला किंमत आली व चामड्यामुळे आंतील रुपयाच्या लहान तारेला एक प्रकारचें संरक्षण मिळालें. अशाच नमुन्यावर अलीकडे सभोंवार तांब्याची कडा व मध्यबिंदु रुप्याचा अशीं नाणीं कांही ठिकाणीं पाडलीं होतीं. हें नाणें दिसण्यांत सुबक दिसून आकारही सोईस्कर असतो; तथापि याचा प्रसार होण्यास बऱ्याच हरकती आहेत. असलीं नाणीं पाडण्याला खर्च फार येतो. शिवाय रुप्याचा मध्यभाग नाण्याच्या इतर भागापासून कधींहि विलग होणार नाही, इतक्या उत्कृष्ट तऱ्हेचें नाणें पाडणें कठीण असतें. त्याचप्रमाणे विजातीय धातूंचा संयोग झाला असतां रासायनिक क्रिया सुरू होण्याचा संभव असतो, व सर्वांहून मोठी अडचण ही की, असल्या प्रकारचीं बनावट नाणीं ओळखून काढणें अशक्य असतें. इ. सन १८१० चे सुमारास पहिल्या नेपोलियनने अशा मासल्याचीं नाणीं काढलीं होतीं; परंतु त्यांचा व्यवहारांत कधी प्रसार झाला नाही. मध्ये तांबें व भोंवताली पितळ असलीं नाणीं इंग्लंडांत कांही वेळ चालत होतीं. त्याचप्रमाणे कथील व तांबें या दोन धातूंचीं पाडलेलीं नाणीं पुष्कळ दिवस उपयोगांत होतीं व अद्यापिही तीं नाण्यांच्या संग्रहालयांत पहावयास सांपडतात. हिंदुस्थानांत असलीं नाणीं पाडल्याचा दाखला कोठे आढळत नाही.

## ब्रॉन्झ धातूंचीं नाणीं

कथिलाच्या अल्पशा मिश्रणाने तांब्याला कठिणपणा येतो ही गोष्ट फार प्राचीन काळींही लोकांला माहीत होती. हें या दोन धातूंच्या मिश्रणाचा उपयोग जो फार दिवसांपूर्वी केलेला दिसतो त्यावरून उघड होतें. सीथियन लोकांचा राजा दुसरा कॅड्फिसिझ याने या धातूंचीं नाणीं पाडलीं होतीं. ऱ्या देशांतहि या धातूंचीं पुष्कळ नाणीं हल्लीं उपलब्ध आहेत. आमच्या पाहाण्यांत जीं कांही नाणीं आलीं तीं सुमारें ४८ ते ५० ग्रेन वजनाचीं

असून ७ ते ९ इंच घेराचीं होतीं. एका अरेबियन इतिहासकाराने आपले इतिहासांत खाली लिहिलेप्रमाणे गोष्ट लिहिली आहे. ईजिप्तच्या अधिकाऱ्यांनी खलीफ वल्लद याच्याकडे जाऊन त्याची अशी प्रार्थना केली की, महाराज आपल्या ह्या अलेक्झँड्रिया शहरांत ब्रॉन्झ धातूच्या देवाच्या मूर्ती विपुल असून किरकोळ नाण्याच्या दुर्मिळतेमुळे आमचे हाल होत आहेत. त्याबरोबर त्या शहरांतील मूर्ति फोडून त्यांचीं नाणीं पाडण्याचा सरकारी ठराव झाला. याप्रमाणे जुने पुतळे नाण्याकरितां वितळले गेले. फ्रान्सच्या राज्यक्रांतिकारांनी अशीच युक्ति लढविली होती. त्यांच्या हातीं लागलेल्या देवालयाच्या घंटा वितळवून त्यांचीं त्यांनी नाणीं पाडिलीं. हीं नाणीं शुद्ध तांब्याच्या नाण्याहून चांगलीं असत, असें असूनही चमत्कार हा की, सन १८५२ पर्यंत या धातूचीं लहान लहान नाणीं पाडण्याचें कोणाच्या ध्यानांत आलें नाही. इ. स. १८५२ सालीं फ्रान्सच्या राजाने हीं नाणीं पाडण्याचा पुन्हा क्रम सुरू केला व त्याचा तो प्रयत्न चांगला सफल झाल्याचेंहि दिसलें.

ब्रॉन्झ धातूमध्ये ९५ भाग तांबें, ४ भाग कथील व १ भाग जस्त असतें. शुद्ध तांब्यापेक्षा हें मिश्रण कठिण होतें. तथापि याच्यावर ठसा चांगल्या तऱ्हेने उमटतो व पुष्कळ दिवस टिकतो. यांत्रिक शक्तीसारख्या शक्तीचा उपयोग केल्याशिवाय या धातूची नाणीं पाडतां येत नाहींत व म्हणूनच या धातूचीं बनावट नाणीं पाडणें दुर्घट असतें. हवेने किंवा दमटपणाने तीं विकृत होत नाहीत. उलट त्यांच्यावर जी एक प्रकारची काळी झांक मारते त्यामुळे तर झिजत चाललेला शिक्का विशेषच खुलतो.

अलीकडे इंग्लंड, अमेरिका, इटली व स्वीडन या देशांत ब्रान्झ धातूचीं नाणीं पाडूं लागले आहेत आणि हिंदुस्थानांतहि असलीं नाणीं पाडण्याचें ठरलें आहे. तांब्याचे ठिकाणीं या धातूचा सर्वत्र उपयोग होईल असें चिन्ह दिसूं लागलें आहे. हल्ली जर्मन सरकारही या धातूचा उपयोग करीत आहे.

## इंग्लिश ब्रॉन्झ नाणीं

सन १८६१ सालच्या सुमारास प्रथमतः ग्रेट ब्रिटनमध्ये या जातीचीं नाणीं सुरू झालीं. ह्यांनाच पेन्स, हाफ् पेन्स व फार्दिंग हीं नांवें आहेत. फ्रान्स देशांतील सँतीम नांवाचीं नाणीं पाडतांना ज्या प्रमाणानें निरनिराळ्या धातूंचें मिश्रण केलें जातें तेंच प्रमाण कायम राखून इंग्लंडमध्ये पेन्स वगैरे नाणीं पाडलीं जातात. इंग्लिश नाण्यांमध्ये फ्रेंच नाण्याइतका सुबकपणा दिसत नाही. तरी पण तीं स्वच्छ असून लवकर झिजत नाहींत. या नाण्यांचा आकार व वजन अद्यापि कमी करतां येण्यासारखें आहे. इतर देशांपेक्षा इंग्लंडमध्ये लहान नाण्यांचा वापर फार कमी असतो ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये दर माणशीं साडेआठ पेन्स ( साडे आठ आणे ) पुरतात; परंतु फ्रान्समध्ये दर माणशीं सरासरीच्या मानानें पाहतां एक फ्रँक आणि साठ सँतीम म्हणजे पंधरा आणे लागतात. बेलजि .म आणि इटली या दोन देशांत अनुक्रमें साडेएकवीस व साडेएकुणतीस आणे दरमाणशीं लागतात. हिंदुस्थानांतील प्रमाण मागें दिलेंच आहे.

## निरनिराळ्या चलनांचीं वजनें

निरनिराळ्या चलनांचीं वजनें त्यांच्या मुख्य किंमतीच्या विरुद्ध प्रमाणानें असतात ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आपल्या इकडील वापरांत असलेलीं निरनिराळीं चलनें घेतलीं तर त्यांचीं वजनें अजमासें खाली लिहिल्या प्रमाणानें भरतात :—

| | |
|---|---|
| कागदी | १९ टन |
| रुप्याचें[१] | ५७१९ टन |

[१] इ. स. सन १८३५ पासून इ० सन १९०४ पर्यंत हिंदुस्थानांत निरनिराळ्या जातींचें रुप्याचें नाणें खाली लिहिल्या किंमतींचें पडलें.

| | |
|---|---|
| तांब्याचें | २६५०६ टन |
| | ३२२६४ |

अगदी हलक्या किंमतीचें नाणें वजनांत सर्वांत जास्ती कां भरावें याचें समाधानकारक उत्तर देणें अशक्य आहे. परंतु याचा परिणाम असा होतो की, किरकोळ विक्री करणाऱ्या दुकानदाराच्या हातांत, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रकार, ट्रॅम्वे कंपनी यांच्याजवळ पुष्कळ खुर्दा सांचून रहातो. एके वेळीं लंडन येथील कलालाजवळ ब्रान्झ धातूचें इतकें नाणें सांचलें होतें की, अखेरीस तेथील टांकसाळींत तें नाणें विकत घेण्याची व्यवस्था करणें सरकारास भाग पडलें. मोठमोठ्या शहरांतून त्रास न पडतां व नुकसान न होतां सांचलेल्या खुर्द्यांचा निकाल लावण्याकरिता स्वतंत्र व्यवस्था केलेली असते. कांही ठिकाणीं दर आठवड्यास गिरण्या व इतर कारखाने यांच्या मालकाकडे हा खुर्दा पाठविण्यांत येतो व तेथे त्या खुर्द्यांने कारखानदार आपल्या मजूरदारांना मजुरी देतात. मुंबई, कलकत्ता वगैरे व्यापाराच्या शहरांतून रेल्वे कंपन्या व कस्टम आफिसें यांत जमलेला खुर्दा सरकारी बँकेंत पाठविण्यांत येतो व या शहरांतील पुष्कळ गिरणीवाले सरकारी तिजोरींतून आपल्या मजूरदारांसाठी खुर्दा घेऊन जातात. कारण कोठच्याही सरकारी तिजोरींत रुपये

---

[मागील पृष्ठावरून]

| रु. | अर्धरुपये | पावल्या |
|---|---|---|
| ३८८०४१०७३४ | ६८०२७०२० | ७७७०८२२१ |

| चवल्या | एकूण |
|---|---|
| ५८८४४६४० | ४०८४९९०६१५ |

हें सर्व नाणें वापरांत नसून ह्यापैकीं सुमारें ५० कोटी वापरांत असावें असा अजमास आहे. बाकीचीं नाणीं अर्थात् वितळलीं गेलीं असलीं पाहिजेत. प्रत्यक्ष व्यवहारांत असलेल्या नाण्यांच्या संख्येचा अजमास निरनिराळ्या माणसांनी निरनिराळा केला आहे; परंतु त्यापैकीं एकाचाहि मेळ दुसऱ्याशीं बसत नाही.

अगर नोटींच्या ऐवजी कितीही रकमेपर्यंत रुप्याचें अगर तांब्याचें लहान नाणें मिळण्यास कोणासही अडचण पडणार नाही अशी ह्या देशांत सरकारने तजवीज केली आहे. इतर पेढीवाले हजारों रुपयांचा खुर्दा घेण्याचें नाकबूल करतात. त्याचप्रमाणे इतर कोणीही मनुष्य रुपयापेक्षा जास्त किंमतीचा खुर्दा घेण्याचें कबूल करीत नाही. कारण एक रुपयाच्या व्यवहारापर्यंतचेंच तांब्याचें नाणें कायदेशीर फेडीचें चलन आहे. ह्यामुळे व लोकांच्या हातांत परचुटण नाणें सांचून राहूं नये म्हणून सरकारी देण्यांत कितीहि रकमेपर्यंत कोणी हें नाणें आणून दिलें तरी तें अधिकाऱ्यांनी घेतलेंच पाहिजे असा ह्या देशांत सरकारी निर्बंध आहे. हल्ली तांब्याचें नाणें शिल्की पडून रहाण्याने जी गैरसोय होते ती निकल किंवा दुसऱ्या एखाद्या हलक्या व सुरेख अशा मिश्र धातूच्या नाण्याने दूर करतां येईल कीं नाही हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. तांब्यापेक्षा ब्रॉन्झ धातूच्या नाण्याचा वापर जास्त होतो असा फ्रान्स देशांत अनुभव आला आहे; तथापि अजूनहि या धातूचीं नाणीं निर्दोष आहेत असें म्हणतां येत नाही. ज्या मानाने कमी वजनाचें नाणें असेल त्या मानाने त्याचा प्रसार जास्त होतो असा सर्वत्र अनुभव आहे.

## निकल, मँगॅनीज, अल्युमिनिअम आणि इतर शुद्ध व मिश्र धातू

हलक्या किमतीच्या नाण्यांकरितां निकल धातूचा उपयोग करण्यांत येतो याबद्दल मागे उल्लेख केलाच आहे; या धातूचा पुरवठा व खप ज्या स्थित्यंतरावर अवलंबून असतात त्या स्थित्यंतरांत जर फारसा अस्थिरपणा राहिला नाही तर या कामीं दुसरी धातु शोधून काढण्याची अवश्यकता उरणार नाही. निकल धातूंत तांबें मिसळलें असतां त्या मिश्रणाला थोडासा कठीणपणा येतो आणि म्हणून त्याचें नाणें पाडणें जरा कठीण पडतें; तथापि त्यावर शिक्का सुबक रीतीने उठवितां येतो व तो फार दिवसपर्यंत टिकण्यास हरकत नाही असें वाटतें. अशा रीतीने या धातूचें बनावट नाणें

पाडण्याचा फार संभव कमी असतो. या धातूचा जो एक विशेष प्रकारचा रंग असतो त्यामुळे तें नाणें सोन्याच्या अथवा रुप्याच्या नाण्यांतून तेव्हाच ओळखतां येतें; असें जरी आहे तथापि धातुशास्त्राची जी हल्ली प्रगति चालू आहे. ती कायम राहील तर उत्तरोत्तर पुष्कळ नवीन धातू व नवीन मिश्रणें आपणांस परिचित होतील व त्यांपैकी एखादें हलक्या किंमतीच्या नाण्याकरिता उपयोगी पडेल. निकल सध्या फार महाग असल्यामुळे तिच्या ऐवजी विपुल सांपडणाऱ्या व सारख्या गुणाच्या अशा मॅंगॅनीज धातूचा उपयोग करावा असें कित्येकांचें म्हणणें आहे.

पैशाच्या कामीं अल्यूमिनिअम धातु फार उपयोगी आहे म्हणून तिचा उपयोग करण्याविषयी एका साहेबाने आग्रहपूर्वक सूचना केली आहे. नमुन्या दाखल "$\frac{3}{4}$ रिअल १८७२" ह्या शिक्याचीं कांही नाणीं फ्रान्स देशांत पाडलीं आहेत व तीं अद्यापि पॅरिसच्या टांकसाळींत पैशाच्या संग्रहालयांत राखून ठेविलीं आहेत. ह्या धातूचा रंग विशिष्ट तऱ्हेचा निळापांढरा असतो. परंतु या धातूचा विशेष गुण म्हटला म्हणजे तिचें विशिष्टगुरुत्व फार कमी आहे. वर सांगितलेल्या नाण्याचा व्यास $\frac{७९}{१००}$ इंच असून वजन फक्त साडेपंधरा ग्रेन आहे. आपल्या दिडक्या व अर्ध्या दिडक्या इतक्या हलक्या असतील तर त्या आपल्या खिशांत घालून कोठेहि सहज बरोबर नेतां येतील. अशा नव्या धातूचा उपयोग करण्यास मुख्य अडचण ही आहे की, कोणत्या किंमतीने तिचा पुरवठा करतां येईल हें निश्चयात्मक सांगतां येत नाही. तसेंच तिच्या टिकाऊपणाबद्दलहि अद्यापि समजून आलें नाही. नाणें पाडण्याच्या कामीं जर कदाचित् शुद्ध अल्यूमिनिअम धातु निरुपयोगी ठरली तरीसुद्धा तिच्या अनेक मिश्रणांपैकी एखाद्या मिश्रणाचा उपयोग करतां येण्यासारखा आहे. अल्यूमिनिअम व ब्रॉन्झ या मिश्र धातूचीं नमुन्याचीं नाणीं इंग्लंडच्या टांकसाळींत ग्रॅहॅम साहेबांनी पाडून पाहिलीं होतीं.

गंज चढून खराब होणार नाही अशी जर खबरदारी घेतां आली, तर अल्प किंमतीच्या पैशाकरिता पोलादाचा चांगला उपयोग होईल असें वाटतें.

पोलादाचीं नाणीं पाडण्यास कठीण जातील, पण एकदा पाडलीं म्हणजे त्यांच्या काठिण्यामुळे तीं प्रायः अविनाशीच होतील. ही धातु स्वस्त असल्यामुळे हिच्या नाण्यांची धातुगत किंमतहि फार असण्याचा संभव नाही; म्हणून बनावट नाणीं पाडणारांस फायदा होण्याचा संभव नसल्याकारणाने खोटीं नाणीं पाडण्यास कोणी धजणार नाही. निकलधातूच्या मिश्रणाने पोलादाला गंज चढत नाही असा कित्येकांचा अभिप्राय आहे व तो जर बरोबर असेल तर हें मिश्रण घेऊन यत्न करणें अगदी गैरवाजवी होणार नाही. रुपें, पोलाद आणि लोखंड यांच्या मिश्रणाने बनलेली धातु नाण्याच्या कामीं उपयोगी पडण्यासारखी आहे. रुपें, तांबें आणि जस्त यांच्या मिश्रणाचीं नाणीं स्वित्झर्लंड देशांत पाडलीं आहेत. या नाण्यांचा परिघ बेताचा आहे, पण त्याचा पिंवळटसर पांढरा रंग चांगला दिसत नाही. या मिश्रणाचा अनुभव दुसऱ्या कोणत्या देशाने घेतलेला दिसत नाही; आणि रुपें घातल्याशिवाय तशाच तऱ्हेचा रंग बनविण्यास कांही प्रत्यवाय नसल्यामुळे या मिश्रणांत रुप्याचा उपयोग केवळ व्यर्थ होत आहे.

नाण्यासंबंधी ज्ञान सरकारी टांकसाळींतील थोड्याशा अधिकाऱ्यांमध्ये वसत असल्यामुळे द्रव्यात्मक शास्त्राची प्रगति होण्यास अडचण पडते; शिवाय एखाद्या नवीन जातीचें नाणें पाडून तिचा अनुभव पाहण्याची संधि इतर लोकांस मिळत नाही. हिंदुस्थानासारख्या अफाट देशाच्या चलनाबद्दल अनुभव घेऊन पाहणें बहुतेक अशक्य असतें. ज्या देशाच्या लहान लहान वसाहती व ताब्यांतील संस्थानें सर्वत्र पसरलीं आहेत, अशा देशास नवीन नाण्याचा अनुभव घेण्याची चांगली संधि मिळते. अशा अनुभवाचा बोजा वसाहती किंवा संस्थानांवर पडलाच पाहिजे असा नियम नाही. कारण मातृदेश ऐपतदार असल्याकारणाने कांही वर्षांनी नवीन सुरू केलेलीं नाणीं निरुपयोगी ठरल्यास स्वतःच्या खर्चाने तीं त्या देशास सहज परत घेतां येतील.

## भाग बारावा

# मुख्यपरिमाण-वाद

कॅलिफोर्निया आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशांत सोन्याच्या विपुल खाणी सांपडल्याने त्या धातूच्या किंमतींत रुपें व इतर पदार्थांच्या मानाने चलविचल होऊं लागल्या दिवसापासून मोलाचें मुख्य परिमाण कोणत्या धातूचें असावें याजबद्दल आजतागाईत सारखा वाद चालू आहे. आता बहुतेक देशांनी सोडून दिलेल्या रूप्यपरिमाणाचे कांही अभिमानी आहेत, कांहींनी सोन्याचा अभिमान धरला आहे व कांहींचा आग्रह दोन्ही धातूंचें परिमाण चालू असावें असा आहे. सन १८४९ पासून युरोपांतील बहुतेक राष्ट्रांनी आपल्या चलनांत फरक केला आहे व कांही राष्ट्रांनी तर एतद्विषयक धोरण वारंवार बदललेलें आहे. सोनें फार स्वस्त होईल असें वाटून हॉलंड देशाने इ. सन १८५० सालीं रुप्याच्या एकात्मक परिमाणाचा अंगीकार केला. अशा रीतीने एका परिमाणांतून दुसऱ्या परिमाणांत जातांना त्या देशास बरेंच नुकसान सोसावें लागलें आहे. शेवटीं इ. सन १८७३ सालीं रुप्याचें नाणें पाडणें बंद करावें लागून दोन वर्षांनी पुढे म्हणजे इ. सन १८७५ सालीं त्या देशाने सोन्याच्या परिमाणाचा अंगीकार केला.

मोलाचें मुख्य परिमाण सोन्याचें किंवा रुप्याचें असावें याविषयीं इंग्लंड देशांत अर्थशास्त्रज्ञांचें कधीहि एकमत झालें नाही. अखेरीस लिव्हरपूल साहेबांनी सोन्याचा पक्ष घेऊन या बाबतींत इंग्लिश राष्ट्राचें धोरण एकदाचें कायम केलें व तेव्हापासून आजपर्यंत यासंबंधी बऱ्याच अंशाने एकवाक्यता झालेली दिसते. जर्मनी, स्कँडिनेव्हिया, बेलजिअम, इटली, आस्ट्रिया वगैरे कित्येक राष्ट्रांनी रुपें टाकून सोन्याच्या परिमाणाचा स्वीकार केला आहे. १८३५ पर्यंत सोन्याचीं नाणीं हिंदुस्थानांत चालत असत व सन १८५२ पर्यंत सरकारहि आपला वसूल सोन्याच्या नाण्यांत घेत असे.

## दोन परिमाणें

युरोपांतील बहुतेक राष्ट्रांनी आपल्या चलनपद्धतींतून रुप्याला अजीबात फांटा दिल्यामुळे फ्रान्स वगैरे पश्चिम युरोपमधील कांही देशांत जेथे रुप्याचें व सोन्याचें अशीं दोन्ही चलनें चालतात अशा ठिकाणच्या लोकांत व जेथे अल्प किंमतीचीं रुप्याचीं नाणीं असून मुख्य परिमाण फक्त रुप्याचेंच आहे अशा ठिकाणच्या एकपरिमाणाभिमानी लोकांत सांप्रत मोठा वाद माजून राहिला आहे. सोन्याचें व रुप्याचें अशीं दोन मुख्य परिमाणें असल्यास हानिपूरक क्रियेच्यायोगानें कोणाचेंही नुकसान होत नाहीं हें फ्रेंच अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें तत्वतः खरें आहे. उलटपक्षीं इंग्लिश ग्रंथकारांची तक्रार अशी आहे, की, ह्या द्विपरिमाणपद्धतीच्यायोगानें दोन्ही धातूंच्या किंमतींत जी अत्यंत चलबिचल होते ती सगळी सोसावी लागते. फ्रान्स देशांत या दोन धातूंच्या चलनाचा भाव कायद्यानें कायम केला आहे. म्हणजे रुपयाच्या साडेपंधरा पटीनें सोन्याची किंमत ठरली आहे. आता कायद्यानें ठरलेली किंमत आणि बाजारभावाची किंमत नेहमी सारखी असणें शक्य नाहीं व कोणत्याही धातूच्या चलनांत वाटेल तितक्या रकमेपर्यंत फेड करण्याची कायद्यानें सवलत ठेविल्यामुळे ज्या धातूच्या नाण्याची किंमत बाजारभावानें कमी असेल त्याच नाण्याचा वापर सर्व व्यवहारामध्ये होण्याचा संभव असतो व असें झालें म्हणजे तत्वतः दोन परिमाणें असतां वस्तुतः पहातां एकच परिमाण आहे असें म्हणावें लागतें. अशा रीतीनें एकदा सोनें तर एकदा रुपें यापैकी कोणत्या तरी एका धातूचेंच चलन कायम रहातें. कित्येक वेळां तर असें होतें कीं बाजारभावाहून ज्या नाण्यांची किंमत कमी असेल तीं नाणीं वितळविण्यांत येतात किंवा परदेशीं पाठविण्यांत येतात व उण्या किंमतीचीं नाणीं फक्त देशांत राहतात. म्हणून या पद्धतीनें नुकसान असून नफा मात्र कांही नाहीं.

इंग्लिश ग्रंथकारांच्या या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे हें कबूल केलें पाहिजे. तथापि दोन्ही धातूंच्या किंमतींत जी अत्यंत चलबिचल होते तदनुसार पदार्थांच्या किंमती बदलल्याच पाहिजेत, ही जी कित्येक ग्रंथकारांची समजूत आहे ती बरोबर दिसत नाही. एकाला साडेपंधरा हें जें दोन धातूंच्या किंमतींचें कायदेशीर प्रमाण ठरलें आहे, त्याखाली ज्या धातूची किंमत जाईल त्याच धातूच्या किंमतींतील फरकाप्रमाणे पदार्थांच्या किंमतींत फरक पडतो. इंग्लिश ग्रंथकारांची एवढीच चुकी आहे असें नाही. फ्रान्स देशांतील चलनी कायद्यामुळे हानिपूरक अथवा समतावह क्रिया चालू होऊन सोन्यारुप्याच्या किंमतींत कायद्याच्या अभावीं जितका फरक पडला असता तितका पडत नाही हें फ्रेंच ग्रंथकारांचें म्हणणें पुष्कळ अंशाने खरें आहे. कायदेशीर किंमतीहून सोन्यांत मोजावयाची रुप्याची किंमत जर वाढली तर कोणत्याही द्विधात्वात्मक परिमाणाच्या देशांत सोनें जास्त येऊं लागेल. ह्या सोन्याचीं तेथे नाणीं पाडलीं जाऊन त्यांनी कायदेशीर भावाने रुप्याचीं नाणीं विकत घेऊन तीं परदेशांत पाठविण्यांत येतील. हें नुसतें तात्त्विक दृष्टीनेच खरें दिसतें असें नाही; फ्रान्स देशांत हा प्रकार प्रत्यक्ष घडला आहे. सन १८४९ मध्ये मुख्य चलन जें रुप्याचें होतें तें १८६० सालीं बहुतेक सोन्याचें झालें. स्वस्त किंमतीची धातु त्या देशांत भराभर येऊं लागली व महाग असलेली धातु झपाट्याने देशाबाहेर जाऊं लागली. याचा परिणाम अर्थात् असा झाला की, सोन्याचा भाव उतरत जाण्याला व रुप्याचा चढण्याला प्रतिबंध झाला. एकाच धातूचें परिमाण असतें तर सोनें स्वस्त होऊन रुपें महाग झालें असतें. रुप्याच्या मानाने सोनें जर वाढलें तर ह्याच्या उलट क्रिया होईल हें निराळें सांगावयला नको. अशा वेळीं देशांत सोन्याची भरती होऊन रुप्याची ओहोटी लागेल. कोणत्याही वेळीं मोलाचें परिमाण निःसंशय कोणत्या तरी एकाच धातूंत असणार; तथापि एका धातूच्या ऐवजी दुसऱ्या धातूचा सारखाच उपयोग होत असल्यामुळे कोणत्याही धातूच्या किंमतींत मनस्वी फरक पडत नाही. इतर

पदार्थांच्या संबंधाने या दोन धातूंच्या किंमतींत कमजास्तपणा होऊं न देण्याचें सामर्थ्य ह्या द्विपरिमाणात्मक चलनपद्धतींत नाही हें खरें; परंतु ह्या पद्धतींत एकच धातूचें परिमाण असतां जो प्रकार झाला असता त्यापेक्षा पुरवठा आणि खप यांमधील स्थित्यंतरांना बराच व्यापक प्रदेश मिळतो. याचा अर्थ असा की, एका धातूचेंच जर परिमाण देशांत असेल तर त्या धातूचा खप किंवा पुरवठा ह्यांत ज्या मानाने कमजास्तपणा होईल त्या मानाने इतर सर्व पदार्थांच्या किंमतींत कमजास्तपणा होणार. परंतु दुसरी धातु साहाय्यकारी असते तेथे हें स्थित्यंतर कधीही अमर्यादित होत नाही.

अशी कल्पना करा, पाण्याचे दोन हौद आहेत व दोहोंचाही पुरवठा व खप होण्याचीं साधनें अगदी स्वतंत्र आहेत. ह्या दोन हौदांना जोडणारी एक नळी नसेल तर प्रत्येक हौदांतील पाण्याचा सांठा त्या हौदाच्याच खप व पुरवठा ह्यांवर अवलंबून असणार. परंतु एका नळीने जर दोन हौदांचा संबंध जडविला तर दोन्ही हौदांतील पाणी कांही नियमित प्रमाणाने कायम राहील. एका हौदाच्या पाण्याच्या खपांत किंवा पुरवठ्यांत कांही कारणाने केव्हा कितीही फरक पडला तरी त्याचा त्याच हौदावर सर्व बोजा न पडतां दोन्ही हौदांवर सारखा वांटून जाईल. असाच प्रकार दोन निरनिराळ्या धातूंचीं परिमाणें ज्या देशांत असतात तेथे घडून येतो.

## नाणें पाडण्याच्या कामीं रुप्याच्या धातूची बंदी

वूलोस्की नांवाच्या फ्रेंच ग्रंथकाराने द्विधातुपरिमाणाचा कायदा झुगारून देऊन नाण्याच्या कामीं रुपें न वापरण्याची यूरोपांतील राष्ट्रांची प्रवृत्ति दिसून येते ती अनिष्ट आहे, म्हणून मोठ्या काकुळतेने सूचना केली आहे. जर्मनीने सोन्याच्या परिमाणाचा अंगीकार करून रुपें नाण्याच्या कामांतून मोकळें केलें, त्यामुळे पुष्कळ रुपें बाजारांत येऊन रुप्याचा भाव उतरण्यास मदत झाली आहे व सोन्याचा खप जास्त होऊं लागल्यामुळे ती धातु महाग होत चालली आहे. हॉलंड, ऑस्ट्रिया वगैरे इतर युरोपियन राष्ट्रांनी

जर्मनीचेंच अनुकरण केलें आहे व रुप्याचें नवीन नाणें पाडण्याचें तर बहुतेक सर्व युरोपियन राष्ट्रांतून कायद्यानें बंद झालें आहे. उदाहरणार्थ, फ्रान्स, बेलजियम, रशिया, इटली या देशांत जुन्या रुप्याच्या नाण्यांत वाटेल तितक्या रकमेपर्यंत ठरीव भावानें फेड करण्यास सवलत आहे; तथापि रुप्याचीं नवीन नाणीं पाडण्याचें कायद्यानें बंद केलें आहे. इतर खंडांतील व युरोपांतीलही दुसऱ्या सर्व राष्ट्रांनी रुप्याचीं नाणीं न वापरण्याचा निश्चय केला तर रुपें अगदी कवडीमोल होऊन सोनें फार महाग होईल हें उघड आहे. फ्रान्स, इटली आणि बेलजियम या द्विधातुपरिमाणाभिमानी राष्ट्रांनी दोन्ही धातूंचीं नाणीं आपआपल्या टांकसाळींतून पाडण्याचा क्रम ठेवल्यास रुप्याला कांहीतरी तेजी येऊन दोन धातूंच्या भावांतील अंतर कांही अंशानें कमी होईल. ही समतावह किंवा हानिपूरक क्रिया बंद पाडून नाण्याच्या कामांतून रुपें हद्दपार केल्यास जिकडे तिकडे एकच सोन्याचें परिमाण झाल्यामुळे सोन्याचा भाव अतिशय वाढेल व त्यामुळे खासगी किंवा सार्वजनिक कर्जाचा बोजाहि विनाकारण वाढणार आहे असें वूलोस्कीचें म्हणणें आहे.

वूलोस्कीचें भविष्य आजमितीस बऱ्याच अंशानें खरें झालें आहे. एक औंस रुप्याला एके वेळीं ६२½ पेन्स किंमत पडत होती, तीच आता तीस पेन्सापर्यंत आली आहे. जपानानें सोन्याचें नाणें सुरू केलें आहे. हिंदुस्थानच्या टांकसाळींत सरकाराशिवाय इतरांस रुपये पाडून देण्याचें बंद झालें असून सरकारच्या हेतूप्रमाणे लवकरच सोन्याचें नाणें सुरू होईल असा अदमास दिसतो. जपानच्या सहवासानें चिनी राष्ट्रांत जर जागृति उत्पन्न झाली तर तें राष्ट्रही सोन्याचें नाणें पत्करण्यास मागे पुढे पहाणार नाही व असें झालें म्हणजे अमेरिकेलाहि आपला आग्रह सोडून इतरांच्या पाटोपाठ जावें लागेल. अशा स्थितींत रुप्याचा भाव किती उतरेल याची कल्पनाही करणें शक्य नाही. असें जरी आहे तरी या बाबतींत कोणतेंही निश्चयात्मक मत प्रतिपादणें जरा धाडसाचेंच आहे.

सोन्याच्या नाण्याची अवश्यकता मानणें हें राष्ट्राच्या सांपत्तिक उन्नतीचें द्योतक आहे. जगांतील सर्व राष्ट्रें एकसमयावच्छेदेंकरून भरभराटीस येतील असें मानण्यास इतिहासांत प्रमाण मिळत नाही. त्यामुळे रुप्याचें नाणें टाकून सोन्याचें नाणें वापरण्यास ज्याप्रमाणे कित्येक राष्ट्रें प्रवृत्त होतील त्याचप्रमाणे सोन्याचें नाणें वापरीत असलेल्या कित्येक राष्ट्रांना हीन स्थितीमुळे रुप्याच्या नाण्यांकडे वळणें भाग पडेल, याचें हिंदुस्थान हें ढळढळीत उदाहरण आहे. ह्या देशांत पूर्वी सर्वत्र सोन्याचीं नाणीं चालत असून तींच नाणीं गैरसोईचीं व म्हणून अनुपयुक्त वाटूं लागलीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्याचप्रमाणे नाण्यांतून मुक्त झालेल्या रुप्याचा उपयोग सुसंपन्न राष्ट्रांत अन्य कार्यांकडे होण्याचाही संभव असल्यामुळे ह्या धातूचा भाव अगदींच खालावेल असें वाटत नाही. आता सोन्याचा खप वाढल्यामुळे ती धातु अत्यंत महाग झाली पाहिजे असेंच केवळ म्हणतां येणार नाही. सोन्याच्या धातूच्या परिमाणाचा स्वीकार केल्याने सोन्याचीं नाणीं पुष्कळ प्रमाणाने पाडावीं लागतील असा नियम नाही. स्कॅंडिनेव्हिया, हॉलंड, जावा, कॅनडा या देशांत सोन्याचें परिमाण मान्य असून त्या धातूचें चलन मुळीच नाही; तसेंच हुंड्यांचा व खात्यावरील व्यवहाराचा ज्या मानाने देशांत फैलाव जास्त होईल त्या मानाने नाण्यांचा वापर देशामध्ये अर्थातच कमी झाला पाहिजे. शिवाय जगांत निरनिराळ्या ठिकाणीं नवीन नवीन सोन्याच्या खाणींचा शोध लागत असल्यामुळे सोन्याच्या हल्लीच्या पुरवठ्यांत उत्तरोत्तर भर पडत जाईल असें मानणें अगदी अयुक्तिक होणार नाही.

सारांश, सोनें व रुपें या दोन मूल्यवान् धातूंचा खप व पुरवठा इतक्या निरनिराळ्या स्थित्यंतरांवर अवलंबून आहे की त्या सर्व स्थित्यंतरांचा आज विचार करून त्यावरून कोणतेंही दृढ अनुमान काढणें प्रायः अशक्य आहे. आजमितीस रुप्याचा जो भाव आहे तो आणखी उतरेलच असा नियम नाही. स्वस्त झालेल्या रुप्याचा उपयोग भांड्यांकडे अथवा दागिने

करण्याकडे लोकांची प्रवृत्ति होणें अगदी साहजिक आहे व तसें झालें असतां त्या धातूला पुनः तेजी येऊन उतरत उतरत जाणाऱ्या भावाला प्रतिबंध झाल्याशिवाय राहणार नाही. त्याचप्रमाणे सोन्याचा भाव उतरेल तर हल्ली ज्या खाणींमधून थोड्याशा फायद्याने ही धातु काढतां येते त्या खाणींचें काम बंद पडेल, म्हणजे याचा अर्थ असा की, खप कमी झाल्याबरोबर पुरवठाही कमी झाल्याशिवाय राहणार नाही व त्यामुळे या धातूचा भाव अगदी कनिष्ठ स्थितीस पोहोंचणें शक्य नाही. सोन्याच्या नवीन खाणी सापडल्यामुळे वाढत जाणाऱ्या सोन्याच्या भावाला बराच अडथळा झाला आहे. तात्पर्य, वर सांगितल्याप्रमाणे लोकांच्या चालीरीती, राज्यचालकांचे कायदे, धातूंची दुर्मिळता इत्यादि अनेक कारणांवर या दोन धातूंचा भाव अवलंबून असल्यामुळे याविषयी कोणताही निश्चित सिद्धांत प्रतिपादन करणें फार धोक्याचें आहे.

## द्विधातुपरिमाणापासून होणारें नुकसान

द्विधातुपरिमाणपद्धति कायम ठेवण्याची अवश्यकता आहे किंवा नाही याचा निर्णय कल्पनेनेच करण्यासारखा असून त्या पद्धतीपासून निष्पन्न होणाऱ्या गैरसोयी मात्र निःसंशय भासमान होत आहेत. फ्रान्स देशांत जोंपर्यंत जुन्या रुप्याच्या जड नाण्याऐवजीं नेपोलियन वगैरे सोन्याचीं नवीन सुंदर नाणीं या पद्धतीने प्रचारांत होतीं तोंपर्यंत लोकांची कोणत्याहि प्रकारची तक्रार नव्हती व ही समतावह पद्धतीची क्रिया त्यांस मोठी वर्णनीय वाटूं लागली. परंतु जेव्हा कांही वर्षांनी पुढे सोन्याचीं नाणीं परदेशांत जाऊं लागून रुप्याचें जड नाणें वापरण्याचा प्रसंग आला, तेव्हा लोकांच्या विचारांत फरक पडूं लागला. फ्रेंच लोकांना सोनें वापरण्याची संवय लागल्यामुळे साडेपंधरा पटीने जड व बोजड असें चलन पुनः वापरण्याची त्यांस कधीही इच्छा न होणें साहजिक आहे. शिवाय या चलनांतराच्या योगाने उण्या किंमतीच्या धातूंत ज्यांना आपल्या कर्जाची फेड करून द्यावी लागते, त्यांना नुकसान सोसावें लागतें व पेढीवाले, सराफ, दलाल

वगैरे लोकांना अशा व्यापारावर आपला फायदा करून घेण्यास संधि मिळते. इतर राष्ट्रें आपल्या पद्धतीचा अंगीकार करीत नाहीत ही गोष्ट आता द्विधातुपरिमाणाभिमानी राष्ट्रांच्या मनांत येऊन चुकली आहे. एखाद्या राष्ट्रानेच ह्या पद्धतीचा स्वीकार केला असतां सोन्यारुप्याच्या किंमतीच्या वाढत्या स्थैर्याचा फायदा इतर राष्ट्रांस मिळून या पद्धतीपासून निष्पन्न होणाऱ्या गैरसोयी व द्रव्यव्यय तेवढ्याच राष्ट्रास मात्र सोसावा लागेल. जगाच्या हिताकरिता इतका स्वार्थत्याग करण्याचा हेतु सर्व राष्ट्रांनी ह्या चलनपद्धतीचा अंगीकार करावा असें प्रतिपादन करणाऱ्यांचा मुळीच नव्हता आणि म्हणून फ्रान्स आदिकरून लॅटिन राष्ट्रांनी ही द्विधातुपरिमाणपद्धति वस्तुतः सोडून दिल्यासारखीच आहे.

रुप्याची फ्रँक नांवाचीं नाणीं पुष्कळशीं पाडण्याची अवश्यकता वाटूं लागली त्याबरोबर फ्रेंच सरकारने तीं नाणीं पाडण्याचें बंद केलें. पुढे फ्रान्स स्वित्सर्लंड, बेल्जियम आणि इटली या राष्ट्रांत आपआपसांत दर वर्षास आपआपल्या राष्ट्राची गरज भागेल अशा बेताने नियमित नाणीं पाडण्याचा करार होत असे. रुप्याचीं वाटेल तितकीं नाणीं पाडण्याची जी पूर्वी सर्वांस मोकळीक होती तिचा अशा रीतीने प्रतिबंध झाल्यामुळे अर्थातच द्विधातुपरिमाणपद्धतीची क्रिया बंद पाडण्यासारखें झालें. नियमित संख्येचीं रुप्याचीं नाणीं पाडलीं जात असल्यामुळे देशाच्या बाहेर सोनें जाईनासें झालें व "पांच फ्रँकांचें" एक नाणें निरनिराळ्या पांच फ्रँकांच्या नाण्यांहून किंमतीने वाढून नेपोलियन नाण्याच्या ( वीस फ्रँक म्हणजे एक नेपोलियन ) एकचतुर्थांशाहून कमी किंमतीचें झालें. जरी पांच फ्रँकांचीं नाणीं अमर्याद रकमेपर्यंत कायदेशीर फेडीकरता वापरतां येतात, तरी तीं नवीन पाडणें बंद केल्यामुळे उपनाण्यांच्या स्थितीप्रत येऊन पोहोंचलीं आहेत. अशा रीतीने कायद्यामध्ये विशेष फरक न करतां फ्रान्स आदि देशांनी द्विधातुपरिमाणपद्धति वस्तुतः सोडून देऊन इंग्लंड आणि जर्मनी यांच्या भिन्न चलनपद्धतीहून अभिन्न अशीच पद्धति ग्रहण केली.

युरोपच्या पश्चिमेकडील देशाच्या चलनपद्धतींत जसे फेरबदल झाले, तसेच द्विधातुपरिमाण सोडून देण्याच्या पूर्वी अमेरिकेंतही झाले होते, हे लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सन १८५३ पर्यंत सोन्याच्या ईगल वगैरे नाण्यांबरोबर रुप्याचें डॉलर नांवाचें नाणें वाटेल तितक्या रकमेपर्यंत कायदेशीर फेडीचें चलन म्हणून अमेरिकेंत मानलें जात असे. फ्रान्समध्ये एकाला साडेपंधरा हें जें दोन धातूंतील किंमतीचें प्रमाण कायद्यानें ठरलें होतें, तसें अमेरिकेंत नसून एकाला सोळा हा कायदेशीर भाव होता. याप्रमाणे इतर देशांपेक्षा अमेरिकेंत कायदेशीर फेड करण्यास रुपें जास्त लागूं लागल्यामुळे अर्थातच सोनें जास्त वापरण्यांत येऊं लागून रुपें परदेशांत जाऊं लागलें. ही स्थिति बदलण्याकरता १८५३ सालीं अमेरिकन सरकारनें अर्धा डॉलर व दुसरीं रुप्याचीं लहान नाणीं उपनाणीं ठरविलीं आणि रुप्याचे डॉलर पुऱ्या वजनाचे असत तरी ते नवीन पाडण्याचें प्रायः बंद केलें. सन १८७३ च्या एप्रिलच्या पहिल्या तारखेस राष्ट्रीय सभेने केलेला कायदा अमलांत आला व त्यामुळे सोन्याचा डॉलर हाच काय तो किंमतीचें आदिपरिमाण ठरला गेला व पांच डॉलरच्या देवघेवीपर्यंत रुप्याच्या नाण्यांचा कायदेशीर उपयोग होऊं लागला. याप्रमाणे पूर्वी तत्त्वतः अस्तित्वांत असलेली द्विधातुपरिमाणपद्धति अखेरीस संपुष्टांत आली आणि सोन्याचें एकेरी परिमाण स्वीकारणाऱ्या राष्ट्रांत अमेरिकेची गणना होऊं लागली.

## जगाच्या मुख्य देशांतील चलनपद्धति

जगांतील प्रमुख राष्ट्रांच्या चलनपद्धतींत अलीकडे झालेला फेरबदल पाहिला असतां असें दिसतें की, सोनें हेंच मोलाचें परिमाण व मुख्य व एकच विनिमयसामान्य म्हणून स्वीकारण्याकडे सर्वांची प्रवृत्ति होत आहे. इंग्लंड, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, आफ्रिकेंतील वसाहती वगैरे ब्रिटिश अमलाखालील मुलखांत हीच पद्धति सांप्रत प्रचारांत आहे व हिंदुस्थानांतही रुप्याच्या ऐवजी सोन्याचें नाणें चालू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हीच पद्धति एके वेळीं पोर्तुगाल, तुर्कस्थान, ईजिप्त देशांत व चिली

आणि ब्रॅझिलसारख्या कांही दक्षिण अमेरिकेंतील संस्थानांत चालू होती. जर्मन, डेन्मार्क, नॉर्वे व स्वीडन या देशांतही सोन्याचें एकाकी चलन तद्देशीय सरकारने सुरू केलें आहे. जपानचा व्यापार व सर्वसाधारण परिस्थिति सुधारल्याबरोबर वीस, दहा, पांच, दोन आणि एक अर्धो येन नांवाचीं सोन्याचीं नाणीं पाडून सोन्याच्या चलनाचा त्या देशांत अंगीकार केला आहे. जपानांत सेन नांवाचीं रुप्याचीं उपनाणीं आहेत; म्हणजे ह्या नाण्यांत दहा भागांत आठ भाग शुद्ध धातू असते. पन्नास, वीस, दहा आणि पांच सेनांचीं हीं उपनाणीं त्यांनी पाडलीं आहेत. इतर कांही देशांत सेंट नांवाचें नाणें चालतें त्याच किंमतीचें हें जपानी सेन नाणें आहे.

फ्रान्स, इटली, बेल्जियम, स्वित्सर्लंड ह्या देशांत अद्यापि तत्त्वतः द्विधातुपरिमाणपद्धति कायम राखिली गेली आहे. स्पेन, ग्रीस व रोमानिया ह्या राष्ट्रांनीही फ्रेंच पद्धतीचें अनुकरण अलीकडे केलेलें दिसतें. अमेरिकेंत पेरू, इक्वेडर व न्यूग्रिनेड हीं राष्ट्रें द्विधातुपरिमाणपद्धति ग्रहण केल्याचें प्रतिपादीत आहेत.

थोड्या वर्षांपूर्वी व्यापाराच्या सोईकरिता मात्र वारंवार बदलणाऱ्या किंमतीचीं थोडीशीं सोन्याचीं नाणीं वापरणाऱ्या परंतु रुप्याची एकात्मक जुनी चलनपद्धतीच कायम ठेवणाऱ्या राष्ट्रांत युरोपच्या बऱ्याच भागाचा समावेश करतां आला असता. जर्मनी, ऑस्ट्रिया, रशिया, डेन्मार्क, नॉर्वे आणि स्वीडन हीं राष्ट्रें याच वर्गांतील होत. परंतु आजमितीस निवळ रुप्याचीं नाणीं वापरणारें असें ह्यांपैकी एकहि राष्ट्र उरलेलें नाही.

## युनायटेड स्टेट्स

ह्या देशांत मोलाचें मुख्य परिमाण सोनें असून सोन्याचींच नाणीं टांकसाळींत पाडलीं जातात. प्रत्यक्ष प्रचारांत सोन्याचीं नाणीं फारच थोडीं आहेत; परंतु पेढ्यांत आणि खजिन्यांत सोनें शिलक ठेविलेलें असतें.

| | पौंड |
|---|---|
| सन १८७५ साली पेढ्यांतील शिल्लक | ८२२५०४४४ |
| खजिन्यांतील शिल्लक | ४८८५२२९० |
| खजिन्यांतील रुप्याचे डॉलर | ७०९४८०८० |
| वापरण्यांत असलेले रुप्याचे डॉलर | १२,३३४,४०० |

हीं नाणीं किंवा याच्या बदला दिलेले कागदी दाखले १६ : १ या पूर्वीच्या भावाप्रमाणे वापरण्यांत येतात. या देशांत सन १८७५ सालीं एकंदर कागदी चलन एकवीस कोटी पौंड किंमतीचें होतें. रुप्याचीं नाणीं व तिजोरींत शिल्लक असलेल्या रुप्याच्या ऐवजी काढलेलें कागदी चलन ह्यांनी वाटेल तितक्या रकमेपर्यंत कायदेशीर फेड करतां येते. सन १८७८ सालीं या देशांत एक कायदा झाला त्या कायद्याअन्वयें अमेरिकन सरकारला दरसाल २०६००००० औंस रुपें खरेदी करावें लागत असे; परंतु सन १८९० मध्ये पास झालेल्या शर्मन कायद्याप्रमाणे हल्ली ५४००००० औंस रुपें खरेदी करावें लागतें. आजमित्तीस एकंदर चलन खाली लिहिल्याप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| सोन्याचें नाणें | ३९२,०००,००० | ( डॉलर किंमतीचें ) |
| रुप्याचे डॉलर | ४८,०००,००० | ” |
| रुप्याच्या डॉलरांच्या बदला दिलेले दाखले | ३९०,०००,००० | ” |
| सोन्याच्या डॉलरांच्या बदला दिलेले दाखले | १०६१,०००,००० | ” |
| युनायटेड स्टेट्सच्या नोटी | २०४,०००,००० | ” |
| फेडरल रिझर्व्ह नोटी | १७१५,०००,००० | ” |
| फेडरल रिझर्व्ह बँकांच्या नोटी | ४,०००,००० | ” |
| नॅशनल बँकांच्या नोटी | ६५३,०००,००० | ” |

( डॉलर = ३ रुपये )

## कॅनडा

मोलाचें परिमाण सोन्याचें आहे व सोन्याचे डॉलर पाडण्याची जरी कायद्याने सवलत ठेवली आहे तरी या देशाचें असें सोन्याचें नाणें मुळीच नाही व व्यवहारामध्येही सोन्याचें नाणें मुळीच नाही म्हटलें तरी चालेल. या देशांत टांकसाळ नाही. रुप्याच्या उपनाण्यांचा पुरवठा इंग्लंडमधून होतो. चोवीस लक्ष पौंड किंमतीचें सोनें खजिन्यांत शिल्लक ठेवलेलें असतें. पंचवीस सेंटापासून चार डॉलरपर्यंतच्या निरनिराळ्या रकमांच्या नोटी या देशांत चालतात. या नोटी सुमारें सदतीस लक्ष पौंड किंमतीच्या आहेत. पांच डॉलर किंवा त्याहून जास्तपट रकमेच्या नोटी पाडण्याचा अधिकार त्या देशांतील पेढ्यांस दिलेला आहे. ह्या नोटींच्या मोबदला नक्त पैसा अगर सरकारी नोटी मिळूं शकतात. अशा पेढ्यांच्या चालणाऱ्या नोटींची किंमत १८७५ सालीं अजमासे सत्तर लक्ष पौंड होती. एका डॉलरचे ऐंशी सेंट ह्या दराने दहा डॉलर रकमेपर्यंत अमेरिकेंतील रुप्याच्या डॉलरांनी फेड करणें कायदेशीर आहे, अशा अर्थाचा १८७० सालीं सरकारी ठराव प्रसिद्ध झाला असूनही हे अमेरिकेंतील रुप्याचे डॉलर १ : १६ या दराने प्रचारांत चालतात. रुप्याच्या नाण्यांचा मोबदला सोन्याच्या नाण्यांत मिळत नाही. या देशासंबंधाने विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे की, कोणत्याही प्रकारचें सोन्याचें चलन नसून व सोन्याचें नाणें पाडण्याकरता टांकसाळही नसून रुप्याचे डॉलर आणि नोटीही अमेरिकेंतील सोन्याच्या डॉलरांच्या किंमतीने वापरलीं जातात.

## जर्मनी

इ. सन १८७१ सालीं जर्मनीने सोन्याचें परिमाण सुरू केलें तेव्हापासून त्या देशांतील चलनपद्धति बहुतेक इंग्लंड देशांतील चलनपद्धतीप्रमाणेच आहे असें म्हणण्यास हरकत नाही. तेथील टांकसाळींत सोन्याचीं नाणीं पाडतात व रुप्याचीं लहान लहान उपनाणीं ठरीव संख्येपर्यंत पाडलीं जातात.

हीं नाणीं फक्त नियमित रकमेपर्यंत कायदेशीर फेडीचें चलन म्हणून गणलीं गेलीं आहेत. पण इंग्लंडपेक्षा या देशांत फरक हा आहे कीं, दोन कोटी पौंड किंमतीचीं जुनीं रुप्याचीं थेलर नांवाचीं नाणीं अद्यापि प्रचारांत कायम राखलीं आहेत. १ : १५१/२ या भावानें अनियमित रकमेपर्यंत या नाण्यांनी कायदेशीर फेड करतां येते. १८७५ सालीं सोन्याच्या नवीन पाडलेल्या नाण्यांपैकी पेढ्यांत ३४२५०००० पौंड व स्पँडावच्या किल्ल्यांत ६०००००० पौंड शिलकी ठेवले असून प्रचारांत साडेसहा कोटींपासून सात कोटी पर्यंत पौंड असावे असा अजमास आहे. १८७५ सालीं या देशांत एकंदर ६८७४०००० पौंड किंमतीच्या नोटा वापरांत होत्या. आजमितीस जर्मनींत ५१७०,०००,००० राईशमार्क किंमतीच्या नोटी चलनांत आहेत व सोन्याचा रिझर्व्ह १८३१,०००,००० राईशमार्क आहे.

( राईशमार्क = ८ आणे )

## स्वीडन व नॉर्वे

या देशांतील मोलाचें मुख्य परिमाण सन १८७३ पासून सोनेंच आहे. टांकसाळींत सोन्याचीं नाणीं पाडतां येतात असें दिसतें. परंतु वापरांत सोन्याचें नाणें फारच क्वचित् आहे. सोन्यांत ज्याचा मोबदला करतां येतो अशा बँकनोटो सामान्यतः प्रचारांत आहेत. उपनाणीं रुप्याचीं आहेत. १८७५ सालीं पेढयांतून सोन्याचा सांठा सुमारें ५५ लक्ष पौंड होता व नोटी सुमारें १६० लक्ष पौंडांच्या असाव्यात असा अदमास आहे. आजमितीस स्वीडनमध्ये ५६०,०००,००० क्रोनर किंमतीच्या नोटी चलनांत आहेत व नॉर्वेमध्ये ३२५,००० ००० क्रोनर किंमतीच्या नोटी चलनांत आहेत.

## फ्रान्स

सोन्याचीं नाणीं पाडण्यास टांकसाळी खुल्या आहेत. सन १८७८पासून लहान नाणीं खेरीजकरून रुप्याचीं नाणीं पाडण्याचें बंद केलें आहे. प्रत्यक्ष वापरांत सोन्याचीं विपुल नाणीं आहेत. परंतु या देशांतील चलनपद्धतींतील

विशेष तऱ्हा ही आहे की, या देशांत जुनीं, ५ फ्रँकचीं नाणीं पुष्कळ आहेत व १ : १५½ या जुन्या दराने अद्यापि तीं वापरलीं जातात. या नाण्यांनी वाटेल तितक्या रकमेपर्यंत कायदेशीर फेड केली जाते व सोन्याच्याच नाण्यांप्रमाणे लोक तीं बिनदिक्कत वापरतात. कायदेशीर रीतीने याच्या मोबदला सोनें मिळूं शकत नाही.

निरनिराळ्या चलनांचा सांठा या देशांत १८७५ सालीं खाली लिहिल्याप्रमाणे होता.

| | | |
|---|---|---|
| सोनें | १७१०००००० | पौंड किंमतीचें |
| रुपें | १४००००००० | पौंड किंमतीचें |
| नोटी | ११२०००००० | पौंड किंमतीच्या |

आपल्या नोटींच्या मोबदला सोनें अथवा रुपें वाटेल तें द्यावें असा फ्रान्सच्या बँकेला अधिकार आहे. देशाच्या अंतर्गत उपयोगाकरितां ही बँक वाटेल तितकें सोनें देऊं शकते.

रुप्याचीं नाणीं किंवा नोटी त्यांच्या सोन्याच्या किंमतीने चालू ठेवण्यात फारशी अडचण येत नाही. टांकसाळ सोन्याला खुली असून रुप्याला बंद असल्यामुळे वस्तुतः मुख्य परिमाण सोनेंच आहे असें मानलें पाहिजे. त्याचप्रमाणे ज्यांचा मोबदला सोन्याच्या नाण्यांत होत नाही अशीं पुष्कळ रुप्याचीं नाणीं वर सांगितलेल्या कृत्रिम दराने कोणतीही अडचण न पडतां सुरळीत रीतीने वापरलीं जातात. आजमितीस फ्रान्समध्ये ५४,१५६००००००० फ्रँक किंमतीच्या नोटी चलनांत असून सोन्याचा रिझर्व्ह ५५४८,०००,-००० फ्रँक किंमतीचा आहे. फ्रँकची किंमत मात्र पूर्वी दहा आणे होती ती आतां दोन आणे झाली आहे.

## बेलजिअम

सोन्याचीं नाणीं पाडण्यास टांकसाळ खुली आहे. बाकी चलनपद्धति फ्रान्ससारखीच आहे.

निरनिराळ्या चलनांचा संग्रह १८७५ सालीं खाली लिहिल्याप्रमाणे होता:-

सोनें ९००००० पौंड किंमतीचें अथवा त्याहून जास्त.

रुपें ( पांच फ्रँकचीं नाणीं ) ८०००००० पौंड किंमतीचें.

नोटी १५०००००० पौंड किंमतीच्या.

बँकेचे सवडीप्रमाणे नोटीच्या ऐवजी सोनें किंवा रुपें मिळतें. आजमितीस या देशांत ११९६.०००,००० फ्रँक किंमतीच्या नोटी चलनांत आहेत. ( फ्रँक = २ आणे )

## इटली

टांकसाळींत सोन्याचें नाणें पाडण्यास कायद्यानें सवलत ठेवली आहे. बाकी चलनपद्धति फ्रान्स देशाप्रमाणेच आहे.

निरनिराळया चलनांचा सांठा १८७५ सालीं खाली लिहिल्याप्रमाणे होता.

| | |
|---|---|
| सोनें | २३६०००००० पौंड किंमतीचें. |
| रुपें [ पांच फ्रँकाचीं नाणीं ] | ४०००००० पौंड किंमतीचें. |
| नोटी | ५७०००००० पौंड किंमतीच्या. |

प्रत्यक्ष वापरांत धातूचीं नाणीं फारच थोडीं आहेत. नोटांची किंमत मुखकिंमतीहून कमी येते. आजमितीस इटलीमध्ये १७७८१,०००,००० लीरे किंमतीच्या नोटी चलनांत आहेत. व सोन्याचा रिझर्व्ह १६५०,०००,००० लीरे इतका आहे.

## हॉलंड व त्याच्या वसाहती

सन १८४७ पासून १८७१ पर्यंत हॉलंड देशांत व त्याच्या अमलांतील इतर मुलखांत रुप्याचेंच मुख्य परिमाण चालत असे. जर्मनी व उत्तर युरोपांतील इतर देशांत चलनपद्धति बदलल्यामुळे ह्या देशानेही सन १८७१ सालीं रुप्याचें नाणें पाडण्याचें बंद केलें. सोन्याचें मुख्य परिमाण करण्याचें अथवा सोन्याचीं नाणीं पाडण्याचा डच पार्लमेंटने ठराव केला नसल्यामुळे सोन्याचीं किंवा रुप्याचीं कोणत्याच तऱ्हेचीं नाणीं

टांकसाळींत पाडतां येतना. वापरांत रुप्याचीं कांहीं नाणीं असत; परंतु त्यांची किंमत त्या वेळीं रुप्याच्या किंवा सोन्याच्या बाजारभावाप्रमाणे नसून कांहीं तरी असे. सन १८७१ सालापासून १८७५ पर्यंत नाण्यांची टंचाई भासूं लागली. शेवटीं असें झालें की, धातु म्हणून रुप्याची किंमत बाजारांत अगदीं उतरली असूनही ह्या देशांतील रुप्याच्या नाण्यांची किंमत सोन्याच्या मानानें फार चढली. सन १८७५ सालीं सोन्याचेंच मुख्य परिमाण "ठरलें" जाऊन १ः १५ ह्याप्रमाणे सोन्यारुप्यांमधील परस्पर भाव कायम करण्यांत आला. टांकसाळींत सोन्याचीं नाणीं पाडण्याचें ठरवून उपनाणी खेरीजकरून रुप्याचीं नाणीं पाडण्याचें मना केलें. हीच स्थिति अद्यापि कायम आहे. सोन्याचीं बरींच नाणीं टांकसाळींत पाडलीं गेलीं; परंतु त्यांचा अंतर्गत व्यवहारासाठीं उपयोग न करतां तीं तशींच ठेवलीं होतीं. देशांतील व्यवहारासाठीं नावाचीं रुप्याचीं फ्लॉरिन नाणीं व कागदी चलन यांचा उपयोग होत असे. कितीही रकमेपर्यंत हीं कायदेशीर फेडीचींच चलनें असत, परंतु सोन्याच्या भावानें त्यांची जी किंमत होई त्या भावानें तीं वापरलीं जात असत. रुप्याचें नाणें किंवा नोटी देऊन सोन्याचें नाणें ह्या देशांत कायद्यानें मिळूं शकत नाहीं. परदेशांत पाठविण्याकरतां नेदर्लंड बँकेतून पाहिजे तितकें सोनें मिळतें. पुढे व्यापाराची दिशा बदलल्यामुळे म्हणजे निर्गतापेक्षा आयात माल जास्त किंमतीचा असल्यामुळे बँकेतील सोन्याचा संग्रह सहा लक्ष पौंडांपर्यंत खालीं आला. तेव्हां सन १८८४ मध्ये गरज लागेल तेव्हां दोन कोटी पन्नास लक्ष रुप्याचे फ्लॉरीन बाजारभावानें विकण्यास बँकेला सरकारनें अधिकार द्यावा असा कायदा सरकारला करावा लागला. ह्या कायद्याची अंमलबजावणी कधीं झाली नाहीं; तथापि त्यामुळे लोकांना धीर आला. १८७५ सालीं पन्नास कोटी पौंडांवर सोनें बँकेमध्ये होतें; देशाबाहेर पाठविण्याकरितां वाटेल तितकें सोनें बँकेंत मिळूं शकलें. हॉलंड देशांत व या देशाच्या पूर्वेकडील वसाहतींत एकच चलनपद्धति चालू आहे. जावा बेटांत टांकसाळ नाहीं व सोन्याचाही संग्रह फारसा

नाही. जावाचा व्यापार सोन्याचें नाणें वापरणाऱ्या देशाबरोबर हालंडच्या-मार्फत करतांना त्या बेटाला कांही अडचण भासत नाही.

ह्या देशांतील चलनसंग्रह १८७५ सालीं खाली लिहिल्याप्रमाणे होता.

| | हालंड. | जावा. |
|---|---|---|
| सोनें सुमार | ७२००००० पौंड. | ५०००००० पौंड |
| रुपें | ११०००००० | २७७३००० ,, |
| नोटी | १६०००००० | ४२५ ००० ,, |

सारांश, या देशांत मोलाचें मुख्य परिमाण सोनें असून प्रत्यक्ष व्यवहारांत सोनें मुळीच नाही. परदेशांत पाठविण्याचा प्रसंग खेरीजकरून सोन्याच्या नाण्यांचा अथवा नोटींचा मोबदला रुप्याच्या नाण्यांत मिळत नसतां बाजारभावाहून जास्त अशा ठरीव ( कृत्रिम ) भावाने रुप्याचीं नाणीं वापरलीं जातात व हा भाव जेथे सोन्याचा संग्रहसुद्धा बिलकुल नाही अशा वसाहतींतसुद्धा कायम राहण्यास हरकत पडत नाही. आजमितीस या देशांत ८४६,०००,००० गुल्डन किंमतीच्या नोटी चलनांत आहेत व सोन्याचा रिझर्व्ह ४१४,०००,००० गुल्डन इतका आहे.

## ऑस्ट्रिया व हंगेरी

सन १८७९ सालापूर्वी ह्या देशांत मुख्य नाणें फ्लॉरिन नांवाचें होतें. हें नाणें रुप्याच्या पौंडाच्या $\frac{1}{45}$ हिश्शाइतकें होतें. टांकसाळींत रुप्याचें नाणें पाडीत असत, आणि रुपयाचे फ्लॉरिन व नोटी हीं वाटेल तितक्या रकमेपर्यंत कायदेशीर फेडीचीं चलनें होतीं. प्रत्यक्ष व्यवहारांत नोटींचाच उपयोग पुष्कळ असून त्या वटावतां येत नसत. सन १८७९ साली ऑस्ट्रियन सरकारने लोकांना रुप्याचीं नाणीं पाडून देण्याचें बंद केलें व गरजेप्रमाणे इतःपर सरकारतर्फे नाणीं पाडण्यांत येऊं लागलीं. सन १८८० पासून १८९१ पर्यंत १२५५०००००० फ्लॉरिन पाडले गेले. ही स्थिति १८९१ पर्यंत कायम होती. पुढे १८९२ साली मोलाचें मुख्य परिमाण सोन्याचें करून टांकसाळींत सोन्याचीं नाणीं पाडण्यास मोकळीक

मिळाली. १८७५ साली आस्ट्रियन सरकाराजवळ १५१००.०००
फ्लॉरिन ( सोन्याचे ) शिल्लक होते. ह्याची उपनाणीं पाडण्याबद्दल कायद्यांत योजना केली होती. परंतु प्रत्यक्ष चलन सोन्यामध्ये मोबदला ह्याचा करतां येतो असें कागदीच होतें. आज मितीस आस्ट्रिया हंगेरीपासून अलग झाला असून या दोनही देशांत प्रजासत्ताक राज्यें स्थापित झालीं आहेत. आस्ट्रियांत ९४६,०००,००० शेलिंग किंमतीच्या नोटी चलनांत आहेत व सोन्याच्या रिझर्व्ह ५३,०००,००० शेलिंग आहे. ( शेलिंग = ६ आणे ). हंगेरींत ४७७,०००,००० करोना किंमतीच्या नोटी चलनांत आहेत व १६९,०,००००० करोना इतका सोन्याचा रिझर्व्ह आहे. ( करोना = ९ आणे. )

## ब्रेझिल.

ह्या देशांत चलनपद्धति जरा चमत्कारिक असल्यामुळे विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यावरून असें दिसतें की, देशाची इभ्रत जर चांगली असेल तर धातूमध्ये ज्याचा मोबदला करतां येत नाही व देशांतील लोकवस्तीच्या मानाने व व्यापारविस्ताराचे मानाने फाजील असलेलें असें निवळ कागदी चलन किंमत कमी न होतां चालू ठेवतां येतें.

ह्या देशांत मिलरीस नांवाचें मुख्य नाणें आहे. सोन्यामध्ये ह्याची किंमत २७ पेन्स आहे. हीं कांही नाणीं एकदा पाडलीं होतीं. परंतु तीं देशाबाहेर जाऊन आज बरींच वर्षे लोटलीं आहेत. म्हणून १८६४ सालापासून ह्या देशांत वटावतां न येण्यासारखें असें कागदी चलनच चालू आहे. सन १८६५ पासून १८८८ पर्यंत हें कागदी चलन दुपटीने वाढलें असून २७ पेन्साच्या खालीं त्याची किंमत क्वचितच गेली असेल. १८९२ सालीं ५१३७२७०० पौंड किंमतीचें चलन देशांत वाढलें, यामुळे व देशाची इभ्रत कमी झाल्यामुळे त्या साली दहापासून पंधरा पेन्सापर्यंत नोटींचा भाव उतरला. महायुद्धानंतर १९२३ सालीं ' बँक ऑफ ब्रेझिल ' ला नोटी काढण्याचा हक्क ब्रेझिल सरकारने दिला व एक कायदा करून

मिलरीमची किंमत ६ पेन्साबरोबर ठरवून टाकिली व दहा मिलरीमच्या मूल्याचें नवीन मापन कूशिरो या नांवानें स्थापित केलें. आज मितीस एकंदर नोटी ६२,०००,००० पौंड किंमतीच्या आहेत व नोटांच्या बदला सोनें देण्याची व्यवस्था लवकरच अमलांत येणार आहे.

## वेस्टइंडिया बेटें

त्यांपैकी बहुतेक बेटांत सोन्याचेंच मुख्य परिमाण आहे; परंतु रुप्याच्या नाण्यांनी वाटेल तितक्या रकमेपर्यंत फेड करतां येते. मात्र या नाण्यांची किंमत सोन्याच्या परिमाणावर बसविली आहे.

## रशिया

या देशाच्या चलनपद्धतीची फारशी माहिती उपलब्ध होत नाही; तथापि सोन्याचें किंवा रुप्याचें नाणें थोड्या प्रमाणांत आहे. रूबल नांवाचें कागदी चलन प्रचारांत आहे व त्याची किंमत नाण्याच्या बरोबरीनें होती; परंतु गेल्या शतकाच्या शेवटीं ती कमी झाल्यानें १८९९ च्या कायद्यानें असें ठरविलें की दहा रूबलचें नाणें पंधरा रूबलच्या नोटींच्या किंमतीचें आहे असें समजावें. हें नोटी व सुवर्ण यांमधील गुणोत्तर १९१४ पर्यंत कायम होतें. महायुद्धांत नोटींचा प्रळय इतका झाला की, नोटींची क्रयशक्ति अगदीं कमी झाली. १९१२ सालीं शरव्होनिट्झ नांवाचें नवें चलन अमलांत आणलें व एक शरव्होनिट्झ = १० रूबल असें प्रमाण स्थापित केलें. १९२४ सालीं नवीन रुबलांच्या नोटी सोव्हिएट सरकारनें काढल्या व जुन्या नोटी ५००० कोटि रुबलांच्या ऐवजीं नवीन एक रूबल या प्रमाणांत रद्द करून टाकल्या. १९२४ सालीं चलनांत ४ कोटि ९९ लक्ष रुबलांचीं नाणीं, २० कोटि १० लक्ष रुबलांच्या 'ट्रेझरी नोट्स' व ३४ कोटि ६० लक्ष शरव्होनिट्झच्या नोटी होत्या. १९२८ सालीं नवीन नोटी सोन्याच्या किंमतीच्या बरोबर आल्या. आजमितीस ४८३,०००,००० रूबल किंमतीच्या 'ट्रेझरी नोट्स,' १७००,०००,००० रूबल किंमतीच्या

रुप्याचीं नाणीं व १,०२०,०००,००० रूबल किंमतीच्या ग्रीनबॅक नोटी चलनांत आहेत. सोन्याचा रिझर्व्ह १,६४०,०००,००० रूबल इतका आहे. टांकसाळींत लोकांस रुप्याचीं नाणीं पाडून देत नाहीत.

ह्या वर निर्दिष्ट केलेल्या उदाहरणांवरून सोन्याची प्रगति बऱ्याच राष्ट्रांत झाली आहे असें दिसून येईल. लॅटिन राष्ट्रांनी द्विधातुपरिमाणपद्धति सोडून दिली. तिचा ते पुनः अंगीकार करितील असें दिसत नाही. जर्मनी-प्रमाणे रशियाने सोन्याचा अंगीकार केल्यास पुनः एकवार रुप्याचा भाव उतरेल असें वाटतें. ह्याप्रमाणे सर्व प्रमुख राष्ट्रांत एक चलन सुरू झाल्यास व्यापारास निर्विवाद सोईचें होईल यांत संशय नाही.

---

## भाग तेरावा

## नाण्यासंबंधी विशिष्ट गोष्टी

ह्या भागांत धातूचीं नाणीं कशीं करावीं ह्यासंबंधाच्या बारीकसारीक गोष्टींचा विचार करावयाचा आहे. पैशाचीं मूलतत्त्वें जरी सोपीं आहेत, तथापि नाणें पूर्ण सोयीचें होण्यापूर्वी कितीतरी बारीकसारीक गोष्टी पहाव-याच्या असतात. नाण्यांच्या कामीं कोणत्या धातूचा उपयोग कशा रीतीने करावा वगैरे गोष्टींचा ऊहापोह पूर्वीच केला आहे. ह्या आणि पुढल्या भागांत कोणत्या हीण धातूचा नाण्यांच्या कामीं उत्कृष्ट उपयोग करतां येईल, वापरण्यास सोयीवार पडावें म्हणून नाण्यांचा आकार किती मोठा असावा, नाण्यांची मोठी रास मोजावयाची असल्यास कोणत्या साधनपद्धतीचा अंगीकार करावा, नाणीं पाडण्यास लागणारा खर्च, सर्व जगांत एकच नाणें सुरू झाल्याने होणारे फायदे व तोटे, किंमतीचें सर्वसंमत

आदिपरिमाण निवडून काढण्याची अडचण व ठरलेल्या प्रमाणभूत नाण्यांचे कोणते पोटभाग सोयीवार होतील ह्या गोष्टींचा अद्यापि विचार करावयाचा आहे. सारांश, देशांतील चलनांत फेरबदल करावयाचा झाल्यास ज्या कितीएक वादग्रस्त गोष्टींचा विचार करावा लागतो त्यांचें मिळ्वळ दिग्दर्शन करण्यापलीकडे येथे जास्त कांहीएक करतां येत नाही.

## नाण्यांतील हीण

सोन्याचा किंवा रुप्याचा पैसा असें आपण सामान्यतः बोलतों खरें; पण वस्तुतः नाणीं हीं रुपें तांबें, सोनें तांबें, अथवा सोनें, रुपें आणि तांबें ह्यांच्या मिश्रणाने केलेलीं असतात. शुद्ध सोन्याचीं नाणीं प्राचीन तसेंच अर्वाचीन काळीं पाडलेलीं आहेत, नाहीत असें नाही. टलूकनी येथील सेक्विन नांवाच्या नाण्यांत १००० व ९९९ शुद्ध सोनें असे. आपल्या इकडे अहमदाबाद नांवाच्या मोहरेंत तर शेंकडा शंभर शुद्ध सोनें असे. पुतळ्यांतही फारशी भेळ आढळत नाही; तथापि शुद्ध सोनें आणि रुपें ह्या मृदु धातु आहेत. म्हणून मूलावस्थेंत त्या शुद्ध सांपडल्या तरीसुद्धा काठिन्य उत्पन्न करून नाण्यांची झीज कमी करणारी तांब्यासारखी धातु त्यांत मिश्र करणें भाग आहे. ह्या तांब्याचें प्रमाण काय असावें हा मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. ह्याचा निर्णय कधी शास्त्रीय तर कधी ऐतिहासिक कारणांवरून केला गेला आहे.

इंग्लंडमध्ये नाण्यांच्यापूर्वी प्रचारांत असलेल्या तोलनात्मकपद्धतीवरून हें प्रमाण ठरलें गेलें आहे. बारा औंसांच्या ट्रॉय पौंडाने तेथे रुपें वजन करीत. ह्या बारा औंसांत ११ औंस २ पेनीवेट शुद्ध चांदी असून १८ पेनीवेट तांबें असे. इ. सन ११५७ च्यापूर्वीपासून चालत आलेलें हें प्रमाण आजमितीपर्यंत कायम आहे. हें प्रमाण १००० व ९२५ ह्या प्रमाणाशीं जुळतें. सोन्याचें वजन कॅरट नांवाच्या वजमाने केलें जाई. अशा २४ कॅरटांत २२ कॅरट शुद्ध सोनें असून २ भाग हीण धातु असे.

निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या काळीं या हीण धातूचें प्रमाण फारच निरनिराळें असलेलें आढळतें. १००० त २०० अथवा १५० भाग फक्त ज्यांत शुद्ध धातु आहे अशीं रुप्याचीं नाणीं पाडलेलीं आहेत. त्याचप्रमाणे १००० त ७०० किंवा ७५० भाग फक्त सोनें असलेलीं सोन्याचीं नाणीं पाडलीं गेलीं आहेत. ह्या मर्यादेपासून पुढे केवळ सर्व शुद्ध धातु असेपर्यंत निरनिराळ्या कसाचीं नाणीं विद्यमान आहेत. परंतु अंतरराष्ट्रीय पेढ्यांत ९०१ आणि ८३५ भाग शुद्ध धातु असावी असें जें हल्लीं मत आहे त्याचाच फक्त विचार केला म्हणजे पुरे. कांहीं वर्षांपूर्वी १० ग्रॅम शुद्ध सोनें आणि १ ग्रॅम हीण धातु ह्यांचें नाणें पाडण्याचा जर्मन सरकारचा बेत होता. ह्यांत १०/११ अथवा ९०९·०९ हें कसाचें प्रमाण पडतें. ह्या कल्पनेंत कांहीं विशेष शोध नव्हती. सुदैवाने हीं नाणीं पाडण्याचा बेत जर्मनीने रहित केला. त्या देशाच्या हल्लींच्या सोन्याच्या व रुप्याच्या दोन्ही प्रकारच्या नाण्यांत १००० त ९०० भाग धातु शुद्ध असते. राज्यक्रांतीच्या वेळीं फ्रेंच लोकांनींसुद्धा ह्या साध्या दशांशात्मक पद्धतीचा अंगीकार केला व फ्रेंच पद्धतीचें अनुकरण करणाऱ्या स्पेन, ग्रीस आदिकरून दुसऱ्या कित्येक देशांनी हीच पद्धति उचलली. अमेरिकेंत तर हें प्रमाण आज पुष्कळ वर्षें उपयोगांत आणलें गेलें आहे. स्कँडिनेव्हिया देशांत सोन्याच्या नाण्यांत याच प्रमाणाचा स्वीकार केला आहे. सारांश, इंग्लंड, रशिया, पोर्तुगाल, तुर्कस्थान अशा कांहीं थोड्याशा राष्ट्रांशिवाय बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांत कसाचें हें दशांशात्मक प्रमाण अंगीकृत झालें आहे.

रासायनिक अगर यांत्रिक दृष्टीने विचार केला असतां कसाचें नक्की प्रमाण काय असावें हा कांहीं महत्त्वाचा प्रश्न नाहीं. पूर्वापार वहिवाटीमुळे हें प्रमाण इंग्लिश लोक घेत नाहींत इतकेंच.

हिंदुस्थानांत निरनिराळ्या टांकसाळींतून नाणें पाडलें जाई; त्यामुळे हीण धातूचें प्रमाणही प्रत्येक जातीच्या नाण्याचें निरनिराळें असे. अत्यंत

कनिष्ठ दर्जाच्या नाण्यांत ( आजपर्यंत उपलब्ध झालेल्या ) १००० त शुद्ध चांदीचें प्रमाण काय तें ५४० भाग असल्याचें दिसतें. ह्या आंकड्या-पासून तों अगदी शुद्ध धातूपर्यंत निरनिराळ्या नाण्यांत कसाचें भिन्न भिन्न प्रमाण आढळतें. मूर्शिदाबादच्या जुन्या शिक्क्याच्या रुपयांत १००० त ९८० भाग शुद्ध धातु असे. अकबराच्या वेळीं तर हीणविरहित नाणीं पाडीत असत असें ऐनीअकबरीवरून दिसतें.

सोन्याच्या नाण्यांबद्दलही हेंच विधान खरें ठरतें. धारवाड आणि नरगुंद येथे पेशव्यांकरतां होन पाडीत. त्यांत ७६० भाग काय तें शुद्ध सोनें असे. अवरंगाबाद आणि पूर्णा ह्या नांवाच्या मोहरेंत १००० त १००० भाग सोनें असल्याचें आढळतें. चालू रुपयांत १६५ ग्रेन शुद्ध चांदी असून १५ ग्रेन हीण असतें. म्हणजे १००० त ९१६.६६ भाग शुद्ध धातु असते. हें प्रमाण इंग्लिश पद्धतीस अनुसरून आहे हें उघड आहे व तें इ. स. १८२९ सालापूर्वीपासून आहे तें कायम आहे.

## नाण्यांचा आकार

नाणीं पाडतांना त्यांचा आकार किती मोठा असावा ह्याविषयी साधारणपणें मर्यादा ठरलेली आहे. तीं सहज उचलून घेतां न येण्याइतकीं अगर सहज नाहींशीं होतील इतकीं लहान असतां कामा नये. सामान्य नियम असा आहे की, आंगठा व त्याच्या जवळचें बोट ह्या दोहोंची चिमटी केल्यास बोटांचा जितका भाग एकमेकाला स्पर्श करतो तितक्या भागाइतका नाण्याचा कमींतकमी आकार असावा. आतां निरनिराळ्या माणसांच्या बोटांचा आकार सारखाच असणें संभवनीय नाहीं हें खरें; म्हणून ह्या बाबतींत आकार कमी करण्यापेक्षा थोडा जास्त झालेला पतकरला.

ह्या नियमाला अनुसरून इंग्रजी तीन पेन्सांचें नाणें, स्वीडनचें १० ओरांचें नाणें, अमेरिकेंतील सोन्याचा डॉलर हीं फार लहान म्हटलीं पाहिजेत. फ्रान्समधील हल्लींचें पांच फ्रँकांचें सोन्याचें नाणें, इंग्रजी चार पेन्सांचें नाणें, कानडामधलें सात पेन्सांचें नाणें किंवा अलीकडे जर्मनी देशांत सुरू

केलेलें वीस फ्रेनिंगाचें रुप्याचें नाणें, हीं इतकीं बारीक आहेत की, ह्याच्या-पेक्षा लहान आकार चालला नसता. नाण्याच्या परिघाचा विचार करणें जसें आवश्यक आहे तसेंच त्याच्या जाडीचाही विचार करणें अवश्य आहे. अमेरिकेच्या टांकसाळींतून निघालेलीं नाणीं इतरांपेक्षा जाड असतात. ह्यामुळे जरी तीं दिसण्यांत ओबड धोबड दिसतात, तथापि वापरण्यास अधिक सोयीचीं पडतात. ह्याच्या अगदी उलट फ्रेंच नाण्याची स्थिति आहे. पांच फ्रँकांचें सोन्याचें नाणें फार पातळ असून त्याचा व्यास जवळ जवळ १७ मिलिमीटर असतो; आणि जास्त किंमतीचा असा अमेरिकें-तील डॉलर १ मिलिमीटरहून थोडा जास्त असतो. आजपर्यंत सर्व नाण्यांत फार मोठें नाणें म्हटलें म्हणजे मेरीआ थेरीसा डॉलर होय. ह्याचा व्यास १. ६ इंच किंवा ४१ मिलिमीटर भरतो. ... किती एक डॉलर आहेत ... ह्याहून कांही कमी आकाराचे आहेत. इ. सन १८५८ मध्ये पाड-लेल्या स्पेन देशांतील डॉलराचा व्यास ३.७ मिलिमीटर आहे. सन १८४५ मध्ये अमेरिकेंत पाडलेला डॉलर, सन १८७० साली पाडलेला स्पेन देशांतील डॉलर व १८... पाडलेला मेक्सिको देशांतील डॉलर ह्यांचा व्यास १७ पासून १८ मिलिमीटरपर्यंत भरतो. कांही डॉलर मोजून पाहिले तर त्यांचा सरसकट व्यास १८½ मिलिमीटर अथवा बरोबर दीड इंच भरतो. अमेरिकन लोक आपल्या सोन्याच्या नाण्यांची जाडी जास्त ठेवितात. चार पौंडांहूनही अधिक किंमतीचें जें डबल ईगल नाणें त्याचा व्यास फक्त १४ मिलिमीटर किंवा १½ इंच असतो. ऑस्ट्रिया देशांतील चारड्युकट नांवाच्या नाण्यांत डबल ईगलच्या निम्मेदेखील सोनें नसतें; तरी पण त्याचा व्यास त्याहून अधिक असतो.

आपल्या रुपयाचा व्यास $1\frac{3}{16}$, पावलीचा $\frac{7}{8}$ व चवलीचा $\frac{5}{8}$ इंच भरतो. ब्रिटिश अमलापूर्वीचे रुपये आकाराने लहान पण जाडीने मोठे असत; पण हें विधान सर्वच नाण्यांबद्दल खास करतां येणार नाही. निरनिराळ्या भागांत निरनिराळीं नाणीं प्रचारांत असल्यामुळे कोठे मोठीं तर कोठे

अत्यंत सूक्ष्म चालू असल्याचें आढळून येतें. चाक्पकोर येथे चालत असलेलें कैश नांवाचें नाणें इतकें बारीक आहे की, जगांत त्याच्या इतकें लहान नाणें दुसरें कोठे असल्याचें दिसत नाही. ह्याचा व्यास १/४ इंचाहूनही कमी भरतो व वजन तर ५ गुंजाही भरत नाही. तुर्कस्थानांतलें मिश्रधातूचें एक हलकें नाणें आहे, त्याचा व्यास १/२ इंचाहून थोडा जास्त आहे; पण वजन फक्त १ गुंजच आहे. जाडी इतकी कमी असणें संभवत नाही. १/८ पैशाच्या किंमतीचें टिपूचें तांब्याचें नाणें फारच बारीक म्हणावें लागतें. त्याचप्रमाणे नेपाळांत इतके बारीक आकाराचे सोन्याचे पैसे आहेत की, त्यांचें प्रत्येकीं वजन १/२ ग्रेन भरतें. अलीकडे दक्षिण अर्कोट प्रांतांत मिरचीच्या आकाराचीं सोन्याचीं नाणीं सांपडलीं आहेत. तींही अतीच बारीक आहेत. त्यांचें वजन १ ग्रेन सरासरीने भरतें.

## नाण्यांची क्षीज

नाणीं वापरलीं असतांना त्यांस क्षीज लागते. ह्यासंबंधानेही विचार करणें अवश्य आहे. सोन्याचीं नाणीं असलीं तर ही क्षीज फार महत्त्वाची असते. कारण त्यामुळे मागे सांगितल्याप्रमाणे ह्या चलनाची किंमत हळूहळू कमी होत जाते. एकाकडून दुसऱ्याकडे, दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे, ह्याप्रमाणे नाणीं सारखीं फिरत असल्यामुळे साधारणपणे एकाच जातीच्या प्रत्येक नाण्याची घस जवळ जवळ सारखीच होईल असें मानण्यास हरकत नाही. हिंदुस्थानांत १.६ ग्रेनपर्यंत रुपयाची क्षीज कायदेशीर मानली आहे. म्हणजे १७६.४ ग्रेन असेपर्यंत तो पूर्ण किंमतीचा मानला पाहिजे असें १८७० च्या कायद्यानें ठरलें गेलें आहे. सन १८३५ व ४० सालचे रुपये माघारे घेऊन नवे रुपये पाडण्यास सरकारने आरंभ केल्यामुळे रुपयाला कायदेशीर मर्यादेच्याखाली जाण्यास किती वर्षे लागतात हें ठरविण्यास चांगली संधि मिळाली. कलकत्त्यास कर्नल बेअर्ड साहेबांनी केलेल्या शोधावरून असें दिसतें की, एक रुपयाचें कायदेशीर आयुष्य ५५ वर्षांहून थोडें जास्त आहे; म्हणजे शेंकडा दोनपेक्षा जास्त वजन

कमी न होतां एक रुपया ५५ वर्षे चालूं शकेल. ह्या साहेबांनी एकंदर ३१ लाख रुपये मोजून हा सिद्धांत काढला आहे. त्याशिवाय ह्या शोधा-वरून असें आढळून आलें की, हलक्या वजनाचीं नाणीं एकंदर संख्येच्या मानाने पहातां शेंकडा तीन ह्याप्रमाणे निघतात. हें प्रमाण इंग्लंड देशांतील प्रमाणाहून कमी आहे. अशीं कमी वजनाचीं नाणीं एकंदर ११४ लाख असावीं असा ह्या साहेबांनी अदमास केला आहे. इंग्लंडमध्ये सॉव्हरिनचें वजन १२२.५ ग्रेनच्याखाली जाईपर्यंत तें कायदेशीर 'चलन' मानलें जातें. ह्याचा अर्थ असा की, ०.७७४ ग्रेनपर्यंत सॉव्हरिन झिजलेला असला तरी तो पूर्ण किंमतीचा असें मानावें लागतें. ह्या नाण्याची झीज त्या देशांत दरसाल सुमारे ०·०४१ ग्रेन होत असते असा अदमास आहे. ह्यावरून हें उघड होतें की, १८ वर्षांहून जास्त वर्षे सॉव्हरिन कायदेशीर रीतीने चालूं शकणार नाही. सारांश १५ पासून २० वर्षेपर्यंत एका सॉव्हरिनचें कायदेशीर आयुष्य असतें असें म्हणण्यास हरकत नाही.

निरनिराळ्या देशांतील चलनाची तुलना केली असतां असें दिसतें की, झिजेचें प्रमाण कांही अंशीं नाण्याची आकृति व आंतील धातु यांवर आणि कांही अंशीं त्यांचा ज्या प्रमाणाने वापर असेल त्यावर अवलंबून आहे. स्वित्झर्लंडमध्ये एका गृहस्थाने केलेल्या शोधावरून असें निष्पन्न झालें आहे की, वीस फ्रँक नाण्यांची दरसाल झीज त्या नाण्याच्या पूर्ण वजनाच्या दोन कोट्यंशाने होते व दहा आणि पांच फ्रँकांच्या सोन्याच्या नाण्याची झीज अनुक्रमें ४१० लाख व ६२ कोटी इतक्या हिश्शाने होते. त्याचप्रमाणे इंग्लिश लोकांचें जें सॉव्हरिन नाणें तें दरसाल आपल्या वज-नाच्या २५ कोटी हिश्शाइतकी झीज सोसतें. फ्रान्सच्या नेपोलियन नाण्या-पेक्षा इंग्रजी नाणीं अधिक जड असल्यामुळे अर्थातच तितक्या प्रमाणाने त्यांस कमी झीज लागते. फीरहरजाग ह्यांचें असें म्हणणें आहे की, इंग्लिश नाणीं लवकर झिजतात याचें कारण त्या नाण्यांत हीण धातूचें मिश्रण कमी असतें हें होय. हें कांही अंशीं खरें आहे; पण इतकें मोठें अंतर पडण्यास

विशेष सबळ कारण म्हटलें म्हणजे इंग्लंडांत पैसा फार झपाट्याने फिरत असतो हेंच समजलें पाहिजे.

नाण्याच्या झिजेचें प्रमाण पुष्कळ अंशाने त्याच्या आकारावर असतें. चवलीपावलीपेक्षा रुपया कमी झिजतो. चवली, पावली, पै, सापिका, ह्यांना झीज जास्त असते. इंग्लंडमध्ये जीं उपनाणीं चालतात त्यांस दरसाल किती झीज लागते त्याचें प्रमाण सन १८३३ सालीं काढलें, त्यावरुन हाफक्राऊन, शिलिंग आणि सिक्सपेन्स, ह्यांची झीज शेकडा अनुक्रमें १·२५, ·२००, ·३७५, लागल्याचें अनुभवास आलें. ह्याच देशांत सन १७९८ सालीं त्या वेळीं वापरण्यांत असलेलीं रुप्याचीं नाणीं वजन करून पाहिलीं, त्या वेळेस असें आढळून आलें की, क्राऊन, अर्धे क्राऊन, शिलिंग आणि अर्धे शिलिंग ह्यांमध्ये शेकडा अनुक्रमें ३·३१, ९·९०, २४·६०, ३८·२८ वजन कमी भरलें. दक्षिण जर्मनीमध्ये जुनीं रुप्याचीं नाणीं वापरण्यांत असलेलीं माघारीं घेतलीं तेव्हां त्या नाण्यांचें वजन ३/४ हिश्शाने कमी झाल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें.

सोन्याच्या नाण्याच्या झिजेपासून होणारें नुकसान कमी होण्यास तीं नाणीं मोठ्या आकाराचीं पाडणें हा एक उपाय आहे. अमेरिकन लोकांचीं ईगल नाणीं पदकाएवढीं मोठीं असत. प्राचीनकाळीं सोन्याचीं मोठ्या आकाराचीं पुष्कळ नाणीं प्रचारांत असत. परंतु ज्या मानाने नाणें मोठें असेल त्या मानाने तें बनावट करण्यास अधिक सुलभ जातें, हा ह्या मोठ्या नाण्यांवर आक्षेप आहे. अमेरिकेंत असें अनुभवास आलें आहे की, मोठें व जाड नाणें असलें म्हणजे तें मधोमध कापून त्याचे दोन वाटोळे मधोमध तुकडे करतात व पुन्हा पूर्वीचें वजन कायम ठेवण्याकरतां मध्ये प्लॅटिनम धातूचा पत्रा घालतात. ह्या कृतीने फायदा करून घेणारे लोक त्या देशांत पुष्कळ आढळून आले आहेत. कधी कधी नाण्याला लहान भोकें पाडून नंतर हातोडीने ठोकून पुन्हा नाणें पूर्ववत् करतात. ही लबाडी बंद करण्याकरता त्या नाण्यांची जाडी कमी कर-

ण्याचा एक उपाय सुचविण्यांत आला आहे, पण असें करण्यापेक्षा मोठ्या आकाराचीं सोन्याचीं नाणीं पाडण्याचें बंद करणें फार चांगलें. इंग्लंड व फ्रान्स ह्या दोन देशांत ह्या धातूचीं मोठीं नाणीं पाडण्याचें पुष्कळ वर्षांपूर्वीच बंद झालें आहे. सॉव्हरिन, नेपोलियन, असें ईगल व त्याच आकाराचीं दुसरीं सोन्याचीं नाणीं ह्यांच्यांत अफरातफर होत नाही असा अनुभव आहे. नाण्यांची झीज शक्य तितकी कमी करण्याकरितां नाण्यांवरील कोरीव काम अगर आकृति, अंक वगैरे अगदी अंगाबरोबर असावेत. राजाचें किंवा राणीचें डोकें अगदी उचललेलें असूं नये. ह्या बाबतींत फ्रान्स देशांत टांकसाळींत पाडलेलीं नाणीं फार सुबक असतात.

## नाणीं मोजण्याची पद्धति

पुष्कळ पैसे मोजावयाचे असतां एक एक नाणें निरनिराळें घेऊन टेण्याने त्रास होतो इतकेंच नव्हे, तर मोजतांना चुकी होण्याचा संभवहि असतो. एवढ्यासाठी म्हणजे पैशाच्या मोठमोठ्या राशी थोडक्या वेळांत व बिनचुक मोजतां याव्या म्हणून मोजावयाच्या निरनिराळ्या तऱ्हा प्रचारांत चालू आहेत. टांकसाळींत, पेढ्यांत, व पुष्कळ पैशाची देवघेव जेथे दररोज चालते अशा ठिकाणीं गणकांची योजना केलेली असते. हिंदुस्थानांत ह्या गणकांचा उपयोग फार प्राचीन काळापासून सराफ व व्यापारी लोक करीत आले आहेत. ह्या चौकोनी फळ्या असून त्यांत पुष्कळ भोकें सारख्या अंतरावर व एकसारखीं पाडलेलीं असतात. प्रत्येक भोक अशा प्रकारचें असतें की, त्यांत नाणें बरोबर जाऊन बसेल. ह्या फळ्यांवर बरींच नाणीं ओंजळीने पसरतात व मग त्या फळ्या हलवतात. असें केलें म्हणजे बहुतेक भोकें भरतात. जीं भोकें रिकामीं राहिलीं असतील तीं मग हातांनी भरतात. ह्या रीतीने लवमात्र चूक न होतां नाण्यांची संख्या बरोबर मोजतां येते व शिवाय खोटीं, परकीय व घांसलेलीं वगैरे नाणीं तावडतोब निवडून काढतां येतात. तसेंच ह्या गणकांच्यायोगाने सारख्या नाण्यांच्या पिशव्याहि चटकन बांधतां येतात.

इंग्लिश पेढ्यांतून चेक वटवून येणारांना पैसे द्यावे लागतात, तसेंच ठेवी ठेवावयास जे लोक येतात, त्यांच्या ठेवी मोजून घ्याव्या लागतात. ह्या रकमा फार मोठमोठाल्या असल्याकारणानें हातानें मोजण्यांत फारच कालक्षेप होतो; करितां तेथे ५।१०।२०।३०।५०।१००।२००।३०० सॉव्हरिनच्या बरोबरीचीं वजनें केलेलीं असतात. हीं कांट्यांत टाकून हवी तेवढी रक्कम असली तरी जलद बिनचूक मोजतां येते. नाणीं फार जुनाट व झिजलेलीं असलीं तर मात्र थोडाबहुत फरक पडण्याचा संभव असतो. अशा रीतीनें वजनांत न्यूनता असल्यानें मोठ्या रकमेंत फार तर एक सॉव्हरिनची तूट पडेल. अर्ध्या सॉव्हरिनचीं नाणीं फार हलकीं असतात, म्हणून ही वजनी गणनाची तऱ्हा उपयुक्त होणार नाही. ह्यावरून हें उघड होईल कीं, जुनाट व झिजलेलीं नाणीं नवीन नाण्यांबरोबर ज्या देशांत मिसळलीं आहेत, तेथे ही पद्धति फलद्रूप होणार नाही.

अर्धेल्या अथवा बहुतेक सारख्या वजनाचीं दुसरीं कोणतींही नाणीं चटकन मोजण्याचा दुसरा एक उपाय आहे. त्याला आपण द्विगुणीकारपद्धति असें नांव देऊं. उदाहरणार्थ, पन्नास नाणीं हातानें मोजून तीं एका परडींत टाकावीं. नंतर तितक्याच वजनाचीं नाणीं दुसऱ्या परडींत घालून तोललीं म्हणजे आपोआपच शंभर नाणीं मोजल्यासारखें होतें. पुन्हा त्या दोन्ही राशी एक करून तितक्याच वजनाचीं दुसरीं नाणीं तोललीं असतां दोनशें नाण्यांचें माप होतें. परडीमध्ये नाण्यांची रास राहूं शकेल तेथपर्यंत आपणांस असाच क्रम चालवतां येईल.

ज्या ठिकाणीं कांटे किंवा गणक ह्यांपैकी कांहीहि नसेल तेथे आणखी एका अगदी साध्या उपायाचें अवलंबन करतात हें पुष्कळांनी पाहिलें असेल. प्रथम आपण १०।१५।२०।२५ रुपये मोजून त्यांची बिट्टी उभी करून ठेवितों व पुढे बाकीच्या रुपयांच्या तितक्याच उंचीच्या तशा बिट्ट्या घालितों. सर्व बिट्ट्या सारख्याच उंचीच्या आहेत, हें पाहण्याकरिता त्यांवर एक काटकी ठेवितों. अशा रीतीनें कमजास्त उंची असल्यास

तावडतोब नजरेस येतें; त्यामुळे कोणत्या बिट्टींतील रकम चुकली आहे हें सहज समजतें.

## धातुरूप चलनाचा खर्च

धात्वात्मक द्रव्याचा उपयोग करूं लागल्यामुळे समाजावर जो बोजा पडतो त्याचा हिशोब बोधप्रद झाल्याशिवाय राहणार नाही. प्रथमतः तांब्याच्या नाण्यांचा विचार करतां असें आढळतें की सरकार ह्या धातूचीं कमी वजनाचीं उपनाणीं पाडून त्यावर फायदा मिळवितें. सन १९०२।३ सालीं सरकारी टांकसाळेंत दर शेरास १४॥ आणेप्रमाणे सरकारने तांबें खरेदी केलें. ह्या एक शेर तांब्याच्या दिडक्या १४४ पडतात. अर्थात् सरकारास २। रुपये मिळतात. म्हणजे लोकांपासून सरकार नाण्याच्या ठरीव किंमतीवर शेंकडा ५९ फायदा घेतें. सन १८३५ पासून आजपर्यंत हिंदुस्थानच्या टांकसाळींत जितकें तांब्याचें नाणें पाडलें त्यावर सरकारास निदान तीन कोट रुपये नफा झाला असला पाहिजे. हा निव्वळ नफा नाही हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण जुनें झिजलेलें नाणें दर्शनी किंमतीने सरकारास विकत घ्यावें लागतें तें घेऊन त्याचें पुन्हा नवें नाणें पाडण्यांत नुकसान होतें.

तांब्याचीं नाणीं झिजलीं म्हणजे तीं सरकारास कांही वर्षांनी परत घ्यावीं लागणार; त्या वेळीं होणाऱ्या नुकसानीचा विचार केला तरीसुद्धा ह्या कामीं सरकारास फायदाच राहतो. कारण दरसाल तांब्याच्या नाण्यांत होणाऱ्या फायद्याची रकम व्याजीं लावली तर — समजा आजपासून पन्नास वर्षांनी हीं नाणीं परत घेण्याचा प्रसंग आल्यास—तितक्या मुदतींत चक्रवाढ व्याजाने नफ्याची रकम इतकी वाढेल की हें नुकसान भरून येऊन अखेरीस फायदाच होईल.

धातूचें चलन सुरू केल्याने मुख्यतः चार प्रकारांनी खर्च येतो. नाण्यांत जी रकम अडकून रहाते त्या रकमेवरील व्याज मिळत नाही, कांही वर्षांनी नाणें झिजतें, टांकसाळीचा खर्च व कांही नाणीं अजिबात नाहीशीं होतात. हें नुकसान किती होतें हें समजण्यास मुळीच मार्ग नाही. बाकीच्या तीन

बाबींचा मात्र अजमास करतां येईल. सन १८३५ पासून १८९३ पर्यंत ३२७,७१,६९,३६६ रुपये पाडले. सन १८९३ पासून १८९९ पर्यंत मुळीच रुपये पाडले गेले नाहीत. सन १८९३ पासून १९०४-०५ सालापर्यंत एकंदर ६२,१६,६८,२०४ मिळून एकंदर ३८९,८८,३७,५७० रुपये १९०४-०५ पर्यंत पाडण्यांत आले. हे सर्व रुपये वापरांत आहेत असें नाही. हॅरिसन साहेबाच्या अंदाजाप्रमाणे १३,२१,७०,००० रुपये फक्त प्रत्यक्ष वापरण्यांत आहेत. हा अंदाज सन १८९३ च्या पूर्वी केलेला आहे. ह्याच्यानंतर फार मोठी रक्कम पाडली गेली आहे. ही रक्कम सरकारास व्यापाराच्या सोईकरितां पाडणें भाग पडलें. हे नंतरचे रुपये वितळले असावे असें मानण्यास जागा नाही. कांही झालें तरी निम्मेहून जास्त रुपये वापरांत असले पाहिजेत. ह्या एकंदर गोष्टींचा विचार करितां पन्नास कोटी रुपये हल्ली लोकांच्या वापरांत असावेत असें अनुमान करण्यास हरकत नाही. ह्यांत संस्थानांतून चालणाऱ्या २,००,००,००० रुपयांचा अंतर्भाव होत नाही. आता ५५ वर्षांनी शेंकडा दोन ग्रेन रुपया झिजतो हें मागें सांगितलेंच आहे. त्या हिशेबानें दर वर्षास रुपयाची झीज $\frac{२}{५५}$ अथवा '०३६ ग्रेन असते असें म्हणावें लागतें. ह्या दरानें दरसाल सरासरीनें सुमारें ७१००० रुपये फुकट जातात. ह्या हिशेबांत तांब्याच्या नाण्यांच्या झिजेचा हिशोब आला नाहीच. ह्याहीपेक्षा व्याजाच्या नुकसाची बाब जास्त जरुर.

१९०५ सालीं वापरामध्ये व नोटींच्या निधींत असलेलें एकंदर नाणें ठोकळमानानें खालील किंमतीचें होतें.

| | |
|---|---|
| वापरांत असलेले | रु. |
| रुपे | ५०,००,००,००० |
| तांबें | ६,००,००,००० |
| बारा कोटींहून जास्त रुपये किंमतीच्या नोटी काढल्यास तितक्या किंमतीची धातु अगर नाणीं ठेवावीं लागतात तीं (१९३१ च्या | |

फेब्रुवारींत ही रक्कम १४५,००,००,००० होती.) १८,००,००,०००

८४,००,००,०००

( १९०५ सालीं अवळ जवळ ४२ कोटी रुपये किंमतीच्या नोटी वापरांत होत्या. आजमितीस १६० कोटि रुपये किंमतीच्या नोटी वापरांत आहेत)

शेंकडा तीन रुपयेप्रमाणे ह्या रकमेचें व्याज २,५२,००,००० रुपये होतें.

टांकसाळ चालवण्याचा खर्च सुमारें सालिना साडेतीन लाख रुपये असतो.

ह्याप्रमाणे धातुरूप चलन वापरल्याने पैशाचें नुकसान होतें. ह्यांतून नाणें-पाडणावळ वजा केल्यास हा खर्च अंशतः कमी होईल. पण नाणीं नष्ट झाल्यापासून होणारें नुकसान आपण हिशोबांत घेतलें नाही. हें नुकसान व नाणें-पाडणावळ ह्यांची वजावाट केली असतां शिलक कांही रहाणार नाही.

---

भाग चौदावा

## अंतर्राष्ट्रीय पैसा

आजमितीस पैशाविषयी लिहिलेल्या ग्रंथांत निरनिराळ्या राष्ट्रांत एकच पैसा चालावा या जगद्व्यापी कल्पनेचा निर्देश करणें अवश्यक आहे. ही कल्पना फलद्रूप होण्यापूर्वी पुष्कळ काळ लोटणार हें उघड आहे. उलट, अलीकडे तर जर्मन सरकारच्या निळेहाटी कृत्याने या कल्पनेचा हेतु पूर्ण होण्यास व्यत्यय आला आहे. असें आहे तरी द्रव्यात्मक विषयांची चर्चा करतांना अगर त्यासंबंधी फेरफार करतांना सर्व राष्ट्रांत एकच चालू राहील अशी चलनपद्धति अखेरीस अमलांत यावी हा हेतु सदोदित लक्षांत ठेवावा. परस्परांमध्ये होणारीं युद्धें आजच बंद पडलीं नाहीत, तरी राष्ट्राराष्ट्रांतली वैमनस्यें कालगतीने नष्ट होतील अशी आशा करण्यास हरकत नाही.

तारा, डांक, गुन्हेगार, पुस्तकांवरील हक्क, वगैरे, युद्धांतील क्रौर्य कमी करण्याचे उपाय इत्यादि गोष्टीसंबंधाने केलेले नियम निरनिराळीं राष्ट्रें हल्ली पाळीत आहेतच. आपल्या शेजाऱ्याचें वाटोळें केव्हा होईल या विचारांत मग्न असलेले पूर्वीचे राज्ये हल्ली फार करून उरलेले नाहीत. अनियंत्रित व्यापार जसजसा वाढत जाईल, आणि आगगाड्या, आगबोटी, तारायंत्रें, डांक आणि वर्तमानपत्रें यांचा प्रसार जसजसा वाढेल त्याप्रमाणाने एकमेकांमधील दूरपणा कमी कमी झाल्याशिवाय राहणार नाही.

अन्तर्राष्ट्रीय अशा धातुरूप चलनपद्धतीपासून होणारे फायदे सांगून नंतर या पद्धतीपासून मानले जाणारे तोटे, द्रव्यात्मक पद्धतींत सोपेपणा आणण्याकरिता केलेले प्रयत्न, मुख्य मुख्य कल्पना व त्यांचे गुणदोष यांचें विवेचन करतां येईल.

## अन्तर्राष्ट्रीय पैशापासून होणारे फायदे

निरनिराळ्या राष्ट्रांत एकच पैसा राहिल्याने त्या देशांत प्रवास करणाऱ्या इसमास फक्त फायदा होईल, बाकी कोणास होणार नाही या सबबीवर कांही अदूरदृष्टि लोक या कल्पनेच्या विरुद्ध गवगवा करितात; परंतु प्रवाशांस होणारा फायदा एकंदर होणाऱ्या फायद्यांत अगदी कनिष्ठ प्रतीचा आहे. सरसकट एक असणाऱ्या किंमतीच्या परिमाणांत जमाखर्च, किंमती व हिशोबी आंकडे तयार केले असतां व्यापारी लोकांस किती सोयीवार पडेल व त्यापासून त्यांचें किती तरी हित होईल हें सांगणें नको. फ्रँक, पौंड, डॉलर, येलर, मिटर, रुपये, यार्ड, एल, हंड्रेडवेट, किलोग्राम, इत्यादि असंख्य निरनिराळ्या परिमाणांत दिलेली माहिती एका सामान्य परिमाणांत बसवून त्यापासून सूचक अनुमानें काढण्यास अंकशास्त्रज्ञास अत्यंत त्रास पडतो. व्यापाऱ्यांस अथवा घंदेवाल्या माणसांत पैशाची व वजनांची विविधता पाहून मांबावल्यासारखें होतें.

पुष्कळ ठिकाणीं चलनांची किंमत नक्की ठाऊक नसते. अशा देशांत

ज्या लोकांस तेथील चलनाचें व पैशाचें विशेष ज्ञान असेल तेच लोक व्यापार करण्यास धजतात. शिवाय चलनभेदामुळे परराष्ट्रांतील बहुधाच हिशोब करण्यास फार कठीण जातो; म्हणून अशा प्रकारचे हिशोब करण्यांत कसलेल्या कांही लोकांसच नफा कमावण्याची संधि मिळते.

एका देशांतील नाणें दुसऱ्या देशामध्ये तसेंच चालू राहिल्यास निरनिराळ्या देशांतील निरनिराळ्या नाण्यांच्या किंमतीचा हिशोब करण्याचा खटाटोप चुकेल. अन्तर्राष्ट्रीय चलनाचा आणखी एक परिणाम असा होईल की मौल्यवान् धातु नाण्यांच्याच रूपाने पुष्कळ अंशीं राहतील. सांप्रत जरी इंग्रजी पौंड, अमेरिकन ईगल, फ्रेंच नेपोलिअन, मेक्सिकोचा डॉलर हीं नाणीं पेढीवाले लोक बाळगतात, विकत देतात, आणि घेतात, तरीपण एकंदरीने पाहतां एका देशाने पाडलेलें नाणें दुसऱ्या देशांत चालण्याच्या-पूर्वी तें वितळवून पुन्हा पाडले जातें. नाण्यांची एकच पद्धति सुरू असेल तर सोन्यारुप्याच्या धातूंचा संग्रह नाण्यांच्या स्थितींत केला जाईल, कारण वाटेल तेव्हा कोठेही तीं पाठविण्यास अडचण पडणार नाही. आणखी एक लहान फायदा आहे तो हा की, प्रत्येक वेळीं लागणारी नाणेंपाडणावळ वांचेल व हल्लीच्या घोटाळ्याच्या स्थितीमध्ये कांही चतुर दलालांना व अडत्यांना जो नफा मिळतो तोही वांचला जाईल. त्याचप्रमाणे प्रवाशांची दगदग व त्रास वांचून त्यांचा फायदा होईल. ही गोष्ट अगदी दुर्लक्ष करण्याजोगी नाही. राष्ट्राराष्ट्रांतील दळणवळण वाढेल त्याप्रमाणे प्रवास करणाऱ्या लोकांची संख्याही वाढणार. अशा वाढत्या संख्येला कृत्रिम अडचणी ठेवणें चांगलें नाही.

अन्तर्राष्ट्रीय नाण्याने आणखी एक फायदा होण्यासारखा आहे. त्याच्या योगाने दुसऱ्या किरकोळ व मागासलेल्या राष्ट्रांतील चलनपद्धति सुधारण्याचा संभव आहे. कितीं तरी देशांत आजमितीस नानाप्रकारचीं व अनिश्चित किंमतीचीं अशीं परकीं नाणीं चालत आहेत. मुख्य राष्ट्रें जोंपर्यंत अगदी भिन्न प्रकारचीं नाणीं पाडीत राहतील, तोंपर्यंत तीं इतर देशांत आपल्या

तेथे गोंधळ कायम ठेवतील. मेक्सिकोच्या डॉलरापासून हल्लीही किती तरी सोय वाटत आहे. ज्या देशांत किंमतीचें मुख्य परिमाण म्हणून हें नाणें चालतें त्या देशाशीं व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांस आपण कोणत्या पायावर करार करीत आहों ह्याबद्दल कधी भ्रांति रहात नाही. आता सर्व प्रमुख राष्ट्रांनी एकाच आकाराचीं व वजनाचीं नाणीं व पोटनाणीं पाडल्यास स्वतःची टांकसाळ नसणाऱ्या देशांतही त्यांचा शिरकाव होईल व अशारीतीने जगाच्या कोनाकोपऱ्यांतसुद्धा एतद्विषयक सुधारणेचा प्रवेश झाल्यावांचून राहणार नाही. हिंदुस्थानांतील परिस्थिति ध्यानांत आणल्यास नाणां कवैचित्र्यापासून होणाऱ्या अडचणींची व त्रासाची कल्पना चांगली करितयेईल. ब्रिटिश अमलांतील मुलुखांतच इतकीं नानाप्रकारचीं वजनें व मापें चालू आहेत की, त्यांचा परस्परसंबंध समजून घेणें म्हणजे एक जबर अध्ययनच होणार आहे. ह्यामुळे व्यापारास हरकत येते. नवीन व्यापारी फार फसतात व प्रवाशास तर हा घोटाळा कांहीच उकलत नाही. दुकानदार सांगेल तितकी किंमत देऊन तो देईल तितका जिन्नस निमूटपणें घ्यावा लागतो. हा प्रकार इतका असह्य आहे की, तो अद्यापि सरकारने चालू ठेवला आहे ह्याचें आश्चर्य वाटतें. कांही ठिकाणीं तर एका जिल्ह्यांत नव्हे तर एका तालुक्यांतही सर्वत्र सारखींच वजनें व मापें असत नाहीत, एवढेंच नाही तर एकाच ठिकाणीं निरनिराळ्या जिनसांचें कोष्टक वेगळें वेगळें असतें. एक नाण्याप्रमाणे सर्वत्र एक माप सरकारने कां करूं नये समजत नाही. ब्रिटिश सरकारने एक पद्धतीचीं नाणीं सर्वत्र चालू केल्याबरोबर संस्थानांतूनसुद्धा जुनीं नाणीं बंद होऊन ह्याच नाण्यांचा वापर सुरू होत चालला आहे. हिंदुस्थानासंबंधाने जसा हा प्रकार अनुभवसिद्ध आहे तसाच वर निर्दिष्ट केलेला सिद्धांत एकंदर जगासंबंधीं खरा होण्यास हरकत नाही.

## अन्तर्राष्ट्रीय पैशापासून होणारे तोटे

सर्व राष्ट्रांत एकच पैसा दृढ झाल्याने कांही अनिष्ट गोष्टी घडून येतील

ह्यांत शंका नाही. उदाहरणार्थ, एखादें राष्ट्र ठरीव प्रमाणाहून किंचित् कमी कसाचें नाणें पाडण्याचा संभव आहे. असें झाल्यास ग्रेशामच्या नियमाप्रमाणे हीं कमी कसाचीं नाणीं पूर्ण कसाच्या नाण्यांना हद्दपार करूं शकतील. फ्रान्स देशांतील टांकसाळ ह्या बाबतींत दोषाई आहे. तेथील सोन्याचें नाणें काळजीपूर्वक तपासलें तर असें आढळतें की, १००० त ९०० भाग शुद्ध सोनें असावयाचें त्याऐवजी ८९८ अगर ८९९ भाग असतें. सरकारी नियमाप्रमाणे २ भागांची सवलत मिळून हीं नाणीं कायदेशीर आहेत हें खरें, तथापि ह्या सवलतीचा टांकसाळीच्या अधिकाऱ्यांनी दुरुपयोग केला असें म्हटलें पाहिजे. कोणत्याही टांकसाळेंत पाडलेलीं नाणीं एकंदरांने ठरीव कसाचीं असलींच पाहिजेत. सवलत जी ठेवली आहे ती फक्त एखादद्दुसऱ्या नाण्यांत कामगाराच्या हस्तदोषामुळे फरक पडणें शक्य आहे त्याकरता होय.

परंतु निरनिराळ्या राष्ट्रांचा कायदेशीर करार झाल्यानंतर नाणें पाडणारें कोणतेंही मातब्बर राष्ट्र या तऱ्हेने हजारांत १।२ हिस्से सोन्याचा नफा मिळविण्याचा प्रयत्न जाणूनबुजून करील अशी कल्पना करवत नाही. ऐक्य संपादन करण्याकरिता निरनिराळ्या राष्ट्रांतील टांकसाळींच्या अधिकाऱ्यांनी एकत्र जमून सर्व टांकसाळींत एकाच तऱ्हेचीं यंत्रें व सांचे वापरण्याचा विचार करावा हें बरें. नाणें पाडण्याच्या बाबतींत एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या प्रामाणिकपणाविषयीं शंका बाळगण्याचें कारण पडेल असें अनुभवावरून दिसत नाही. स्पेन, मेक्सिको, हे दोन देश पैशाच्या कामांत प्रामाणिकपणाचे पुतळे आहेत असें आपण समजत नाही; तथापि त्या देशांतील टांकसाळींत पाडलेल्या रुप्याच्या डॉलरांचें वजन व कस हीं इतकीं ठरीव प्रमाणाबरोबर असत कीं, गेलीं शंभर वर्षें हीं नाणीं जगाच्या बहुतेक भागांत वजन केल्यावांचून लोक वापरीत आले आहेत. एके वेळीं तर इंग्लंडमध्येसुद्धा हीं नाणीं सुरू झालीं होतीं. एकमेकांचे तह झाले नसतांही आजमितीसही कित्येक राष्ट्रांचीं नाणीं अन्य देशांत कायदे-

शीर फेडीचें चलन म्हणून मानलीं जात आहेत. यावरून अन्तर्राष्ट्रीय चलनाची शक्यता सिद्ध होते. इंग्रजी सॉव्हरिन नाण्यांचीही हीच स्थिति आहे. ब्रिटिश मुलखांत व वसाहतींत हीं नाणीं चालतातच; परंतु पोर्तुगाल, इजिप्त, ब्रेझील ह्या देशांत व क्वचित् अन्यत्रही चालू आहेत. युरोपखंडांत पुष्कळ ठिकाणीं नेपोलियन वापरले जात आहेत. हॉलंडचा डयूकटही सर्वत्र अभिप्रेत आहे आणि डॉलरचा प्रसार तर फारच आहे हें वर पुष्कळदा सांगितलेंच आहे.

## द्रव्यपद्धतींचा परस्परविरोध

अतर्राष्ट्रीय चलन होण्यास मुख्य अडचण ही आहे की, फ्रेंच, इंग्लिश अमेरिकन आणि जर्मन ह्या प्रमुख लोकांची स्वतःची विशिष्ट चलनपद्धति आहे. ती ते लोक कांही स्तुत्य कांही अस्तुत्य हेतूमुळे सोडून देण्यास तयार नाहीत. यांपैकी कोणाचीही चलनपद्धति सर्वतोपरी निर्दोष म्हणून निखालस उत्तम आहे असें म्हणतां यावयाचें नाही. प्रत्येकांत कांही गुण व दोष आहेतच. यामुळे सर्व राष्ट्रांची एकवाक्यता होण्याला अडचण पडली आहे. फ्रेंच, इंग्लिश, आणि अमेरिकन यांना आपआपल्या चलनपद्धतीचा अभिमान बाळगण्यासारखें पुष्कळ आहे, नाही असें नाही. फ्रान्सच्या चलनपद्धतीचा मूलस्तंभ फ्रँक हें नाणें होय व ही पद्धति अगदी पूर्ण दशांशात्मक आहे. शिवाय बेलजियम, स्वित्झर्लंड, इटली या देशांत तीं नाणीं मान्य झालीं आहेत.

इंग्लिश लोकांचें म्हणणें असें आहे की, पौंडाचा पोटभेद जरी प्रशंसा करण्यासारखा नाही तरी पौंड हा मोलाचें उत्कृष्ट परिमाण आहे. हें नाणें सोन्याचें असून इतर सर्व देशांतील परिमाणांत मोठें आहे, त्यामुळे राष्ट्राच्या वाढत्या संपत्तीस तें सोयीचें आहे. युरोप खंडांत पोर्तुगाल देशांत व शिवाय ऑस्ट्रेलिया, पॉलेनेशिया आणि आफ्रिकेंतील वसाहती या ठिकाणीं हें नाणें चालू आहे. हिंदुस्थानच्या अफाट देशांतही हें एका काळीं चालू होतें. इंग्लिश लोकांचा व्यापार सर्व जगाशीं असल्यामुळे जगांतील सर्व

लोकांना ह्या नाण्याचा परिचय झाला आहे.

अमेरिकन लोकांचा डॉलर यांतही पुष्कळ चांगलेपणा आहे. याचा पोटभेद दशांशात्मक असून मोठ्या सोईचा केला आहे हें पुढे दिसेल. दोन-तीनशें वर्षे फैलावून राहिलेल्या व जमाखर्ची पैसा म्हणून मानलेल्या नाण्यांशीं याची सदृशता असल्यामुळे त्याची योग्यता अनुभवसिद्ध स्थापित झाली आहे; आणि सर्वांत विशेष हें की, सर्व जगांत लोकसंख्येने, संपत्तीने, आणि सामर्थ्याने निःसंशय अत्युच्च पद मिळवणाऱ्या राष्ट्राचें हें दशांगीकृत नाणें होय.

## अन्तर्राष्ट्रीय पैशासंबंधी वाटाघाटी

इ० सन १८९५ मध्ये पॅरिस शहरांत वजनें, मापें, नाणीं यांची सरसकट दशांशात्मकपद्धति सर्वत्र सुरू करून घेण्यासाठी निरनिराळ्या राष्ट्रांतील गृहस्थांची एक सभा स्थापन झाली आणि ह्या सभेच्या इंग्रजी शाखेचें मोठ्या जोराने काम चाललें. इ. सन १८५७ सालीं संयुक्त संस्थानांनी चलनेंस्याबद्दल कांही सूचना केल्या. इ. सन १८६० आणि १८६३ सालीं लंडन आणि बर्लिन येथे महत्त्वाच्या सभा भरल्या. ह्या सभांस निरनिराळ्या राष्ट्रांतील लोक हजर होते. बर्लिन येथील सभेंत फार महत्त्वाचे ठराव पास करण्यांत आले, त्याचा विचार पुढे करण्यांत येईलच. पुढे बेल्जम, फ्रान्स, स्विट्झर्लंड आणि इटली ह्या देशांच्या निकट सान्निध्यामुळे, तसेंच फ्रान्स देशांतील सोन्यारुप्याचें नाणें परहद्दींत जाण्याचें बंद करणें दुरापास्त झाल्यामुळे ह्या प्रश्नाची पुन्हा उचल झाली आणि इ. सन १८६५ च्या दिसेंबर महिन्यांत अन्तर्राष्ट्रीय चलनाचा कांही विचार झाला.

इ. सन १८६३ च्या सभेचा ह्यासंबंधाचा रिपोर्ट फार महत्त्वाचा आहे. रुप्याचीं आणि ब्रॉंझ धातूचीं उपनाणीं असून मुख्य नाणें सोन्याचें असणें फार सोईचें आहे, असा अभिप्राय या सभेने दिलेला आहे; मुख्य नाण्यांत १० मध्ये ९ भाग शुद्ध धातु असावी असें नमूद केलें आहे; नाण्याचें वजन

किती व कसें असावें याबद्दल सूचना केल्या आहेत आणि अखेरीस विद्यमान परिमाणाचा परस्परांशीं संबंध जुळण्याकरिता युक्ति सुचविली आहे.

इ. सन १८७० सालीं जर्मनीबरोबर युद्ध सुरू होण्यापूर्वी फ्रान्सने साक्षीपुरावा घेऊन ह्या विषयाची वाटाघाट करण्याकरिता एक कमिशन बसविलें. या कमिशनने ३७ साक्षीदार तपासले; त्यावरून असें दिसतें की, सोन्याचें एकच मुख्य परिमाण असावें अशाबद्दल बहुमत होतें.

सुदैवाने विद्यमान मुख्य परिमाणें फ्रांकाच्या विभाज्य संख्येच्या जवळ जवळ येतात. खालील कोष्टकावरून त्या परिमाणांच्या विद्यमान किंमती व उद्दिष्ट फेरफारांचें प्रमाण हीं कळतील.

| | फ्रँकांत विद्यमान किंमत | फ्रँकांत उद्दिष्ट किंमत |
|---|---|---|
| फ्रँक | १ | १ |
| फ्लॉरिन ( ऑस्ट्रिया : रुप्याचा ) | २·४७ | २½ |
| डॉलर ( अमेरिकन : सोन्याचा ) | ५·१८ | ५ |
| पौंड स्टर्लिंग | २५·२२ | २५ |

फ्लॉरिनची किंमत शेंकडा १·२१ ने वाढविली पाहिजे आणि डॉलर व पौंड ह्यांची किंमत अनुक्रमें शेंकडा ३·५ आणि ०·८८ ह्या प्रमाणाने कमी केली पाहिजे; म्हणजे त्यांच्यामध्ये अगदी सोपें प्रमाण बसेल. अशा रीतीने चालू असलेल्या परिमाणांत कळे न कळेसा बदल केल्यास एका नाण्यांतील हिशोब दुसऱ्या नाण्यांत करण्यास सुलभ जाईल. शिवाय ह्या नाण्यांत एक प्रकारचें अन्तर्राष्ट्रीयत्व येईल. इंग्लिश पौंड फ्रान्सांत २५ फ्रँकांच्या ऐवजी व अमेरिकेंत ५ डॉलराच्या ऐवजी वापरतां येईल. अमेरिकेचा सोन्याचा डॉलर फ्रान्सांत एकु नाण्याच्या जागीं व इंग्लंडांत चार शिलिंगांच्या ऐवजीं चालवितां येईल. ह्यांपैकी एकच प्रमाण पतकरण्याबद्दल वरील सभेने आग्रह धरिला नाही; पण ज्या राष्ट्रांचें परिमाण ह्यांतून एकही नसेल त्यांनी ह्यांपैकी वाटेल त्याचा स्वीकार करावा अशी शिफारस केली. ह्या कल्पनेचा जर आजपर्यंत निरभिमानाने विचार झाला असता,

तर अन्तर्राष्ट्रीय चलनाची कल्पना सिद्धीस जाण्याचे दिवस मागेच आले असते. ह्यानंतर जर्मनी व स्कँडिनेव्हिया ह्या देशांनी आपआपल्या चलनांत सुधारणा केली खरी; पण ती वरील विचारास अनुसरून केली नाही.

## इंग्लिश नाण्यांचें दशांशीकरण

इ. सन १८२४ मध्ये प्रथमतः पार्लमेंटमध्ये पौंडाचा दशांशात्मक पोटभेद करण्याची सूचना लार्ड राटेस्ले साहेबानी आणल्यापासून पुष्कळ वादविवाद होऊन नाण्यांच्या नवीन रचनेबद्दल निरनिराळ्या कल्पना निघाल्या आहेत; तथापि कोणतीही कल्पना अगदी निर्दोष नसल्यामुळे पूर्वस्थिति अद्यापि कायम आहे. ह्यांपैकी दोन कल्पना मात्र विचार करण्यासारख्या आहेत.

फार्दिंग हा पौंडाचा जवळ जवळ हजारावा हिस्सा आहे, ह्या गोष्टीवर पहिल्या कल्पनेची इमारत उभारली आहे. ९६० फार्दिंगांचा एक पौंड होत असल्यामुळे शेंकडा ४ प्रमाणाने फार्दिंग कमी केला म्हणजे अगदी शेवटचें पोटनाणें दशांशात्मक होईल. ह्या नाण्यास मिल म्हणावें, एक पेनी पांच मिलांबरोबर करावा. १०० मिलांबरोबर एक फ्लॉरिन व ५०० मिलांबरोबर अर्धा सॉव्हरिन हीं नाणीं आहेतच. हल्लीचें व सुचविलेलें कोष्टक येणेंप्रमाणे.

| विद्यमान | सुचविलेलें |
|---|---|
| ४ फार्दिंग = १ पेनी. | ५ मिल = १ पेनी. |
| १२ पेन्स = १ शिलिंग | १०० मिल = १ फ्लॉरिन. |
| २ शिलिंग = १ फ्लॉरिन | ५०० मिल = १ अर्धा सॉव्हरिन. |
| १० शिलिंग = १ अर्धा सॉव्हरिन. | |
| २० शिलिंग = १ पौंड. | |

मिल हें नाणें फारच लहान होतें असा आक्षेप आहे; पण त्यांत कांही अर्थ नाही. कारण फ्रेंच चलनपद्धतींतील शेवटल्या नाण्याहून हें २$\frac{1}{2}$ पटीने व जर्मनीच्या शेवटल्या नाण्याहून १$\frac{1}{२५}$ पटीने मोठें आहे.

१० फ्रँक १०० पेन्सांच्या अगर ८ शिलिंगांच्या जवळ आहेत. ह्या गोष्टीवर दुसऱ्या कल्पनेची उभारणी आहे. म्हणून ह्या लोकांचें म्हणणें असें आहे की, आठ शिलिंगांच्या किंमतीचें उपनाणें म्हणून १० फ्रांकांचें सोन्याचें नाणें नवीन पाडलें म्हणजे फ्रेंच पद्धतीशीं साम्य आलें. शेंकडा ४ प्रमाणाने पेनीची किंमत कमी केली व शिलिंगाच्या ऐवजी दहा पेन्सांचें नाणें पाडलें म्हणजे दशांशात्मक पद्धति झाली. ह्या कल्पनेंत पौंडाला जागा नाही. तेव्हा पौंडातून फ्रँकांत हिशोब करण्यास लोक तयार होणार नाहीत.

## जर्मनींतील नाण्यांची सुधारणा

ह्या देशाने आपली चलनपद्धति सुधारण्याच्या पूर्वी तेथे सगळा गोंधळ होता. भिन्न "जाती" चीं तीन चार तऱ्हांचीं नाणीं तेथे एकवट चालत. मुख्य परिमाण रुप्याचें होतें. नवीन सुधारणेने रुप्याच्या ऐवजी सोन्याचें मुख्य परिमाण ठरलें. हें आदिपरिमाण मार्क नांवानें आहे. त्यांत ६·१४६५ ग्रेन सोनें असतें. कसाचें प्रमाण १० त ९ भाग असतें. एका मार्कांची किंमत सुमारें ११$\frac{3}{4}$ पेन्स होते. मोठें नाणें वीस मार्कांचें आहे. त्याचें वजन १२२·९२ ग्रेन असून त्यांत ७·१६८४५९ ग्रॅम शुद्ध सोनें असतें. ह्याच्या अर्ध्या वजनाचें दहा मार्कांचें नाणें आहे. उपनाणीं इंग्लिश धर्तीवर रुपें, निकल व तांबें या धातूंचीं आहेत. नाणेंपाडणावळ शेंकडा ११·१११ होते. हा कर फ्रान्स व इंग्लंड ह्या दोन्ही देशांतील टांकसाळीच्या दराहून जास्त आहे. फ्रान्सबरोवर जर्मनीचें युद्ध जुंपलें नसतें तर त्या देशांतील चलनपद्धति फ्रान्सच्या चलनपद्धतीस अनुसरून झाली असती. एका सॉव्हरीनामध्ये ७·३२२४ ग्रॅम शुद्ध सोनें असतें. योजलेलें पंचवीस फ्रँकांचें नाणें पाडलें तर त्यांत ७·२५८१ ग्राम शुद्ध सोनें असेल. परंतु ह्या दोन्हीमधील प्रमाण सोडून देऊन जर्मनीने आपलें वीस मार्कांचें नाणें ७·१६८५ ग्रॅम सोन्याचें केलें आहे.

## पोटनाण्यांची रचना अथवा क्रम

किंमतीच्या आदिपरिमाणाची एकदा निवड झाली म्हणजे मग त्याचे

कोणत्या तऱ्हेने पोटभाग करावे हा प्रश्न उपस्थित होतो. सामान्यतः द्व्यंश, द्वादशांश आणि दशांश अशा तीन प्रकारच्या पद्धति पोटनाणीं पाडण्याच्या आहेत. पहिल्या पद्धतीवर आपल्या इकडील पोटनाण्यांची रचना केली आहे. रुपयाचे पोटभाग हल्लीच्या नाण्यांप्रमाणे बसतात ते असे:— $\frac{१}{२}$; $\frac{१}{४}$; $\frac{१}{८}$; $\frac{१}{३२}$; $\frac{१}{६४}$. द्वादशांश पद्धतीचीसुद्धा छाया आपल्या नाण्यांवर पडली आहे. उ. १२ पै म्हणजे १ आणा. ३ पैचा एक पैसा होतो. ही पोटनाण्यांची रचना फार जुनी आहे. ब्रिटिश अमलापूर्वी पै होतीशी दिसत नाही; पण पैच्या जागीं निदान हिशोबांत तरी रुका नांवाचें नाणें धरलें जात असे. ३ रुके म्हणजे एक पैसा होई. नेपाळांतहि रुपयाचे पोटभेद $\frac{१}{२}$; $\frac{१}{४}$; $\frac{१}{१६}$, $\frac{१}{३२}$; ह्याप्रमाणे आहेत. त्यावरून आण्याचें नाणें तेथे होतें असें दिसतें. फार प्राचीन म्हणजे स्मृतिकालीं दशांशपद्धति असल्याचेंहि दिसून येतें. मनूच्या कोष्टकांत १० पलें म्हणजे एक धरण होतो व १० रुप्याचे धरण म्हणजे १ शतमान होतें. तसेंच अमरकोशांतलें पुढील कोष्टक येणेंप्रमाणे:—

१०० पल = १ तुला.

२० तुला = १ भार.

१० भार = १ आचित.

इंग्लंडच्या नाण्यांत ह्या तीनहि पद्धतींचें संमिश्रण आहेच.

ह्या तीन्हींपैकी कोणतीहि टाकाऊ नसल्यामुळे फार प्राचीन काळापासून तीनहि चालत आल्या आहेत. प्राचीन इटली देशांत ॲपिनाइन्सच्या दक्षिणेस द्वादशांशात्मक व उत्तरेस दशांशात्मक पद्धति चालू होती. सिसिली-मध्ये ह्या दोन्ही पद्धति एकवटलेल्या असत. चीन देशांत अति प्राचीन काळापासून अगदी निर्भेळ दशांशपद्धतिच चालत आली आहे. इंग्लंडांत द्वादशांश व द्व्यंश भाग फार कालापासून होते. ह्यांत द्व्यंशपद्धतींत सोकर्य जास्त आहे हें कोणीहि कबूल करील. कारण ह्यांत फक्त २ ह्या आंकड्या-चीच जरूर लागते. द्वादशांश क्रमामध्ये ही सोय आहेच. १२ चे भाग २×२×३ असे पडतात. ह्यांत २ चा आंकडा दोनदा येऊन त्याच्या

पुढला आंकडाहि सांपडतो. दशांशाचा क्रम मात्र इतका बाळबोध नसून सोयीचाहि नाही. १० चे गुण्यगुणक २ आणि ५ इतकेच पडतात. पांच हा कांही चांगलासा अंश नाही; परंतु आपल्या अंकांची मांडणी दशांशांत असल्यामुळे ह्या पद्धतीची आपणांस संवय झाली आहे. पूर्वी बोटांवरून मोजण्याची चाल असल्याने व बोटें दोन्ही हातांचीं मिळून १० असल्या-कारणाने सर्व मानव जातीला हा क्रम दृढ परिचित आहे. आपले सर्व हिशोब दशांशांत चालतात. सबब वजनें, मापें, नाणीं ह्याच क्रमाने असणें सोयीचें आहे.

अगदी शुद्ध दशांश क्रमाचें अवलंबन केलें तर येणेंप्रमाणे भाग बसतील.

१०००, १००, १०, १, ०·१, ०·०१, ०·००१. ह्यांमध्ये अंतर फार रहतें. जास्त किंमतीचें वरचें नाणें येण्यापूर्वी १० नाणीं मोजावीं लागतात. हा त्रास चुकवण्याकरिता फ्रेंच पद्धतींत आणखी भर घातली आहे त्याचा क्रम असा आहे :

१, २, ५, १०, २०, ५०, १००, २००, ५००, इ. ह्यांत प्रत्येक भाज्याचा अर्धा व दुप्पट भाग आला आहे. अमेरिकन चलन-पद्धतींत तीनहि प्रकारचे क्रम येतात. आपल्या हल्लीच्या पद्धतींत दशांशाला थारा नाही.

## अन्तर्राष्ट्रीय पैशाच्या आदिपरिमाणाची निवड

हें परिमाण कायम करितांना कोणत्या गोष्टीचा विचार करणें अवश्य आहे ह्याचा थोडासा ऊहापोह हा भाग संपण्याच्यापूर्वी करण्याचा हेतु आहे. वाढत्या संपत्तीस उपयोगी पडेल असें मोठ्या किंमतीचें आदिपरि-माण पाहिजे असें कित्येकांचें मत आहे. पौंडाच्याऐवजी रुपया हें परिमाण स्वीकारल्यास एका आंकड्याच्या जागीं दोन आंकडे वापरावे लागतात. ह्या आक्षेपांत अगदीच अर्थ नाही असें नाही; तथापि हें विसरतां कामा नये की, एकच परिमाण–मग तें कोणतेंहि असो– प्रत्येक प्रकारच्या संख्येचा निर्देश करण्यास सोयीचें पडणें शक्य नाही. अवश्य पडेल त्याप्रमाणे मुख्य

परिमाणाचें भाज्य किंवा भाजक ह्याचा उपयोग केला पाहिजे. कामावर घेतलेल्या मजुराच्या रोजच्या मजुरीचा निर्देश करावयाचा असल्यास तो आण्यांतच केला पाहिजे. एखाद्या अधिकाऱ्याच्या दरमहाच्या पगाराविषयी बोलावयाचें असल्यास रुपयांमध्ये बोलावें लागेल. व्यापाऱ्याचें अगर पेढीवाल्याचें उत्पन्न सांगावयाचें असल्यास तें हजारांत सांगितलें पाहिजे. संस्थानच्या उत्पन्नाचा लाखांत उल्लेख केला पाहिजे व राष्ट्राची जमा कोटिसंख्येनें व्यक्त करावी लागेल. पोर्तुगीज लोकांचें आदिपरिमाण री नांवाचें आहे त्याची किंमत इंग्रजी पेनीच्या १९ व्या अंशाइतकी आहे. जगामध्यें ह्याच्याइतकें लहान आदिपरिमाण दुसरें नाही. सारांश, अमक्याच संख्येचें परिमाण पाहिजे असा आग्रह धरण्याचें कारण नाही.

मुख्य परिमाणाचे पोटभाग कसे असावे हा विचार मात्र फार महत्त्वाचा आहे. पोटभाग दशांशात्मक असले पाहिजेत हें ठरलेंच, पण हा पोटभेद असा पाहिजे की, त्यांतील शेवटचें नाणें व्यापारी हिशोबांत ज्या अगदी अति लहान संख्येचा अन्तर्भाव केला जातो त्या संख्येच्या किंमतीचें असावें. आता एक फ्रँक म्हणजे १०० सँतीम होतात. तेव्हा एका सँतीमची किंमत एकदशांश पेनीहूनही कमी आहे. एक आणि दोन सँतीमची ब्रॉंझ धातूचीं नाणीं फ्रेंच सरकारनें पाडलीं होतीं, पण तीं कोणी वापरीना. पावबिस्किटांचे दुकानांत त्यांचा कदाचित् खप झाला असला तरी पण हिशोबांत कोणीही तें धरीना. फ्रेंच व्यापारी पांच सँतीम मात्र हिशोबांत घेतो. पोर्तुगीज लोकांचें आदिपरिमाण री हें इतकें सूक्ष्म आहे की त्याचें निदर्शक नाणेंच नाही. तथापि जमाखर्च मात्र ह्या परिमाणांत होतो. हा निरर्थक घोटाळा होय.

इंग्लंडांत शेवटचें नाणें फार्दिंग होय; परंतु हिशोबांत फार्दिंग कोणी धरीत नाहीत. हिशोब करतांना पेन्साच्याबाहेर कोणी जात नाहीत. तेथील पोष्टऑफिसाच्या नियमांत एका पेनीहून कमी किंमतीच्या नाण्याचा हिशोब करूं नये असा एक नियम आहे; परंतु पेनी हा पौंडाचा शंभरावा

हिस्सा नाही अगर हजाराबाहा हिस्सा नाही. दशांशाची पद्धति तेथे सुरू केली तर हिशोबांत अति लहान मिल नाणें घ्यावें लागेल.

हिंदुस्थानांत पै हें शेवटचें नाणें होय. रुपयाचा हा १९२ वा हिस्सा आहे. ह्याच्या खालील नाणें बहुधा व्यवहारांत लागत नाही. जेथे लागतें तेथे कांही ठिकाणीं कवड्या वापरतात; पण हिशोबांत कवड्या कोणी धरीत नाहीत. कांही रेलवे कंपन्या तर पैचाही हिशोब करीत नाहीत. आणा हाच त्यांचा शेवटचा पैसा होय.

अमेरिकन पद्धति ह्या बाबतींत अपवादरहित आहे. एका डॉलराचे १०० सेंटपर्यंत भाग पाडले असून प्रत्येक सेंटाची किंमत अर्ध्या पेनीइतकी आहे. अर्ध्या सेंटाचीं नाणीं पाडलीं आहेत व बारीकसारीक व्यवहारांत त्यांचा उपयोग क्वचित् केला जातोही; पण हिशोबांत तीं कोणी धरीत नाही. हिशोबांत जमेस धरण्यासारखें जें अगदी हलकें नाणें अवश्य लागतें त्याचें काम सेंटाने भागत असून शिवाय तें डॉलराचा शंभरावा हिस्सा असल्यामुळे हिशोब करण्यास सुलभ जातें. हिशोबांत धरलें जाणारें शेवटलें नाणें हेंच आदिपरिमाण मानावें किंवा नाही हा एक प्रश्नच आहे. खरें म्हटलें तर सेंट, डॉलर अगर ईगल ह्यांपैकी वाटेल त्यास निरनिराळ्या प्रसंगीं आदिपरिमाण मानण्यास हरकत नाही. आदिपरिमाणाच्या संख्येचा अगर किंमतीचा विचार अगदी गौण आहे. मुख्य गोष्ट ही आहे की हें आदिपरिमाण अगर ह्याचा कोणताही दशांशात्मक भाग हिशोबांत धरल्या जाणाऱ्या शेवटच्या संख्येच्या किंमतीइतका पाहिजे. अशा दृष्टीने पाहतां डॉलर हें उत्कृष्ट आदिपरिमाण होय. तथापि डबलडॉलर अथवा सोन्याचें दहा फ्रँकांचें नाणें हें ह्या कामीं जास्त सोयीचें होईल कीं नाही हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. राष्ट्रांची संपत्ति वाढून सोन्याची किंमत उतरल्यास हिशोबांत न धरण्याइतकें सेंट नाणें लहान होईल. असें झाल्यास पेनी जास्त सोयीवार पडेल. सारांश सोन्याचें दहा फ्रँकांचें नाणें हें सर्व जगाचें आदिपरिमाण होण्यास योग्य आहे. सोन्याचा डॉलर आणि पांच

फ्रँकांचें नाणें हीं फार लहान असल्यामुळे लवकर झिजतात. तशा प्रकार दहा फ्रँक नाण्याचा होणार नाही.

## भाग पंधरावा
## विनिमयाचें साधन

धातुमय द्रव्याचें येथपर्यंत पूर्ण विवेचन केल्यावर आतां आपण धातूंचा काटकसरीनें उपयोग करतां यावा, अगर तो मुळीच टाळावा ह्या हेतूनें ज्या राष्ट्रांत व्यापार फार वाढला आहे, अशा राष्ट्रांत ज्या युक्त्या आपोआप निघतात त्यांचा विचार करूं. सुव्यवस्थित चलनपद्धतीच्या उपयुक्ततेचा लोकांस अनुभव येत आहे तोंच त्यांस असें आढळून येतें कीं, विनिमयसामान्य म्हणून पैशाचा उपयोग करण्याची मुळीच अवश्यकता नाही. कारण मग अदलाबदलीशीं निकट साम्य पावणाऱ्या व्यापारी तऱ्हेचा फैलाव होऊं लागतो. व्यापाराचा आरंभ व अखेर अदलाबदलींत होतो असें जरी आहे, तथापि अखेरचें अदलाबदलीचें स्वरूप, पहिल्या स्वरूपाहून भिन्न आहे. खरेदीविक्री पैशांतच केली जाते; पण मालाच्या मोबदला पैसे न देतां तितक्याच किंमतीचा माल दिला जातो. ज्या कागदांवरून नाणें मिळेल असे कागद केव्हां केव्हां मध्ये येतात, नाही असें नाही; पण ह्या कागदांचा उपयोग क्वचित्च केला जातो.

पैशाकडून निरनिराळीं चार, निदान दोन तरी कार्यें होतात हें मागेंच सांगितलें आहे ( भाग ३ ). उद्योगधंद्यांच्या बाल्यावस्थेंत एकाच धातुमय द्रव्यानें निरनिराळीं कार्यें करावीं हें सोयीचेंही असतें; परंतु हा कार्यसंघात सर्व प्रकारच्या परिस्थितींत सोयीवार पडेल असें नाही. आपणांस

पुढे असें दिसून येईल की, किंमतीचें सर्वमान्य निदर्शक म्हणून सोनेंरुपें मानलें जातें. तरीपण देवघेवींत त्याचा प्रत्यक्ष वापर होण्याचें कमी पडतें. पुढच्या भागांत ( २३ ) तर असें विवरण करण्यांत येईल की, मोठया मुदतीच्या व्यवहारांत मुख्य परिमाणाकरता पैशाच्या ऐवजी पदार्थांच्या सरसकट किंमतीचा उपयोग करणें चांगलें.

## विनिमयसामान्यांत एकापुढे एक झालेले फेरफार

आद्यावस्थेंतील अदलाबदलीपासून तों ज्यांत मौल्यवान् धातूंचा अडेल तेथेच उपयोग केला जातो, अशा सांप्रत पूर्णावस्थेस पोचलेल्या व जगद्व्यापी झालेल्या विनिमयतऱ्हेपर्यंत मध्ये कितीतरी उपाय योजण्यांत आलेले होते. धात्वात्मक पैशाचा वापर टाळण्याकरिता आजपर्यंत जे उपाय योजण्यांत आले त्यांचें खाली लिहिल्याप्रमाणे वर्गीकरण करतां येईल:

१ मुख्य पैशाच्या जागीं प्रतिनिधिभूत पैसा वापरणें;

२ खात्यावर मांडण्याची वहिवाट;

३ दर्शनी हुंड्या व वजावाटपद्धति;

४ परदेशीय मुदतीच्या हुंड्या;

५ अन्तर्राष्ट्रीय वजावाटपद्धति.

## प्रतिनिधिभूत पैसा

विनिमय व्यवहार घडण्यास धातुमय पैशाने सुलभता येते हें मागे सांगितलेंच आहे; परंतु सोनेंरुपें वापरणाऱ्या राष्ट्रांच्या लक्षांत कालगतीने असें लवकरच येतें की, धातुगत किंमत फारच अल्प आहे, अशीं उपनाणीं अगर बिनमोलाचे कागदाचे अगर चामड्याचे तुकडेसुद्धा खऱ्या नाण्यांच्या स्वामित्वाचे निदर्शक म्हणून समाजांत वापरले जाण्यास कांही हरकत नाही. सोनें, रुपें अगर तांबें यांच्या स्थानीं प्रथमतः जें वापरलें जातें तें निवळ प्रतिनिधिभूत असतें; परंतु अशा प्रकारचें चलन वापरण्याची समाजास एकदा सवय झाली म्हणजे ह्या प्रतिनिधींना आधारभूत मौल्यवान् धातु काढून घेऊन कवडीमोल चामड्याचे अगर कागदाचे तुकडे वापरण्यांत

ठेवले जातात. ह्यामुळे त्याच्या मोबदला रोख पैसे मिळत नाहीत असें कागदी चलन देशांत सुरू होतें. असें चलन त्या देशाच्या हद्दीच्या बाहेर कोणी पतकरीत नाही.

प्रत्यक्ष धातूंनी सर्व व्यवहार चालविल्यास व्याजाचें नुकसान होतें. कधी कधी तर धातूच नाहीशा होतात. ही गोष्ट परराष्ट्राशीं व्यापार करणाऱ्या मोठमोठ्या व्यापाऱ्यांच्या तेव्हाच लक्षांत येते. ह्यामुळे पुष्कळ वर्षांच्या मागे हुंड्यांनी देवघेव करण्याची पद्धति सुरू झाली व प्रतिनिधिभूत पैशाप्रमाणे त्या एकाकडून दुसऱ्याकडे, दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे धारण्यात येऊं लागल्या. ह्यामुळे अनेक देवघेवींचा निकाल नाणें एकदाच पाठविल्याने होतो.

## दर्शनी हुंडी व वजावाटपद्धति

अदलाबदलीपासून उद्भवणाऱ्या गैरसोयींचा अनुभव न मिळतां विनिमयसामान्याचा प्रत्यक्ष उपयोग टाळण्याचा आणखी चांगला उपाय आहे. परस्परांशीं निरंतर व्यापार करणाऱ्यांस खरेदीच्या किंमतीचे पैसे देणें व विक्रीच्या किंमतीचे घेणें हा क्रम निरर्थक आहे असें आढळून आलें. दिल्याघेतल्या मालाच्या किंमती ठरवून बाकी ज्याच्याकडे निघेल त्याने ती दिली म्हणजे झालें. शिलकी पैसे पेढीवर सुरक्षित राहण्याकरिता ठेवण्याची वहिवाट सुरू झाली तेव्हा लोकांच्या साहजिकच लक्षांत आलें की, प्रत्यक्ष पैशाच्या ऐवजी पैसे देण्याबद्दल चिठी दिली म्हणजे काम झालें. तसेंच दोन माणसांचा एकाच पेढीशीं संबंध असेल तर त्या दोघांसही आपल्या व्यवहारांत पैशाला शिवण्याचेंसुद्धा कारण नाही. जी बाकी उरेल तिचा पेढीवर जमाखर्च झाला म्हणजे झालें. अशाच रीतीने निरनिराळ्या पेढीवाल्यांनी केलें म्हणजे त्यांनाही प्रत्यक्ष पैसे देण्याघेण्याचा प्रसंग पडणार नाही. हा प्रकार इंग्लंड व अमेरिका ह्या दोन देशांत मोठ्या विस्तृत प्रमाणावर चालू आहे. अशा रीतीने देशांतल्यादेशांत लोकांच्या सर्व मोठमोठ्या देवघेवींचा निकाल नुसता जमाखर्च मांडून केला जातो.

भाग सोळावा

# प्रतिनिधिभूत पैसा

प्रतिनिधिभूत पैसा सांप्रत चोहोंकडे कागदाचाच असल्यामुळे धात्वात्मक व कागदी हे दोन भेद आपण हल्ली पैशाचे मानितों; तरी पण ह्या प्रतिनिधिभूत पैशाचें काम करण्यासाठी कागदाशिवाय दुसऱ्या कित्येक पदार्थांचा आजवर उपयोग झाला आहे, हें विसरतां कामा नये. सारांश, नेहमी धातुगत किंमतीनेच वापरल्या जाणाऱ्या मुख्य नाण्यापासून तों हजारों रुपयांच्या ऐवजी वापरल्या जाणाऱ्या बिनमोल कागदी चिटोऱ्यांपर्यंत पायरीपायरीने आपण आलों आहों.

आठव्या भागांत सांगितलेलीं उपनाणीं हीं कांही अंशीं प्रतिनिधिभूत पैशाप्रमाणेच होत. कारण त्यांची किंमत आंतील धातूवर अवलंबून नसून त्यांच्याऐवजी जितकीं मुख्य नाणीं मिळूं शकतात त्यांवर अवलंबून असते. देण्याचा करार हा शाईकागदानेच सदोदित निर्दिष्ट केला पाहिजे असा कांही नियम नाही. तो करार धातूच्या तुकड्यावर ठशाच्यायोगाने आणखी जास्त चिरकाल राहील अशा रीतीने उठवितां येईल. ह्याची प्रतीति इंग्लंडच्या इतिहासावरून येण्यासारखी आहे. आपल्या चलनपद्धतींत तांब्याचें नाणें सुरू केल्याने तिची योग्यता कमी होईल अशा बेढगळ समजुतीने एलिझबेथ राणीपर्यंत इंग्लंडच्या राजांनी तांब्याचें नाणें पाडिलें नाही. अर्थात् अल्पस्वल्प व्यवहार करितांना लोकांची मोठी अडचण पडूं लागली. ही उणीव दूर करण्याकरिता तेथील व्यापाऱ्यांनीच उपनाणीं पाडून तीं वापरण्याचा उपक्रम केला. हीं नाणीं आरंभीं आरंभीं तर शिशाचीं, पितळेचीं अगर चामड्याचींही होतीं. १८ व्या शतकांत

तीं प्रायः तांब्याचींच पाडीत. कित्येक वेळां तीं नाणीं प्रॉमिसरी नोटी म्हणून समजावयाचीं असा त्यांच्यावर स्पष्ट उल्लेख असे. साउदॅम्पटन् येथे इ० सन १७९१ सालीं घडलेल्या नाण्यांवर येणेंप्रमाणे लेख आहे: 'टेलर, मुडी आणि कंपनी ह्यांच्या ऑफिसांत वटवतां येईल असा अर्धा पेनी प्रॉमिसरी'. अगदी अलीकडे न्यू साउथ वेल्समध्ये लहान किंमतीच्या नाण्याची मोठी टंचाई भासली, तेव्हां व्यापाऱ्यांनी तांब्याचीं आणि ब्रॉस धातूचीं उपनाणीं सुरू केलीं. हीं इ० सन १८७० पर्यंत चालत होतीं.

पूर्वीच्या लोकांना मुख्य व उपनाणीं ह्यांतील फरक ठाऊक होतासें दिसतें. लॅसिडीमोनिअन् लोकांचा लोखंडी पैसा हें कायदेशीर फेडीचें मुख्य चलन असावेंसें दिसतें. कारण अवजड, अल्प किंमतीचें असें त्याचें वर्णन आढळतें. बायझंटाईन लोकांचा लोखंडी पैसा हा तर प्रतिनिधिभूत उपपैशाप्रमाणे वापरला जात असे. हल्लींच्या कागदी नोटींच्या स्वरूपाचे पैसे प्राचीन राष्ट्रें वापरीत असत हें पुढे दिलेल्या माहितीवरून दिसून येईल.

## प्रतिनिधिभूत पैशाचा प्राचीन इतिहास

प्राचीन राष्ट्रांना कागदी पैशाचा उपयोग माहीत नव्हता, ह्याचें कारण इतकेंच की, त्यांच्याजवळ कागदच नव्हता. परंतु हल्लीं आपण कागदी पैशाचा उपयोग ज्या तत्त्वावर करितों, त्या तत्त्वानुसार प्रतिनिधिभूत पैशाचा ते उपयोग करीत नव्हते हें मानणें चुकीचें होईल.

प्राचीन काळीं प्राण्यांच्या कातड्यांचा विनिमयसाधनाऐवजी उपयोग करीत हें मागे सांगितलेंच आहे. गजाच्या शिक्क्याचे कातड्याचे लहान लहान तुकडे हें प्रतिनिधिभूत पैशाचें प्राथमिक स्वरूप होय. अवजड कातडीं वापरण्यास गैरसोईची भासूं लागल्याबरोबर त्यांचा तुकडा तोडून तो संबंध कातड्याच्या ऐवजी देऊं लागले असावे. केवळ ते तुकडे काढले तेथे ते पुन्हा बसवले म्हणजे मालकी शाबीत होण्यास हरकत पडत नसे.

कागदी पैशाचा आपणांस जो अनुभव आहे त्यावरून असें म्हणण्यास हरकत नाही की, हे लहान कातड्याचे तुकडे वापरण्याची चाल लोकांच्या हार्डीमाशीं खिळली म्हणजे त्या तुकड्याचें प्रतिनिधित्व ते विसरतात आणि सरकारने किंवा दुसऱ्या चामड्याच्या मालकांनी तें सर्व कातडें नाहींसें केलें तरी ते तुकडे बिनदिक्कत वापरतात. रशियांत पुष्कळ दिवस चालणाऱ्या चर्मी पैशाचा इतिहास असाच आहे.

न्यूमाच्या अगोदर रोममध्ये चर्मी पैसे चालत असत अशी एक अंधुक आख्यायिका आहे. त्या पैशाचें स्वरूप काय होतें हें समजणें अशक्य आहे. कार्थेज येथे चामड्याचें चलन होतें ह्यांत शंका नाही. कारण शिक्का मारलेले व एका पदार्थाभोंवती गुंडाळलेले लहान चामड्याचे तुकडे ते वापरीत असें 'एश्चिनस'ने लिहून ठेवलें आहे. शेजारचीं राष्ट्रें हे पैसे पतकरीतसत ह्यावरून त्यांची किंमत ठरीव होती हें उघड आहे.

फार प्राचीन काळीं चीन देशांत मात्र कागदी पैशाचा उपयोग पूर्णपणें होत होता. खिस्ती शकापूर्वी १०० हून जास्त वर्षांच्या मागे एकदा तेथील राजाने युद्धाकरता ज्या रीतीने पैसे जमविले त्यावरून त्या लोकांस चामड्याच्या उपपैशाचा उपयोग पुरा माहीत होता असें दिसतें. पांढऱ्या हरणाच्या चामड्याचे त्या राजाने हे पैसे केले. ह्यासाठी त्याने पांढऱ्या रंगाचीं सर्व हरणें एका बागेंत आणून ठेवून त्याच जातीचे प्राणी बाळगण्याची आपल्या प्रजेस मनाई केली. ह्याप्रमाणे वॉटरमार्क कागदांत 'बँक ऑफ इंग्लंडचा' जसा मक्ता असतो, तसा ह्या पदार्थावर आपलें एकट्याचें स्वामित्व करून त्याने लहान लहान चामड्याचे तुकडे मोठी किंमत ठेवून सुरू केले. इ० स० ८०० ह्या वर्षी ह्या देशांत कागदी चलन होतें. त्यास "उडते पैसे" असें कित्येकांनी नांव दिलें आहे.

११ व्या शतकांत चीन देशांत झाडांच्या सालींच्या कागदाचें चलन चालू होतें. हे कागदाचे चौकोनी तुकडे असून त्यांच्यावर सही शिक्का असे. ह्या नोटी लहान मोठ्या किंमतींच्या असत, व त्यांनी कायदेशीर

फेड करितां येत असे. त्या घेण्याचें कोणी नाकारल्यास त्यास कायद्याने देहांत शिक्षा ठरविलेली होती असें एकाच्या प्रवासवृत्तावरून समजतें. १४ व्या शतकांत ह्या देशांत प्रवास करणाऱ्या दुसऱ्या एका प्रवाशाने कागदी पैशासंबंधी अशीच हकीकत दिली आहे व शिवाय आणखी असें म्हटलें आहे की, ह्या नोटी फाटल्या अगर विरल्या तर कांही कर पडल्याशिवाय नवीन नोटी घेऊन त्या बदलतां येत असत. एकंदरींत ह्या चलनात्मक कागदांच्या इतिहासावरून असें दिसतें की त्या पटवतां येत नसत. मोंगोल वंशाच्या वेळीं हें कागदी चलन इतकें फाजील झालें की, त्यापासून अनर्थ होऊं लागला. 'मिंग' वंशाने तें पुढे कायम ठेविलें इतकेंच नाही, तर सोन्यारुप्याच्या पैशाचा उपयोग मना केला, त्यामुळे कागदाची किंमत इतकी उतरली म्हणतात की, एका 'क्यॅश नाण्याला' १००० कागद मिळत असत. ह्यावरून सानडॉमिंगो येथील कागदी चलनाच्या स्थितीचें स्मरण होतें. ह्याचा परिणाम ह्या कागदी नोटीचा लो लवकरच झाला. परंतु १५ व्या शतकांत पुन्हा उलट खाली.

आशिया खंडांत चिनी लोकांशिवाय तार्तार व इराणी या लोकांस कागदी पैशाचा उपयोग करावयाचें समजलें होतें. १४ व्या शतकांत तार्तर देशांत प्रवास करणाऱ्या एका इसमाने ह्या चलनापासून तद्देशीय राजाला होणाऱ्या फायद्याचें वर्णन येणेंप्रमाणे केलें आहे, "ह्या राजास अगणित खर्च करितां येतो. कारण तो चामड्याच्या किंवा कागदाच्या पैशाशिवाय दुसरे पैसे पाडीत नाही. त्याच्या कायद्याप्रमाणेच त्याचे हे पैसे कांही कमी किंमतीचे व कांही जास्त किंमतीचे असतात. हे पैसे जीर्ण होऊं लागले म्हणजे ते लोक राजाच्या तिजोरींत घेऊन येतात आणि तेथें जुने देऊन नवे घेतात. ह्या राजाच्या सर्व मुलुखांत हा पैसा चालतो. सोन्याचा अगर रुप्याचा तेथें पैसाच नाही, आणि म्हणून त्या राजास मनसोक्त खर्च करण्यास संधि मिळते." ह्या गोष्टींत याचान बादशहाचें अनुकरण थोडक्याच बादशहांनी, राजांनी अथवा राज्यसूत्रें चालवि-

णाऱ्या लोकप्रतिनिधींनी करून कागदी पैसे उधळले आहेत असें नाही. जपानांतही प्राचीनकाळीं कागदी चलन असे. निरनिराळ्या प्रांतांतले जमीनदार कार्डासारखे लहान कागद काढीत त्यांची किंमत फार अल्प असे.

## प्रतिनिधीभूत पैशाच्या उपयोगाचीं कारणें

प्रतिनिधीभूत पैसा चालू करण्याची अवश्यकता काय ह्याचा विचार करणें जरूर आहे. पुष्कळ कारणें सांगतां येतील व निरनिराळ्या ठिकाणीं वेगवेगळ्या कारणांनीच हें चलन सुरू झालें पाहिजे. ४०० पासून ७०० वर्षांपूर्वी इटली देशांत ठेवीच्या पेढ्या स्थापन झाल्या. या पेढ्यांत युरोप-खंडांतील बँकनोटीचा उगम आहे. ह्या काळीं झिजलेलीं, घासलेलीं अशीं पुष्कळ प्रकारचीं नाणीं विनिमयसामान्यादाखल वापरीत. त्यामुळे पैसे घेतांना प्रत्येक नाणें व्यापाऱ्यांस वजन करावें लागे व कसोटीस लावावें लागे. अर्थात् या कामीं वेळ लागून त्रास पडे व शिवाय लोकांस ठक-बाजी करण्यास संधि सांपडे ती निराळीच. ह्या कारणानें असले पैसे पेढी-वर ठेवण्याची चाल इटली देशांतल्या व्यापारी लोकांत पडली. पेढीवर प्रत्येक नाण्याची अगदी नक्की किंमत एकदा कायमची ठरवीत व तें ठेव ठेवणाऱ्याच्या खातीं जमा करीत.

ह्याच धोरणावर "ॲम्स्टर्डाम व हॅंबुर्ग" येथील पेढ्या स्थापन झाल्या हें ॲडॅम स्मिथच्या पुस्तकावरून कोणासही समजेल. हे लवकरच "पेढीचे पैसे" म्हणून प्रसिद्ध झाले व त्यांची किंमत इतर सजातीय नाण्यांहून थोडी अधिक येऊं लागली. ठरीव वेळीं पेढीवर जाऊन व्यापारी लोक पेढीवरच्या वह्यांत निरनिराळ्या खात्यांत जमाखर्च करावयास सांगत. प्रत्यक्ष पैसे देत नसत. कारण ते पेढीवाल्यांच्या जवळ अगोदरच दिलेले असत. त्यांची किंमत आधीच कायमची ठरली गेल्यामुळे मोजण्याचा व किंमत ठरविण्याचा सर्व त्रास चुके.

हिंदुस्थानांत पेढ्या कधी व कां सुरू झाल्या ह्याचा शोध अद्यापि

कोणीं केला नाही. मुसलमानांच्यापूर्वी त्या होत्या की नाही, हें समजण्यास कांही मार्ग नाही. युरोप खंडांत पहिली नोट " इ. स. १६७१ " मध्ये स्वीडनच्या बँकेने काढिली.

## धातूच्या पैशापासून होणाऱ्या अडचणी

मागच्याप्रमाणे मौल्यवान धातूंचें ओझें बाळगण्याचा त्रास चुकावा हा एक दुसरा प्रतिनिधीभूत पैसे सुरू करण्यांत उद्देश असतो. धात्वात्मक पैशाच्या मोठमोठ्या रकमा सुरक्षित ठेवण्यास घर बंदोबस्ताचें पाहिजे व पहारेकरी ठेविले पाहिजेत. अशी सोय सगळ्यांची नसल्यामुळे बंदोबस्ताची जागा असेल तेथे सर्व लोकांचे पैसे ठेवण्यास येतात. इंग्लंड देशांत अशाच कारणाकरिता पेढ्या अस्तित्वांत आल्या असाव्या असा तर्क आहे. लंड-नमध्ये सुरक्षितपणाकरिता लोक आपली शिल्लक लंडन टॉवरमध्ये टांकसाळ असे तेथे पाठवीत. अशा रीतीने ठेवलेल्या ठेवींतून पहिल्या चार्लस राजाने इ. स. १६४० त दोन लक्ष पौंड कर्ज म्हणून उचलले; ह्यामुळे व्यापाऱ्यांचा सरकारावरील विश्वास उडाला व स्वतःचीं घरें इतकीं मजबूत नसल्यामुळे सोनारापाशीं ठेव ठेवण्याचा प्रघात पडला. ह्यावरून ह्या सोनारांचीं घरें मजबूत असून तेथे पहारा असावा असें अनुमान आहे.

सोनारांस पैसे दिले म्हणजे ते पावत्या देत. ह्या पावत्या प्रथम ज्याच्या त्याच्यापुरत्याच चालत, पण पुढे पावत्या दुसऱ्याच्या हस्तगत करून पैशा-वरची सत्ता बदलण्याचा क्रम सुरू झाला. ह्या पावत्यांना " सोनारांच्या नोटी " असें म्हणत. पार्लमेंटच्या कायद्यांतून या नोटींचा उल्लेख वारंवार केलेला आढळतो. ह्या प्रथम इ. स. १६७० त सुरू झाल्या; परंतु ॲन राणीच्या कारकीर्दीपर्यंत त्यांस कायदेशीरपणा आला नव्हता.

## चलनाचें वजन

मोठमोठ्या व्यवहारांत प्रतिनिधीभूत दस्तऐवजांचा उपयोग करण्यास धातुमय पैशाचें वजन हेंसुद्धा पुरेसें कारण होईल. कायदेशीर फेडींचे

चलन ज्या मानाने अवजड व बाळगण्यास गैरसोयीचें, त्या मानानें हें कारण बलवत्तर असतें. १८ व्या शतकांत 'व्हर्जिनिआ संस्थानांत तंबाखु विनिमयसामान्य असे. तेव्हा ती वखारींत ठेवीत व लेखी पावत्या समाजांत वापरल्या जात. इ. स. १७६८ पूर्वी रशियांत कायदेशीर फेडीचें चलन तांब्याचें असे. तें अवजड व गैरसोयीचें ह्या सबबीवर 'दुसऱ्या कॅथराइन' च्या कारकीर्दीत कागदी चलन सु झालें. हे कागद लोकांना इतके प्रिय झाले की, त्यांची किंमत सवाईने जास्त येऊं लागली.

हल्लीच्या व्यापाराच्या स्थितींत मोठ्या देवघेवींत सोयीचें विनिमयसामान्य बनण्यास सोन्याचा पैसासुद्धा फार मोठा होईल. जगांत अत्यंत मोठा हिरा नुकताच दक्षिण आफ्रिकेंत सापडला. त्याचें वजन ३०३२ कॅरट असून किंमत १५० ०००० रुपये किंवा १०००००० सॉव्हरिन आहे. तेव्हा हिऱ्याच्या ऐवजी सोन्याचें सॉव्हरिन नाणें झाल्यास तें नेण्यास चाळीस माणसेंही पुरणार नाहीत. लंडन येथील पेढीवाल्यांच्या वजावाटीगृहांत नेहमीचे सरासरीचे व्यवहार सुमारे २ कोटी पौंडांचे होतात. हे हिशोब ज सोन्याच्या नाण्यांत चुकते केले, तर तें नाणें सुमारे १५७ ट भरेल व तेथून हलवावयाचें झाल्यास जवळ जवळ ८० घोडे लागतील. हेच हिशोब रुपयांत चुकते केले असतां रुपयांचें २५०० टनांहून जास्त वजन होईल.

पांच रुपयांवरील कोणतीही नोट १० ग्रेनहून जास्त भरत नाही; पण १ रुपयाचें वजन १८० ग्रेन असतें. शिवाय १ नोट म्हणजे १० पासून १०००० पर्यंत असूं शकेल. कागदाचें नाणें जर आजमितीस उपयोगांत नसतें, तर मौल्यवान खडे अथवा सोन्याहून पुष्कळ अधिक किंमतीची एखादी धातु वापरणें भाग पडलें असतें. परंतु व्यापाराची अत्यंत भरभराट असणाऱ्या देशांत दस्तऐवजाचा उपयोग इतका सर्वत्र होत चालला आहे की, धात्वात्मक पैशाच्या सुवाह्यतेचा प्रश्न अगदी

कमी महत्त्वाचा झाला आहे. इंग्लंडसारख्या देशांत आजच नोटी वटाव-ण्यास मात्र सोन्याचा उपयोग केला जातो, व एवढ्या कामाकरिता तरी त्याचा उपयोग फार दिवस करावा लागेल किंवा नाही हा प्रश्न लवकरच उत्पन्न होईल.

## व्याज वांचतें

प्रतिनिधीभूत पैशाचा उपयोग करण्यास दुसरें एक सबळ कारण असें आहे की, मौल्यवान् सोन्यारुप्याऱ्यांऐवजी बहुतेक बिनमोल पदार्थ वापरल्याने नाण्याच्या रूपाने भांडवल अडकून रहात नाही. म्हणून त्यावरचें व्याजही फुकट जात नाही. पैशाकरिता एखादें राष्ट्र जेव्हा मोठ्या संकटांत असतें, तेव्हा वात्वात्मक चलन हा एक खजिना आहे व तो राजकार्यासाठी कांही मुदतीपर्यंत वापरण्यास हरकत नाही असें मानण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. अर्वाचीन इंग्लिश, इटॅलिअन व अमेरिकन लोकांप्रमाणे प्राचीन ग्रीक लोकांना हा उपयोग करण्याचें चांगलें ठाऊक होतें. याच कारणाने चौपटीनें जास्त किंमतीच्या रुप्याच्या नाण्याच्या ऐवजी कथलाचीं उपनाणीं घेण्यास 'सिराक्यूझन' लोकांना डायोनिसिअसने भाग पाडिलें. ॲरिस्टॉटलच्या अर्थशास्त्रावरील ग्रंथांत असें लिहिलें आहे की, ॲथेन्स येथील 'टिमोथिअसने' शिपायांना व व्यापाऱ्यांना रुप्याऐवजी तांब्याचीं नाणीं घेण्यास लाविलें. मात्र लढाईच्या शेवटीं तीं परत घेऊन रुप्याचीं नाणीं पुन्हा दिलीं जातील असें त्याने वचन दिलें होतें. टिपुसु-लतानही आपल्या नाण्यांची किंमत मनसोक्त रीतीने वारंवार बदलीत असे. फौजेंतील पगार द्यावयाचा झाला म्हणजे प्रत्येक नाण्याची किंमत धातुगत किंमतीहून अतिशय वाढवीत असे आणि सुमारे दहा दिवसपर्यंत तो ती किंमत तशीच कायम ठेवी. या मुदतींत ह्या वाढवलेल्या किंमतीच्या पैशाने कर्ज फेडण्यास तो आपल्या शिपायांस मोकळीक देई. ह्यानंतर मात्र त्या नाण्यांची किंमत पूर्ववत् उतरण्यांत येई.[१] व्याज वांचण्याच्या उद्देशाने

[१] बुकॅननकृत म्हैसूरचा प्रवास, भाग १, पान १२४.

'क्लाझोमेनिअन' लोकांनी उपनाणीं सुरू केलीं. कांहीं हंगामी शिपायांस वीस टॅलेंट देण्यास असमर्थ असल्यामुळे वर्षास ४ टॅलेंट त्यांना व्याज द्यावें लागे. तेव्हा त्यांना युक्ति सुचून त्यांनी लोखंडी नाणीं पाडिलीं व त्यांची शाब्दिक किंमत २० टॅलेंट ठरवून तीं नाणीं रुप्याच्या नाण्याच्या ऐवजी स्वीकारण्यास लोकांस लावलें. लोकांकडून घेतलेल्या रुप्याच्या नाण्यांचा विनियोग कर्ज फेडण्याकडे केला. अर्थात् सालीना त्यांचे ४ टॅलेंट वांचले. ह्या संगृहीत द्रव्याने त्यांनी उपनाणीं पुढे परत घेतलीं. फ्रान्सच्या वायव्येस "गर्नसी" नांवाचें एक लहान बेट आहे, तेथे अशाच रीतीने म्हणजे खर्चाशिवाय एक मार्केट बांधण्यांत आलें. त्या बेटाच्या गव्हरनराने सेंट पीटर्स येथे एक मार्केट बांधण्याचें ठरवलें. परंतु जवळ अवश्य तितकें द्रव्य नसल्यामुळे प्रत्येकीं एक पौंड किंमतीच्या अशा चार हजार नोटी योग्य शिक्का मारलेल्या पाडल्या. ह्या नोटींनी त्याने लोकांची मजुरी दिली. मार्केटाची इमारत पुरी होऊन भाडें येऊं लागलें, तेव्हा नोटी परत घेऊन त्या रद्द करण्यांत आल्या. तात्पर्य :—एक तोळाभरसुद्धा सोनें खर्च केल्याशिवाय एक मोठी इमारत बांधितां आली.

गर्नसी बेटाच्या गव्हरनरने "मार्केट नोटी" काढून तेवढ्या किंमतीचें सोनें वापरण्यांत होतें तें नाहीसें केलें; आणि ह्याप्रमाणे बेटाच्या चलनामधून त्याने एक प्रकारचें बळजबरी कर्ज काढलें म्हणावयाचें व पुन्हा गंमत ही की, व्याजाकरिता एक छदामही त्यास खर्च करावा लागला नाहीं. त्याप्रमाणे हल्ली ज्या ज्या देशांत नोटी चालतात, तेथे तितक्या पूर्ण किंमतीचें सोनें अगर रुपें तिजोरींत ठेवलेलें नसतें.

जितक्या नोटींची फेड करण्याकरिता खजिन्यांत रोकड रकम तरती ठेवितात, त्याहून जास्त असलेल्या नोटींवर प्रत्येक सरकारास व्याजाच्या रूपाने फायदा मिळत असतो. हिंदुस्थानसरकारास १९०५ सालीं बारा कोटींवर अशा तऱ्हेने फायदा मिळवितां येत होता. महायुद्धापासून ही

मर्यादा १२० कोटींपर्यंत गेली आहे. म्हणून १२० कोटी किंमतीच्या नोटींबद्दल खजिन्यांत सरकारास रकम ठेवावी लागत नाही. ही रकम सरकार व्याजीं लावतें. हिंदुस्थानसरकारास सन १९०५ सालीं १२ कोटींवर ३४७०४२० रुपये व्याज मिळालें. आजमितीस या रकमेवर अदमासें अडीच कोटि रुपये व्याज मिळतें. कागदी पैशांत सर्वांचीच सोय आहे. मात्र चांगल्या तत्त्वांवर हें काम केलें पाहिजे; परंतु चांगलीं तत्त्वें कोणतीं ह्याबद्दलच मोठा मतभेद आहे.

भाग १७ वा

## वायदेचिठ्यांचें स्वरूप आणि जाती

वायदेचिठ्या अथवा प्रॉमिसरी नोटी कोणत्या तत्त्वांवर काढाव्या ह्याचा विचार करण्यापूर्वीं निरनिराळ्या वचनांमधील फरक स्पष्ट समजून घेणें अवश्य आहे. कारण प्रथमदर्शनीं सूक्ष्म वाटणारा भेद परिणामीं फार महत्त्वाचा होतो. अमुक एक पदार्थ इतका देईन असें कबूल करून वायदेचिठी लिहून देणारा मनुष्य खालीं लिहिल्याप्रमाणे तीन प्रकारचे वायदे करूं शकेल.

१ एखादा विवक्षित पदार्थ ज्याचा त्याच तो परत मागेपर्यंत आपल्या ताब्यांत ठेवण्याचा करार करील.

२ अथवा वायदेचिठीप्रमाणे पदार्थ हवा तेव्हा देतां यावा म्हणून त्या जातीचा ( तोच नव्हे ) पदार्थ ठरीव प्रमाणाने मी नेहमी जवळ बाळगीन इतकाच तो करार करील.

२ किंवा मी आपल्या कबजांत अमुक पदार्थ अमुक संख्येपर्यंत ठेवीन असा कांही एक करार न करितां वायदेचिठ्ठी हजर करतांच ठरलेला पदार्थ मी देईन असा मोघम करार करील.

## विशिष्ट ठेवचिठ्ठी

उत्तम जातीची वायदेचिठ्ठी म्हटली म्हणजे पहिली होय. ह्यांत वखारचिठ्ठी ( गोदीपत्र ), भरलें पत्र अगर कोणत्याही विशिष्ट पदार्थावर मालकी स्थापन करणारी चिठ्ठी ह्यांचा समावेश होतो. आपल्या हातांत भरलेचिठ्ठी असली म्हणजे खुणा, संख्या, विस्तार, आकृति वगैरेंनी निश्चित असा माल आपणांस मिळाला पाहिजे. जहाजावर माल भरला म्हणजे जहाजमास्तर आपणांस ही भरलेचिठ्ठी देतो. नेमल्या ठिकाणीं गलबत जाऊन माल मालकास देईपर्यंत जहाजमास्तराला तो ज्याचा तसाच ठेविला पाहिजे. वखारचिठ्यांचा हाच प्रकार आहे. गोदींतील वखारींत ठेवलेल्या मालाबद्दलच्या ह्या पावत्या असतात. ह्या चिठ्या ज्याच्या हातांत असतील त्याचा कापसाचे गठ्ठे, तांदुळाचे गोण, तेलाच्या पेट्या अथवा जे कांही पदार्थ चिठ्ठींत नमूद केले असतील त्यांवर हक्क असतो. कायद्याप्रमाणे अथवा व्यापारचालीप्रमाणे ह्या चिठ्ठयांवर शेरा मारून त्या वेचन दिल्या तर त्यांतील मालावरची मालकी बदलली असें होतें. ह्या वायदेचिठ्ठयासंबंधाने महत्त्वाची गोष्ट ही आहे की, वास्तविक जितका माल ठेविला असेल त्याच्याबाहेर त्या काढतां येत नाहीत. काढल्यास तें ठकबाजीचें कृत्य होईल. चिठ्ठी लिहून देणाराने निश्चळ वखारवाल्याप्रमाणे वागलें पाहिजे; आणि हवा तेव्हां माल परत मागतां येत असल्यामुळे वायदेचिठ्ठी घेऊन माल परत करीपर्यंत आपल्या ताब्यांतून कोणताही पदार्थ त्यास कायदेशीर रीतीने दूर करितां येत नाही.

## सामान्य ठेवचिठ्ठी

आता आपण दुसऱ्या प्रकारच्या वायदेचिठ्ठांकडे वळूं. ह्यांत जो माल

नमूद केला असेल तो जशाचा तसाच वायदेचिठ्ठी देणाराने दिला पाहिजे असें नाही, तर त्याच जातीचा व तितकाच दुसरा माल दिला तरी चालतें. पुष्कळ पदार्थ असे असतात की, एका गठ्ठयापासून दुसरा गठ्ठा निराळा ठेवण्यांत कांही मतलब नसतो; अथवा ठेविलेला गठ्ठाच परत करण्यांत कांही विशेष हेतु नसतो. एकाच जातीचीं, एकाच छापखान्यांतील पुस्तकें असलीं तर एके ठिकाणीं त्यांपैकी कोणतींही निरनिराळ्या मालकास दिलीं म्हणून हरकत नसते. म्हणून प्रत्येकाचे गठ्ठे निरनिराळे ठेवण्याची जरूरी नाहीं; पण ह्यामध्ये करार पुरा करण्याची हयगय होण्याचा संभव असतो व दुसऱ्या व्यापारांत अशा कृत्याने गैरसमज उत्पन्न होऊं शकतो. समजा, एखाद्याने कापसाचे गठ्ठे गहाण ठेऊन कर्ज काढलें तर सावकाराने तेच गठ्ठे गहाण सोडवितांना परत केले पाहिजेत किंवा त्याच्या जातीचे दुसरे केले तरी चालतील, अशाविषयी तक्रारी उपस्थित होऊन हें भांडण कोर्टापर्यंत न्यावें लागतें.

## सामान्य आणि विशिष्ट वायद्यांतील फरक

वर निर्दिष्ट केलेल्या फरकाचें महत्त्व सहज समजण्यासारखें आहे. विशिष्ट माल देण्याचा ज्याने वायदा केला असेल त्यास तो माल जवळ असल्यावांचून वायदेचिठ्ठी करतां येत नाही. तसें केल्यास त्याच्यावर फौजदारी खटला होईल व तो आपणास शिक्षेस पात्र करून घेईल; परंतु हाच करार जर मोघम असेल तर कोणतीही वायदेचिठ्ठी लागू झाली तरी योग्य जातीचा माल दिला म्हणजे झालें. त्याने जर कांही लबाडी केली असेल तर सर्व, निदान बऱ्याचशा, वायदेचिठ्ठया हजर कराव्या तेव्हा ती उघडकीस येईल. अशा रीतीने हा एक सट्टयाचा धंदा बनूं पाहतो. ठेवलेल्या मालापैकी बराच माल नेहमी शिल्लक राहतो असें आढळल्यावर दररोज सरासरीने किती मागण्या येतात याचा अजमास करून त्या पुऱ्या करितां येतील इतका माल काय तो ठेवून बाकीचा माल व्यापारांत घालण्याची स्फूर्ति ठेव ठेवणारास होण्याचा संभव आहे. मागण्या पुऱ्या

होताहेत तोंपर्यंत कोणाचें कांही नुकसान होत नाही. तथापि अनुभव असा आहे की, अशा परिस्थितींत सर्वच नाही पण कांही लोक असे असतात की, ते सर्व मागण्या पुऱ्या करितां येतील इतक्या शहाणपणाने वागत नाहीत.

शिवाय अशा कृत्याने पदार्थांचा खोटा पुरवठा करणें म्हणजे पुरवठा मुळीच नसतांना तो आहे असा लोकांचा समज करणें शक्य आहे. वायदेचिठ्ठी ज्याच्या कबजांत असते तो ती चिठ्ठी म्हणजे त्यांत दाखल केलेला पदार्थच आहे असें मानतो. अशा चिठ्ठ्या जर कोणी फाजील काढल्या तर त्यांत नमुद केलेल्या पदार्थांचा पुरवठा फाजील आहे अशी समजूत होऊन त्या मालाची किंमतही कमी होईल. करार पुरा करावयाचा तो पुढे करावयाचा असतो हें खरें; पण पुढील काळ अज्ञात असल्यामुळे वायदेचिठ्ठीप्रमाणे माल द्यावा लागण्यापूर्वीच मालाची किंमत उतरेल असा समज चिठ्ठी लिहून देणाराचा होणें शक्य आहे. जवळ माल नसतांना वाटेल तितक्या चिठ्ठ्या काढून मालाची किंमत उतरवावी व नंतर कमी दराने माल खरेदी करून त्याने वायदेचिठ्ठींतील करार पुरे करावे व ह्या जुगारी व्यापारावर खूप पैसे मिळवावे, असा प्रकार झाल्याशिवाय राहणार नाही. कोणी असें म्हणेल की, वायद्यांनी आपला नफा होत असेल तर तें करण्याचा प्रत्येक मनुष्यास स्वभावसिद्ध हक्क आहे. कांही दिवसांनी पैसे देण्याची कबूली करून हुंडी पतकरण्याचा हक्क सर्वांस आहे. कापूस, गल्ला इत्यादि समुद्रांतून पाठविलेला माल जाग्यावर येऊन तो हस्तगत होण्याच्या मुदतीपूर्वीच त्यासंबंधी खरेदीविक्रीचे व्यवहार हम्मेश होत असतात हें खरें आहे; परंतु आपण ही गोष्ट विसरतां कामा नये की, एकंदर जनसमूहापैकी पुष्कळांना पुष्कळ सुख व्हावें म्हणून कायदे व समाजबंधनें निर्माण झालीं आहेत. सर्व प्रकारचे वायदे करण्याचा हक्क कायद्याने कबूल केलेला असला तर त्याचें कारण तसें करणें समाजास हितावह आहे हें होय; आणि कायद्याने मान्य झाल्यामुळेच त्यास हक्काचें स्वरूप प्राप्त होतें.

परंतु जर या उलट असें अनुभवास आलें की, कांही विवक्षित जातीचे वायदे करूं दिले असतां एकंदर समाजाचें हित न होतां अनहित होतें, तर असे वायदे करूं न देणें हें समाजाच्या कल्याणाकरिता इष्ट आहे. सारांश हा उपयुक्ततेचा व सोयीचा प्रश्न आहे.

## पैशाच्या वायदेचिठ्या

हे विचार पैशाच्या विषयास लागू केले असतां असें आढळतें की, पैशाचे बहुतेक सर्व वायदे सामान्य असतात. कांही मुदतीने रकम देण्याचा पतकर जो घेतो तो मी अमकीं विशिष्ट नाणीं देईन, अशा कधी करार करीत नाही. मुळी नाण्याच्या कायद्यांत कायदेशीर फेडीच्या चलनाची व्याख्याच अशी केली आहे की, त्यामुळे एकाद्यास १०० रुपये देण्याचा करार जर मी केला असला तर त्याबद्दल सरकारी टांकसाळींत पाडलेले व योग्य वजनाचे कोणतेही रुपये दिले तरी चालतील. हाच प्रकार पोट व उपनाण्यांचा समजावयाचा. सरकारी नोटीवर रुपयांचा आंकडा असतो तितके रुपये पाहिजे तेव्हा देण्याचा करार सरकार त्याच नोटीच्या द्वारें करितें; पण त्यांत अमुकच रुपये देऊं असें कोठेही नसतें. पैशाचे सर्व वायदे अशाच प्रकारचे असतात. आपण कोणा एकाचें कर्ज काढलें तर तें फेडतांना त्याने दिलेलेच रुपये परत केले पाहिजेत असें नाही. असें झाल्यास कर्ज काढण्याचा उद्देशच समूळ नाश होईल. गिऱ्हाइकाने ठेवलेल्या ठेवीचे रुपये तो परत मागेपर्यंत असेच्या तसेच निराळे ठेवावे लागल्यास कोणत्याही पेढीवाल्याला नफा मिळवितां येणार नाही व असें करण्यांत कांही हेतूही नसतो. व्यापारी गोष्टींत असें करण्याचा विचारसुद्धा आपल्या मनांत कधी येत नाही.

आता पैशाचे वायदे नेहमीच विशिष्ट जातीचे असते, तर अशा प्रकारच्या वायदेचिठ्या काढण्याची पूर्ण मुभा देण्यास हरकत नसती. कारण एखाद्या वखारवाल्याप्रमाणेच वायदेचिठी देणाराला रुपयांची प्रत्येक पिशवी निराळी ठेवावी लागली असती. परंतु असें नसल्यामुळे, फाजील

वायदेचिठ्ठया काढण्याची सवलत दिल्याने नुकसान होण्याचा संभव आहे. चलन फार झाल्याने रुपयांचा भाव उतरेल म्हणजे सर्व जिनसा महाग होतील. हिंदुस्थानांत शहाजोग प्रॉमिसरी नोटी (चलनी नोटी) काढण्याचा हक्क फक्त सरकारने आपणाकडे ठेवला आहे. अशा प्रकारच्या नोटी कोणासही काढितां येत नाहीत. (सन १८८२ चा कायदा विसावा.)

## प्रतिनिधीभूत पैशाच्या चलनाचीं अथवा फिरतीचीं तत्त्वें

धातूचे पैसे घेण्यांत, देण्यांत व ठेवण्यांत मनुष्याचे जे हेतु असतात त्यांचें पृथक्करण केल्यास चलनाचे कांही नियम आपणास बसवितां येतील हें मागे सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणे धात्वात्मक व कागदी पैशाच्या मिश्र चलनालाही ते नियम लागू करितां येतात हेंहि निर्दिष्ट केलें आहे. कागदी पैशांचा वापर चालू ठेवण्यांत सवयीचें विलक्षण सामर्थ्य दृष्टीस पडतें. कागदी पैसे देण्याघेण्याने कवडीचेंही नुकसान ज्यांना लागलें नाही, ते त्यांच्या विश्वासावर एकाएकी जबर आघात पडेपर्यंत कागदी चलन उत्कृष्ट आहे असेंच म्हणत रहातील. ही मर्यादा येथपर्यंत पोंचते की, सोन्याच्या सुंदर नाण्यापेक्षा तें देण्याचें वचन ज्यांत आहे असा घाणेरडा कागदाचा तुकडा त्यांस अधिक पसंत पडेल. ह्याची प्रतीति स्कॉटलंड व नॉर्वे ह्यांच्या चलनांवरून येण्यासारखी आहे. नॉर्वे देशांत १८७४ पर्यंत वापरांत सोनें मुळीच नव्हतें. एक, पांच, दहा अशा डॉलरांच्या नोटी हेंच मुख्य चलन असे.

एका महत्त्वाच्या बाबींत धात्वात्मक व कागदी पैसा ह्यांत अंतर आहे. ज्या देशांत कागदी चलन कायदेशीर असेल अगर सवयीने वापरण्यांत येत असेल त्या देशाची हद्द सोडून बाहेर तें चालणार नाही. परदेशांत आपल्या नोटी पुष्कळ लोक घेतात; पण त्या कांही हेतूने घेतात. हिंदुस्थानांत ज्यांना पैसे पाठवावयाचे असतात तेच त्या घेतात. कारण जड धातु पाठवण्यापेक्षा हलके कागद पाठविणें सोयीचें व कमी खर्चाचें असतें. पर-

देशांत ह्या नोटीने देणें फिटत नाही, उलट ह्या देशाला कर्ज होतें. उ० जपानांत १००० रुपयांची नोट कोणा व्यापाऱ्याने घेतलीच तर ह्या देशास त्या व्यापाऱ्याचें तितके रुपये कर्ज झालें. जेव्हा ती नोट तो व्यापारी हजर करील तेव्हा आपल्या सरकारास त्याचे १००० रुपये दिले पाहिजेत. मुख्य धात्वात्मक पैशांनीच परदेशांतील देणें देतां येईल. दुसऱ्या कशाने देतां येणार नाही; म्हणून हलकीं व झिजलेलीं नाणीं जशीं चांगल्या नाण्यांना हद्दपार करितात त्याचप्रमाणे कागदी पैसा धात्वात्मक पैशाला देशांतून परदेशांत घालवितो.

नोटी कायद्याने वटावतां येण्याजोग्या नसल्या म्हणजे तर हा प्रकार चांगला स्पष्टपणें अनुभवास येतो. दरवर्षास भर पडत गेल्याने—आणि अशी भर बहुतेक पडतेच—चलन गरजेपेक्षा जास्त होऊं नये म्हणून नाणें परदेशांत पाठवावें लागतें. अशा रीतीने बहुतेक नाणें नाहींसें झालें म्हणजे परदेशांतील देणें देण्याकरिता त्याची गरज भासूं लागते आणि मग जितक्या रकमेची प्रतिनिधीभूत नोट असते तिच्यापेक्षा कमी किंमत त्या नोटीची होते. अशा रीतीने पुढे फायदा मिळवितां येईल ह्या आशेवर पुष्कळ लोक नाण्याचा संग्रह करून ठेवतात व त्यामुळे प्रत्यक्ष व्यापारांत कागदाशिवाय कांही रहात नाही. कागदी चलनाचा हा परिणाम फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं बँक ऑफ् इंग्लंडने इ. स. १७९७ पासून १८१९ पर्यंत आपल्या नोटीचे रोख पैसे देण्याचें बंद केलें होतें तेव्हा आणि अमेरिकन युद्धाच्या प्रसंगीं अनुभवास आला. इ. स. १८६२ पासून १८६५ पर्यंत इटॅली देशांत सोन्याचीं व रुप्याचीं सुंदर नाणीं पाडलीं होतीं; पण कागदी चलन तेथे सुरू होतांच हीं सर्व नाहींशीं झालीं.

---

भाग अठरावा

# कागदी चलन चालविण्याचे प्रकार

कागदी पैसा कोणत्या धोरणावर चालवावा ह्याचा आपण आता विचार करूं. अर्थशास्त्रांतील सर्व विषयांत हा अत्यंत वादग्रस्त व भानगडीचा प्रश्न आहे. तथापि ह्या विषयाचीं मूलतत्त्वें इतकीं संकीर्ण नाहीत; त्यामुळे ह्या तत्त्वांवरची दृष्टि ढळूं न देतां ह्या प्रश्नाचा विचार केल्यास बरीच सुलभता प्राप्त होईल.

नाण्याप्रमाणे प्रतिनिधिभूत पैसे पाडण्याचें काम सरकार आपल्या हातांत ठेवील अगर कायद्याने कांही प्रतिबंध ठेवून तें काम लोकांवर, संस्थांवर अथवा मंडळ्यांवर सोंपवील. ह्यापैकी प्रत्येक पद्धतींत सोयी, गैरसोयी काय आहेत ह्याचा विचार पुढे करण्यांत येईल. तथापि कोणत्याहि पद्धतींत कागदी चलन ज्या निरनिराळ्या प्रकारांनी चालविलें जातें ते प्रकार येणे-प्रमाणेः—

१. रद्द न झालेल्या एकंदर नोटींच्या किंमतीइतका ऐवज, नाणें अगर सोन्यारुप्याच्या लगडी, वायदेचिठ्ठ्या काढणाराने आपल्याजवळ सतत बाळगला पाहिजे. जसजसे नोटींचे पैसे देऊन नोटी परत येतील तसतशी ऐवजाची शिल्लक कमी होत जाईल हें उघड आहे.

२. नोटींची सर्व रकम खजिन्यांत राखून न ठेवतां यापैकी कांही नियमित रकम सरकारी फंडांत अगर दुसऱ्या किफायतीच्या पण निर्भयपणाच्या सरकारी रोख्यांत अडकवून टाकण्यास नोटी काढणारास सवलत दिलेली असते.

३. कांही झालें तरी कमींत कमी अमुक रकम शिल्लकी नेहमी ठेवलीच पाहिजे असा निर्बंध केलेला असतो.

४. शिलकी रकमेची संख्या निश्चित न करितां, विनछेकलेल्या नोटीं-च्या अमुक एक प्रमाणानें ती असली पाहिजे एवढेंच ठरविलें असतें.

५. एकंदर नोटी ठरीव रकमेपर्यंतच काढावयाची परवानगी द्यावयाची व जास्त काढल्यास त्यास कडक शिक्षा ठेवावयाची.

६. वरीलप्रमाणें अमुक संख्येपर्यंत एकंदर नोटी काढावयाच्या अशी मर्यादा घालावयाची; पण फाजील नोटी काढल्या तरी त्या अपराधास शिक्षा जाणूनबुजून इतकी हलकी ठेवावयाची की, कांहीं प्रसंगीं नोटी काढणा-रास आपल्या नोटींची संख्या न वाढविण्यापेक्षा दंड देणें श्रेयस्कर वाटावें.

७. शिलक जी ठेवावयाची ती धातूच पाहिजे असा निर्बंध न ठेवतां ती सरकारी प्रॉमिसरी नोटी, खतें, भाग अगर अशाच दुसऱ्या दस्त-ऐवजांच्या रूपानें असली तरी चालतें.

८.नुसते दस्तऐवज जवळ बाळगण्याच्या ऐवजी, चिठ्या लिहून देणा-रांचीं घरेंदारें, जमीनजुमला ह्यांच्या हमीवर चिठ्या काढावयाच्या.

९. एखाद्या नामांकित पेढीस वटावतां येतील अशा नोटी काढण्याची परवानगी द्यावयाची. परंतु शर्त ही की, परराष्ट्रीय हुंड्यांचा भाव जोपर्यंत चढता आहे व रोख ऐवज पाठविणें जोपर्यंत फायदेशीर वाटत आहे, तोपर्यंत फिरत्या चलनांची संख्या ती पेढी वाढवणार नाही.

१०. इतर सर्व व्यापारी व्यवहारांना व करारांना लागू पडणाऱ्या सामान्य कायद्याशिवाय दुसरा कोणत्याही प्रकारचा निर्बंध न ठेवतां वाटेल त्या माणसास वाटेल तितक्या वायदेचिठ्या काढण्याची सवलत ठेवावयाची.

११. प्रॉमिसरी नोटींच्या रूपानें वटावतां न येईल असें कागदी चलन काढूं द्यावयाचें; परंतु जास्त पैसे देऊन लोक धातु घेतात असें आढळतांच अधिक नोटी काढण्याचें बंद ठेवावयाचें. अशा रीतीनें नोटीचा व तन्नि-र्दिष्ट नाण्याचा भाव सारखा ठेवितां येईल.

१२. विनवटावाचें कागदी चलन वाटेल तितकें काढूं द्यावयाचें;

सरकारदेणें वसूल करतेसमयीं नाण्याच्या ऐवजीं नोटीच घेऊन त्यांची किंमत कमी होऊं न देण्याचा प्रयत्न करावयाचा.

१३ कांही मुदतीने— मग ती निश्चित असो अगर एखादी गोष्ट घडण्यावर अवलंबून असो — धातूचे पैसे देण्याच्या कराराने वायदेचिठ्या काढूं द्यावयाच्या.

१४ वायदेचिठ्या काढणारांवर करार पुरा करण्याची जबाबदारी कोणत्याही रीतीने पडत नाही. म्हणजे नोटींचा प्रसार सवयीच्या जोरावर, राजाच्या हुकमावर अथवा दुसऱ्या एखाद्या विनिमयसामान्याच्या अभावामुळे होत असतो.

ह्याप्रमाणे कागदी चलन चालू करण्याच्या निरनिराळ्या चौदा तऱ्हा सांगितल्या; तरी त्याहूनहि वेगळ्या प्रकारांनी आजपर्यंत हें चलन चाललें नव्हतें असें नाही. तसेंच, वर सांगितलेले प्रकार एकवटूनहि हें चलन चालू करतां येईल. उदाहरणार्थ, राखून ठेवावयाचा ऐवज कांही नाणें, कांही दस्तऐवज व कांही स्थावर मिळकत असूं शकेल. त्याचप्रमाणे कांही ठरीव रकमेपर्यंत गंगाजळीसंबंधाने कोणत्याहि प्रकारची अट न घालतां वायदेचिठ्या पेढीवाल्यांस काढूं देऊन जास्त काढणें झाल्यास त्यांचा ऐवज जवळ सतत राखला पाहिजे अशी अट घालावयाची. ह्या सर्व प्रकारांबद्दल सविस्तर विवेचन करणें अशक्य असल्यामुळे वर सांगितलेल्या पद्धतींचा थोडक्यांत खुलासा करूं.

१

इटली, ॲम्स्टरडाम, हॅमबुर्ग येथील प्राचीन पेढ्या व लंडन येथील सोनारांची दुकानें ह्यांत जोपर्यंत लोकांनी आणून दिलेल्या पैशांचें संरक्षण केलें जात असे, तोपर्यंत त्या पेढ्यांवरून ही पद्धति चांगली व्यक्त होत असे. ह्या ठेवीवर काढलेल्या वायदेचिठ्या वखारचिठ्यांप्रमाणे निवळ प्रतिनिधीभूत असतात हें मागे सांगितलेंच आहे. वायदेचिठ्यांप्रमाणें पैसे परत मिळतील असा भरंसा कायद्याने आलेला असतोच. असल्या चल-

नाची संख्या धात्वात्मक चलनाच्या इतकीच असली पाहिजे हें उघड आहे. त्यामुळे धातूला हद्दपार करून त्याच्या जागीं कागद येण्याची धास्ती नसते. कारण वायदेचिठ्ठ्या काढण्याच्या पूर्वीच काढणाराच्या पेढीवर रोख पैसे असले पाहिजेत.

हें जरी खरें आहे तथापि ह्या पद्धतीचे फायदेहि फार कमी आहेत. नाण्याच्या ऐवजी कागद वापरूं लागल्याने नाण्यांची झीज होत नाही, बरोबर बाळगण्याचें ओझें कमी होतें; एवढेंच काय तें. मोठा फायदा म्हणजे व्याजाचा असतो. तो फायदा ह्या पद्धतीने समाजास मिळत नाही. तसेंच, आपल्या हातांत पैसे न ठेवतां ते दुसऱ्याच्या हातांत देणें हें सुरक्षितपणाच्या दृष्टीने जरा कमी पायरीचें आहे. बराच संचय निरुपयोगी पडला आहे असें आढळतांच जुलमी राजाची त्यावर झडप पडते. इंग्लंडमध्ये पहिल्या चार्लस राजाने ह्याप्रमाणे पैसे लुटण्यास कमी केलें नाही. इ० स० १७९५ त फ्रेंच लोकांनी हॉलंडवर स्वारी केली तेव्हा हाच प्रकार झाला. ॲम्स्टरडाम येथील पेढीवरील ठेवीचे बरेचसे पैसे डच ईस्ट इंडिया कंपनीला व स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांस दिलेले होते. सेंटपिटर्सबर्ग येथील किल्ल्यांत राखून ठेविलेले पेढीवाल्यांचे पैसे रशिअन सरकारने घेतल्याचें प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांतहि सावकार, सराफ, पेढीवाले ह्यांस तत्प्रांतीय राजांनी लुटल्याचे इतिहासांत दाखले सापडतात. इ० स० १७९७ सालीं इंग्लिश सरकारनेही बँक ऑफ इंग्लंडच्या नोटींचे रोख रुपये मिळणार नाहीत असे ठरवून त्या ठेवीचा विनियोग आपल्याकडे केला आहे.

२

हिंदुस्थानसरकारने ह्याच पद्धतीचा अंगीकार केला आहे. शंभर कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या नोटी काढाव्या लागल्या तर तितक्या किंमतीचें नाणें अगर सोनेंरुपें ठेवावें लागतें. शंभर कोटींपर्यंत मात्र सरकारी किंवा तसेच रोखे ठेविले तरी चालतात. आजपर्यंत चौदा कोटींची रयत्ता होती ती महायुद्धाचे वेळीं शंभर कोटींची करण्यांत आली आहे. ह्या व्यवस्थे-

मुळे शंभर कोटींवरचें व्याज सरकारास मिळतें. इंग्लंडांत नोटी काढण्याचें काम हिंदुस्थानसरकाराप्रमाणे तेथील सरकारने आपल्या शिरावर घेतलें नाही. तें बँक ऑफ इंग्लंडकडे सोपविलें आहे. ह्या पेढीचें काम आंशिक ठेवपद्धतीवर चालतें.

३

ह्या आंशिक पद्धतीमध्ये निश्चित रकम सतत ठेविलीच पाहिजे अशी शर्त असते. एखाद्या मनुष्याला तूं आपल्या खिशांत सदोदित एक रुपाया ठेवीत जा म्हणजे तुला वाण पडणार नाही असें सांगण्यासारखेंच हें आहे. अशा अटीने मागण्या आल्या म्हणजे त्या पुऱ्या करतां येणें शक्य नाही. एकदम मागण्या फार आल्या तर सरकारला मध्ये पडून कायद्याची अंमलबजावणी तहकूब ठेवावी लागेल. नाही तर अशा राखून ठेवलेल्या ऐवजाचा कांहीच उपयोग नाही.

४

फिरत्या नोटींच्या अमुक हिश्शाने राखून ठेवलेला ऐवज असलाच पाहिजे हें ह्या पद्धतीचें मुख्य स्वरूप होय. अमेरिकेंतील " राष्ट्रीय पेढीचें " चलन ह्याच धोरणावर बसवलें होतें. ही पद्धति अखेरीस वरच्या कनिष्ठ रिझर्व्ह पद्धतीवरच जाते. समजा, १,००,००० रुपयांच्या नोटी बाहेर वापरांत आहेत. आणि ४०,००० रु. रिझर्व्ह आहेत. आता २०,००० रुपयांच्या नोटी वटाववयास आल्या असतां राखून ठेवलेली रकम २०,००० रु. होईल व फिरत्या नोटी ८०,००० रुपयांच्या राहतील. फिरत्या नोटींच्या $\frac{१}{४}$ इतकी शिल्लक असलीच पाहिजे असा कायद्याचा निर्बंध असेल तर आणखी वीस हजारांच्या नोटी वटावण्यास आल्या तर त्यांचे सर्व रुपये देतां येणार नाहीत हा ह्या पद्धतींत मोठा दोष आहे. १८७३ च्या व्यापारी प्रलयकाळांत अमेरिकन लोकांना हा अनुभव आला.

शिवाय फाजील नोटी काढण्याची ओढ बंद करण्याचा उपाय ह्या पद्धतींत नाही. जितक्या नोटी जास्त निघतील तितक्या मानाने पेढीचें साव-

कारी भांडवल वाढतें व नोटी फिरत असतात तोंपर्यंत त्यांवर व्याज मिळतें.

५

पेढीवाल्यास अथवा पेढीवाल्यांना ठरीव संख्येच्या बाहेर बायदेचिठ्ठ्या काढूं न देणें अर्थशास्त्राच्या तत्त्वास अनुसरून आहे. त्यामुळे विनिमय-सामान्याच्या कांहीं भागावरील व्याज वांचतें व वापरण्यास सोयीचें चलन होतें. शिवाय ठरीव रकमेच्या पलीकडे सोनेंरुपें देशाच्या बाहेर जात नाही. लोकांना अधिक पैसे पाहिजे असतात व अशा प्रकारचा निर्बंध ठेवणें केवळ दांडगाईचें आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण जास्त पैसे पाहिजे असल्यास नाणें वापरण्याची त्यांस मोकळीक असतेच. निर्बंध पैशावर नसतो तर त्याच्या प्रतिनिधीवर असतो. आता जास्त चलन नसल्याकारणाने व्याज बुडतें हें खरें; तथापि फाजील चलनाने होणाऱ्या नुकसानांची भीतीहि मग बाळगण्याचें कारण राहणार नाही हें लक्षांत ठेवलें पाहिजे. इंग्लंडांत १७० पेढ्यांना अशा रीतीने नियमित बायदेचिठ्ठ्या काढण्याची परवानगी दिली आहे. जास्त काढल्यास त्यांस दंड होतो. ह्या सर्व पेढ्यांचे तक्ते प्रतिज्ञापूर्वक प्रसिद्ध होत असतात.

६

जर्मनी देशांत ह्या पद्धतीचा अंगीकार केलेला आहे. नोटी काढण्याबद्दलचे नियम इंग्लंडसारखेच आहेत. कायद्याने केलेल्या नियमास जे अनुसरतील त्यांस सोनें जवळ न बाळगतां ३८,५०,००,००० मार्कांच्या नोटी काढतां येतात. मात्र जास्ती नोटी काढावयाच्या असल्यास तितकें सोनें ठेवलें पाहिजे. ही पद्धति आंशिक ठेवपद्धतीशीं अगदी अभिन्न आहे. परंतु इंग्लंडमध्ये संकट टाळण्याकरिता पुष्कळ वेळां कायद्याची अंमलबजावणी तहकूब ठेवावी लागली. या अनुभवामुळे जर्मन सरकारने पेढीवाल्यांना जास्ती नोटी काढण्याची सवलत दिली आहे; पण त्यावर शेंकडा पांचप्रमाणे कर देण्यांत येत असतो. ह्याचा उद्देश इतकाच की, गरजेपेक्षा फाजील नोटी काढण्यापासून फायदा होऊं नये; पण प्रसंग पडल्यास कर देऊन जास्त

नोटी काढतां याव्या. ही इंग्लिश पद्धतीवर सुधारणा आहे ह्यांत संशय नाही.

७

पेढीवाल्यांजवळ दस्तऐवज असले म्हणजे लोकांकडून त्यांचे येणें बरेंच असलें तर आपल्या नोटींचे रुपये येतील असें पुष्कळांस वाटतें. दस्तऐवज भरपूर बाळगणारा पेढीवाला कंगाल नाही व आपले रुपये अखेरीस वसूल झाल्याशिवाय राहणार नाहीत असें म्हणणारे लोक वायदेचिठीचे रुपये मागितल्याबरोबर द्यावे लागतात ही गोष्ट विसरतात. नोट वटावयाला आल्याबरोबर रोख नाणेंच तरतें असणें अवश्य आहे. तेथे नुसत्या कागदांचा कांही उपयोग व्हावयाचा नाही. कारण त्या कागदांचे रुपये तावडतोब वसूल होतीलच असा नियम नाही. हे दस्तऐवज बाजारांत विकावे तेव्हा रकम वसूल होणार. पण बाजारांत सोन्यारुप्याची टंचाई उडते तेव्हाच नोटी वटवावयास एकदम येतात. आता एवढें खरें की, सरकारी खिलें केव्हाही विकलीं तरी थोड्या बहुत फरकांनी पैसे वसूल होतात व हे दस्तऐवज बाळगणाऱ्या पेढीवाल्यास अडचण पडावयाची नाही. ह्यांत खिलें विकण्यांत वेळ जाऊन गिऱ्हाइकाची खोटी होते हा एक दोष आहेच; पण शिवाय विशेष हानिकारक परिणाम हा होतो की, गिऱ्हाईक नसतां बाजारांत दस्तऐवज विकावयास आल्यास भाव एकदम उतरून इतका गोंधळ उडेल की नोटींचे रुपये मिळणार नाहीत. मागणी केल्याबरोबर पैसे मिळतील असा करार केला म्हणजे सोनेंरुपें मी जवळ बाळगीन हा दुसरा करार ध्वनित होतो. कारण वायदेचिठ्यांचे रुपये पुढे द्यावयाचे नसतात. देशांत पुरेसें नाणें अथवा सोनेंरुपें नसेल तर दस्तऐवज किंवा पुढे देण्याची बोली ह्यांचाकांही उपयोग होत नाही.

८

वायदेचिठ्यांची भरपाई होण्याकरिता सोनेंरुपें राखून ठेवण्याच्या भरीस न पडतां जमीनजुमला, घरें इत्यादि स्थावर मिळकतीच्या हमीवर वायदेचिठ्या

काढितां यावा असें कित्येक अर्थशास्त्रवेत्त्यांचें मत आहे. फ्रान्स देशाच्या राज्यक्रांतिकारांनी ह्या मताचा अंगीकार केला होता. जप्त केलेल्या देवाळ-यांच्या जमिनीच्या हमीवर त्यांनी कागदी चलन काढिलें. परंतु जमिनीची किंमत ठरली नसल्यामुळे कागदी चलन व जमिनी ह्यांत कांही प्रमाणच राहिलें नाही आणि अखेरीस ह्या चलनाची किंमत मूळच्याहून २०० व्या पटीने उतरली. लढाईमध्ये रिकामी पडलेली तिजोरी भरून काढण्याकरितां "फ्रेडरिक दि ग्रेट" राजाने जमिनीच्या हमीवर वटावतां न येणाऱ्या नोटी काढल्या होत्या, पण ह्या नोटींवर व्याज मिळे.

आपल्या कर्जाची फेड होण्यास सोन्यारुप्यापेक्षा जमीन तारण असणें जास्त श्रेयस्कर ह्यांत संशय नाही; पण हें पुष्कळ मुदतीच्या करारानें पैसे दिले घेतले असतील तेव्हा. परंतु नोटी म्हणजे वाटेल तेव्हा मिळणारें सोनें-रुपेंच होय व जमिनीचे पैसे तावडतोब वसूल होणें असंभवनीय आहे. ह्या बाबतींत दस्तऐवजापेक्षाहि जमीन कुचकामाची आहे.

ह्या पद्धतीने कागदी चलन सुरू करावें असें म्हणणारांचा मुख्य हेतु असा दिसतो की, त्यामुळे फिरत्या पैशाची संख्या वाढून देशाची संपत्ति वाढेल. परंतु फिरते पैसे फाजील झाले तर त्यांची किंमत उतरते हें उघड आहे. व्यापारधंद्याच्या विवक्षित स्थितींत फिरतें चलन नियमित लागतें. शिवाय नोटींच्याऐवजीं कांही नियमित जमीन मिळणें शक्य असेल तरच जास्त झालेल्या नोटी वटावण्याकरितां येतील. एकंदर चलन देशांतील जमिनीच्या किंमतीइतकें करितां येईल असें प्रतिपादणें युक्तिबाह्य आहे.

## ९

गेल्या शतकाच्या आरंभीं या मताचे पुरस्कर्ते युरोपांतील पेढीवाले होते. परराष्ट्रीय हुंड्यांचा भाव पाहून त्याप्रमाणे कागदी चलनांत फेरबदल करावा असें त्यांचें मत असे. ह्या हुंड्यांचा दर हलका झाला व देशाच्या बाहेर धातु जाऊं लागली म्हणजे कागदी चलन बिनमोल होत चाललें असें समजून जास्त नोटी काढण्याचें बंद करावें.

कांहीच पद्धति नसण्यापेक्षा ह्या पद्धतीने कागदी चलन चालवणें बरें. पण अखेरीस ह्याचा परिणाम केवळ ठेवपद्धतीच्या परिणामाहून भिन्न होईल असें मानण्यास कारण नाही.

१०

वाटेल त्या मनुष्याला वाटेल तितक्या वायदेचिठ्ठ्या काढण्याचा हक्क आहे व त्यांत फायदा आहे असें प्रतिपादन करणाऱ्या अर्थशास्त्रवेत्त्यांचा एक वर्ग इंग्लंडमध्यें व अमेरिकेंत आहे. ह्यास ते पेढीस्वातंत्र्य म्हणतात; पण ती त्यांची चूक आहे. कारण प्रॉमिसरी नोटी काढणें हें कांही पेढीचें आवश्यक कृत्य नाही. नोटी न काढणाऱ्या पुष्कळ पेढ्या असतात. ह्या पद्धतीने नोटीचे पैसे देणें पेढीवाल्याला भाग आहे; पण त्याकरिता कांही सदोदित रक्कम राखून ठेवावयाची कीं नाही हें मात्र त्याच्या खुषीवर राहणार. सामान्यतः पैसे दिले जातील ह्यांत संशय नाही. तथापि व्यापाराच्या घरसोडीमुळे केव्हा केव्हा एकदम पुष्कळ नोटी वटावण्याकरिता येतात. अनुभवावरून असें सिद्ध झालें आहे की, कांही लोक अशा आणीबाणीच्या प्रसंगाकरिता कधीच तयार नसतात. त्यामुळे त्यांस आपले करार पुरे करतां येत नाहीत.

११

कधीच वटावतां येणार नाहीत अशा नोटी खुद्द सरकारने फक्त काढण्याचें ठरविलें असें मानलें तर ह्या पद्धतींतील पुष्कळ दोष टाळतां येतील; मात्र सरकारनेसुद्धा नोटींवरची लेखी किंमत व प्रत्यक्ष किंमत ह्यांत फरक पडतांच नोटी कमी केल्या पाहिजेत. जोंपर्यंत ही किंमत सारखीच आहे तोंपर्यंत ह्या नोटी वटावतां येणाऱ्या नोटींसारख्याच समजावयाच्या. फ्रँको-जर्मन युद्धाच्या आरंभीं फ्रेंच बँकेने ह्याच धोरणावर आपलें कागदी चलन चालविलें होतें. राजकीय संकटें व सरकारी तिजोरींत तूट अशी स्थिति असतांही शेंकडा १ किंवा $\frac{1}{2}$ प्रमाणाहून जास्त त्या बिनवटावल्या जाणाऱ्या नोटींची किंमत उतरली नाही; परंतु अशीं उदाहरणें क्वचित्च

आढळतात. इंग्लंडमध्ये बँक ऑफ इंग्लंडच्या नोटींचे पैसे मिळणार नाहीत असें कायद्याने ठरविण्यांत आलें होतें, त्या वेळीं सोन्याचा भाव शेंकडा २५ ने वाढला. अर्थात् नोटींची किंमत तितकी कमी झाली.

१२

सरकारदेणें वसूल करतांना कागदी चलन घेण्याचें कबूल करून व कांही ठिकाणीं तर सरकारदेणें कागदी चलनांत दिलें पाहिजे असा नियम बांधून त्या चलनाची किंमत कायम राखण्याचा प्रयत्न कित्येक सरकारांनी केला आहे. रशिअन सरकारने जेव्हा कागदी चलन सुरू केलें तेव्हा तें ठरीव दराने तांब्याच्या नाण्याच्या ऐवजी घेण्याचें कबूल केलें होतें व शिवाय अशा देण्याचा निदान $\frac{१}{१०}$ हिस्सा या चलनांतच दिला पाहिजे असेंही ठरविलें होतें. फ्रेंच राज्यक्रांतिकारांचें कागदी चलनही सरकारी तिजोरींत घेत असत. दोन अटी पाळल्या तर अशा रीतीने कागदी चलनाची किंमत कायम राखतां येईल. ( १ ) कर किंवा सरकारखिस्त निश्चित पाहिजे. ( २ ) व नोटीची संख्या इतकी मर्यादित पाहिजे की, नोटीचें नाणें करूं पाहणाऱ्या कोणत्याही इसमास नोट घेऊन तें देणारा एखादा कर देणारा इसम भेटावा. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतूनही त्यांचें ग्रीनबॅक नांवाचें कागदी चलन सरकारदेण्यांत घेत असत.

लहान प्रमाणावर पुष्कळ देशांत पोस्टाच्या तिकिटांचा चलनासारखा उपयोग करीत असतात. अमेरिकन् युद्धाच्या आरंभीं तर पोटनाण्याच्या ऐवजी त्यांचा एकसहा उपयोग होत होता. इंग्लंडांतहुदा देणें देण्याचें तिकिटें हें एक मान्य साधन झालें आहे. त्या देशांत शेंकडा २॥ बट्याने हीं तिकिटें पोष्टांत परत घेतात. आपल्या इकडेही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं रुपयापर्यंत पैसे पाठवावयाचे असल्यास पत्रांतून तिकिटें पाठवण्याचा प्रघात पडला आहे. पोष्टाच्या तिकिटांप्रमाणे कोर्टांचे स्टॅपही पाठविण्यांत येतात. वापरलेलें तिकीट रद्द होत असल्यामुळे पुष्कळ तिकिटें निघून त्यांची किंमत कमी होईल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

किरकोळ पैसे पाठवावयाचे असल्यास तिकिटें फार सोयीचीं पडतात. दिडक्या दोन दिडक्यांच्या ऐवजी पोष्टाचीं तिकिटें दिलीं घेतलीं तरी कांही हरकत असण्याचें कारण नाही. मोठया प्रमाणावर मात्र उपयोग करतां कामा नये.

१३

जवळ द्रव्य नसलेल्या अशा बंडखोर मंडळ्यांना अथवा युद्धांत गुंतलेल्या राज्यकर्त्यांस यशःप्राप्तीनंतर रोख पैसे देण्याचें वचन देऊन वायदेचिठ्ठ्या काढण्याची फार सवय असते. त्या मुदतीचें व्याज देण्याचेंही जेव्हा अभिवचन दिले असेल, तेव्हा त्यांस वायदेचिठ्ठया म्हणण्यापेक्षा खतें म्हणणें बरें. हंगेरी येथे स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या हेतूने पैसे गोळा करण्याकरता अशाच वायदेचिठ्ठया काढण्यांत आल्या होत्या. त्यांचे पैसे राज्यस्थापनेनंतर द्यावयाचे होते. अशाच मासल्याच्या चिठ्ठया निकाराग्वा येथे प्रजासत्ता स्थापन करूं पाहणाऱ्या वॉकरने काढल्या होत्या. हे दस्तऐवज म्हणजे लांब मुदतीच्या व अनिश्चित किंमतीच्या हुंड्या होत. युद्धाच्या वेळीं लोकांत जी ईर्ष्या असते तिच्यामुळे असल्या प्रकारचें चलन कांही काल टिकतें, पण पुढे त्याच्या किंमतींत जबर फरक पडत जातात आणि अशा चिठ्ठ्यांचे पैसे अखेरीस मिळाले अशीं थोडकींच उदाहरणें दाखवितां येतील.

## कागदी पैसा

सरतेशेवटीं शुद्ध कागदी पैशाचा आपण विचार करूं. हे पैसे काढून लोकांनी कर्जाच्या फेडींत ते घेतले पाहिजेत असें सरकार ठरवितें. ह्या बिनवटावतां येणाऱ्या नोटी प्रथमतः सुरू करितात तेव्हा बहुतेक प्रसंगीं त्या वटावतां येतील अशा समजुतीने प्रचलित करण्यांत येतात व त्यांचा निर्देशही पैशांत केला जातो. रोख पैसे देण्याचें वचन भ्रामक आहे असें आढळल्यावरसुद्धा नोटी पूर्ववत् चालतात; त्याचें कारण कांही अंशीं सवय व कांही अंशीं नाण्यांचा अभाव हें होय. कांही तरी चलन पाहिजेच असतें, त्याच्यावांचून लोकांचें चालावयाचें नाही व इकडे व्यव-

हाराकरता तर लोकांजवळ नाणें नसतें अथवा असल्यास पुढे फायदा व्हावा ह्या आशेने तें सांठवून ठेवलेलें असतें. अशा वेळीं जें असेल तें चलन वापरावें लागतें. अत्यंत नेमस्तपणाने नोटी पाडल्या तर त्यांची मूळ किंमत कायम राखतां येते ह्याबद्दल भरपूर पुरावा आहे. ह्या संबंधाने बँक ऑफ् फ्रान्सच्या नोटींचें उदाहरण ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. असल्या प्रकारच्या चलनाला मुख्यतः दोन प्रकारच्या हरकती आहेत.

१ अतिरेक करण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते आणि त्यामुळे तें चलन विनमोल होत जातें.

२ व्यापाराच्या सोईप्रमाणे एकंदर संख्येंत बदल करणें अशक्य असतें.

## कागदी पैशाचा अतिरेक

नोटीचे रोख रुपये देण्याची कायदेशिर अवश्यकता एकदा नाहीशी झाली की नोटींचा अतिरेक झालाच असें समजावें. हा प्रकार बहुतेक सर्व राष्ट्रांत घडून आला आहे. रशियामध्ये १०० वर्षें सारखें हें चलन होतें. संख्येची इयत्ता वारंवार ठरविली जात असे; पण दुसरी लढाई सुरू झाली की इयत्ता उल्लंघण्यास वेळ लागत नसे. अमेरिकेसारख्या देशांतसुद्धा हीच स्थिति दिसून येत असे. सरकारची तिजोरी जेव्हा रिकामी पडते तेव्हा लोकां-जवळून जुलमाने कर्ज काढण्यास हाच खात्रीचा उपाय योजला आहे. अशा रीतीने लोकांकडून पैसे काढून परदेशीय व स्वदेशीय कर्ज सरकार फेडतें. तसेंच लोकांचे आपआपसांतले करारही मोडावयास सरकार लावतें. सावकाराने ऋणकोला रोख पैसे दिलेले असतात; पण हें कागदी चलन सुरू होतांच पैशाच्या ऐवजी त्यास कागदाचीं चिटोरीं घ्यावीं लागतात. अशी स्थिति आणणाऱ्या राज्यकर्त्यांची दैनाच उडाली असलेली पाहिजे हें उघड आहे.

## कागदी पैसा कमी करतां येत नाही

बदलून ज्याचें नाणें मिळत नाही अशा कागदी पैशाच्या चलनाला आणखी दुसरी एक हरकत अशी आहे की, व्यापाराच्या स्वाभाविक

घडामोडीने त्याच्या संख्येंत बदल करतां येत नाही. धातूच्या पैशाप्रमाणे हे पैसे परदेशी कोणी पाठवीत नाहीत किंवा परदेशांतून मागावीतही नाहीत. त्याचप्रमाणे सरकार अगर सरकारने अधिकार दिलेल्या पेढ्या ह्यांव्यतिरिक्त ते कोणाला सुरू करितां येणार नाहीत; त्यामुळे व्यापाराची तेजी असतां जास्त लागणाऱ्या पैशाचा पुरवठा सरकारी हुकमावांचून होणें शक्य नाही; आता सरकारने व्यापाराच्या सोयीकरता हा पुरवठा यदाकदाचित् केलाच तर व्यापार मंदावल्यावर हें चलन अनवश्यक होतें व त्यामुळे त्याची किंमतही उतरते. सरकार कितीही चौकस असलें तरी जास्त पैशाची अवश्यकता केव्हा आहे केव्हा नाही ह्याचें यथार्थ ज्ञान त्यास कधीही होणार नाही. इतर सर्व पुरवठ्याप्रमाणे पैशाचाहि पुरवठा तेजी व मंदी ह्यांच्या स्वाभाविक नियमांस अनुसरूनच झाला पाहिजे.

कागदी पैसा देशाच्या बाहेर जाऊन कमी होणें शक्य नसल्यामुळे व परदेशीं चाललेल्या व्यापारी घडामोडीचा त्यावर कांही परिणाम होत नसल्याकारणाने देशांतल्या देशांत चालण्यास कागदी पैसा योग्य आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे; परंतु अन्तर्गत व्यापार व परराष्ट्रीय व्यापार ह्यांचा संबंध तोडणें शक्य नाही. दोन राष्ट्रांचा परस्परांशीं व्यापार चालला की तेथे मालाची किंमत मोलवान धातूमध्येच ठरली गेली पाहिजे. हिशोबाअंतीं ज्या राष्ट्रास दुसऱ्याचें देणें निघेल तें राष्ट्र सोन्या-रुप्यापैकी कोणत्या तरी धातूनेच त्या देण्याची फेड करील; म्हणून प्रत्येक व्यापाऱ्याने माल मागतांना किंवा पाठवतांना त्याच्या कागदी किंमतीचा विचार न करतां धातुरूप किंमतीचाच विचार केला पाहिजे. कारण मालाची किंमत वस्तुतः सोन्यारुप्यांतच तो देत असतो. तात्पर्य, वटावतां-न येण्याजोगा असा कागदी पैसा चालू असला तरी किंमतीचें वास्तविक परिमाण सोनें आणि रुपें हेंच राहतें. किंमतींत वारंवार फरक पड-णारें कागदी चलन अनवश्यक असल्यामुळे अधिक घोटाळ्यास कारणीभूत मात्र होतें.

## भाग एकोणिसावा

# साकपत्रें

नाण्याचें काम साकपत्रांकडून करून घेतां येईल व फिरतें चलन विपुल करण्याकरिता पुरेशीं बिलें आणि कायदेचिठ्ठया छापून काढिल्या म्हणजे काम झालें असें मोघम विधान करणाऱ्या ग्रंथकारांनी पैशाच्या संबंधाने बराच घोटाळा करून ठेवला आहे. साकपत्राच्या योगाने संपत्ति वाढून इच्छित त्या गोष्टी पार पाडितां येतात, असें त्यांचें म्हणणें आहे. परंतु ह्या साकपत्रांच्या स्वरूपाचें पृथक्करण केलें असतां असें दिसून येईल की, विश्वास अथवा पत म्हणजे देणें लांबणीवर टाकणें होय. मी उधार माल घेतों तेव्हा त्याच्याबद्दल आज जें मला दिलें पाहिजे तें पुढे कांही दिवसांनी घेण्याबद्दल धनकोचें मन वळवतों. त्याचप्रमाणे मी माल उधार देतों तेव्हा मीं आपल्या ऋणकोस कर्ज फेडण्यास मुदत देतों. तात्पर्य हा विश्वास म्हणजे कांही नियमित वेळांत पैसे मिळतील ही आशा होय. कर्ज द्यावयाचें तें कोणत्याहि पदार्थाचें असूं शकेल. मला धान्य, तेल, कापूस, मीठ ह्यांपैकी कांहीहि द्यावयाचें असेल; परंतु सधारणतः कर्ज कायदेशीर फेडीच्या चलनाचें समजलें जातें.

ह्या पतीचें स्वरूप स्पष्ट समजण्याकरिता निरनिराळ्या गोष्टींचा विचार करणें अवश्य आहे.

१. मिळणाऱ्या पैशाची संख्या.

२. ते मिळण्यापूर्वी जाणारा काळ.

३. त्या वेळेस ते दिले जाण्याचा संभव.

४. दरम्यान असणारा व्याजाचा दर.

५. त्या व्यवहारांनी उत्पन्न होणारीं कायद्याचीं बंधनें.

कायद्यांत किंवा चालींत यत्किंचित् फरक पडल्यास त्यापासून महत्त्वाचे परिणाम निष्पन्न होतात ह्या गोष्टीचा विचार न करितां सर्व प्रकारचीं साकपत्रें एकाच माळेंत गोंवण्याची सवय एतद्विषयक ग्रंथकर्त्यांस विशेष आहे. इतकें खरें की, पैसे देण्याच्या प्रत्येक जातीच्या वायद्याला कांही तरी किंमत असतेच. परंतु देवघेव सुकर होण्यास जी उपयुक्तता अवश्य आहे ती पुष्कळ भिन्न गोष्टींवर अवलंबून असते.

## चलनी नोटी

आपण जीस चलनी नोट म्हणतों ती प्रॉमिसरी नोट होय. युरोपियन राष्ट्रांत ह्या नोटी पाडण्याचा अधिकार कांही पेढीवाल्यांना दिलेला असतो; पण आपल्या देशांत हा अधिकार सरकारने फक्त आपल्याकडे ठेविला आहे. ह्या नोटीवर लिहिलेले रुपये मागतांक्षणींच देण्यास सरकारने आपणास बांधून घेतलें आहे. नुसती मालकी बदलण्यास ती दुसऱ्याच्या हस्तगत केली म्हणजे झालें. म्हणून ज्याप्रमाणे नाणें आपल्याजवळ असलें म्हणजे त्याचे आपण मालक समजले जातों, त्याचप्रमाणे नोट आपणाजवळ असली म्हणजे आपण मालकच आहों असें प्रथमदर्शनीं मानलें जातें. म्हणून केव्हाही थोड्या तासांच्या अवकाशाने चौकशीवांचून आपणांस हक्काने पैसे मिळूं शकतात. जर कदाचित् सरकारांतून पैसे मिळाले नाहीत तर त्या नोटीचे पैसे देण्याची जबाबदारी ज्यांच्याकडून आपण ती नोट पूर्वी घेतली त्याच्यावर पडत नाही. म्हणजे नाण्याप्रमाणेच कर्ज फेडण्यांत आणि देणें वारण्यांत नोटींचा सतत उपयोग केला जातो. प्रामिसरी नोटींचे पैसे मागितल्याबरोबर मिळण्यासारखे असल्यामुळे तिच्यावर व्याज मिळत नाही व तिचे मिळावयाचे पैसे कधी कमी होत नाहीत ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. एवढ्याकरिता नाणें बाळगणाऱ्या मनुष्याप्रमाणे नोट जवळ असणाऱ्या मनुष्याचा— जर पुढे कांही खरेदी करावयाची नसेल तर— ती बाळगून ठेवण्यांत हेतु नसतो. आपणांस साधारणपणें खर्चास लागतील त्याहून जास्त नोटी आपल्याजवळ असल्या तर त्या आपण पेढीवर

ठेवूं. तेथे त्या सुरक्षित राहून शिवाय आपणांस व्याज मिळेल. अशा रीतीने नाण्यांप्रमाणे नोटी आपोआपच वापरल्या जातात व त्या आपणाजवळ फाजील बाळगून ठेवण्याची कोणाची प्रवृत्ति होत नाही.

## चेक अगर दर्शनी हुंडी

चेक म्हणजे दर्शनी हुंडी होय; चेक काढणारा इसम, अमुक निश्चित मनुष्यास अगर तो हुकूम करील त्यास अगर तो हजर करणारास फक्त पैशांची अमुक रकम देण्याविषयी एखाद्या विवक्षित पेढीवाल्याला हुकूम करतो. चलनी नोटीप्रमाणेच दर्शनी हुंडीला व्याज नसतें. जेव्हा चेकाचे पैसे चेक हजर करणारास मिळावयाचे असतात तेव्हा तो दुसऱ्याच्या हस्तगत केल्याने त्यावरची मालकी बदलते येते व ज्याच्या कबजांत चेक असेल त्याचा तो प्रथमदर्शनीं मालक समजला जातो. अशा प्रकारचा म्हणजे धाहाजोग चेक ज्याने काढला असेल तो इसम व ज्या पेढीवर तो दिला असेल ती पेढी ही दोनहि ऐपतदार असतील तर ह्या चेकाची योग्यता चलनी नोटीहून कमी असण्याचें कारण नाही. दोहोंमध्ये फरक इतकाच की, चेक विषम संख्येचाहि असतो तशी चलनी नोट नसते. अशा रीतीने चेकांचा उपयोग कित्येक ठिकाणीं होत असतो. ऑस्ट्रेलियांत क्वीन्सलंड प्रांतांत नाणें अगर चलनी नोटी नसल्याकारणाने तेथील वसाहतवाले आपल्या लोकांस लहान रकमेचे चेक पेढीवर देत व ते चलनाऐवजी वापरले जात; परंतु चलनाप्रमाणे चेकांचा उपयोग करण्यास उघड हरकती आहेत त्या अशा :

प्रत्येक पेढीवाल्याच्या चेकांचे नमुने काढणाऱ्यांच्या सह्या व ऐपत ह्या सर्व गोष्टी प्रत्येकास माहीत असणें शक्य नाही. खरेपणाबद्दल चौकशी न करितां लोक बिनदिक्कत चेक वापरूं लागले तर ठकबाजी करण्यास अनुकूल स्थिति प्राप्त होईल. हुंडीच्या नमुन्यांची वही अगर चेकबुक कसें तरी स्वाधीन करून घेतलें म्हणजे पेढीवाल्याकडे शिल्लक असलेल्या रकमेहून जास्त रकमेचे चेक खुशाल काढावे. खरी स्थिति कळण्यास लोकांना कांही मार्ग नसतो. काढणारांची शिल्लक संपल्यामुळे सरनाम्याने चेक स्वीकारूं

नये व हुकडे काढणाराने दिवाळें काढावें. ही स्थिति अनभिज्ञ अशा मधल्या लोकांस टाळतां येणें शक्य नाही. शिवाय ज्या पेढीवर चेक काढला असेल त्या पेढीचें दिवाळें वाजणें शक्य आहे. कारण कायद्याचा असा नियम आहे की, चेक मिळाल्यापासून योग्य मुदतींत व कामाच्या वेळीं तो हजर न केल्यास व त्यामुळे पेढीचें दिवाळें निघून चेकचे पैसे न मिळाल्यास मूळ काढणाऱ्या इसमावर त्या चेकचे रुपये देण्याची जबाबदारी पडत नाही. योग्य मुदत म्हणजे कोणती समजावयाची ह्याचा निर्णय पेढी-वाल्यांची व व्यापाराची पद्धति, चेकाचें स्वरूप व इतर गोष्टी ह्यांवर करावयाचा असतो. चेक काढणारा जबाबदारींतून सुटतो ह्याचें कारण उघडच आहे की, पेढीवर चेकाचे पैसे देण्याकरिता जी त्याची शिल्लक असते ती नाहीशी होते; आणि म्हणून चेक घेणाऱ्या कसूरीमुळे झालेलें नुकसान त्याच्यावर पडत नाही.

कायद्याच्या निर्बंधामुळे पैशाच्या ऐवजी चेक वापरले जात नाहीत; ते घेतल्यापासून एक दोन दिवसांच्या आंतच पेढीवर हजर करावे लागतात ह्यामुळे चेकांचा उपयोग पैसे देण्याघेण्याचें साधन म्हणून केला जातो. त्याचप्रमाणे चेकांच्या बाबतींत पतीवर फार वेळ अवलंबून रहावें लागत नाही. व्याज चालू नसल्यामुळे तो बाळगून ठेवण्यांत कांही मतलब नसतो. उलट झालेंच तर नुकसान होण्याचा मात्र संभव. चलनी नोटी अथवा रोख पैसे न घेतां चेक घेतला तर तो रुजू करण्याची दगदग पडते एवढेंच कायतें. व्याजाचा प्रश्न दोन्हीमध्ये सारखाच. पाहिजे तर चेकाचे रुपये घेऊन आपल्या पेढीवाल्याकडे ठेवावे म्हणजे सुरक्षित राहून व्याजहि मिळतें. पुढे आपणांस गरज लागेल तेव्हा चेक देऊन घेणें फेडावें म्हणजे झालें. ह्या संप्रदायावरच पुढच्या भागांत निरूपण केल्या जाणाऱ्या चेक आणि वजावाट पद्धतीचा पाया उभारला आहे.

चेक निरनिराळ्या प्रकारचे असतात: बँकड्राफ्ट अगर पेढीवाल्याच्या हुंड्या ज्यांस म्हणतात ते. चेक एक पेढीवाला दुसऱ्या पेढीवाल्यावर काढतो

आणि पैसे परठिकाणीं पाठवण्यास त्यांच्यायोगाने सोयीचें पडतें म्हणून त्यांचा उपयोग केला जातो. दोनहि पेढीवाले पुऱ्या कायकीचे असून त्यांचे नमुने व सह्या चांगल्या रीतीने ओळखतां येतील तर चलनी नोटींप्रमाणेच प्रतिनिधीभूत पैसे म्हणून ह्यांचा उपयोग करण्यास हरकत दिसत नाही. ह्याप्रमाणे दोन नामांकित पेढीवाले अतिशय मोठ्या नव्हे अशा ठोक रकमांचे चेक परस्परांवर काढून ते आपल्या गिऱ्हाइकांस देऊं लागले तर चलनी नोटी ठरीव संख्येच्या बाहेर न पाडण्याचा कायदा निर्धास्त रीतीने निरुपयोगी करतां येईल; परंतु सवयीचा इतका जबरदस्त अंमल असतो व कायद्याबद्दल इतका आदर असतो की, असा प्रयत्न आजपर्यंत कोणीं केला नाही व दुसऱ्या चेकांप्रमाणे पेढीवाल्यांचे ड्राफ्टहि ताबडतोब रुजू करण्यांत येतात.

दुसरे शिक्क्याचे चेक म्हणून असतात; हे चेक न्यूयॉर्क शहरीं वापरतात. हे चलनी नोटींच्या जवळजवळ येतात. कारण ज्याच्यावर ते काढलेले असतात त्या पेढीवाल्याचा शिक्का त्यावर असतो त्यामुळे त्यांचे पैसे मिळण्याची खातरजमा असते. अशी खात्री देणाऱ्या पेढीवाल्याजवळ चेक काढणाराची शिल्लक असते; किंवा नसली तरी रुजू केलेल्या चेकाचे पैसे देण्याचें तो पतकरतो. खरोखर म्हटलें तर पेढीवाल्याच्या ह्या प्रॉमिसरी नोटीच होत व त्याप्रमाणे त्या चालण्यास कांही हरकत नाही. मात्र ठोक रकमेचे ते क्वचित् असतात आणि लबाडी होण्याचा संभवहि बराच असतो.

## अदलाबदल करतां येणारी हुंडी

हिलाच इंग्रजींत बिल ऑफ एक्स्चेंज म्हणतात. मराठींत ह्यास नुसती हुंडी म्हणतां येईल. अमुक निश्चित मनुष्यास अगर तो हुकूम करील त्यास अथवा लेख हजर करणारास फक्त पैशाची अमुक रक्कम देण्याविषयी अमुक मनुष्यावर, करणाऱ्याच्या सहीसह बिनअटीचा हुकूम ज्यांत लिहिलेला असतो तीस हुंडी म्हणावें.

एखादी निर्दिष्ट गोष्ट केव्हां घडेल याचा जरी नियम नाही, तरी लोकांच्या साधारण प्रतीक्षेप्रमाणे घडावयाची खरी; अशी गोष्ट घडल्यापासून अमुक मुदतीनंतर रकम अगर एखादा हप्ता देण्याची वेळ पैका देण्याविषयींच्या वायद्यांत किंवा हुकमांत लिहिली आहे, म्हणून तो वायदा किंवा हुकूम भ्रष्ट होत नाही.

रकम द्यावयाची तींत पुढील व्याजाचा अगर बट्ट्याच्या दराने होणाऱ्या रकमेचा समावेश करतां येतो. तसेंच पैसे ज्यास द्यावयाचे त्याचें नांव नसतां वर्णन असलें तरी चालेल. ( हिंदुस्थान सरकारचा कायदा २६ स. १८८१ चा पहा ).

रकम जर "पहातांच" द्यावयाची असेल तर बिल आणि चेक ह्यांत अंतर नाही. म्हणजे ती दर्शनी हुंडी समजावयाची. इंग्रजींत बिल आणि चेक ह्यांत थोडा फरक आहे. पेढीवाल्यावर काढलेल्या दर्शनी हुंडीस ते चेक म्हणतात व इतर लोकांवर काढलेल्या हुंडीस बिल म्हणतात. हा फरक वर सांगितलेल्या कायद्यांत ह्या देशांतही राखला आहे. "पहातांच" पैसे मिळावयाचे नसले म्हणजे पैसे मिळण्याची मुदत एकाहून जास्त दिवस असणें शक्य आहे. ती संपेपर्यंत पैसे मागतां येत नाहीत. एवढ्याकरता बिलावर बहुधा व्याज असतें. किंवा विकलें तर त्याचे भरपूर पैसे न येतां पैसे मिळण्याची मुदत संपेपर्यंत जो व्याजाचा हिशोब होईल तेवढी रकम वजा करून बाकी पैसे मिळतील. म्हणून दरम्यान व्याजाचा दर काय असेल ह्याचा अजमास पाहून बिलाची खरेदी करावी लागते. हजर करणाराला पैसे मिळण्याचीं बिलें नसतात असें नाही; पण प्रायः एखाद्या निश्चित मनुष्यास पैसे मिळण्याविषयी तीं काढलीं जातात, मग जरूर तर तो मनुष्य शेरा मारून दुसऱ्याच्या नांवाने तें बिल करतो. ह्याप्रमाणे बिलाची रकम अखेरीस मिळेपर्यंत दरम्यान ज्यांच्या हातून तें बिल गेलें असेल ते सर्व त्यांतील रकमेबद्दल जबाबदार असतात. ह्यावरून नाणें पाडलेल्या पैशापेक्षा बिल पुष्कळ बाबतींत भिन्न आहे हें उघड आहे; नाण्याला व्याज नसतें

व तें दिलें म्हणजे नवीन जबाबदारी उत्पन्न न होतां पूर्वीची नाहीशी होते. तसा प्रकार विलाचा नसतो.

## ज्यावर व्याज मिळतें असे दस्तऐवज

ज्या दस्तऐवजांवर व्याज असतें व ज्यांवर नसतें अशा दोन दस्तऐवजांमधील फरकाचा विचार बऱ्याचशा ग्रंथकारांनी केलेला नाही. परंतु ह्या गोष्टीवरूनच ते प्रतिनिधीभूत पैसे म्हणून चालण्यास लायक होतात किंवा नाही हें ठरवावयाचें असतें. पेटीमध्ये नाणें ठेवलें तर त्यापासून कांही नफा होत नाही; हा नाण्याचा विशिष्ट स्वभाव आहे. लोकांचें देणें देण्याकरिता रोख पैसे जवळ ठेवणें भाग आहे खरें; पण त्या मुदतींत ते पैसे पेढीवर ठेऊन, कर्जाऊ देऊन अथवा सरकारी कागद विकत घेऊन वगैरे रीतींनी जो फायदा व्हावयाचा तो होत नाही. म्हणून पैसा म्हणजे पुरवठा व खप ह्यांच्या नियमांनी बद्ध झालेल्या दुसऱ्या कोणत्याहि पदार्थांप्रमाणेच पदार्थ होय. हातांतून पैसे दूर करून एखाद्या किफायतीच्या कामांत ते घालण्याकडे प्रत्येकाची प्रवृत्ति असते. हीच स्थिति चलनी नोटी, दर्शनी हुंड्या इत्यादि बिनव्याजाच्या दस्तऐवजांची होय. व्याज येत नसल्यामुळे असले दस्तऐवज कुलपांत राखून ठेवण्यास कोणी तयार नसतो. म्हणून नाण्यांशीं ह्या दस्तऐवजांचें साम्य फार असतें. ह्याच्या उलट, व्याज मिळणारे दस्तऐवज मनुष्य आपल्याजवळ राखून ठेवितो. कारण उघडच आहे की, जितका काळ जास्त जाईल तितकें व्याज वाढतें. आपल्याकडे लोकांनी ठेवलेल्या ठेवींचा बराचसा भाग प्रत्येक पेढीवाला सरकारी अगर दुसऱ्या पतीच्या संस्थांचे कागद विकत घेण्यांत खर्च करितो व हे कागद तो आपल्या जवळ बाळगतो.

आपल्या नेहमीच्या चलनाखेरीज दुसरें एक व्याजाचें चलन असावें असा कित्येकांचा आग्रह आहे. अमेरिकन सरकारने ह्याचा अनुभव घेऊन हें व्याज देणारें चलन लवकरच बंद केलें. फ्रेंच लोकांचें पहिलें 'आसिन्या' नांवाचें चलन निघालें त्यावरहि त्यांनी व्याज ठेविलें होतें. राष्ट्रीय कर्जाचें चलन

चलनाचें असेंहि कित्येकांचें म्हणणें आहे. उदाहरणार्थ, दरसाल दर शेंकडा ४ रु. प्रमाणें १०० रु. मागाल तेव्हां देऊं, अशा नमुन्याच्या नोटी सरकारनें काढावयाच्या. व्याज दिलें असेल तें त्या नोटीवर मांडावयाचें. या पद्धतींत काहींच गुण नाहीं. व्याजाचा दर बाजारापेक्षां जास्ती झाल्याबरोबर सर्व लोक नोटी तिजोरींत आणून रोख रुपये मागूं लागतील. त्यामुळें नोटींचे सर्व पैसे तयार ठेवण्याची आवश्यकता आली; यामुळें सरकारला दुहेरी तोटा होणार. नोटी फिरत्या आहेत तोंपर्यंत व्याज चालू आहेच; नोटींची रकम अडून राहिल्यानें व्याज मिळावयाचें तें मिळत नाहीं.

## पैशाची व्याख्या

पैशाची व्याख्या करण्यांत पुष्कळ बुद्धिकौशल्य खर्च झालें आहे व कोणकोणतीं विभावपत्रें पैसेदाखल मानावीं याबद्दल कडाक्याचा वाद माजून राहिला आहे. कायदेशीर फेडीचें मुख्य चलन नाणें असून तें पुन्हा वजनाचें असल्यास तें निर्विवाद पैसे अथवा द्रव्य होय. आणि चलनी नोटींचे हवे तेव्हां पैसे मिळण्यासारखे असल्यामुळें त्यांसहि पैसा मानण्यास हरकत नाहीं, असें प्रतिपादन वारंवार करण्यांत येत असतें. पण बटावतां न येण्याजोग्या नोटीसुद्धां कायद्यानें कायदेशीर फेडीचें चलन म्हणून ठरल्या जातात व त्यामुळें देशांतल्या देशांत पैशाचीं सर्व कार्यें त्यांच्याकडून होत असतात, तेव्हां त्यांचा द्रव्यांत समावेश कां करावयाचा नाहीं? मंतर चेकांनाहि द्रव्य कां म्हणूं नये असा दुसरा प्रश्न उद्भवेल. हे जे द्रव्याची व्याख्या करण्याचे प्रयत्न, त्याच्या मुळाशीं एक गैरसमज आहे तो हा कीं, एका शब्दाची व्याख्या केल्यानें ज्या प्रत्येक वस्तूची स्वतंत्र व्याख्या असणें अवश्य आहे अशा सर्व वस्तूंतील निरनिराळे भेद टाळतां येतील. निवळ धातु, 'नाणें,' 'उपनाणें,' बटावतां येण्याजोग्या व बटावतां न येण्याजोग्या नोटी, कायदेशीर फेडीचें चलन, व बिनकायदेशीर फेडीचें चलन, निरनिराळ्या प्रकारचे चेक, व्यापारी हुंड्या, इत्यादिपैकीं, कोणत्याहि प्रकानें, ऋणकोधनकोचें ऐकमत्य असल्यास देण्याची फेड

होण्यास हरकत नाही. तथापि ह्या सर्व वस्तु भिन्न आहेत. ह्यांपैकी कांहींस द्रव्य म्हटल्याने व कांहींस न म्हटल्याने त्यांत कायद्याच्या व अर्थशास्त्राच्या दृष्टीने जो भिन्नपणा आहे त्याकडे दुर्लक्ष करणें शक्य नाही. धातूची लगड हें अर्थात् नाणें नाही. पण अगदी अल्प खर्चाने त्याचें नाणें पाडतां येणें शक्य आहे. तसेंच निवळ धातूच्या योगाने नाण्यांप्रमाणेच परदेशांतील देणें देतां येतें. उपनाणीं मुख्य नाणीं नव्हत व परराष्ट्रीय कर्ज फेडण्यांत त्यांचा कांही एक उपयोग नाही. परंतु लहान रकमांपर्यंत तद्द्वारा फेड केली जाते व मुळीच किंवा म्हणण्यासारखें नुकसान न लागतां तीं देऊन मुख्य नाणीं चटकन मिळूं शकतात. चलनी नोटी प्रत्यक्ष नाणीं नाहीत. तथापि कागदी चलनाच्या ऑफिसाच्या आसपास राहणारांस त्यांचे तावडतोब रुपये रोख मिळूं शकतात व लोकहि नाण्यांच्या ऐवजी ह्या नोटी स्वीकारण्यास मुळीच कांकूं करीत नाहीत. चेक हें नाणें नसून तें मागतांच देण्याचा हुकूम होय व पैसे मिळण्याची जितकी खात्री त्या मानाने चेकांची किंमत ठरते. स्वीकारलेली हुंडी म्हणजे विवक्षित दिवशीं रोख रुपये देण्याचा वायदा होय. सत्कारणाऱ्याच्या हातून पैसे न मिळण्याची संभवनीय गोष्ट बाजूस ठेवली तर ह्या हुंड्या म्हणजे विलंबी अथवा अनुरुद्ध पैसे होत. सारांश आपण जेथून आरंभ केला तेथेच पुनः आलों. इतर सर्व दस्तऐवज व व्यापारी करार ह्यांचा निर्देश कायदेशीर फेडीच्या मुख्य चलनी नाण्यांतच केला जातो; परंतु त्यांचे रोख रुपये मिळतेसमयीं त्यांतील फरक दृष्टीस पडतो. कांहींत पैसे मिळण्याची खात्री कमी असते; कांहींत जास्त असते; कांहींत रकम तावडतोब मिळते; कांहींत विलंब लागतो; कांहींत कायद्याच्या भानगडी कमजास्त असतात; कांहींत व्याजाच्या करारामुळे अगर तदभावीं शेवटीं मिळणाऱ्या रकमेंत कमज्यास्तपणा होतो. ह्याशिवाय दुसरी व्यापारी मिळकत म्हणजे गहाणखतें, भागदाखले, विम्याचे दाखले, कर्जाचे रोखे इत्यादि दस्तऐवजसुद्धा अशाच मासल्याचे आहेत, म्हणजे विवक्षित काळीं पैसे मिळण्याची शक्यता हे दस्तऐवज उत्पन्न करतात. अशा रीतीने न कळत आपण आपल्या हातांतील

रोख रुपये घालवून त्याच्या ऐवजी ते रुपये पुढे मिळतील ह्या नुसत्या संभवावर तृप्त होऊन बसतों. पैशाइतक्याच संदिग्ध अर्थानें आपण रोख किंवा रोकड हे शब्द वापरतों. रुक्का शब्दावरून रोख शब्द झालेला असावा. तेव्हां रोख ह्या शब्दानें वस्तुतः पहातां त्या त्या देशांत चालणारें नाणेंच पाहिजे व ह्याप्रमाणे कित्येक ठिकाणीं समजतातहि. परंतु पुष्कळ ठिकाणीं चलनी नोटीहि रोकडींतच मोडल्या जातात. कित्येक ठिकाणीं तर खात्रीलायक हुंड्यांचाहि समावेश रोकडींत केला जातो. सारांश, ह्यांत तारतम्य आहे. ह्या शब्दाची निश्चित व्याख्या करणें व ती सर्व व्यापाऱ्यांनी पतकरणें कठीण आहे.

साधारण व्यवहारांतहि आपण असे पुष्कळ शब्द हम्मेश वापरतों की त्यांचा अगदी बिनचूक अर्थ काय होतो ह्याची आपण बिलकुल पर्वा करीत नाहीं. उदाहरणार्थ 'घर' आणि 'इमारत' ह्या दोन शब्दांनी कोणकोणते वेगवेगळे पदार्थ सूचित केले जातात हें कोणास ठरवितां येईल! पागा, गोठे, उपगृहें, विश्रांतिगृहें, दीपगृहें, सोपे, ह्यांपैकी 'इमारती' शब्दांत किती व 'घर' ह्या शब्दांत किती मोडतात ह्याचा निर्णय करण्याचा प्रयत्न वाचकांनी करावा. हें जितकें कठीण तितकेंच द्रव्य अगर रोकड ह्या शब्दाचे अर्थ निश्चित करणें कठीण आहे.

---

## भाग विसावा
## वहींतील जमाखर्च आणि पेढीची पद्धति

नाण्याच्या ऐवजी तत्प्रतिनिधीभूत जो कागद तो वापरल्यानें मूल्यवान् धातूंची पुष्कळ काटकसर करतां येते हें मागें सांगितलेंच आहे. परंतु

काटकसरीचें मोठें कारण चेक आणि वजावाटपद्धति होय. ह्या पद्धतीमुळे कर्ज प्रत्यक्ष रोख रुपये देऊन फेडावें लागत नाही; तर वजावाट केली म्हणजे झालें. ह्या पद्धतीचा अंकूर आपल्या नेहमीच्या जमाखर्चाच्या वह्यांत सापडेल. दोन पेढ्यांची परस्पर देवघेव असेल, म्हणजे अदलून बदलून एकमेक देवघेव करीत असतील तर प्रत्येक व्यवहाराच्या वेळीं रोख रकम देऊन निकाल करणें मूर्खपणाचें होईल. कारण आज पैसे द्यावयाचे व उद्या पुन्हा दुसऱ्या व्यवहारांतील परत घ्यावयाचे ह्यांत कोणताच फायदा नाही. म्हणून परस्पर देवघेव असणारे पेढीवाले आपआपल्या हिशोबाच्या चोपड्यांत त्या त्या रकमांचा जमाखर्च करितात व शेवटीं वरीचशी रकम एकजण दुसऱ्याची देणें निघाल्यास मात्र तो ती देऊन टाकितो.

मोठमोठ्या व्यापारी घडामोडीच्या राष्ट्रांत पेढीवाल्यांनी अमलांत आणलेली अत्यंत संकीर्ण अशी जमाखर्चाची पद्धति आकृतीच्या रूपानें स्पष्ट करितां येईल. जमाखर्चाची अगदी साधी तऱ्हा खालील आकृतीनें दाखवूं.


प———————फ

ह्या अक्षरांपैकी प्रत्येक अक्षर व्यक्तीचें किंवा पेढीचें निदर्शक समजावें. मधली ओळ ही त्या दोहोंमधील व्यवहारांची सूचक होय. तथापि दोघांच्या व्यवहारांत खातेबाकीवरून कोणी कोणाचें देणें निघणार नाही असा क्वचितच प्रसंग यावयाचा. बहुधा एकाकडून माल दुसऱ्याकडे जातो व ह्या दुसऱ्याकडून तत्प्रीत्यर्थ पैसे यावयाचे असतात. कारखानदार घाऊक माल विकणारास माल विकत देतो, तो परत किरकोळीनें विक्री करणारास खरेदी देतो व हा तोच माल गिऱ्हाइकांस विकतो. परंतु पेढीवाल्याच्या मध्यस्थीनें निरनिराळ्या पुष्कळ माणसांचे व्यवहार व त्याचप्रमाणे वेगवेगळ्या व्यापाऱ्यांच्या शाखेतील घडामोडी एका केंद्रांत आणतां येतात. त्यामुळे पुष्कळशा देवघेवीचा शिल्लक झाडा करितां येतो.

## एकपेढीपद्धति

पेढीवाल्यांच्या साहाय्यानें रोकडीचा उपयोग करण्याचें आपणांस कसें

टाळतां येतें हें समजण्याकरिता प्रथमतः अगदी साधी पद्धति कोणती व तिची पुढे अत्यंत संकीर्णपद्धति कशी झाली हें सांगितलें पाहिजे; म्हणून आपण अशी कल्पना करूं की, एका खेडेगांवांत एकच पेढी आहे व ह्या गांवाचा बाहेरील दुसऱ्या कोणत्याहि गांवाशीं संबंध नाही. अर्थात् सर्व-जणांची शिल्लक ह्या एकाच पेढीवर असावयाची. आता 'अ' ने 'ब' ला कांही रक्कम द्यावयाची असली तर आपल्या पेढीवाल्याकडे जाऊन पैसे काढून ते 'ब' कडे नेऊन देण्याची भानगड करण्याचें त्यास कारण नाही. पेढीवाल्यावर चेक काढून तो 'ब' च्या स्वाधीन केला म्हणजे झालें. आता 'ब' जर आपली शिल्लक पेढीवर ठेवीत असेल तर त्यालाहि पेढी-वरून रोख रुपये उचलण्याचें प्रयोजन नाही. 'अ' कडून आलेल्या चेकाचे रुपये घ्यावयाचे व तेच पुन्हा त्याच पेढीवर आपल्या नांवाने ठेवावयाचे हा व्यर्थ खटाटोप होय. उत्तम उपाय म्हटला तर, पेढीवर 'अ' च्या खातीं रक्कम खर्ची घालून 'ब' च्या खातीं जमा करणें हा होय. त्याचप्रमाणे 'ब' ने 'क' ला पैसे द्यावयाचे असल्यास तसाच जमाखर्च केला म्हणजे झालें. ह्या रीतीने दुसऱ्या कितीहि व्यापाऱ्यांची अगर इतर मनुष्यांची देवघेव असली तरी एक दिडकीलाहि स्पर्श न करितां सर्व व्यव-हाराचा उलगडा करतां येईल. ह्या प्राथमिक ठेवपद्धतींचें स्पष्टीकरण खालील आकृतीवरून चांगलें होईल.





ह्या आकृतींत 'प' हा एकटाच पेढीवाला असून अ, ब, क, ड, ग ही त्याची खातेवाली मंडळी होय. ॲमस्टरडॅम आणि हामबुर्ग येथील पेढ्या ह्याच मासल्याच्या आहेत.

जोपर्यंत आपण गांवाच्या अन्तर्गत व्यवहारांचा विचार करीत आहों,

तोपर्यंत पेढीवर ठेवलेल्या पैशांना बिलकुल हात न लावतां सर्व व्यवहार करतां येतील. दूरच्या ठिकाणीं व्यापाऱ्यांना पैसे पाठवावयाचे नसतील, तर धातवात्मक पैशाला अजीबात फाटा दिला तरीसुद्धा चालेल. माणसास कांही रोकडीची गरज लागण्याचा संभव असतो ह्याकरतां एकंदर मागण्यांचा अदमास पाहून त्याप्रमाणे पेढीवाल्याने शिल्लक ठेविली म्हणजे भागण्यासारखें असतें.

## दोन पेढ्यांची पद्धति

आता एका गांवांत दोन पेढीवाले आहेत, अशी कल्पना करूं. अर्थात् कांही जणांचा हिशोब एका पेढीशीं असेल व कांही जणांचा दुसरीशीं असेल. मात्र गांवांतील प्रत्येक माणसाचा दोहोंपैकी कोणत्यातरी पेढीशीं हिशोब आहे, हें आपण गृहीत धरून चाललें पाहिजे. खालील आकृतींत ‘प’ आणि ‘फ’





हे दोन पेढीवाले असून त्यांच्याशीं अनुक्रमें अ, ब, क, ड; व म, र, स, ग, ह्यांचा व्यवहार आहे. आता अ, ब, क, ड, ह्यांच्या परस्पर देण्या-घेण्याचा निकाल ‘प’ च्या चोपड्यांत नुसता जमाखर्च केल्याने होईल; व म, र, स, ग, ह्यांच्यामधील देवघेवींच्या व्यवहारांचा निकाल ‘फ’ च्या चोपड्यांत जमाखर्च केल्याने करतां येईल. पण ‘अ’ ला जर ‘म’ ला पैसे द्यावयाचे असतील तर थोडी जास्त मानगड उत्पन्न होते. ‘अ’ ‘म’ ला ‘प’ वर हुंडी देतो; त्यामुळे ‘म’ ला ‘प’ पासून रोख पैसे मागतां येतील. परंतु पैशाची जरूर नसल्यामुळे ‘म’ ती हुंडी आपल्या

पेढीवाल्यास पैशाच्याऐवजी देतो व त्या हुंडीचे पैसे आपल्या खातीं जमा करण्यास सांगतो. अशा वेळीं आता 'फ' ती हुंडी 'प' वर रुजू करील, व कदाचित् रोख पैसे देण्याघेण्याची पाळी अखेरीस येण्याचा संभव खरा. पण गांवांतील दुसऱ्या लोकांचा व्यवहार असाच चालत असतो; त्यामुळे 'फ' वर दिलेल्या कांही हुंड्या 'प' जवळ असतील व 'प' वर दिलेल्या कांही हुंड्या 'फ' पाशीं असतील. तेव्हा हे दोन पेढीवाले म्हणजे परस्परांचा चालू हिशोब असणारे दोन व्यापारी होत. यामुळे फार झालें तर ज्याच्याकडे बाकी निघेल त्याला तेवढे पैसे रोख द्यावे लागतील. परंतु ही बाकी आज एकाकडे निघाली, तर उद्या दुसऱ्याकडे निघेल म्हणून दररोज ती न देतां मोठीशी रक्कम झाली म्हणजे दिली तरी चालेल.

## संकीर्ण पेढ्यांची पद्धति

मोठमोठ्या व्यापारी शहरांत अनेक पेढ्या असतात व प्रत्येक पेढीवाल्यांचीं निरनिराळीं कुळें असतात. ज्यांचा एकाच पेढीशीं संबंध असेल त्यांच्या देवघेवीचा निकाल पूर्वी सांगितल्याप्रमाणे पेढीवरच्या चोपड्यांत जमाखर्च करून होईल. परंतु पुष्कळ व्यवहार असे घडतील की, त्यांमुळे एका पेढीवाल्याचें येणें दुसऱ्या पेढीवाल्याकडे निघेल. प्रायः प्रत्येक पेढीवाल्यास दररोज द्यावें लागेल आणि घ्यावें लागेल. परंतु ज्यांच्याकडून बाकी येणें निघेल त्यांचेंच देणें निघेल असा नियम नाही. म्हणून ह्यामध्ये बरीच भानगड उत्पन्न होते. उदाहरणार्थ, एखाद्या शहरांत १४ पेढ्या असल्या तर ज्यांचें एकमेकांकडे देणेंयेणें निघेल, अशीं एकंदर ९१ युग्में होतील; ५० पेढ्या असल्या तर ही संख्या १२२५ हून कमी होणार नाही. ह्याचा परिणाम असा होईल की, पला फचें पुष्कळ देणें निघेल. पण तसेंच 'र' अगर 'स' कडून येणेंहि निघेल. अशा स्थितींत प्रत्यक्ष रोकड इकडून तिकडे नेणें मूर्खपणाचें होईल. जमाखर्चाची पद्धति वाढविल्याने ही अडचण दूर होण्यासारखी आहे. पेढीवाल्यांची पेढी स्थापून त्यांत सर्व पेढीवाल्यांनी आपआपली थोडी बहुत शिल्लक ठेविली म्हणजे झालें. खालच्या आकृतींत




प, फ, र, स हे चार पेढीवाले असून प्रत्येकाची स्वतंत्र कुळें आहेत. ह्या सर्वांचा परस्पर संबंध पेढीवाल्यांची जी पेढी क्ष, तिने जडला गेला आहे. पला आता फ, र आणि स ह्यांच्याकडे हुंड्यांचें पुडकें देऊन मनुष्य पाठविण्याचें कारण नाही. तो त्या सर्व हुंड्या क्ष पेढीवर पाठवून देईल. तेथे त्या प च्या खातीं जमा केल्या जातील. तेथे त्यांची विल्हेवारी होऊन फ, र, स ह्यांजकडून आलेल्या हुंड्यांत सामील केल्या जातील. अशा रीतीने हुंड्या काढून फेडल्या जाणाऱ्या देण्याचा निकाल नाण्यांचा उपयोग केल्यावांचून व शहरांत एकच पेढी असतांना केला जातो तसा होतो. बहुतकरून प्रत्येक पेढीचें देणेंघेणें दररोज सारखेंच होईल. बाकी निघालीच तर पेढीवाल्यांची पेढी अथवा सरपेढी जी क्ष, तिच्या चोपड्यांत रकमा चढविल्या म्हणजे झालें.

इंग्लंड किंवा अमेरिका ह्या देशांत प्रत्येक शहरीं पेढीवाल्यांची पेढी असतेच असा नियम नाही. पण तेथे वजावाटीची मंडळी म्हणून एक संस्था आहे, त्या संस्थेकडून हें हिशेबी काम केलें जातें. ही मंडळी म्हणजे पेढीवाल्यांची कमिटी होय. पेढीवाल्यांची ठेव बँक ऑफ् इंग्लंडमध्ये ठेविलेली असते. ही बँक दर दिवशीं संध्याकाळीं हिशेब पुरा करून आपल्या वहींत जमाखर्च करून टाकिते.

## शाखात्मक पेढ्यांची पद्धति

स्कॉटलंडप्रमाणे इंग्लंड देशांत लहान लहान स्वतंत्र पेढ्यांच्या जागीं उत्तरोत्तर ज्यांच्या शाखा देशभर पसरल्या आहेत, अशा मोठमोठ्या पेढ्या अस्तित्वांत येत आहेत. आपल्याइकडेहि मागे एका पेढीच्या शाखा निर-

निराळ्या ठिकाणीं स्थापलेल्या असत. इंग्लंड व स्कॉटलंडमध्ये एकेका पेढीच्या १५० पर्यंतहि शाखा गेलेल्या आहेत. मुख्य व पोटऑफिस ह्यांचा जो निकट संबंध असतो, त्यामुळे पुष्कळ देवघेवींची वजावाट करितां येते. वरील आकृतींत क्ष हें मुख्य ऑफिस व प, फ, र, स हीं पोटऑफिसें समजूं. अ, ब, क वगैरे त्या त्या शाखेचीं कुळें होत. आता अ ने मला प वर हुंडी दिली. तर ती र च्या पेढीवर जाऊन तेथे म च्या नांवें जमा होऊन पोष्टांतून प कडे पाठविण्यांत येईल. तेथे अ च्या नांवाने खर्ची पडेल. दररोज संध्याकाळीं जाणाऱ्या तक्त्यांत ही गोष्ट मुख्य ऑफिसला समजेल व तेथे त्या हुंडीची रक्कम प च्या खात्यांतून र च्या खात्यांत मांडली जाईल. हें नुसतें आंकडेमोडीचें काम आहे; हें काम करणारास मोठा पगार द्यावा लागेल असें नाही. तात्पर्य, म्हणण्यासारखा खर्च न लागतां ही वजावाट सहज करितां येते. ह्या कामीं मुख्य ऑफिसाचा उपयोग वजावाटमंडळी अथवा पेढीवाल्यांच्या पेढीप्रमाणे होतो.

आता कदाचित् असा कोणी प्रश्न विचारील की, एका पेढीच्या शाखा दुसऱ्या पेढीच्या शाखांबरोबर व्यवहार कसा करतील. ह्याचें उत्तर सोपें आहे. ह्या शाखा आपआपल्या मुख्य ऑफिसामार्फत व्यवहार चालवितील. एका पेढीच्या शाखेंत दुसऱ्या पेढीच्या शाखेवर हुंडी आली, तर ती मुख्य ऑफिसामार्फत वजावाटगृहांत येईल व तेथें तिची विल्हेवाट लागेल.

मुख्य पेढीच्या शाखा नसल्या तर त्यांच्या ऐवजी मुनीम नेमलेले असतात. हे मुनीम पोटपेढीप्रमाणे सर्व कामें करतात; फरक इतकाच की, मुनिमास कामावर अगर नफ्यावर कांही टक्के ठरविलेले असतात.

बाहेर गांवीं ज्या पेढ्या असतात त्यांचा चालू हिशोब राजधानींतल्या कोणत्याना कोणत्यातरी पेढीबरोबर असतोच. ह्या राजधानींतल्या सर्व पेढ्यांचा व्यवहार वजावाटगृहरूपी केंद्रांत येऊन दाखल होतो. अशा रीतीने पेढ्यांचें जाळें पसरतें व त्या सर्व एकमेकांशीं संबद्ध होतात.

---

## भाग एकविसावा

## चेकबँक

पेढीच्या पद्धतीचें विवरण केलें त्यावरून पेढ्यांचा उपयोग लोकांस फार होतो असें दिसून येईल. तथापि त्यांत एक थोडीशी उणीव आहे. पेढीशीं व्यवहार ठेवावयाचा म्हणजे बरीचशी रक्कम जवळ असावी लागते. तसेंच पेढीवाला विश्वास टाकील इतकी पतहि असली पाहिजे. ह्यामुळे गोरगरिबांना ह्या पेढ्यांचा कांही उपयोग होत नाही; त्यामुळे, पैसे कोणास द्यावयाचे अगर पाठवावयाचे झाल्यास नाणें, पोस्टाचीं तिकिटें अथवा पोष्टखात्याचे ड्राफ्ट ह्यांचाच अवलंब करावा लागतो.

एवढ्याकरता चेकबँका स्थापन करून गरीब लोकांना पेढीच्या पद्धतीचा फायदा घेतां यावा, म्हणून इंग्लंडमध्ये प्रयत्न चाललेले आहेत. इतर पेढ्यांचीं जीं चेकबुकें मिळतात त्यांतील चेक हव्या त्या रकमांपर्यंत भरतां येतात ह्या कारणास्तव त्यांत लबाडी होण्याचा संभव फार असतो. ही गोम चेकबँकांच्या चेकांत दिसून येत नाही. तीं बुकें ठरीव रकमांपर्यंत भरतां येतात व तो आंकडा त्या बुकावर कायमचा मोठ्या अक्षरांनी छापला असतो. शिवाय जितक्या रकमेचें बुक असेल, तितकी रक्कम दिल्याशिवाय तें बुक मिळतच नाही. जसजसे चेक पाठवावे तसतशी ती रक्कम कमी होत जाते; म्हणून बँकनोटीप्रमाणे ह्या चेकाची योग्यता असते, असें म्हणण्यास हरकत नाही.

चेकबँकेची सर्व ठेव दुसऱ्या पेढ्यांवर असते. ह्यामुळे हे चेक बहुतेक सर्व पेढ्यांवर पटवतां येतात. ह्या पेढीवाल्यांकडून जें व्याज मिळतें तोच चेकबँकेचा फायदा होय. परगांवीं पैसे पाठविणें झालें तर मनीऑर्डर करण्याची फार दगदग पडते, म्हणून त्याच्याऐवजी चेकबँकेचे चेक लोक त्या देशांत पाठवून देतात. कारण हे चेक बहुधा सर्व पेढ्यांवर पटविले जातात हें मागे सांगितलेंच आहे.

ह्या चेकांनी मजुरदारांस मजुरीसुद्धा देतां येईल. गिरण्यांसारख्या मोठमोठ्या कारखान्यांतून लोकांस आठवड्यास मजुरी द्यावयाची असते. त्याकरता दर आठवड्यास कारखानदारांस पेढ्यांतून मोठमोठ्या रकमा उचलाव्या लागतात. त्यामुळे पेढीवाल्यांचीहि गैरसोय होते. करता मजुरदार लोकांस पेढ्यांच्याऐवजी असले चेक द्यावे. हे चेक दुकानदार घेण्यास फारशी हरकत घेणार नाहीत. कारण वर सांगितल्याप्रमाणे चलनी नोटीच्या खालोखाल त्यांची योग्यता असते. पुढे ह्या दुकानदारांपासून तेच चेक एकदम परत कारखानदारांनी विकत घेतल्यास त्यांस त्यांचा पूर्ववत् पुन्हा उपयोग करतां येईल. शिलकीच्या पेढ्या म्हणूनहि चेकबँकांचा उपयोग करतां येतो. शिल्लक असेल त्या मानाने बँकेचें चेकबुक विकत घेऊन ठेवावें. आपल्या देशांत गरीब लोकांना आपली अल्प शिल्लकहि व्याजीं लावितां यावी म्हणून सरकारने पोष्टखात्यांतच शिलकी पेढ्या स्थापन केल्या आहेत. परंतु सरकारी कामाचे नियम फार कडक असल्यामुळे ह्या सोयीचा फायदा खऱ्या गरीब लोकांस होत नाही. आमच्या लोकांना अद्यापि विश्वासाने काम करण्याची सवय लागली नाही. परंतु आहे ह्या स्थितींत प्रत्येक खेड्यांतील विद्यमान सावकारास स्वतंत्र पेढी चालवितां येईल. सावकाराची स्थावर मिळकत जितक्या किंमतीची असेल तितक्या रकमेपर्यंत त्याच्याकडे खेड्यांतील लोकांच्या ठेवी येण्यास हरकत नाही. मात्र व्यापारी मनुष्याप्रमाणे त्याने ठेव ठेवणारास हुंडीपत्र लिहून दिलें पाहिजे. ह्या ठेवीवर सरकारी रिवाजाचें व्याज देऊन ठेवीचा उपयोग स्वतंत्र धंदा उभारण्यांत करतां येईल. १०००० रुपयांच्या भांडवलावर उभारतां येतील असे धंदे पुष्कळ आहेत. एकाच माणसाचें भांडवल असल्यामुळे हयगय, लबाडी, व अखेरीस बूड येण्याचा संभव नाही. तसेंच स्थावर मिळकतीची हमी असल्यामुळे ठेवी ठेवणारांस नुकसान लागणार नाही, आणि अशा रीतीने देशांतील उद्योगधंदे वाढतील.

---

## भाग बाविसावा

# परराष्ट्रीय हुंड्या

प्राचीन काळीं परदेशाशीं मालाची प्रत्यक्ष अदलाबदल करून व्यापार चालत असे. नाना तऱ्हेचा माल घेऊन एका देशाहून दुसऱ्या देशास जाण्यास लमाणांचे तांडेच्या तांडे निघत व तेथून त्याच्या मोबदला दुसरा माल घेऊन परत येत. कालांतराने स्वतः माल घेऊन न जातां व्यापारी गलबत भरून माल परदेशीं रवाना करूं लागले. तेथे नाखवा तो माल विकी व आपल्या धन्याकरता दुसरा माल विकत घेऊन गलबत भरी. याप्रमाणे पूर्वी व्यापार उभयगामी असल्यामुळे व जो माल परदेशीं पाठवायाचा त्यानेच तेथे दुसऱ्या मालाची खरेदी होत असल्यामुळे पैसा विनाकारण अडकून रहात नसे.

परंतु ज्या देशांत आपल्या मालाला गिऱ्हाईक आहे त्याच देशांत आपणांस पाहिजे तो माल मिळणें शक्य नसल्यास दुसऱ्या देशांतून माल आणला पाहिजे. असें झालें म्हणजे एका देशांतून पैसे आणणें व दुसऱ्या देशांत ते पाठवणें, अथवा देणें फेडण्याचा दुसरा कोणता तरी उपाय योजणें भाग पडतें. आता रोख पैसे पाठवावयाचे म्हणजे दरम्यानचें व्याज बुडतें; शिवाय ते सुरक्षित पोंचावे म्हणून बंदोबस्त करण्यांत खर्च करावा लागतो; आणि इतकेंहि करून ते अजिबात नष्ट होण्याचा संभव असतोच. यामुळे परदेशाशीं चालणाऱ्या व्यापारांत दस्तऐवजाचा उपयोग केला असतां धातूचे पैसे वापरण्याचें अजिबात बंद झालें नाही तरी पुष्कळ कमी प्रमाणावर आणतां येईल; ही गोष्ट पुष्कळ शतकांच्या मागे लोकांच्या लक्षांत आली होती.

## हुंड्यांची मूळउत्पत्ति व स्वरूप

परदेशीय हुंड्यांच्या पद्धतीची रोमन लोकांनाहि अंशतः माहिती होती

असें दिसतें. परंतु त्या पद्धतीस उत्क्रांत स्वरूप प्राप्त होण्यास प्राचीन इटॅलियन व ज्यू व्यापारीच कारणीभूत झाले ह्यांत संशय नाही. ह्या विषयासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. तथापि १४ व्या शतकांत परदेशीय हुंड्यांची पद्धति चांगली प्रचारांत होती असा दाखला मिळतो. हुंड्या लिहिण्याची तऱ्हा, तत्संबंधी नियम व कानु हीं हल्लींहून फारशीं भिन्न नव्हतीं.

एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यास, अमुक इसमास अमुक वेळीं अमुक रक्कम द्या, असा हुकूम करतो त्यासच हुंडी अगर व्यापारी बिल म्हणावयाचें. हुंडी लिहिली म्हणजे सरनाम्याकडून लिहिणाराला पैसे येणें आहेत असें प्रथम अनुमान केलें जातें. सरनाम्याकडे हुंडी रुजू करून त्याने ती स्वीकारली म्हणजे त्यांतील देणें त्याने कबूल केलें असें होतें. हुंडींत एखाद्या विवक्षित इसमास पैसे देण्याविषयी जरी लिहिलें असलें, तरी ती त्यास शेरा मारून दुसऱ्यास बेचन देतां येते. अशा रीतीने तिसऱ्याच रकमेचें दुसरें कर्ज फेडण्यांत त्या हुंडीचा उपयोग होतो.

इंग्लंडांतून ह्या देशांत दरवर्षास सोनें, रुपें, कापड, यांत्रिक सामान, कोळसा वगैरे माल येतो व येथून त्या देशांत कापूस, गहू, भुईमूग इत्यादि जिन्नस जातात. अर्थात् ह्या देशांतून इंग्लंडांत पैसे पाठविणें व तेथून इकडे परत आणणें हें मूर्खपणाचें कृत्य होईल. हिंदुस्थानांतून ज्या व्यापाऱ्याने इंग्लंडांत कापूस पाठविला असेल, त्याला ज्याच्याकडे माल पाठविला त्याच्यावर कापसाच्या किंमतीच्या रकमेची हुंडी काढतां येईल. ही हुंडी ज्याने लंडनहून कोळसा मागविला असेल अशा व्यापाऱ्यास हिंदुस्थानच्या बाजारांत विकल्यास तो ती घेऊन पोस्टाने आपल्या सावकारास लंडनला पाठवून देईल. तेथे तो सावकार ज्याच्या नांवाने ती हुंडी काढिली असेल त्याच्याकडे रुजू करील व पैसे घेईल. ह्या कृत्यांत रोख पैसे दोनदा द्यावे लागतात हें खरें; एकदा इंग्लंडांत व एकदा हिंदुस्थानांत हुंडी विकत घेतली तेव्हा. परंतु समुद्रावरून पैसे पाठविण्यापेक्षा शहरांतल्या शहरांत पैसे देणें

फार सोईचें जातें. व येथेहि पैशाऐवजी दर्शनी हुंडीने काम भागण्या-सारखें असतें. वजावटीच्या संस्था असल्यास कोठेच रोकडीची गरज कदाचित् लागणार नाही. ह्यावरून हें उघड होतें की, परराष्ट्रीय व्यापारांत आयात-निर्गत मालाच्या संख्येंत फार फरक नसेल, तेव्हा धातूच्या पैशाचा उपयोग करण्याची आवश्यकता पडत नाही व एकंदर व्यापारास अदलाबदलीचे उत्क्रांत स्वरूप प्राप्त होतें.

## परराष्ट्रीय हुंडयांचा व्यापार

आता परदेशाहून माल मागविणाऱ्या व्यापाऱ्याला तितक्याच किंमतीचा माल परदेशीं पाठविणारा व्यापारी आढळण्याचा योग क्वचित् येतो. बहुतेक नाहीच म्हटलें तरी चालेल. परंतु इंग्लिश व्यापाऱ्यांचे देणेकरी असे हिंदुस्थानांत पुष्कळ व्यापारी सापडतील व तसेच हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांचे देणेकरी असे इंग्लंडांत बरेच व्यापारी निघतील. म्हणून निरनिराळया रकमांच्या हुंड्यांचा पुरवठा सारखा होईल व त्यांना मागणीहि नेहमी असेल. ह्यामुळे कांही लोकांना हुंडया विकणें व विकत घेणें हा किफायतीचा धंदा झाला आहे. हे लोक हुंडया काढणारांपासून त्या विकत घेतात व ज्यांना परदेशीं पाठवावयाच्या असतील त्यांस विकतात.

पुष्कळ वेळां असें घडतें की, मोठमोठ्या व्यापाऱ्यांच्या पेढया हिंदुस्थान व इंग्लंड अशा दोन्ही देशांत असतात; निदान त्यांचे अडते तरी असतात. एकाच पेढीने माल मागविला व बाहेर रवाना केला तर देवघेवीची प्रत्यक्ष वजावट होईलच. शिल्लक राहिलीच तर ती वेळोवेळीं प्रसंगानुसार दिली म्हणजे झालें. तात्पर्य, अंतर्गताप्रमाणेच बहिर्गत व्यापारांत जमाखर्ची पद्धतीने रोख पैशाची देवघेव बरीच वांचते. ज्या वेळेस आयातनिर्गत मालाच्या किंमतींत फारच फरक पडेल व एका देशाला दुसऱ्या देशाचें जबरदस्त कर्ज होईल, तेव्हाच रोकड पाठवण्याचा प्रसंग पडेल.

हुंडयांची खरेदीविक्री करून फायदा मिळवणारे व्यापारी बरेच अस-

तात, म्हणून मागे सांगितलेंच आहे. हा फायदा ते कसा मिळवतात हें समजण्यासाठी ह्या विषयाचें जास्त विवेचन करणें जरूर आहे.

दोन देशांचें परस्पर देणेंघेणें सारखेंच असलें तर हुंड्यांचा भाव बरोबरीचा असतो. म्हणजे १०० रुपयांच्या हुंडीस १०० रुपयेच पडतील. जास्ती किंवा कमी पडणार नाहीत. जितक्या रुपयांची हुंडी असेल त्याहून कमी अधिक किंमत पडण्याचीं कारणें येणेंप्रमाणे आहेत. (१) ऋणवैषम्य, (२) चलनभिन्नता, (३) चलनाच्या किंमतींत फरक, (४) पत अथवा तिचा अभाव, (५) रुपये मिळण्याच्या मुदतींतील फरक.

विक्रीकरता हुंड्या थोड्या असतील व त्यांस गिऱ्हाईक फार असेल, तेव्हा अर्थातच हुंड्यांना तेजी येईल. आपणांस हुंडी मिळावी अशी प्रत्येकाची इच्छा असते. कारण हुंडी न मिळाल्यास सोनें अगर रुपें बंदोबस्ताने पेट्यांत घालणें, त्याचा विमा उतरणें व तें रवाना करणें भाग पडतें. ही दगदग टाळण्याकरता हुंडीवाल्याला जास्त पैसे देण्यास व्यापारी तयार होतो. असें झालें म्हणजे हुंडीचा भाव चढता आहे असें म्हणतात. ह्याच्या उलट बाजारांत पुष्कळ हुंड्या विक्रीस असून त्यांस गिऱ्हाईक कमी असल्यास हुंडीवाले आपल्या हुंड्या विकण्यास आतुर होतील व चढाओढ फार असेल, तर कमी रकमेलाहि विकण्यास माघार घेणार नाहीत. नाही तर त्यांना परदेशांतून रोख पैसे मागवावे लागतील. अर्थात् दगदग व खर्च सोसावा लागेल. अशा वेळीं हुंड्यांचा भाव उतरता आहे असें म्हणतात. ह्यावरून हें उघड आहे की, पुरवठा व खप यांचा अम्मल ह्या व्यवहारावरहि इतर व्यवहारांप्रमाणेच चालतो.

अन्तरराष्ट्रीय कर्जबाजारीपणामुळे परदेशी हुंड्यांच्या भावांत चलबिचल होते हें वर सांगितलें. पण हा कर्जबाजारीपणा निर्गताहून आयात माल जास्त असल्यामुळेच होतो असें मानणें चुकीचें होईल. कारण परदेशीं भांडवल नेऊन कारखाने उभारले असतां अगर परदेशच्या लोकांना किंवा राजाला कर्जाऊ रक्कम दिली असतां, तात्पुर्ती रोकड देशांतून बाहेर जाईल

हें खरें, पण तो देशाचा कायमचा कर्जबाजारीपणा म्हणतां येणार नाही.

हिंदुस्थानांतून दरसाल इंग्लंडास व्याजाच्या रूपाने, पेनशनाच्या रूपाने, इंडिया ऑफिसच्या खर्चाकरिता म्हणून, त्याचप्रमाणे व्यापारी व जहाजवाले ह्यांचा फायदा म्हणून जे कित्येक कोटी रुपये जात असतात, ते व्यापाराच्या पदार्थांत मोडतां यावयाचे नाहीत. तथापि इतर व्यापारी मालाप्रमाणेच व्यापाराच्या समतोलपणांत फरक पाडण्यास ह्या रकमा कारणीभूत होतात.

कांही हुंड्या तर फोकळ असतात. केवळ धान्य पिकविणाऱ्या देशांत तें पिकेल तेव्हांच बाहेरदेशीं पाठवितां येईल. परंतु तोंपर्यंत इतर जिन्नस बाहेरून मागवावे लागतात. ह्या बाहेरून मागविलेल्या मालाच्या किंमतीचे रुपये रोख समुद्रावरून पाठविल्याशिवाय गत्यंतर नाही. कारण हुंड्या विकत घेऊं म्हटलें, तर माल बाहेर कोणीं पाठविला नसल्यामुळे त्या मिळणें शक्य नाही. अशा वेळीं पैसे पाठविण्याचा खर्च टाळण्याकरता माल मागविणाऱ्या देशांतील पेढीवाले पाठविणाऱ्या देशांतील पेढीवाल्यांवर कोऱ्या हुंड्या काढतात. ह्या हुंड्या माल आणणारे व्यापारी विकत घेऊन आपल्या धनकोस पाठवून देतात. माल पाठविणाऱ्या देशांतील पेढीवाले ह्या कोऱ्या हुंड्या स्वीकारतात. अशा स्वीकारण्याने हुंड्या काढणारे पेढीवाले त्यांचे ऋणको बनतात. पुढे व्यापाऱ्यांनी धान्य बाहेर पाठविलें म्हणजे त्यांच्याकडून हे पेढीवाले हुंड्या विकत घेतात व त्या आपल्या धनको पेढीवाल्यांकडे परदेशीं पाठवून आपल्या देण्याचा निकाल करितात.

कांही हुंड्या तर अशा असतात की, त्यावरून देशाचा कर्जबाजारीपणा मुळीच ध्वनित होत नाही. हा प्रकार इंग्लंडांत विशेष दिसण्यांत येतो. त्या देशाचा व्यापार फार आहे. त्या देशाबरोबर व्यापार नाही असा देश सांपडणें कठिण. त्यामुळे इतर देशांच्या हुंड्यासुद्धा इंग्लंडमधून जात असतात. उदाहरणार्थ, आपण हिंदुस्थान व चीन देश घेऊं. आपल्या देशाच्या आयात व्यापाराचा शेंकडा ६७ भाग व्यापार इंग्लंडबरोबर आहे. बाकीचे

भाग व्यापार जगातील इतर देशांबरोबर. अर्थात् इतर देशांतून फारच थोडा माल आपण घेतो. तेव्हां समजा, व्यापाऱ्यांनी कांही माल जर्मनीत पाठविला. मालाच्या किंमतीकरितां हे व्यापारी जर्मन व्यापाऱ्यांवर हुंड्या काढतील. परंतु ह्या हुंड्या विकत घेण्यास त्यांस हिंदुस्थानांत कोणी गिऱ्हाईक मिळत नाही. कारण जर्मनीदेशांतून माल मागविणारे व्यापारी क्वचित् असतात. तथापि हे व्यापारी इंग्लंडाहून माल मागवीत असल्याने तेथील व्यापाऱ्यांचे पैसे त्यांस द्यावयाचे असतातच. तेव्हां येथील व्यापारी आपल्या इंग्रजी धनकोकडे जर्मनीवर काढलेल्या हुंड्या पाठवून देतात. ह्या हुंड्या इंग्लिश व्यापाऱ्यांच्या हातीं आल्या म्हणजे तेवढ्यापुरता जर्मनी देश इंग्लंडचा ऋणको बनतो. हें ऋण फेडण्याकरता जर्मन व्यापाऱ्यांना इंग्लंडवर काढलेल्या हुंड्या विकत घेणें भाग पडतें.

दुसरें चीनचें उदाहरण घेऊं. चीन देशांतून अमेरिकेस पुष्कळ चहा जातो व अमेरिकेपासून चहाच्या किंमतीइतका माल चीन देश घेत नाही. अमेरिकेपेक्षा त्या देशाचा आयात व्यापार इंग्लंडाशीं जास्त असतो. त्यामुळे अमेरिकन व्यापारी इंग्लंडवर हुंड्या काढून त्या आपल्या चिनी व्यापाऱ्यां-कडे पाठवतात. चिनी व्यापारी त्या परत आपल्या इंग्लिश धनको व्यापा-ऱ्यांकडे पाठवून आपलें देणें फेडतात.

परदेशच्या हुंड्यांच्या किंमतींत फेरबदल होण्याचीं पुष्कळ कारणें अस-तात. त्यांपैकी खप व पुरवठा ह्या कारणांचा निर्देश वर केलाच आहे. आतां ह्या कारणानें फेरबदल होणाऱ्या किंमतीस मर्यादा असते; म्हणजे रोख रुपये पाठविण्यास जो खर्च येईल त्यापेक्षा जास्त किंमत हुंडीला कोणी देणार नाही. त्याचप्रमाणे आपली हुंडी विकावी म्हणून कितीहि आतुर व्यापारी असला तरी तो कांही मर्यादित रकमेहून जास्त कमी घेणार नाही. लवकर विकण्यांत त्यास पैसे तावडतोब मिळून त्याचा उप-योग करण्यास सापडतो, हा फायदा असतो. परदेशाहून रकम येईंपर्यंत वाट पहावी लागत नाही. परंतु किंमत फार कमी घेऊं लागल्यास तो रोख

पैसे मागवील हें उघड आहे. येथे ही एक गोष्ट सांगणें जरूर आहे की, निर्गत व्यापार दोन तऱ्हांनी चालतो. व्यापारी आपण होऊन माल परदेशीं पाठवतो किंवा परदेशांतल्या व्यापाऱ्याने मागणी केल्यावरून पाठवतो. आपण होऊन माल पाठवल्यास परदेशांतून येणाऱ्या पैशाचा खर्च माल पाठविणाऱ्या व्यापाऱ्यानेच सोसला पाहिजे हें उघड आहे.

किंमतींत फेरबदल होण्याचें दुसरें कारण असें की, सर्वच हुंड्या दर्शनी नसतात. कांही मुदतीच्या असतात. अशा हुंड्यांना भाव कमी येतो. कारण जितक्या मुदतींत पैसे मिळावयाचे नाहीत तितक्या मुदतीचें व्याज कापून बाकीची रकम हुंडी विकत घेणारा हुंडीवाल्यास देईल. त्याचप्रमाणे ज्या देशावर हुंड्या असतील त्या देशाची पतहि पहावी लागते. पत चांगली नसल्यास विकत घेणारा हुंडीची भरपूर रकम देत नाही. ह्याशिवाय दोन देशांतील चलनांत फरक असल्यामुळे हुंड्यांच्या किंमतींत वारंवार चलबिचल होते. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत रुप्याचें चलन असून इंग्लंडांत सोन्याचें आहे. हिंदुस्थानच्या बाजारांत लंडनवरील १५० पौंडांची हुंडी विकण्यास आली, तर एका पौंडास १५ रुपये ह्या भावाने २२५० रुपये येतील. पण सोन्याची किंमत वाढल्यास २२५० रुपयांहून जास्त रकम द्यावी लागेल; उलट पक्षीं सोन्याचा भाव उतरला म्हणजे एका पौंडाला १५ रुपयांऐवजी १० रुपयेच पडूं लागले तर १५० पौंडांच्या हुंडीस १५०० रुपयेच पडतील.

वर चीन देशाचें व हिंदुस्थानचें जें उदाहरण दिलें आहे, त्यावरून एक गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे ती ही की, लंडन शहर हें सर्व जगाचें वजावाटगृह बनलें आहे. इतर बऱ्याच देशांतील व्यापाऱ्यांच्या पेढ्या त्या शहरांत आहेत व सर्व जगाशीं त्या शहराचा व्यापार आहे. त्यामुळे जगाच्या दुसऱ्या कोणत्याहि भागाशीं व्यापार केला तरी त्याची देवघेव लंडन शहरीं पुष्कळ प्रसंगीं होत असते. ह्याचा परिणाम रोकडीचा उपयोग निर्गत व्यापारांतहि कमी होतो हा होय. परंतु लंडन शहराची ही

स्पृहणीय स्थिति फार वर्षें टिकेलसें वाटत नाही. कारण जर्मनी, अमेरिका व जपान हे देश झपाट्यानें पुढे येत आहेत. विशेषतः महायुद्धापासून न्यूयॉर्क शहर हें जगताचें केंद्र बनण्याविषयी लंडनशीं फार जोराची स्पर्धा करीत आहे व जगांतील अर्ध्यापेक्षा अधिक सोनें युनायटेड स्टेट्स-मध्ये एकत्र झालें असल्यामुळे ही गोष्ट अशक्यप्राय नाही.

## भाग तेविसावा

# मोलाचें कोष्टकात्मक परिमाण

आरंभींच असें सांगितलें आहे की, मोलाचें सर्वसामान्य माप, विनिमयाचें साधन व मोलाचें मुख्य परिमाण म्हणून पैशाचा उपयोग केला जातो. ह्या परिमाणांतच पुष्कळ वर्षपर्यंत चालणारे करार निर्दिष्ट केले जातात. कायमच्या कुळागतीने अगर पुष्कळ वर्षांच्या बोलीने जमीन लागणीस देतांना, त्याचप्रमाणे सरकारला, रेलवे कंपन्यांना अगर दुसऱ्या संस्थांना कर्जाऊ पैसे दिले असतां, कायदेशीर फेडीचें चलन जे रुपये त्यांत परत व्याज व मुद्दल घेण्याचा नेहमीचा प्रघात असतो. परंतु रुपयाची किंमत तितक्या मुदतींत कायम राहणें शक्य नाही, असें मानण्यास मागील अनुभवाचें सबळ कारण मिळतें. म्हणजे कोणत्याहि परिस्थितीमुळे का होईना पण रुपयाला आज जितका माल मिळत आहे तितकाच आजपासून १० वर्षांनी मिळेल असा नियम नाही.

### ऐनजिन्नस खंड

सोन्यारुप्याच्या किंमतींत बरेचसे फरक होत असल्यामुळे लांब मुद-

तीच्या करारांत मोलाचें मुख्य परिमाण म्हणून त्याचा उपयोग करणें कितपत इष्ट आहे हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. जमिनीचे खंड पूर्वी व अद्यापिहि पुष्कळ ठिकाणीं नक्त न घेतां ऐन जिनसांत घेत असतात; असें करण्यास कायद्याची कांहीं मनाई नाहीं. परंतु पैशापेक्षा ऐन जिन्नस घेण्यांत भानगड होण्याचा संभव असतो. शिवाय एकाच पदार्थाच्या किंमतींत सालोसाल बराच फेरफार होत असतो. तेव्हां दहावीस वर्षांच्या मुदतीकरितां तर सोन्यारुप्याहून दुसरा कोणताहि पदार्थ मोलाचें परिमाण म्हणून जास्त उपयुक्त होईल असें वाटत नाहीं. कारण खप व पुरवठा यांच्या फरकामुळे पदार्थांच्या किंमतींत जबरदस्त फरक पडत असतो.

## अनेकपदार्थात्मक कायदेशीर फेडीचें चलन

तेव्हां अर्थशास्त्राच्या व अंकशास्त्राच्या मदतीनें याहून चांगलें परिमाण आपणांस शोधून काढतां येईल की नाहीं हा प्रश्न उद्भवतो. द्विधात्वात्मक चलनपद्धतीमुळे सोन्यारुप्याचा खप व पुरवठा साधारणपणें समतोल राहूं शकतो हें मागें सांगितलेंच आहे. त्याहीपेक्षा ज्याच्या किंमतींत फारसा फरक होणार नाहीं असें एखादें चलन आपणांस बनवितां येणार नाहीं काय[1] ? शंभर रुपयांची किंमत, आपण तितक्या रुपयांत धान्य, लांकूडफाटें, तेल, तूप, गूळ इत्यादि प्रपंचाचे मुख्य पदार्थ जितके येतील तितकी समजतों. आपणांस अशी नोट बनवितां येणार नाहीं काय की तिच्याऐवजी कोणताहि एक पदार्थ न मिळतां स्पष्टपणानें ज्यांची जात व संख्या ठरली आहे असे नानाप्रकारचे थोडथोडे पदार्थ मिळतील. उदाहरणार्थ, शंभर रुपयांची नोट असली, तर तिच्या मालकास दोन खंडी भात, पाच खंडी

---

१ अशा प्रकारच्या चलनाची पूर्ण कल्पना नव्हती. तथापि सोमवल्लीची किंमत म्हणून एकाच्या ऐवजी अनेक वस्तू देण्याचा प्रघात वेदकाळीं होता. गाई, शेळ्या, सोनें, वस्त्रें, बैल वगैरे जिन्नस देऊन सोम खरेदी करण्याची अनुज्ञा सोमादि यागांत आढळते.

गहू, मणभर तेल, मणभर तूप व राहिलेल्या किंमतीचे दुसरे कोणतेहि पदार्थ मागण्याचा हक्क प्राप्त होईल. ह्यांपैकी कांही पदार्थांच्या किंमतींत बदल झाल्याशिवाय राहणार नाही हें खरें; तथापि नोटीच्या मालकास एका पदार्थात नुकसान लागल्यास दुसऱ्यांत बहुधा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही. मिळून एकंदरींत नोटीची क्रयशक्ति निश्चल राहील.

प्रत्यक्ष व्यवहारांत असलें चलन अतिशय गैरसोयीचें होईल हें उघड आहे. कारण, नको असतील ते पदार्थ लादले गेले तर तें कोणालाहि आवडणार नाही. ज्याला फक्त धान्यच पाहिजे असेल त्याला त्याच्या बरोबर आलेले दुसरे तेल, तूप वगैरे पदार्थ दुसऱ्यास विकावे लागतील व ह्या व्यापारांत बहुधा सोन्यारुप्याचा उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही.

हा दोष राहूं नये म्हणून कित्येक पाश्चात्य ग्रंथकारांनी कोष्टकी अगर सरासरीच्या परिमाणाची क्लृप्ति काढली आहे. ही कल्पना अशी आहे की, सरकारने एक कायमचें कमिशन नेमावें. ह्या मंडळीने देशांतील सर्व प्रमुख प्रमुख बाजारांतील जिनसांचे भाव काय आहेत ह्याची चौकशी करून ते टिपून ठेवावे व त्यावरून सोन्याच्या अथवा रुप्याच्या क्रयशक्तींत बदल झाल्यास तो निश्चित करावा. कमिशनने ठरविलेले फरक दर महिन्यास प्रसिद्ध करावे व तदनुसार लोकांनी आपल्या देण्याघेण्याची व्यवस्था लावावी. उ० असें समजा की, चैत्र शुद्ध १ शके १८२० सालीं १०० रुपये कर्ज काढलें; हें कर्ज १८२५ सालीं त्याच महिन्यांत फेडावयाचें आहे. आता रुपयाची किंमत दरम्यान सारखीच राहिली तर सावकारास १०० रुपयेच मिळतील हें उघड आहे. पण रुपयाची किंमत सरासरीने शेकडा ६ प्रमाणे उतरली आहे असें जर कमिशनने ठरवलें तर ऋणकोस १०० च्या जागीं १०६ रुपये देणें भाग आहे. ह्यांत ऋणकोचाहि तोटा नाही. कारण शके १८२० सालीं जितक्या मालाला १०० रुपये येत होते तितक्याच मालाला आता त्यास १०६ रुपये येतील.

ह्या पद्धतींत कांही एक दोष नाही. कमिशनचे लोक तिऱ्हाईत असून त्यांनी महिन्याच्या महिन्यास जिनसांच्या किंमती प्रसिद्ध केल्या म्हणजे त्यांनी केलेला ठराव बरोबर आहे किंवा नाही हें कोणासहि पाहण्यास सापडेल. अडचण काय ती हीच आहे की, सरासरी कशी ठरवावयाची; म्हणजे किती व कोणत्या पदार्थांच्या किंमतीवरून ती काढावयाची. सर्वांस नेहमी लागणारे निदान १०० तरी पदार्थ घ्यावे असें बहुमत दिसतें; पण हा नियम गरीब लोकांस लागू करणें कठीण जाईल. शंभर पदार्थांची अवश्यकता भासणारे लोक हिंदुस्थानासारख्या दरिद्री देशांत फारच थोडे सापडतील. म्हणून अशा देशांसाठी १०० पदार्थांच्या ऐवजी ४० पदार्थ घेणें अधिक सोयीचें होईल.

---

## भाग चोविसावा

# राष्ट्राला लागणाऱ्या पैशाची संख्या

पैशावर लिहिलेल्या निबंधांत राष्ट्राला लागणाऱ्या पैशाची संख्या किती असली पाहिजे ह्याचें विवेचन करणें स्वाभाविक आहे. प्रत्येक माणसाला रुपये, दिडक्या, नोटी, किती लागतात तें समजलें म्हणजे सरकार तितका पुरवठा करील हें म्हणणें सर्वत्र ऐकूं येतें. बहुतेक देशांत पैशाची टंचाई म्हणून हाकाटी असते. सर्वांना जास्त पैसे पाहिजे असतात. व्यापाराची मंदी, किंमती उतरणें, जमाबंदी कमी होणें, लोकांचें दारिद्य, धंदा नसणें, असंतुष्टता इ० सर्व संकटांचें खापर पैशाच्या टंचाईवर फुटलें जातें. ह्यास उपाय, पूर्वी टांकसाळ सुरू करणें व अलीकडे कागदी नोटी काढणें हा सुचविला जात असतो. ह्या सर्व तक्रारींना खरें उत्तर म्हटलें म्हणजे हेंच

की, राष्ट्राला किती पैसे लागतात हें कोणालाहि सांगतां येणार नाही, आणि ती संख्या आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न कोणीहि शहाण्या मुत्सद्याने करूं नये. धात्वात्मक व कागदी चलनाची व्यवस्था जेथे चांगली नसते, तेथे पैशाची टंचाई भारी असते. ह्याशिवाय इतर कारणेंहि असतातच. आपणांस असें दिसून येईल की, राष्ट्राला किती पैशाची अवश्यकता आहे हें ठरवितांना कित्येक गोष्टी अशा येतात की, त्यांजबद्दल आपल्या ठिकाणीं पूर्ण अज्ञान वसत असतें. ह्यामुळे ह्या प्रश्नाचा निकाल लागणें अशक्य आहे.

## पैशाने करावयाचें कार्य

राष्ट्राला किती पैसा पाहिजे हें ठरविण्यापूर्वी पैशाने किती कार्य करावयाचें हें पाहिलें पाहिजे. हें प्रमाण लोकसंख्येवर अवलंबून असणार. दुप्पट लोकसंख्या झाली व सर्वांची कार्यशक्ति सारखीच असली तर दुप्पट पैसे लागतील. तसेंच ही पैशाची संख्या व्यापाराच्या तेजीमंदीवर व तो एकमार्गी अगर भानगडीचा असेल तर त्या गोष्टीवर अवलंबून असते. जितक्या जास्त मालाची खरेदीविक्री होईल व जितक्या जास्त वेळां एकाकडून दुसऱ्याकडे तो जाईल तितकी जास्ती पैशाची अवश्यकता लागेल. त्याचप्रमाणे किंमतीच्या दराप्रमाणेहि पैसे कमीजास्ती लागतात. रुपयाचा भाव उतरला तर पदार्थांच्या किंमती वाढतात म्हणून तितक्याच पदार्थांची खरेदी करण्यास जास्त पैशांची जरूरी लागते. ह्यांपैकी बहुतेक सर्व गोष्टींविषयी आपणांस कांही माहिती नसते. आपणांस साधारणपणें लोकसंख्या व परदेशाच्या व्यापाराची गोळाबेरीज समजेल. परंतु देशांतल्या देशांत मालाची खरेदीविक्री कितीवेळां होते हें समजणें अशक्य आहे. बाकीच्या बाबींतहि आपलें अज्ञान तितकेंच आहे.

## चलनाची कार्यक्षमता

विवक्षित वेळांत विशिष्ट पैशाने घडवून आणलेल्या विनिमयसंख्येस चलनाची कार्यक्षमता असें आपण समजतों. गृहीत काळांत प्रत्येक नाणें अगर नोट एका हातांतून दुसऱ्या हातांत जितक्या वेळां जाईल तितक्या

व्यवहारांच्या व पैशांच्या एकंदर संख्येचा गुणाकार केला तर पैशाच्या हातून होणाऱ्या एकंदर कामाची गणति करतां येईल. आता बहुतेक देशांतील चलनसंख्येची आपणांस अर्धीमुर्धी माहिती आहे व चलनव्यापाराचें सरासरीचें मान किती असतें ह्याची तर कांहींच माहिती आपणांस नाही. एका दिवसांत लहान नाण्याची, विशेषतः तांब्याच्या नाण्याची, फिरती इतर नाण्यांहून जास्त होते. मोठ्या किंमतीच्या नोटी तर मनुष्य वर्षानुवर्षे पेटींत जशाच्या तशा ठेवितो. एक नाणें एका वर्षांत किती वेळां फिरतें ह्याचा हिशेब करण्याचा प्रयत्न कोणत्याहि देशांत झालेला नाही. हा हिशेब कसा करतां येईल हेंहि सांगणें अशक्य आहे. आता उलट दिशेने म्हणजे विनिमयसंख्या व चलनसंख्या समजेल तर भागाकार करून एक नाणें सरासरीने किती वेळां फिरतें हें काढतां येईल; पण विनिमय व चलनसंख्या नक्की कळणेंच कठीण आहे. एका देशाहून दुसऱ्या देशांत नाण्याच्या फिरतीचें प्रमाण भिन्न असणार ह्यांत शंका नाही. ज्या देशांत पेढ्या नाहीत व जेथील लोक कंजूष असतात तेथे नाणें कुलपांत पडून राहतें. खर्चिक लोक जेथे आहेत अगर पेढ्यांची सोय जेथे उत्कृष्ट आहे अशा देशांत पैसे सारखे फिरत असतात. आगगाड्या, आगबोटी व तारायंत्रें ह्यांच्यायोगानेहि पूर्वीपेक्षा हल्ली पैसा जास्त फिरतो.

## चेक व वजावाट-संस्थांचा परिणाम

वरच्यापेक्षा सर्वांत विशेष महत्त्वाची बाब म्हटली म्हणजे जेथे पेढ्यांची पद्धति विस्तृत प्रमाणावर असते त्या देशांत प्रत्यक्ष पैशाने घडून आणलेले विनिमयव्यवहार फार थोडे असतात. हुंड्यांच्या प्रसारामुळे नाण्याला क्वचितच स्पर्श करावा लागतो. लंडनच्या वजावाटगृहांत सालीना १२ अब्जाहून जास्त रकमेची वजावाट होते. एवढ्या व्यवहारांत रोकडीला अजीबात फांटा मिळतो; ह्याशिवाय दुसऱ्या शहरांतल्या पेढ्यांतून जमाखर्ची हिशेब होतो तो निराळाच. सर्व जगांत रोकडीचा उपयोग न करितां किती मोठा व्यवहार होतो हें समजण्यास मार्ग नाही; पण तो फारच मोठा असला

पाहिजे. सारांश, लोकांच्या व्यापारविषयक प्रवृत्ति इतक्या भिन्न असतात की, चलनसंख्या व विनिमयसंख्या ह्यांत कायमचें प्रमाण बसविणें शक्य नाही.

## निष्पत्ति

तात्पर्य, वर केलेल्या विवेचनावरून इतकेंच निष्पन्न होतें की, चलनसंख्येचें नियमन करण्याच्या भरीस न पडतां स्वाभाविक जें होईल तें होऊं द्यावें हें बरें. व्यापारांत चलबिचल होईल त्या मानानें देशाच्या बाहेर पैसे जातात अगर बाहेरून देशांत येतात. कोणत्याहि मुलखाला हें केव्हा घडून येईल हें ठरवितां यावयाचें नाही. कागदी चलनाचें नियमन मात्र चांगलें केलें पाहिजे. नाही तर, जेथे पैसे नाहीत तेथे ते आहेत असा समज उत्पन्न होईल. सरकारने पैशासंबंधी कोणत्या बाबतींत हात घालावा व घालूं नये हें ठरविणें सोपें नाही.

गतकाळीं ज्या गोष्टी सरकारने आपल्या स्वाधीन ठेविल्या होत्या त्या हल्ली सरकारच्या हातांत नाहीत व पूर्वी ज्या अनियमित होत्या त्या आता नियमाखाली आल्या आहेत. मजुरीचे दर, पदार्थांच्या किंमती, ह्यापूर्वी कायद्याने किंवा रूढीने कायम केलेल्या असत. सांप्रत ह्या बाबतींत पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य आहे. बहुतेक प्रत्येक मोठ्या शहरीं पूर्वी टांकसाळ असे. हल्ली पैसे पाडण्याचें काम सरकारने फक्त आपल्याकडे ठेविलें आहे. ह्या धोरणावरच कागदी चलन चालविलें पाहिजे. खासगी टांकसाळीप्रमाणे खासगी नोटी काढण्याचें बंद केलें पाहिजे. नोटी कमजास्त पाडणें तें त्यांच्याऐवजी सोनेंरुपें नक्त ठेवलें असेल त्याप्रमाणे करावें. परंतु एकंदर नोटी किती निघाल्या ह्याचा विचार करण्याची जरूर नाही. पैशाच्या बाबतींत हल्ली जास्त घोटाळा होतो ह्याचें कारण कागदी चलनाची सुरवात हें होय; म्हणून त्यासंबंधाने चांगली खबरदारी घेणें अवश्य आहे.

---

# प्राक्कालीन अधातुरूप विनिमयसामान्यें

पैसा म्हटला म्हणजे धातुमय असला पाहिजे असा सांप्रत सर्वसाधारण समज झालेला दिसतो. ह्याचें कारण उघड्च आहे की, आपल्याला लहानपणापासून धातूचा पैसा वापरण्याची सवय झालेली आहे. कोणत्यानाकोणत्या तरी धातूहून भिन्न पदार्थ पैशादाखल वापरलेला आपण फारसा पहात नाही. कदाचित् अन्य पदार्थांचा उपयोग पैशादाखल केलेला पाहण्यांत आलाच तर, सर्वत्र व मुख्यत्वेंकरून धातुमय पैसा वापरण्याची सवय हाडीं खिळल्यामुळे अन्य द्रव्याच्या पैशाच्या उपपत्तीचा विचार आपण कधी करीत नाही. आपल्या मनावर धातुमय पैशाचा पगडा इतका बसला आहे की, अन्य द्रव्याचा ह्या कामीं कधी उपयोग झाला असेल ही कल्पना सुद्धा आपल्या मनाला कधी शिवत नाही. पैशाचा अग्रमान धातूंनीच जगाच्या आरंभापासून घेतला असावा असा समज आपला बनतो. पण वास्तविक प्रकार पाहूं गेलें असतां अगदी उलट आहे. धातूचा पैसा नंतरचा असून समाजाच्या बाल्यावस्थेंत तो वापरण्याचें लोकांस माहीत नव्हतें असें शोधाअंतीं समजतें.

ह्या विनिमयसामान्याचें (पैशाचें) द्रव्य जगाच्या निरनिराळ्या भागांत व निरनिराळ्या काळीं वेगवेगळें होतें. चामडें, गुरें, ढोरें, धान्य, फळें, कापड, बैल, मांस, अंडीं, कवड्या, तंबाखु, हातऱ्या, पिसें, दगड, मीठ, खिळे इत्यादि नाना तऱ्हेच्या पदार्थांचा पैशाच्या कामीं आजवर उपयोग झालेला आहे व अद्यापिहि कांही ठिकाणीं थोड्याबहुत प्रमाणावर होत आहे. ह्या विषयावरील इंग्रजी ग्रंथांतून इतर देशांत प्राचीन व अर्वाचीन काळीं प्रचलित असलेल्या अशा प्रकारच्या विनिमयसामान्याचीं उदाहरणें भरपूर दिलीं आहेत. आपल्या देशांतसुद्धा अशा मासल्याचीं उदाहरणें

आढळतात हें दाखविण्याचा ह्या लहानशा निबंधाचा मुख्य उद्देश आहे. हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून, किंबहुना ऋग्वेदापासूनहि सोन्यारुप्याचा पैसा वापरण्याचें लोकांस माहीत होतें असें दिसतें. तथापि त्याच्याबरोबर इतर पदार्थांचा सुद्धा उपयोग विनिमयसामान्य ( medium of exchange ) म्हणून करीत असत. हिंदुस्थानांत पूर्वी कांही पुढे गेलेले व कांही मागसलेले असे दोन्हि प्रकारचे समाज असल्यामुळे धातूंबरोबर अन्य द्रव्यांचाहि पैशादाखल उपयोग केलेला आढळून येतो.

मनुष्यांनी प्रथम आपापल्या स्थितीस अनुरूप अशा पदार्थांचा उपयोग पैशाच्या कामीं केलेला असावा; पुढे ती स्थिति बदलल्यावर सुद्धा तो पदार्थ पैशाच्या रुपाने कांही काल चालू राहावा हें स्वाभाविक आहे. शिकारी युगांत, दुसरा पदार्थ विकत घेण्यास मनुष्याजवळ मारून आणलेली शिकार काय ती असणार, तेव्हा मारलेल्या प्राण्यांचें चामडें हेंच काय तें इष्ट पदार्थ विकत घेण्याचें साधन त्याच्याजवळ असतें. ह्यामुळे चामड्याचा पैसा चालू झाला असावा असें वाटतें. असें नाणें चालू होतें अशाबद्दल प्राचीन ग्रंथांतून उल्लेख केलेला आढळतो. आपल्या हिंदुस्थानांत चामड्याचें नाणें चालत असे ह्यास ज्ञानेश्वरींतील खालील उतारा प्रमाण आहे. राजाज्ञेचीं अक्षरें आहाती। जिये चामा एका जया पडती। तया चामासाठीं जोडती। सकळ वस्तु॥ वांचूनि सोनें रूपें प्रमाण नोहे। एथ राजाज्ञाचि समर्थ आहे। तेंचि चाम एक जै लाहे। तेणें विकती आणवीं॥ ज्ञानेश्वरी अ० ९ ओव्या ४५३।५४. ह्या उताऱ्यावरून राजाच्या शिक्याचें चामड्याचें नाणें हिंदुस्थानांतील कांही समाजांत ज्ञानेश्वराच्या वेळीं चालू असावें असें स्पष्ट दिसतें.

शिकारी अवस्था जाऊन मनुष्य गुरेंढोरें बाळगून राहूं लागला म्हणजे त्यांच्या साहाय्याने त्याने विनिमयव्यवहार करावा हें साहजिक आहे. होमरच्या काव्यांत डायमेडच्या शस्त्रांची किंमत नऊ बैल व युद्धांत पकडून आणलेल्या कुशल स्त्रीची किंमत चार बैल होती असें वर्णन आहे. आपल्या

इकडेहि पूर्वी विनिमय करण्याकरिता चतुष्पाद जनावरांचा उपयोग करीत असत असें मानण्यास जागा आहे. पञ्चभिरश्वैः क्रीता पञ्चाश्वा (कौमुदी ४।१।२२)— पांच घोडे देऊन विकत घेतलेली— गोपुच्छेन क्रीतं गोपुच्छिकम् (कौ० ५।१।३७)— गाय देऊन विकत घेतलेलें; तसेंच गवा क्रीता। अश्वेन क्रीता (पतंजलि ४।१।५०) व पञ्चभिर्गोभिः क्रीतः पञ्चगुः। दशगुः (काशिका ५।४।९५). हीं व अशा प्रकारचीं दुसरीं उदाहरणें दिलेलीं आहेत. ह्या उदाहरणांवरून गायी, घोडे हीं विनिमयसामान्यें होतीं असें सिद्ध होतें. शिवाय दक्षिणाशब्द पूर्वी गायीला लावीत असत व लाखों गाई दक्षिणा म्हणून ब्राह्मणाला देत असत हें पुराणावरून उघड होतें. त्या वेळेस गाय जर विनिमयसामान्य नसती तर एकाच ब्राह्मणाला हजारों गायींची दक्षिणा कोणी दिली नसती. कारण, अशा दानाने त्या ब्राह्मणाचें हित न होतां उलट अनहित होण्याचाच संभव जास्त. एवढया गाईंना खावयास घालण्यांतच त्या बिचाऱ्याच्या पूर्वसंचित सर्वस्वाचा फडशा उडणार. ह्यावरून पूर्वी गाईंचा पैशाप्रमाणे उपयोग करीत असत असें अनुमान करणें वावगें होणार नाही. शेतकी करूं लागला म्हणजे मनुष्य अर्थात् आपल्या श्रमाने उत्पन्न केलेल्या धान्याने इष्ट पदार्थ खरेदी करूं शकतो. ह्याप्रमाणे धान्याचा उपयोग पैशाच्या कामीं होऊं लागला. नॉर्वे देशांत धान्य पेट्यांतून ठेवतात व कर्जाऊ देतात घेतात. आपल्या इकडेहि हा धान्याचा पैसा प्राचीन काळीं चालू होता व त्याच्या साहाय्याने लोक देवघेव करीत असत असें कौमुदींतल्याच खाली दिलेल्या उदाहरणांवरून दिसतें. द्वाभ्यामञ्जलिभ्यां क्रीतः द्व्यञ्जलिः (५।४।१०२)—दोन ओंजळी (धान्य) देऊन विकत घेतलेला; द्वाभ्यां शूर्पाभ्यां क्रीतं द्विशूर्पं (७।३।१७) दोन सुपें (धान्य इत्यादि) घालून विकत घेतलेला; पञ्चभिर्गोणीभिः क्रीतः पटः पञ्चगोणिः (१।२।५०)— पांच गोणी (धान्य) देऊन विकत घेतलेला पट; मुद्गैः क्रीतं मौद्गिकं (काशिका ५।१।३७) मूग देऊन विकत घेतलेलें तें मौद्गिक. ह्यापुढे, मनुष्य यन्त्रसाध्य सामान

तयार करूं लागला म्हणजे त्याचाहि खरेदीच्या कामीं तो उपयोग करतो हातऱ्या, खिळे, घडीव दगड ह्यांचा उपयोग पैशादाखल इतर देशांतून केलेला आहे हें मागे सांगितलेंच आहे. ह्याच्या जोडीला आमच्या देशांत होड्यांचा उपयोग करीत असत हें पुढच्या उदाहरणावरून समजेल. नावो द्विगोः ( ५।४।९९ ) ह्या पाणिनीच्या सूत्रावर " पञ्चभिर्नौभिः क्रीतः पञ्चनौः " —पांच नावा देऊन विकत घेतलेला—असें उदाहरण दिलेलें आहे. ह्यावरून नौकांच्या साधनाने लोकांचा विनिमयव्यवहार चालत असे असें होतें. नौकाप्रमाणेच वस्त्रांचा व सुयांचा उपयोग होत होता. उदाहरणार्थ, वस्त्रेण क्रीयते । वस्त्राने विकत घेतात तेथे वस्त्रक्रीतिः असें म्हणतात (४।१।५० काशिका). पञ्चभिः सूचीभिः क्रीतः पञ्चसूचिः। दशसूचिः। पांच सुया देऊन विकत घेतलेलें त्यास पञ्चसूचि व दहा सुयांनी विकत घेतलेलें त्यास दशसूची म्हणतात. ( १।२।५० काशिका ). कांही दिवसांपूर्वी पुण्यास व अन्यत्र कांही ठिकाणीं कवड्या बारीकसारीक व्यवहारांत चालू होत्या. ह्या कवड्या प्रथम कशा उपयोगांत आल्या हें ठरविण्यास नक्की प्रमाण नाही. पण इतर ज्या ठिकाणीं त्या चालू आहेत त्या देशच्या लोकांच्या स्थिती-वरून असें वाटतें की, अंगभूषण म्हणून त्यांचा उपयोग होत असल्यामुळे लोक त्यांची किंमत फार मानीत व त्यावरूनच पुढे त्यांचा पैशादाखल उपयोग झाला असावा.

फळांचा विनियोग पैशाच्या कामीं करीत असत हें मागे सांगितलें आहे. हिंदुस्थानांत व गुजरायेंत बदाम किरकोळ देवघेवींत चालतात हें पुष्कळ लोकांस ठाऊक असेलच. ह्याप्रमाणे नानाविध वस्तूंचा विनियोग पैशांच्या कामीं इतर देशांप्रमाणे ह्याही देशांत होत होता हें वर दिलेल्या उदाहरणांवरून दिसून येईल.

इष्टवस्तुप्राप्त्यर्थं मनुष्याने जड पदार्थ व पशु ह्यांचा उपयोग केला तसा मानवी प्राण्याचाहि करावयास कमी केलें नाही. प्राचीन काळीं गुलामगिरी सर्वत्र प्रचारांत असल्यामुळे गुलाम देऊन पाहिजे तो जिन्नस खरेदी कर-

ण्याची चाल स्वाभाविकच पडली असावी. त्याप्रमाणे हिंदुस्थानांत सुद्धा हे गुलामी पैसे लोकांनी चालविले असें दिसतें. उदाहरणार्थ, द्वाभ्यां पुरुषाभ्यां क्रीता द्विपुरुषा । त्रिपुरुषा ( ४।१।२४ काशिका ): दोन पुरुषांला विकत घेतलेली ती द्विपुरुषा; तीन पुरुषांला विकत घेतलेली ती त्रिपुरुषा.

वरील उदाहरणांवरून हिंदुस्थानांतील प्राचीन समाजाचें स्वरूपहि लक्षांत येईल व जगाच्या कोणत्याहि भागावरील समाजाचा स्वाभाविक विकास होत असतां विवक्षित परिस्थितींतून जावेंच लागतें असेंहि कळून येईल.

---

# धातुरूप विनिमयसामान्य अथवा नाणें.

" प्राक्कालीन अधातुरूप विनिमयसामान्यें " या निबंधांत अधात्वात्मक पदार्थांचा पैशाच्या कामीं विनियोग होत असे असें सांगितलें. हा सिद्धांत जुन्या ग्रंथांच्या परिशीलनाने अधिकाधिकच दृढ होतो. ज्योतिष्टोम यज्ञांत एक वर्षाची रक्तवर्णा व पिंगाक्षी अशी कालवड देऊन सोमवल्ली विकत घ्यावी अशी अनुज्ञा आहे.

" अरुणया पिंगाक्ष्यैकहायन्या सोमं क्रीणाति "

ह्यावरून पश्वादिकांचा विनिमयाच्या कामीं उपयोग होत असे हें स्पष्ट आहे. त्याचप्रमाणें " धनं तु गोधने वित्ते " ( विश्व ) व " गवादिकं जीवधनम् " ( त्रिकाण्डशेष ) ह्या कोशद्वयावरून वरील गोष्टीस प्रमाण मिळतें. वरील वाक्यांतील " अरुणया " ह्या शब्दाचा संबंध कोठे आहे ह्याचा ऊहापोह करीत असतां जैमिनीयन्यायमालाविस्तरांत " वाससा क्रीणाति " " अजया क्रीणाति " हीं प्रसंगवशात् उदाहरणें दिलेलीं आहेत. ह्या उदाहरणांवरूनही मागील निबंधांत केलेल्या विवेचनाला चांगली

बळकटी येते. तेव्हा धातूंहून भिन्न अशा नानाविध पदार्थांचा विनिमय-सामान्यादाखल उपयोग होत होता ह्यांत संदेह नाही.

तथापि एवढ्यावरून क्रयविक्रयांत धातूंची मदत घेण्याचें पूर्वीच्या आर्य लोकांस माहीत नव्हतें असें मात्र नाही. सोनें, रुपें, तांबें ह्यांचा व्यवहारांत सर्वत्र उपयोग होत असे. ह्या कामीं धातूंचा उपयोग आजपर्यंत दोन प्रकारांनी करण्यांत आला आहे. प्रथमतः हल्लींप्रमाणे धातूंचें नाणें पाडण्याची कल्पना लोकांस सुचली नव्हती. ही क्लृप्ति व्यवहारांत येण्या-पूर्वी धातूंचे नुसते तुकडे वजन करून देत घेत असत. ह्या पद्धतीस आपण तोलनात्मक चलनपद्धति म्हणूं. नाणें झाल्यानंतर लोक अर्थात् त्याची संख्या मोजूं लागले. तेव्हां ह्यास आपण संख्यात्मक चलनपद्धति असें नांव देऊं. दुसरी पद्धति पहिल्या पद्धतीनंतर अमलांत आली असें मानण्यास पुष्कळ पुरावा आहे.

नाण्याची कल्पना ही मूळची आर्य लोकांची नसून ती त्यांनी दुसऱ्या लोकांची उचलली असें म्हणावें लागतें. खुद्द नाणें हा शब्द परकी भाषें-तला आहे. संस्कृतमध्ये नाणें ह्यास नाणक ही संज्ञा आहे. पण नाणक हा शब्द कोणत्याहि संस्कृत धातूपासून बनलेला नाही हें उघड आहे. अमर-कोशांत हा शब्द सापडत नाही. मनुस्मृतींतहि तो आढळत नाही. याज्ञव-ल्क्यस्मृतींत मात्र ह्या शब्दाचा उपयोग केलेला दिसतो व त्या उपयोगा-वरून तत्कालीं नाणीं चांगलींच प्रचारांत होतीं असें मानण्यास प्रत्यवाय नाही.

> “ तुलाशासनमानानां कूटकृन्नाणकस्य च ।
> एभिश्च व्यवहर्ता यः स दाप्यो दण्डमुत्तमम् ” ॥

ह्यांत बनावट नाणें करणाऱ्याला सर्वांत मोठा दण्ड सांगितला आहे. त्याचप्रमाणे—

> “ अकूटं कूटकं ब्रूते कूटं यश्चाप्यकूटकम् ।
> स नाणकपरीक्षी तु दाप्य उत्तमसाहसम् ” ॥

ह्या श्लोकांत खोटें नाणें असतां तें खरें आहे असें सांगणारा व खरें असतां खोटें आहे म्हणणारा नाणकपरीक्षी मोठ्या शिक्षेस पात्र होतो असें सांगितलें आहे. ह्या वचनांवरून याज्ञवल्क्यस्मृतीच्या वेळेस नाण्यांचा प्रसार सर्वत्र फैलावला होता असें स्पष्ट होतें; व ह्यावरून मनु व याज्ञवल्क्य ह्या दोन स्मृतींमध्ये बराच काळ गेला असला पाहिजे असें अनुमान निघतें. मनूमध्ये नाणक शब्द नाही हें वर सांगितलेंच आहे. परंतु ह्या स्मृतींतील एका श्लोकावर सर्वज्ञनारायणाची जी टीका आहे ती ह्या विषयासंबंधानें लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

" नान्यदन्येन संसृष्टरूपं विक्रयमर्हति ।
न चासारं न च न्यूनं तद्दूरेण तिरोहितम् " ॥

अ० ८ श्लोक २०३.

ह्यांतील प्रथम चरणाचा अर्थ बहुतेक टीकाकारांनी एकच उदाहरण घेऊन केलेला आहे. कुंकुमादि द्रव्यांत कुसुमादि कुद्रव्यें मिसळून कुंकू म्हणून विकण्यास ठेवूं नये हा अर्थ मेधातिथि, कुल्लूक, राघवानंद, नंदन ह्यांनी दिला आहे. इतक्या टीकाकारांनी दिलेलें उदाहरण सर्वज्ञनारायणानें सोडून देऊन नाणकविषयक उदाहरण घेतलें आहे.

" नान्यदन्येन विजातीयेन संसृष्टं रूपं नाणकं विक्रयमर्हति "

दुसऱ्या धातूची भेसळ केलेलें नाणें विक्रीस ठेवूं नये हा ह्याचा अर्थ होय. ह्यावरून सर्वज्ञनारायणाला नाण्याची ओळख होती हें उघड आहे. पण सर्वज्ञनारायणाची टीका अर्वाचीन असावी असें मानतात.

मृच्छकटिक नाटकांत नाणक शब्द शकाराच्या तोंडीं घातला आहे ही गोष्टसुद्धां विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. शकारानें वसंतसेनेला नाणकमूषिका व चारुदत्ताला निर्नाणक म्हटलें आहे. दुसऱ्या कोणत्याहि पात्राच्या भाषणांत हा शब्द घातला नाही. उलट जेथे प्रसंग आला तेथे आर्यपरिमाणद्योतक सुवर्ण शब्दच वापरला आहे. ह्यावरून मृच्छकटिकाच्या वेळेस नाणक शब्दाचा प्रवेश संस्कृत भाषेंत अज्ञाहत झालेला नसावा असें

वाटतें. शकारानेसुद्धा वसंतसेनेला वश करण्याच्या हेतूने पैशाची लालूच दाखविली त्यावेळेस नाणक शब्द वापरला नाही. "कार्षापणं ते ददामि" असें म्हटलें आहे ह्यावरून नाणक हा क्षुद्रद्रव्यवाचक शब्द असावा असें अनुमान करण्यास जागा आहे व त्यावरूनच त्या वेळीं नाणीं फारशीं प्रचारांत नव्हतीं असें समजणें भाग पडतें.

> लोकसंव्यवहारार्थं याः संज्ञाः प्रथिता भुवि ।
> ताम्ररूप्यसुवर्णानां ताः प्रवक्ष्याम्यशेषतः ॥
>
> अ० ८, श्लो० १३१.

असें म्हणून मनूने जें कोष्टक दिलें आहे त्यांत नाण्याचा मुळीच उल्लेख नाही. मनूचें सर्व कोष्टक वजनी आहे; तें येणेंप्रमाणे.

| | |
|---|---|
| ३ यव = १ गुंज. | २ गुंजा = १ रुप्याचा मासा. |
| ५ गुंजा = १ मासा. | १६ रु. मासे = १ रु. धरण अथवा पुराण. |
| १६ मासे = १ सुवर्ण. | १० रु. धरण = १ रु. शतमान. |
| ४ सुवर्ण = १ पल. | ४ सुवर्ण = १ निष्क. |
| १० पलें = १ धरण. | |

८० गुंजा
१ कर्ष } तांबें } = १ कार्षापण किंवा पण ( तांब्याचा ).
१६ मासे

व्यवहारांत जेवढया एतद्विषयक संज्ञा प्रचलित होत्या तेवढया सर्व मनूने दिल्या आहेत. नाणीं व त्यांचीं निरनिराळीं दुसरीं परिमाणें जर तेव्हां अस्तित्वांत असतीं तर ह्यांत त्यांचें कोष्टक आल्याशिवाय राहतेंना. शिवाय "ताम्ररूप्यसुवर्णानां याः पणादिसंज्ञा द्रव्यविक्रयादिलोकव्यवहारार्थं प्रसिद्धास्ता दण्डाद्युपयोगार्थं साकल्येन कथयिष्यामि" अशी टीका ह्यावरील मनुस्मृतींतील श्लोकावर कुल्लूकाने केली आहे. म्हणजे क्रयविक्रयाकरितां ह्याखेरीज दुसरें परिमाण नव्हतें हें ह्यावरून व्यक्त होतें. तसेंच राजाने अपराध्यास अमुक दंड करावा असें मनूने सांगितलें आहे व पण म्हणजे

मनूच्या कोष्टकाप्रमाणे १६ माषे वजनाचा तांब्याचा तुकडा होय. अमर-कोशांत वैश्यवर्गांत खालीं लिहिल्याप्रमाणे कोष्टक दिलें आहे:

५ गुंजा = १ माषा.
१६ माषे = १ अक्ष किंवा कर्ष.
४ कर्ष = १ पल.
१ सोन्याचा अक्ष किंवा कर्ष } = १ सुवर्ण अथवा बिस्त.
१ सो. पण = १ कुरुबिस्त.
१०० पल = १ तुला.
२० तुला = १ भार.
१० भार = १ आचित.
१ ताम्रपण = १ कार्षापण किंवा कार्षिक.

ह्यावर "इति तुलामानमुक्तम्" अशी रामाश्रमी टीका आहे. ह्यानंतर प्रस्थमान दिलें आहे. पण नाणकवाची शब्द कोठेंहि नाहींत. ह्यावरून अमरसिंहाच्या वेळेस आर्य लोकांची नाण्याची पद्धति स्वतंत्र नव्हती ह्यांत बिलकुल संशय नाही. आर्य लोकांची स्वतंत्र पद्धति असें म्हणण्याचें कारण हिंदुस्थानांत त्या वेळीं परकी म्हणजे ग्रीक वगैरे लोकांचें नाणें चालत असलें पाहिजे. नानार्थवर्गांत "दीनारेऽपि च निष्कोऽस्त्री" म्हणजे दीनाराला निष्क शब्द वापरतात असें म्हटलें आहे. दीनार हें अरेबिक व ग्रीक नाणें होतें ह्याबद्दल वाद नाही. त्याचप्रमाणे अथर्वपरिशिष्टासारख्या जुन्या ग्रंथांतून धातूंचीं वजनी कोष्टकें आहेत, पण नाण्याबद्दल उल्लेख नाही. तात्पर्य, पुढे नाणें प्रचारांत इतकें आलें की, कविदेखील अंगीकृत विषय व्यक्त करून दाखविण्याच्या कामीं त्याचा उपयोग करूं लागले. उदाहरणः—

"जैवि सोनें नाणें विरहित आपुलेंपणें नव्हे विपरीत"

पासष्टी ओवी ३९. टीका १९४.

इतका प्रसार ३००० वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत झालेला दिसत नाही. भास्क-

राचार्यांनी लीलावती लिहिली, तेव्हा क्रयविक्रय नाण्यांत होत असे असें स्पष्ट दिसतें; कारण वजनाचीं परिमाणें देऊन पैशाचें कोष्टकहि त्यांनी दिलें आहे, तें येणेंप्रमाणे :

वराटकानां दशकद्वयं यत्सा काकिणी ताश्च पणश्चतस्रः ।
ते षोडश द्रम्म इहावगम्यो द्रम्मैस्तथा षोडशभिश्च निष्कः ॥

ह्यांत दिलेलें कोष्टक असें बसतें :

२० कवड्या=१ दमडी.
४ दमड्या=१ पैसा.
१६ पैसे=१ द्रम्म.
१६ द्रम्म=१ निष्क.

कर्ष हें चलन फार जुनें आहे असें म्हणतात. बुद्धसूत्रांत त्याचा उल्लेख आहे. कर्ष, कार्षापण व पण ही तीन एकाच चलनाचीं नांवें होतीं किं काय सांगतां येत नाही. कौटिलीय अर्थशास्त्रांत कर्ष किंवा कर्षापण ह्यांचा निर्देश नाही. पण हें चलन मात्र आढळतें. हें रुप्याचें चलन होतें. माष आणि काकिणी हीं तांब्याचीं चलनें होतीं. दंड अगर कर ह्या चलनांत घेत असत. ह्या चलनांवर शिक्का होता असें मानण्यास सदरील ग्रंथांत आधार नाही. म्हणून त्यांस नाणें ही संज्ञा देतां येणार नाही.

एवढा वेळ झालेल्या विवेचनावरून इतकें सिद्ध झालें की, नाण्याची कल्पना आपण परकी लोकांपासून घेतली आहे; ती मूळची आपली नव्हती; ग्रीक लोकांचीं नाणीं हिंदु लोक वापरीत असत. वरील भास्कराचार्यांच्या कोष्टकांतील द्रम्म हें नाणें व ग्रीक नाणें (Drachma) ह्यांत्मा हीं एकच होत. व्यवहारांत हें नाणें चालू होतें असें मानण्यास भास्कराचार्यांशिवाय आणखी पंचतंत्राचा आधार आहे तो असाः—

"ततश्च द्रम्मानादाय गुर्जरग्रामे गत्वा करभाः संक्रीताः" तंत्र. ४

त्याचप्रमाणे काकिणी हें व्यवहार्य नाणें होतें असें दशकुमारचरितावरून दिसतें. उदाहरणः—

" पभिर्लब्धाः काकिणीर्दत्वा शाकं घृतं दधि तैलमामलकं बिभ्राफलं च यथालाभमानय "

पुतळ्या वर अशाच्या तशाच आपण बॅक्ट्रिअन लोकांच्या घेतल्या हें अद्यापिहि त्यांवरील आकृतीवरून निर्विवाद सिद्ध होत आहे. त्याचप्रमाणे ग्रीक लोकांचें दीनार नांवाचें नाणें आपण वापरीत होतों हें कोष्टकांवरून उघड दिसतें. दीनार शब्द मूळ संस्कृत नसल्यामुळे कोशांत त्याचा अर्थ दिला नाही. पण वर सांगितल्याप्रमाणे अमरांत नानार्थवर्गांत निष्क शब्द दीनारवाची आहे असें जें म्हटलें आहे त्यावरून हें नाणें प्रचारांत होतें असें मानण्यास प्रत्यवाय नाही. अमराप्रमाणेच मेदिनीकोशांतहि दीनाराचा उल्लेख आहे.

" निष्कमस्त्री साष्टहेमशते दीनारकर्षयोः "

सोन्याचें अलीकडलें दुसरें एक मोहोर नांवाचें नाणें हें तर उघड मुसलमानी होय. जुन्या मोहरा पाहिल्या असतां त्यांच्यावर अद्यापि मुसलमानी अक्षरें दृष्टीस पडतात. खुद्द मोहोर हा शब्द फारशी असून त्याचा मूळ अर्थ शिक्का असा आहे. हा शब्द नाण्याला कसा लावला गेला ह्याची उपपत्ति एका इंग्रेजी ग्रंथकाराने खाली लिहिल्याप्रमाणे दिली आहे.

The ancient Greek idea of expressing a solemn compact by means of sealing or placing the stamp or seal upon a piece of metal, guaranteeing the exactness of its weight and purity of the metal, has its counterpart in the Indian mohar. "

महाभारतांत निष्क शब्द आला त्याचा अर्थ मराठी भाषांतरांत मोहोर म्हणून केला आहे तो बरोबर नाही. मोहोर ही मुसलमानांच्या वेळची आहे व निष्क उपनिषत्कालीन आहे. मोहोर हें नाणें आहे; पण तत्कालीन निष्क हा ठरीव वजनाचा धातूचा तुकडा होय. शिवाय वजनामध्ये किंवा किंमतींत मोहोरेचें निष्काशीं यत्किंचितहि साम्य नाही.

मराठ्यांच्या वेळेस होन चालत असत. होन शब्द हा सुवर्णवाचक कानडी शब्द जो हून त्यापासून झाला आहे; तेव्हा ह्या नाण्याकाहि संस्कृत भाषेंत थारा नाही.

आता सांप्रत प्रचलित असलेलें नाणें—रुपया ह्याचें मूळ कोठे आहे त्याचा विचार करूं. हा शब्द संस्कृतांतील रूप्य शब्दापासून निघाला असावा. ' आहतं रूपं अस्य ' अशी व्युत्पत्ति पाणिनीच्या ' रूपादाहतप्रशंसयोर्यत् ' ( ५।२।१२० ) ह्या सूत्रावरून बसते. म्हणजे घडलेला आकार ज्याचा आहे तें रूप्य. भट्टोजी दीक्षितांनी ह्याचें उदाहरण " रूप्यः कार्षापणः " असें दिलें आहे. ह्यावरून कार्षापण हें तीनशें वर्षांपूर्वी नाणें होतें हें खचित. रूप्य शब्द पुढे नाणेंवाचक झाला असावा असें दिसतें. कारण " कार्षापणः कार्षिकः स्यात् " ह्यावर भट्टोजी दीक्षितांचे चिरंजीव भानुजी दीक्षित ह्यांनी केलेल्या व्याख्यासुधा नामक टीकेंत " द्वे रजतरूप्यस्य " म्हणजे कार्षापण व कार्षिक हे दोन शब्द रुप्याच्या नाण्याला लावतात असें म्हटलें आहे. ह्यांत रजत आणि रूप्य असे दोन शब्द वापरले आहेत, त्यावरून रूप्य शब्दाचा अर्थ नाणें करणें भाग आहे. आता संस्कृतामध्ये रुपयास रूपक हा पर्याय शब्द आहे; तेव्हा रुपया हा " रूप्य " किंवा रूपक शब्दापासून निघाला हें ठरविणें जरा दुर्घट आहे; तथापि मराठी शब्दांतील यकारावरून त्याची उत्पत्ति रूप्य शब्दाशीं नेऊन पोंचविणें बरें दिसतें. व्युत्पत्ति कशीहि असो, रूप्य किंवा रूपक हे मराठी रुपयाचे संस्कृतांतील पर्याय शब्द अद्यापि समजले जातात. आता पाणिनीच्या " पूरणार्धाट्ठन् " ( ५।१।४८ ) व " भागाद्यच्च " ( ५।१।४९ ) ह्या सूत्रांवरील भट्टोजी दीक्षितांच्या व्याख्येंत " अर्धशब्दो रूपकस्यार्धे रूढः " व " भागशब्दोपि रूपकस्यार्धे रूढः " अशीं उदाहरणें दिलेलीं आहेत. रुपयाच्या अर्ध्या भागास म्हणजे अधेलीच्या ठिकाणीं भाग व अर्ध शब्द रूढ आहेत असें ज्या अर्थी येथे म्हटलें आहे त्या अर्थी दीक्षितांच्या पूर्वीपासून अर्ध, भाग व रूपक हे शब्द चांगले प्रचारांत होते हें

उघड आहे. भट्टोजी दीक्षितांचा जन्म शके १५०० त झाल्यामुळे ३२५ वर्षांपूर्वी रुपये चालू होते असें सहजच ठरतें. अमरकोशांत नाण्याचा वाचक शब्दच नाही तेव्हा येथे एतदर्थी रूप्य किंवा रूपक शब्द सापडत नाही हें साहाजिक आहे. परंतु नंतरच्या कोशांत, उदाहरणार्थ हैमांत, " भागो रूपार्धके " असा पाठ आहे. ह्यावरून " रूप " म्हणजे रुपया तत्कालीं निःसंशय चालू होता. " रूप " शब्द नाणकवाची आहे अशा-बद्दल त्या कोशाचाच आधार आहे, तो असा : "रूपं तु श्लोकशब्दयोः। पशावाकाशे सौंदर्ये नाणकं नाटकादिके ॥ ग्रंथावृत्तौ स्वभावे च." ह्यावरून 'रूप' किंवा 'रूपक' हे दोन शब्द मराठी रूपयाचे संस्कृत पर्याय हैमकोश-कर्त्यांच्या कालीं प्रचलित होते हें सिद्ध आहे. त्यावरून तन्निर्दिष्ट जें नाणें तेंहि असलेंच पाहिजे. हैमकोशाचा कर्ता हेमचंद्र पंडित. हा जैन असून तो होऊन गेल्यास ८०० वर्षे झालीं. याने शके १०९५ मध्ये गुजराथेंतील कुमारपाल नामक राजास जैनधर्मी केलें असें म्हणतात. ह्यावरून हल्लीचा रुपया ८०० वर्षांचा जुना आहे असें ठरतें.[1]

असें असतां रुपया शब्द प्रथमतः शीरशहाने इ० स० १५४० आणि १५४५ ह्यांच्या दरम्यान प्रचारांत आणला असें जें डी कुना साहेबांनी रॉयल एशियाटिक सोसायटीसमोर वाचलेल्या आपल्या निबंधांत म्हटलें

---

१ कौटिलीय अर्थशास्त्रांत रूपदर्शक हा शब्द चलनाची परीक्षा करणारा अधि-कारी ह्या अर्थानें योजिला आहे. हा अधिकारी याज्ञवल्क्यस्मृतींतला नाणक-परीक्षी होय. तसेंच रूपिक शब्दहि कौटिल्यानें वापरला आहे, त्याचा अर्थ चलन पाडून देण्याबद्दल द्यावयाचा कर. हा शेकडा पांच असे. कौटिल्याचा ग्रंथ इ. सनापूर्वीचा आहे. ह्या ग्रंथांत नाणक शब्द नाही हें ध्यानांत ठेवण्यासारखे आहे. माष, पण, धरण, सुपर्ण, काकिणी इत्यादि चलनांचा उल्लेख मात्र आला आहे. रुप्याच्या पणांत चार भाग तांबें, एक भाग लोखंड, कथील, शिसें व अंजन यांपैकी एक धातु व अकरा भाग रुपें असें मिश्रण असलें पाहिजे असें कौटिल्य म्हणतो.

आहे, तें कसें ? ह्या प्रश्नासंबंधाने त्यांनी ज्या भागांत विवेचन केलें आहे तो असाः—

The use or employment of the word Rupia or Rupee in the annals of Indian coinage in general is of comparatively modern date. The early Mahomedan rulers used the Arabic designations of a dinar, dirhem, and falas, for the gold, silver and copper coins respectively —words belonging originally to Greek and Roman and Byzantine systems until the Pathan Sultans introduced the word Tankas for both their gold and silver coinage. Shirshaha of the family of Sur was the first to introduce the word Rupia in substitution of the Silver Tank between the years 1540 and 1545, a designation which was soon adopted by Mogal Emperors, by the Portuguese and the East India Company.

ह्याचा सारांश असा आहे की, पहिल्या मुसलमान राजांनी दीनार, दिराम आणि फॅलस ह्या ग्रीक, रोमन व बायझंटाइन संज्ञा आपल्या नाण्यांस लावल्या. पुढे पठाण सुलतान झाले त्यांनी आपल्या रुप्याच्या नाण्यास टंक ही संज्ञा दिली व शीरशहाने इ० स० १५४० व १५४५ ह्यांच्यामध्ये टंक शब्दाच्या ऐवजी रुपया शब्द प्रथमतः सुरू केला.

हेमकेशांतील जो वर उतारा दिला आहे त्यावरून ह्या साहेबांचें म्हणणें मान्य होण्याजोगें दिसत नाही व तें एकंदर सारासारविचाराशींहि जुळत नाही. नाण्याचा वाचक जो जुना शब्द तो बदलून परकी भाषेतला नवीन शब्द त्या जागीं आणण्यास मुसलमानधर्मी राजास काय कारण झालें असावें ? इतरत्र प्रचारांत असलेला शब्द त्याने विशेष प्रचारांत आणला इतकेंच फार तर म्हणतां येईल. पण त्यावरून रुपया हा शब्द त्याने नवीन बनविला असें सिद्ध होत नाही.

पंचतन्त्रांत एके ठिकाणीं रूपक ( रुपया ) शब्द वापरलेला आहे. त्यावरून तर हा शब्द फार जुनाट असावा अशी कल्पना होते. तंत्र ५ कथा ९ ह्यांत खाली दिल्याप्रमाणे वाक्य आहे.

"तद्यदि दुर्भिक्षं भवति तदनेन ( सक्तुभिः परिपूरितघटेन ) रूपकाणां शतमुत्पत्स्यते ततस्तेन मयाजाद्वयं ग्रहीतव्यम्" ह्या वाक्यांत रूपक शब्दाचा स्पष्ट उल्लेख आहे. हें वाक्य जर विश्वसनीय असेल तर सांप्रतचा रुपया फार जुनाट आहे असें म्हणावें लागतें. हिंदुस्थानांतील ग्रंथ व ग्रंथकर्ते ह्यांचा कालनिर्णय अद्यापि संशयारूढ असल्यामुळे अमक्याच वर्षी रुपयाचें नाणें प्रथमतः अस्तित्वांत आलें असें विधान करणें सांप्रतच्या स्थितींत शक्य नाही; तथापि वरील उदाहरणांवरून ३०० वर्षांहून जास्त वर्षांपासून हिंदुस्थानांत हें नाणें वापरलें जात आहे हें खास. आता भास्कराचार्यांचें लीलावतींतील नाण्याचें कोष्टक वर दिलें आहे, त्यांत रुपयाचा उल्लेख नाही. भास्कराचार्यांचा काल निर्णीत आहे. त्यांस होऊन गेल्यास आज ८०० वर्षे झालीं. ह्यावरून रुपयाचें अस्तित्व ह्या ८०० वर्षांच्या आंतील आहे असें प्रथमदर्शनीं वाटण्याचा संभव आहे. परंतु लीलावतींत रुपयाचा उल्लेख नाही, ह्यावरून तेव्हा हें नाणें नव्हतेंच असें अनुमान करणें जरा धाडसाचें होईल. इंग्रेजी अमलाखाली ह्या देशांत सर्वत्र एक नाणें चालू आहे तसें पूर्वी कधीच नव्हतें. निरनिराळ्या भागांत निरनिराळीं नाणीं व निरनिराळीं वजनें चालत असत.

ह्यामुळे भास्कराचार्यांच्या वेळीं रुपया नव्हताच हें अनुमान जसें अगदी निर्दोष होऊं शकत नाही, त्याचप्रमाणे पंचतंत्रांतील वरील वाक्यावरून तत्कालीं रुपयाचें नाणें होतें असें मानणेंहि आम्हांस सयुक्तिक दिसत नाही. एक तर रुपयाचा इतका जुनाटपणा शाबीत करण्यास दुसरा स्वतंत्र पुरावा नाही. व खुद्द पंचतंत्रांत ज्या वाक्यांत रूपक शब्द आला आहे त्या वाक्याच्या अर्थावरून तो शब्द पाठीमागून गैरसमजुतीने अथवा लेखकाच्या चुकीने लिहिला गेला असावा.

भिक्षा मागून जमविलेल्या मडकेभर धान्याची किंमत शंभर रुपये कितीहि दुर्भिक्ष झालें तरी येईल असें वाटत नाही व यदाकदाचित् येईल अशी कल्पना केली, तरी दोन शेळ्यांची किंमत इतकी मरमसाट कधीहि असावयाची नाही. विशेषेंकरून दुष्काळांत धान्याशिवाय इतर सर्व पदार्थ अधिक स्वस्त असतात. त्याचप्रमाणे ह्या एका वाक्याशिवाय पंचतंत्रांत अन्यत्र कोंठेहि एतद्विषयक शब्द वापरलेला नाही. तात्पर्य, पंचतंत्राएवढा रूपक शब्द जुना होता असें मानण्यास सबळ कारण नाही.

ह्या एकंदर हकीकतीवरून नाण्यांची कल्पना आपण परकीयांपासून घेतली असें ठरतें. पूर्वी आपलीं स्वतंत्र नाणीं नसून ग्रीक आदि परकी लोकांचीं नाणीं जशींच्या तशीं चालत असत. पुढे कालांतराने त्याच नाण्यांस एतद्देशीय बनविण्याचे प्रयत्न सुरू झाले असें निष्क शब्दाचा दीनार नाण्याच्या ठिकाणीं उपयोग होऊं लागला त्यावरून म्हणावें लागतें. शब्दस्थापनेनंतर आर्योत्पत्तिसूचक मुद्रांनी युक्त अशीं स्वतंत्र नाणीं पाड-ण्याचा क्रम सुरू झाला. लल्लादीक्षितांनी मृच्छकटिकांतल्या नाणक शब्दाचा अर्थ "शिवाङ्कम्, टङ्कादि" ह्याप्रमाणे दिला आहे त्यावरून वरील सिद्धांतास पुष्टि मिळते. ह्याप्रमाणे ह्या देशांत फार वर्षांपासून नाणीं चालत आहेत. तीं किती जुनाट आहेत हें ठरविणें अगदी सोपें नाही; तरी पण जवळ जवळ २५०० वर्षे आपण नाणीं वापरीत आहों ह्यांत संदेह नाही. याज्ञवल्क्यस्मृति इ० स० नंतर २०० वर्षांनी लिहिली असें मान-तात. ह्या स्मृतींतील जो वर उतारा दिला आहे त्यावरून तत्कालीन नाण्यांचा प्रसार सर्वत्र झाला होता हें उघड होतें. त्याच्याहि पूर्वींचीं म्हणजे शुंग घराण्याचीं तांब्याचीं नाणीं सापडलीं आहेत. इ० स० पूर्वी १७८ व्या वर्षी ह्या घराण्यांतील प्रथम पुरुष राज्यारूढ झाला.

आता नाण्याची कल्पना निघण्यापूर्वी विनिमयासाठी धातूंचा उपयोग होत होता; पण तो निराळ्या स्वरूपाने होत होता हें प्रथमतः सांगितलेंच आहे. धातू वजन करून कोणत्याहि पदार्थाचें मूल्य म्हणून देत असत.

अगदी पूर्वीची रीत म्हटली म्हणजे धातूच्या मोठ्या कांबींतून गरज पडेल त्याप्रमाणे व तेव्हां वजन करून तुकडा पाडून तो पदार्थाच्या किंमतीदाखल देत असत. ह्या कामीं प्रत्येक वेळीं तागडी जवळ बाळगण्याचा प्रसंग व क्षणोक्षणीं वजन करण्याची मेहनत पडते. हा त्रास चुकविण्याकरिता निरनिराळ्या धातूंचे ठरीव तुकडे पाडण्याची चाल सुरू झाली असावी ही गोष्ट मनुस्मृतींतील्या व अमरकोशांतल्या वर दिलेल्या कोष्टकावरून सप्रमाण सिद्ध होते. पल, धरण, पण, सुवर्ण, इत्यादि त्या त्या वजनांचे धातूंचे तुकडे होत; हीं केवळ वजनें होतीं असें म्हणतां येत नाही. तसें असतें तर निरनिराळ्या धातूंचीं वजनें असण्याचें कांही प्रयोजन नव्हतें. वजन तांब्याचें, रुप्याचें, सोन्याचें अगर दगडाचें असलें तरी एकच. कोणताहि पदार्थ तोलण्याकरिता तांब्याच्या ऐवजी तितक्याच प्रमाणाचें सोन्याचें वजन वापरल्याने कांही विशेष कार्य निष्पन्न होत नाही. उलट बहुमोल धातु निष्कारण अडून राहते. तेव्हा ज्या अर्थी निरनिराळ्या धातूंचीं निरनिराळीं वजनें मनुस्मृतींत दिलीं आहेत, त्या अर्थी त्या त्या धातूंचे त्या त्या वजनाचे तुकडे मूल्यादाखल वापरीत असत असें म्हणणें प्राप्त होतें. चीन, जपान व ब्रम्हदेश येथे ही तोलनात्मक चलनपद्धति थोड्या वर्षांपूर्वीपर्यंत चालू होती. हंटर साहेब म्हणतात "The principal money of this country (Pegu) is silver, which is not coined but paid by weight" (पेगू येथील मुख्य चलन रुप्याचें आहे, पण तेथे रुप्याचें नाणें नाही, तर हें रुपें वजन करून देतात). कांही कांही जुन्या पैशांवर तागडी दाखविलेली असते हेंहि ह्या प्राचीन पद्धतीचें द्योतक आहे.

वर जें भास्कराचार्यांचें नाण्याचें कोष्टक दिलें आहे त्यांत कवडी हें आदिपरिमाण धरलें आहे. हें निःसंशय आर्यांचें दिसत नाही. कांही अनार्य लोक कवड्यांच्या माळा गळ्यांत घालतात व त्यांस बहुमोल समजतात आणि म्हणूनच त्यांचा पैशाच्या कामीं उपयोग करण्यांत आला हें प्रसिद्धच आहे. त्याच कोष्टकांत पण आणि निष्क हे दोनच काय ते खरे

आर्यशब्द होत. त्यांतहि निष्क शब्द दीनाराप्रमाणेच परकी नाण्याबद्दलच वापरूं लागले हें अमरावरून उघड होतें. तात्पर्य, नाण्याच्या बाबतीत आर्य लोकांनी दुसऱ्यांचें साहाय्य मुबलक घेतलें ह्यांत शंका नाही. नाण्यांची कल्पना त्यांनी परकीयांकडून घेतली व त्याबरोबर तद्वाचक शब्दहि घेतले. पण ते शब्द अशा खुबीने घेतले की, त्यांची संस्कृत शब्दांत सहज गणना व्हावी. वेडयाबाकडया उच्चारांचे इंग्रेजी शब्द मराठींत जसेच्या तसेच घेणारांनी ही गोष्ट लक्षांत ठेवावी. त्याचप्रमाणे इंग्रेजी शब्द मराठींत बिलकुल शिरकवूं न देणाऱ्या कांही विद्वानांनीहि आपल्या पूर्वजांनी ह्या बाबतींत काय केलें आहे हें अवश्य अवलोकन करावें.

---

## ब्रिटिश अमलापूर्वीच्या चलनासंबंधाने थोडी माहिती

सांप्रत हिंदुस्थानांत ब्रिटिश अमलांतील मुलखांत रुप्याचें व तांब्याचें अशीं दोन धातूचीं नाणीं चालू आहेत. त्यांत मुख्य परिमाण रुप्याचें असून तांब्याचीं उपनाणीं आहेत. आजमितीस जी चलनपद्धति आहे तिचें जर निरीक्षण केलें तर रुपयेसुद्धा उपनाण्यांतच गणले पाहिजेत. उपनाण्यांचें मुख्य लक्षण हें आहे की, त्यांची ठरीव किंमत अन्तर्गत धातूच्यापेक्षा जास्त असते. आजच्या तांब्याच्या बाजारभावाप्रमाणे आपल्या दिडकीची वास्तविक किंमत $\frac{1}{2}$ पैपेक्षा जास्त नाही. म्हणजे ठरीव किंमत $\frac{1}{2}$ पैने अधिक आहे. ह्या कामांत सरकारास बराच नफा होतो. समजा, सरकारने एक शेर म्हणजे ८० भार अथवा १४४०० ग्रेन वजनाचें तांबें खरेदी करून त्यांच्या दिडक्या पाडल्या. एका दिडकींत १०० ग्रेन तांबें असावें लागतें; ह्या हिशोबाने एक शेर तांब्याच्या १४४ दिडक्या पडतात.

अर्थात् सरकारास २१ रुपये मिळतात. ह्याचा अर्थ असा की, सव्वा रुपयाच्या भांडवलावर सरकार एक रुपया नफा मिळवितें.

रुपये पाडण्याचें बंद केल्यामुळे रुपयांची हीच स्थिति झाली आहे. एक रुपया १८० ग्रेन वजनाचा असावा लागतो व त्यांत १६५ ग्रेन शुद्ध चांदी असते. हल्ली रुप्याचा भाव उतरल्यामुळे नाण्याची मुख्य किंमत धातुगत किंमतीहून पांच आण्यांनी जास्त आहे. ह्या व्यवहारांत रुपयाच्या पाठीमागे सरकारास पांच आणे नफा मिळतो. ह्या नफ्याचा उपयोग पुढे सोन्याचें नाणें सुरू करण्याच्या उद्देशानें जो हल्ली त्या धातूचा संग्रह केला जात आहे त्या कामीं होतो.

रुपें व तांबें ह्या धातूंहून अन्य धातूचें नाणें सध्या चालत नाही. सोन्याचें व निकल[1] धातूचें नाणें सुरू करण्याचा सरकारचा हेतु आहे.

ब्रिटिश अमलापूर्वी हिंदुस्थानांत सोनें, रुपें व तांबें ह्या धातूंचीं नाणीं प्रायः चालत असत. होन, मोहरा, पुतळ्या हीं सोन्याचीं नाणीं होत. रुपये सर्व रुप्याचे. अल्प किंमतीचीं नाणीं तांब्याचीं असत. ह्या निरनिराळ्या धातूंच्या नाण्यांची परस्पर किंमत कायद्यानें ठरलेली नव्हती. सदर किंमती बाजारभावाप्रमाणें वारंवार बदलत. ह्यामुळे हल्ली रुपयाच्या चौसष्ट दिडक्या ज्याप्रमाणे हमेश मिळतात त्याप्रमाणे पूर्वी रुपयाचे चौसष्ट शिवराई नेहमी मिळत नसत. खुर्दाचा भाव वारंवार बदले. कांही दिवसांपूर्वी जुने शिवराई रुपयास ६७ किंवा ६८ मिळत. ह्याचें कारण तांबें हल्ली फार उतरलें आहे. हल्ली जेथे एका शेरास सवा रुपाया पडतो, तेथे पूर्वी दोन रुपये पडत. शके १६९४ ची एक जुनी जमाखर्चाची वही आम्हांस पहाण्यास सांपडली त्यांत तांब्याचा भाव दर शेरास दोन रुपये लागलेला होता, व त्याच वहींत खुर्दाचा भाव २९ व ३० सण्या अगर ३, ३॥, ३॥। टक्केप्रमाणे दिला आहे.

जुन्या वह्यांतले शब्द हल्ली प्रचारांत नसल्यामुळे अगर त्यांचे पूर्वीचे

१ निकल धातूचें नाणें हल्ली सुरू केलें आहे.

अर्थ बदलल्यामुळे त्यांची मांडणी समजणें अवश्य आहे. सणी हा शब्द हल्ली बऱ्याच लोकांस माहीत नसेल. २ दिडक्यांस पूर्वी सणी म्हणत. तेव्हां २९ सण्या म्हणजे ५८ शिवराई व तीस सण्या म्हणजे ६० शिवराई होतात.

टका हा शब्दहि हल्ली निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या अर्थी वापरतात. परंतु पूर्वी १६ पैशांना टका म्हणत असत. रुपयाचे तीन टके म्हणजे ४८ शिवराई, साडेतीन टके म्हणजे ५६ शिवराई; पावणेचार टके तीन रुके ( ३॥।३ ) म्हणजे ६१ शिवराई.

एका पैशाचे रुके तीन व त्याची मांडणी वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे असे. हल्लीच्या पैच्या किमतीचा रुका असे. एका रुपयावर रकम मांडावयाची झाली तरी टक्यांत लिहिण्याची वहिवाट कांही ठिकाणीं असलेली दिसते. व शिवराई किंवा पाव आण्याच्या ऐवजी तीन रुके म्हणण्याचा प्रघात असे. उदाहरणार्थ, ब्राह्मण संख्या १८३५, दर तीन रुके प्रमाणे एकूण टके ११४॥९. कांही प्रांतांत रेसांत हिशोब मांडण्याची वहिवाट असे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे.

तात्पर्य, ह्या देशांत पूर्वी त्रिधातुपरिमाणपद्धति चालू होती म्हणण्यास हरकत नाही. मात्र तांब्याचें नाणें किती रकमेपर्यंत कायदेशीर फेडीचें चलन होतें हें समजण्यास मार्ग नाही.

तांब्याच्या नाण्यांत दुसऱ्या धातूचें मिश्रण नसे. सोन्याचीं नाणीं व रुप्याचीं नाणीं ह्यांची परस्पर किंमत कायद्याने ठरली नसल्यामुळे बाजारभावाप्रमाणे जी किंमत असेल त्याप्रमाणे त्यांचा परस्पर मोबदला होई. अर्थात् वजनावर सोन्याच्या नाण्यांची किंमत होई. वर निर्दिष्ट केलेल्या वहीवरून असें दिसतें की, शके १६९४ त सोन्याचा दर १५ पासून १६ पर्यंत असे व हा भाव शके १७४४ पर्यंत तरी निदान कायम होता. ह्या दराने एका होनाची रुपयांत किंमत ३॥।= अथवा ३॥।- होई. एक होन सुमारे सवातीन मासे वजन भरे. त्याचा आकार उडदाएवढा असे.

हैदराने पाडलेल्या होनास बहादुरी व टिपूने पाडलेल्या होनास सुलतानी अशा संज्ञा असत. पेशव्यांच्या वेळेस कांही अधिकाऱ्यांचा पगार होनांत दिला जात असे. विजापुरच्या हिंदुराजांचे होन सापडले आहेत ते इ.स. ६ किंवा ७ व्या शतकांतले असावेत.

शिवाजीच्या वेळेस खाली दिलेल्या नांवाचे होन चालत असत.

| | | |
|---|---|---|
| पातशाही | अच्युतराई | जलखटी |
| शिवराई | देवराई | पाकनाईकी |
| | रामचन्द्रराई | आदवाणी |
| कावेरीपाकी | गुती | जलमाल |
| सणगरी | धारवाडी | ताडपत्री |
| अफराजी | चंदावरी | महमदशाई |
| त्रिवाळुरी | बिलघरी | वेलुरी |
| त्रिसुजी | उलफकरी | कंठेराई |
| देवजवळी | रामनाथपुरी | कुनगोटी |

मोहरांमध्येहि दिल्लीची मोहोर, अवरंगाबादी मोहोर अशा नानाविध जाती असत. त्यांपैकी कांहींचीं नांवें येणेंप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| अमदाबाद | अंग्रशाही | अर्काट |
| अश्राफी | बऱ्हाणपूर | शहाअलमबादशाहाची |

ह्या मोहरांचें वजन १६४ पासून १९० पर्यंत असे. ह्यांपैकी अवरंगाबादी मोहरेंत शेकडा शंभर शुद्ध धातु असे. त्यामुळे ह्या मोहरेचा भाव हाली शिक्का १३ रु० असे. पुतळ्याहि वजन करून घेत व त्यांची किंमत ४॥ पासून ५ रु० पर्यंत येई. ऐनीअकबरींत मोहरेची किंमत ९ रु० दिली आहे. ह्याशिवाय सोन्याच्या निरनिराळ्या किंमतीच्या दुसऱ्या सोन्याच्या नाण्यांचीं नांवें सदर ग्रंथांत नमूद केलीं आहेत. रुपये तर महाराष्ट्रांत व इतरत्र फारच निरनिराळे चालत व त्यांचा बट्टयाचा भावहि

निरनिराळा असे. ह्यामुळे सराफ लोकांस नफा मिळविण्याची चांगली संधि असे. तत्कालीं चालू असलेल्या कांही रुपयांचीं नांवें खाली दिलीं आहेत.

१ अर्काटगंजी
२ इटावे
३ हालींशिक्का
४ जमखंडी
५ फुलचरी हैदरी
६ पटणी
७ हातणी
८ काशींशिक्का
९ मिटे
१० दौलताबादी
११ मल्हारशाही
१२ भिलवडा
१३ चिकोडी
१४ दिल्लींशिक्का
१५ पैठणी
१६ तळेगांवचे
१७ शिवराई
१८ बेलापुरी
१९ चांदवड
२० बुऱ्याचे
२१ गेरसाल
२२ मलकापुरी
२३ उदेपुरी
२४ हुकेरी
२५ निळकंठी
२६ पन्हाळी
२७ कितुरशहापुरी
२८ गडपाडी
२९ भूतपाडी
३० निजामशाही
३१ बागचलनी
३२ हुकुमचलनी
३३ शेटचलनी
३४ समशेरी
३५ चांभारगोंदी
३६ बऱ्हाणपुरी
३७ वाफगांवी
३८ जरीपटका
३९ कुलाची
४० चिकोडी
४१ अंकुशी
४२ रुई
४३ मोसे
४४ कुमठे
४५ अमदाबाद
४६ अकाशाही
४७ बाबाशाही
४८ बागलकोटी
४९ सम्बरू
५० बडोदे
५१ भूनगर
५२ बिलासपूर
५३ खंबायती
५४ कचाणी
५५ चंदेरी
५६ चोंकुलिया
५७ चनविसाणी
५८ धेराणाजीखान
५९ धोलकी
६० डफशाही
६१ फिसरु
६२ हलकुरी
६३ कोरा
६४ कुभांडी
६५ कुशारी
६६ लारकन
६७ मामाशाही
६८ मनोरी
६९ मुल्लाशाही
७० नादरी
७१ नागपूर
७२ पकंमी

| | | |
|---|---|---|
| ७३ शाहापुरी | ७९ तांबशाही | ८५ वाईशिक्का |
| ७४ शाहजादी | ८० तांब्या | ८६ वाडीपीरखानी |
| ७५ शिकारपूर | ८१ तालता | ८७ वाळकरशाही |
| ७६ सोलापूर | ८२ टेंभुरणी | ८८ यशोवोली |
| ७७ सुनामुल्ला | ८३ तुकाशाही | ८९ कहारी |
| ७८ सयाशाही | ८४ वल्लभशाही | ९० लारी |

ह्याप्रमाणे निरनिराळीं चलनें चालत असत. नांवावरून कोठे नाणें चालत असे हें बहुतेक समजण्यासारखें आहे. कशाणी, हैद्राबाद, तांब्या वगैरे रुपये सिंधप्रांतांत चालत.

एका जुन्या इंग्रजी प्रवाशाने कराचीस चालू असलेल्या नाण्यांचें कोष्टक खाली लिहिल्याप्रमाणे दिलें आहे.

| | | |
|---|---|---|
| ४ कशीर | = | १ दोडका |
| २ दोडके | = | १ तंग |
| २॥ तंग | = | १ कशाणी रुपया |
| ५॥ कशाणी रु. | = | १ पुतळी |

कशाणी रुपया ११ माशांचा असे.

कांही निरनिराळ्या रुपयांच्या बट्टयाचा भाव वर उल्लेख केलेल्या वहींत आढळला तो असा.

| | | |
|---|---|---|
| १०० इटावे | = | ९६॥। अटीचे रोकडे (दर ३। प्रमाणे) |
| १०० अर्काटगंजी | = | ९९॥ अटीचे रोकडे (दर ·॥· प्रमाणे) |
| ४१० इटावे | = | ४०० अ. गंजी (दर २॥ प्रमाणे) |
| ६८० हालीशिक्का | = | ६८५ अ. गंजी (दर ·॥।· प्रमाणे) |
| १०० इटावे | = | १०१॥= दौलताबादी |
| १०० दौलताबादी | = | ९४॥ अ. रोकडे |
| २५ चिकोडी | = | २३॥ अ. रोकडे |

नेपाळांत रुप्याच्या नाण्यास मोहोर म्हणतात व तें आपल्या अर्ध्या रुपयाइतकें असतें.

दक्षिण महाराष्ट्रांत फानम नांवाचीं सोन्याचीं नाणीं चालत असत. फानम–फनम् हा पण (पणम्) शब्दाचा अपभ्रंश होय. ह्याच्या दोन जाती गड्डी व गोपाळी प्रसिद्ध आहेत, हीं नाणीं सुमारे ५।। पासून ६ ग्रेन वजनाचीं असत. तसेंच दक्षिण हिंदुस्थानांत क्याश नांवाचें नाणें चाले. ८० कयाश म्हणजे १ फणम, ४२ फणम म्हणजे १ पगोडा. पगोड्याची किंमत सुमारे ३।। रुपये असे. नाण्यांवर मनोऱ्यासारखी देवाळयाची आकृति असे. त्यावरून पोर्तुगीज लोकांनी त्या नाण्यास पगोडा हा शब्द लाविला. कांहीं ठिकाणीं १ फणाची किंमत ६४ कयाश दिली आहे. एक रुपया ४५६ कयाशांबरोबर होई.

शिवाजीच्या वेळेस देशाभिमानाची लाट जी महाराष्ट्रावर आली तिचा पगडा भाषेवरहि बसला. राजव्यवहारकोशांत कांही नाण्यांची परिभाषा येणेंप्रमाणे दिली आहे.

> द्रव्यं तु नक्तसंज्ञं स्यात् । वराटो होन उच्यते ॥
> तदर्धं तु प्रतापः स्यात् । माषयोरुभयोरपि ॥
> वराटपादो धरणः । चवलस्त्वष्टमांशकः ॥
> दुधलः षोडशांशः स्यात् । मोहरा तु बुधैः स्मृतम् ॥
> सुवर्णनिष्कं, रजत-निष्कं स्यात् रुपयाभिधम् ॥
> वाच्या रजवर्ती तु लाहरी फलमः पणः ॥

# रुपया शिरशाहानेच सुरू केला काय?

" प्राक्कालीन अधातुरूप विनिमयसामान्यें " ह्या लेखांत धातुविरहित दुसऱ्या कित्येक पदार्थांचा—सुया, नौका, वस्त्रें, पशु इत्यादि उपयोग पैशाच्या कामीं प्राचीन हिंदुस्थानांत करीत असत हें दाखविलें आहे. तेथे आणखीहि असें सिद्ध केलें आहे की, ह्या कामीं मानवजातसुद्धा वगळली गेली नव्हती. द्वाभ्यां पुरुषाभ्यां क्रीता द्विपुरुषा, त्रिभिः पुरुषैः क्रीता त्रिपुरुषा म्हणजे दोन पुरुष व तीन पुरुष देऊन विकत घेतलेली, ह्या काशिकेंतील उदाहरणांवरून वरील विधान केलें होतें. ह्याच्यावर एक असा आक्षेप घेतां येईल की, हल्ली राजाच्या आकृतीवरून सोन्याच्या नाण्यास इंग्रजींत जसें साव्हरीन म्हणतात, त्याचप्रमाणे पुरुष हा नाणकविशेषवाची शब्द नसेल कशावरून? ह्यास उत्तर इतकेंच की प्राचीन नाण्यांवर राजाचा मुखवटा काढण्याची पद्धति नसे. आपली आकृति नाण्यांवर उठवण्याची कल्पना ऐहिकसुखेच्छु पाश्चात्यांचीच आहे. तेव्हा द्वि-त्रिपुरुष ह्या प्रयोगावरून मानवी पैशाचाच अंगीकार करणें भाग आहे. मनुष्यरूपी मूल्याने फार प्राचीनकाळीं क्रयविक्रयादि व्यवहार होत असावेत असें अनुमान करण्यास प्राचीन ग्रंथांत निर्दिष्ट केलेल्या आख्यायिकांवरून जागा आहे. यज्ञांत सोमवल्ली विकत घेण्यास एक वर्षाची कालवड द्यावी लागते. ह्याचें मूळ ऐतरेय ब्राह्मणांत येणेंप्रमाणे दिलें आहे:—

सोमो वै राजा गन्धर्वेष्वासीत्तं देवाश्च ऋषयश्चाभ्यध्यायन्कथमयमस्मान्सोमो राजाऽऽगच्छेदिति सा वागब्रवीत्स्त्रीकामा वै गन्धर्वा मयैव स्त्रिया भूतया पणध्वमिति नेति देवा अब्रुवन्कथं वयं त्वदृते स्यामेति साऽब्रवीत्क्रीणीतैव यर्हि वाव वो मयाऽर्थो भविता तर्ह्येव वोऽहं पुनरागन्तास्मीति तथेति तया महानग्न्या भूतया सोमं राजानमक्रीणन्.

ह्या आख्यायिकेंत सांगितल्याप्रमाणे वाग्देवीला मूल्य म्हणून देऊन देवांनी गन्धर्वांपासून सोमवल्ली विकत घेतली. ह्या आख्यायिकेला झगझगीत दिलेलें रूप काढून घेतलें तर मुळाशीं प्राचीन काळीं लहान मुलगी देऊन सोम विकत घेत असत असें मानण्यास हरकत नाही. वाग्देवी अल्पवयस्क नसूनहि तिने मुद्दाम नग्निकेचें रूप धारण केलें ह्यावरून अल्पवयस्क बालिकांची पैशाच्या कामीं योजना होत असे असें दिसतें. ह्यांत जर खरोखर क्रयविक्रयाचा संबंध नसता व सोम मिळविण्यासाठी देवांनी स्त्रीकाम-गन्धर्वांना एक स्त्री दिली इतकाच प्रकार असता तर वाग्देवीने नग्निकेचें रूप धारण करण्याचें प्रयोजन नव्हतें. अशा कामीं एक वर्षांच्या नग्निकेपेक्षा युवतिच जास्त ग्राह्य झाली असती. सारांश, विनिमयसामान्य ( medium of exchange ) म्हणून मनुष्यजातीचा उपयोग फार प्राचीन काळीं आर्यावर्तांत होत असे हें अनुमान बलवत्तर होतें.

पुढे ही चाल जेव्हा बंद पडली तेव्हा स्त्रीच्या ऐवजी एक वर्षांच्या कालवडीची योजना होऊं लागली.

सोमक्रय फक्त एक कालवड देऊन करावयाचा नसून पुष्कळ द्रव्यांच्या साधनाने करावयाचा असतो. सोम खरेदी करण्यास कालवड, अज, हिरण्य, वस्त्र इत्यादि द्रव्यें विहित आहेत. म्हणजे ह्यांपैकी कोणत्या तरी एका द्रव्याने सोम खरेदी करावयाचा नसून सर्व द्रव्यें मिळून खरेदी करावयाचा असतो. ह्या पद्धतीवरूनहि फार प्राचीन काळीं अदलाबदलीचा व्यवहार—म्हणजे विनिमयसामान्य—लोकांस माहित नव्हतें त्या वेळचा व्यवहार कसा करावा लागे ह्याची कल्पना होईल. अदलाबदलीच्या व्यवहारांत आपणांस जरूर असलेला पदार्थ ज्याच्यापाशीं असेल तो कोणता दुसरा पदार्थ घेऊन देण्यास तयार होईल ह्याची अटकळ प्रथमतः करतां येत नाही. म्हणून आपल्याबरोबर बऱ्याचशा जिनसा घ्याव्या लागतात. अशाच हेतूने सोमक्रय दहा द्रव्यांनी करण्याचें विधान पूर्वमीमांसेंत केलेलें आढळतें. “ बहुभिर्द्रव्यैर्विक्रेतुरानतेः [ आनुकूल्यस्य ] सोलभ्यादशभिः क्रीणातीति

संख्योक्तेश्च समुच्चयः" ह्या भाष्यांत हा हेतु स्पष्ट रीतीने सांगितला आहे. ह्याप्रमाणे सोमक्रयासंबंधी आख्यायिकेवरून विनिमयसामान्याच्या पूर्व-कालीन अदलाबदलीच्या व्यवहाराचें व विनिमयसामान्याच्या प्रचारानंतर विनिमयसामान्याचें स्वरूप समजण्यास चांगली मदत होते.

पुढे "धातुरूप विनिमयसामान्यें" ह्या निबंधांत मुख्यत्वेंकरून मनुस्मृति व अमरकोश हे दोन ग्रन्थ ज्या काळांत लिहिले गेले त्या काळा-पर्यंत आर्य लोकांची स्वतन्त्र नाणकपद्धति नव्हती हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. ही गोष्ट विशेष रीतीने ध्यानांत ठेवण्याचें कारण हें की, त्याच्या उलट म्हणजे ऋग्वेदकाली व पाणिनीच्या वेळीं नाणीं प्रचा-रांत होतीं असें कित्येकांचें मत आहे. परंतु हें मत मागील निबंधांत जें प्रतिपादन केलें आहे त्यावरून निराधार असावें असें वाटतें. ऋग्वेदांत शुल्क शब्द आहे खरा; पण तें नाणेंच होतें असें मानण्यास कांहीच पुरावा नाही. त्याचप्रमाणे पाणिनीच्या अष्टाध्यायींत निष्क, पण, इत्यादि जे शब्द आले आहेत, तेहि ठरीव वजनाच्या धातूच्या तुकड्याचे वाचक समजले पाहिजेत. एतच्छब्दनिर्दिष्ट जे धातूचे तुकडे त्यांमध्ये व नाण्यांत थोडा फरक आहे. ठरीव वजनाच्या व कसाच्या धातूच्या तुकड्यांवर राजमुद्रा बसली की त्यांची गणना नाण्यांत होऊं लागते. तोंपर्यंत नुसत्या अमुद्रित धातूस नाणें म्हणतां येत नाही. विज्ञानेश्वरांनी नाण्याची व्याख्या अशीच केली आहे. "मुद्रादिचिन्हितं राजनामाङ्कादिना लक्षितं नाणकं" म्हणजे ज्याच्यावर शिक्का मारला आहे, राजचिन्ह अगर राजाचें नांव ज्यावर उठविलें आहे त्यास नाणें ही संज्ञा आहे. अर्वाचीन पाश्चात्य अर्थशास्त्र-वेत्त्यांनी केलेली व्याख्या संस्कृतामध्ये ह्या शब्दाचें जें वर निर्दिष्ट केलेलें लक्षण दिलें आहे त्याहून फारशी भिन्न नाही. पृष्ठभागावर मारलेल्या शिक्क्यावरून ज्या धातूच्या तुकड्याच्या वजनाची उपलब्धि होते, अशा तुकड्यास नाणें म्हणतात अशी जीव्हॅन्स साहेबांची व्याख्या आहे. ह्या दोन लक्षणांत थोडा फरक आहे. इंग्रजी व्याख्येप्रमाणे नाणें धातुमयच

असावें लागतें. परंतु संस्कृतांतील नाणक हा शब्द शिक्का मारलेल्या कोण-त्याहि द्रव्यभूत पदार्थाला लावतां येईल. तथापि बिनछापाच्या धातूच्या तुकड्यास नाणें म्हणतां यावयाचें नाही हें कोणतेंहि लक्षण घेतलें तरी सिद्ध होतें. तेव्हा असे छाप मारलेले धातूचे तुकडे पाणिनीच्या वेळेस जर प्रचारांत असते तर संस्कृत कोशांत नाणकवाची शब्द अवश्य आढळावयास पाहिजे होता. बिनशिक्क्याच्या सुवर्णांने किंवा रजतानेच पूर्वी व्यवहार होत असल्याकारणाने "सुवर्णं देवेभ्यः" "रजतं पितृभ्यः" असे प्रयोग संस्कृतांत वापरलेले आढळतात. तेव्हा ऋग्वेदकाळीं अगर रामायणभारताच्या वेळीं देखील शिक्का मारलेल्या धातूचा उपयोग होत होता असें मानण्यास सबळ प्रमाण नाही. महाभारतांत निष्क शब्द जागोजागीं आला आहे हें खरें. उदाहरण, "वाचयित्वा द्विजश्रेष्ठान्गोभिर्निष्कैश्च भूरिशः' (सैन्यनि-र्याणपर्व. अ. १५७). ह्याच्याहि पूर्वीच्या ग्रंथांत म्हणजे छान्दोग्योप-निषदांत निष्क शब्द आलेला आहे. उदाहरण, 'तदु ह जानश्रुतिः पौत्रायणः षट्शतानि गवां निष्कमश्वतरीरथं तदादाय प्रतिचक्रमे। तं हाभ्युवाद." ह्या महाभारतांतील व उपनिषदांतील निष्क शब्दाचा अर्थ काय कराव-याचा हाच प्रश्न आहे. त्याचें उत्तर मागील निबंधांत मनूचें जें कोष्टक दिलें आहे त्यावरून समजून येणारें आहे. म्हणून वेदकालीं व पश्चात् हिंदुस्थानांत नाणीं प्रचारांत असत हें विधान जें कित्येक नामांकित विद्वा-नांनी केलें आहे तें भ्रममूलक दिसतें.

ता. २५ सप्टेंबर सन १९०४ च्या ज्ञानप्रकाशांत "आमच्या रा-याचा थोडासा इतिहास" या मथळ्याखाली प्रथमतःच पुढे लिहिल्या-प्रमाणे मजकूर आहे. "आमच्या देशामध्ये नाणें फार प्राचीनकाळापासून चालू आहे. वेदकाळीं आमच्या देशांत नाणें चालू होतें. त्याला प्रत्यंतर पुष्कळ ठिकाणीं पहावयास सापडतें. महाभारतांत आमच्या देशांत नाणें चालू होतें यास आधार सापडतो. मनुस्मृतींत नाण्याचा पुष्कळ ठिकाणीं स्पष्ट उल्लेख आहे. 'रूप्' धातूचा अर्थ ठोकणें ह्यावरून रुपया असा पाणि-

नीच्या ग्रंथांत नाण्याचा शब्द आढळतो. सारांश, वेदकालीं व महाभारताच्या वेळीं व पाणिनिसूत्रांच्या समयीं आमच्या देशांत नाणें चालू होतें ह्याबद्दल बिलकूल शंका राहात नाही. मुसलमानांच्या पूर्वी रुपया हें नाणें आमच्या देशांत चालू होतें ही निर्विवाद गोष्ट आहे."

ह्या वरील उताऱ्यांत जीं विधानें केलीं आहेत त्यांच्या पुष्ट्यर्थ कांही आधार दिले असते तर बरें होतें. वेदकालीं जर ह्या देशांत नाणें चालू होतें तर नाणक हा शब्द परकी भाषेतून घेण्याची अवश्यकता कां पडली? अमरकोशांत नाणक हा शब्द कां आढळत नाही? ह्या प्रश्नांचीं उत्तरें देणें कठीण आहे. मुसलमानांच्या पूर्वी रुपया होता हें विधान मात्र खरें असावेसें वाटतें. डी कुन्हा साहेबांच्या निबंधांतील उतारा देऊन तो हेमकोशाशीं विरुद्ध आहे हें आम्हीं मागील निबंधांत दाखविलें आहे. डी कुन्हांनी रुपया शिरशहाने सुरू केला ही माहिती बहुधा ऐनी अकबरीवरून दिली असावी असें वाटतें. फ्रॅन्सिस ग्लडविन साहेबांनी मुळांतील एतद्विषयक भागाचें भाषांतर येणेंप्रमाणे केलें आहे.

Rupee is a silver coin of a round form, in weight 11¼ māshās. It was first *introduced* in the time of Sheerkhan and under the present reign, it has been revived and made more pure."

रुपया हें वाटोळ्या आकाराचें रूप्याचें नाणें असून त्याचें वजन ११¾ मासे आहे. रुपया प्रथम शिरखानाच्या वेळीं सुरू झाला. ह्या कारकीर्दीत ... हें भाषांतर बरोबर आहे किंवा नाही हें सध्या सांगतां येत नाही.

हौवर्थ साहेबांनी आपल्या "वसाहतींतील नाणीं व उपनाणीं" ह्या पुस्तकांत उत्तर हिंदुस्थानांत मुसलमान राजांच्या कारकीर्दीत रुपयाची चलनपद्धति सुरू झाली असें म्हटलें आहे. The coinage with the rupee as standard had its origin in the Mahomedan dynasties of Northern India ( Colonial Coins and Tokens by Howworth. )

सदरहूप्रमाणे टाइम्स ऑफ् इंडिया पत्रांत ( अंक ता. १४ आक्टोबर १९०१), जे. जी. सी. ह्या नांवाने सही करणाऱ्या गृहस्थांनी रुपयाच्या सुरवातीसंबंधाने खालील मजकूर लिहिला आहे. Shirshaha the Afgan rival of Humayun ( circa. 1540 A. D. ) marks an important era in Indian Numismatics. Not only did he invent the rupee, but he put away from it the debased mixtures of silver and alloy which under the Pathan sultans had done duty as coins and contented himself with issues of simple metals containing but the necessary minimum of alloy. Shirshaha's rupee, as we have seen, was a glorified Tank of the white or silver variety. "

ह्याचा मथितार्थ इतकाच आहे की, शिरशहाने रुपया हा शब्द नवीन बनवून तो पूर्वीच्या टंक नाण्याला लाविला, व त्यांतील हिणकसपणाहि फार कमी केला.

हे साहेब लोकांचे तर्क वस्तुस्थितीस धरून नाहीत हें मागील निबंधांवरून स्पष्ट दिसेल. "रूप" किंवा "रूपक" शब्द हेमकोशांत आहे, ह्यावरून रुपया हा शब्द व तन्निर्दिष्ट नाणेंहि बरेंच जुनें असलें पाहिजे असें अनुमान तेथे काढलें होतें. पण हा "रूपक" शब्द कोणत्याहि नाण्याचा वाचक आहे अथवा त्याने एखादें विशिष्ट नाणें निर्दिष्ट केलें जातें ह्याचा स्पष्ट खुलासा झाला नव्हता. "रूपक" शब्दाचा अर्थ रुप्याचें विशिष्ट नाणें असा जर होईल तर शिरशहाने रुपया हा शब्द नवीन बनविला ह्या म्हणण्यांत कांही अर्थ राहणार नाही. ह्या शब्दाचा अर्थ ठरविण्यास "भाग" व अर्घ" ह्या शब्दाची फार मदत होणार आहे. "भागशब्दो रूपकस्यार्धे रूढः" "अर्धशब्दो रूपकस्यार्धे रूढः" हीं उदाहरणें कौमुदींतच नाहीत तर काशिकेमध्येहि दिलेलीं आढळतात. "भक्तिवीच्योर्भागो रूपार्धके माम्यैकदेशयोः" हा अनेकार्थसंग्रहांतील उतारा आहे. आता 'भाग' व 'अर्ध' शब्दांनी कोणत्याहि नाण्याचा अर्धा भाग घ्यावयाचा

किंवा "रुपया" ह्या विशिष्ट नाण्याचा अर्धा भाग घ्यावयाचा हें पहावयाचें आहे. ह्याचा उलगडा महाभाष्यावरून बराच होण्यासारखा आहे. अर्ध्या कार्षापणाला 'अर्ध' शब्द लावीत असें त्यावरून स्पष्ट होतें. उदाहरणार्थ, "अर्धिकः" "आर्धिकी" "कार्षापणार्धा"(कैयट) भाष्य-टीका "अर्धशब्दः कार्षापणस्यार्धे रूढः". आता 'कार्षापण' हा नाण्याला प्रतिशब्द नसून तें एक विशिष्ट रुप्याचें नाणें होतें ह्याबद्दल कोणाला शंका येण्याचें कारण नाही. म्हणून 'अर्ध' शब्दाने विशिष्ट नाणें घेणें भाग आहे. 'अर्ध' शब्दाने विशिष्ट नाण्याचा जर बोध होत नसेल तर "आर्धिकः" "अर्धिकी" असे प्रयोग होणेंच शक्य नाही. "अर्धशब्दः कार्षापण-स्यार्धे रूढः इति भागवदपेक्षायामसामर्थ्यं नाशंकनीयम्". अर्ध शब्दानें कशाचा अर्ध ही अपेक्षा रहात नाही. म्हणूनच अर्धिकः आर्धिकी हे प्रयोग होण्यास हरकत नाही. सारांश, अर्ध शब्द पूर्वी अर्ध्या कार्षापणाला लावीत. पुढे कार्षापणाची जागा रुपयाने पटकावल्यावर तो अर्ध्या रुपयास लावूं लागले हें निर्विवाद आहे. व ज्याअर्थी अर्ध शब्द कार्षापणार्धाच्या ठिकाणीं रूढ आहे म्हणून भाष्यांत सांगितलें आहे व तो रूपकार्धाच्या ठिकाणीं रूढ म्हणून काशिकेंत व कौमुदींत म्हटलें आहे, त्याअर्थी कार्षापण व रूपक हे दोन शब्द एकाच नाण्याचे वाचक असले पाहिजेत.

सांप्रतहि आपण अधेली हा शब्द अर्ध्या रुपयाच्या ऐवजी वापरतों. व अधेली हा आर्धिकी ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे हें उघड आहे. तात्पर्य, "रूपक" हा शब्द आरंभीं जरी निवळ नाणकवाची असला, तरी तो पुढे पुढे नाणकविशेषवाची झाला ह्यांत संदेह नाही.

रा. राजवाडे ह्यांनी ग्रन्थमालेच्या १३५ व्या अंकांत मिरजेच्या किल्ल्याचा एक ताम्रपट प्रसिद्ध केला आहे. ह्या ताम्रपटांत रुपया हा शब्द वापरलेला आहे. "दीड चावर इनाम दीले मेली मोसा दिल्हा चैन व मेली उलाहीलाची जवसी दील्हा खण त्याचे नावे तुफ्या वारकीसहीत मैत्रीवर एक कोशाळू लुगडे आरवीनाचे मंत्रीवर सात रुपये चावडीवर

तर पुनीद घरीवर पखोली रुपये ११ मगजुलावर शोळी रुपये जमीन दावर एक." हा ताम्रपट शके १४११ म्हणजे इ. स. १४८९ तला आहे. शिरवहाची कारकीर्द ह्याच्यानंतरची आहे. हा ताम्रपट जर खरा असेल व त्याच्या तारखेविषयी कांही शंका नसेल तर शिरशहाच्या पूर्वीपासून रूपकच नव्हे तर रुपया हा शब्दहि महाराष्ट्रांत प्रसिद्ध होता हें उघड आहे. ह्या ताम्रपटाच्या खरेपणाविषयी जर कांही शंका नसेल तर ह्या वादाचा निकाल निश्चितपणें कायमचा लागला असें म्हणण्यास हरकत नाही.

---

## परतहुंड्या ( रिव्हर्स कौन्सिल बिल्स )

### व हिंदुस्थानच्या चलनपद्धतीचें सामान्य स्वरूप.

रिव्हर्स कौन्सिल बिलाविषयी अलीकडे इंग्रजी वर्तमानपत्रांतून व मासिकांतून जोराची चर्चा चाललेली आढळते. तीवरून इंग्रेजी जाणणाऱ्यांना या विषयाची थोडी तरी कल्पना करितां येण्यासारखी आहे. परंतु निव्वळ मराठी वाचकांना या इंग्रजी चर्चेचा कांहीहि उपयोग होत नाही. म्हणून त्यांच्याकरिताच हा लेख मुख्यतः लिहिण्यांत आला आहे. शिवाय आर्थिक विषयाचें ज्ञान समाजांतील बोटानें मोजतां येतील इतक्याच लोकांना असावें व बाकीच्यांत तद्विषयक गाढ अज्ञान असावें, ही स्थिति समाजाला अनिष्ट आहे. आर्थिक विषय इतके भानगडीचे असतात की, तज्ज्ञांत सुद्धां तत्संबंधी एकमत क्वचितच असतें. तेव्हां सामान्यजनांना कोणतेहि निर्वात सिद्धांत बांधतां येतील असें नाही. तथापि या विषयाचें स्वरूप व त्यांतील ठळक गोष्टी यांची माहिती प्रत्येकास असणें शक्य आहे व अवश्यहि आहे.

'रिव्हर्स कौन्सिल बिल' म्हणजे काय हें समजण्यापूर्वी 'कौन्सिल बिल' म्हणजे काय हें समजलें पाहिजे. इंग्लंडमध्ये सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणून जो अधिकारी असतो त्यास सल्लागार मंडळ दिलेलें आहे. या मंडळाला इंग्रजींत 'कौन्सिल' असें म्हणतात. या कौन्सिलने काढलेलीं जीं बिलें त्यांस कौन्सिलबिलें म्हणतात. बिल म्हणजे हुंडी. 'कौन्सिल बिल' म्हणजे थोडक्यांत, 'सरकारी हुंडी' असें म्हणतां येईल. हुंडी म्हणजे तिसऱ्या माणसास अमुक रुपये देण्याबद्दल एका माणसाने दुसऱ्या इसमास लिहिलेलें पत्र; अर्थात् हुंडी म्हटली म्हणजे तेथे तीन माणसांचा संबंध येतो. पत्र देणारा, ज्याच्या नांवाने पत्र दिलें असेल तो, व ज्याला पैसे द्यावयाचे असतील तो. सरकारी हुंड्यांत स्टेट सेक्रेटरी हा हिंदुस्थान-सरकारावर हुंड्या काढितो; म्हणजे स्टेट सेक्रेटरी हिंदुस्थानसरकारास असें लिहितो की, तुम्ही अमुक इसमास अमुक रुपये द्या. तेव्हा स्टेट सेक्रेटरी व हिंदुस्थानसरकार या दोन व्यक्ति सरकारी हुंड्यांच्या संबंधानें कायम असतात. तिसरी व्यक्ति म्हणजे व्यापारी वर्ग होय.

हुंड्याच्या योगाने देवघेवीचा व्यवहार फार सोइस्कर होतो. व्यवहार अर्थात् नाना प्रकारचे असल्यामुळे हुंड्या काढण्याचीं कारणेंहि अनेक असतात. 'अ'ला 'ब' चे रु. १०० देणें आहे. अजवळ पैसे नाहीत; पण त्याचे पैसे 'क'जवळ आहेत, अगर 'क'जवळ त्याची पत आहे; तेव्हा तो 'ब'ला 'क' वर रु. १०० ची हुंडी देतो. 'ब' हा हुंडी 'अ' जवळून घेऊन ककडे हजर करितो आणि त्याच्याकडून रुपये १०० घेतो. अशा रीतीने ब 'च्या' देण्याची अ फेड करितो. हा झाला एक प्रकार. दुसरा प्रकार असा की, अ आणि ब हे दोघे व्यापारी आहेत. दोघांची देवघेव असून एकमेकांचे पैसे एकमेकांकडे आहेत. 'क' हा अचे रु. १०० देणें आहे. हे 'अ' चे रुपये कच्या मनांत देऊन टाकावयाचे आहेत. अ दूर अंतरावर रहाणारा असल्यामुळे रुपये पाठविण्यांत खर्च होतो व रुपये वाटेंत गमावण्याचीहि भीति असते; म्हणून त्याच्या गांवचा जो ब त्याच्याकडे तो जातो आणि त्याच्या-

जवळ अकरिता १०० रुपयांची हुंडी मागतो; व ब हा व्यापारी असल्यामुळे हुंड्या विकण्याचा धंदा करितोच, म्हणून रुपये १०० शिवाय तो वर आणखी क जवळ हुंडणावळ मागतो. हुंडणावळ हा बचा नफा. या हुंडणावळीची कमाल मर्यादा कला अकडे रुपये १०० पाठविण्यास जो खर्च येईल तेथपर्यंत असते. कारण या खर्चापेक्षा जास्ती रकम 'ब' मागूं लागला तर 'क' प्रत्यक्ष रुपयेच 'अ' कडे पाठवील. या दोन उदाहरणांवरून व्यापारामध्ये हुंड्यांची अवश्यकता किती असते हें दिसून येईल.

आता आपण पुन्हा सरकारी हुंड्यांकडे वळूं. स्टेट सेक्रेटरी हुंड्या कां काढितो? त्याला पैसे पाहिजे असतात म्हणून. हे पैसे त्याला कां लागतात? त्याच्या स्वतःचा पगार ( आता हा पगार विलायतसरकार सोसतें ) त्याच्या कौन्सिलच्या सभासदांचा पगार वगैरे, यांकरिता त्यास पैशाची जरूर असते. आता हिंदुस्थानसरकारावरच ह्या हुंड्या कां काढावयाच्या? तर हा पगार देण्याची जबाबदारी हिंदुस्थानसरकारावर आहे म्हणून. शिवाय येथील सनदी साहेबनोकर विलायतेस रजेवर गेले असतां त्यांचा पगार त्यांस तेथेच द्यावा लागतो. तसेंच सनदी नोकर पेन्शन घेऊन परत गेले म्हणजे त्यांचें पेन्शन त्यांस इंग्लंडमध्ये दिलें जातें. त्याचप्रमाणे हिंदुस्थानसरकाराकरिता सरकारी ऑफिसांना वगैरे लागणारे जिन्नस स्टेट सेक्रेटरी विलायतेंतून खरेदी करून पाठवितो; त्याचे पैसे येथील सरकारने दिले पाहिजेत. तसेंच विलायतेंत हिंदुस्थानसरकारने काढलेल्या कर्जावरील व्याज दरवर्षास द्यावयाचें असतें. लष्करी लोकांचीं पेन्शनें व लष्करी इतर खर्च हाहि येथील सरकाराकरिता इंग्लंडमध्ये केला जातो. या सर्व रकमा स्टेट सेक्रेटरी देऊन टाकितो, म्हणून हिंदुस्थानसरकाराकडे त्यास पैशाची मागणी करावी लागते. या सगळ्या खर्चाला सामान्यतः "होम चार्जेस" असें इंग्रजींत म्हणतात. हे पैसे हिंदुस्थानसरकार रोख विलायतेस पाठवीत नाही; कारण तसें करणें त्रासाचें व खर्चाचें आहे. यास्तव स्टेट सेक्रेटरी हिंदुस्थानसरकारावर हुंड्या काढितो व त्या विलायतेंतील व्यापारी-मुत्सद्देंकरून एक्स्चेंज

बँका–विकत घेतात. अर्थात् विशेष त्रासाशिवाय स्टेट सेक्रेटरीला जागच्याजागीं पैसे मिळतात.

आता ह्या हुंड्या विकत घेणारे व्यापारी कोण? हिंदुस्थानांतून जो माल इंग्लंडला जातो त्याच्या किंमतीचे पैसे माल मागविणाऱ्या व्यापाऱ्यांस इकडे पाठवावयाचे असतात. हे लोक ह्या सरकारी हुंड्या विकत घेतात. कारण रोख पैसे पाठविण्यापेक्षा हुंड्या घेऊन पाठविणें त्यांस सोयीचें पडतें. सरकारी हुंड्या विकत घेऊन त्या हे विलायतचे व्यापारी ज्यांच्याकडून त्यांनी माल मागविला असेल त्यांच्याकडे हिंदुस्थानांत पाठवितात; मग हिंदुस्थानांतील व्यापारी त्या हुंड्या हिंदुस्थानसरकारावर लागू करितात. हुंडी पाहतांच येथील सरकार हुंडीचे पैसे येथील व्यापाऱ्यांस देतें. हे पैसे म्हणजे विलायतेंत हिंदुस्थानसरकाराकरिता खर्च केले जातात ते–हिंदुस्थानच्या तिजोरींतून दिले जातात. हिंदुस्थानसरकारच्या तिजोरींत पैसे कोठून येतात? अर्थात् हे पैसे येथील लोकांकडून करांच्या रूपाने सरकारी तिजोरींत आलेले असतात. यावरून वाचकांच्या एक गोष्ट ध्यानांत येईल की, हा सरकारी हुंड्यांचा प्रकार हिंदुस्थानच्या विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळे उत्पन्न झाला आहे. दुसऱ्या कोणत्याहि देशांत अशी स्थिति असण्याचें कारण नाही व ती नाहीहि. वसाहती व इंग्लंड यांच्यामधील जुजबी व्यवहार पेढ्यांच्या मार्फत होत असतात. म्हणजे एखाद्या वसाहतीला ब्रिटिशसरकारास पैसे पाठवावयाचे असले तर वसाहतसरकार तेथील बँकेचीं बिलें विकत घेऊन तीं इंग्लिशसरकाराकडे पाठवितें. हुंड्या विकण्याचें व विकत घेण्याचें काम पेढ्या करतात आणि पेढ्यांकडून व्यापारी व्यक्तिशः त्या विकत घेतात. प्रत्यक्ष व्यापाऱ्यांना स्टेट सेक्रेटरी सुद्धा हुंड्या विकीत नाही. स्टेट सेक्रेटरीची हुंड्या विकण्याची पद्धति पुढे सांगण्यांत येईल; पण येथे चाणाक्ष वाचकांच्या मनांत एक कल्पना येईल; तिचा जातां जातां उल्लेख केला पाहिजे. वसाहतसरकाराप्रमाणे हिंदुस्थानसरकारास कां करतां येऊं नये? येथील खाजगी पेढीवाले इंग्लंडच्या पेढीवाल्यांवर हुंड्या काढ-

तील त्या सरकारने विकत घ्याव्या; म्हणजे येथील पेढीवाल्यांकडे पैसे भरावे व त्यांच्या हुंड्या घेऊन त्या स्टेट सेक्रेटरीकडे पाठवाव्या; मग तो त्या तेथील व्यापाऱ्यांवर लागू करून अगर तेथील पेढ्यांना विकून आपले पैसे वसूल करून घेईल. असें करतां येण्यासारखें आहे हें खरें. पण हिंदुस्थानासंबंधाने अशी गोष्ट आहे की, येथील सरकारास पुष्कळ पैसे पाठवावयाचे असतात व येथे तितक्या पुरेशा हुंड्या मिळत नाहीत, का तें पुढे दिसून येईल. म्हणून स्टेट सेक्रेटरीने हुंड्या काढून त्यांचे पैसे येथे देणें हा एकच मार्ग शक्य असतो. दुसरें कारण, पूर्वी पेढ्या चांगल्या नव्हत्या त्या वेळेपासून ही पद्धति चालत आलेली आहे. १८६२ पासून दुसऱ्या मार्गाचें अवलंबन करण्याचें सोडून सरकारने हा मार्ग मुकरर केला. सरसकट मानाने पाहतां हिंदुस्थान सरकाराचा विलायती खर्च (Home charges) दोन कोटी पौंडांपर्यंत असतो. सन १८९९।१९०० सालापासूनच्या खर्चाचे आंकडे खाली दिले आहेत.

| | |
|---|---|
| १८९९–१९००–१६१२९००० | पौंड. |
| १९००–१९०१–१६९८२००० | ,, |
| १९०१–०२–१६८७७००० | ,, |
| १९०२–०३–१७६६७००० | ,, |
| १९०३–०४–१७३९९००० | ,, |
| १९०४–०५–१८८२७००० | ,, |
| १९०५–०६–१७६६६००० | ,, |
| १९०६–०७–१८३३३००० | ,, |
| १९०७–०८–१७७६८००० | ,, |
| १९०८–०९–१८३२३००० | ,, |
| १९०९–१०–१८४४१००० | ,, |
| १९१०–११–१८६०५००० | ,, |
| १९११–१२–१८८६५००० | ,, |

| | |
|---|---|
| १९१२-१३-१९३०२००० | पौंड |
| १९१३-१४-१९४५५००० | ,, |
| १९१४-१५-१९५२५००० | ,, |
| १९१५-१६-१९४०३००० | ,, |
| १९१७-१८-२४०००००० | ,, |

ह्या २४०००००० पौंडांत शें. ३९ रेल्वेखर्च, शें. २६ लष्करी वेतन, शें. २० व्याजाबद्दल व शें. ८ पेनशन वगैरे. बाकी इतर १९११-१२ च्या विलायती खर्चांचा तपशील येणेंप्रमाणेः—

| | पौंड. | | पौंड. |
|---|---|---|---|
| पेनशन–मुलकी | २०६३१०० | पेनशन–लष्करी | २४७१४०० |
| रजेवर असणारांचा पगार | ४२६५०० | कर्जावरील व्याज | २२८४७०० |
| रेल्वेकारिता काढलेल्या कर्जावरील व्याज | ५२६८६०० | विकत घेतलेल्या रेल्वेंचा वार्षिक हप्ता | ३६२३६०० |
| लष्करी वेतन (पेनशनखेरीज) | २२७७४०० | किरकोळ | ११३०२०० |

एकूण बेरीज १९५४५५००

युद्धापूर्वी सरकारी हुंड्या विकण्याची पद्धति खाली वर्णन केल्याप्रमाणे होती. ह्या हुंड्या दर बुधवारीं विकीत व त्याबद्दल बँक ऑफ इंग्लंडच्या ऑफिसांत आदले बुधवारीं नोटीस लावीत. ह्या नोटिशींत एकंदर किती पौंडांच्या हुंड्या विकावयाच्या तो आंकडा लिहीत. त्याचप्रमाणे कमींत कमी अमुक भाव आला पाहिजे असेंहि सर्व लोकांना कळविलें जात असे. ज्याची मागणी सर्वांत अधिक असेल ती पतकरण्यांत येई. ज्या लोकांच्या मागण्या कबूल होत त्यांस हिस्सेरशीने हुंड्या देण्यांत येत. १९१७ सालापासून स्टेट सेक्रेटरी हुंड्यांचा भाव आपणच ठरवितो. विकत घेणारांवर तो अवलंबून ठेवीत नाही. शिवाय स्टेट सेक्रेटरीच्या ऑफिसांत विशेष पत असलेल्या व्यापाऱ्यांची आणि पेढ्यांची यादी करून ठेवलेली असते, त्यांतील इसमांसच हुंड्या विकल्या जातात. कोणी किती रकमेच्या हुंड्या मागाव्या हेंहि नोटिशींत लिहिलें जातें. हल्ली हुंड्या विकण्याचा दिवस बुधवार नसून मंगळवार आहे. हा फरक हुंडणावळीचा भाव आपल्या कह्यांत आणण्याकरिता म्हणून केला आहे असें सांगण्यांत येतें.

हिंदुस्थानसरकारास विलायतेस दरसाल दीड ते दोन कोटी पौंड पाठवावे लागतात हें वर सांगितलेंच आहे. तेव्हा सरकारी हुंडया दोन कोटींपर्यंतच निघत असतील असा तर्क करणें स्वाभाविक आहे. व सन १८९३ पर्यंत अशीच वस्तुस्थिति होती. ह्या सालीं सरकारी टांकसळींतून चांदी देऊन रुपये पाडून घेण्याचा लोकांचा हक्क बंद करण्यांत आला. तेव्हापासून सरकारी हुंडयांमुळे व्यापारांत चलबिचल होऊं लागली आणि स्टेट सेक्रेटरीचें ऑफिस म्हणजे एक व्यापारी पेढी बनली. तथापि १९०२–३ सालापर्यंत खर्च व हुंडया ह्यांत फारशी तफावत नव्हती. पुढील कोष्टकावरून विलायती खर्च व सरकारी हुंडया ह्यांचें प्रमाण समजेलः—

| वर्ष | खर्च | हुंड्या |
|---|---|---|
| | पौंड | पौंड |
| १८९९–१९०० | १६१२९००० | १९०६७०२२ |
| १९००–१९०१ | १६९८२००० | १३३००२७७ |
| १९०१–१९०२ | १६८७७००० | १८५३९०७१ |
| १९०२–१९०३ | १७६६७००० | १८४९९९४७ |
| १९०३–१९०४ | १७३९९००० | २३८५९३०३ |
| १९०४–१९०५ | १८८२७००० | २४४२५५५८ |
| १९०५–१९०६ | १७६६६००० | ३१५६६९७२ |
| १९०६–१९०७ | १८३३३००० | ३३४३२१९६ |
| १९०७–१९०८ | १७८६८००० | १५३०७०६१ |
| १९०८–१९०९ | १८३२३००० | १३९१५४२६ |
| १९०९–१९१० | १८४४१००० | २७४१६५८६ |
| १९१०–१९११ | १८६०५००० | २६४६३३०३ |
| १९११–१९१२ | १८८६५००० | २७०५८५५० |
| १९१२–१९१३ | १९३०२००० | २५७५९७०६ |
| १९१३–१९१४ | १९४५५००० | ३११००८२७ |
| १९१४–१९१५ | १९५२५००० | ७७४८१११ |

सन १९१४-१५ साल लढाईचें असल्यामुळे हुंड्यांची संख्या कमी आहे. कारण हिंदुस्थानसरकारासच विलायतीसरकाराकरिता ह्या देशांत पुष्कळ खर्च करावा लागला. परंतु बाकीच्या सालीं खर्चापेक्षा स्टेट सेक्रेटरीने हुंड्या पुष्कळ जास्त काढल्या, त्या कां व कशा? प्रथमतः हुंड्या घेण्यास लोक तयार असतात म्हणून सरकारी हुंड्या बाजारांत खपतात, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हुंड्या कां खपतात? तर विलायतच्या लोकांना ह्या देशांत पैसे पाठवावयाचे असतात म्हणून. पैसे कां पाठवावे लागतात? तर इकडून नेलेल्या मालाची किंमत द्यावयाची असते म्हणून. म्हणजे हिंदुस्थानांतून जो माल जातो तो आयात मालापेक्षा नेहमी अधिक असतो. आमच्याकरिता विलायतेंत होणारा खर्च जाऊनहि आमचें देणें राहातेंच. खालील कोष्टकावरून ही गोष्ट उघड दिसून येईल.

## आयात वजा जातां निव्वळ निर्गत :-

**१९१४ पर्यंत खालील सालांत संपणारी ५ वर्षांची सरासरी**
**( पौंडाचे आंकडे तेवढ्या हजारांचे आहेत असें समजावें. )**

| | | | |
|---|---|---|---|
| १८८३-८४ | २०७१४ | १९१३-१४ | ५२१७९ |
| १८८८-८९ | २००३९ | १९१४-१५ | २९१०८ |
| १८९३-९४ | २४७७३ | १९१५-१६ | ४३५९६ |
| १८९८-९९ | २५१०६ | १९१६-१७ | ६३६७७ |
| १९०३-०४ | ३०७२७ | १९१७-१८ | ६१४२० |
| १९०८-०९ | ३५६३९ | १९१८-१९ | ५६५५३ |

ह्यावरून हें उघड होतें की सरकारी हुंड्या जर अधिक काढल्या नाहीत तर विलायती व्यापाऱ्यांना हिंदुस्थानांत रोकड पाठवावी लागणार. सरकारी हुंड्या आहेत तरी सुद्धा कांही रोकड या देशांत यावी लागतेच. पण ह्या हुंड्यांच्या योगाने काय परिणाम होतो तो वाचकांच्या लक्षांत आला असेलच. हुंड्या विकल्यामुळे ह्या देशांत जें सोनें यावयाचें त्याऐवजी रुपयेच मिळतात. कारण हुंड्यांच्या विक्रीचें सोनें स्टेट सेक्रेटरीजवळ रहातें व येथे व्यापाऱ्यांस हिंदुस्थानसरकारकडून हुंडणावळीचा भाव असेल त्याप्रमाणे रुपये मिळतात. स्टेट सेक्रेटरीने आपल्या खर्चापुरतीं कौन्सिलबिलें काढण्याची वहिवाट फार पुरातन म्हणजे कंपनीसरकारपासून आहे. सन

१८६२-६३ सालाकरिता ह्या सरकारी हुंडया साडेसासष्ट लक्ष पौंडांच्याहि नव्हत्या. ( ह्या सालचा नक्की आंकडा ६६४१५७६ पौंड आहे ). त्या हल्ली सव्वा तीन कोटींपर्यंत आल्या आहेत. अर्थात् जास्त हुंडया काढण्यांत व्यापाऱ्यांची सोय आहेच, पण त्यांत सरकारचेहि विशिष्ट हेतु साध्य करावयाचे असतात. हे हेतु नीट समजण्याकरिता चलनाचा इतिहास समजणें जरूर आहे.

इंग्रजांच्या पूर्वी ह्या देशांत निरनिराळीं रुप्याचीं व सोन्याचीं नाणीं चालू होतीं. सध्या येथे एवढें सांगणें पुरेसें आहे की, कंपनीसरकारचें राज्य सुरू झाल्यावर त्यांनी सर्व हिंदुस्थानांत एक नाणें सुरू केलें. हें रुप्याचें नाणें होय. पूर्वी चालू असलेलें सोन्याचें नाणें कायदेशीर फेडीचें चलन म्हणून बंद झालें. हल्ली चालू असलेला रुपया सन १८३५ सालीं सुरू झाला, याचें वजन एक तोळा अगर १८० ग्रेन आहे. यांत १६५ ग्रेन शुद्ध चांदी असून १५ ग्रेन हिणकस धातू असते ( सन १८३५ चा ॲक्ट १७ ). सोन्याचें नाणें कायदेशीर फेडीचें चलन म्हणून जरी बंद केलें तरी तें व्यवहारांत कित्येक वर्षें चालू होतेंच व तें टांकसाळींतहि पाडीत असत. परंतु ही बाब विशेष महत्त्वाची नसल्यामुळे त्याविषयी जास्त लिहिण्याचें प्रयोजन नाही. या ठिकाणीं ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे, हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें चालू असतां तें बंद करण्यांत आलें. सन १८३५ सालीं यूरोपमध्ये रुप्याचेंच चलन पुष्कळ देशांत चालू होतें. रुपये पाडण्याचें काम सरकारने पतकरलें, पण लोकांनाहि चांदी देऊन सरकारी टांकसाळींतून रुपये पाडून घेण्याचा हक्क असे. हा हक्क १८९३ सालीं काढून घेण्यांत आला. म्हणून १८३५ ते १८९३ पर्यंतचा कालविभाग पाडणें सोईचें आहे. ह्या इतक्या अवधींत एकंदर ३३५,६१,००,००० रुपये टांकसाळींत पाडले गेले. एक तोळा चांदी आणून देई त्यास एक रुपया टांकसाळींतून मिळे. ह्याशिवाय रुपया पाडणावळ म्हणून कांहीं द्यावें लागे तें निराळें. ह्या कामांत सरकारास विशेष नफा होत नसे.

रुप्याच्या चलनाशिवाय १८६१ सालापासून सरकारने कागदी चलन सुरू केलें. त्याच्या अगोदर प्रेसिडेन्सी बँका नोटा काढीत असत. कागदी चलनामुळे विशेष फरक होण्यासारखा नव्हता. कारण जितक्या नोटा निघतील तितके रुपये अगर चांदी खजिन्यांत ठेवावी लागते. फक्त चार कोटी

रुपयांपर्यंत रोखे ठेवण्याची मोकळीक कायद्याने सरकारास ठेविली होती. या रोख्यांवरील व्याज हाच सरकारचा नफा. हा नफा सरकारी खजिन्यांत जमा होई. वीस वर्षांनी पुढे चार कोटींची इयत्ता सहा कोटींवर नेली. १८९१ सालीं सहा कोटींच्या ऐवजी आठ कोटींपर्यंत रोखे ठेवण्याचा अधिकार सरकारास कायद्याने मिळाला. कागदी चलन सुरू केल्यामुळे सुद्धा वरील नियमाप्रमाणे कोणत्याहि तऱ्हेची खळबळ उडण्याचें कारण नव्हतें. वरील कोष्टकावरून १८९३ पर्यंत हा व्यवहार किती सुरळीत चालला होता हें ध्यानांत येईल. जास्त नोटा काढल्या की तितकेच रुपये अगर चांदी अगर सोनें ठेवावें लागे.

| मार्चअखेर | चालू कागदी चलन | आंकडे लाखाचे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | चांदी | सोनें | | | कर्जरोखे | | |
| | | हिंदुस्थान | हिंदु. | इंग्लंड | एकंदर | हिंदुस्थान | इंग्लंड | एकंदर |
| १८६२ ते १८७१ सरासरी | ७६३ | ४८० | ३ | ० | ३ | २८० | ० | २८० |
| १८७२ ते १८८१ ” | ११८२ | ५९८ | ० | ० | ० | ५८४ | ० | ५८४ |
| १८८२ त १८९१ ” | १५७४ | ९६४ | ० | ० | ० | ६१० | ० | ६१० |

१८९२।९३ पर्यंत सर्व कांही सुयंत्र चाललें होतें. लोकांस किंवा सरकारास कुरकुर करण्यास कोठेच जागा नव्हती.

सन १८९३ पर्यंतच्या चलनाचा इतिहास वाचकांनी नीट लक्षांत ठेवावा म्हणजे पुढे जे फेरबदल करण्यांत आले त्यांचें महत्त्व समजेल. रुपयांची किंमत बहुतेक आंतील चांदीइतकी असे. लोकांस रुपयांची गरज लागली म्हणजे चांदी देऊन ते रुपये पाडून घेत. रुपये फाजील झाले तर वितळविण्यासहि हरकत नव्हती. पण ह्यानंतर चांदीचा भाव एकदम फार उतरला. कित्येकांच्या मतें चांदी उतरली असें म्हणण्यापेक्षा सोनेंच चढलें हें म्हणणें अधिक बरोबर. कांही कां असेना, सोन्यामध्ये चांदीचा भाव सांगावयाचा म्हणजे, चांदी उतरली असें म्हणण्यास हरकत नाही. १८७१ नंतर जर्मनी, डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे, हॉलंड, फ्रान्स, बेलजम, इटली,

स्वित्झरलंड इत्यादि राष्ट्रांनी चांदीचें मुख्य नाणें बंद करून सोन्याचें नाणें सुरू केलें. त्यामुळे सोन्याचा भाव वाढला. त्याचप्रमाणे सोन्यापेक्षा चांदीची उपजहि वाढत्या प्रमाणावर होती, हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल. कोष्टकांतील आंकडे दहा लाखांचे आहेत.

| वर्ष | सोनें | चांदी | वर्ष | सोनें | चांदी |
|---|---|---|---|---|---|
| | औंस | औंस | | औंस | औंस |
| १८३० पर्यंत | १२९ | ४३७४ | १८७५ | ५ | ६० |
| १८३१ ते ४० | .. | ११९ | १८७६ | ५ | ६८ |
| १८४१ ते ५० | १८ | २५१ | १८७७ | ६ | ६३ |
| १८५१ तें ५५ | ३२ | १४? | १८७८ | ६ | ७३ |
| १८५६ तें ६० | ३२ | १४५ | १८७९ | ५ | ७४ |
| १८६१ | ६ | ३५ | १८८० | ५ | ७५ |
| १८६२ | ६ | ३५ | १८८१ | ५ | ७९ |
| १८६३ | ६ | ३५ | १८८२ | ५ | ८६ |
| १८६४ | ६ | ३५ | १८८३ | ५ | ८९ |
| १८६५ | ६ | ३५ | १८८४ | ५ | ८२ |
| १८६६ | ६ | ४३ | १८८५ | ५ | ९२ |
| १८६७ | ६ | ४३ | १८८६ | ५ | ९३ |
| १८६८ | ६ | ४३ | १८८७ | ५ | ९६ |
| १८६९ | ६ | ४३ | १८८८ | ५ | १०९ |
| १८७० | ६ | ४३ | १८८९ | ६ | १२० |
| १८७१ | ६ | ६३ | १८९० | ६ | १२६ |
| १८७२ | ६ | ६३ | १८९१ | ६ | १३७ |
| १८७३ | ५ | ६३ | १८९२ | ७ | १५३ |
| १८७४ | ४ | ५५ | १८९३ | ८ | १६५ |

ह्या आंकड्यांवरून हें उघड दिसून येतें की, १८६१ सालापासून सोन्याची सर्व जगांतील निपज जवळ जवळ सारखीच असून चांदीची निपज मात्र चौपट झाली. चांदीचा भाव खालावल्यामुळे हिंदुस्थानसरकारची फारच तारंबळ उडाली. येथील सरकारास इंग्लंडमध्ये खर्च करावा लागतो, हें वर सांगितलेंच आहे. हा खर्च सोन्याच्या नाण्यांत असतो. कारण इंग्लंडमध्ये सोन्याचें नाणें असून ह्या देशांत रुप्याचें नाणें आहे. इंग्लंडमध्ये दरसाल

सुमारें दोन कोटी पौंडांचा हिंदुस्थानसरकारचा खर्च आहे. ह्या देशांत नाणें नाही. तेव्हा दोन कोटी पौंडांबद्दल रुपये किती द्यावयाचे हा प्रश्न. म्हणजे आपण १ रुपया दिला तर आपणांस किती पेन्स विकत मिळतील हें पाहून तितके रुपये द्यावे लागतील; अर्थात् इंग्लंडच्या बाजारांत सोन्याचा जो भाव असेल त्या मानाने रुपये द्यावे लागतील. आता सोनें महाग झालें, अगर चांदी स्वस्त झाली, तर आपणांस अधिक रुपये द्यावे लागतील हें उघड आहे. चांदी पुष्कळ झाल्यामुळे तिचा भाव उतरला हें वर सांगितलेंच आहे. तो किती उतरला हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

| मार्चअखेर संपणारें वर्ष | चांदीची १ औंसाची सरासरीची किंमत | एक रुपयाला मिळणाऱ्या पेन्साचें सरासरीनें प्रमाण |
|---|---|---|
| १८७२ | ६० १/२ पेन्स | २३·१२५ पेन्स |
| १८७३ | ६० ५/१६ ,, | २२·७५० ,, |
| १८७४ | ५९ १/४ ,, | २२·३५१ ,, |
| १८७५ | ५८ ५/१६ ,, | २२·२२१ ,, |
| १८७६ | ५६ ७/८ ,, | २१·६४५ ,, |
| १८७७ | ५२ ३/४ ,, | २०·४९१ ,, |
| १८७८ | ५४ १३/१६ ,, | २०·७९० ,, |
| १८७९ | ५२ ९/१६ ,, | १९·७६१ ,, |
| १८८० | ५१ १/४ ,, | १९·९६१ ,, |
| १८८१ | ५२ १/४ ,, | १९·८९६ ,, |
| १८८२ | ५१ १५/१६ ,, | १९·८९५ ,, |
| १८८३ | ५१ ५/८ ,, | १९·५२५ ,, |
| १८८४ | ५० ९/१६ ,, | १९·५३६ ,, |
| १८८५ | ५० ५/८ ,, | १९·०३८ ,, |
| १८८६ | ४८ ५/८ ,, | १८·२५४ ,, |
| १८८७ | ४५ ३/८ ,, | १७·४४१ ,, |
| १८८८ | ४४ ५/८ ,, | १६·८९९ ,, |
| १८८९ | ४२ ७/८ ,, | १६·३७९ ,, |
| १८९० | ४२ ११/१६ ,, | १६·५६६ ,, |
| १८९१ | ४७ ११/१६ ,, | १८·०८९ ,, |
| १८९२ | ४५ १/१६ ,, | १६·७३३ ,, |
| १८९३ | ३९ १३/१६ ,, | १४·९८४ ,, |

१८७२ सालीं एक रुपयास तेवीस पेन्स मिळत असत, तेथें १८९३ सालीं चौदा पेन्स मिळूं लागले. म्हणजे २३ पेन्स विकत घेण्याकरितां एक रुपयाच्या ऐवजी १८९३ सालीं जवळजवळ पावणे दोन रुपये देण्याचा प्रसंग आला. एका रुपयाला चोविस पेन्स मिळूं लागले तर एक पौंडाला आपणांस १० रुपये द्यावे लागतील म्हणून दोन कोटी पौंडांकरितां वीस कोटी रुपये येथून पाठवावे लागणार. पण एक रुपयास सोळा पेन्सच मिळूं लागले तर वीस कोटींच्या ऐवजी तीस कोटी रुपये हिंदुस्थानसरकारास विलायतेस पाठविणें भाग आहे. म्हणजे एकदम दहा कोटींची तफावत पडते; सरकारचीं अंदाजपत्रकें चुकतात; हिंदुस्थानसरकारचें जितकें उत्पन्न आहे त्याचा १/५ हिस्सा इंग्लंडमध्ये पाठवावा लागतो. शंभर कोटींच्या उत्पन्नांतून एक रुपयाला दोन शिलिंग हें प्रमाण असतां वीस कोटी द्यायचे. पण तोच भाव चढला—म्हणजे रुपयास सोळा पेन्स मिळूं लागले—म्हणजे तीस कोटी रुपये द्यावे लागतील. अर्थात् ८० कोटींतून अचानक दहा कोटी कमी झाले तर राज्यकारभाराला हरकत येईल हें निराळें सांगणें नको. चांदीचा बाजारभाव उतरला म्हणजे रुपयाची किंमतहि उतरते. उलट चांदी वाढली म्हणजे रुपयाची किंमतहि वाढते. एका रुपयांत १६५ ग्रेन शुद्ध चांदी असते, म्हणून रुपयाची किंमत ह्या चांदीवरच अवलंबून असते. बाकीच्या पंधरा ग्रेन हिणकस धातूला कोणी विचारीत नाही. शुद्ध चांदीच्या एका औंसाची बाजारांत अमुक किंमत असली म्हणजे रुपयांतील १६५ ग्रेन चांदीची किंमत अमुक असते हें पुढील कोष्टकावरून समजेल.

ठोकळ मानानें, रुपयाचा भाव एका पेन्सानें जरी कमी झाला तरी दहा लाख पौंडांचा बोजा हिंदुस्थानवर चढतो. यामुळे, अंदाजापेक्षा फारच जास्त रुपये पाठविण्याचा प्रसंग आला तेव्हां यास काय उपाय योजावे इकडेहि सरकारचें लक्ष लागलें. स्वस्त झालेले रुपये महाग करावयाचे ही गोष्ट तर निर्विवाद आहे; पण हें कोणत्या उपायानें करावयाचें हा मुख्य प्रश्न. तसेंच या देशांत रुप्याचें नाणें असल्यामुळे हा प्रसंग उद्भवतो; करितां या आपत्तीचें बीज जी ही चलनभिन्नता तेंच समूळ नाहींसें करणें हा दुसरा उपाय. ह्याशिवाय तिसरा उपाय म्हणजे हिंदुस्थानसरकारनें इंग्लंडमधील आपला खर्चच कमी करणें. इंग्लंडमध्ये कर्ज न काढतां ह्याच देशांत

| लंडन बाजारांतील शुद्ध चांदीची किंमत दर औंसास | त्याच दराने रुपयांतील १६५ ग्रेनांची किंमत | लंडन बाजारांतील शुद्ध चांदीची किंमत दर औंसास | त्याच दराने रुपयांतील १६५ ग्रेनांची किंमत |
|---|---|---|---|
| पेन्स | पेन्स | पेन्स | पेन्स |
| २० | ७·४३२ | ४३ | १५·९७९ |
| २१ | ७·८०४ | ४४ | १६·३५१ |
| २२ | ८·१७६ | ४५ | १६·७२३ |
| २३ | ८·५४७ | ४६ | १७·०९४ |
| २४ | ८·९१८ | ४७ | १७·४६६ |
| २५ | ९·२९१ | ४८ | १७·८३८ |
| २६ | ९·६६२ | ४९ | १८·२०९ |
| २७ | १०·०३४ | ५० | १८·५८१ |
| २८ | १०·०४६ | ५१ | १८·९५२ |
| २९ | १०·७७७ | ५२ | १९·३२४ |
| ३० | ११·१४९ | ५३ | १९·६९६ |
| ३१ | ११·५२० | ५४ | २०·०६७ |
| ३२ | ११·८९२ | ५५ | २०·४३९ |
| ३३ | १२·२६३ | ५६ | २०·८११ |
| ३४ | १२·६३५ | ५७ | २१·१८२ |
| ३५ | १३·००७ | ५८ | २१·५५४ |
| ३६ | १३·३७८ | ५९ | २१·९२५ |
| ३७ | १३·७५० | ६० | २२·२९७ |
| ३८ | १४·१२१ | ६१ | २२·६७१ |
| ३९ | १४·४९३ | ६२ | २३·०४१ |
| ४० | १४·८६५ | ६३ | २३·४१२ |
| ४१ | १५·२३६ | ६४ | २३·८७२ |
| ४२ | १५·६०८ | ६५ | २४·१५६ |

कर्ज काढलें म्हणजे दोन तीन कोटींची बचत होईल. सन १९१८ मार्च-अखेर विलायतेंत आजपर्यंत काढलेल्या कर्जाचा आंकडा १३,६५,००,००० पौंडाचा आहे. सन १८९९ सालापासून इंग्लंडमध्ये काढलेल्या कर्जांची कल्पना खालील कोष्टकावरून करितां येईल.

| वर्षे | कर्ज ( आंकडे हजाराचे ) |
|---|---|
| १८९९–१९०० | ६५०० पौंड |
| १९००–१९०१ | १४४२२ ,, |
| १९०१–१९०२ | ६००९ ,, |
| १९०२–१९०३ | ५००० ,, |
| १९०३–१९०४ | ३५०० ,, |
| १९०४–१९०५ | ३००० ,, |
| १९०५–१९०६ | १४४८० ,, |
| १९०६–१९०७ | २००० ,, |
| १९०७–१९०८ | १०७७७ ,, |
| १९०८–१९०९ | ११३४२ ,, |
| १९०९–१९१० | ६५०१९ ,, |
| १९१०–१९११ | ६३८०८ ,, |
| १९११–१९१२ | ७३५५ ,, |
| १९१२–१९१३ | ३००० ,, |
| १९१३–१९१४ | ३००० ,, |
| १९१४–१९१५ | १४७१५ ,, |

यावरून दिसून येईल की, वीस लक्ष पौंड अगर दोन तीन कोटी रुपयांकरिताहि हिंदुस्थानसरकारने विलायतेंत धांव मारली. १५० कोटी रुपये ज्या हिंदुस्थानने ब्रिटिशसरकारास बहाल केले त्यास वीस कोट रुपये कर्जाऊ देणें अशक्य नव्हतें.

हिंदुस्थानसरकारने एकंदर कर्ज केवें व इंग्लंडमध्ये किती काढलें तें पुढील कोष्टकावरून दिसेल :—

( आंकडे दशलक्ष पौंडांचे )

| वर्ष | विलायतेंतील कर्ज | हिंदुस्थानांतील कर्ज | एकंदर |
|---|---|---|---|
| १७९२ | ... | .... | ९ |
| १८२९ | ... | ... | ३० |
| १८५० | ... | ... | ५१ |
| १८५८ | | ... | ६९॥ |
| १८७६ | ... | ... | १३९ |
| १८८८ | ८४ | ६५ | १४९ |
| १८९३ | १०६ | ६८ | १७४ |
| १८९८ | १२४ | ७४ | १९८ |
| १९०३ | १३४ | ७८ | २१२ |
| १९०८ | १५६ | ८९ | २४५ |
| १९१३ | ... | ... | २७४ |
| १९१६ | १८२ | १०४ | २८६ |

शिवाय हिंदुस्थानांत परदेशीं पाठविलेल्या मालाची किंमत म्हणून दरसाल सोनें अगर रुपें येत आहे असें सरकारचेंच म्हणणें आहे. तीच गोष्ट इंडिया ऑफिसच्या खर्चाची. हिंदुस्थानसरकारच्या नोकरांना रुपयांतच पगार देण्यास कांही हरकत नाही. या देशाचें चलन चांदीचें असल्यामुळे सर्व कामगारांचा पगार या चलनांत कायम करणें अन्यायाचें नाही. आता १९२०।२१ सालापासून तर इंडिया ऑफिसच्या खर्चापैकी दरसाल १३६५०० पौंड खर्च आपण सोसण्याचें विलायत सरकारने ठरविलें आहे. त्याचप्रमाणे सरकारी खात्यांना लागणारा माल पुष्कळसा येथेच खरेदी केला तर तीहि कटकट मिटण्यासारखी आहे. तात्पर्य; इंग्लंडमध्ये होणारा खर्च बंद करणें, निदान त्या दिशेने प्रयत्न करणें, अशक्य कोटींतील नव्हतें. अथवा दरसाल अमुक औंस चांदी आम्ही खरेदी करणार असें सरकारने प्रसिद्ध करणें व जरूर तर खरेदी करणें हाहि एक प्रयोग करून पाहण्यासारखा होता. असो. हिंदुस्तानसरकारची अशी धांदल चालू असतां या सगळ्या प्रकरणाचा विचार करण्याकरिता एक कमिटी बसली. अध्यक्षाच्या नांवावरून या कमिटीला ' हर्शेल कमिटी ' म्हणण्याचा प्रघात आहे. या

कमिटीच्या सूचना येणेंप्रमाणेः— लोकांकरिता टांकसाळी बंद करणें,— म्हणजे चांदी घेऊन लोकांस रुपये पाडून सरकार देत असे तें बंद करणें; तथापि लोकांनी सोनें आणून दिलें तर १६ पेन्साला एक रुपया या दराने रुपये पाडून देणें, तसेंच सरकारी करांत कोणी वरील दराप्रमाणे सोनें आणून देईल तर तें घेणें, इत्यादि. या सूचना सरकारने ताबडतोब अमलांत आणल्या ( जून १८९३ ). टांकसाळी लोकांपुरत्या बंद केल्या. मात्र आपणांस स्वतःकरिता रुपये पाडण्याचा हक्क सरकारने राखून ठेवला. तसेंच टांकसाळींत शुद्ध सोनें अगर सॉव्हरिन आणून देणाऱ्यास ७.५३३४४ ग्रेनांस अथवा १६ पेन्सांस एक रुपया या दराने रुपये दिले जातील असें सरकारने जाहीर केलें. शिवाय सरकारी देण्यांतहि १५ रुपयांस सॉव्हरिन अगर ७॥ रुपयांस अर्धा सॉव्हरिन या दराने सॉव्हरिन अगर अर्धा सॉव्हरिन देण्यास लोकांस सरकारने मुभा दिली. हा हर्षेल-कमिटीचा रिपोर्ट अत्यंत महत्त्वाचा आहे हें वाचकांस निराळें सांगावयास नको. सोन्या-रुप्याचा भाव कायम करून टाकणें म्हणजे जगांतील व्यापाराचीं सूत्रें आपल्या मुठींत दाबून ठेवण्याचा प्रयत्न करणें होय. सरकार आता प्रत्यक्ष व्यापारांत पडलें. व्यापारांत पडलें इतकेंच नव्हे तर व्यापारांतील मुख्य दोन जिनसांचे परस्परभाव आम्हीं ठरविल्याप्रमाणे राहिलेच पाहिजेत अशी त्यांनी हाव धरली. आपला हेतु तडीस नेण्याकरिता सरकारास वाटेल त्या उपायांचें अवलंबन करावें लागलें यांत कांही आश्चर्य नाही. जगांत अशा प्रकारचा धाडसी प्रयत्न कोणी केला असेल कीं नाही याची शंकाच आहे. यामुळे विलायती खर्चापुरत्याच हुंड्या न विकतां अमर्याद हुंड्या विकण्याचें स्टेट सेक्रेटरीने ठरविलें. दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे रुपयाची आणि चांदीची फारकत केली. आजपर्यंत रुपयाचा भाव चांदीवर अवलंबून असे. पण नवे रुपये पाडणें बंद करून कृत्रिम रीतीने रुपये महाग केले. १८९३ च्या बाजारभावाने रुपयाची किंमत खरोखरी १४$\frac{1}{2}\frac{1}{2}$ पेन्स होती; पण सरकारी रीतीने ती आता १६ पेन्स झाली.

तिसरा फरक म्हणजे सोनें कायदेशीर फेडीचें चलन झालें; मात्र सोन्याचें नाणें ह्या देशांत पाडण्याचा विचार अद्यापि झाला नाही. तथापि सोन्याचें नाणें कधी ना कधी तरी सुरू करण्याचा उद्देश सरकारचा उघड

असला पाहिजे. परवी सरकारी देण्यांत सॉव्हरिन अगर सोनें घेण्याचा त्यांनी उपक्रम सुरू केला नसता.

टांकसाळी लोकांना बंद केल्यानंतर कांही वर्षे सरकारच्या हेतूप्रमाणे बाजारभाव रुपयाला सोळा पेन्सांवर आला नाही. स्टेट सेक्रेटरीला आपल्या हुंड्या कमी भावाने विकाव्या लागल्या. १८९४-९५ सालाचा सरासरीचा भाव तर तेरा पेन्सच होता. पण जास्त रुपये न पाडण्याच्या सरकारच्या नियमामुळे सन १८९८-९९ साली अखेरीस सरकारी भावाजवळजवळ बाजारभाव आला. इतक्यांत दुसरी एक कमिटी ह्याच कामासाठी बसली होती तिचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. ह्या कमिटीचे अध्यक्ष फाउलर साहेब असल्यामुळे तिला 'फाउलर कमिटी' असें म्हणतात. (१) हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरू करावें; (२) हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें लोकांकरिता पाडून द्यावें; (३) रुपया उपनाणें (Token coin) करूनहि अमर्यादित रकमेपर्यंत तें कायदेशीर फेडीचें चलन म्हणून कायम ठेवावें. (४) रुपये पाडून जो फायदा होईल त्याचें सोनें घेऊन पुढे सोन्याचें नाणें पाडण्याकरिता तें वेगळें ठेवावें. येणेंप्रमाणे ह्या कमिटीने शिफारशी केल्या. ह्यांपैकी सोन्याचें नाणें चालू करण्याचें कांही वर्षे घाटत होतें. पण अखेरीस तो विचार ब्रिटिश ट्रेझरीने फार विघ्ने आणल्यामुळे कायमचा सोडून देण्यांत आला. बाकीच्या सूचना सरकारने अमलांत आणल्या. आता वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल की, सोन्याचें मुख्य नाणें सुरू करणें यावरच बाकीच्या सूचना अवलंबून होत्या. सोन्याचें नाणें पाडण्याची शिफारस कमिटीने केली नसती तर सोन्याचा संचय करण्यास सांगण्याचेंहि प्रयोजन नव्हतें. तसेंच देशांत मुख्य नाणें सोन्याचें असावें असल्या शिफारशीमुळेच रुपया हा उपनाणें करण्याचें कमिटीने सुचविलें. पण मुख्य सूचना सोडून तिला पोषक ज्या दुसऱ्या सूचना तेवढ्याच उचलल्याने हिंदुस्थानच्या चलनपद्धतींत अधिकच घोटाळा झाला. सन १८९९ सालापर्यंत हिंदुस्थानांतील चलनाचा इतिहास येणेंप्रमाणे आहे.

ह्यापुढे आपल्या चलनपद्धतीला निराळेंच स्वरूप येऊं लागलें. ह्या देशांत सोन्याचें नाणें नाही, सोन्याचें परिमाण नाही व सोनेंहि नाही. मुख्य नाणें तर उपनाणें होऊन बसलेलें. दहा अकरा आण्यांना सोळा आणे म्हणावयाचे अशी स्थिति. हल्ली या देशांत 'गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड' आहे;

' गोल्ड स्टँडर्ड ' नाही. स्टँडर्ड म्हणजे परिमाण-मोलाचें परिमाण. रुपया हें उपनाणें ( Token coin ) असल्यामुळे तो मोलाचें परिमाण ( Standard of value ) नाही. एक रुपया दिला असतां जितकें सोनें मिळेल तेंच सध्या परिमाण समजावयाचें व ह्याचेंच नांव ' गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड. ' स्टेट सेक्रेटरी व हिंदुस्थानसरकार यांच्या दरम्यान पत्रव्यवहार होऊन १९०० च्या डिसेंबर महिन्यांत वरील योजना मुक्रर झाली. ह्या योजनेच्या मुळाशीं कल्पना अशी आहे की, देशांतील व्यवहाराकरितां रुप्याचें नाणें बस्स आहे, सोन्याच्या नाण्याचें कांही कारण नाही. परदेशीय व्यवहाराकरिता फक्त सोनें असलें म्हणजे पुरे. देशांतील लोकांना रुपये देऊन सोनें हक्काने मागतां येऊं नये, पण ठरीव दराने व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी आयात मालाची किंमत देण्याकरिता सोनें परदेशीं पाठवितां येईल अशी सरकारने तजवीज करावी. ह्यासाठी हा सुवर्णनिधि इंग्लंडमध्ये असावा; कारण, इंग्लंडच्या बाजारांतच हिंदुस्थानास पैसे द्यावयाचे असतात. सोन्याचें नाणें ह्या देशांत पाडतां यावें म्हणून रुपये पाडून झालेल्या नफ्यांतून सुवर्णनिधि करावयाचा हा फाउलर-कमिटीचा उद्देश नसून त्याच्या ऐवजी परदेशीय कर्ज सोन्यांतच फेडतां यावें व हुंडणावळीचा सरकारी दर कायम राहावा, हा आहे.

सुवर्णनिधीला सन १९०१ सालीं सुरवात झाली. हिंदुस्थानसरकारने रुपये पुष्कळ पाडले; त्यामुळे नफाहि पुष्कळ झाला. सन १९०० सालापूर्वी इंग्लंडमध्ये हिंदुस्थानचें सोनें मुळीच नव्हतें व १८९० सालाच्या अगोदर ह्या देशांतहि तीच स्थिति होती. हिंदुस्थानच्या चलनपद्धतींत सुवर्णनिधि हीच वादविवादाची महत्त्वाची बाब होऊन बसली आहे. कारण रुपया उपनाणें ठरलेंच. सरकारास वाटेल तेव्हा तें रुपये पाडणार. कौन्सिलबिलें जास्त विकलीं गेलीं व सरकारी खजिन्यांत तितके रुपये नसले म्हणजे अधिक रुपये पाडणें आवश्यक होतें. चांदी जितकी स्वस्त तितका हा नफा विशेष. रुपये वितळविण्यांत आता लोकांचा फायदा नसल्यामुळे नवीन पाडलेला प्रत्येक रुपया चलनांत भर घालतो. नाणें फाजील झालें म्हणजे पदार्थ महाग होतात. आता सरकारने रुपये कितीहि पाडले तरी लोकांस गरज नसल्यास घेतो कोण व कसे घेणार, अशी शंका येईल. त्यासाठी ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे की, सरकार रुपये पाडतें त्यास तीन

कारणें असतात. सरकारास स्वतः खर्च करावयाचा असेल तेव्हा; लोकांनी सरकारास सोनें किंवा सॉव्हरिन नेऊन दिले व त्याऐवजी मागे सांगितलेल्या भावाने रुपये मागितले तर; किंवा सरकारी हुंड्या वटावण्याकरिता. स्टेटसेक्रेटरी कौन्सिलबिलें लागतील तेवढीं विकतो, त्यांचे आलेले सॉव्हरिन आपलेजवळ ठेवितो, आणि हिंदुस्थानसरकारास त्या हुंड्यांचे रुपये देण्यास लावितो. सरकारी हुंड्यांची मर्यादा म्हणजे हिंदुस्थानसरकारची त्या हुंड्या वटावण्याची शक्ति होय.

कागदी चलनासंबंधाने विचार केला तर, जितक्या नोटा काढाव्या तितके रुपये किंवा चांदी ठेवणें इतके दिवस भाग असे. त्यामुळे त्यांत विशेष भानगड नसे. पुढे सरकारने कायदा करून सोन्याच्या आधारावर नोटा काढण्याचें ठरविलें. समजा, दहा लाखांचें सोनें अगर सॉव्हरिन कोणी आणून दिले तर त्यास दहा लाखांच्या नवीन नोटा पाडून सरकार देईल. शिवाय स्टेट सेक्रेटरीकडे विलायतेंत असलेल्या सोन्याच्या आधारावरहि नोटा काढण्याचा अधिकार सरकारने आपल्याकडे घेतला. म्हणून सोन्याचा संचय सरकारजवळ पुष्कळ झाला. याकरिता आधी त्याचाच विचार करणें अगत्याचें आहे. हें सोनें अगर सोन्याचें नाणें कोठे तरी तीन खात्यांत असलें पाहिजे. सरकारचा कर वसूल झाला म्हणजे त्यांत कांही सोनें असतें. सरकारजवळ शिल्लक नेहमी असतेच. ही शिल्लक कांही इंग्लंडमध्येहि असते. इंग्लंडमधील शिल्लक अर्थात् सोन्यांतच असते. हिंदुस्थानांतील शिल्लक सरकारी खजिन्यांत—जिल्ह्याचे ठिकाणीं सर्व देशभर —शिलकी तिजोरींत आणि प्रेसिडेन्सी बँकांत ठेवलेली असते. सोनें जमण्याचें दुसरें ठिकाण म्हणजे "पेपर करन्सी रिझर्व्ह,"—कागदी चलननिधि. आणि तिसरें ठिकाण म्हणजे "गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह." ह्याशिवाय सरकारी पैसा अन्यत्र असणें शक्य नाही. यांतील तीनहि शिलकांचे हिशोब निरनिराळे असतात.

१९०० च्या अगोदर आमच्या चलनाला सोन्याचा गंधहि नव्हता हें मागे सांगितलेंच आहे. तेव्हा शिलकी तिजोरींत सोनें १९०० नंतरच असणें संभवनीय आहे. हें सोनें किती, कोठे व कसकसें असतें याचा अजमास पुढील कोष्टकावरून करितां येईल.

(दरवर्षी मार्च अखेर)

| वर्षे | हिंदुस्थानांतील | | | | | लंडनमधील | हिंदुस्थान व इंग्लंडमधील एकंदरीत शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | शिल्लकी खजिना कोटी रु. | प्रेसीडेन्सी बँका कोटी रु | जिल्ह्यांतील खजिने कोटी रु. | एकंदर रुपये कोटी रु. | पांढऱ्या कोशांतील रुपयांचे पौंड. १ पौंडास १५ रुपयेप्रमाणे | | |
| | | | | | दशलक्ष पौंड | दशलक्ष पौंड | दशलक्ष पौंड |
| १९०७– ८ | ६·० | ४·१ | ९·२ | १९·३ | १२·८ | ४·६ | १७·४ |
| १९०८– ९ | ४·४ | ३·५ | ७·५ | १५·४ | १०·२ | ८·० | १८·२ |
| १९०९–१० | ५·३ | ४·१ | ९·० | १८·४ | १२·३ | ११·८ | २५·१ |
| १९१०–११ | ६·७ | ४·१ | ९·६ | २०·४ | १३·६ | १६·७ | ३०·३ |
| १९११–१२ | ५·२ | ४·५ | ८·७ | १८·४ | १२·३ | १८·४ | ३०·७ |
| १९१२–१३ | १३·३ | ५·७ | ९·९ | २८·९ | १९·३ | ८·८ | २८·१ |
| १९१३–१४ | ७·४ | ६·० | १०·० | २३·४ | १५·६ | ८·१ | २३·७ |
| १९१४–१५ | ६·१ | ५·९ | १०·२ | २२·२ | १४·८ | ७·९ | २२·७ |
| १९१५–१६ | ३·६ | ७·४ | ९·० | १८·० | १२·० | ७·० | १९·० |
| १९१६–१७ | ४·६ | १०·६ | ८·२ | २२·९ | १५·३ | ५.४ | २०·७ |
| १९१७–१८ | २·५ | १२·९ | ७·६ | २३·० | १५·३ | १०·६ | २५·९ |
| १९१८–१९ | ३·६ | ११·८ | १०·६ | २६·० | १७·३ | १४·७ | ३२·० |

वरील कोष्टकावरून असें दिसून येईल की, सरकारमदमुव्यापैकी मुद्दा स्टेटसेक्रेटरीच्या तिजोरींत त्याच्या खर्चाकरितां बरीचशी रक्कम शिल्लक ठेवली जाते. शिवाय बरीचशी रक्कम प्रेसिडेन्सी बँकांत असते. ह्या रकमांवर सरकारास व्याज मिळत नाही. नोटी काढण्याचा बँकांचा हक्क सरकारनें काढून घेतला, त्याचा मोबदला म्हणून बिनव्याजी रक्कम सरकार त्या बँकांमध्ये ठेवतें. हेतु कांही का असेना, पण त्याचा परिणाम असा होतो की, विलायती व्यापाऱ्यांना १०।१२ कोटी रुपये फुकटचे वापरावयास मिळतात. आता सरकारी बँक स्थापन झाल्यामुळे हा प्रश्नच रहात नाही.

आता आपण कागदी चलन–निधीकडे वळूं. इसवी सन १८९८ पर्यंत हा निधि रुपयांमध्येच असे. १८९८ च्या कायद्यानें सोन्याचें नाणेंहि ठेवण्याचा अधिकार सरकारास मिळाला. सन १९०० च्या कायद्यानें ह्यापैकी कांही सोनें विलायतेंत ठेवण्याची परवानगी दिली. १९०५ च्या कायद्यानें रुपये मात्र ह्या देशांत ठेवून बाटेल तितकें सोनें हिंदुस्थानांत अगर इंग्लंडमध्ये ठेवण्याची मुभा सरकारास मिळाली. पुढील कोष्टकावरून वाचकांना सर्व माहिती एकत्र मिळेल. [पृष्ठ २६६ वरील कोष्टक पहा]

सन १८६१ च्या कायद्यानें कागदी पैसा काढण्याचा अधिकार हिंदुस्थानसरकारास मिळाला. १८९८ चा कायदा होईपर्यंत हा निधि रुपयांतच असे. १८७१ सालापूर्वी फक्त ३ लाख रुपयांचें सोनें या निधीमध्ये होतें. पुढे १८९८ नंतर हिंदुस्थानांत सोनें जमा होऊं लागलें तोंच १९०० च्या कायद्यानें तें सोनें विलायतेंत ठेवण्यास सवड मिळाली. त्याचा परिणाम असा झाला की, ९।१० कोटींपर्यंत सोनें विलायतेंत राहूं लागलें. सॉव्हरिन आणून देणाऱ्यास दर सॉव्हरिनला रुपये १५ प्रमाणे सरकार देण्यास तयार झालें. तेव्हापासून कागदी चलनाच्या निधींत सोनें येऊं लागलें. इकडून पाठविलेल्या मालाची किंमत म्हणून विलायतेंतून आलेले सॉव्हरिन देऊन व्यापारी लोक रुपये मागत. हे सॉव्हरिन अगर सोनें कागदी चलनाच्या निधींत ठेवून त्या ऐवजी सरकार व्यापाऱ्यांना नोटा अगर रुपये देत असे. इकडे सोनें जमूं लागतांच तें विलायतेंत ठेवतां येईल अशी कायद्यानें योजना केली आणि लगेच हिंदुस्थानांतील कागदी चलन–सुवर्णनिधि बराचसा विलायतेंत नेण्यांत आला. हें सोनें विलायतेंत

## गंगाजळी कोठे व किती हें दाखविणारें कोष्टक

(आंकडे लाखाचे व रुपयांमध्ये.)

| मार्चअखेर संपणारें साल | नोटांचा एकंदर वापर | चांदी | सोनें | | | रोखे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हिंदुस्थान | हिंदुस्थान | इंग्लड | ए. बेरीज | हिंदुस्थान | इंग्लंड | बेरीज |
| १८६२-७१ सरासरी | ७६३ | ४८० | ३ | ० | ३ | २८० | ० | २८० |
| १८७२-८१ ,, | ११८२ | ५९८ | ० | ० | ० | ५८४ | ० | ५८४ |
| १८८२-९१ ,, | १५७४ | ९६४ | ० | ० | ० | ६१० | ० | ६१० |
| १८९२-१९०१ ,, | २७२९ | १५७४ | २३२ | २३ | २५५ | ९०० | ० | ९०० |
| १९०२-१९११ ,, | ४३८२ | १९४५ | ९१५ | ४०२ | १३१७ | १००० | १२० | ११२० |
| १९१२ | ६११६ | १५४८ | २३३३ | ८५५ | ३१८८ | १००० | ४०० | १४०० |
| १९१३ | ६८९८ | १६४५ | २१३८ | ९१५ | ३८५३ | १००० | ४०० | १४०० |
| १९१४ | ६६१२ | २०५३ | २२४४ | ९१५ | ३१५९ | १००० | ४०० | १४०० |

कां ?-- असा प्रश्न सहजत उद्भवतो. याचें कारण असें सांगण्यांत येतें की, सोन्याची जरुरी येथल्यापेक्षा तेथे अधिक. तेथे सोनें ठेवल्याने रुपये पाडण्यासाठी त्या देशांत चांदी खरेदी करावी लागते तेव्हा आयत्यावेळीं सोनें उपयोगी पडावें. निर्गतीपेक्षा आयात जास्त झाल्यास इकडून सोनें पाठविण्याची दगदग व खर्च वांचेल. त्याचप्रमाणे इंग्लंडमध्ये सोनें असल्याने रुपयासोन्याचा दर कायम ठेवण्यास सोनें देण्याची पाळी आल्यास अधिक मदत होईल. यावर उलट म्हणणें असें आहे की कागदी चलनाच्या ऐवजी तितकीच रोकड ठेवण्याचा उद्देश इंग्लंडांत सोनें ठेवल्याने सफल होत नाही. कागदाला कांही किंमत नाही. त्याचे वाटेल तेव्हा रुपये मिळतील असा भरंसा असल्यामुळे कागदाच्या चिटोऱ्यांना १००० रुपये, १०००० रुपये असेंच समजून लोक ते वापरतात. पण जेथे कागदी चलन तेथेच जर हा निधि नाही तर प्रसंगाला त्या निधीचा कांही उपयोग होणार नाही. तसेंच चांदी विकत घेण्याकरिता सोनें ठेवणें तें नियमित प्रमाणांत ठेवतां येण्यासारखें आहे. कारण रुपये पाडण्याचा अंदाज सरकारास आगाउ होण्यासारखा आहे. त्याचप्रमाणे, निर्गतीहून आयात फारच अधिक असा प्रसंग फारच क्वचित् येतो; नाही म्हटलें तरी चालेल. कागदी चलननिधीपैकी विलायतेंतील सोनें बँक ऑफ इंग्लंडमध्ये ठेविलें जातें. वरील विवेचनावरून एक गोष्ट ध्यानांत येईल की, कागदी चलननिधि व सुवर्णविनिमय- परिमाणनिधि यांत वस्तुतः कांहीच फरक नाही अशी हल्ली स्थिति आहे. त्याचप्रमाणे, नियमित रकमेपर्यंत रोकडीच्या ऐवजी रोखे ठेवण्याची सवलत कायद्याने दिली असल्यामुळे त्याचाहि फायदा इंग्लिश व्यापाऱ्यांना मिळतो हें वरील कोष्टकावरून दिसून येईल.

सन १९१२ पासून चार कोटी रुपये विलायती कर्जांत अडविले आहेत. ह्या देशांत व्याज मिळतें तितकें विलायतेंत मिळत नाही. येथे ५॥ टक्के मिळूं शकतात. पण विलायतेंत २॥ टक्के व्याजाचे कर्जरोखे घेणें प्राप्त होतें. चार कोटी रुपये विलायती व्यापाऱ्यांना हलक्या व्याजाने वापरण्यास सापडतात.

आता आपण सुवर्णविनिमय-परिमाणनिधींतील सोन्याचा विचार करूं. हा निधि प्रथम सोन्याचें नाणें हिंदुस्थानांत सुरू करण्याच्या इराद्याने स्थापित झाला व रुपये पाडून जो नफा होईल त्या नफ्यांत हा सुवर्णनिधि निर्माण

करण्याचें ठरलें. आंतील चांदीपेक्षा रुपयाची किंमत कृत्रिम तऱ्हेने वाढविली. चांदी स्वस्त झाली तेव्हा रुपया वितळविला असता तर त्याची १० आण्यांपेक्षा जास्त किंमत झाली नसती. अर्थात् दर रुपयामागे ६ आणे सरकारास नफा मिळत असे. या नफ्याने सुवर्णनिधि रचला गेला. या निधीस 'गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह' म्हणतात; परंतु कांही रुपयेहि या निधींत ठेवतात. तेव्हा सुवर्णनिधि हें नांव अगदी सार्थ आहे असें समजूं नये. हा निधि सन १९०० सालापासून सुरू झाला आहे, हें मागे सांगितलेंच आहे. तेव्हापासून आजपर्यंत हा निधि कोठे, कोणत्या प्रमाणांत, ठेवण्यांत आला हें पुढील कोष्टकावरून समजेल. आंकडे हजाराचे असून पौंडाचे आहेत. [पृष्ठ २६९ वरील कोष्टक पहा.]

वरील कोष्टकावरून एक गोष्ट उघड दिसून येईल की, ह्या सुवर्णनिधींत सोन्याचा पत्ता नाहीं. सर्व कागदच. तेव्हा याला सुवर्णनिधि म्हणण्यापेक्षा कागद-निधि म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. जमलेलें सर्व सोनें कर्जरोख्यांत गुंतविलें गेलें म्हणजे ह्या सोन्याचा फायदा विलायतच्या लोकांना मिळाला हें तर उघड दिसतेंच आहे. पण जमवून ठेवण्याचा उद्देश काय? तर प्रसंगीं, म्हणजे निर्गतीपेक्षा आयात जास्त होऊन व्यापाराचा आढावा ( Balance of trade ) हिंदुस्थानच्या विरुद्ध आंला व त्यामुळे इकडून सोनें पाठवावें लागेल तेव्हा हा निधि उपयोगी पडावा. पण हातचें सोनें गमावून व त्याचे कागद करून ठेवल्याने वरील हेतु सफळ होण्याजोगा नाही. रोखे विकल्याशिवाय सोनें हजर तेव्हा कसें मिळणार? पण अडचणीच्या प्रसंगीं रोख्याचाहि भाव उतरतो आणि घाईघाईने येईल त्या भावाने आयत्यावेळीं रोखे विकावे लागतात. त्यामुळे पुष्कळ नुकसान होतें. व्याज मिळतें ही सबब निरुपयोगी आहे. कारण व्याजाकरिता सोनें जमविलेलें नाही. शिवाय सुवर्णनिधि म्हणजे कागद-निधि नव्हे. प्रत्यक्ष सोनें जवळ असेल तेव्हाच हुंडणावळीचा भाव कायम राहण्यास त्याचा उपयोग होईल. सोनें इंग्लंडमध्ये ठेवल्याने व तेंहि गेल्यांत अडकविल्यामुळे कशी आपत्ति ओढवते ही गोष्ट १९०७ च्या प्रसंगावरून ध्यानांत येईल, म्हणून त्या प्रसंगाची हकीकत थोडक्यांत देणें इष्ट आहे.

या सालीं पाऊस न पडल्यामुळे सर्व देशभर दुष्काळ पडला. अर्थात् निर्गत कमी होऊन आयात माल मात्र दरसालइतकाच भरला. त्यामुळे

| वर्ष | इंग्लंडमध्ये- | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ मार्च | रोखे विकत घेतले तेव्हाची किंमत | थोडे मुदतीने दिलेली रकम | बँकेमध्ये ठेवलेलें सोनें | एकूण बेरीज |
| १९०१ | ० | ० | ० | ० |
| १९०२ | ३४५४ | ० | ० | ३४५४ |
| १९०३ | ३८१० | ० | ० | ३८१० |
| १९०४ | ६३७७ | ० | ० | ६३७७ |
| १९०५ | ८३७७ | ० | ० | ८३७७ |
| १९०६ | १२१६५ | ० | ० | १२१६५ |
| १९०७ | १२५१९ | ० | ० | १२५१९ |
| १९०८ | १३१८७ | ११३१ | ० | १४३१८ |
| १९०९ | ७४१४ | ४७० | ० | ७८८४ |
| १९१० | १३२१९ | ३०११ | ० | १६२३० |
| १९११ | १५८४९ | १४७७ | ० | १७३२६ |
| १९१२ | १६७४८ | १०७४ | ० | १७८२२ |
| १९१३ | १५९४६ | १००६ | १६२० | १८५७२ |
| १९१४ | १७१६५ | २५ | ४३२० | २१५१० |
| १९१५ | १२१४९ | ८ | १२५० | १३४०७ |
| १९१६ | १६२१९ | ५७९२ | ० | २२०११ |
| १९१७ | २५४०६ | ६००१ | ० | ३१४०७ |
| १९१८ | २८४५३ | ६००० | ० | ३४४५३ |
| १९१९ | २९७२९ | ६०१६ | ० | ३५७४५ |

| वर्ष | हिंदुस्थानामध्ये– | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ मार्च | कर्जाऊ दिलेल्या रकमा | सोनें | रुपये | एकूण बेरीज |
| १९०१ | १८३१ | १९०० | ० | ३०३१ |
| १९०२ | ० | ० | ० | ० |
| १९०३ | १ | ० | ० | १ |
| १९०४ | १६७ | ० | ० | १६७ |
| १९०५ | १५२ | ० | ० | १५२ |
| १९०६ | २८७ | ० | ० | २८७ |
| १९०७ | ३०१ | २२ | ४००० | ४३२३ |
| १९०८ | ० | ० | ४००० | ४००० |
| १९०९ | ० | ० | १०५८७ | १०५८७ |
| १९१० | ० | ० | २५१४ | २५१४ |
| १९११ | ० | ० | १९३४ | १९३४ |
| १९१२ | ० | ० | १९३४ | १९३४ |
| १९१३ | ३५ | ० | ४००० | ४०३५ |
| १९१४ | २२ | ० | ४००० | ४०२२ |
| १९१५ | ७०७० | ५२३८ | ० | १२३०८ |
| १९१६ | ४००१ | २३९ | ० | ४२४० |
| १९१७ | ० | १०३ | ० | १०३ |
| १९१८ | ० | ० | ० | ० |
| १९१९ | ० | ० | ० | ० |

विलायती व्यापाऱ्यांकडे हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांस पैसे म्हणजे सोनें पाठविणें जरूर पडलें. येथील व्यापाऱ्यांजवळ तर सोनें नाही. लोक सोनें पुरून अगर संचित करून ठेवतात हा आरोप खरा असता तर व्यापाऱ्यांनी बिनबोभाट सोनें विलायतेस रवाना केलें असतें आणि सरकारहि पेचांत पडलें नसतें; पण सोनें व्यापाऱ्यांच्या हातीं लागणार नाही अशी चलनपद्धतीची स्थिति असल्याकारणाने, प्रसंग ओढवला म्हणजे व्यापाऱ्यांना सरकारकडे धांव मारल्याशिवाय गत्यंतर नाही. सरकारनेहि ' गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड रिझर्व्ह ' बनवितांना परदेशीं पाठविण्याकरिता येथील व्यापाऱ्यांस आम्ही सोनें पुरवूं असें वचन दिलें. किंबहुना हा रिझर्व्ह स्थापण्यांत हाच प्रधान हेतु होता. असें असून १९०८ सालीं व्यापाऱ्यांना सोनें वेळेवर मिळालें नाही. १९०७ च्या सप्टेंबरच्या पहिल्या तारखेस एकंदर सोनें —रोकड व रोखे मिळून— सरकाराजवळ सुमारें ३०९००००० पौंड होतें. त्यापैकी ह्या देशांत ४१,००,००० पौंड असून बाकीचें विलायतेंत. पण तेथेहि प्रत्यक्ष रोकड १,०३,००,००० पौंड काय ती होती. ५२ लक्ष पौंड थोड्या मुदतीने कर्जाऊ लावले असून १,५४,००,००० पौंडांचे रोखे होते. १९०७ च्या आक्टोबर महिन्यांत दुष्काळ पडणार याविषयी कांही शंका उरली नाही. याच सुमारास अमेरिकेवरहि आर्थिक आपत्ति ओढवली. स्टेट सेक्रेटरीने हुंड्या काढल्या, पण त्या कोणी विकत घेईना. नोव्हेंबर महिन्यांत २० लाख रुपयांच्या हुंड्या जेमतेम खपल्या. यापुढे सरकारी हुंड्या निघाल्याच नाहीत. सोन्याची टंचाई भासूं लागली. बँक ऑफ इंग्लंडने व्याजाचा दर वाढविला. हुंडणावळीचा भाव सरकारी भावाच्या खाली गेला; म्हणजे १ रुपयास १६ पेन्स मिळेनात. हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांना सोनें विलायतेस पाठविण्याकरिता पाहिजे होतें. तें येथे मिळालें असतें म्हणजे इतकी धांदल उडाली नसती. पण येथे सोनें फक्त ४१ लक्ष पौंड. तें देऊन टाकण्याचें धैर्य सरकारास होईना. नंतर सरकारने सोनें देऊं केलें. पण एका व्यक्तीस अगर संस्थेस दहा हजार पौंडांपेक्षा जास्त सोनें देण्यास सरकार तयार होईना. ह्याप्रमाणे कांही दिवस गेले. इकडे स्टेट सेक्रेटरी आपला नेहमीचा खर्च कागदी चलननिधींतील सोन्यांतून भागवूं लागला. डिसेंबरपर्यंत असेंच चाललें होतें. ह्यापुढे हिंदुस्थानसरकारने स्टेट सेक्रेटरीवर हुंड्या काढण्याचें ठरविलें. ह्या हुंड्या भराभर

खपूं लागल्या. १९०८ मध्ये मार्च महिन्याच्या सुमारास विलायतेंतील सर्व रोकड सोनें खलास झालें. यापुढे हिंदुस्थानसरकारच्या हुंड्यांचे पैसे रोखे विकून स्टेट सेक्रेटरीस द्यावे लागले. १९०८ च्या आगस्टपर्यंत एकंदर ८० लक्ष पौंडांचे रोखे विकले गेले. १९०७ च्या सप्टेंबरांत ३ कोटी ९ लक्ष पौंड सोनें होतें, तें १९०८ सप्टेंबरांत एक कोटी ११ लक्ष पौंड सोनें राहिलें. याशिवाय इंग्लंडांत याच सुमारास जें कर्ज काढिलें, त्यापैकी ४५ लक्ष पौंडांचा स्टेट सेक्रेटरीस हिंदुस्थानसरकारच्या हुंड्या वटावण्याच्या कामीं उपयोग करितां आला. याप्रमाणे आलेला प्रसंग कसा तरी निभावला. पण ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे, ६।७ वर्षें जमविलेला खजिना एका वर्षाच्या आपत्तीनेच बहुतेक रिता झाला. दोन वर्षें सारखा दुष्काळ पडला असता तर कर्ज काढूनच परत-हुंड्या (हिंदुस्थानसरकाराने स्टेट सेक्रेटरीवर काढलेल्या) वटवण्याचा प्रसंग आला असता. हिंदुस्थानांतल्या व्यापाऱ्यांना इंग्लंडमधील व्यापाऱ्यांना पैसे देण्यास पाहिजे होते. आता सुवर्णनिधि ह्या देशांतच असता तर येथच्या येथे येथील व्यापाऱ्यांना ताबडतोब सोनें सरकारकडून मिळाऊं असतें. पण सोनें विलायतेंत ठेवलें जातें. त्यामुळे सरकार येथील व्यापाऱ्यांना रुपये घेऊन सोनें देतें, एवढेंच नव्हे, तर तें सोनें विलायतेंत पोहोंचविण्याचेंहि काम करितें. अर्थात् सरकार हुंड्या विकणाऱ्या पेढ्यांचें, वाहकांचें अगर आगबोटवाल्या कंपन्यांचें अशीं दोन कामें करितें. विलायतेंत सोनें ठेवून वाहतुकीच्या रुपाने नफा मिळवितें.

असो. १९०७–१९०८ च्या प्रसंगामुळे लोकांच्या तक्रारी फार झाल्या व त्या सरकारच्या कानावरहि गेल्या. सर जेम्स मेस्टन यांनी चेंबर्लेन-कमिशनपुढील आपल्या जबानींत ह्या तक्रारींचें यथार्थ वर्णन केलें आहे. " आपमतलबीपणाने लंडनमधील सुवर्णनिधि आम्ही फुगवितों व निरर्थक तेथे ठेवतों, अशा तक्रारी आमच्या कानावर हमेशा येत आहेत. तसेंच गरज नसतांना रुपये पाडून आम्ही पदार्थांच्या किंमती वाढवितों, लंडनमधील व्यापाऱ्यांना हलक्या व्याजाने पैसे देतों, व हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांना कांहीच मदत करीत नाहीं. लंडनमध्ये सोनें ठेवून नुसत्या इंग्लंडचाच नव्हे तर इतर देशांचाहि फायदा करीत असतों. हिंदुस्थानांतील लोकांपासून कर घेऊन ते पैसे बँक ऑफ इंग्लंडला वापरावयास देतों."

इत्यादि. लोकांच्या तक्रारीचें चित्र मेस्टन यांनी हुबेहूब रंगविलें यांत शंका नाही. पण स्टेट सेक्रेटरीला अशी भीति पडली की, हिंदुस्थानांत सोनें ठेवल्याने विलायतेंत सोन्याची टंचाई पडेल आणि हिंदुस्थानाकरिताच स्टेट सेक्रेटरीला विलायतेंत वारंवर कर्ज काढावें लागतें त्यास मोठा व्यत्यय येईल. याला उत्तर सोपें आहे. कर्ज विलायतेंत काढलें पाहिजे असें कांही शास्त्र नाही. हिंदुस्थानांत सोनें पुष्कळ झालें म्हणजे येथेहि कर्ज मिळण्यास अडचण पडणार नाही. याप्रमाणे हिंदुस्थानसरकार व विलायत-सरकार यांच्यांत वाद पडला. येथील सरकारचें म्हणणें आमच्याजवळ सोन्याचा संचय जास्ती पाहिजे. अर्थात् सरकारी हुंड्या कमी निघाल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे लंडनमध्ये रोकड सोनें अधिक ठेवावें व रोख्यांत कमी गुंतवावें. स्टेट सेक्रेटरीस या दोनहि गोष्टी सर्वथैव कबूल करवत ना. चेंबर्लेन साहेब अध्यक्ष असल्यामुळे यास 'चेंबर्लेन-कमिशन' म्हणतात. १९१३ सालीं कामाला सुरवात होऊन १९१४ सालीं या कमिशनचा रिपोर्ट बाहेर पडला. या कमिशनने आजपर्यंत चालू असलेला चलनाचा प्रकार अगदी बरोबर आहे असा शेरा मारला. हिंदुस्थानाला सोन्याच्या नाण्याचें कारण नाही; सुवर्णनिधि लंडनमध्येच पाहिजे; तो पुष्कळच वाढविला पाहिजे. मात्र निम्मे रोकड सोनें ठेवलें म्हणजे झालें. स्टेट सेक्रेटरीने सोन्याचे रोखे घेणें गैरवाजवी नाही. सुवर्णनिधीचा उपयोग हंडणावळीचा भाव कायम राखणें हाच होय. १९१७ सालासारखा प्रसंग येईल तेव्हा हिंदुस्थान सरकारने विनादिक्कत स्टेट सेक्रेटरीवर हुंडया काढाव्या; वगैरे, वगैरे. ह्या कमिशनने पूर्वस्थितीवर आपल्या पसतीचा शेरा मारला इतकेंच; चलनपद्धतीच्या धोरणांत अगर स्वरूपांत कांहीच फरक केला नाही. वास्तविक, कमिशनच्या ऐवजी कमिटीहि नेमली असती तरी हरकत नव्हती. कमिशनने किरकोळ बाबींत फेरबदल केला एवढेंच. पण युद्धामुळे कमिशनच्या किरकोळ सूचनाहि सर्वच अमलांत आल्या नाहीत.

युद्धामुळे ह्या देशांतून बाहेर माल फार गेला, त्या मानाने आयात मात्र झाली नाही. सबब हिंदुस्थान धनकोच्या स्थितींत होतें. करिता ह्या देशांत पुष्कळ सोनें यावयास पाहिजे होतें. पण देशाबाहेर पाठविण्याच्या अडचणीमुळे स्टेट सेक्रेटरीजवळच बरेंच सोनें राहिलें. मागे निव्वळ निर्गतीचे आंकडे दिले आहेत, त्यावरून दिसून येईल की, १९१४ ते १९ पर्यंत

सुमारें सव्वीस कोटी पौंड किंमतीचा माल परकीयांना आम्हीं अधिक दिला. तेव्हा उघडच आहे की, इतके पौंड हिंदुस्थानांत यावयास पाहिजे होते. सन १९१५ पासून सरकारी हुंड्या सुमारें ११ कोटींच्या काढल्या; हुंड्यांचा ऐवज येथे रुपयांतच मिळतो. ह्याशिवाय दोन कोटी साठ लक्ष पौंड किंमतीचें सोनें व जवळ जवळ एक कोटी किंमतीची चांदीची खासगी आयात झाली. व्यापाराची स्थिति समजण्याकरिता तपशीलवार आंकडे पुढील पृष्ठावर दिले आहेत.

यामुळे हिंदुस्थानांत सोनें यावें तितकें आलें नाहीच, पण चांदीहि फार महाग झाली. १८९६ सालापर्यंत चांदीच्या भावाचे आंकडे पूर्वी दिलेच आहेत. त्याच्या पुढे दरसाल सरासरीच्या मानाने भाव कसा होता हें खालील कोष्टकावरून समजेल.

| वर्ष | एका औंसाची किंमत | वर्ष | एका औंसाची किंमत |
|---|---|---|---|
| १८९४ | ३५ ५/१६ | १९०७ | ३० [illegible]/८ |
| १८९५ | २८ १५/१६ | १९०८ | ३० ३/१६ |
| १८९६ | २९ ७/८ | १९०९ | २४ [illegible] |
| १८९७ | ३० ३/४ | १९१० | २३ ११/१६ |
| १८९८ | २७ [illegible]/१६ | १९११ | २४ ५/८ |
| १८९९ | २६ १५/१६ | १९१२ | २४ ९/१६ |
| १९०० | २७ ७/१६ | १९१३ | २८ १/३२ |
| १९०१ | २८ १/४ | १९१४ | २७ ९/१६ |
| १९०२ | २७ ३/१६ | १९१५ | २५ ५/१६ |
| १९०३ | २४ १/१६ | १९१६ | २३ ११/१६ |
| १९०४ | २४ ३/४ | १९१७ | ३१ ५/१६ |
| १९०५ | २६ ३/८ | १९१८ | ४० [illegible]/८ |
| १९०६ | २७ १३/१६ | १९१९ | ४७ ९/१६ |

| साल | मालाची आयात | मालाची निर्गत | निव्वळ निर्गत | सरकारी हुंड्या | सोन्याची आयात | चांदीची आयात | सोन्याचांदीची बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पौं. | पौं. | पौं. | पौं. | पौं. | पौं. | पौं. |
| १९१४-१५ | ९१९५२६०० | १२१०६११०० | २९१०८५०० | ७७४८१११ | ५६३७००० | ६६७६००० | १२३१३००० |
| १९१५-१६ | ८७५६०२०० | १३१५८६८०० | ४४०२६६०० | २०३५४५१७ | ३२६७००० | ३७१७००० | ६९८४००० |
| १९१६-१७ | ९९६४८००० | १६०४९१२०० | ६०८४३२०० | ३२९१८०९५ | २७९७००० | १८४०००० | १[illegible]५७००० |
| १९१७ १८ | १००२८०००० | १६१७००००० | ६१४२०००० | ३४८८०६८२ | १४३०६००० | ९७१००० | १५२७७००० |
| १९१८-१९ | ११२९९०००० | १६९२३०००० | ५६५४०००० | २०९४६३१४ | १५००० | ३८००० | ५३००० |
| | | | २५१९१८३०० | (अजमासाने) | २६०२२००० | ९९६२००० | ३५९८४००० |
| | | | | ११६९९५७१९ | | | |

वरील भाव सरासरीचे आहेत. दरम्यानचे भाव ह्याहूनहि निराळे होते. १९१५ च्या आक्टोबरमध्ये २४ पेन्स भाव होता तो १९१९ च्या मेच्या १० व्या तारखेस ५८ पेन्सवर गेला. आता १ औंस चांदीचा २४ पेन्स भाव असला म्हणजे एका रुपयाची किंमत ( १६५ ग्रेनांची ) जवळ जवळ नऊ पेन्स असते; आणि ५० पेन्सप्रमाणे चांदीचा भाव असल्यास रुपयाची किंमत २१॥ पेन्स होते, हें मागे दिलेल्या कोष्टकावरून ध्यानीं येईल. आता सरकारी सोळा पेन्सांच्या दराहून ही किंमत ५॥ पेन्सांनी अधिक आहे. अर्थात् रुपयाच्या आंतील चांदीची किंमत अधिक, पण रुपयाची किंमत कमी, अशी स्थिति झाली. रुपये पाडण्यांत सरकारचा आजपर्यंत नफा होत होता तो न होतां उलट तोटा होऊं लागला. एक रुपया पाडण्यास २२ पेन्स खर्च; पण तो पाडून त्याची किंमत १६ पेन्सच येणार. ह्यामुळे हुंडणावळीचा भाव वाढविणें सरकारास भाग पडलें. असें केलें नसतें तर लोकांनी रुपये वितळविले असते आणि चांदी विकली असती. आता दुसरा उपाय म्हणजे रुपयांत हल्ली १६५ ग्रेन चांदी आहे ती कमी करावयाची. पण हें लोकांना पसंत पडलें नसतें. रुपयाचा इतिहास फार जुना आहे. रुपया म्हणजे एक तोळा असा लोकांचा दृढ समज होऊन बसला आहे. शिवाय जुने सर्व रुपये माघारे घेऊन पुन्हा दुसरे रुपये पाडणें जरूर पडतें. पण सर्व रुपये माघारे घेणें फार अवघड. मेक्सिकोने अशा प्रकारचा प्रयत्न केला होता; पण त्यांत तो देश लहान असूनहि त्यास अतिशय अडचणी आल्या. इत्यादि कारणांमुळे हा उपाय अव्यवहार्य होता. तेव्हा रुपया–सोन्याचा मात्र पुन्हा निश्चित करण्याकरिता एक कमिटी नेमण्यांत आली. स्मिथ साहेब ह्या कमिटीचे अध्यक्ष होते. हा रिपोर्ट १९२२ मध्ये प्रसिद्ध झाला. कमिटीच्या रिपोर्टाप्रमाणे हुंडणावळीचा भाव वाढल्याने हिंदुस्थानचें एकंदरींत हित झालें आहे. त्यामुळे हाच भाव कायम ठेवणें बरें म्हणून १० रुपयांस एक सॉव्हरिन, अगर एका रुपयास ११०३ ग्रेन शुद्ध सोनें, हा भाव ठरवावा; एका रुपयास दोन शिलिंग ह्यापेक्षाहि चांदीचा भाव अधिक झाल्यास सरकारी हुंड्या कमी प्रमाणावर विकाव्या, चांदी खरेदी करूं नये; सोन्याचा उपयोग नाणें पाडण्याकडे करावा; स्टेट सेक्रेटरीस न विचारतां हिंदुस्थानसरकारने दर आठवड्यास परत–हुंड्या काढून त्या विकाव्या; हुंडणावळ मिळत आहे

तोंपर्यंत तरी हा क्रम चालू ठेवावा; सोन्याचें नाणें अल्पशा प्रमाणावर सुरू करावें; मुंबईच्या टांकसाळींत लोकांनी सोनें आणून दिल्यास त्यांस सोन्याचें नाणें पाडून द्यावें; सॉव्हरिन घेऊन रुपये देण्याची जबाबदारी सरकारने सोडून द्यावी; चांदीचा भाव वाढल्यामुळे रुपये वितळून लोकांस चांदी परदेशीं पाठवितां येऊं नये, म्हणून चांदीच्या निर्गतीस तूर्त बंदी आहे तीच कांही दिवस चालू ठेवावी; कागदी चलनाचा धात्वात्मक निधि शेंकडा ४० या प्रमाणाहून कमी असतां कामा नये; हल्ली असलेल्या सोन्याची किंमत एका रुपयास २ शिलिंगांप्रमाणे करावी; कागदी चलनाच्या निधीप्रमाणे सर्व सोनें हिंदुस्थानांतच रहावें; सुवर्णपरिमाणनिधीपैकी निम्मेपर्यंत सोनें हिंदुस्थानांत असावें; इंग्लंडांतील ह्या निधींतील सोनें ३ वर्षांपेक्षा अधिक मुदतीच्या रोख्यांत गुंतवूं नये; वगैरे, वगैरे.

हुंडणावळीचा भाव वाढल्यामुळे हिंदुस्थानचा फायदा होतो असें कमिटीने आपलें मत दिलें आहे. त्याविषयी अधिक खुलासा केल्याशिवाय वाचकांचा समज पडणार नाही. एका रुपयास पूर्वी १६ पेन्स मिळत असत, तेथे आता २४ पेन्स म्हणजे २ शिलिंग मिळूं लागले. ह्याचे आता कसकसे परिणाम होतील तें आपण बघूं. हिंदुस्थानांतून कच्चा माल परदेशीं जातो, तेव्हा एक रुपयाचा माल पाठविला तर पूर्वी १६ पेन्स मिळत होते तेथें आता २४ पेन्स मिळतील. अर्थात् हा आपला नफा सकृद्दर्शनीं दिसतो. पण ह्या गोष्टीची अधिक छाननी केल्यास काय निष्पन्न होतें हें बघूं. आमचा शेतकरी आपल्या देशांतील उत्पन्न आपणच विलायतेंत पाठविता व त्याची किंमतहि परस्पर त्यास मिळती, तर हा नफा त्याच्या पदरांत पडला असता; पण सध्या दोन्हीपैकी एकहि गोष्ट घडत नाही. प्रथम, स्टेटसेक्रेटरी वाटेल तितक्या हुंड्या काढतो त्यामुळे ह्या देशांत सोनें फारच कमी येतें. सोन्याच्या ऐवजी रुपयेच आम्हांस मिळतात. अर्थात् हे रुपये पुन्हा २४ पेन्सांना एक रुपयाप्रमाणेच मिळणार. म्हणजे आमच्या हाताला १ रुपयापेक्षा जास्त कशाचाहि स्पर्श होत नाही. दुसरें, शेतकऱ्याजवळून माल मधले दलाल खरेदी करितात तेव्हा शेतकऱ्यास रुपयाच मिळतो. रुपयाचे २४ पेन्स घेण्याचा प्रसंग आला तर तो ह्या दलालांना! आता हे दलाल तर रॅली ब्रदर्ससारखे परकीय असतात. म्हणून निर्गत व्यापार जोंपर्यंत परकीयांच्या हातांत आहे तोंपर्यंत

शेतकऱ्यांस कांही नफा नसतो. आयात माल मात्र स्वस्त होतो. इंग्लंड-मधून आपण माल मागिवला म्हणजे त्याची किंमत आपणास सोन्यांत द्यावी लागते. २४ पेन्सांचा माल आपण विकत घेतला तर पूर्वी १॥ रुपया द्यावा लागत असे, तेथे आता एक रुपयांत काम होईल. म्हणजे आपले आठ आणे वांचले. आणखी दुसऱ्या रीतीने विचार करूं. हुंडणा-वळीचा भाव रुपयास १६ पेन्स असतां १ खंडी गहू मी विलायतेस पाठविले. एका खंडीचा ६० रु. भाव हिंदुस्थानच्या बाजारांत असल्या-मुळे मला ६० रुपये मिळाले पाहिजेत. ह्या साठ रुपयांकरिता माझे गहू घेणाऱ्या विलायतेंतील मनुष्याला ४ पौंड खर्च करावे लागतात. आता मी ५० वार कापड विलायतेंतून मागविलें. ५० वारांची किंमत विलाय-तच्या बाजारांत ४ पौंड आहे. तेव्हा मला ४ पौंड द्यावे लागणार. हे ४ पौंड घेण्यास मला ६० रुपये दिले पाहिजेत. अर्थात् एक खंडी गव्हाला ५० वार कापड हें प्रमाण पडलें. आता हुंडणावळीचा भाव रुपयास २४ पेन्स झाला. त्यामुळे मला किती नफातोटा होईल तें पाहूं. १ खंडी गहू इंग्लंडांत पाठविले व येथील बाजारभावाप्रमाणे मी ६० रुपये किंमत आकारली. आता इंग्लिश व्यापाऱ्याजवळ रुपये नसतात. त्याच्याजवळ सोनें अगर सॉव्हरिन असतात. ते तो रुपयांचा व सॉव्हरीनचा जो भाव असेल त्याप्रमाणे देणार. अर्थात् मला त्याला आता बदललेल्या भावा-प्रमाणे ६ पौंड द्यावे लागतील. म्हणजे ज्या मालाला मला पूर्वी ४ सॉव्ह-रिन मिळाले होते त्याच मालाला मला आता ६ सॉव्हरिन मिळतील. आता उलट प्रकार बघूं. ५० वार कापड मी विलायतेहून मागितलें, तेथील भाव ४ पौंड. माझ्या जवळ सोन्याचें नाणें नसल्यामुळे रुपये देऊन तें मला विकत घेतलें पाहिजे. करिता मला आताच्या भावाने चार सॉव्हरिन घेण्यास ४० रुपयेच पडतील. पूर्वी साठ रुपये पडले होते. म्हणजे १ खंडी गहू देऊन मला ५० वार कापड तर पूर्वीप्रमाणे आलेंच, पण शिवाय दोन सॉव्हरिन अधिक मिळाले. व २० रुपयांची बचत झाली. ह्यांत एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती ही की, मला सॉव्हरिन घेण्यास मुळीच प्रत्यवाय नाही. कारण सॉव्हरिन कोठेहि चालतो व त्यांतील सोन्याची किंमतहि जवळ जवळ तितकीच असते. पण विलाय-तेंत रुपये मात्र कोणी हातांत धरणार नाही. म्हणून सोन्याचा भाव उत-

रल्यामुळे मला दुहेरी फायदा मिळतो. माझ्या मालाला जास्त सॉव्हरिन मिळतात व मला पूर्वीच्या इतके सॉव्हरिन खरेदी करण्यास कमी रुपये पडतात. पण ह्यामध्ये दोन गोष्टी आपण गृहीत धरल्या आहेत. विलायती व्यापाऱ्याला आमचा माल इतर देशांत मिळत नसल्यामुळे आमच्या बाजारांत आम्हीं सांगू त्या किंमतीने तो त्याने विकत घेतला पाहिजे. तीच गोष्ट विलायतेंतील मालाची. पण अशी कल्पना करा की, आपल्या दाराशीं येऊन कोणी मालाची मागणी करीत नाही. आपणांसच आपला माल घेऊन दुसऱ्याच्या दाराशीं जावें लागतें. अशा वेळीं त्याच्या नाण्यामध्ये तो आपणांस किंमत सांगेल. समजा, १ खंडीभर गहू मी आपण होऊन विलायतेच्या बाजारांत विक्रीकरिता पाठविले. आता तेथे जो भाव असेल त्याच भावाने मला माझे गहू विकावे लागतील हें उघड आहे. हुंडणावळ वाढल्याने मला कोणी अधिक पैसे देण्यास तयार होणार नाही. विलायती बाजारांत १ खंडीचा भाव ४ पौंड असला तर पूर्वीप्रमाणे आतांहि मला ४ पौंडच मिळणार, ही गोष्ट खरी. पण पूर्वी ४ पौंडांबद्दल मला ६० रु. मिळत, तेथे आता ४० रुपयेच मिळतील. अर्थात् या व्यवहारांत मला नुकसान लागलें.

यापुढे प्रत्यक्ष व्यापार कसा चालतो तें पाहूं. निर्यात व्यापारी ( Export Merchants ) शेतकऱ्यांजवळून माल खरेदी करतात. ह्यांत हे व्यापारी शेतकऱ्यांस रुपयेच देतात. निरनिराळ्या शेतकऱ्यांकडून थोडा थोडा माल गोळा करून तो सर्व माल ते विलायतेस पाठवितात. आता ह्या मालाचीं हे व्यापारी जीं बिलें काढतात तीं सर्व पौंडांतच असतात. विलायतचे भाव काय आहेत तें पाहून त्याप्रमाणे ते आपल्या मालाच्या किंमती ठेवितात. हीं बिलें ( Export bills )-वटावी-पेढ्या विकत घेतात हे पैसे ह्या पेढ्या कोठून देतात? आयात-बिलांचे पैसे वसूल करून त्या पैशांनी सदर पेढ्या निर्यातबिलें विकत घेतात. विलायतेतून जो माल इकडे येतो त्या मालावर काढलेलीं बिलें येथील शाखापेढ्यांच्या मुख्य पेढ्या विलायतेस असतात त्या विकत घेऊन ह्या देशांत आपल्या शाखांकडे पाठवितात. ह्या बिलांचे पैसे येथील शाखा वसूल करून त्यांनी निर्यातबिलें विकत घेतात. ह्यावरून असे स्पष्ट होतें की, आमचा आयात निर्यात व्यापार परकीयांच्या पैशांनी चालतो. ह्या थोड्याशा विवेचनावरून असे

दिसून येईल की, हुंडणावळीचा भाव वाढल्याने परदेशाहून हिंदुस्थानात येणारा माल स्वस्त मिळतो. निर्गत मालाला भाव किंमत कमी येते. त्यामुळे निर्गत व्यापार कमी होतो; पण, उलट, देशांत स्वस्ताई होईल.

आता आयात माल स्वस्त झाला तर उद्योगधंद्यांना मात्र विघ्न येतें. परदेशीय माल जितका महाग त्या मानाने येथील नवीन उद्योगधंद्यांचा विकास होण्यास अवकाश मिळतो. तथापि त्याच्या बरोबरच आहि गोष्टींचा विचार केला पाहिजे की, यंत्रसामग्री आणणास स्वस्त पडते व एकंदर स्वस्ताई झाल्यामुळे मजुरी स्वल्प पडते. तेव्हा एकंदरीत विचार करितां हुंडणावळीचा भाव वाढल्याने आपलें नुकसान आहे; असें म्हणतां यावयाचें नाही. विलायती खर्चांत ( Home Charges ) तर पुष्कळच बचत होईल. दोन कोटी खर्चांत १० कोटी रुपये पाठवावे लागत तेथे आता १० कोटींनी काम भागेल. पण दुसरा एक तोटा आहे. तोहि लक्षात घेतला पाहिजे. हिंदुस्थानसरकारकडे अगर विलायतेंत जे सोनें शिल्लक असेल त्याची आता १ सॉव्हरिनला १० रुपयेप्रमाणे पुन्हा किंमत करावी लागेल. १९११ सालीं जवळ जवळ ४ कोटी पौंड सोनें अगर सोन्याचे कर्जरोखे सरकारजवळ होते. पूर्वीच्या दराने ह्याची किंमत ६० कोट रुपये होती. ती आता ४० कोट रुपयांवर आली. म्हणजे २० कोटींचें नुकसान होतें. पण त्याबरोबरच विलायतेंत काढलेलें कर्ज अशा वेळीं फेडलें तर हें नुकसान भरून येईल; अगर नुकसानच होणार नाही. शिल्लकी सोन्याने कर्ज फेडावें व नवीन दराने नवीन सोनें पुन्हा जमवावें म्हणजे झालें.

हुंडणावळ वाढल्याने निर्यात व्यापारावर जो परिणाम घडतो त्याचें वर्णन वर केलें. पण निरनिराळ्या निर्यात मालावर निरनिराळा परिणाम होतो हें विसरतां कामा नये. हिंदुस्थानावांचून जो माल इतर देशांत फारसा मिळत नाही त्या मालाला ह्याच देशांत मागणी येते, व ह्या देशातल्या पेठेंत त्याला जो भाव असेल तो देऊन परकी व्यापाऱ्यांना तो खरेदी करावा लागतो. ह्या खरेदीची किंमत रुपयांत ठरते. व रुपयांत ठरली नाही तरी आपणांस जितके रुपये आले पाहिजेत असें वाटतें त्या मानाने पौंडांत किंमत वागतां येते. त्याचा परिणाम काय होतो हें वर दर्शविलें आहेच. पण कापूस, चहा इत्यादि मालासंबंधाने निराळा प्रकार घडतो. हे जिन्नस इतर देशांतहि होतात. ते देश सोन्याच्या नाण्याचे असल्यामुळे तेथे ह्या

जिनसांचा जो भाव असेल त्याच्यापेक्षा हिंदुस्थानांत कोणी जास्ती देणार नाही हें उघड आहे. म्हणून ह्या मालाची किंमत रुपयांत न ठरतां सोन्यांत ठरते. सोन्यांत किंमत ठरली की, परदेशांतून ह्या देशांत सोनेंच पाठविलें पाहिजे. आता सोन्याऐवजी रुपये घेणें आह्मांला भाग असल्यामुळे एक पौंडाच्याऐवजी आह्मांला पूर्वी १५ रुपये मिळत होते तेथे आता १० रुपयेच मिळणार. म्हणजे वाढत्या हुंडणावळींत येथील व्यापाऱ्यांचें नुकसान होतें.

स्टेट सेक्रेटरीने आपल्या गरजेपुरत्या हुंड्या काढाव्या, अधिक हुंड्या काढण्याची जबाबदारी त्याच्यावर नाही, ही गोष्ट बॅबिंग्टन कमिटीने नमूद केली आहे. पण ह्या गोष्टीस स्टेट सेक्रेटरी कबूल होईलसें दिसत नाहीं. ह्या सरकारी हुंड्यांमुळे हिंदुस्थानांत यावयाचें सोनें विलायतेंत राहतें हें मागे सांगितलेंच आहे. पण ह्या हुंड्यांचा आणखी एका तऱ्हेने विलायती व्यापारी उपयोग करून घेतात. ह्या देशांत इंग्रजी पटावी-पेढ्या ( Exchange Banks ) आहेत त्या शाखा असून त्यांच्या मुख्य पेढ्या इंग्लंडांत व इतर देशांत आहेत. येथील शाखा निर्गत-मालाचा व्यापार करतात. म्हणजे इंग्लंडमध्ये मुख्य पेढ्यांत इंग्लिश लोकांचे पैसे असतात, त्या पैशांनी हे पेढीवाले सरकारी हुंड्या विकत घेतात व त्या येथे मुंबईंत किंवा कलकत्त्यास हजर करून हिंदुस्थानसरकारकडून त्या हुंड्यांचे रुपये घेतात. ह्या रुपयांनी ते येथील निर्यात—बिलें खरेदी करितात. म्हणजे परदेशीं माल पाठविणाऱ्या व्यापाऱ्यांचीं बिलें ( Export-Drafts ) विकत घेतात व तीं विलायतेस पाठवितात. ह्याप्रमाणे निर्यात व्यापार चालतो.

म्हणजे विलायती पैशावर आमचा निर्गत व्यापार ( export trade ) चालतो. त्यामुळे या व्यापाराचा सर्व नफा विलायती व्यापाऱ्यांना मिळतो हें सांगणें नकोच. तेव्हा या सरकारी हुंड्यांमुळे निर्गत व्यापाराचीं सूत्रें विलायती व्यापाऱ्यांच्या हातीं राहतात व शिवाय सर्व सोनें विलायतेंत राहतें. आता याच्यावर असा प्रश्न विचारण्यांत येतो की, ' तुम्हाला सोनें पाहिजे कशाला ? तुम्हाला रुपयेच लागणार. या देशांत जरी सोनें आलें तरी तें अखेरीस तुम्ही हिंदुस्थानसरकारकडे घेऊन जाऊन त्याचे रुपयेच मागणार. कारण, धान्य-खरेदीस रुपयेच लागणार. ' या प्रश्नांत असें गृहीत धरलें आहे की, सर्व सोनें धान्य-खरेदी करण्यांतच खर्च झालें पाहिजे. पण ही चूक आहे. या सोन्यांत आमचा नफा असतो. त्या नफ्याने आम्ही

आपली शिल्लक वाढवूं अगर नवीन उद्योगधंदे काढूं. पैसे जास्त झाले म्हणजे धान्य जास्त पिकतें असें नाही. तें पिकावयाचें तितकेंच पिकणार. तेव्हा धान्य-खरेदीच्या पैशाला मर्यादा आहे. बरें, रुपये आमच्या हातांत येतात तेही फुगवलेल्या किंमतीचे. त्या रुपयांचा संग्रह करण्याच्या कामीं कांही उपयोग होत नाही. अशी कल्पना करू की, एक पौंड किंमतीचें धान्य मी विकलें, त्याबद्दल माझ्या हातांत हुंडणावळीच्या भावाप्रमाणे दहा रुपये आले, पण या दहा रुपयांची खरी किंमत म्हणजे आंतील चांदीच्या हिशोबाने साडेसहा रुपयेहि होत नाही ! मला दहा रुपये देऊन सरकार तीन चार रुपये मिळवितें ! हा एक प्रकारचा करच झाला. कारण सरकार ५।६ रुपयांची चांदी विकत घेतें व तिचे दहा रुपये बनवून ते माझ्या पदरांत टाकितें. वरील विवेचनावरून निर्गत व्यापार एतद्देशीयांच्या हातीं असणें किती अगत्याचें आहे तें दिसून येईल.

१८९३।९४ सालीं चांदीचा भाव फारच उतरला म्हणून सरकारास अडचण उत्पन्न झाली. पुढे १९१८ सालानंतर चांदी कडाडल्यामुळे विवंचना उत्पन्न झाली. हुंडणावळीचा भाव कसा वाढत गेला हें खालील कोष्टकांत दाखविलें आहे.

| तारीख | भाव शि. पे. |
|---|---|
| १२।८।१९१९ | १–१० |
| १६।९।१९१९ | २—० |
| २३।९।१९१९ | २—० |
| २५।११।१९१९ | २—२ |
| १६।१२।१९१९ | २—४ |

करन्सी—कमिटीचा रिपोर्ट २ फेब्रुवारी १९२० रोजीं प्रसिद्ध झाला तेव्हा २ शि. ४ पेन्सांच्या आगेमागे भाव होता. तो नंतर २ शि. ९ पेन्स पर्यंत चढला. १५ रुपयांस १ सॉव्हरिन हा भाव कायम राहण्यास १ औंसास ४३ पेन्सपेक्षा जास्ती चांदीचा भाव जातां कामा नये. जास्त झाल्यास रुपयाचा उपनाण्याचा धर्म नाहीसा होईल. रुपये वितळविणें अगर परदेशीं पाठविणें लोकांना फायद्याचें होईल. नवीन रुपये पाडावे तर सरकारास तोटा सोसूनच पाडावे लागणार. १९१७ च्या ऑगस्टपर्यंत रुपये पाडण्यांत सरकारचें

नुकसान नव्हतें. पण पुढे चांदीचा भाव भडकल्यामुळे सरकारचें नुकसान होऊं लागलें. इकडे सोनेंही महाग झालें. म्हणून १ रुपयास दोन शिलिंग सोनें हा दर कमिटीने कायम केला. चांदी उतरण्याचा संभव नाही असें कमिटीला वाटलें. सोनें घेऊन लोकांना रुपये देण्यांत आपला तोटा आहे असें पाहतांच सरकारी हुंड्यांचा हात स्टेटसेक्रेटरीने आखडून घेतला. पण पुढे कमिटीचें भविष्य लवकरच खोटें ठरलें. चांदी झपाट्याने उतरूं लागली. रुपयाला २ शिलिंग हा दर तर सरकारने जगजाहीर केला व तो कायम ठेवण्याकरतां सन १८९४ सालाप्रमाणे वाटेल तें करण्यास सरकार तयार झालें. रुपयास १७।१८ पेन्सांपर्यंत गेलेला दर खेंचून २४ पेन्सांवर आणण्याची खटपट करण्याचा सरकारचा निश्चय झाला. रुपया स्वस्त झाला आणि सोनें महाग झालें.. म्हणून २४ पेन्सांवर दर राहीना. तेव्हा रुपये महाग करावे आणि सोनें स्वस्त करावे हा मार्ग त्यांनी काढला. रुपये महाग करावयाचे म्हणजे लोकांजवळचे रुपये कमी करावयाचे. हा कमी करण्याचा उपाय म्हणजे 'रिव्हर्स कौन्सिल बिल्स' अगर परत हुंड्या काढणें हा होय. परत हुंडी म्हणजे हिंदुस्थान सरकार स्टेटसेक्रेटरी-वर हुंडी काढतें ती. अशा हुंड्यांमुळे लोक हिंदुस्थान सरकारास रुपये देतात व हुंडी विकत घेतात. आणि ती हुंडी स्टेटसेक्रेटरीवर लागू करून त्याच्याकडून रुपयास २ शिलिंगप्रमाणे सोनें घेतात. अशा रीतीने फिरतीं-तील रुपये कमी होतात व लोकांजवळ सोनें पुष्कळ होतें. ह्याशिवाय आपल्या शिलकेंत असलेलें सोनेंहि हिंदुस्थान-सरकारने विक्रीस काढलें; हेतु हा की, सोनें स्वस्त करून रुपये दुर्मिळ करावयाचे. करन्सी कमिटीने 'परतहुंड्या' काढण्याची सूचना केली होती, तिचा सरकारने ताबड-तोब फायदा करून घेतला. आता ह्यामध्ये नुकसान काय झालें तें बघूं. १५ रुपयांस १ पौंड ह्या दराने आजपर्यंत जें सोनें सांचविलें होतें तें सर्व ९ रुपयांस १ पौंड ह्याप्रमाणे देऊन टाकलें. अशा रीतीने दर पौंडाच्या मागे ६ रुपये नुकसान झालें. दर आठवड्यास २० लाख पौंड ह्याप्रमाणे कित्येक महिनेपर्यंत परत-हुंड्या विकून सरकारने सर्व सोन्याची विल्हेवाट लावली. बरें, ह्यापासून फायदा तरी कोणाचा झाला? तर विलायती व्यापाऱ्यांचा. हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांना परतहुंड्या विकत घेण्याचें कार-णच नाही. व्यापाऱ्यांना परतहुंड्यांची गरज केव्हा लागते? त्यांस विला-

यतेस मालाचे पैसे पाठवावयाचे असतील तेव्हा. पण असे पैसे पाठविण्याची जरूरी केव्हा असते ? देशाची निर्गतीपेक्षा आयात अधिक असेल तेव्हा. पण महायुद्धामुळे ह्या देशाची निर्गत आयातापेक्षा पुष्कळच अधिक. त्यामुळे आम्हांलाच इंग्लंडमधून पैसे आले पाहिजेत. तेव्हा व्यापाऱ्याला परत-हुंड्यांची मुळीच अवश्यकता नव्हती. तर मग ह्या परत-हुंड्या कोण घेणार व त्यापासून फायदा कोणाचा होणार ? इंग्लिश व्यापाऱ्यांचा व येथे असणाऱ्या इंग्लिश लोकांचा. बाजारामध्ये १ रुपयास १५ पेन्सच मिळतात, पण सरकार २४ पेन्स देतें. इंग्लिश लोकांची घरें दारें विलायतेंत, तेथे त्यांना सोनें पाहिजेच; तेव्हा ही आलेली संधि कोणीहि फुकट जाऊं देणार नाही. येथे पसरलेले रुपये सर्व गोळा करून त्यांनी थोडक्या पैशांत सोन्याचा संचय विलायतेंत केला. शिवाय बाजारभाव व सरकारी भाव ह्यांत इतकी तफावत पडल्यावर सट्टेबाजी करण्यासही पुष्कळांस संधि मिळाली. हलक्या दराने सरकारकडून सोनें विकत घेऊन बाजारांत अधिक दराने विकण्यास मुळीच हरकत नव्हती व त्याप्रमाणे लोकांनी केलेंहि. विलायतेंतील लोकांस १६ रुपयास १ तोळा सोनें मिळालें आणि हिंदुस्थानांत तोळ्यास २२ रुपये देण्यास तयार असूनहि लोकांस तें मिळेना असा प्रकार घडला. हिंदुस्थानच्या विरुद्ध व्यापाराचा आढावा क्वचित् जात असल्यामुळे परतहुंड्या काढण्याचा प्रसंग फारसा येत नाही. १९०८ साली दुष्काळामुळे परतहुंड्या काढाव्या लागल्या हें मागे सांगितलेंच आहे. १९१९ पर्यंत अशा परत-हुंड्यांचा तपशील खाली दिला आहेः—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९०८।०९ | ८०५८००० | पौंड. | १९१५-१६ | ४८९३००० | पौंड. |
| १९०९।१० | १५६००० | ,, | १९१८-१९ | ५३१५००० | ,, |
| १९१४।१५ | ८७०७००० | ,, | | | |

वरील हुंड्यांत तार-हुंड्यांचाहि समावेश होतो. तार-हुंड्या म्हणजे हिंदुस्थान सरकार स्टेटसेक्रेटरीस हुंडीचें सोनें देण्याबद्दल तारेने कळवतें. ह्याला इंग्रजींत 'टेलिग्रफिक ट्रॅन्सफर' असें म्हणतात. हुंडी टपालाने जाते. ती विलायतेस पोंचण्यास वेळ लागतो, म्हणून निकडीच्या प्रसंगीं तार-हुंड्या घेतात. म्हणजे हुंडीचे पैसे त्यांस तावडतोब मिळतात. स्टेट-

सक्रेटरीसुद्धा हिंदुस्थान सरकारावर तारहुंडया काढीत असतो. तारहुंडयांचा भाव साहजिकच जास्त असतो. ह्या परतहुंडयांमुळे ३५ कोट रुपये हिंदुस्थानचे गेले. इ. स. १९१९ सालीं १८३'५०० पौंडांच्या परत-हुंडया विकल्या. त्यामुळे हिंदुस्थानचें सोनें इंग्लंडमध्ये होतें त्यापैकी इतके पौंड सोनें कमी झालें. आता ह्या सोन्याबद्दल ह्या देशांत सरकारास २४४२४२६३ रु. मिळाले. सन १९२० सालीं परतहुंडया काढून पुन्हा सरकारने ४६९३'५५८५७ रुपयांस ५५३८२००० पौंड सोनें विकलें. ढोकळ मानाने दर पौंडाला ९ रुपये भावाने हें सोनें विकलें असें होतें ! हिंदुस्थानांतल्या लोकांस २५ रु. देऊन सुद्धा तोळाभर सोनें मिळत नाही, पण विलायतेस त्यांचेंच सोनें ९ रुपयांस ११३.००१६ ग्रेन ( १ पौंडांत इतकें शुद्ध सोनें असतें ) गेलेलें पाहून त्यांस स्वाभाविकच वाईट वाटतें. १८० ग्रेनांचा १ तोळा ह्या हिशोबाने पाहतां एक तोळा सोन्यास वरील दराने १३।१४ रु. पडतात. १ रुपयास १६ पेन्स ह्याप्रमाणे विलायतेंत जमवून ठेवलेलें सोनें १९२० सालीं एक रुपयास ३४।३५ पेन्सांप्रमाणे देण्यांत आलें ! अर्थात् हा परत–हुंडयांचा भाव म्हणजे येथें सरकारला एक रुपया दिला की, विलायतेस सुवर्णनिधींतून ३५ पेन्स मिळावयाचे. परत–हुंडयांचे कांही भाव या खाली दिले आहेत; त्यावरून ही गोष्ट चांगली लक्षांत येईल.

| तारीख | भाव | ( तारहुंडयांचा ) |
|---|---|---|
| १२–२–२० | २ शि. | १० $\frac{२७}{३२}$ पे. |
| १९–२–२० | २ ,, | १० $\frac{७}{३२}$ ,, |
| २६–२–२० | २ ,, | १० $\frac{५}{१६}$ ,, |
| ३–३–२० | २ ,, | १० $\frac{१}{३२}$ ,, |

आता हा कांही बाजारभाव नव्हता. फेब्रुवारी महिन्यांत बाजारभाव २ शि. ६ पेन्स आणि २ शि. ८ पेन्स यांच्या दरम्यान होता. अर्थात् सरकार बाजारभावापेक्षा २।४ पेन्स अधिक देत असे. अशा रीतीने दर आठवडयास २० लक्ष पौंडांच्या परत–हुंडया विकण्यांत आल्या. ह्यावरून एकंदर नुकसान किती झालें असावें याची कल्पना करतां येईल.

वरील विवेचनावरून संकटाचा उद्भव सरकारी हुंड्यांत आहे असें दिसून येईल. स्टेटसेक्रेटरीने आपल्या गरजेपेक्षा जास्त रकमेच्या हुंड्या

सहसा काढूं नयेत. विलायतेंत सोनें न ठेवतां सोन्याचा हिंदुस्थानांत येण्याचा मार्ग खुला करावा. हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरू करावें. चांदीचा भाव कमजास्त होतो तसा सोन्याचा होत नाही. सोन्यारुप्याचा भाव ठरविण्याचा प्रयत्न करूं नये. विलायतेचा खर्च शक्य तितका कमी करावा. १० रुपयांस १ सॉव्हरिन हा भाव इतकें नुकसान होऊनहि टिकला नाही. यावरून असा उपाय दुःसाध्य आहे हें ठरतें. नुसत्या घटत्या हुंडणावळीने किंमती वाढलेल्या नाहीत. तसें असतें तर स्वस्ताई होती तेव्हां हुंडणावळीचा भाव अधिक असावयास पाहिजे होता. पण अनुभव असा आहे की, १५ रुपयांस एक पौंड या हुंडणावळीचा दर असतांना जी स्वस्ताई होती ती अजूनही नाही. स्वस्ताई—महागाईची दुसरीं पुष्कळ कारणें असतात. निर्गत व्यापार आपल्या हातांत ठेवण्याचा आमच्या लोकांनी प्रयत्न करावा. कारण पुष्कळ वेळां बटावी—पेढ्यांच्या ( Exchange Banks ) फायद्याकरता स्टेट सेक्रेटरीला हुंड्या काढाव्या लागतात. सोन्याच्या आधारावर नोटींचा प्रसार वाटेल तितका करावा; पण सोनें मात्र हिंदुस्थानांत पाहिजे. १०० रुपयांपर्यंत रुपया हें कायदेशीर फेडीचें चलन ठरवावें; व नाणीं पाडण्याव्यतिरिक्त सर्व कामें नवीन स्थापलेल्या इंपीरिअल बँकेकडे सोंपवावीं. देशांत सोनें आहे एवढ्याच गोष्टीवर व्यापार संभाळला जातो, म्हणजे व्यापारी बादल पुष्कळ वेळां टळलें जातें. म्हणून सोनें याच देशांत ठेवण्यांत यावें. या गोष्टी न केल्यास कालाचा, बुद्धीचा व द्रव्याचा अपव्यय होत राहणार यांत संशय नाही.

---

# भारतीय चलन-पद्धति.

## [ पुस्तकपरीक्षण ]

अलीकडे मराठी वर्तमानपत्रांतून, मासिकांतून आणि स्वतंत्रग्रंथद्वारा हिंदी चलन-पद्धतीचें सोपपत्तिक, विस्तृत व प्रमाणबद्ध विवेचन होत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. असल्या विषयावर लिहिण्याची प्रवृत्ति अपूर्व असल्यामुळे आम्ही रा. शंकर गणेश खांडेकर यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. कारण भारतीय चलन-पद्धति ह्या सव्वाशें पृष्ठांच्या लहानशा पुस्तकांत रा. खांडेकर ह्यांनी हिंदी चलनपद्धतींचें तात्त्विक व व्यावहारिक दृष्ट्या सांगोपांग विवेचन केलें असल्यामुळे सदर पुस्तक फारच उपयुक्त झालें आहे. त्याचप्रमाणे अद्यापि फारशा न मळलेल्या वाटेने जाऊन रा. खांडेकर यांनी मराठी वाङ्मयांत विनमोल भर टाकली आहे. अपवादादाखल असलेलीं दोन तीन ठिकाणें वगळलीं तर पुस्तकाची भाषाहि सुबोध आहे असेंच आम्हांस वाटतें. दुर्बोधतेचा आरोप अवास्तव आहे अशी आमची समजूत आहे. म्हणून विद्यार्थ्यांना ह्या पुस्तकाच्या वाचनाने फायदा झाल्यावांचून राहणार नाही असें आमचें मत आहे. परंतु इतक्या सुंदर विषयावर लिहिलेल्या पुस्तकाची छपाई तितकीच वाईट असावी हें पाहून मात्र मनास फार विषाद वाटतो. शुद्धिपत्र देऊनहि पुस्तकांत अशुद्धें इतकीं राहिलीं आहेत की, त्यांची यादी केली तर ती एक फर्लांगभर लांब होईल अशी भीति वाटते. वाईट छपाई, घाणेरडा कागद, आणि बेढब आकार इतक्या गोष्टी एकत्र जुळल्या की, उत्कृष्ट लेखांचाही समाजांत प्रसार होण्यास मोठें विघ्न येतें. कोणत्या पुस्तकाला कागद कोणता वापरावा, टाईप किती मोठा असावा, पुस्तकाची जाडी, लांबी, रुंदी किती असावी, बाह्यांग मोहक होण्यास काय करावें इत्यादि गोष्टींचा निर्णय करणारी एखादी मध्यवर्ती संस्था स्थापून प्रकाशनाचें काम तिच्याकडे सोपविणें सध्या अगदी जरूर झालें आहे. साहित्यपरिषदेचा ह्या कामीं उपयोग करितां येण्यासारखा आहे. सारांश, भाषेच्या ओबडधोबडपणापेक्षा छपाई-

चाच ओबडधोबडपणा आम्हांस विशेष दुःसह वाटतो.

प्रस्तुत पुस्तकांतील विषयाकडे पाहतां पैशाची आवश्यकता, त्याचा पूर्वेतिहास, निरनिराळ्या चलनपद्धति, नाण्यांच्या कल्पनेचा उद्भव, इत्यादि गोष्टींचा ऊहापोह रा. खांडेकर यांनी पहिल्या भागांत करून दुसऱ्या भागांत चलनी नोटांविषयी सामान्य विचार प्रदर्शित केले आहेत. तिसऱ्या ते दहाव्या भागांत आधुनिक चलन-पद्धतीचें विवरण करून उपसंहारात्मक अकराव्या भागांत चालू चलनपद्धतीसंबंधाने त्यांनी सरकारास महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. रा. खांडेकर यांनी केलेल्या विवेचनाशीं अगर काढलेल्या अनुमानांशीं कोणाचा फारसा मतभेद होईल असें वाटत नाही. असो. ह्या पैशाने समाजांत फार मोठी क्रांति घडवून आणली आहे. ह्याची यथार्थ कल्पना होण्यास आज जगांतून पैसा नाहीसा केला तर काय होईल ह्याचा विचार केला म्हणजे पुरें आहे. तथापि ही गोष्ट विसरतां कामा नये की, गरज भासूं लागली तेव्हाच पैशाची युक्ति निघाली. ज्या वेळेस लोक मारलेल्या पशुपक्ष्यांच्या मांसाने क्षुधानिवारण करीत असत व वृक्षांच्या वल्कलांनी थंडीपासून संरक्षण करून घेत, तेव्हा पैशाची अवश्यकता भासण्याचें कारणच नव्हतें. पण मनुष्याची बुद्धि त्याला स्वस्थ बसूं देत नाही. बुद्धीच्या जोरावर तो नवीन शोध लावतो; शोधांच्या योगाने नानाविध कृत्रिम पदार्थ उत्पन्न करतो; अशा अनेक पदार्थांच्या उपभोगाने मनुष्याच्या गरजा सारख्या वाढत असतात. गरजा वाढल्या की, एकट्याच्या हातून होणें शक्य नाही अशा असंख्यात वस्तूंची तो अपेक्षा करूं लागतो, आणि अशा वस्तु दुसऱ्याकडून संपादन करून घेण्यासाठी पैशाची क्लृप्ति त्याला सुचते. गरजा मर्यादित असतात तोंपर्यंत अदलाबदलीने व्यवहार करतां येतो. उदाहरणार्थ, हिमालयपर्वताच्या माथ्यावर बेगसर येथे दर जानेवारी महिन्यांत जत्रा भरे, त्या वेळीं पुष्कळ ठिकाणचे लोक तेथे जमत. त्यांत मध्यआशियांतले लोक आपणाबरोबर आणलेले लोकर, टांकणखार वगैरे जिन्नस देउन त्या ऐवजी स्थानिक पदार्थ घेऊन जात, असा उल्लेख प्रवासवर्णनांत सांपडतो. पण आटोक्याच्या बाहेर मनुष्याच्या गरजा गेल्या, थोडक्यांत मनुष्याचें भागेनासें झालें, म्हणजे विनिमयसाधनाचा अवलंब करावा लागतो. हें विनिमयसाधन म्हणजेच पैसा होय. ह्यावरून स्पष्ट दिसून येईल की, समाजाची प्रगति झाली म्हणजेच पैसा अस्तित्वांत येतो व

पैशामुळे त्या प्रगतीचें पाऊल पुढे पडण्यास मदत होते. पण ही गोष्ट जरी खरी असली तरी पैशामुळें सामाजिक व राजकीय स्वातंत्र्य लोकांस मिळून मानवजातीचा पुष्कळ फायदा झाला ( पान १२ ), ह्या विधानांत थोडी अतिशयोक्ति आहे असें आम्हांस वाटतें. धनी व नोकर ह्यांचे संबंध पूर्वापार रूढीने ठरलेले असत म्हणून ते गुलामगिरीचेच असले पाहिजेत असें नाही. पिढीजात नोकरीचा हक्क असला म्हणजे धन्यालाहि त्याच्या इच्छे विरुद्ध त्याच कुळांतील मनुष्यास नोकर म्हणून पतकरावें लागतें. ह्यांत गुलामगिरी असली कदाचित् तरी ती एकपक्षी नसून उभयपक्षी आहे हें आपण विसरतां कामा नये. बरें वतन-पद्धतींत कांही तोटे आहेत तसे फायदेहि आहेत. वतन-पद्धतीने समाजांत सस्निग्धता उत्पन्न होते तर माहेमाल पगार देऊन ठेवलेल्या नोकरपद्धतीने समाज विघटित होतो. समुद्रावरील वाळूच्या कणांप्रमाणे समाजाची स्थिति होते. तसेंच पैशाचा उपयोग प्रत्येक बाबतींत व प्रत्येक ठिकाणीं आपण करूं लागलों म्हणजे पैशाचें महत्त्व समाजांत अनिवार वाढतें. मनुष्य पैशाचा दास बनतो. पैशावांचून पदोपदीं अडून जातें. राजेहि पेचांत पडतात; आणि अखेरीस आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून लोकांवर जुलूम करतात. तांब्याच्या एका पैशाला रुपया नाही तर मोहोरहि समजा, असे अनन्वित हुकूम सोडून ह्या आर्थिक संकटातून पार पडून जाण्याच्या युक्त्या आजपर्यंत पुष्कळ राजांनी केल्या आहेत. ह्याचीं उदाहरणें बुकॅनन व फेरिस्ता यांनी दिलीं आहेत.

The value of the different coins was frequently changed by the late Sultan (Tipu) in a very arbitrary and oppressive manner. When he was about to pay his troops, the nominal value of each coin was raised very high and left at the standard for about ten days, during which time the soldiery were allowed to pay off their debts at the high valuation. After this the standard was reduced to the proper value."

'*Journey to Mysore*'-**Buchanan.**

टिपूसुलतानाप्रमाणेच महंमद तघलखहि अशा वाममार्गाचा अवलंब करीत असे. पण ती हकीकत इतिहासप्रसिद्ध असल्यामुळे येथे जागा अड-

वण्याचें कारण नाही. तात्पर्य, पैशाचें महत्त्व व्यवहारांत फार ठेवल्याने समाजाला दुःखहि सोसावें लागतें. पैसे पुष्कळ झाले की, पदार्थांच्या किंमती वाढतात आणि मग सोन्यारुप्याच्या नाण्यांशिवाय चालत नाहीसें होतें. पण ह्या धातूंचा पुरवठा कमी, ह्यामुळें अनर्थपरंपरा ओढवते. हलीच पहा, पै कोणी बंद केली नाही. पण महर्घतेमुळे पैचा उपयोग करण्याचा प्रसंगच येत नाही. जो समाज सर्वत्र पैशाचा उपयोग करीत नाही तो मागसलेलाच असला पाहिजे; त्याचप्रमाणे महर्घतेमुळे देशाचें कांही नुकसान होत नाही, ह्या कल्पना आता लोकांनी सोडून दिल्या पाहिजेत. महागाई झाली म्हणजे एकाच्या ठिकाणीं दोन पैसे मोजावे लागतात इतकेंच हें म्हणणें खोटें आहे. महर्घतेला द्रव्याची विपुलता हें कारण खरें मानलें, तरी द्रव्याची वाढ सर्व समाजांत सारखी वाटली जात नाही. थोडे लोक श्रीमंत तर बहुतेक गरीबच असा प्रायः योग असतो. त्यामुळे गरीब लोकांचे महागाईच्या दिवसांत मनस्वी हाल होतात. स्वस्ताईच्या काळांत लोक फार सुखी असतात. महर्घतेने गरिबांची फार त्रेधा उडते. पण स्वस्ताईने श्रीमंतास यत्किंचितहि त्रास होण्याची भीति नको. ज्या समाजांत कवडीपासून रत्नापर्यंत पैसा म्हणून वापरण्याची संधि मिळते तोच समाज सुव्यवस्थित मानला पाहिजे. शुक्रनीतींत म्हटल्याप्रमाणे "यत्र यादृग्व्यवहारस्तत्र तादृक्प्रकल्पयेत्" आणि "व्यवहार्यं वराटाद्यं रत्नान्तं द्रव्यमीरितम्." द्रव्याचा उपयोग व्यवहाराच्या योग्यतेप्रमाणे करीत जावा. पण विद्यमान समाजांत आपणांस काय दिसून येतें ! कवडी तर गेलीच, परंतु तांब्याचें नाणेंहि फारसें वापरण्याचा प्रसंग येत नाही. ह्या महागाईमुळे सुखी कोण आहेत हें दिसतेंच आहे. ही स्थिति सुधारणें सध्या तरी दुरापास्त दिसतें. पाश्चात्यांचें अनुकरण करून यंत्रांच्या साहाय्याने आपण उद्योगधंदे चालविले आहेत. अशा धंद्यांत कोट्यवधि रुपयांचें भांडवल संकलित होतें; परस्पर लोकांकडून मिळविलेले पैसे वाटेल त्या किंमतीने पदार्थ विकत घेऊन खर्च करण्यास धंदेवाल्या लोकांस कांही दिक्कत वाटत नाही; त्यामुळेच पदार्थांच्या किंमती वाढून महागाई होते. प्रस्तुत विषयाशीं महागाईचा निकट संबंध नसल्यामुळे तत्संबंधीं अधिक लिहिणें योग्य नाही. पण देशांत पैसा कमजास्त होईल त्या प्रमाणाने सुद्धा स्वस्ताईमहागाई होत असल्यामुळे पैशापासून होणाऱ्या हिता-

बरोबर अनहिताकडेहि पाहणें अगत्याचें होतें.

असो. रा. खांडेकर यांनी हिंदी चलनाचा इतिहास देऊन सरकारी हुंडयांचें विवेचन केलें आहे तें सर्वांनी लक्षपूर्वक वाचून मनन करण्या-सारखें आहे. तथापि रा. खांडेकर यांनी दुसरी आवृत्ति काढतांना ह्या आवृत्तींत राहिलेले दोष काढून टाकण्याची खबरदारी घ्यावी. पान २३ वर "१२ व्या शतकांत ज्या वेळी मार्को पोलोने चीन देशाला भेट दिली" असें वाक्य आहे. येथे १३ व्या शतकांत असें पाहिजे. मार्कोपोलो हा चीन देशांत १३ व्या शतकाच्या मध्यांत गेला होता. तसेंच पान ६२ मध्ये—१४३१/३२ व १५३/६ असे आंकडे पडले आहेत. त्यांऐवजी १५३१/३२ आणि १५१/६ असे आंकडे पाहिजेत. शुद्धिपत्रांत नमूद न केलेले दोषच येथे निर्दिष्ट केले आहेत. "स्टेट सेक्रेटरी विलायती व्यापाऱ्यांपासून सोनें घेऊन ज्या हुंडया विकत घेतो" (पा. ७०) ह्या वाक्यांत "विकत देतो" असें पाहिजे. पा. ७९ वर "बँक ऑफ् बाँबेची संस्थापना १८४७ साली झाली" असें आहे; १८४७ च्या जागी १८४० पाहिजे. १८४० चा कायदा ३ अन्वयें मुंबई बँकेची स्थापना झाली. पा. ८३. "त्याचप्रमाणे चलनी नोटांचा प्रसार ४० कोटींनी वाढला" ह्या ठिकाणीं ४५ कोटींनी बाढला, असें पाहिजे असें वाटतें. पान ८८ मध्ये, "नोटांचा प्रसार १९१४ पासून १९१५ पर्यंत ६६ कोटींपासून १५३ कोटी रुपयां-पर्यंत वाढला" असें लिहिलें आहे. पण ही वाढ १९१५ पर्यंत झाली नसून १९१९ पर्यंत झाली. त्याचप्रमाणे ह्याच पानावर पुढे "१९१७ व १९१८ सालीं एक रुपयाची व २॥ रुपयांची नोट सुरू करण्यांत आल्या व त्यांचा प्रसार अनुक्रमे १७ कोटी ५० लक्ष व १ कोटी ६६ लक्ष रुपयां-पर्यंत होता–" असें लिहिलेलें आढळतें. पण कोटींचे आंकडे चुकले असावे असें वाटतें. ( By March 31, 1918, the value of one-rupee notes in circulation was Rs. 33 lakhs and of Rs. 2½ notes Rs. 18 lakhs. On March 31, 1919, the values were Rs. 1051 lakhs and Rs. 184 lakhs: Findlay Shirras, Page 262 ) तसेंच पान ९१ मध्ये "पण हल्लीं पाहावें तों ही संख्या ६९ कोटींपर्यंत गेलेली आहे." ६९ च्या ऐवजीं १०० हा आंकडा पाहिजे. ( फिनले शिरास. पानें २६३, २६४ पहा. ) खालील वाक्यांत केलेल्या

विधानाच्या सत्यतेविषयी फार संशय येतो. " ज्या ज्यारान्याला विलायतेंत पैसे पाठवावयाचे असतील तो हिंदुस्थान सरकारला २४ पेन्स दराने पैसे देऊन हुंड्या विकत घेई. व ह्या हुंड्या विकत घेऊन विलायतेंत स्टेट सेक्रेटरीकडे पाठविल्या म्हणजे त्याच हुंड्या १० किंवा १२ पेन्स भावाने घेऊन तो हुंड्या घेऊन येणाऱ्या इसमास चुकत्या करी. ह्याचा अर्थ असा होई की, जो हिंदुस्थानाचा पैसा युद्धाचे पूर्वी व युद्ध चालू असतांना १६ पेन्स दराने विलायतेस नेला गेला, तोच पैसा ह्या उलट-हुंड्या विकण्याच्या पद्धतीमुळे १० किंवा १२ पेन्स ह्या दराने परत ह्या देशांत येई." पा. १२०. आता २४ पेन्स दराने परत-हुंडी विकत घेतल्यावर स्टेट सेक्रेटरीस १० अगर १२ पेन्स देण्याचें कारण काय, हेंच आम्हांस समजत नाही. परत-हुंडींत जितके पौंड लिहिले असतील तितकेच स्टेटसेक्रेटरी देणार; जास्त देण्याचें कारणच नाही. ह्या ठिकाणीं लेखकाचा थोडा गोंधळ झाला असावा असा आम्हांस संशय येतो. बाजारभावापेक्षा परत-हुंड्यांचा भाव फायदेशीर असतो, तेव्हा लोक सरकाराकडून परत हुंड्या विकत घेतात. तेव्हा २४ पेन्स आणि १०।१२ पेन्स हे परतहुंड्यांचेच पण निरनिराळ्या वेळचे दर होत. सोनें देतांना स्टेट सेक्रेटरीस ह्या दरांत फरक करतां येत नाही. वास्तविक प्रकार असा आहे की, करन्सी कमिटीच्या अभिप्रायाप्रमाणे हिंदुस्थानसरकारने १ रुपयास २४ पेन्सप्रमाणे परत हुंड्या काढण्याचें धोरण निश्चित केलें. कमिटीने अभिप्राय दिला तेव्हा बाजारभाव २८ पेन्सांवर होता. पण पुढे लवकरच भाव उतरला, तो १७।१८ पेन्सांवर आला. तथापि सरकार १ रुपयास २४ पेन्स देत होतेंच. ह्याप्रमाणे एकदा नुकसान झालें. आता १ रुपयास १७ पेन्स मिळतात; अर्थात् रुपया स्वस्त होऊन सोनें महाग झालें. सरकारचा संकल्प तर रुपया महाग करून सोनें स्वस्त करावयाचें. ह्या नादाने बाजारभाव १०।१२ पेन्स असतांना सरकार १४।१५ पेन्स भावाने परत-हुंड्या विकूं लागलें. ह्यांतहि अर्थात् सरकारचें म्हणजे प्रजेचें नुकसान झालें आणि ३५ कोटींचा चट्टा बसला तो अशा रीतीने बसला. जी हुंडी रुपयास २४ पेन्सप्रमाणे हिंदुस्थान सरकारने विकली त्याच हुंडीबद्दल रुपयास १२ पेन्स स्टेट सेक्रेटरीने देणें शक्य नाही. असो. पुढील आवृत्ति वरीलसारख्या दोषांनी विकृत होऊं नये म्हणजे झालें.

ह्यानंतर ग्रंथकर्त्याचे कांही सिद्धांत आक्षेपार्ह वाटतात त्यांचा उल्लेख करूं. पान ८ वर रा. खांडेकर लिहितात की, " ज्या देशांत सोन्याचें नाणें असून सर्व वस्तूंची किंमत सोन्याने ठरविली जाते त्या देशाला आपली आर्थिक उन्नति करून घेतां येते, असा युरोपखंडांतील राष्ट्रांचा अनुभव आहे. आमच्या मतें कार्यकारण-भावाचा हा विपर्यास आहे. देशांत व्यापार वाढला, लोक श्रीमंत झाले, यांत्रिक धंद्यांचा सर्वत्र फैलाव झाला, म्हणजे सोन्याच्या नाण्याची अवश्यकता उत्पन्न होते. मोठ्या प्रमाणावर जेथे व्यवहार होत नाहीत तेथे सोन्याची जरूरी भासत नाही. एखाद्या साध्या खेडेगांवांत सोन्याचें नाणें सुरू केलें तर त्यामुळे त्या खेड्याची आर्थिक उन्नति होईल असें मानण्यास कारण नाही. पण एवढें मात्र खरें की, लोकांच्या वाढत्या महत्वाकांक्षा सफल होण्यास सोन्याच्या नाण्याचा वापर अपरिहार्य आहे. सोन्याचें नाणें न वापरतां रुप्याचेंच वापरलें तर आर्थिक म्हणजे सांपत्तिक उन्नति होणार नाही असें नाही. पण सोन्याच्या नाण्याने व्यापाराला सुलभता येते, आणि काल व श्रम ह्यांचा व्यर्थ व्यय होत नाही. " " पैशामुळे राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य लोकांस मिळतें. " ( पा. १२ ) ह्यांत जशी अतिशयोक्ति भरली आहे, तशीच वरील विधानांत आहे असे आम्हांस वाटतें. शास्त्रीय विषयांवर लिहिलेल्या पुस्तकांत अतिशयोक्तीचा दोष न येऊं देण्याविषयी जपलें पाहिजे. अशा मासल्याचीं विधाने युरोपियन ग्रंथकारांनी केली आहेत, नाही असें नाही. तथापि तो दोषच समजला पाहिजे. अशाच मासल्याचें वाक्य पान ९ वर वाचकांना आढळेल. " हल्ली बनावट नाणीं पाडणें अशक्यच होऊन बसलें आहे. " वर्तमानपत्रें वाचणारांना हें म्हणणें जरा अतिशयोक्तिपूर्ण वाटेल; कारण खोट्या नाण्याचे खटले हल्लीहि पुष्कळ वेळां वाचण्यांत येतात.

ह्या पुस्तकांतला तिसरा दोष म्हणजे रा. खांडेकर ह्यांनी कांही ठिकाणीं मोकार व अर्थभंग करणारी भाषा वापरली आहे. त्याप्रमाणे इंग्रजीचें मराठी करतांना जितकी काळजी घ्यावी तितकी घेतली नाही. तें कसें हें आता आपण पाहूं.

" तसेंच एक मोठें खातें निर्माण करण्यांत यावें, ह्या खात्याचा संबंध टांकसाळ व तिचे अधिकारी यांच्याशीं असावा, व पेढ्या किंवा सरकार

त्यांच्याशीं बिलकूल नसावा." पान ८०–८१. ह्यांत सरकार हा शब्द फार व्यापक असल्यामुळे तो भ्रामक कल्पना उत्पन्न करतो. ह्याचें मूळ इंग्रेजी असें आहेः—

"This department would be entirely dissociated from banks and from the *Regular executive government.*" एक्झिक्यूटिव्ह गव्हर्मेंट म्हणजे अम्मलबजावणी करणारें खातें, सरकार नव्हे. तसेंच "पुढे ही रोख्यांची किंमत वाढून १९११ सालीं १४ कोटीपर्यंत गेली; व ह्या १४ कोटींपैकी ४ कोटीचे तारणरोखे हिंदुस्थान सरकारच्या तारणरोख्यांव्यतिरिक्त असावेत असें ठरलें." ( पृष्ठ ८३ ). ४ कोटींचे रोखे असावेत असें ठरलें नाहीं; असले तरी चालतील असें ठरलें. शिवाय 'हिंदुस्थानसरकारच्या रोख्यांव्यतिरिक्त'—म्हणजे दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राचे असल्यास चालतील असा अर्थ ध्वनित होतो. पण वास्तविक प्रकार तसा नाही. बाकीचे रोखे संयुक्तराष्ट्राचेच पाहिजेत. इंग्रेजींत 'Of which 4 crores might be securities of the United Kingdom' असें आहे.

पृष्ठ ८४ वर खालील वाक्यें वाचकांस आढळतील. "ह्या हुंड्यांबद्दल येथील सरकाराला आपल्या खजिन्यांतून रुपये देणें अशक्य झालें. तेव्हां स्टेटसेक्रेटरीनें येथील सरकारास चलनी नोटांप्रीत्यर्थ राखून ठेवलेल्या निधींतून पैसे देण्यास परवानगी दिली, व तितक्या किंमतीचें सोनें त्याच निधीच्या विलायतेमधील शाखेंत ठेवून दिलें." ह्यांत 'निधींतून पैसे देण्यास परवानगी दिली' हे शब्द अर्थविपर्यास करणारे आहेत. खरोखर म्हटलें म्हणजे विलायतेंतील सोन्याच्या हमीवर हिंदुस्थानसरकारास नोटा काढण्याची परवानगी मिळाली. ( Under the Gold Note Act, council drafts were sold against earmarked gold at the Bank of England belonging to the paper currency reserve and *paid for in India by notes* issued against such gold ).

८९ पानावरील शेवटलें सबंध कलमच निराळ्या मार्गेत लिहिलें गेलें पाहिजे होतें. "चलनी नोटांच्या ठेवलेल्या रकमेंतून जे रोखे हिंदुस्थान सरकारने काढावे, व बाकीचे रोखे ब्रिटिश साम्राज्यांतील इतर सरकारांनीं काढलेले असावे. ह्यांपैकी १० कोटींचे रोखे एका वर्षाच्या मुदतीचे असावे

व बाकीच्या रोख्यांबद्दल कांहीं ठराविक मुदतीनें पैसे मिळण्यासारखे असावेत; ह्या तीस कोटींपेक्षां जास्त किंमतीचे रोखेसुद्धां ब्रिटिश साम्राज्यामधील सरकारांनीं काढलेले व एका वर्षाचे आंतील मुदतीचे असावेत, व हल्लीं जी रोख्यांच्या किंमतीची मर्यादा कायद्यानें १२० कोटीपर्यंत ठरविली आहे ती कांहीं वेळपर्यंत राहूं द्यावी"!! आता मूळ इंग्रजी येणेंप्रमाणे आहेः–

"As regards the fiduciary portion of the reserve, the holding of securities issued by the Government of India should be limited to 20 crores. The balance should be held in securities of other governments comprised within the British Empire and of the amount so held not more than 10 cores should have more than one year's maturity, and all should be redeemable at a fixed date. The balance of the invested portion above these 30 crores should be held in short dated securities, with not more than one year's maturity, issued by government within the British Empire."

ह्याचा अर्थ असा की, कागदी चलननिधींत जे रोखे ठेवावयाचे त्यांत हिंदुस्थानसरकारने काढलेले रोखे वीस कोटींहून अधिक असूं नयेत. बाकीचे ब्रिटिशसाम्राज्यांतील इतर सरकारांनी काढलेले असावे व अशा रोख्यांपैकी सुद्धां ज्यांची मुदत भरण्यास एक वर्षाहून अधिक अवधि आहे असे रोखे १० कोटींहून जास्त असूं नयेत; आणि हे सर्वच ठराविक मुदतीचे असावेत. ह्या तीस कोटींच्या रोख्यांशिवाय बाकीचे रोखे साम्राज्यान्तर्गत कोणत्या तरी सरकारचे असून थोडक्या मुदतीचे असावेत; असे की त्यांची मुदत भरण्यास एक वर्षाहून अधिक काळ असूं नये.

आणखी पहाः–"ह्या नोटांच्या प्रसाराकरितां हिंदुस्थानचे तीन किंवा जास्त विभाग करण्यांत यावे व प्रत्येक विभागांत एक मुख्य शहर असावें व येथूनच नोटांचा प्रसार करण्यांत यावा. तीन विभागांचीं तीन मुख्य शहरें असावींत"—वगैरे (पा. ८९). तीन विभागांचीं मुख्य शहरें वाटेल तीं ठरविण्याचा अधिकार कायद्याने दिला नव्हता. इलाख्याच्या राजधानीचें शहर हेंच नोटा काढण्याचें व विभागाचें मुख्य शहर असलें पाहिजे, असें १८६१ च्या कायद्याने ठरविलें.

( ' The Presidency towns were to be the places of issue of three of the circles ' )

पृष्ठ ७२ मध्ये येणेंप्रमाणे मजकूर आहे :—" आपल्या जवळचें सोनें वाढविण्याकरितां सरकारने असा ठराव केला की, जितकें सोनें बाहेरून येईल तितकें आपण सांगूं त्या दराने विकण्यांत आलें पाहिजे. " एवढ्या चांगल्या पुस्तकांत असें अवास्तव विधान करणें चांगलें नाही. एका सॉव्हरीनला १५ रुपये, व ७. ५३३४४ ग्रेन सोन्याला १ रुपया, ह्या ठरीव दराने आयात सोन्याची खरेदी करण्याचा हक्क सरकारने आपल्याकडे घेतला.

" Where any gold is taken in possession of in the exercise of the power conferred by sub section ( 1 ) the Govern- or General in Council shall pay to the owner thereof on production of such documents as the authority making the order under sub-section 1 may require, a sum in res- ect of such gold calculated at the rate set out in the sche- dule ( Ordinance No. III. of 1917 ). "

विलायतेंतील कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनी मद्रास सरकारला लिहिलेल्या खलित्यांत ( स. १८०६ ) हिंदुस्थानांत मोलाचें अगर संपत्ति मोज- ण्याचें मुख्य परिमाण एकाच धातूचें असलें पाहिजे असें म्हटलें आहे. ( " The money or coin which is to be the principal mea- sure of property ought to be of one metal only ). पण पृष्ठ ३८ वर हा " मुख्य " शब्दच गळला आहे. उपनाणें ( Token coin ) सुद्धा मोलाचें परिमाणच होय, पण तें मुख्य परिमाण नव्हे.

असो. ह्या व अशांसारख्या किरकोळ गोष्टी वगळल्या असतां एकंदरींत सदरहू पुस्तक अत्यन्त उपयुक्त झालें आहे. चालू चलनपद्धतींतील मुख्य दोष म्हणजे, एवढ्या मोठ्या देशाला चलनच नाही ! त्याचप्रमाणे ह्या देशांत जें सोनें वास्तविक रीत्या यावयाचें तें विलायतेंतच ठेवलें जातें. आमचा रुपया म्हणजे कागदी नोटच होय. तुम्ही प्रचारांत नाणें फार आणूं नका. विकलेल्या मालाबद्दल जें ह्या देशास सोनें मिळावयाचें त्याच्या ऐवजी रुपयाचें लटकें नाणेंच आम्हांस पत्करावें लागतें. हें नाणें कोणी वितळीत नाही, म्हणून अशा नाण्याचा दुकाळ होऊन त्यामुळे महर्घता होते. बरें, हें सोनें आम्हांस इंग्लंडकडून घ्यावयाचें असतें तर गोष्ट वेगळी होती.

पण इतर देशांतूनच तें आम्हांस यावयाचें असतें व तें हल्लीच्या पद्धतीने परस्पर इंग्लंडला मिळून आमच्या देशांत रुपयेच मिळतात. उदाहरणार्थ, सन १९१३।१४ सालच घ्या. ह्या सालीं हिंदुस्थानाने एकंदर माल १६२८२१५०० पौंड किंमतीचा परदेशी पाठविला, व हिंदुस्थानांत आलेल्या मालाची किंमत १२२१६७१०० पौंड होती. अर्थात् इतर देशांनी आमचें देणें ४०६५४४०० पौंड निघालें. पण हें सर्व इंग्लंड खेरीज करून फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, बेलजम, रशिया इत्यादि देशांकडूनच यावयाचें होतें. कारण ह्याच सालीं संयुक्त राष्ट्राला ( इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड ) ३८२३४३०० पौंडांचा माल हिंदुस्थानाने पाठविला, तर त्या राष्ट्रापासून ७८३३३१०० पौन्डाचा माल विकत घेतला. म्हणजे हिंदुस्थानाने ४००९८८०० पौंड इंग्लंडला द्यावयाचे होतें. हें देणें देऊन बाकीचे सुमारें ४ कोट पौंड इतर देशांनी आम्हांस द्यावयाचे. पण ह्या सालचे प्रसिद्ध झालेले आंकडे पाहिले तर १॥ कोट पौंडही हिंदुस्थानांत आले नाहीत ! ह्या अशास्त्रीय पद्धतीचें वर्णन रा. खांडेकर यांनी फार मार्मिकपणाने केलें आहे. म्हणून मराठींतून ह्या क्लिष्ट विषयाचा परिचय करून घेणाऱ्यास ह्या पुस्तकापासून फायदा झाल्याशिवाय राहणार नाही, अशी आमची खात्री आहे. रा. खांडेकर यांच्या हातून उत्तरोत्तर ह्यांहीपेक्षा विस्तृत ग्रंथ ह्या विषयावर लिहिले जातील अशी आशा करून हें परीक्षण आम्ही पुरें करितों.

# 'रुपया अर्थात् आमचें चलन'

## [पुस्तकपरीक्षण]

अलीकडे हिंदी चलनपद्धतीकडे आमच्या विद्वानांचें लक्ष वेधून मराठींत एकामागून एक ह्या विषयावर ग्रंथ निघूं लागले आहेत, ही गोष्ट मराठी भाषेला अत्यन्त भूषणावह आहे. रा. खांडेकर यांच्या पुस्तकाचें परीक्षण विस्तारांत होऊन फारसे दिवस लोटले नाहींत तोंच 'रुपया अर्थात् आमचें चलन' हें पुस्तक विस्ताराकडे अभिप्रायाकरतां आलेलें पाहून आम्हांस मोठा आनंद होतो. ह्या पुस्तकाचे कर्ते रा. वामन नारायण गोडबोले व विनायक हरिहर घोरपडे हे आहेत. पैकी रा. गोडबोले हे एम्. ए. असून अजमीर कॉलेजमध्ये त्यांनी १०।१२ वर्षे अर्थशास्त्राच्या अध्यापकाचें काम केलें आहे. त्यानंतर ते राजाराम कॉलेजांत ह्याच विषयाचे प्रोफेसर होते. 'सर्व्हंट ऑफ् इंडिया' मध्ये चालू चलनपद्धतीवर त्यांनी जे इंग्रजी लेख प्रसिद्ध केले त्यावरून त्यांचा चलनपद्धतीवरील व्यासंग किती मोठा आहे ह्याची कल्पना होण्याजोगी आहे. रा. घोरपडे हे कोल्हापूर येथील एक विद्याव्यासंगी गृहस्थ आहेत. अशा अधिकारी माणसांकडून अत्यंत अवघड समजल्या जाणाऱ्या विषयावर मराठींत ग्रंथ लिहिला जावा ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. ह्या अडीचशें पानांच्या पुस्तकांत लेखकांची विद्वत्ता, लेखनचातुर्य व अधिकार हीं पदोपदीं दृक्प्रत्ययास येतात.

ह्या पुस्तकाचीं दहा प्रकरणें असून परिशिष्टांत इंपीरियल बँकेची घटनाही सविस्तर दिलेली आहे. (१) पूर्वेतिहास, (२) सुवर्णसंलग्नचलन, (३) हिंदुस्थानांतील धातूंचें चलन, (४) कागदाचें चलन, (५) कौन्सिल बिलें अथवा हुंड्या, (६) सुवर्णचलननिधि, नोटांचा निधि व खजिन्यांतील शिल्लक, (७) पैसा व त्याचें कार्य आणि चलनाचीं तत्त्वें, (८) हिंदुस्थानांतील बँका व त्यांचें स्वरूप, (९) महायुद्धाच्या काळांतील फेरबदल, आणि (१०) गुणदोषविवेचन. ह्याप्रमाणे दशप्रकरणात्मक हें पुस्तक

विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांनाही उपयुक्त वाटल्याशिवाय राहणार नाहीं असा आम्हांस पूर्ण भरंसा वाटतो. मासिकांतील विस्तृत परीक्षणाने पुस्तकाला प्रसिद्धि मिळते व म्हणूनच आम्ही हें परीक्षण करीत आहों. कारण, असल्या विषयावर मराठींत अनेक ग्रंथ व्हावे अशी आमची इच्छा आहे. त्यामुळें मराठीची योग्यता वाढणार आहे. असो. हिंदुस्थानांतील घेडगुजरी चलनपद्धतीचें स्वरूप ह्या पुस्तकांत चांगलें व्यक्त केलें असून ह्या पद्धतीचें समर्थन करणारांचें खंडनहि उत्तम तऱ्हेने केलेलें आहे.

तुम्ही हिंदुस्थानचा सुवर्णनिधि इंग्लंडमध्ये कां ठेवतां, असा प्रश्न केल्यास, हिंदुस्थानसरकारास रुपये पाडण्याकरतां विलायतेंत रुपें खरेदी करावें लागतें, तें विकत घेण्यास सोनें पाहिजे–तें लंडनमध्येच सुवर्णनिधि ठेवल्याने हिंदुस्थानांतून नेण्याचा त्रास व खर्च वांचतो,हे उत्तर मिळतें. पण रुपें विलायतेंतच खरेदी कां करावें ? हिंदुस्थानांतच खरेदी करण्याचा प्रघात पाडला तर व्यापारी येथे रुपें नाही का आणणार ? रुप्याचें मार्केट येथेहि अस्तित्वांत येईल. व्यापारी लोक येथें रुपें आणून सरकारास विकतील.

स्टेटसेक्रेटरीच्या गरजेपेक्षां अधिक हुंड्या कां विकतां ? असें विचारलें तर असें सांगण्यांत येतें की, हुंड्या विकल्या नाहीत तर व्यापारी हिंदुस्थानांत पौंड पाठवितील. पण हिंदुस्थानांतील लोकांना रुपये पाहिजेत, पौंड नकोत म्हणून हे पौंड ते सरकारी तिजोरींत देऊन रुपये मागतील, व असें झालें म्हणजे ते पौंड सरकारी तिजोरींत कुजत पडतील. परंतु इंग्लंडांतील व्यापारी पौंडच पाठवितील हें गृहीत कां धरतां ? सोनें पाठविणार नाहीत कशावरून ? सोनें पाठविलें म्हणजे लोकांच्या जवळ सोनें राहील, तिजोरींत जाणार नाही. शिवाय येथेहि सोन्याचें नाणें सुरू केलें तर लोक सरकारकडे पौंड घेऊन कशाला जातील ? वापरांतच हे पौंड राहतील खास.

आता सोन्याचें नाणें सुरू करा अशी टकळी लावली, की त्या योगानें कोट्यावधि रुपयांचें सोनें बिनव्याजी पडून राहील असा आक्षेप घेण्यांत येतो पण सोन्याचें चलन करा म्हटलें म्हणजे वापरांत सर्व चलन सोन्याचेंच ठेवा असा आग्रह कोणीं धरला आहे ? सोन्याच्या जोरावर नोटा काढतां येणार नाहीत काय ?

इंग्लंडमध्ये सुवर्णनिधि ठेवण्याचें दुसरें कारण असें पुढे करण्यांत येतें की, हुंडणावळ हिंदुस्थानच्या विरुद्ध गेल्यास इकडून इंग्लंडांत पौंड पाठविणें कठीण पडेल. लोकांच्या हातांत पौंड दिले तर ते दागिने करण्याच्या कामीं त्यांचा उपयोग करतील व इंग्लिश व्यापाऱ्यांचें कर्ज फेडण्यास जवळ कांही राहणार नाही. पण ही आपत्तीहि कांही दुस्तर नाही. खासगी व्यापाऱ्यांना पौंड देऊं नका, बँकांना द्या व त्यांच्यापासून हे पौंड आम्ही देशाच्या बाहेर पाठवूं असा करार करून घ्या.

ह्याप्रमाणे ग्रंथकर्त्यांनी निरुत्तर खंडन केलें आहे व त्याबद्दल मतभेद असणेंहि शक्य नाही. चालू सदोष चलनपद्धतीचें ग्रहण सुटण्यास सोन्याचें चलन हिंदुस्थानांत सुरू केलें पाहिजे, हा सिद्धांतहि सर्वमान्य होण्याजोगा आहे. "सुवर्णचलन स्थापित झालें म्हणजे, निधि, हुंडणावळ, कौन्सिलबिलें वगैरे सर्व 'पदार्थांचा' आपोआप अत्यंताभाव होईल" ही गोष्ट विलायतेंतील अधिकाऱ्यांना पटेल तेव्हा खरी. कारण वचन, कायदा, ठराव सर्व कांही झालें; फक्त कृति नाही. डॉकिन्स यानी हिंदुस्थानांत रॉयल मिंटची एक शाखा लवकरच उघडली जाईल असें जाहीर केलें. सोन्याचें नाणें चलनांत आणण्याचा आमचा पूर्ण निश्चय आहे अशी मेस्टन साहेबांनी खात्री दिली. दहा रुपयांचें सोन्याचें नाणें पाडण्याचें स्टेट सेक्रेटरींनीहि ठरविलें, पण ब्रिटिश ट्रेझरीने मध्ये विघ्न आणून हिंदुस्थान सरकारच्या सर्व ठरावांवर हरताळ फांसला! ह्या हकीकतीचें केलेलें वर्णन वाचकांस पानें ३, १५ व २६ ह्यांवर वाचावयास मिळेल.

हल्लीच्या पद्धतीने नोटा व रुपये यांचा वापरांत सुळसुळाट झाल्यामुळे घातकी महर्घता सर्वांस कशी जाचत आहे हेंहि ग्रंथकर्त्यांनी चांगलें सांगितलें आहे; पण आमच्या मतें ह्या गोष्टीचा अधिक विस्तार करावयास पाहिजे होता. पान २२७ वर ग्रंथकार लिहितातः "हल्लीच्या मितीस एकंदर चलनांत अदमासें २५० कोटी रुपये व १७५ कोटींच्या नोटा आहेत हें पूर्वी सांगितलेंच आहे. अशा रीतीने एकंदर चलन ४००।४२५ कोटींचें झाल्याने व व्यापारधंदा, उद्योग व आर्थिक उत्पादन स्थिर असल्याने रुपये जास्त व वस्तु कमी असें होऊन त्यांचें गुणोत्तर बदललें आहे." आता सन १९११ च्या गणतीप्रमाणे ह्या देशाची लोकसंख्या सामान्यतः ३१ कोटी होती असें धरलें तर माणशीं १४ रु. चलन पडतें.

याचा अर्थ असा की, माणशीं २० अगर ३० रु. उत्पन्न, आणि चलन रुपये १४. सन १९०० पासून वापरांत रुपये व नोटा किती होत्या हें खालील कोष्टकावरून दिसून येईलः—

| वर्ष | वापरीत असलेले रुपये | | ३१ मार्च रोजीं वापरांत असलेल्या नोटा | | नोटा रुपयांची बेरीज. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रकम कोटींत | दर माणशीं | रकम कोटींत | दर माणशीं | रकम कोटींत | दर माणशीं |
| १९०० | १३० | ४·५ | २२ | ·८ | १५२ | ५·३ |
| १९०१ | १४३ | ४·९ | २२ | ·७ | १६५ | ५·६ |
| १९०२ | १३८ | ४·७ | २२ | ·७ | १६· | ५·४ |
| १९०३ | १३६ | ४·६ | २५ | ·९ | १६१ | ५·५ |
| १९०४ | १४४ | ४·९ | २८ | ·९ | १७२ | ५·८ |
| १९०५ | १५२ | ५·२ | २८ | ·९ | १८० | ६·१ |
| १९०६ | १६४ | ५·६ | ३३ | १·१ | १९७ | ६·७ |
| १९०७ | १७८ | ६·१ | ३६ | १·२ | २१४ | ७·३ |
| १९०८ | १९१ | ६·५ | ३२ | १·१ | २२३ | ७·६ |
| १९०९ | १८७ | ६·३ | ३५ | १·२ | २२२ | ७·५ |
| १९१० | १८६ | ६·३ | ४० | १·४ | २२६ | ७·७ |
| १९११ | १८४ | ५·८ | ४० | १·३ | २२४ | ७· |
| १९१२ | १८२ | ५·८ | ४४ | १·४ | २२६ | ७·२ |
| १९१३ | १९१ | ६·० | ४७ | १·५ | २३८ | ७·५ |
| १९१४ | १८७ | ५·९ | ५० | १·६ | २३७ | ७·५ |
| १९१५ | २०४ | ६·५ | ४४ | १·४ | २४८ | ७·९ |
| १९१६ | ·१२ | ६·७ | ५३ | १·७ | २६५ | ८·४ |
| १९१७ | २२७ | ७·२ | ६७ | २·१ | २९४ | ९·३ |
| १९१८ | २१९ | ६·९ | ८४ | २·७ | ३०३ | ९·६ |
| १९१९ | २२८ | ७·२ | १३४ | ४·२ | ३६२ | ११·४ |

वरील कोष्टकावरून गेल्या १९ सालांत लोकांच्या वापरण्यांत दुप्पट चलन आलें हें उघड होतें.

आतां चलन फाजील झाल्यामुळे किमती वाढल्या अगर किमती वाढल्यामुळे चलन वाढवावें लागलें, हें आंकड्यांवरून ठरविणें जरा धोक्याचें खरें. कारण निरनिराळया माणसांनी दिलेल्या आंकड्यांतच फेर असतो. तथापि आंकड्यांचेंहि ह्या निर्णयास साहाय्य घेतलें पाहिजे ह्यांत शंका नाही. म्हणून १८९० पासून १९१२ पर्यंत सालोसालचा पदार्थांच्या किमतीचा ज्ञापक अंक ( Index number ) येथे देणे अवश्य आहे.

| साल | ज्ञापक अंक | साल | ज्ञापक अंक |
|---|---|---|---|
| १८९० | ९७ | १९०१ | ११६ |
| १८९१ | ९८ | १९०२ | १११ |
| १८९२ | १०३ | १९०३ | १०० |
| १८९३ | १०२ | १९०४ | १०६ |
| १८९४ | १०० | १९०५ | ११६ |
| १८९५ | १०१ | १९०६ | १२९ |
| १८९६ | १०६ | १९०७ | १३३ |
| १८९७ | १२१ | १९०८ | १४३ |
| १८९८ | १०६ | १९०९ | १३२ |
| १८९९ | १०४ | १९१० | १३२ |
| १९०० | १२२ | १९११ | १३४ |
| | | १९१२ | १४१ |

सन १९१३ चे आंकडे मिळाले नाहीत व पुढे महायुद्धाने उलथापालथ केल्यामुळे पुढच्या आंकड्यांचा उपयोगहि नाही. ह्या आंकड्यांवरून असें दिसतें की, स. १९०० पासून १९१२ पर्यंत शेंकडा १५ किमतीमध्ये वाढ झाली व त्याच्या पूर्वीच्या १० वर्षांत १८९७ साल वगळलें तर शेंकडा ४ ही झालेली नव्हती. आता स. १८९० साली रुपये व नोटा मिळून १२० कोटी रु. किमतीचें चलन वापरांत होतें तेंच स. १९१२ सालीं २१४ कोटी रु. चें झालें; म्हणजे चलनांत दुप्पटीचा फरक पडला. ( दत्त साहेबांचा रिपोर्ट ). आता व्यापारहि दुप्पटीवर वाढला असें सांगण्यांत येतें त्याचा विचार निराळा.

आता महर्घता कोणत्या पदार्थांसंबंधाने विशेष झाली हें पुढील आंकड्यांवरून कळेल. १८९० ते १८९४ पर्यंत दर सालच्या निरनिराळ्या पदार्थांच्या किंमतीचा सरासरीचा आंकडा १०० धरून पुढील ज्ञापक अंक दिले आहेत.

| साल | साखर | चहा व कॉफी | दुसरे खाद्य पदार्थ | गळिताचीं धान्यें तेलें व पेंड |
|---|---|---|---|---|
| १८९० | ९९ | ९५ | ९९ | ९७ |
| १८९१ | १०० | ९४ | ९७ | ९८ |
| १८९२ | ९८ | १०३ | १०१ | १०१ |
| १८९३ | १०२ | ९८ | १०३ | १०४ |
| १८९४ | १०१ | ११० | १०० | १०० |
| १८९५ | ९८ | १०० | ९४ | १०४ |
| १८९६ | ९८ | ९४ | ९९ | १०९ |
| १८९७ | १०१ | ८३ | ११० | ११४ |
| १८९८ | १०० | ७८ | ११० | १०१ |
| १८९९ | ९७ | ७१ | १०९ | १०१ |
| १९०० | १०४ | ६७ | १२० | १२२ |
| १९०१ | १०१ | ६६ | ११७ | ११८ |
| १९०२ | ९१ | ६५ | १०८ | ११४ |
| १९०३ | ९२ | ६६ | १०६ | १०० |
| १९०४ | ९६ | ६५ | १०६ | ९५ |
| १९०५ | १०५ | ६५ | ११५ | ११२ |
| १९०६ | ९९ | ६५ | १२५ | १३२ |
| १९०७ | ९९ | ७२ | १२५ | १४१ |
| १९०८ | १०६ | ६८ | १२४ | १४५ |
| १९०९ | १०९ | ७१ | १२४ | १३१ |
| १९१० | ११२ | ७९ | १३० | १४३ |
| १९११ | १०९ | ८३ | १३३ | १४९ |
| १९१२ | १११ | ८५ | १३६ | १५६ |

| साल | कापूस | कापड | कातडीं व चामडीं | धातू | कच्चा व पक्का माल | इमारती सामान |
|---|---|---|---|---|---|---|
| १८९० | १०२ | १०१ | ९५ | ९८ | १०० | ९९ |
| १८९१ | ९६ | ९७ | ९५ | ९८ | ९८ | ९९ |
| १८९२ | ९५ | ९५ | ९३ | १०० | ९९ | ९२ |
| १८९३ | १०५ | १०४ | १०५ | १०० | १०२ | १०१ |
| १८९४ | १०२ | १०३ | १०९ | १०४ | १०१ | १०२ |
| १८९५ | १०२ | ९९ | १२० | १०५ | १०६ | १०४ |
| १८९६ | १०२ | ९२ | १११ | १०४ | १०८ | १०७ |
| १८९७ | ९८ | ८८ | १०९ | १०५ | १०३ | १०९ |
| १८९८ | ९१ | ८४ | ११३ | १०६ | १०१ | ११२ |
| १८९९ | ८७ | ९४ | १२४ | १२२ | १०३ | ११३ |
| १९०० | १०८ | ८८ | ११५ | ११७ | ११२ | ११६ |
| १९०१ | १०४ | ८३ | ११८ | १२१ | १०७ | ११८ |
| १९०२ | १०२ | ८४ | १२६ | ११६ | १०४ | १२० |
| १९०३ | १०६ | ९३ | १३६ | ११६ | १०६ | १२२ |
| १९०४ | १२१ | ९१ | १४१ | ११३ | ११० | १२५ |
| १९०५ | ११३ | ९८ | १४८ | ११५ | ११२ | १२८ |
| १९०६ | १२१ | ९८ | १६४ | १२६ | ११८ | १३१ |
| १९०७ | १२३ | १०२ | १६१ | १३७ | १२३ | १३४ |
| १९०८ | १२१ | ८६ | १५० | १२१ | १२२ | १३६ |
| १९०९ | ११९ | ९३ | १५२ | ११६ | १२२ | १३८ |
| १९१० | १४१ | ९६ | १६४ | ११८ | १२७ | १४२ |
| १९११ | १४५ | ९५ | १५९ | ११९ | १२६ | १४६ |
| १९१२ | १३७ | ९८ | १७२ | १२६ | १३२ | १४९ |

वरील आंकडयांवरून असें दिसतें की, गळिताची धान्यें, पेंड, कातडीं, चामडीं व नंतर खाण्याचे पदार्थ ह्यांच्या किंमतींत मनस्वी वाढ झाली आहे. देशांतील जनावरें कमी झालीं, पेंड बाहेर गेली म्हणजे शेतीचा खर्च वाढतो; आणि धान्य महाग होतें. जगण्याचें साधन जें अन्न तेंच महाग झालें म्हणजे मजुरी वाढून इतर सर्व जिन्नस हळुहळू महाग होतात. म्हणून

कच्चा माल सर्वस्वी परदेशीं रवाना झाल्याने फायदा होतोच असें नाही. कच्चा माल हीच ज्या देशाची संपत्ति त्या देशाला व्यापार फायदेशीर होत नाही. अशा देशाच्या हातांत पैसे येतात खरे, पण ते पैसे यांत्रिक अगर इतर जिन्नस—परदेशांतून आलेले—खरेदी करण्यांत खर्च होतात. हा फरक फार महत्त्वाचा असून प्रत्येक अर्थशास्त्रज्ञाने लक्षांत ठेवला पाहिजे. येथून कापूस इंग्लंडला नेऊन तेथें कापड तयार होतें. आपल्या देशाला कापडाचा पुरवठा करून जास्त काढलेला माल इंग्लंड परत ह्या देशांत पाठवितें. आतां कापडावर किंमत जी आकारणार ती कापसाला पडलेली किंमत, माल बनविण्यास लागणारा खर्च व नफा, ह्या सर्वांचा अंतर्भाव करून आकारली जाते, हें उघड आहे. तेव्हां ह्या धंद्यांत इंग्लंडचें नुकसान कोठे झालें ? कापसाला पडलेली किंमत भरून निघेल इतका माल तयार करण्याची जबाबदारी बाळगली म्हणजे झालें. आता आपली स्थिति काय होते पहा. कापसाबद्दल आपणांस पैसे मिळाले खरे परंतु हे आलेले पैसे आपणांस कापडाकरता द्यावे लागले. असो. ह्यापेक्षा येथे अधिक लिहिणें शक्य नाही. तथापि धान्याची निर्गत त्यांतल्या त्यांत फारच जाचक होते. सुपीक सालांत आलेलें धान्य २।३ सालें पुरेल इतकें असतें असें कित्येक ठिकाणीं म्हटलेलें आढळतें. पण त्यांत कांही तथ्य दिसत नाही. असें असतें तर दुष्काळाच्या सालीं आस्ट्रेलिया वगैरे परदेशांतून धान्य आणविण्याची गरज लागली नसती. परंतु असें धान्य आणावें लागतें ह्यावरून लोकांजवळ शिलक धान्य नसतें असें म्हणणें भाग पडतें. संस्थानें धरून सर्व हिंदुस्थानांत दरसाल आठ कोटी टन धान्य म्हणजे दोन अब्ज चोवीस कोटी मण होतात. ह्यापेक्षा उपज जास्त होण्याचा संभव दिसत नाहीं. हें खालील आंकड्यांवरून कळून येईल.

स. १९१७।१८ सालीं धान्याच्या लागवडीची जमीन वीस कोटी सत्तर लक्ष एकर होती, व १९०८।०९ सालीं २९ कोटी ७० लक्ष होती. म्हणजे अधिक चांगली जमीन लागवडीस आणणें फारसें शक्य नाही. तसेंच १८९० पासून १९१२ पर्यंत धान्याच्या पिकाची मर्यादा १ अब्ज ८६ कोटी ७२ लक्ष मणांपासून २ अब्ज ४ कोटी ७ लक्ष मणांपर्यंतच कायती गेली. पण लोकसंख्या १८९१ पासून १९१२ पर्यंत २१ कोटींवरून २३ कोटींवर गेली. सारांश, लोकांच्या गरजेपेक्षा धान्याची निपज

कमी होते व ही गोष्ट दत्तसाहेबानी आपल्या रिपोर्टात सांगितलीही आहे. "In other words the requirements of food grains for internal consumption have increased in a larger proportion than the total production of food grains." वरील हिशेबांत ब्रह्मदेश धरलेला नाही. आता निर्यात माल म्हणजे धान्य मात्र दुपटीने वाढलें. १८९० ते ९५ ह्या पांच सालांची वार्षिक सरासरी काढली तर २८८९९००० हंड्रेडवेट धान्य हिंदुस्थानांतून परदेशांत गेलें. पण १९११।१२ सालांत ६४२४०००० हंड्रेडवेट धान्य परमुलखांत रवाना झालें. ब्रह्मदेशांतून व इतर देशांतून जे धान्य आयात होतें तें अर्धा कोटीपासून अडीच कोट हंड्रेडवेट पर्यंत असतें. ब्रह्मदेशांतून तांदूळ आले नाहीत तर हिंदुस्थानची उपासमारच होईल. आता देशांत पिकणाऱ्या धान्यापैकी लोकांच्या निर्वाहाला कांही धान्य जातें, कांही बी भरण्याकरता ठेवावें लागतें व बाकीचें निर्गत होतें. सन १८९९ सालीं फॅमिन कमिशनने केलेल्या अंदाजाप्रमाणे ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांस खाण्यास जवळजवळ ६ कोटी टन धान्य लागतें. नक्की आंकडे येणेप्रमाणेः—५८५३५८४५ ह्यांत ४८०५८४७२ माणसांचें अन्न म्हणून, ४२२३१७ बियाकरता; ३१९९३१० जनावरांकरता, ३०५४६९० वांया जातें तें. आता सदरहू रिपोर्टांत इंग्रजी मुलखांतील २१ कोटी लोकांना ६ कोटी टन अन्न लागतें असें धरलें आहे. सध्या सर्व हिंदुस्थानची लोकसंख्या ३१ कोटी आहे. तेव्हा वास्तविक पाहतां ९ कोटी टन धान्याची देशाला निर्वाहाकरतां जरूरी आहे. असे असून २ कोटी टन धान्य दरसाल परदेशी जात असतें. अर्थात् ३१ कोटी लोकांना ६ कोटी टन धान्यावर निर्वाह करावा लागतो. गेल्या कौन्सिलांत हिंदुस्थान सरकार तर्फे असें सांगण्यांत आलें की, चालू सालीं ९ कोटी टन धान्य निपजेल असा अंदाज आहे व त्यापैकी १८ लक्ष धान्य पुरून उरण्यासारखें आहे. ह्या बाबतींत नक्की अजमास करणें अशक्य असतें. म्हणून १८ लक्ष टन धान्य सुद्धा देशाबाहेर जाणें चांगलें नसल्यामुळे धान्याची निर्गत कायमची बंद करण्यांत सर्वांचें हित आहे. लोकसंख्या वाढत्या प्रमाणावर असते. त्या मानाने धान्याची निपज वाढत नाही. स. १८७२ सालीं लोकसंख्या २० कोटी होती तर ती हल्ली एकतीस कोटींवर आहे.

आता इतर देशांतील महर्घतेचा धक्का हिंदुस्थानासहि भोगवा लागतो असें प्रतिपादन करण्यांत येतें, त्यांत किती तथ्य आहे हें खाली दिलेल्या आंकडयांवरून समजेल.

## निरनिराळ्या देशांतील किंमतींचा (सोन्याच्या नाण्यांत) ज्ञापक अंक

१८९० ते १८९४ ह्या सालांच्या किंमतीन्ची सरासरी = १००

| | इंग्लंड. | बेलजम. | जर्मनी. | फ्रान्स. |
|---|---|---|---|---|
| १८९० | १०५ | १०१ | १०६ | १०४ |
| १८९७ | ९० | १०० | ९० | ८७ |
| १९०४ | १०१ | ११४ | १०६ | ९९ |
| १९०६ | १०७ | १२१ | ११८ | ११० |
| १९०८ | १०४ | १२७ | ११५ | १०५ |
| १९११ | ११४ | १२७ | १३४ | १२० |
| १९१२ | १२४ | (मिळत नाहींत) | (नाहींत) | (नाहींत) |

| | अमेरिका. | आस्ट्रेलिया. | हिंदुस्थान. |
|---|---|---|---|
| १८९० | १०६ | ११७ | ११३ |
| १८९७ | ८४ | १०२ | १२० |
| १९०४ | १०६ | ९८ | ११० |
| १९०६ | ११५ | १०५ | १३४ |
| १९०८ | ११५ | १२३ | १४७ |
| १९११ | १२१ | १११ | १३९ |
| १९१२ | १२८ | १३० | १४७ |

सदरहू आंकडे मुल्हालच्या आंकडे ग्रंथांतून घेतले आहेत.

वरील आंकडयावरून महायुद्धाच्या पूर्वी हिंदुस्थानांत इतर देशांच्या मानाने पाहतां स्वस्ताईच होती असें म्हटलें पाहिजे. म्हणजे इतर देशांत महर्घता झाली त्याचा हा परिणाम ह्या देशावरहि झाला असें मानण्यास कांहीं जागा नाहीं.

किंमती वाढण्याला दोन कारणें असतात. एक, पदार्थांचा पुरवठा मागणीपेक्षा कमी; आणि दुसरें पैसा पुष्कळ. ह्यांपैकी चलन फाजील झालें, व तें होत रहाणार, हें मागें आंकडे दिले आहेत त्यावरून सिद्ध होतेंच आहे. " चलन बेसुमार झालें व महागाई झाली. चलन पाण्यापेक्षा पातळ झालें " हें ग्रंथकर्त्यांचें विधान अगदीं बरोबर आहे पण ह्या महागाईची उत्कटता धान्यन्यूनत्वानेहि वाढली आहे असें मानण्यासहि कारण आहे, असें वरील विवेचनावरून दिसून येईल. व्यापारी मोसमांत, लोकांस रुपयांची गरज लागते तेव्हां, सरकारास रुपये पाडणें भाग पडतें. आता मंदीच्या दिवसांत हे सर्व रुपये परत सरकारी खजिन्यांत येत नाहीत. त्यामुळे दरसाल चलनांत भर पडत जाते. कारण रुपये कोणी वितळवीत नाहीत. त्यांत त्यांचा फायदा नाही. ह्यासाठीं कागदी चलननिधींतून मोसमांत सरकारने व्यापाऱ्यांस कर्ज द्यावें, ही ग्रंथकर्त्यांची सूचना आमच्या अर्थशास्त्रज्ञांनी व सरकारने विचार करण्यासारखी आहे. पण हल्ली हिंदुस्थानांत शिल्लक कोणत्याहि रूपाने जास्त झाली की, हुंड्या काढून तद्द्वारा ती विलायतेंत नेण्याच्या चालू प्रघातास अगोदर आळा बसला पाहिजे. सरकार टांकसाळींतून रुपये मनसोक्त रीतीने काढून लोकांवर लादतें असें कोणी शहाणा मनुष्य म्हणणार नाही. ह्या लौकिकी भ्रमाचा निरास ग्रंथकर्त्यांनी केला आहे. आपण सरकारकडे सॉव्हरिन, नोटा अगर कौन्सिलबिलें घेऊन जातों तेव्हाच आपणांस रुपये देणें सरकारास भाग पडतें. लोकांजवळ सॉव्हरिन फारसे नाहींतच. दरसाल सरकारी ५ कोटींचे सॉव्हरिन मोसमाच्या दिवसांत लोक सरकारकडे आणून त्याऐवजी रुपये घेऊन जातात. नोटाहि ह्याच प्रमाणांत येतात. सरकारी हुंड्या पटविण्याकरता मात्र दरसाल १५–१६ कोटी रुपये तरते ठेवावे लागतात. तात्पर्य, इंग्लंडांत सोन्याचा निधि ठेवल्यामुळे हें रुपयांचें चक्र सतत चालू ठेवावें लागतें, ही गोष्ट ह्या पुस्तकांत फारच उत्तम रीतीने विशद करून सांगितली आहे. ग्रंथकर्त्यांची विद्वत्ता पुस्तकांत ठिकठिकाणीं प्रत्ययास येते. आमच्या समजुतीप्रमाणे विद्वत्तेचा ठसा उठलेलें ह्या विषयावरील असें दुसरें पुस्तक पाहाण्यास मिळावयाचें नाही. या ग्रंथांत पुष्कळ अंगभूत गोष्टींचा ऊहापोह विद्वत्तापूर्वक केलेला आहे, त्या सर्वांचा येथे विचार करणें शक्य नाही. वाचकांनी मुळाकडे धांव मारिली पाहिजे. महर्घतेचा प्रश्न सोडविणें सोपें

काम नाही. तथापि हिंदी अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या हातांत अधिकार येईल तेव्हा धान्याच्या निर्गतीवरील प्रतिबंध उठविण्याचे ठराव पुढे न आणतां उलट धान्य देशाबाहेर जाणार नाही असे उपाय योजण्याचे प्रयत्न करावे. चलन गरजेपेक्षा फाजील आहे ही गोष्ट कित्येक लोक कबूल करीत नाहीत. त्यांच्या मतें उद्योगधंदे वाढल्यामुळे आहे हें चलन जरूरच आहे. १८९० सालीं व्यापाराचा ज्ञापक अंक ८५ होता तो १९१८ सालीं ४१७ वर आला. अर्थात् चौपटीहून अधिक व्यापारी घडामोड वाढल्यामुळे चलन अधिक लागलें हें कितपत खरें आहे, हें पाहणें तज्ज्ञांचें काम आहे. पण धान्य मुबलक आहे, चलन बेताचेंच आहे, मग महागाई कशाने झाली, हें नीटसें सांगतां येत नाही. इतर देशांकडे बोट दाखविल्याने समाधान होत नाही.

असो. ह्या पुस्तकांत चुकीचीं विधानें बहुशः नाहीत ही गोष्ट विशेष आहे. तथापि कांही थोडीं विधानें आक्षेपार्ह आहेत त्यांचा विचार होऊन पुढल्या आवृत्तींत तीं सुधारलीं जातील अशी आम्हांस आशा आहे. पान २८ वर पौंड हें कायदेशीर फेडीचें चलन आहे असें म्हटलें आहे, तें यथार्थ नाही. कीन्स साहेबांनी आपल्या पुस्तकांत (पा. ७४) हीच चुकी केली आहे, व तिचेंच प्रतिबिंब ह्या पुस्तकांत उठलेलें दिसतें. आमीं ॲक्ट पुरतेंच पौंड हें कायदेशीर फेडीचें चलन आहे. (स. १८९९ चा १९ वा कायदा पहा.) कोणत्याहि माणसाला आपल्या कर्जाची फेड पौंड देऊन करतां येईलच असा नियम नाही. "पूर्वी रुपें व सोनें यांमधील प्रमाण १:१० असें होतें तें आता १:१५, १:२०, १:२५ असें होऊं लागलें" (पा. ५). ह्यांत 'रुपें व सोनें' ह्यांच्याऐवजी 'सोनें व रुपें पाहिजे.' "विशेषतः नोटांची लोकप्रियताहि अगदीं आधुनिक असल्यामुळे, नोटांविषयीं अविश्वास होऊन, नोटा व रुपये जमविण्याची हूल केव्हा उठेल याचा नियम नाही. (पा. ११५)." ह्यांत "नोटा" शब्द चुकून पडला आहे असें वाटतें. "नंतर चेंबरलेन कमिशनने हें धोरण पसंत करून, सोन्याचें चलन करणें हें मूर्खपणाचें आहे असे ठरविलें! सुवर्णचलनासारखे उत्क्रांतीच्या उच्च शिखरावर गेलेलें चलनच हिंदुस्थानास हितकर आहे असें ठरवून, त्यांनी हा निधि इंग्लंडमध्ये ठेवावा असेंहि सुचविलें" (पा. ९८). सोन्याचें चलन व सुवर्ण ह्यांत फरक नाही. सुवर्णचलन ह्या

शब्दांच्या ठिकाणी 'सुवर्णविनिमयप्रमाणपद्धति' असें पाहिजे होतें. रुपयास १६ पेन्स हा भाव असला म्हणजे इंग्लिश व्यापाऱ्यांना आपले रुपये कायदेशीर रीतीने इंग्लंडांत पाठवतां येतात, असें विधान पा. २ व १११ वर केलेलें आढळतें. पण त्यांतील वाक्यरचना सदोष आहे. इंग्लंडांत रुपये पाठविण्याचें मुळी कारणच नाही, कां तर त्याचा उपयोग नाही. हिंदुस्थानांतील इंग्रजी व्यापारी रुपयांचे पौंड येथे करून ते इंग्लंडांत पाठवितात. आक्षेपविषयक भाषासरणी इंग्रेजी धर्तीवर गेलेली दिसते. एवढी गालबोटें वगळलीं म्हणजे सर्व पुस्तक येथून तेथून धुतल्या तांदळाप्रमाणे स्वच्छ, निर्मल व उत्कृष्ट आहे असेंच म्हणावें लागतें.

---

# जुन्या हुंड्यांचा नमुना

॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री दाजीबा चिपलोणकर स्वामींचे शेवेशी पो॥ गणपतराव धोंडदेव निदसुरे सा॥ नमस्कार विनंती विशेष हाली आपणावर चिठी केली आहे याजबद्दल पुणीयात रा. भिकाजी मोहाजने भरेकरी यास चिठी पावल्यावर मुदत रोज ०४॥ ०४॥ येकूण रोज नऊ नव रोजानी शाहाजोग याचा ठावठिकाणा चौकसी करून सिका रु. ११५ अक्षरीं एकशें पंधरा देऊन चिठीवर भरपाई करून घ्यावी. मि॥ चैत्र शु॥ १ शके १७४७ पार्थीव नाम संवत्सरे बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती ओळी शु॥ १२ बारा हे विनंती.

हुंडी सही

हरीकचंद पुरुशोत्तमदास धनीजोग.

॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री दाजीबा चिपळूणकर स्वामीचे शेवेशी पो॥ गणपतराव धोंडदेव निदसुरे सा॥ नमस्कार विनंति विशेष हाली आपणावर चिठी केली आहे त्याजबद्दल पुण्यात राजश्री विनायक जोसी व बहीरंव जोसी चिपळूणकर यांस चिठी पावल्यावर मुदत रोज ४॥ ४॥ येकूण नऊ नव रोजानी शाहाजोग याचा ठाव ठिकाण चौकसी करून चांदवड निर्मळ छापी रुपये ५०० अक्षरी पांचशे देऊन चिठीवर भरपाई करून घ्यावी. मि॥ कार्तीक व॥ ३० शके १७४६ तारण नाम संवत्सरे बहुत काय लिहिणे लोभ करीत जावा हे विनंती ओळी शु॥ १५ पंधरा.

हुंडी सही

वासुदेव जोसी चिपलोणकर जोग

लिखिते विनायक जोसी चिपलोणकर सदरहु हुंडीचे भरून पावलो.

॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री दाजिबा चिपलोणकर मु॥ पुणे स्वामीचे शेवेसी पा॥ गणपतराव धोंडदेव निदसुरे मु॥ बडोदे सा॥ नमस्कार विशेष हाली आपणावर हुंडी देणे केली. येक येथे राखले राजश्री बाबाजी खंडेराव भाटे यांचे सिका रु. १५० अक्षरी दीडशे याचे निमे पाऊणसे पाऊणश्याचे ऊणेपुरे करून हुंडी पुण्यांत आपले जवळ दाखल जाल्यावर मुदत रोज ८४॥ ८४॥ येकूण नव रोजानी म॥ निल्हे याचा टावठिकाणा पाहून चौकसी करून सिका देणे आणि हुंडीवर भरपाई करून घेणे. मि॥ माघ शु॥ १३ शके १७४७ बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती. हुंडीच्या ओळी सु. १२ बारा.

॥ श्रीशंकर ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री दाजीबा चिपलोणकर मु॥ पुणे स्वामीचे शेवेसी पो गणपतराव धोंडदेव निदसुरे मुा बडोदे सा॥ नमस्कार विनंती विशेष हाली आपणावर हुंडी देणे केली येक येथे राखले सेट बेचरदास सिरचंद याचे सिका रु॥ ५०० अक्षरी पाचसे याचे निमे अडीचसे अडीचश्याचे उणेपुरे करून हुंडी पुणीयांत आपलेजवळ दाखल जाल्यावर मुदत रोज ८४॥८४॥ येकूण नवा रोजानी शाहाजोगचा ठावठिकाणा पाहून चौकसी करून हुंडी बरहुम रु॥ देणे आणि हुंडीवर भरपाई करून घेणे मि॥ भाद्रपद व॥ ४ शके १७४८ बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती हुंडीचा ओळी सु॥ नऊ.

श्रीशंकर

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री दाजीबा चिपळोणकर मु॥ पुणे स्वामीचे शेवेसी पो गणपतराव धोंडदेव निजसुरे मु॥ बडोदे सा॥ नमस्कार विनंती विशेष हाली आपणावर हुंडी देणे केली येक येथे राखले राजश्री देवचंद कुबेरदास याचे सिका रु॥ ३०० अक्षरी तीनसे याचे नि॥ दीडसे दीडश्याचे उणेपुरे करून हुंडी पुण्यांत आपलेजवळ दाखल जाल्यावर मुदत रोज ८४॥८४॥ येकूण नवा रोजानी शहाजोगचा ठावठिकाणा पाहून चौकशी करून सिका देणे आणि हुंडीवर भरपाई करून घेणे मि॥ माघ शु॥ १३ शके १७४७ बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती हुंडीचा ओळी सु॥ ११ हुंडी सई जव्हेर दयालजोग.

# सूची


**अ**

आझिमशहा ३९
ॲडम स्मिथ २०
अथर्वपरिशिष्ट २२१
अदलाबदल २–६
० ची प्राथमिक पद्धति २
० तील अडचणी ३–५, ११
— किंमत ठरविता येत नाही ४
— विभाग करण्याच्या साधनांची उणीव ५–६
० म्हणजे काय ? २–३
अदलाबदल करितां येणारी हुंडी १८४–१८६
अनियंत्रित संख्यात्मक चलन–पद्धति ६६, ६९–७२
अनेकपदार्थात्मक कायदेशीर फेडीचें चलन २०६–२०८
अनेकात्मक चलन पद्धति (कायदेशीर फेडीची) ६६, ७३–७५
अमरकोश १४४, २१८, २२३, २२५, २२९, २४१
० तील कोष्टक १४४, २२१
अरिस्टॉटल् ३१, ६७, १५८
अल्युमिनियम् ३९, १००–१०२
अविनाश्यता (पैशाच्या द्रव्यांत लागणारी) २१, २५, २६

**आ**

आदिपरिमाण (मोलाचें) ५०, ५१, ५२
आयझॅक न्यूटन ७४
ऑस्ट्रियांतील चलनपद्धति १९१

**इ**

इन्नबस् (नाणें) ६४
इटलींतील चलनपद्धति ११७
इतर धातु ३८, ३९
इरीडिअम् २५
इरिडिओ प्लॅटिनम् धातूचीं वजनें ९१
इंग्लिश नाण्यांचें दशांशीकरण १४२, १४३

**उ**

उडते पैसे १५३
उपपैसा ५५, ५६
उपयुक्तता (पदार्थांची) ७, ८, ९

**ऋ**

ऋग्वेद २१४, २३९

**ए**

एकरंगी पद्धति १९०–१९२
एकात्मक चलनपद्धति–कायदेशीर फेडीची ६६, ७२, ७३
एट्रूस्कन (लोक) ४०

**ऐ**

ऐतरेय ब्राह्मण २३७
ऐतिहासिक नाणीं ४७, ४८
ऐनी अकबरी १२५
ऐंद्र (धातु) ३८

**ओ**

ओस्मीअम् (धातु) २५
ओस्म (धातु) ३८

अं
अंतर्राष्ट्रीय पैसा १३४–१४८
• च्या आदिपरिमाणाची निवड १४५–१४८
• पासून होणारे तोटे १३७–१३९
• " फायदे १३५–१३७
• संबंधीं वाटाघाटी १४०–१४२
क
कथील ३३, ३४
करन्सी कमिटी २८३, २८४
कर्नल बेअर्ड १२५
कलाकौशल्याच्या कामें ह्या दृष्टीने नाण्यांचा विचार ४६, ४७
कवड्यांचा पैशाप्रमाणे उपयोग १८
काकिणी २२२, २२३
कागदी चलन १५३–१५५, २५२, २५३
• चालविण्याचे प्रकार १६७–१७९
कागदी पैसा १७७–१७९
• कमी करतां येत नाही १७८, १७९
• चा अतिरेक १७८
कान्तरराय (पैसा) ५३
कातड्यांचा विनिमयसामान्यादाखल उपयोग १६, १५२, १५३
("चामड्याचा पैसा" पहा)
कापडाचा पैशाप्रमाणे उपयोग २०
कायदेशीर फेडीचें चलन ५७, ५८
• अनेकपदार्थात्मक २७६, २७८
• संयुक्त ६७, ७५–७७
कार्थेज १६
कार्यविभाग (पैशाचे) १४
कार्षापण २२०, २२१, २२४, २४३
काशिका १७, २१५, २१६, २१७
किंमत–मोल पहा
धातुगत ५६, ५७
—हद्द ५६
• म्हणजे काय? १०, ११, १२
• वाढण्याची कारणें (धान्याची) १०८
किरकोळ पदार्थांचें चलन २०
कैयट २४३
कोडम (नाणें) ४४
कोबंग ( ,, ) ६६
कोष्टक
—अमरकोशातील १४४, २२१
—कराचीचें २१५
—मनुस्मृतींतील २२०
कौटिलीय अर्थशास्त्र २२२, २२५
कौन्सिल बिल म्हणजे काय? २४५
कौमुदी २१५
कॅनडामधील चलनपद्धति ११४
कॅश (नाणें) १९, ४४
क्रयविक्रय २
ख
खांडेकर २८८, २९१, २९३, २९७
ग
गणक (नाणीं मोजण्याचा) १३०
गुलामांचा पैशाच्या कामीं उपयोग १७, २१६, २१७
गोडबोले २९८
ग्रेशामचा नियम अथवा सिद्धान्त ६०–६३, १३८
• ची व्याप्ति ६३–६५
ग्रॅहॅम साहेब १०१
घ
घोरपडे २९८
च
चक्रं (नाणें) ४६

-चलन—
० कागदी-चालविण्याचे प्रकार १६७-१७९
० कायदेशीर फेडीचें ५७-५८
० चा खर्च-धातुरूप १३२-१३४
० ची कार्यक्षमता २०९, २१०
० चीं तत्त्वें ५०-६५
० चीं वजनें-निरनिराळया ९८—१००
० चें वजन १५६-१५८
० त दिसून येणारें सवयीचें प्राबल्य (पैशाच्या) ५८-६०
० शिल्पनिर्मित व किरकोळ पदार्थांचे २०
० शेतकीच्या परिस्थितीतील १८, १९
० संबंधी थोडी माहिती-ब्रिटिश अंमलापूर्वीच्या २३०-२३६
चलन-हिंदुस्थानांतील ३०१
चलनपद्धति
० अनियंत्रित संख्यात्मक ६६, ६९-७२
० अनेकात्मक—कायदेशीर फेडीची ६६, ७३-७५
० एकात्मक— ,, ६६, ७२-७३
जगांतील मुख्य देशांतील १११, ११२
-ऑस्ट्रिया ११९
-इटली ११७
-कॅनडा ११४
-जर्मनी ११४-११५
-नॉर्वे ११५
-फ्रान्स ११५-११६
-बेल्जियम् ११६-११७
-ब्रेझिल १२०
-युनायटेड स्टेट्स् ११२-११३
-रशिया १२१
-वेस्ट इंडिया बेटें १२१
-स्वीडन ११५
-हंगेरी ११९
-हॉलंड व त्याच्या वसाहती ११७-११९
० तुलनात्मक ६६-६९
० तौलनात्मक २१८
० घेडगुजरी २१९
० संख्यात्मक २१८
० संयुक्त—कायदेशीर फेडीची ६६, ७५-७७
० हिंदुस्थानची-धात्वात्मक ७८-९१
० चें सामान्य स्वरूप-हिंदुस्थानच्या २४४-२८०
चलनी नोटा १६५, १६१
चामड्याचा पैसा ("कातड्याचा विनिमयसामान्यादाखल उपयोग" पहा) २१४
चीन १०७, २०३,
चेक १८२-१८४, २१०, २११
० चे प्रकार १८३-१८४
-शिक्याचे १८४
चेकबँक १९६-१९७
चेंबरलेन कमिशन २७२, २७३

छ

छान्दोग्योपनिषद् २४०

ज

जमाखर्ची पैसा आणि मोलाचें आदिपरिमाण ५२-५५
जर्मनींतील चलनपद्धति ११४-११५
जरतारीं नाणीं ३९
जीव्हन्स २३९
जुन्या हुंड्यांचा नमुना ३११-३१२

जेम्स (राजा) ३९
जैमिनीयन्यायमालाविस्तर २१७
जॉर्डासाहेब ४८

झ

झांज (नाण्याची) १२७–१३०
झेंदावेस्ता १७

ट

टक्का २३२
टरगो ४०
टांकसाळी ८८–९१
० मुंबईची ८९–९१
टॅव्हरमीअर ३३
ट्रेझरी–ब्रिटिश ३००

ठ

ठेवचिठ्ठी
—विशिष्ट १६१
—सामान्य १६१,१६२

ड

डी कूनासाहेब २२५, २४१
डॉकिन्स ३००

त

तागलू (नाणें) ३९,४४,४९,६८,७२
तारहुंडी २८४
तुलनात्मक चलनपद्धति ६६–६९
तंक (नाणें) ३९
तांबें ३४, ३८
तांब्याचें नाणें ८०–८२,९४,९५
—चा पुरवठा ८८

द

दत्तसाहेबांचा रिपोर्ट ३०२,३०६
दर्शनी हुंडी १५०, १८२–१८४
दशकुमारचरित् २२२
दस्तऐवज
दस्तऐवज ज्यावर व्याज मिळतें असे १८६,१८७
दागिन्यांचा पैशाच्याकामीं उपयोग १८
दीनार ६०, २२३
दोकडा ५३
दोन परिमाणें १०४–१०६
दोन पेढ्यांची पद्धति ११२, ११३
द्रम्म (द्रम्मा) ४०
द्रव्यपद्धतीचा परस्परविरोध १३९, १४०
द्विधातुपरिमाणापासून होणारें नुकसान १०९–१११

ध

धातु (पैशाच्या कामीं उपयोजिलेल्या)
—इतर ३८,३९, १००-१०२
—कथील ३३
—तांबें ३४
—निकल ३७, ३८
—प्लॅटिनम् ३७
—मिश्र ३९, १००-१०२
—रुपें ३४, ३५
—लोखंड ३१, ३२
—शिसें ३२, ३३
—सोनें ३५,३६
धातूंचीं तुलनात्मक वजनें ९९
(सोन्याशीं)
धातूच्या पैशापासून होणाऱ्या अडचणी १५६
धातुरूप चलनाचा खर्च १३२–१३४
धातुरूप विनिमय सामान्यें २१७–२३०
धात्वात्मक पैशाचे प्रकार ६५–७७

न

नायक २१८, २१९, २२०, २२१
नाणीं ४०–५०, २१७–२३०

नाणीं ऐतिहासिक ४७,४८
—ब्राँझ धातूचीं ९६,९७
— ,, (इंग्लिश) ९८
—मोजण्याची पद्धति १३०-१३२
—म्हणजे काय ? ४२,४३
—संयुक्त ९५,९६
—सोन्याचीं ८७
—हीण धातूचीं ९४,९५
—चा आकार १२५-१२७
—चा उत्तम प्रकार ४३,४४
—ची वत्पत्ति ४१,४२
—ची झीज १२७-१३०
—च्या धातुगत आणि ठरीव किंमती ५६,५७
—चा विचार (कलाकौश- ल्याचीं कामें या दृष्टीने ४६,४७
—चा पुरवठा (रुप्याच्या) ८५,८६,८७
—चा पुरवठा (तांब्याच्या) ८८
—चे दशांशीकरण (इंग्लिश) १४,१४२,१४३
—च्या वजनांत मुभा ७८,७९
—संबंधी विशिष्ट गोष्टी १२२-१३४
—तील हीण १२३-१२५
नाणे ५१-५५
—तांब्याचें (हिंदुस्थानांतील) ८०,८०,८२
—जमाखर्ची पैसा आणि मोलाचें आदिकारण ५२-५५
—परचुटण ९१-१०२
—पाडण्याचा हक्क फक्त राजालाच आहे ४८,४९
—पाडण्याच्या कामीं रुप्याच्या धातूची बंदी १०६-१०९
नाणें रुप्याचें ७८,७९,८०
—हलकें परत घेणें ८२,८३,८४,८५
निकल ३७,३८,१००-१०२
निर्गत व्यापार २७३,२८०,२८१
निष्क ६७
निष्पत्ति (चलन संख्येचे नियमा विषयीं) २११
नेपोलियन (नाणें) ११०
नॉर्वेतील चलनपद्धति १९५

प

पंचतंत्र २२२,२२७,२२८
पण (पणम्) ३४,६७,२३६
पतंजलि २१५
पन्हाळे रुपये ५४
परचुटण (नाणें) ९१-१०२
परत हुंड्या २४४-२८३
परराष्ट्रीय हुंड्या १९८-२०५
—चा व्यापार २००-२०५
परिमाणवाद (मुख्य) १०३-१२२
—दोन १०४-१०६
—पासून होणारें नुकसान १०९-१११
पल ६७
पलाद ३८
पशुपाल-वृत्तींतील चलन १६,१७
पशूंचा पैशाच्या कामीं उपयोग १६,१७,२१५,२१७,२१८
पाणिनि २१६,२२४,२३६,२४०
पादष्टी २२
पीटर दी ग्रेट १६
'पेक्यूनिया' १७
पेगू २२९
पेढीची पद्धति १८९-१९५

पेढीची पद्धति एक १९०-१९२
—दोन १९२, १९३
—शाखात्मक १९४, १९५
—संकीर्ण १९३, १९४
पेल्या वटावी २८१
पै ५३
पैसा २८८, २८९
—कशाला म्हणतात ? ३
—कागदी १७७, १७८-१७९
—कमी करतां येत नाही १७८, १७९
—चा अतिरेक १७८
—चा आद्यकालीन इतिहास १५-२०
—चा अभाव १
—चा उपयोग ३
—ची व्याख्या १८७, १८८, १८९
—ची संख्या (राष्ट्राला लागणाऱ्या) २०८, २०९
—चे कार्यविभाग १४
—चे प्रकार, धातवात्मक ६५-७७
—च्या ऐवजीं उपयोग, दागिन्यांचा १८
—च्या कामीं उपयोजिलेल्या धातु ३०-३९
—च्या कामीं गुलामांचा उपयोग १७, २१६, २१७
—च्या कामीं धान्याचा उपयोग १८, १९, २१५
—च्या कामीं पशूंचा उपयोग १६, १७, २१५, २१७, २१८
—च्या चलनांत दिसून येणारें सत्र-यीचें प्राबल्य ५८-६०
—च्या द्रव्यांत लागणारे गुणधर्म २०-३०
अविनाश्यता २१, २५, २६
उपयुक्तता व मोल २१-२३
—मोलाची स्थिरता २१, २७-२९
—साधर्म्य २१, २६
—सुवाह्यता २१
—सुविभाज्यता अगर विभाज्यता २१, २६, २७
—ज्ञेयता २१, २९, ३०
—च्या वायदेचिल्या १६४, १६५
—ने करावयाचें कार्य २०९
—पासून होणारीं कार्यें ११-१५
—पासून होणाऱ्या अडचणी (धातूच्या) १५६
—मूल्य आणि उप ५५, ५६
—शिकारी युगांतील १५, १६
पैसा आणि विनिमयाचीं साधनें १-६
पैसे—
—'उडते' १५३
—पेढीचे १५५
पोटनाण्यांची रचना अथवा क्रम १४३-१४५
पोलक्स ३२
पोलाद १०१, १०२
पौंड (स्टर्लिंग) १४१-१४३
प्रतिनिधीभूत पैसा १४९, १५०, १५०-१६०
—चा प्राचीन इतिहास १५२-१५५
—च्या उपयोगाचीं कारणें १५५, १५६
—ने व्याज वांचतें १५८-१६०
प्रतिनिधीभूत पैशाच्या चलनाचा अथवा फिरतीचीं तत्त्वें १६५, १६६

प्राक्कालीन अधातुरूप विनिमय सामान्य २१३-२१७
प्रामिसरी नोटी १६०, १८१
— व्यवहारोग १६५
प्लॅटिनम ३६, ३७
प्लिनी ४०, ६७

फ

फया ४६
फाउलर कमिटी २६१, २६२
फेनिशा ( प्रवासी ) ६४, २८९
फ्रॅन्सिस ग्लॅडविन २४१
फ्रान्समधील चलनपद्धति ११५, ११६

ब

बिल ऑफ एक्स्चेंज १८४
बिलन ९४, ९५
बुकॅनन २८९
बुद्धसूत्र २२२
बेअर्ड ( कर्नल ) १२०
बेगसर २
बेल्जममधील चलनपद्धति ११६, ११७
बँक ड्राफ्ट १८३, १८४
बॅबिंग्टन कमिटी २८१
ब्रॉझ ( धातु ) ९७
-- ची नाणी ८२, ९३, ९६-९८
ब्रिटिश अमलापूर्वीच्या चलनासंबंधाने थोडी माहिती २३०-२३६
ब्रेझिलमधील चलनपद्धति १२०, १२१

भ

भट्टोजी दीक्षित २२४, २२५
भागवत ६
भारतीय चलनपद्धति २८०-२९७
भास्कराचार्य २२२, २२७, २२९

म

मनु १४४
मनुस्मृति ४३, २१८, २१९, २२९
मनुस्मृतीतील कोष्टक २२०
मलाया बेट १
महर्घता २९०, ३०२-३०९
महाभारत ४१, २२३, २४०
मार्क १४३
मिरॅबो ७५
मिल १४२
मिश्रधातु ३९
मुख्य आणि उपपैसा ५५, ५६
मुख्य परिमाणवाद १०३-१२२
'मुमा' (नाण्यांच्या वजनांत) ७८, ७९
मुलहॉल ३०७
मुंबईची टांकसाळ ८९-९१
मृच्छकटिक २१९, २२८
मेदिनीकोश २२३
मेरियाथेरिसा डॉलर १२६
मोल (किंमत पद्दा) ८, ९
—चा संग्रह १३
—चें आदिपरिमाण ५०,५१,५२
५२-५५
—चें कोष्टकात्मक परिमाण २०५-२०८
—चें परिमाण (सर्वसामान्य) ११,१२,१३
मोलाविषयी सिद्धांत ९
मोहोर ४२,५४,७२,८२,२३३
मँगेनिज् ३९,१००-१०२

य

याज्ञवल्क्यस्मृति ४४,२१८,२१९,२२५
युनायटेडस्टेट्समधील चलनपद्धति ११२,११३
येन ११२

र

रशियांतील चलनपद्धति १२१,१२२
राजनीति (ग्रंथ) ६७
राजवाडे २४३
राटेस्ले (लॉर्ड) १४२
राधाकृष्ण ५९
रानटी लोक २
रामायण ४१,२४०
राष्ट्राला लागणाऱ्या पैशाची संख्या २०८-२११
'रिव्हर्स कौन्सिल बिल' २४४-२८६
—म्हणजे काय? २४५
रुक्का २३२
रुपया ६३,७८,७९,२२४-२२७, २३१,२३४,२३५,२४१-२४३,२५२,२७७
'रुपया' अर्थात् आमचें चलन २९८-३१०
रुपया शीरशहानेच सुरू केला काय? २३७-२४४
रुपें ९,३४,३५
रुप्याचें नाणें-नाण पहा
रुप्याच्या धातूची बदी (नाणें पाडण्याचें कामीं १०६-१०९
रुप्याच्या नाण्याचा पुरवठा (नाणें पहा)
रूबल् ५४
रेस ५३

ल

लक्षादीक्षित २२८
लायकरगस ४१
लारिन् ४२
लिव्हरपूल (लॉर्ड) ७६,७७,१०३
लीलावती २२२,२२७
—तील कोष्टक २२२
लोखंड ३१, ३२

व

वजनें (निरनिराळ्या चलनाची) ९८-१००
वजावाट ६
वजावाटपद्धति १५०
—संस्थांचा परिणाम २१०,२११
वतनपद्धति २८९
वह्यांतील जमाखर्च १८९-१९५
वायदेचिठ्या, (पैशाच्या) १६४,१६५
वायदेचिठ्यांचें स्वरूप आणि जाति १६०-१६६
वायद्यांतील फरक, सामान्य आणि विशिष्ट १६२-१६४
विनिमय ६-११,१२,१३
—चें साधन १४८,१५०
—म्हणजे काय? ७
विनिमयक्रिया २
विनिमयव्यवहार ९
विनिमयसामान्य ११,१३
—त एकापुढें एक झालेले फेरफार ११९
—धातुरूप २१७-२३०
—म्हणजे काय? ३,
—म्हणून मनुष्य-जातीचा उपयोग २३८
विनिमय-सामान्यें प्राक्कालीन अधातुरूप २१३-२१७
विभाग करण्याचें साधन ३
विशिष्ट ठेवचिठ्ठी १६१
विज्ञानेश्वर २३९
वूलोस्की १०६, १०७
वेद ४१
वेस्ट इंडिया बेटांतील चलनपद्धति १२१

**श**

शर्मन् ( कायदा ) ११३

शास्त्रात्मक पेढ्यांची पद्धति ११४, ११५

शिकारी युगांतील पैसा १५, १६

शिवराई ४६, ५९, ६०, ९३, ९८, २३१

शिवाजी ४७, ५९

शिसें ३२, ३३, ३६

शीरशहा २२५, २२६

—नेंच रुपया सुरू केला काय ? २३७–२४४

शुक्रनीति २९०

शेतकीच्या परिस्थितींतील चलन १८, १९

' श्री ' ५९

**स**

सणी २३२

समानपरिमाणात्मक पद्धति ७२

सर्वज्ञ नारायण ४३, २१९

सवदा ३

संवयीचें प्राबल्य, पैशाच्या चलनांत दिसून येणारें ५८–६०

साकपत्रें १८०–१८९

साधर्म्य, (पैशाच्या द्रव्यांत लागणारें) २१, २६

सामान्य आणि विशिष्ट बायर्यातील फरक १६२–१६४

सामान्य ठेवचिठ्ठी १६१,१६२

सीसर ४१

सुवर्णनिधि (हिंदुस्थानचा)२६२,२६७, २६८,२९९,३००

सुवाह्यता ( पैशाच्या द्रव्यांत लागणारी ) २१,२३–२५

सुविभाज्यता २१,२६,२७

सेंट ५५,११२

सेन ११२

'सोनारांच्या नोटी' १५६

सोनें ३५,३६,३८,४०,४१

सोन्याचीं नाणीं (नाणें पहा)

संकीर्ण पेढ्यांची पद्धति ११३,११४

संयुक्त-चलनपद्धति—कायदेशीर फेडीची ६६,७५–७७

स्पेन्सर ('हर्बर्ट स्पेन्सर' पहा)

स्मिथ कमिटी २७६,२७७

स्वस्तिक ५९

स्वीडनमधील चलनपद्धति ११५

**ह**

हर्बर्ट स्पेन्सर ४८,४९,६२

हर्शेल कमिटी २५९

—च्या सूचना २६०

हलके नाणें परत घेणें (नाणें पहा)

हिंदुस्थानची धात्वात्मक चलन-पद्धति ७८–९१

हिंदुस्थानच्या चलनपद्धतीचें सामान्यरूप २४४–२८६

हुंडी २९४

—अदलाबदल करितां येणारी १८४-१८६

—तार २८४

—दर्शनी १८२,१८३

—पेढीवाल्याची १८३,१८४

हुंड्या

—चा नमुना (जुन्या)३११,३१२

—परराष्ट्रीय १९८–२०५

—ची मूळ उत्पत्ति व स्वरूप १९८–२००

हेमचंद्र पंडित २२५

होन ४४,७२,१२५,२३२,२३३
'होमचार्जेस' २४६,२४८,२४९,२८०
होमर १७,४१,२१४
होवर्थ २४१
हंगेरीमधील चलनपद्धति ११९,१२०
हॅरिसन्साहेब १३३
हॉलंड व त्याच्या वसाहतींतील चलनपद्धति ११७,११८,११९

क्ष

ज्ञानेश्वर १६
ज्ञानेश्वरी २१४
ज्ञापक अंक ३०२,३०३,३०४,३०७
ज्ञेयता (पैशाच्या द्रव्यांत लागणारी) २१, २९, ३०

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५ | मथळ्याची ओळ | कार्यविभाग | पैशाचा आद्यकालीन इतिहास |
| १६ | टीप | प्राक्कालीन वगैरे | पुढे पान २१३ पहा |
| १७ | मथळ्याची ओळ | पैशापासून होणारीं कार्ये | पैशाचा आद्यकालीन इतिहास |
| १७ | टीप | निवडक लेख वगैरे | पुढे पान २१७ पहा |
| १९ | टीप | निवडक लेख वगैरे | पुढे पान २१५ पहा |
| २१ | १८ | विभाज्यता | सुविभाज्यता |
| ४१ | मथळ्याची ओळ | पैशाच्या कामीं उपयोजिलेल्या धातू | नाणीं |
| ४३ | ,, | ,, | ,, |
| ४५ | ,, | ,, | ,, |
| ४७ | ,, | ,, | ,, |
| ४९ | ,, | ,, | ,, |
| १०५ | ,, | परचुटण नाणें | मुख्य परिमाण-वाद |
| १०७ | ,, | ,, | ,, |
| १०९ | ,, | ,, | ,, |
| १११ | ,, | ,, | ,, |
| ११३ | ,, | ,, | ,, |
| ११५ | ,, | ,, | ,, |
| ११७ | ,, | ,, | ,, |
| ११९ | ,, | ,, | ,, |
| १२१ | ,, | ,, | ,, |
| १३३ | १९ | नुकसाची | नुकसानाची |
| १३५ | पृष्ठाचा आंकडा | ५३१ | १३५ |
| १३५ | मथळ्याची ओळ | नाण्यासंबंधीं विशिष्ट गोष्टी | अन्तर्राष्ट्रीय पैसा |

| | | | |
|---|---|---|---|
| १३७ | ९ | करित | करिता |
| १३७ | ,, | ,, | ,, |
| १३९ | ,, | ,, | ,, |
| १४१ | ,, | ,, | ,, |
| १४३ | ,, | ,, | ,, |
| १४५ | ,, | ,, | ,, |
| १४७ | ,, | ,, | ,, |
| १३७ | ९ | करित | करिता |
| १९५ | मथळ्याची ओळ | आणी | आणि |
| २२९ | ,, | ब्रिटिश अमलापूर्वीच्या वगैरे | धातुरूप विनिमयसामान्य अथवा नाणें |
| २३२ | ,, | पैसा | आर्थिक निबंध |
| २५६ | २१ | | याच्यापुढे 'पान २५७ पहा' असें वाचावें |
| २६१ | ,, | ६१ | २६१ |
| २६९ | पानाच्या खाली | ——— | कोष्टक पुढे चालू असें वाचावें |